Satara Historical Research Society

2

Historical Papers of the

# SINDHIAS OF GWALIOR

1777-1793

Price Rs 7/-

1940

सातारा इतिहास संशोधक मंडळाची

# ऐतिहासिक लेखमाला

## २

भाग १ महादजी सिंदे ले० १ - २५८
भाग २ पेशव्यांचा कारभार ले० २५९ - ४२४

संचयक— द बा डिस्कळकर, माजी क्यूरेटर, सातारा म्यु०,
संपादक— गो स सरदेसाई, रियासतकार, कामशेत

किंमत ४ रुपये

इ स १९४०

Printed by Mr S K Joshi LL B, at the "*City*" Press Satara Mangalwar Peth
and published by Mr V S Bakhle Secretary Satara Historical Research Society

Respectfully dedicated

to

**His Highness Maharaja**

**GEORGE JIVAJI RAO SCINDHIA**

**Bahadur, Maharaja of Gwalior,**

in appreciation of his intense interest in our national history

*By*

The Satara Historical Research Society

# FOREWORD

( Sir Jadunath Sarkar, Kt C I E, D Litt, Hony M R A S of Great Brittain, Hon Fellew, R A S of Bengal )

The Satara Historical Research Society has completed a very useful and important task by printing in this carefully edited and indexed volume the residue of Nana Fadnis's collection of historical papers ( known as the Menavali Daftar ), which has been purchased by the Bombay Government from the heirs of Rao Bahadur D B Parasnis It is a volume that no student of Maratha history can do without Many of the records here published for the first time, give invaluable information from contemporary sources, ranging from 1713 to 1802 and throwing new light on the careers of the great Peshwa Baji Rao I and his successors

The sober statesmanship of Raja Shahu finds another illustration in letter No 268 A few letters supply fresh details of Bhau's expedition to Panipat There are letters, hitherto unknown, from the Pashwa Madhavrao Ballal, elucidating his relations with Raghunathrao Quite a large number of papers is being published here for the first time, which desribe the delicacy of the situation of the Barabhais after the murder of Narayanrao No 375 contains a judicious remonstrance addressed to Nana Fadnis by his agent Baburao Krishna at Satara on the subject of Ram Raja being compelled to adopt a son Parasnis appears to have obtained copies of important papers of this class from the Satara Palace

But it is not Deccan history alone, or even principally, that this volume illuminates It contributes even more largely to the study of the career of the great Mahadji Sindhia, to whom 258 out of the 424 letters are devoted The two leading figures on the stage of Indian history in the last quarter of the eighteenth century – Mahadji Sindhia and Nana Fadnis – stand out in their contrasted personalities in this volume, no less markedly than in the mass of letters printed by H H the Maharajah Sindhia's Government under the editorship of Rao Bahadur G S Sardesai as " Historical Papers relating to Mahadji Sindhia, " from the same Menavali store

It is a good work well done, and ought to make its way in the world of scholarship by its undeniable intrinsic value

**Jadunath Sarkar.**

# प्रस्तावना

सातारा-इतिहास-संशोधक मंडळानें चालविलेल्या कामाचा हा दुसरा खंड आहे पहिला खंड सुमारें पांच वर्षां पूर्वी " सिंदेशाहीचीं राजकारणें " या नावानें प्रसिद्ध झाला सातारा म्यूझियम मध्यें ऐतिहासिक महत्त्वाचे कागद पूर्वी बाहेर न आलेले बरेच आहेत असें आढळून आल्या वरून ते छापण्याची व्यवस्था साताऱ्याच्या मंडळानें स्वीकारली, तिचें प्रयोजन पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत सांगण्यांत आलें आहे म्यूझियमचे क्युरेटर रा डिस्कळकर यांनीं कित्येक उपयुक्त कागद निवडून त्यांच्या नकला मजकडे पाठविल्या, त्या सर्व मीं वाचून इंग्रजी व इतर टीपा लिहून छापण्यासाठीं साताऱ्यास मंडळाचे सेक्रेटेरी रा बखले यांजकडेस दिल्या ते हे कागद आतां वाच कांपुढें ठेवण्यास मला संतोष वाटतो

ज्या असल कागदांवरून रा डिस्कळकरांनीं या नकला केल्या, ते मला पाहण्यास मिळाले नाहींत त्यांनीं मला कळविलें कीं म्यूझियममध्यें कै पारसनीसांनीं मूळ कागदांच्या नकलाच ठेविल्या होत्या, त्यांवरून त्यांनीं या दुसऱ्या नकला तयार केल्या अर्थात् नकलांत वाचनाचे वगैरे जे दोष मला आढळले त्यांतले सहज सुधारण्यासारखे दिसले ते मीं सुधारले, परंतु कांहीं तसेच राहू देणें भाग पडलें

या खंडांत एकंदर पत्रसंख्या ४२४ आहे, पैकीं सुमारें अडीचशें लेख महादजी शिंद्याच्या स्वाऱ्यांचे दिसले, तेवढे निराळे काढून ते या खंडाच्या पहिल्या भागांत छापले आहेत बाकीचीं पत्रें बहुतेक पेशवाईच्या सामान्य कारभाराचीं असून तीं या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत दाखल केलीं आहेत तथापि ही व्यवस्था केवळ स्थूल मानाची असून विषय विभागणीच्या दृष्टीनें स्वीकारली आहे पेशवाई व्यवहाराचेही कांहीं कागद पहिल्या महादजी शिंद्याच्या भागांत दाखल झाल्याचें मागाहून आढळून आलें पहिल्या भागाचीं १८६ पृष्ठें असून त्यापुढें अखेरपर्यंत दुसरा भाग ठरविला आहे

दोनही भाग आपापल्यापरी अत्यंत महत्त्वाचे आहेत महादजी शिंद्याचा एकंदर पत्रव्यव हार प्रचंड असून तो या पूर्वी निरनिराळ्या ठिकाणीं प्रसिद्ध झालेला अभ्यासकांस माहीत आहे काव्येतिहास संग्रहाचा 'पत्रें यादी' खंड, समर्थभारत छापखान्यानें प्रसिद्ध केलेला 'ऐतिहासिक पत्रव्यवहार' नांवाचा खंड, दोन वर्षांपूर्वी ग्वाल्हेर दरबारानें बाहेर आणलेला पारसनीसांच्या पांच पुस्तकांचा मोठा खंड, शिवाय कोटेकर पंडिताच्या दप्तरांतले भाग वगैरे पुष्कळ ग्रंथांतून महादजीचे कागद छापलेले आहेत, पण त्यांत ज्या कित्येक उणीवा होत्या त्या बहुतेक या पुस्तकांतील काग दांनीं भरून येणाऱ्या आहेत यांतील बरींचशीं पत्रें नारो शिवदेव व सदाशिव दिनकर यांनीं लिहिलेलीं असून, त्याच लेखकांचीं पुष्कळ पत्रें वर सांगितल्याप्रमाणें पूर्वी प्रसिद्ध झालेलीं आहेत महादजीच्या मोठ्या स्वाऱ्या उत्तर हिंदकडे झाल्या, दक्षिणेंतील त्याचा उद्योग मुख्यत कोल्हापूर स्वारी, व तोतयावरील स्वारी, या संबंधाचा असून, त्याचीं भरपूर पत्रें या पुस्तकांत नवीनच प्रसिद्ध होत आहेत पैकीं बरींचशीं पत्रें धोंडो बहिरव नांवाचा नाना फडणिसाचा हस्तक महादजी बरोबर कोल्हापुरच्या स्वारींत होता, त्यानें लिहिलेलीं चमत्कृतिजनक वाटतील या लेखकाची भाषा गांवढळ व अतथ्य कारभारांत त्यास प्रवेश नव्हता, सबब बाहेरच्या अवांतर गप्पा कंड्या इत्यादि जें काय लेखकाच्या कानावर पडलें, तें दिनचर्येच्या रूपानें त्यानें नानास कळवि लेलें आढळतें भरपूर बातमी काढण्याची नानाची पद्धत या धोंडो बहिरवाच्या लेखांत व्यक्त होते अभ्यासकाच्या सोयीसाठीं महादजीच्या पत्रांचे पुढील चार पोटविभाग कल्पिले आहेत -

१ ले० १—७६ कोल्हापुर स्वारी,
२ ले० ७७—९३ तोतयावरील स्वारी,

३ ले० ९४—११७ पुण्यातील वाटाघाटी,
४ ले० ११८—२५८ गुजरात व माळवा

हा शेवटचा भाग उत्तरहिंदच्या व्यवहाराचा असून त्यातील कागदांच्या तारखा सर जदुनाथ सरकार यांनी मुक्रर करून दिल्या

पत्राच्या शेवटीं जेथें X खूण असेल, तेथून पुढील अक्षरें निराळ्या वळणाची समजावी

ले० २५९-४२४ चे कागद पुस्तकाच्या दुसऱ्या भागात स्वतंत्र कालक्रमानें छापलेले अत्यंत महत्वाचे आहेत इतक्या महत्त्वाचे हे कागद पारसनीसांनीं कोठून पैदा केले, ते त्यानींच पूर्वी इतिहाससंग्रहात वगैरे का प्रसिद्ध केले नाहींत याचा पत्ता लागत नाहीं शाहूच्या आगमनापासून तों दुसऱ्या बाजीरावापर्यंतच्या नानाविध बाबतींचे हे कागद पूर्वी अज्ञात असलेली पुष्कळच नवीन माहिती देतात रघुनाथराव व नाना फडणीस यांच्या दरम्यान घडलेले व्यवहार, बापूराव कृष्णानें सातारा येथें छत्रपतींजवळ दाखविलेली दक्षता, चिमणाजी माधवरावाची अल्प कालीन कारकीर्द अशा किती तरी बाबती आपणास या कागदात प्रथमच पहावयास मिळतात अभ्यासकास त्याचें विशिष्ट महत्त्व कळावें म्हणून त्याची एक सामान्य यादी प्रस्तावनेच्या पुढें स्वतंत्र दिली आहे ती अभ्यासकानीं लक्षात आणावी अद्यापि आपणास इतिहास संशोधनात किती मजल गाठावयाची आहे, याची कल्पना या भागावरून झाल्याशिवाय राहणार नाहीं रा डिस्कळकरानीं परिश्रमपूर्वक या नकला केल्या म्हणूनच हे कागद वाचकास उपलब्ध झाले

सातारा येथील सिटी प्रेस व ऐक्य प्रेस याचे चालक रा स कृ जोशी याचें पुस्तक छापून तयार करण्याचे कामीं हार्दिक व बहुमोल साह्य लाभलें, म्हणूनच तें प्रसिद्ध होऊं शकलें, हें नमूद करण्यास संतोष वाटतो त्यानीं या बाबतींत केवळ सौदाची दृष्टि न ठेवता काहीं तरी लोकोपयोगी कृत्य आपण करीत आहों अशा भावनेनें दोनही भाग सुंदर व आकर्षक स्वरूपात पुष्कळ घस सोसून कसे तयार केले हें आमच्यावाचून बाहेरच्यास कळणार नाहीं एवढ्या शाब्दिक उल्लेखानें त्याचे उपकार फिटणार नाहींत हें उघड आहे, तथापि ही त्याची जनसेवा लोकानीं मान्य करून घ्यावी एवढ्याचसाठीं हा उल्लेख केला आहे

सातारा म्यूझिमचा उपक्रम तेथील जनतेस उपकारक झाला नाहीं, याजबद्दल कोणासही खेद वाटेल म्यूझियमच्या कामास दुजोरा यावा म्हणून तेथील ऐतिहासिक मंडळाची स्थापना झाली आणि त्या मंडळाच्या मार्फत बहुमोल कागदाचे दोन सुंदर खंड प्रसिद्ध झाले हें त्यास भूषणावह आहे तथापि आता म्यूझिम पुण्यास आल्यानें मंडळास स्थानिक काम उरलें नाहीं असें मानण्याचें कारण नाहीं सातारा जिल्ह्यात ऐतिहासिक साधनें मुबलक आहेत तीं जमवून प्रसिद्ध करणें जरूरीचें असून त्या कामीं इतउत्तर मंडळानें लक्ष घातल्यास पुढेंही इतिहासाची सेवा त्यास करिता येईल प्रस्तुत खंडाच्या संपादनाची संधि सातारकरानीं मला दिली याबद्दल मी त्याचा सदैव ऋणि राहीन वाचक वर्ग या खंडास उदार आश्रय देऊन गुणग्राहकता व्यक्त करतील अशी आशा आहे

ऐतिहासिक साधनाचीं हीं पुस्तकें किती प्राप्तीचीं असतात हें वाचक जाणतातच थोड्यादा अभ्यासकाच्या बाहेर त्याचा खप बहुधा होत नाहीं केवळ पूर्वजाचें ऋण फेडण्याच्या दृष्टीनें त्याचा खर्च सोसावा लागतो अशा स्थितींत साताऱ्च्या मंडळानें श्रीमंत शिंदे सरकार अलिजाबहादर याजकडे साह्याची याचना केली ती मनावर घेऊन त्यानीं उदार अतःकरणानें ऐन वेळीं पैशाची मदत करून मंडळाचें आर्त हलकें केलें हा त्याचा उपकार त्याच्या स्वार्थत्यागी राष्ट्राभिमानास साजेसाच आहे त्याचा सदैव उत्कर्ष होवो अशी सातारकर मंडळाची व व्यक्तिशः माझी ईशचरणीं प्रार्थना आहे मु कामशेत, ता १५ मार्च स १९४०

गो स सरदेसाई

# निवेदन

सातारा इतिहास सशोधन मडळाच्या ऐतिहासिक लेखमालेचा हा द्वितीय भाग इतिहासप्रेमी जनतेस सादर करिताना मडळ च्या वतीनें थोडासा खुलासा करणे अप्रासगिक होणार नाहीं लेखमालेचा पहिला भाग प्रसिद्ध होऊन तीन चार वर्षें झालीं या मुदतींत अनेक लोकाकडून व सस्थाकडून आमच्या सस्थेकडे विचारपूस करण्यात आली, आणि दुसरा भाग लवकर प्रसिद्ध व्हावा म्हणून सर्वत्र उत्सुकता दिसत होती, परतु आमच्या मार्गातील अडचणी मात्र सारख्या वाढत गेल्या, यास्तव हा भाग प्रसिद्ध करण्याचा योग अखेरीस आज आला हेंच आम्ही आपलें महद्भाग्य समजतों

साताऱ्यातील हिस्टॉरिकल म्यूझियम ज्या वेळीं खुलें झालें त्या वेळीं तेथें असलेले महत्त्वाचे कागदपत्र प्रसिद्ध करून ते जनतेस उपलब्ध करणें आपलें कर्तव्य आहे असे साताऱ्यातील कै दादासाहेब करदीकर व कै रा ब काळे आदिकरून प्रमुख शहरवासीयास वाटल्यामुळें प्रामुख्यानें या प्रसिद्धीच्या कार्याकरिता येथें आमच्या मडळाची स्थापना झाली या मडळाच्या विद्यमानें पहिला लेखमालेचा भागही त्वरित प्रसिद्ध झाला हिस्टॉरिकल म्यूझियमच्या ट्रस्टींनीं म्यूझियममधील कागदपत्र मडळाला प्रसिद्धीस देण्याबद्दलही ठराव केला व या ठरावावर विसबून जनतेकडून आर्थिक साहाय्याबद्दल आश्वासनें घेऊन आम्हीं दुसरा भाग छापण्यास घेण्याची तयारी केली परतु यापुढें आमच्या मार्गांत अनेक विघ्नें उपस्थित झालीं मि ब्रह्मे व मि हमीदअली हे दोन सन्मान्य कलेक्टर सेवानिवृत्त झाल्यावर त्यानीं जी म्युझियमची व आमच्या सस्थेची व्यवस्था कळकळीनें ठरवून दिली होती ती बद पडली, म्हणूनच पुढें म्युझियमला अनिष्ट दशा प्राप्त होऊन तिचा सपर्क मडळालाही पोंचला, आणि शेवटीं या उपयुक्त सस्थेचें साताऱ्यातून उच्चाटन झालें, याजबद्दल इतराबरोबर मडळालाही अत्यत खेद वाटतो पण अशा खेदजनक प्रसगात देखील आमच्या मडळास नि सशयपणें समाधान वाटतें तें एवढेंच, कीं इतिहाससेवेचें आपलें कर्तव्य यथायोग्य पार पाडण्यात आपणाकडून यत्किंचित् हयगय झाली नाहीं, उलट म्यूझियमचें कार्य यशस्वी करून दाखविण्यात मडळानें शक्य तितके प्रयत्न केले सबब जे काहीं बरे वाईट प्रकार होऊन गेले, त्याची शहानिशा करण्याची आता अवश्यकता नाहीं अनेकाच्या साह्यानें प्रस्तुतचा उपयुक्त कागदाचा हा खड बाहेर आला ही गोष्ट मडळाला चिरतन अभिमानाची वाटेल, एवढें नमूद करणें जरूर आहे

ऐतिहासिक लेखमालेचे आमच्या मडळामार्फत प्रसिद्ध झालेले दोनही भाग सपादण्याच्या कामीं रा ब गोविंद सखाराम सरदेसाई याचें आम्हाला बहुमोल साहाय्य झालें आहे, इतकेंच नव्हे तर हीं पत्रें आम्हाला प्रसिद्धीस मिळण्याच्या कामींही त्याचेच परिश्रम सर्वस्वी कारणीभूत झाले रा ब सरदेसाई याची मदत व प्रोत्साहन नसतें तर हें अगीकृत कार्य आम्हाला अर्धवटच सोडून देणें भाग पडलें असतें या पत्राच्या सपादनाची जबाबदारी शिरावर घेऊन हीं पत्रें प्रसिद्ध होईपर्यंत त्यानीं सदैव आम्हाला अनेक रीतींनीं साहाय्य व मार्गदर्शन केलें आहे, व त्याबद्दल आमच्या प्रमाणेंच महाराष्ट्रीय जनताही त्याचे उपकार विसरणार नाही अशी आम्हाला खात्री आहे

हें निवेदन पुरें करण्यापूर्वी आमच्या मडळामार्फत जे दोन भाग प्रसिद्ध झाले आहेत त्याच्या खर्चाबद्दल जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील ज्या धनिकानीं व विद्वानानीं आम्हाला आर्थिक साहाय्य

केलें त्याचे आभार मानणें आमचें कर्तव्य आहे पहिल्या भागाच्या प्रसिद्धीला इचलकरंजीचे अधिपति श्री बाबासाहेब घोरपडे व सिनामाऊचे श्री महाराज कुमार यानीं आर्थिक मदत करून आह्माला ऋणी केलें आहे हा दुसरा भाग जवळ जवळ छापून पुरा झाला तरीही आमची आर्थिक अडचण कायमच राहिली अशा वेळी ग्वालियर संस्थानचे तरुण व इतिहासप्रेमी अधिपति श्रीमत जिवाजीराव शिंदे अलिजा बहादूर यानीं मोठ्या औदार्यानें हा पत्रसंग्रह प्रसिद्ध करण्यास आह्माला आर्थिक साहाय्य केलें नसतें तर हा ग्रंथ आज वाचकाना सादर करिता आला असता की नाहीं याबद्दल शंकाच आहे श्री महाराज सरकार याचे त्यानीं दिलेल्या आर्थिक साहाय्या बद्दल आह्मी अत्यंत आभारी आहोंत

या ग्रंथाच्या प्रकाशनाबरोबर आमच्या मंडळाच्या कार्याचेंही अवसान होत आहे म्यूझियमच्या कार्याला पूरक ह्मणूनच आमच्या मंडळाची स्थापना झाली होती व म्यूझियमच येथून हलविल्यामुळें आता आमचें कार्यक्षेत्र बरेंच संकुचित झालें आहे सातारा जिल्ह्यात किती तरी महत्वाचे ऐतिहासिक अवशेष व कागदपत्र मिळण्यासारखे आहेत, पण हे कार्य स्वतंत्र रीतीनें पुढें चालविण्याचें आमच्या मंडळाला आता सामर्थ्य नाहीं आमचें मंडळ अस्तित्वात आल्यापासून ज्या ज्या लोकानीं आर्थिक मदत देऊन अगर सहानुभूति दाखवून आह्माला प्रोत्साहन दिलें त्या सर्वांचे पुन एकदा आभार मानणें आमचें कर्तव्य आहे

वि स बखले
वि र करंदीकर
चिटणीस, सातारा इतिहास संशोधन मंडळ

# महत्त्वाचा विषय निर्देश

एकाच कागदात अनेक विषय येत असल्यामुळें त्यांचें नक्की वर्गीकरण शक्य होत नाहीं तथापि या पुस्तकाचे दोन भाग स्पष्ट पडतात पहिल्या भागात महादजी सिंद्यांच्या स्वाऱ्याचे कागद असून, दुसऱ्यात लेखांक २५९-४२४ चे कागद सामान्य पेशवाई कारभाराचे ऐतिहासिक दृष्टीनें विशेष महत्त्वाचे असून त्यात पूर्वी बाहेर न आलेली नवीन माहिती पुष्कळ आहे विशेषत पानिपतोत्तर कालीं रघुनाथरावाच्या खटपटी सुरू झाल्या त्यासबधात पेशवा माधवरावाचीं, नाना फडणिसाचीं वगैरे पत्रें या भागात छापलेलीं अत्यत महत्त्वाचीं आहेत भाषेच्या व राजकारणाच्या दृष्टीनेंही तीं अत्यत मोलवान वाटतील वाचकाच्या सोयीसाठीं त्याचा अल्प उल्लेख दाखवितों

१ पेशवा माधवराव— ले० ३११-३१३ व ३२१

२ नाना फडणीस—ले० ३२०, ३२१, ३२३, ३२९, ३३९, ३४१, ३७९, ३८२

३ रघुनाथराव—३५९-३६१, ३८९, ३९३-३९५, ३९८, ३९९, ४०४ ४०७

४ सखाराम बापू—ले० ८१, ८२, २६८, ३३५.

५ बाबूराव ( कृष्ण ) आपटे—ले० ३४५, ३७३ ३७५ ( उद्बोधक ) ३८२

६ महादजी सिंदे—ले० ३१, ६६, ९९

७ तोतया सबधीं—ले० १७, १८, १९, ९३

८ बाबूराव भास्कर ( मेहेंदळे ? )—ले० १४१, १९९-२०५, २१५, २१७ व २९३

९ पहिले बाजीराव –ले० २६२-२७०

१० गोविंदपत बुंदेले ले० २८७

११ नाना फडणिसाविरुद्ध कट—ले० २०, २२, २३, ७०, ३८२

१२ राजकारणी महत्त्व—ले०—१०३, १२९, १३५, १९१, २११, २२२, २३१, २३२, २६८ २८७, २९५, ३००, ३०६ ३२०, ३४९, ३८२, ३९३, ३९४

महादजी सिंदे व तुकोजी होळकर याचा बेबनाव पदोपदीं दिसून येतो यातच पुढें राज्यनाश झाला

# दुरुस्ती

## १ पत्रांचें वर्गीकरण

पृ १ महादजी सिंदे, कोल्हापुर स्वारी

पृ ५५ महादजी सिंदे, -- पुणें

पृ ८३ ' पुण्यातील वाटाघाटी ' च्या ऐवजीं ' गुजरात-माळवा मोहीम ' हें नाव पाहिजे पुण्यातील वाटाघाटी हा विषय पृ ६५ वर येऊन गेला

## २ पत्रांचे लेखांक

पृ ५५-५६ वरील पत्राचे अंक १-५ चुकून पडले आहेत ते ७७-८१ समजावे

पृ १११ वर ले० 134 बद्दल 146 A वाचावें

## मजकुरांतील चुका

पृ २ इंग्रजी टीप व तारीख चुकली आहे The letter is addressed to Nana Fadnis, not to Sakharam Bapu, probably with reference to the latter's arrest on 27 February 1779 and the confiscation of his property

पृ १७ ओळ ४ " वस्त्रें " बद्दल ' पत्रें " वाचावें

,, इंग्रजी टीप शेवटचा शब्द plot वाचावा, place नव्हे

पृ ३१ ओळ ८ " सदाशिव दिनकर " बद्दल " सदाशिव मल्हार " वाचावें

पृ ४७ ओळ ४ " बाजीतजग " बद्दल ' जावीतजग " पाहिजे

पृ १०० ओळ २३ " जान कुराण " बद्दल " नान कुराण " वाचावें

पृ १२५ पत्र नं १७० इंग्रजी टीपेंत forging बद्दल foraging पाहिजे

पृ १६० पत्राचा नं २१७, ५१७ नव्हे

पृ १६६ पहिली ओळ he शब्द कमी करावा

पृ १८५ टीप अजीमुद्दौला हा दौलताबादचा सुभेदार, मस्रन्मुल्क नव्हे मस्रन्मुल्कचा किताब अजीमुल्-उमरा

पृ १९५ इंग्रजी टीप पत्र २६८ ची The letter appears to be written to Mahadaji Ambaji Purandare at Poona by his cousin Malhar Tukdev from Satara

पृ २११ पत्र नं २९१ वजारतमाब, वजारतमाहा नव्हे

पृ २१३ ओळ १६ मागेकईबद्दल मोगलाई वाचावें

पृ २१६ पत्र नं २९६ ची ओळ ५ " सलाबत स्वाद्ली आहे " असें वाचावें

पृ २५३ ओळ ३ " नाशिकापासून " बद्दल " नाशिकापासून " वाचावें

# अनुक्रमणिका

भाग १


१ ले १— ७६ कोल्हापुर स्वारी,

२ ले ७७—९३ तोतयावरील स्वारी,

३ ले ९४—११७ पुण्यातील वाटाघाटी,

४ ले ११८—२५८ गुजरात व माळवा


भाग २


ले २५९—४२४ पेशवाईचा कारभार

# ऐतिहासिक लेख

## १

## महादजी शिंदे

*No 1* ] [ March 1777

श्री

पु॥ विज्ञापना येसाजी सिंदे याची मसलत आह्मास सागावी ह्मणोन होळकरानी मध्यस्त घातले होते परंतु आपण सागितली नाही, सिंद्यानी कबूल केली आहे, तेच करितील यामुळे होळकरासी जावसाल जाहाले ह्मणून पेसजी आपण लिहिले हैदरनाइकाची मसलत आपण त्यास सागतात ते करीत नाहीत ल्हान दुसरी मसलत सागावी तर योजोन येत नाही हैदरनाइकाची मसलत सिंद्यावाचून होळकर करीत नाहीं सिंद्यास ह्मणावे तरी सिंद्यानी तोतयाचे पारपत्य केले दुसरे येसाजी सिंदे याचे मसलतीस उद्युक्त जाहाले कोणे प्रकारे सेवटास नेतील किंवा कसे करितील हें सेवटीं कळेल परंतु ह्मणावयास जाले की सिंद्यानी दोन कामें केलीं होळकर रिकामे देवयात्रा करीत फिरतात हे त्याचे मनात लज्याच असेल आपण ह्मणतील होळकरानी काहींच केले नाही, इतका शब्द त्याजवर राहील, असे कदाचित आपण ह्मणतील, परंतु सरकारचे काम कोणते होते ? करोडो रुपयाचा सरजाम खातात तेव्हा नफा तो कोणता ? हैदरखानाखेरीज दुसरे काम असते तर आपण त्यास सागते परंतु ते योजून येत नाही येशास माझे मनात येक काम आले आहे की कितूरवाला धारवाड ताळुकियानजीक हैदरखानाचा आश्रा करून सरकार ताळुकियास पै दर पै उपद्रव करितो त्यास तची पोहोंचाऊन संस्थान हस्तगत करावे पाचसात लक्षाचा ताळुका कमकसर त्याजकडे आहे तरी हें काम होळकरास सागावे हैदरखानाची मसलत तुह्मी करीत नाही तर ही ल्हानसी मसलत तुह्मास सागतों, ही करावी येविसीचा जाव साल ते काय करितात हेही कळेल कबूल केले तर उत्तम सरकारचें काम जाले न कबूल करितील तर मातबरच शब्द ठेवावयास जागा होईल विचारास आले तर त्यासी बोलावे ही मसलत त्याणी कबूल केली तर हैदरावरीही दबाव बसेल अशा किनेक गोष्टी किफायतीच्या आहेत ही मसलत होळकरानी कबूल करून सेवटास नेली तरी हेही फारसे वारे घेणार नाहीत मनात प्रकार आला तो लिहिला असे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Addressed to Nana Fadnis by his agent Naro Shivdev who compares the services rendered by Sindia and Holkar to the state The writer suggests that Holkar may be employed in the task of subjugating the chief of Kittur as he had rebelled against the Marathas and was in league with Haidar

---

*No 2* ] [ 10 March 1778 ?

श्री

सेवेसी विज्ञापना पाडुरग कृष्ण कृतानेक सा नमस्कार विनती विशेष आज्ञेप्रो कोकसुभा आले त्याची हकीकत येणे प्रो आहे

भिवरीपुढे आले तो हुजुरचे स्वार आह्मापुढे सासवडाचे सुमारे आले होते त्यासी पाटीलबाबाचे लोकानीं गाठून धरू लागले ते पल्त हे मागे यैसे चाबुकसिवर्णीने आपले लोक आले, तेच आह्मास भेटले तेव्हाच ते बोलले की तुह्मास धरितील तुह्मी न जाणे परतु आवाईनेच फिरलो तर ठीक नाही ह्मणोन पुढे येऊन आन्याचे झाडात खाचट आहे तेथें दबा धरिला आणि तेथें घोडे टाकून पाच च्यार येकट दोन दाहा लाऊन फूट केला चोहो वाटाने श्रीमत बापूचे हवेलीपासी जमलो * मागे पाटीलबाबाचे लोकानी घोडी वगैरे काही लोक आमचे अडिवले हवेलीतून आह्मास तिकडे बोलाविले आह्मी साफ सागितले की आह्मास यावयाची श्रीमताची आज्ञा नाही त्याजवरी तेही हवेलीस आले आह्मास काढावे, पाटीलबाबाकडे ह्मणोन हवेलीतून काढावे आणि मालावरी बसऊन ठेवावे हे हिकमत करीत होते परतु आह्मास हवेली सापडली आत बाहेर चौकी पाहारा करून दरवाजा लाऊन तोडे सिलाऊन बसलो आणि साफच सागितले हे घर खावदाचे, भ्रमाकारण तसनस जालिया पाटीलबावाही तुमचे पारिपत्य करीत ते न करावे खटपट केलिया हे गरदी खून खराबी करतील यैशा बोलण्याचे घालमेलीत आह्मी आपली घोडी लोकही आणून घेतली दोन तीन चिठ्या पा पावत नाही मधेच अटकाऊन माणसे बसवितात

आह्मासी पाटीलबाबाचे लोक खटखट करून गेले आहेत तेथे सागून फार लोक आणून आह्मास पाटीलबाबाकडे न्यावे यैसे बोलले यास्तव दोन तीन वेळा सेवेसी हकीकत लिहिली तो माणसे उतर घेऊन येत नाहीं, तस्मात बसऊन ठेविलीच यैसे भासते त्यास तेथे सागून पाठऊन जी स्वामीकडे जाईल येईल त्यास अटकाव नसावा यैसे जाले पाहिजे

साहित्य सरजाम देवपूजा श्रीमत बापूची पाठवावी त्यास सारे साहित्य गोटात आहे तेथे पाटीलबाबाचे लोकानीं चहुन येक तसनस केली ह्मणून आइकितो त्यास बिछाने वगैरे साहित्य व तीन तटे चागली यावयासी आज्ञा जाली पा

वाड्यातील कारभारी विठलभट वगैरे कोणी नाहीं आन्याही नाही गावात आहेत दील दिलासा देऊन सागून पा की येऊन भेटावे आल्यावरी लेहोन पाठवितो बगाजीपत मोकासी यासी बोलाऊन आणून त्याचे हाते त्यास दिलासा देऊन बोलाविले आहे

आठ दाहा ब्राह्मण हरकार व शागीर्द वगैरे मिळोन वाड्यात ह्या वेळपर्यंत आले

गावातील पागेत येणेप्रो आहे पाहारा बसविला

१२ तटे वगैरे जखमी पाऊसुधा आहेत

३२ उटे बतीस आहेत गाई बैल ह्मैसी वासर आहेत मोजदाद करविली आहे मागाहून कळेल पालख्या दोन

लकडखाना गजी वगैरे चौकी बसविली आहे जुनासा फरासखाना आहे

थोरले हवेलीत मागें पुढें वगैरे पाहारे रीतीने ठेऊन वाड्यातील जेवणखाणाची व नित्य कृत्याची वैवाट चालत आल्याप्रमाणें करावी ह्मणोन सागितलें आहे १

गारदी यास खर्चास नाही याविसी आज्ञा जाली पाहिजे

येणेप्रमाणे येथील वृत्त आहे विदित जाल्यावरी बंदोबस्त जाला पाहिजे हे विज्ञप्ति

रा छ १० सफर प्रात काल

☞ Pandurang Krishna probably writing to Sakharam Bapu informs him how he and his party were harassed by Mahadji's

---

* टीप — एक दोन दहा पाच असे फुटून निरनिराळ्या वाटांनीं सासवडास सखाराम बापूचे वाड्यात आलों, असा अर्थ

troops on his way He however managed to reach Saswad and took shelter in Sakharam Bapu's house Mahadji suspected Sakharam Bapu of disloyalty to the state and was possibly hunting out his accomplices at this time

---

*No 3* ] [ 20 April 1777

पौ छ १४ रा॥वल सवा

श्री

विज्ञापना छ १० रबिलावलीं राजश्री गुरुजीबावानी आपले नातू आबा त्यास पाटीलबावाकडे पाठविले की तुमचा आमचा करार ठरला होता की चैत्र शु॥ त्रयोदसीस[1] कूच पाचा कोसाचा करावा आह्मी एक मजल समागमें जावें मग तुह्मी जोतलिंग वगैरे जावें आह्मी बाळाराव गडास जावें येणेप्रमाणे करार ठरला उद्दैक रविवार त्रयोदसी आहे त्यास उद्दैक कूच करावें, ह्मणून गुरुजींनी आपले नातू पाठविले पाटीलबावानी उतर केलें की आनंदीबाईचा[2] जावई त्यास बहुत समाधान नाही आठा चौ रोजा आराम होईल दुसरे तोतियावर पचवीस लक्ष रुपये खर्च पडला आता आह्मासही खर्चाची तजवीज केली पाहिजे याकरिता पधरा दिवस जाणे होत नाही आबानी येऊन गुरुजीस सागितलें गुरुजींनी मागती आपले कारकुनास पाठविलें की तुमचा आमचा करार जाला, त्याप्रमाणें गडास लिहिलें, आता तुमच्या या प्रकारच्या गोस्टी आहेत तुमच्या कराराप्रमाणें गडास लिहिलें आता आह्मास निरोप देणें उद्दैक गडास जाऊ मग तुह्मी चितास येईल तेव्हा येसाजी सिंद्यावर जाणे पाटीलबावानी सागून पाठविलें कीं उद्दैक आह्मी गुरुजींचे भेटीस येतों जें भाशण करणे तें समक्ष केले जाईल छ ११ रोजीं प्राथकाली पाटीलबावा बाळाराव राणेखान गुरुजी जाबगावात राहिले होते तेथे आले येकात जाला सेवट ठरलें की वैशाख शु॥ १ प्रतिपदेस कूच करावें गुरुजींनी तयारी केली होती ते महकूफ करविली आनंदीबाईच्या जावा [ पुढील बंद गहाळ ]

☞ Naro Shivdev reports how Mahadji was using dilatory methods in prosecuting the expedition against Kolhapur

---

*No 4* ] [ 21 April 1777

पुरवनी श्रीमंत नानासाहेब

[3]दुसरी स्त्री सगमनेरची तीस ऋतु प्राप्त जाला फळशोभन जाले गुरुजी वगैरे सर्वांनी आहेर केला मग आह्मास करणें प्राप्त जालाच लुगडें सेलापागोटें माहाराजाचें नाव पदरी केला पाहिजे माझें वर्तमान साहेबाचे ध्यानात रोजमरा पूर्वी विनंती लिहिली आहे, त्याप्रमाणें कृपा करणार धणी जासुदजोड्या कासीद दोन जोड्या याचा रोजमरा आज्ञा करणार धणी छ ११ राजीं श्रीमंत तात्याकडे जोडी चिदा केली तिकडे वर्तमान लिहिलें असे कळावें पाटीलबावाच्या बाजारात चोरी जाली तो मजकूर पूर्वी लिहिलाच आहे ते निमित्ये करून गावोगाव मसाले पाटील धरून आणिले आहेत च्यार पाच हजार मेळविले राजापूरकर मलारराव सुमत याचे घरी चवकी बसविली स्त्री व कन्या मातुश्री धरली घोडी उटे

---

१ म्ह ता २०-४-१७७७ २ निंबाळकर, महादजीची बहीण ३ मागील बंद गहाळ आहेत

वगैरे येथें आपली बेरड काही धरले आकात करतात मतलब रयेतीस सुख नाही ओळकर गावास चित्र्या करतात वाटेस कोन्ही सापडेल तर लुटूनही घ्यावें मतलब जें आहे तें उतमच आहे कळावें गुरुजी बाळाराव पुढें दो चौ दिवसापुढें पाठवावे ऐसे ह्मणतात परतु हे ह्मणतात की तुह्मी पाचा कोसाचा कूच करणे, मग आम्ही पुढें गडास जाऊ त्यासही समजेल की कूच बोलल्याप्रमाणें करविलें मग आह्मास जावयाची सोय होती आता काये बोलावे ! छ ११ रविलावल्पावेतों इतका मजकूर जाला पुढें होईल तो सेवेसी लिहून पाठविला जाईल वरकड येकाताचा मजकूर गुरुजी नारो सिवदेव सेवेसी लिहीत असतील त्याजवरून ध्यानास येत असेल छ १२ रालावल सोमवार प्राथ काल हे विज्ञाप्

☞ This is a news-letter sent to Nana by his secret agent in Mahadji's camp in his journey to Kolhapur

---

*No 5* ] [ 29 April 1777

पौ छ २४ रावल सबा

श्री

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २० रावल मगलवार साइकाळ स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष मी राहुटी सोडून दरबारास देखील जात नसतो अकस्मात परवा रात्रौ राजश्री पाटीलबावाचे बोलावणे चोपदार आला, त्याजवरून गेलों दर्शनार्ती तुह्मी येत का नाहीं ह्मणोन पुसो लागले याचे उत्तर दिल्हा नतर कूच करावयाचा मुहूर्त कधी नेमिला ऐसी विनती केली उतर जहालें जे, मासान्त आला अमावास्या जाल्यानतर मुहूर्त पाहून कूच करू पत्रें येथून गेलीं त्याचीं उतरे काही पाठविली नाहींत उभयताच्या चितात आह्मासी गुप्त भापणच करावें तथास्तु आमचाही आग्रह काहीं नाहीं धनी थोर नाहीं ह्मणून आगर येक वेल चाकरी केली, दुसरी न करावी हा आमचा सेवाधर्म नाहीं चाकरी नच करावी भाकरी मेलवाव्या त्याच्या दैवेकरून अनुकूल असेल त्यास असो श्रीकरवीर प्राताची मोहीम आह्मास सागितली ती अगीकारिली जातो होईल ती सेवा करून आपले घरास जाऊ निरोप घ्यावयास पुरदरास जावे तर निरोप जालाच आहे आता जाऊन विशेष काय ! काहीं मागावयाचे नाही खावदाचे दौलतेचा बदोबस्त व्हावा चितात होते ज्याचे भरवशावर आला त्यासी बोलणीही जाली परतु गोष्ट आमचे मनोदयाप्रमाणे घडोन न आली तस्मात कालचक्राचा फेरा असाच दिसला दौलतेच्या बदोबस्ताचें बोलणें बोलून दुर्लौकिक मात्र आमचा जाहाला आमची इच्छा म्हणावी तर श्रम सायास न करिता प्राप्त जाले त्यानी कोठे उपेक्षा केली ! परतु धन्यानी आह्मास उणे काय केलें ! धन्याचे प्रतापेंकरून वडिलानी देशसपति मेलविली आमची निष्ठा स्वामीचाई आसल्यास कमी नाहीं सर्व मिळेल अशा उदासीनतेच्या गोष्टी बोलल याचा भाव ध्यानास येईल राज्याचा बदोबस्ताचा प्रकार घडावा हे मानस व आस्था, पर्वत व हिंदुस्थानची मुतालकी या दों कलमाचेविसी अत्युत्कट आहे येविसी पूर्वी विनती सेवेसी केलीच होती हालीही राजश्री गुरुजीचावानी लिहिलेच असेल त्याची निश्चयाची उतरे न आली परतु नारो शकर यासी बोलणे जाले त्यानी वर्तमान लिहिले की या दोनी गोष्टी केल्यास होलकराचे विचारा [ पुढील बद गहाळ ]

☞ His conversation with Mahadji & the latter's replies are reported by Naro Shivdev to Nana

---

*No 6* ]                                                                 [ about 4-5-1777
Received on 13 May 1777

पौ छ ५ राक्र सवा

श्री

विज्ञापना छ २३ रविलावली पाटीलबावानी कारकून लक्षुमन सवाजी नवाबाकडे विदा केला छ मारी स्वार होऊन गेला हा मजकूर पूर्वी लिहिलाच आहे छ मजकुरी तिसरा प्रहरा नारो सिवदेव याचे गावींचे पत्र आले नारो सिवदेव याचे वडील बधु शात जाले छ २३ रोजीं पाच रोज जाले सकूबाईचे नातीचें लग्नास जावे येस ठरलें येक मनसुबा सडें जावें येक मनसुबा फौजसुधा जावें येसाजी सिंद्याकडील कारकून आला सल्याचा जाबसाल लागला आहे घडता कैसे घडेल ते, छ २३ रविलावली जोडी सेवेसी विदा केली, ते पावली असेल, त्या पत्रावरून ध्यानास येईल सकूबाई छ २२ रोजी श्रीगोंद्याहून येथ आली येक दिवस राहून दुसरे दिवसी स्वार जाली डेरे व नगारखाना घेऊन गेली लग्नाबद्दल वैशाक सुध अष्टमीच लग्न ठरल पाटीलबावाचे कूच वैशाक सुध ३ सुक्रवारच ठरले सडे जावे लग्न जालिया मग बाहिरबुनगे बोलाऊन घ्यावे दुसरा मनसुबा की समागमे घ्यावे तिकड कारकून येसाजी सिंद्याचा आला याचा गेला तिकडील कसकस ठरत त्याप्रमान वर्तनुक करतील दुसरे पातशाहा नजेफखान दिलीआलीकड अजमेरीस येणार त्या आवईच मिस करून उजेनीस लौकर जावे नाना प्रकारचे मनसब घडतात ठरता काय ठरल ते पाहावे नारो सिवदेव याचे बधु शात जाले या अर्थ पाटीलबावाचा निरोप घेऊन गडास येऊन आपली आज्ञा घेऊन गावास वाईस जानार बालाजी कोनेर दि॥ चिंनो विठल [ अपूर्ण ] छ २५

☞ This is a report of Mahadji's movements sent to Nana by his spy He says, Naro Shivdev lost his brother and was going home Mahadji was performing the marriage of Sakhubai's ( Jayappa's wife ) grand-daughter and then will proced on his journey, says the writer

---

*No 7* ]                                                                 [ 10 May 1777

श्री

विज्ञापना छ १ माहे रविलाखरी दो प्रहरा फतेसिंग गाइकवाड याचा दिवान अताजी नागनाथ नामे ग्रहस्त येथ आले बालारायाचे मारफात पाटीलबावाची भेटी जाली येक घटिका येकात जाला मग गुरुजी आले तेही येकात बसले मग आपलाले राहुटीस गेले तिसरा प्रहरा माहादाजी नारायेण किले आमदानगर हे आले पीरखान पाग्या याचे मारफात येऊन पाटीलबावास भेटले येका दो दिवसा जानार छ २ रोजी प्राथकाली ल्होळकराचा वकील येथ आहे, रामचेंद्र धोंडदेव दिमत होळकर त्याजसमागमे त्याजकडील कारकून बापूजी नारायेण उभयेतास ल्होळकराकड विदा केले स्वार व्हावे तो इताकियात सिउबा बाजी ल्होळकरापासी असतात त्याचे कुटुब पारनेरी असत ते गावास आले होते ते भेटीस आले बालाराव पाटीबावा सिउबा बाजी दोन घटिका येकात जाला याजकरिता या उभयेताच राहून जालें येका दो दिवसा कारकून व वकील रामचेंद्रपत ल्होळकराकड जानार छ २ रोजी पाटीलबावाचे कन्येचा सेरीरसमध पुन्येकर देशमुख यासी निछेये ठरला मुलीस वस्त्र व साकरपुडा मल्हाखामधे करतात तो तिसरा प्रहरा जाला गुरुजी वगैरे आदिकरून सर्वास बोलाऊन पाणे वाटली अधे

जेष्ट मासी करावी ऐसे ह्मनतात इताफियावर न कळे येसाजी सिंधाकडील जाबसाल आबाजी रघुनाथ चिटनीस आपले गावास गेले, त्याचे मारफात जाबसाल [ पुढील बंद गहाळ ]

☞ This is an incomplete news-letter from Mahadji's camp mentioning the various visits he received & the secret conferences he held

---

*No 8* ] [ 23 May 1777

श्री

विनती विज्ञापना छ १४ माहे रबिलाखरी पाटीलबावाचा मुकाम श्री फिरंगाबाईच कुरकुंबावर आला रात्री रानेखान पाटीलबावा बालाराव येकात बसले याचा कारकून सिवाजी नारायण पारनेरकर व ह्मोळकराचा वकील ह्मोळकराकड गेले होते त्याच पत्र आले किंवा दुसरी बातमी आली येकांत बसले तेंव्हा बोलिले की ह्मोळकर गडीची आज्ञा न घेता निघाले रसवा करून महेस्वरास जातात श्रीतुळजापुरास जातो ह्मणून अवाई घातली परंतु जातात महेस्वरास बहुता रो मोरोबादादाचे सूत्र निघालेस वाटत इतके तो मोठ्यान बोलिले ते खिजमतगाराणी येकिले मग हळूच कानात बोलून तेच क्षेनी साडणीस्वार पत्र देऊन विदा केला तो खुलस कळला नाही दिनचर्या की ह्मोळकर निसबंदी हुंदुस्तानात चालले त्यास काही समजल की यास काही जाहागीर इजापा देऊ केली कोन्ही ह्मनतात की याचा कारकून गेला होता त्यास सुचविले की तुह्मी रसवा करून निघावे, मागाहून आम्ही येतो श्रीमत बाजीरायाचा वंशे असता त्यास आसरा नाही इग्रजानी लबाडी केली तेंव्हा त्यासच उभ करू कोन्ही ह्मनतात की तात्या हैदरनाइकावर गेले पुढ प्रजेणकाळ दिवस, हैदरनाईक तात्यावर छापा घालील मग उभयेता सरदारास जावे लागेल या अर्थे ह्मोळकर निघाले हेही देवाचे दरशेन करून निघोन जानार नाना प्रकारचे दिनचर्या कोन्ही ह्मनतात की नवाब हरिपंत येके-विचार आहेत हैदरनाइकाचा सला घवशाचे मारफत ठरतो तात्या नवाब माघार येनार हे उभयता सरदारास तबी पोहचावनार या अर्थे निघतात येणप्रमान ह्मनतात माहाराज छ १५ रोजी मुकाम केला कोन्ही ह्मनतात की कुरकुंबी सितोळ्याची नवरी भावाबंदाची आहे आठरा वरशाची स्वरूपकरून बहुत उतम आहे लग्न छ १६ माहे रबिलाखरी करनार कोन्ही ह्मनतात की येथूनच माघार फिरनार हरिपंत पुढ भाऊ पडल याची वगैरे पारपत्ये करून मग जावे ऐसे नाना प्रकारचे घाट घाटत आहे पुढ पाहावे ह्मोळकर देवाचे मिस करून निघाले हे खर हे कस कस असल ते माहाराजाचे ध्यानात असल येकिल वर्तमान तो सेवेसी लिहिल पाहिजे छ १५ रोजी दो प्रहरा सरकारचा ग्रहस्त सदाशिव रघुनाथ केळकर आले गुरुजीस येऊन भेटले येकात जाला आबा गुरुजीचे नातू बालारायाकड गेले मग पाटीलबावाकड उभयेता गेले काय कार्यानिमत्ये आले हे कळल नाही स्वामीनी पाठविले किंवा गडीहून आले माझी भेट जाली गडीहून आलो ह्मनाले कोनता मुद्दा असल हे न कळे पाटीलबावास भेटला नाही च्यार घटका दिवस राहता राजेश्री सदाशिव मलार बक्षीचे राहुटीस गेले पुन्याहून ग्रहस्त आला आहे कोनत्या कामावर आला आहे हे समजत नाही, ऐस ह्मनाले पाटीलबावास पत्र नाही गुरुजीस मात्र आहे पालखीपदस्त ग्रहस्त पाटीलबावास पत्र नाही याचा बयेस काय ! अदेशा करीत होते छ १५ रोजीच संध्याकाली याचा कारकून सिवाजी बापू व रामचंद्र धोंडदेव दि॥ ह्मोळकर उभयता ह्मोळकराकड गेले होते आले पाटीलबावा बालाराव रानेखान व उभयता कारकून

आले ते येकात बसले दोन घटिका येकात जाला सेवट सिवाजीपत रामचेंद्रपत मोज्यान बोलिले, की आम्ही ऱ्होळकरासी करार करून आलो की तुह्मी मुकाम माडवगणी करावे आम्ही जाऊन पाटीलबावासी बोलोन गणोजी फदमसुधा घेऊन येतो येसा निछये ठरऊन आलो पाटीलबावानी उतर केल की आज सुक्रवारची रात्र आहे उदईक मुकामच करितो तुमच आमच भाशेन होईल मग जे लिहिन, ते तुह्मी ल्याहावे किवा तुह्मास मागती फिरोन जावे लागल रामचेंद्रपत वकील राहुटीस आले आह्मी गेलो पाटीलबावाच आपले भासन कस कस जाले, आह्मासही थोडस कळू यावे ह्मणून बोलिलो उत्तर केल की उदईक सध्याकाली निछये ठराऊन तुह्मास बोलू ह्मनाले इतक मात्र रामचेंद्रपत बोलिले की धोंडोपत तुमच्या घरात फूट असली तर उपाय नाही उतर केल की नसावीसी आहे इतकियावर न कळे त्यानी उतर केल की फूट आहे आह्मास इस्वास आहे येस [ पुढील बद गहाळ ]

☞ The daily happenings and conversations in Mahadji's camp are reported to Nana by his agent, whose name is mentioned here as Dhondopant

---

*No 9* ] [ 13 June 1777

पौ छ १४ जावल समान

श्री

विनंती सेवक कृतानेक सा। नमस्कार विनती विज्ञापना कुरकुबचे मुकामीहून पत्र सेवेसी पाठविली ते पावली आसतील त्याजवरून सर्व मजकूर ध्यानास आला आसल कुरकुबचे मुकामी पाटीलबावाचे सेरिरास समाधान बहुतच नवते वगैरे मजकूर की कोन्हे प्रकार माघार फिरावे, त्यास आबाजी रघुनाथ चिटनीस याची पत्र आली की रामचेंद्र गणेशाणी येसाजी सिंदे यास लुटून घेतल तम्हा मनसुबा ठरला की पुढ चल यावा दर कूच छ २५ रोजी कृष्णातार मुकाम कऱ्हाड येथ आले छ २६ रोजी मु॥ केला तो प्राथकाली रो रामचेंद्र गणेश व बाजी गोविंद हही छ २६ रोजी कृष्णा उतरतीरी येऊन मुकाम केला तिसरा प्रहरा पाटीलबावाच्या भेटीचा प्रसग जाला पाटीलबावा कृष्णा उतरोन उतरतीरी गेले रामचेंद्र गणेश ते वगैरे आले प्रतिनिधीकडील कार कून व लोक काही आहेत याचे मानस की पाटीलबावानी आह्माजवळ येऊन भेटावे दोन घटिका रदबदली जाली तेव्हा पाटीलबावा येकले घोड्यावर बसोन पुढ त्याजपासी जाऊन भेटले मग रामचेंद्र गणेश यास भेटले पाटीलबावानी भासेन केल की आम्ही आडभीड करावी तर पातशा वगैरे येथ आहे काय ? आह्मी पातशाह नवे करनार वरकड हिसोब काय ? याच उतर कोन्हीच केल नाही आपलाले डेऱ्यास आले गुरुजी पाटीलबावासी बोलले की रामचेंद्र गणेशाची फौज झाडून गेली रामचेंद्र गणेश गडास जातात पाटीलबावानी उतर केल की उदईक मुकाम करवावा त्याजला माघारे फिरवावे मग रात्री पाटीलबावा बाळाराव रानेखान येकात बसले तेव्हा मनसबा करू लागले की येसाजी सिंदा लबाड आह्माकडे सूत्र पुरत लाविले आहे परतु इस्वास नाही दुसर आम्हापासी फौजपागा सुधा आडीच तीन कमबेस आमचा सरजाम थोडा रामचेंद्र गणेश याजपासी फौज आठ नव हजार तेव्हा लढाई घेनली कदाच आम्हावर रात्री छापा घातला किंवा लबाडी करून बाहीर निघाला, पुढ निघता नये तेव्हा दाहा हजार फौज ठेवावी, छावनी करावी लाखो रुपये खर्च पडल दिसोन येन प्रमान येत की गडकरानी रामचेंद्र गणेशास बोलाऊन घेतले आम्हास पुढ फजीत पाडावे गडी मुसदी खिलाडी आहेत त्याजकडही सूत्र

ळावितील की पाटीलबावास फजीत पाडावे रामचंद्र गणेश जातात तेव्हा आम्हास फजीत पाडावे हेच सला मनसब ठरला की रामचंद्र गणेश ते समागमे न्यावे सला केला तर उत्तम नाही तर लग्नाच निमित्ये करून माघार फिरावे जेष्ट वद्य नवमीच हे आवाई पडली आहेच फौज थोडी या करिता भयेभीत जाले आहेत रात्री येसाजी सिंदा छापा घालील हे दहसेत प्राप्त जाली तेव्हा मनसबा हेच ठरला की रामचंद्र गणेशाची दहशेत त्याजवर ये समई पडली यास समागमे घ्यावे येनप्रमान ठराऊन मग प्रायकाली मुकाम करऊन गुरुजी आबा चिटनीस रामचंद्र गणेश तात्या याच्या डेन्यास गेले तिकडून बाजीपत आनास घेऊन आले पाटीलबावा व बाजीपत गुरुजी बालाराव येकात बसले मनसबा ठरता ठरता काय ठरल ते पाहावे छ २६ रोजी येसाजी सिंदा कडील कारकून व भला मनुश्ये आला रात्री येकात जाला प्रायकाली त्याचा कारकून व भला मनुश्ये व आपला दुतु खिजमतगार समागमे देऊन विदा केल उतर आले नाही म्होळकराकड याचे कारकून सिवाजी नारायेन व म्होळकराचे वकील रामचंद्र धोंडदेव व कुरकुबचे मुकामीहून गेले होते ते छ २५ रोजी आले याच त्याच वचेन ठरल की आह्मी जोतलिंग करून येतो तुम्ही श्रीतुळजापूर दरशेन करून यावे मग भेटीअती मनसबा जे करण ते केला जाईल येथ मनसबा ठरतो की येकत्र होऊन श्रीमत किंवा त्याचे चिरंजीवच उभे करावे दुसर मनसबा हे कितेक मजकूर पूर्वी कुरकुबचे मुकामीहून लिहिलाच आहे म्होळकराचे वकिलाची माझी भेट जाली त्यानीही जे बोलावयाचे ते थोड थोड बोललेच छ २७ रोजी सिवाजी नारायेन कारकून म्होलकराकड गेले व्होते ते आले त्याजला येसाजी सिंद्याकड बिदा करनार हे ठरल पुढ पाहाव श्रीमत तात्या कडील अवाई येथ कोन्ही उडविली की हरिपतावर हैदरनाइकानी रात्री छापा घातला भवशा हैदरनाईक येकत्र होऊन हरिपताची फौज बुडविली तात्याचे पुत्रास धरून नेल हरिपत पळाले हे येकून लोकास बहुत सतोसे जाला कोन्ही म्हनतात की सिपाईगिरी ब्राह्मनास होनची नाही पाटीलबावाचे समजे नाना प्रकारच्या गोष्टी बोलतात कोन्ही बकारनामकासारिके मातबर म्हनत की आडकसबी कसब करे लन ( लाय ! ) खावे की भाग जावे नाना प्रकारच्या गोष्टी बोलत माहाराज जेव्हा छ १७ शालावरची पत्रे श्रीमत तात्याची मजला व पाटीलबावा गुरुजीस स्वदस्तुर तात्याची आली तेव्हा खातरजमा सर्वांची जाली आता तोंडावर सर्वांच्या पैजार पडली याच बोलन असे आहेच परतु गुरुजीही नाना प्रकारच्या गोष्टी बोलत कळावे बालाराव गुरुजीपासी म्हनत व्होते की नारो सिवदेव त्याजला माया पाटीलबावा रानेखान याची होती आह्मासी लबाडी केली त्यास परिनाम काय सुध जाला काहाडून दिल्हे आम्हासी ज्यानी लबाडी केली त्याचा परिनाम सुध होनार नाही पाटीलबावा बटेबाज खिलाडी कोन्हा-चाही नाही कामाचा यार आहे छ २७ रोजी पाटीलबावा गुरुजी, बाजी गोविंद येकात जाला बाजीपत म्हनाले की आम्ही माघारे फिरतो परतु आम्हापासी खर्चास नाही तेव्हा दाहा हजार रुपये बावे त्यात पाच नगद दिल्हे छ २८ रोजी कूच करून चार कास उभयेता जोतलिंग येसाजी सिंद्याच्या सुमार चालले का कन्हाड तेथून तीन कोस गाव आहे येथ बालाराव याचा दुसरा सेरीर समध ठीक जाला जेष्ट सुध ८ अष्टमीचा निश्चये ठरला वारना नदी तेथ लस्करचा मुकाम उतरतीरी सडे बालाराव लग्नास येणार येन प्रमान ठरल इत्ताकियावर न कळे जेष्ट वद्य नवमीच लग्न पाटीलबावाचे कन्येच कारकून तो जामगावास सरंजामास पाठिविले इकडही करू ह्मनतात उजेनीस करू ह्मनतात काये ठरल हे न कळे छ २८ रोजी गुरुजीचे नातू आबाजीपत बालाराव पाटीलबावा वगैरे बसले व्होते पाटीलबावा बोलले की येसाजी सिंद्यान आम्हास कृष्णातीरी येऊन भेटावे येस व्होन तसमात लबाडी काम दिसत बदमामली दिसतो कारकून गेला, त्याचाही जाब येत नाही काही लबाडीस आला वाटत आबाजीपत मसलत बहुकली येसाजी सिंद्याचा दार मदार न आला तर

आम्ही कैस निवावे ? आमचे कन्येच लग्न वद्य नवमी ते राहिले परंतु आम्हापासी रुपाया नाहीं लोक आमचे उठोन जातील आमचे पागानसी आम्ही राहू तेव्हा पागा आम्ही राहिलो तर देन काय ? आम्ही खराब जालो तर तुमचीच खराबी आहे याचा बदोबस्त गुरुजीस सागोन गडास पत्र लेहून काही तजवीज करावी इतकियात देवजी पराडा व बहिरजी जगताप बोलिले की हजार फौज त्याची हजार फौज आपली ठेवावी घोड्यास गवत नाही धान्ये दर रुपयाच आताच सात सेर. पुढ नद्या भरतील रस्त बद होईल घोडी मानस मरतील इतकियात बालाराव बोलले की येसाजी गडात गेला तेथ आह्मी काय करावे ? चऊ रोजात भेटला सल्याचा डौल लावील तर उत्तम नाही तर आह्मास लग्नास जाबगावास जात आहेच पुढ पाहून घेऊ बाहीर असता तर लढाई करतो मागती बाबा बोलले कीं गुरुजीस बोलाऊन मनसबा करावा गुरुजीस बोलाऊन आनिल येकात जाला येकाती मनसबा ठरला कीं गडास गुरुजींनी पत्रे ल्याहावी दुसर वारना नदी तेथ मुकाम होईल येसाजी सिंद्याकडील कस कस होत, ध्यानास येत मग जो मनसबा करन तो केला जाईल इतक बोलोन उठले रा रामचंद्र गणेश व बाजी गोविंद मिळून फौज दोन अडीच हजार कमबेस पाटीलबावापासी तीन साडेतीन पागासुधा खर्चाचा सरजाम पोख्त करून घेतला आहे परतु अतासीच लोकास रोजमरा देत नाहींत ऐवज नाहीं ह्मनतात महर्गता विशेष आतापासून ये गोष्टीचा आरभ केला तेव्हा गुजरात प्रातीं प्रमान डौलही दिसतो पुढ घडता घडल ते सेवेसी लिहिल जाईल छ २९ रोजी श्रीमत रा तात्याचे लस्करची पत्र सावकारी आली ह्मनतात कीं जाबितजग हैदराबादेकड नवाबसुधा जातात तात्या माघारे मिरजच्या सुमार येणार हे वर्तमान साहेबाकड कच येत असल बाजारी वर्तमान येथ आहे छ २ माहे जमादिलावली पाटीलबाबा व रामचंद्र गणेश कूच करून नदी वारना पाऊन कोस आलीकड नाला आहे तेथ मुकाम केला पाटीलबावाचा कारकून पनाला गडास गेला व्होता तो कारकून व येसाजी सिंद्याकडील कारकून छ मारी दो प्रहरा आले पाटीलबावा, बालाराव, गुरुजी, बाजी गोविंद आण्णा ह्मनतात वगैरे तिकडील कारकून सुधा येकात बसले याची त्याची भवति न भवति बहुत जाली येसाजी सिंदा याजकडील कारकून बोलिला कीं आह्मी केल काय ? तुह्मी आह्मावर चढाई करून काशास आला ? सेवट याचा त्याचा जाबसाल जालियावर मागती उभयेता तेच समई बिदा जाले येकात मजकूर ठरला असल तो गुरुजी व बाजी गोविंद यानी सेवेसी पत्र लिहिली असतील त्याजवरून ध्यानास येईल बालाराव राहुटीस आले व्होते येसाजी सिंदा याचा खिजमतगार जवळ उभा होता बालारायासी बोलिला कीं तुह्माकरिता मेजमानींचा सरजाम केला आहे बालाराव बोलिले की रात्री छापा घालावयाचा सरजाम केला असल इतकियात बालाराव याची बातमी आली की येसाजीपासी फौज दोन हजार पायदळ पाच हजार आहे याच मानस वारना नदी उतरोन जावयाच दिसत नाही देवाचे दरसेनास सडे जाव ऐस मानस दिसत महर्गता बहुत दुसर गवत दाहा दाहा कोस मिळत नाही छ ३ रा पाटीलबावाची कही बतीस सिराले दि॥ भोसले त्या गावावर गेली होती सिरालेवाल्यानी कही भरुन दिल्ही सवा दो प्रहरा पाटीलबावानी फौज झाडून पाठविली सिरालेवाले बाहीर निघोन लढाई जाली पाटीलबावाकडील घोडी तीन मयेत जाली सेवट पाटीलबावाकडील लोकानी हला करून पेठ घेतली लुटून पस्त केली तीन च्यार हजार गुर, पचेवीस तीस घोडी, भाडी वगैरे लूट फार जाली सिरालेवाले गढी बळकाऊन आहेत याची स्वारी रात्री आली पुढ काय होईल पाहावे याची स्वारी तयार जाली, ते समई रा रामचंद्र गणेश यानी कारकून पाटीलबावाकड पाठविला की सिरालेकर भोसले आह्मा पासी दोघा लोकानसी चाकरीस आले व्होते रुजू आहेत त्याजपासून आतर पडल असल तर त्याजला बोलाऊन तुह्मापासी आनवितो स्वारी मना करण पाटीलबावानी काही ऐकिल, बर उत्तम

ह्मनाले परंतु लोक गेले, आता उपाय काय ? मतलब स्वार्थापुढं काहींच सुचत नाहीं छ २ रोो पाटीलबावाचे कनिष्ट स्त्रीस रुतु प्राप्त जाला बाळारावाच लग्न अष्टमीच पाटीलबावाचहीं ठीक हेत(?) तीन आहेर पाहिजेत मी गरीब ब्राह्मन * याच्या आहेरानी बेजार जालो माहाराज ह्मनतील की आहेर फिरोन येत असतील तर ही याचे लस्करात रीत नाहींच सेर आटा कोनास प्राप्त नाही ते हा आहेर माघारे कोन देतो ? सेला पागोट दसऱ्याच याजपासी आहे तेव्हापासून हा मजकूर पूर्वी लिहिलाच आहे वलावे सातारियास माहाराजाही कृपावत ब्होऊन वरात रुपये पनास रोज मऱ्या बा व राहुटी रो कृष्णराव अनंत[1] याजवर देविली होती दोन जोड्या पाठविल्या पत्र मजला लिहिल की यैवज नाही आल्यास राहुटी व यैवज पावता होईल जासुदास जबानी सांगितले की आह्माकड सरकारचा यैवज नाहींच तुह्मी गडास लिहून सरकारची वरात माघारे मागितली ती न दिल्ही त्यास माहाराज येथ महर्गता विशेष दिवस प्रजेनकाळ, लस्करच्या पुढमागे कोस आदकोस गावात राहावे तर मुलूक दाहा दाहा कोस उज्याड प्रजेनकालाची महाराजाचे ध्यानात मागतीं माहाराज रो कृष्णराव दादावर पत्र देतील तर ते साफ म्हनाले की यैवज नाहीं आम्हाकड दुसर पत्र न आनावे ज्यात महाराजाची मर्जी खूश तेच करावे कर्ज कोठ मिळना महागाई नव सेर दाहा सेर जैरी दुसर याची स्वारी पनाला गडावर सडीं जानार यैस म्हनतात धमकावनी देतात कदाच गेले तर स्वारीत घोडी बसावया योगे नाहा देवास तो हे जातात दरसेनास सडे पुढ पाहावे जैस बनल तैस करून निघावे ह्या मनसुब्यात अ हेत घडता काय घडल ते खर श्रीमत तात्या माघारे फिरल्याच वर्तमान येथ बहुत आहे सत्ये असल्ये कृपावत होऊन ल्याहावे श्रीमत रो बापू व स्वामी सातारियास येनार येथ ह्मनतात पाटीलबावास तो भरोसा आहे की येसाजी येऊन भेटल परंतु रो रामचेंद्र गणेश व बाजी गोविंद यास विस्वास येत नाही इतकियावर पाहावे सिराळेकराणी पाटीलबावाकडील लढाई जाली तेंव्हा मानस च्यार जिवे मेली, दाहा जखमी जाली मग पेठ घेतली वलावे छ ३ रोजी रामचेंद्र गणेश यानी कारकून गुरुजीकड पाटीलबावाकड पाठविला की आम्ही सांगून पाठविले असता ते आह्माकड आले आसता सिराळे लुटावे हे उतम नाही पनास ब्राह्मन वगैरे केवळ उघडे, धोत्र देवील नाही, यैसे आले आम्ही निरोप पाठविला असता ध्यानास न आले तेंव्हा आमचे राहाण्यास प्रयोजन काय ? तेव्हा पाटीलबावा बोलिले की आमची वीस घोडी मारली पनास मनुशे जखमी, काही जिव मारली, जा ली ती गु द स्त गुर काही असतील तर सोडून देवितो त्यास लोकास दो प्रहरा रात्री ताकीद जाली की ज्यास जे वस्तभाव घोडी गुर वगैरे सापडली असल ते आताच घेऊन जान लोकानी रात्रीच गुर वगैरे घेऊन वीस कोस गेले कोन्ही कृष्णापार जाले आसतील मतलब ब्राह्मनाची वस्तभाव बहुत गेली कोल्हापुरचे ब्राह्मन सिराळ्यात येऊन राहिले व्होते देवास उपाय कोनाचा ? येसाजी सिंद्याकड कारकून तो गेले आहेतच छ ३ रोजी दत्तु खिजमतगार पाठविला सला करीलसे दिसत इतकियावर न कळे छ २ रोजी गडची पत्र पाटीलबावाचे वकिलाची आली त्यात मजकूर व्होता की पुन्यामधे गाईची पुठे कापली घोड्याचे कान, गणपति, हनमत फोडून टाकले गोसावी कोन्ही मारला पाटीलबावा गुरुजीस ह्मनाले की हा अनर्थ काय ? गुरुजी बोलले की राज्याचा बंदोबस्त उडाला तुह्मी या प्रांती आहा, ह्मनऊन काही येक दाब आहे तुह्मी हिंदुस्तानात गेलात ह्मनजे इकड राज बुडाले, यैसे दिसत पाटीलबावा बोलले की गुरुजी, तुह्मीही आमचे समागमे चलावे उतम आहे ह्मनाले इतकियात कोन्ही भले मनुशे भेटीस आले

---

* यावरून वर ले न ४, ६, ७, ८ इत्यादींचा लेखक धोंडो भिवराव ब्राह्मण होता असें दिसतें [1] सातारच्या महाराजाजवळील फडणीस

मग ही गोष्ट राहिली श्रीमत तात्या माघारे फिरले पाटीलबावापासी ह्मनतात पाटीलबावा बोल्तात की येस येकतो छ ३ रोजी प्रजेन बहुत जाला दो प्रहरा ते समई वीज बाजारात पडली दोन खासबारदार पाटीलबाबाचे जिवे मेले तीन गुर पळाले आहेत तेही वाचतील किंवा कैस हे विस्वराचे स्वाधीन छ १७ माहे रबिलाखरी जोडी पाठविली ती पावली किंवा नाही उतर आले नाही आता जोडी सेवेसी आली आहे, याजला रोजमरा पावला आहे उतर मात्र कृपा करनार धनी येक जोडी आमचे गावास गेली, दोन स्वामीकड, तीन तात्याकड मजपासी जोडी नाही मरजीस येईल ( तर ) दोन जोड्या आनिक पाठवाव्या नाही यासच तऱ्ही उतर देऊन मार्गस्त करनार धनी मागती साहेबाकड येतील रवाना छ ६ माहे जमादिलावल मुक्काम नजीक वारना नदी पाऊन कोस गड पनाला च्यार कोस श्रीजोतलिंग साडेतीन कोस बतीस सिराले आडीच कोस प्रायकाल हे विज्ञाप्त

☞ This is a long news-letter or a diary of events as they occurred in Mahadji's camp, reported to the head quarters at Poona by a secret agent named Dhondo Bhivrao specially employed for the purpose Such letters are instructive in so far as they clearly reveal conditions in a Maratha camp under one of their best generals

---

*NO 10* ] [ 14 June 1777

श्री

विनती सेवक कृतानेक सा नमस्कार विनती विज्ञापना छ ६ माहे जमादिलावल जोडी सेवेसी पाठविली ते पावली असल त्या पत्रावरून कच वर्तमान ध्यानास येईल छ ५ रोजी येसाजी सिंद्याकडील कारकून वगैरे आले होते, त्यास छ ६ रोजी पाटीलबावा रानेखान गुरुजी बाजी गोविंद बालाराव वगैरे येकात बसले याची त्याची भासने बहुत जाली सेवट त्याच्या कारकुनान उतर केल होत की आह्मापासून आतर काय पडल ? यानी त्याचे आगी लावल की आनर या प्रकारच पडल पुढ यानी ह्मटल बाजबी हिसोबी पचेवीस लक्ष रुपये निघतात ते देन चिकोडी मनोलीचा जोबसाल त्याच्या कारकून श्रीमत दादासाहेबाची पत्र व श्रीमत नारायेनराऊ साहेबी पत्र दाखविली तेऱ्हा यानी त्यानी करार ठरविला की येक भला मनुष्य येसाजी सिंदे यानी आमचे समागमे द्यावा पत्र गडी दाखऊ बाजबी रुपये निघतील त्याची निशा सावकारी द्यावी पाटीलबावा छ ८ रोजी रविवारी दरशेनास श्रीजोतलिंगास जावे याच्या त्याच्या भेटी होत नाहीत सिवाय काये भासेन जाले असल ते गुरुजी बाजीपत यानी सेवसी लिहिल असल आह्मी येकिल वर्तमान ल्याहावे कारकून त्याचा याचा छ ६ रोजी तिसरा प्रहरा स्वार देऊन पनाल्यास गेले मागती काय ठरत पाहावे याचा मनसबा ठरला की कैसही करून छ १० रोजी कूच करून निघावे लग्नाचा बाहना करून निघतात रहिमतपुरी सरजाम करविला छ १० रोजी येथून कूच करून कृष्णा उतरोन पईलतीरी मुकाम करावा, लोकास निरोप द्यावा, आपन रहिमतपुरी कन्येच लग्न करावे, बालाराव गुरुजी स्वामीकड पाठवावे, येसाजी सिंद्याकडील कारकूनसुधा येण प्रमान मनसबा ठरला दिनचर्या की यानी येऊन केल काय ? आहे ते उतमच आहे आतरयामीचा मजकूर आसल तो स्वामीस लिहीत असतील ऱ्होलकर श्रीतुळजापूर करून माघारे करकभोस तेथ आलेती मोहीम फते करून श्रीजानाई सातान्यापासी आहे तिचे दरसे

मास येनार याच्या त्याच्या भेटी रहिमतपुरी होनार  दुसर व्होळकर माडवगन तेथ येनार यानी तिकड जावे  श्रीगोंद्यात भेटावें परतु याच त्याच वचेनप्रमान कागदीपत्री कारकुनाचे मारफात पक ठरल हा मजकूर पूर्वी लि॥ आहेच रहिमतपुरी भेटी हे वर्तमान व्होळकराचा वकील सागत व्होता की याची पत्र गेली मजकडूनही पत्र लेहविले आहे पाटीलबावाची धन्याच्या पायासी येकनिष्टा बहुतच झनऊन तोतियाप्रमान येशे आले मतलब पाटीलबावाचे शाहानपनास बट्टा नाहीं येकनिष्ट खरे सला ठरला हे यैकून समाधान जाले कच वर्तमान मागाहून जोडी मुजरद पाठवीन त्यासमागमे लिहू छ ७ माहे जावल मुकाम नजीक वारना नदी पाऊन कोस हे विज्ञास

☞ Newsletter from the camp of Mahadji Sindia communicating to Nana the negotiations of peace and other topics that had taken place

---

*No 11* ] [ 25 June 1777

श्री

पो छ १९ राकर सवा

सेवेसी सदाशिव रघुनाथ* सा। नमस्कार विज्ञापना यैसीजे ता। छ १७ माहे राकर मुकाम कुरकुभ प्र॰थ काल प्रथम प्रहर पावेतो वर्तमान येथास्थित असे यानतर आपली आज्ञा घेऊन स्वार जालो ते मुकाम मजकुरी छ १५ रोजी प्रथम प्रहरी दाखल जालो राजश्री महादाजी पत गुरुजी याची भेट घेतली आपले आज्ञापत्र त्यासी प्रविष्ट केले वर्तमान आज्ञेप्रमाणें श्रुत केले त्यावर गुरुजीबावाही आम्ही आल्याचे वर्तमान राजश्री माहादजीबावा सिंदे यासी सागितले, व आम्ही मजकूर गुरुजीसी आपले आज्ञेचा बोललो तो त्यासी सागितला यावर त्याणी येक मुकाम येथे केला रा। तुकोजीबावा होलकर याचा कारकूनही येथे आला होता त्यासी राजश्री माहादजी सिंदे याणी गुरुजींचे उतराप्रमाणें बोलले त्यास कारकुनाही प्रत्योत्तर केले की तुमचे व तुकोजी बावाचे बोलने जे होणे ते निरेवर होईल तूर्त ते तुलजापुरास देवीदर्शनास जातात त्यास सिंदे बोल्ले की आह्मासही जोतिबास जाणे आहे तुम्ही तुलजापुरीहून लौकर यावे व आपणही देवाहून सत्वरच येतो याप्रमाणें उभयताचे बोलने जाले म्हणून गुरुजीबावानी सागितले तूर्त होलकरानी महादजीबावा देवाहून आल्याखेरीज त्याणी देशास न जावे यैस बोलन्यात दिसते आपली व सिंदे याची अद्याप भेट जाली नाहीं  माहादजी सिंदे याचा कूच होऊन मौजे जलगाव येथील मुकाम होणार रा। गुरुजीनी व रा। पाटीलबावानी पत्र दिल्हे आहे ते सेवेसी पावतील रा। गुरुजीनी पत्री लि॥ आहे होलकर आह्मास न पुसता कूच करून गेले ह्मणून सदासिवपती सागितले त्यास आपण बोल्लिा की होलकर कूच करून का गेले ह्मणून मोघम मात्र बोल्लिा आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ The letter refers to the insubordinate attitude of Tukoji Holkar who being asked to put down the rebellion at Karkamb took possession of the place for himself Nana deputed his agent Sadashiv Raghunath for a settlement to be effceted in consultation with Mahadaji Ballal and Sinde In this connection letters 2156 and 2158 of Khare's vol 6 may be usefully consulted

---

* Nana s clerk surnamed Kelkar

*No 12* ] [ 22 July 1777

श्री

विनती सेवक नारो सिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १६ ताकर पावेतों सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी आज्ञापत्र पा। तेथे अज्ञा की मुहूर्ताने बाहेर निघोन राहाणे स्वारी लौकरीच येईल येका दिवसात जावसाल उगऊन वाटे लाऊ त्यास आज्ञेप्रा। मुहूर्त नवमी सोमवारचा पाहिला आहे निघतो घोडी व उटे आणावयास वाईस लेहून पाठविले आहे तेही येतील राहोटीविसी विनती केली होती दाहा गजी राहोटीची परवानगी आल्यास अगोधर पाहून घ्यावयास येईल पर्जन्यकाळ आहे यास्तव चागली मजबूद घावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev informs Nana that he was ready to start & has fixed an auspicious day for it

---

*No 13* ] [ 25 July 1777

श्री

नकल

मीरखान टोके खुशवख्त बशद्

तहवर जमदस्त दस्तगाहा सु॥ समान सबैन मया व अलफ तुमचे बाप हमीदखान टोके याजकडे जातीस व फौजेचे बेगमीस सरजाम चालत होता त्यास ते मृत्य पावले सबब तुह्माकडे पेशजी प्रो॥

२५००० खासा तैनात

२१००० खुद जातीस व हतीस व पालखी देखील शागीर्दपेशा मिलोन हमीदखान यास तैनात होती ते हाली तुमचे नावे,

४००० शाबजखान व गुलजारखान यास जातीस च्यार हजार रु॥ तैनात करार केली आहे त्यास सरजामपो॥ चोहो हजाराची गावे नेमून देणे हरगुजण जातीणसी चाकरी हुजूर करितील

२५०००

३००० कारकून

२०३०७ स्वार खासे माणूस भालेकरी व आडहात्येरी सामान चागले घोडे माणूस मजबूद बाळगावे

६६ यैन स्वार

२ नि॥ शाबजखान व गुलजारखान

६८

दर राउतीस सालिना सरासरी तैनात रु॥ ३०० तीनसे प्रा।

४८३०७

येणे प्रो॥ अठेतालीस हजार तीनसे सात रुपये यासी सरजाम माहाल व गावची बेरीज पेशजी सरजामात लाऊन दिल्याप्रमाणे देखील माहाल मजकूर —

४७५०७ प्रात खानदेश

४५००० पो॥ डागरी खेरीज मोकासा करून आकार रु॥

४४००० येन आकार
१००० जकात

४५०००
५०७ पो चोपडे पौ गाव खेरीज मोकासा करून आकार
४२५ मौजे मौला
८२ मौजे वैजापूर

५०७
२००० मौजे मेहून पो निंबईत खेरीज मोकासा करून आकार रुो

४७५०७
४०० मौजे कापसी व भिल्वडी पो वखारी खेरीज मोकासा करून आकार रुो
४०० मौजे वटेगाव पो चादवड पो हिसा

४८३०७

येकूण अठेतालीस हजार तीनसे सात रुो बेरिजेचे माहाल व गाव सदरहु लिहिल्याप्रमाणे तुह्माकडे सरजाम करार करून दिल्हा असे तरी पो डागरी व देहेहाये मजकूरचा अमल तुह्मी चवकसीने करून पेशजीचे करारावमोजीब सरकारचाकरी येकनिष्ठपणे करीत जाणे तुमचे आजे मीरखान याचे खानाजाद दलेलखान व हकीमखान आहेत व लेकवले असतील त्याणी सरकारात गैरवाका समजाविल्यास आइकणार नाही माहालात बखेडा करू लागल्यास सरकारातून त्याचे पारपत्य केले जाईल तुह्मी त्याचे पोटाची सोई करून देत जाणे जाणिजे छ १९ जमादिलाखर. आज्ञा प्रमाण

☞ This paper is the grant of a Saranjam conferred upon Mir Khan Toke after the demise of his father Hamidkhan The grant amounted to Rs 48307

---

*No 14* ] [ 30 July 1777

पौ छ २५ जाफर समान

श्री

विनती सेवक नारो सिवदेव कृतानेक साष्टाग नमस्कार विनती ता छ २४ जमादिलाखरपावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री सदासिव दिनकर याची पत्रे पुरवण्या सा पाठविल्या आहेत अवलोकनात येऊन माघाऱ्या पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत राजश्री पाटीलबावा याचे चितात मात्र आला आहे की उभयताचे विचारे मसलतीस आड लाऊन खर्चीखाले आणावे मसलत जाली तरी उतमच आहे न जाली तरी चढास लागले आहेत ते नरम होतील हा विचार करून या दिवसात मसलत सागितली ज्या दिवसात आम्ही सागा ह्मणत होतो तेव्हा न सागितली आणि पर्जन्याचे सधीत सागितली याजवरून अर्थ हाच दिसतो जे आह्मास फजीत पाडावे हे आपल्या आवल्यात बोलतात याचे परिमार्जन करावयास जागे आहेत परंतु जे कामाचे प्रसगी आहेत त्यानी करावी, ती हात नाहीतसे दिसते परतु पाटीलबावाचा स्वभाव येक वाईट आहे कोणी सागतो त्याचा शोध पुरता करून मग चितात विषम आणावे हे नाही प्रसगी राहावे त्यानी या गोष्टीस बातमी

टेऊन वरचेवर परिमार्जन करीत जावे असे आहे आढळले वर्तमान सेवेसी कळावे यास्तव लिहिले आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev communicates to Nana Mahadji's suspicions that the ministers at Poona were working for his downfall

---

*No 15* ] [ 10 August 1777 ?

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी—

विनंती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ ४ रजब रविवार प्रहर रात्री मुकाम रहमतपूर स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष येथें पावल्यावर विनंतीपत्र सेवेसी पाठविलें तें प्रविष्ट जालें असल काल राजश्री पाटीलबावाची गाठ पडोन बोलणें जाह्लें चिठी देऊन वाचून दाखविली सेवकाचे पत्राचा हवाला होता, त्यातीलही मजकूर सांगितला तात्पर्य कीं गाठ पडली पाहिजे त्यास यांनी येकच उतर दिल्हे जे, मसलत करवीरची त्यानींच सांगितली आहे ही सेवटास गेल्यास्तवराज कोणताही मजकुर होत नाहीं मसलत आखर जाल्यावाचून पाऊल मागें पडत नाहीं दुसरा जाबसाल किमपि करीत नाहीं च्यार घटिकाचे बोलण्यात पर्याय सुचलेले पुष्कळ काढिले उतर हेंच दुसरे बोलतच नाहींत आणिखी गाठ पाडून बोलतों होईल वर्तमान ते लेहून पाठवितों × बाबाची शरीर प्रकृति ठीक नाही जुलाब दोन दिवस घेतले जलदी विशेष करावी तरी मर्जी बहुत दिसती यास्तव मरजी नीट जाल्यास जाबसाल करून लेहून पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports to Nana his interview with Mahadji at Rahimatpur in which he expressed his great desire seriously to accomplish his undertaking against Kolhapur

---

*No 16* ] [ 11 August 1777

श्रीशंकर

विज्ञापना गुरुजीबावा छ ४ रजबी बेलवड प्रतिनिधींचा गाव तेथ गेले आहेत येका दो दिवसा येणार त्याची उट आली चारनीस गेली व्होती रो बाळाराव यानी मोहूर्त करून श्रावन सुध पचेमीस राहुटी बाहीर दिल्ही अष्टमीस कुटुब पेडगावास बिदा करणार. सुध एकादसीस गुरुजी व बाळाराव स्वार होऊन गडास येणार येन प्रमान ठरल इतकियावर न कळे आनंदीबाई पाटीलबावाची बहीन निंबाळकरीन छ ६ रोजी स्वार होऊन श्रीतुळजापुरास गेली याचे कारकून व व्होळकराचा वकील व्होळकराकड गेलेत ते आले नाहीत छ ५ रोजी पत्र आली, परतु काय लिहिल हे समजल नाही छ ७ रजेब हे विज्ञाप्त

☞ The daily routine of Mahadji's life is further communicated to Nana by his newswriter in camp

---

*No 17* ]                                                  [ 17 August 1777

श्री

'भवानी सिवाजी आपाजी ( पराजपे ) याणी लिहून दिल्ही छ १२ रजब समान भावण मु॥ पुरधर

यादी

प्रथम रघुनाथ दीक्षित पुण्याहून गेले तेव्हा त्याची भेट आमची जाली नंतर त्याणी सागितले की मला तोतयास भेटवा ते (व्हा) आह्मी ह्मटले की हे श्रीमताचे माऊसभाऊ पूर्वे वलखी आहेत याची वलख पुरत्ये की काय ते पाहावे तेव्हा नेऊन भेटविले नतर त्याचे बोलणे जाले तेव्हा दीक्षितास आह्मी पुसले की तुमची निशा जाली की काय? तेव्हा त्याणी सागितले की मी त्यास वलखला माझी निशा जाली नतर दीक्षित पुण्यास येऊन नाइकास भेटोन गेले पत्र नाइकाचे नव्हतें त्याणी सागितले की मी नाइकाची निशा केली मग त्रिंबकपत भट पहावयास ह्मणून आले तेव्हा त्याणीही वलख पुरली ह्मणोन सागितले नतर धोंडोपत व हवलदार व माझ्या मतें हा खरा आहे तर यास मोकला करावा यैसे दुर्बुध होऊन मोकला केला हे सर्व वृत्त पेसजी लिहिलेच आहे रघुनाथ दीक्षित व दौलतगिरी हे ह्मणत की श्रीमत मोरोबाचे सूत्र आमचे हाती आहे यैसे ह्मणोन आह्मास मोहात घातले त्याजकडे येक दोन वेला पत्रेंही पाठविली परतु त्याचे सागणे जाय ( जाई? ) की आपल्या खुणा पटल्यावाचून आपली निशा होत नाही हे लेहून पाठवीत की आमची निशा जाली यैसे लेहून पाठवीत नतर माधवराव पाडुरग पुण्याहून आला पालखी त्याणेंच दिल्ही आनुबाईची वरचेवर पत्र येत की लौकर बाहेर काढा व भास्कर हरीचीही येत व उधोपतही बच्याजीपत पतानी पाठविला तोही ह्मणो लागला की माझी निशा जाली मग बच्याजीपताचीही पत्रे येऊ लागली

रत्नागिरीहून आमचे तर्फेन व सौ। अनपूर्णाबाईच्या तर्फेन पुण्यास बातमीस जात येत असत

१ गोपाल शागीर्द घरी होता तो दोन तीन महिन्यामध्यें येक वेल येऊन जात असे

१ विनायक फडका घरींच होता, तोही येत जात असे पुण्यास

१ शामभट तेलग द्रवीड

१ भिकाजीपत विजयेदुर्गास गगाधर पताजवळ होते तेथून मग मजवळ राहिले होते तेथून मी पुण्यास श्रीमत मोरोबा दादाकडे पाठवीत होतो त्यास त्याणी सागितले की आपल्या खुणा पटल्यावाचून माझी निशा होत नाही यैसे सागितले तेव्हा हेच बोलणे रघुनाथ दीक्षित याजवळ जाऊन आम्ही सागो तेव्हा ते सागत की आता कशास पाहिजे ? त्याची निशा आम्ही करू तुम्ही उगेच असा

१ विठलराव गाडगीळ पुण्याची व पुरधरची बातमी लिहीत असे

गोपाल व विनायक हे बातमीस येत असत त्यास गोपाळ सागत असे की मी येक वेल पुरधरास गेलो होतो म्हणोन सागत होता कची पकी बातमी सागत असे विठलराव गेले याज कडून येक वेल कारकून व पत्र सुवर्णदुर्गाकडे आलो तेव्हा रघुनाथ दीक्षिताजवळ आला होता पत्रातील मजकूर काय होता तो मला समजला नाही नेहमी बातमी त्याज [ अपूर्ण ]

---

१ या दोन ओळी नाना फडणिसाच्या हातच्या तोतयाचे सबधाचा हा कागद त्या प्रकरणात वाचावा

*No 18* ]　　　　　　17 August 1777

श्री

याद्दी जबानी सिवाजी आपाजी पराजपे
सन समान सबैन श्रावण

वस्त्रे तोतयास पाठवीत होते कोण ? त्यास येसूबाई याणी येक वेल पाठविली होती काय काय पाठविली ते शफतपूर्वक स्मरणात नाहीं दौलतगिरीकडून केनकर कोणी पुण्यात होता तोही नेत असे अमुक नेई यैसे ठाऊक नाहीं रघुनाथ दीक्षित याचा माणूस पुण्यास येऊन नेत होता. कोणाकडून नेत होता हे मला ठाऊक नाही मोरो बापूजी याणीं आपले घरी नेऊन वस्त्रे शालजोडी व तिवट दिल्हे, व पत्र (नाही) त्याकडून वस्त्रे आली होतीं हैदरनाईक याणें वस्त्रें व पत्र कारकून घेऊन राजमाचीस आला आपल्ये तिकडे यावे यैसे बोलत होता आनुबाई याचे चिरजीव आले त्याणीं येक हती नजर केला व सिरपेच कठी दिल्ही व पत्रेही अगोधर येत होती व भास्कर हरि याणी आपले चिरजीव पाठविले होते त्याचीही पत्रे येत होती आनुबाई काही फरालासही पाठवीत होती इग्रेजाकडून पत्रे येत होतीं वकीलही सुवर्णदुर्गास पाठविला होता शामलाकडूनही पत्रे येत होती त्याणे आपला जावई श्रीवर्धनास आला होता गोविंदराव माणकर याणे वस्त्रे दिल्ही होती रघोजी आगरे याजकडून पत्रे येत होती व शाकभाजी श्रीवर्धनच्या मुकामास येत होती भेटावयासही येत होता येक मजल निघोन आला होता मग बोरघाटाची लढाई जाली तेव्हा परतोन माघारा गेला किला व पहिली जागा होती ती मागत होता

बातमी—

१ विसाजीपत गद्रे जवल असत त्याचा माणूस बातमी घेऊन जात असे
१ दौलतगिरीची माणसे बातमी घेऊन जात असत
१ रघुनाथ दीक्षिताची माणसे बातमी घेऊन जात असत
१ आनुबाईची माणसे बातमी घेऊन जात असत केतकर दौलतगिरीकडे होता तोही पुण्यास येत जात असे
१ येसूबाईकडूनही माणूस जात असे

बापूजी नाईक याजकडून कारकून आला होता पत्रे नव्हती कारकून ह्मणत होता की नाईकास घेऊन येतो यैसे ह्मणत होता राजमाची पर्यंत होता वासुदेवबावा सर्वांची खातरजमा करून देत असत रासत्याकडून येक अग्निहोत्री आले होते ह्मणोन रघुनाथ दीक्षित सागत श्रीमत दादासाहेबाकडील शास्त्री सुवर्णदुर्गास अटकेत होते ते याणे सोडिले तेच त्याजकडे जाऊन आले पत्रे वस्त्रे तोतयास नव्हती माधवराव पाडुरग याणे दादासाहेबास लिहिले होते त्याचे उत्तर मात्र होते

☞ This and the preceding paper are confessions of Shivaji Appaji Paranjpe, bearing on the affair of the pretender whom he let at liberty at Ratnagiri, and mentioning the persons who were concerned with that place

---

*No 19* ]

श्री

१ तीर्थस्वरूप राजश्री रामचद्र नाईक याणी दाहा पाच वेला खोटा ह्मणोन पत्रे जात असत, परतु बेडी तोडावयाचे पत्र नाईक याचे नव्हते रघुनाथ दीक्षित व त्रिबकपत भट व

विसाजीपंत यांणी खरा ह्मणोन सांगितल्यावर आमचे बुधीस भ्रश होऊन बेडी तोडिली नंतर गणेशपंत नाइकाकडून लस्करांतून आला फिरोन बंदोबस्त पहिला होता तसा करावा ह्मणोन ह्मणत होता परंतु धोंडोपंताच्या विचारास न ये, सा। गणेशपंताकडून हुजूरपत्र लिहिले की पूर्ववत् प्रो बंदोबस्त आहे ल्यख अपराधी आहे स्वामीनी क्षमा करावी आणि पावन करावे

१ तोतया घरी जेवावयास आला होता

१ विसाजी केशव याजकडून कारकून खरा की खोटा याचे चौकसीस आला होता पत्र नव्हते बच्याजीपंत यास भेटोन गेला बोलणे काय जाले ते न कळे

१ बच्याजीपंत बरवे याजकडून उधोपंत चैत्रमासी प्रथम रत्नागिरीस गेले होते तोतयास भेटले मग त्याचे पत्र घेऊन बच्याजीपंताकडे गेले फिरोन बच्याजीपंत यांणी कारकुना-समागमे सदासिव चिमणाजी ह्मणोन पत्रे पाठवीत असत

१ आमचे घरांहून कोणी बातमी लिहित होता असे खरे जाल्यास आपण गुन्हेगार

☞ Shivaji Appaji Paranjpe who was the keeper of the pretender at Ratnagiri, gave the above confession in writing to Nana Fadnis, when at the time of his punishment, he was asked to narrate all persons & circumstances connected with the release of that offender The writer confesses guilt & begs for mercy

---

*No 20* ] [ 18 August 1777

श्रीशंकर

विज्ञापना छ १४ रजबी बालारायाकडे गेलो येकांत गाठ पडली मग विनंती केली की गडचे वर्तमान काही नवल विशेष आले की काय ? त्यास बोलिले की नानास बसविले हे वर्तमान काल्यापासून उडाले परंतु मिथ्या आहे बापू, मोरोबा, बज्याबा, तिनो विठल येकत्र जाले हे खरे नानास वर्तमान नाही दुसरे नानावर काही घरकृत्याचा अभिप्राय आनला आहे हे निमित्य ठेऊन घरी बसवावे हरिपंतास फौजेच्या पेचात परभारे आनावे, येस घाटत आहे आणि खरे आहे तात्यास ल्यहावे की सावध असावे चिंता काय ? आह्मी मायेत आलियावेगळ करणार नाहीत परंतु आज्ञासिवाय मोरोबाचे सूत्र गणोजी कदमाचे विद्यमान सरदाराकडे आमच्या लाविले आहे आह्मी गडास जातो कस कस असल ते ध्यानास येईल तात्यास वर्तमान लि।। मासे न लि।। दिनचर्या ह्मनऊन लि।। हे विज्ञाप्त

☞ The newswriter of Nana Fadnis writes to him from Mahadji's camp that a rumour had spread there that a plot had taken place at Purandar resulting in the arrest of Nana, due to some secret domestic evil

---

*No 21* ] [ 19 August 1777

श्री

विज्ञापना होलकर सिंदे यास उमेदवार करून कर्नाटकात पाठवावे ह्मणून लिहिले होते त्यास उभयता दोही कामावर गुतले रिकामे जाले तरी कर्नाटकची मसलत कबूल करतीलसे दिसत नाही ह्मणोन लिहिले यैसास हैदरखानाची मसलत कोण जातीची, येथे फौज किती आहे ती

कोणे आवस्थेची ही झाडा आल्यावर समजेल श्रावण अर्धा जाला पुढें दिवस राहिले नाहीत हैदर खानाचे पारपत्यास सरजाम किती असावा हे ध्यानात आणून त्याची तरतूद कर्तव्य ती करावी गायकवाडाचा ठराव लवकरच होईल जो न यैके त्याचे पारपत्य करणेच प्राप्त जाले अताजी नागेशाचे मर्जीप्रो होत नाहीं तेन्हा पैका सरकारचा येत नाहीं सेना खासखेळी गोविंदराव याची काढून यास सागावी गोविंदरायास श्रीमत कैलासवासीचे वेलेस दीड लाख द्यावयाचे केले होते त्यास तीन पो देवावे तर पाच लाख रुो देणार तेन्हा हे करणे आह्मा कसे करावे ? सात पो गोविंदरायास जागीर द्यावी असे निश्चयात आणिलें आहे अद्याप अताजी नागेशासी बोलून ठरलें नाहीं गुडघ्याने काहीच काम सुधे होत नाहीं पैका मिलत नाहीं ह्मणोन व राजश्री भवानराव प्रतिनिधीची आवस्था फार कठिण, स्त्री गरोदर आठ महिन्याची आहे, बाबूजी नाईक गलाठ्यातच आहेत, मोरो माधवराव याचा काल जाला, माणसे चागली जातात ह्मणोन लिहिले त्यास मोठी मोठी माणसे खर्चेली दौलतेत मनुष्य राहिलें नाहीं, याजमुले सर्व गोष्टी उघड्या जाल्या ईश्वर इच्छा घडेल ते खरें [1]गणेशपताचे पत्र आले होते त्यात फतेसिंगाची नजर सुधी नाही ह्मणोन लिहिले होते त्यास अतोबा पुण्यास आले आहेत उभयताचा ठराव करून कजिया तोडावा ते स्वामी करीतच आहेत जी ती गोष्ट लाबणीखाली पडते इलाज नाहीं प्रतिनिधीस फार बरे वाटत नाहीं आता कसे आहेत, रोग काय ते ल्याहावे नाइकाचे पत्र मजला आले होते प्रकृत बरी आहे ह्मणोन लिहिले होते मग आता कसी असेल देव जाणे मोरो माधवराव उमदा माणूस होता परतु आयुष्य मर्यादेस इलाज नाहीं हे विज्ञापना होलकरानी करकच घेतली मोकले जाले आहेत आता त्यास कामगिरी काय योजिली ? सिंद्याचे सोइरिकेमुले सारे मराठे खटे आहेत घडेल ते खरें हे विज्ञापना

☞ Haripant Phadke writes to Nana Fadnis deploring the deaths of several useful persons in the Maratha state & advising a settlement of the dispute between the Gaikwad brothers

---

*No 22* ] [ 21 August 1777

## श्रीशंकर

विज्ञापना छ १७ माहे रजब श्रावन वदे ३ गुरुवारी बालाराव व रो गुरुजी पाटील बाबापासून बिदा व्होऊन कोरेगाव तीन कोस तेथून आहे तेथील मुकाम केला मीही त्याचे मुकामास गेलो व्होतो बालारायास विचारल की गोपाळशास्त्री* व राघो विठल दि॥ येसाजी सिंदे हे समागमे येतात की काय ? बालाराय बोलिले की समागमे चालावे, करार तो ठरला परतु मागाहून येका दो दिवसा येतील गडाकडील वर्तमान काही आले की काय म्हनऊन विचारल नारो सकर वकील आमचा त्याच पत्र आजच आले ह्मनाले त्यात काही मजकूर आहे की काय ह्मनऊन विचारल. उतर केल की मजकूर जो घाटन आहे तो नानासही समजला आहे बापू दोन्हीकडही आहेत घाट तो घातिला आहे खरा परतु या कामास येक दोन मास लागतील सिंदे व्होलकर या प्राती असता येस व्होईल मग तोड काय दाखवितील ! इतकियावर आहेत खिलाडीदार आह्मी गडास जातो कस कस असल ते सर्व समजल तात्यास ल्याहावे की चिंता नाही समजोन घेऊ रात्री माग फिरोन रहिमतपुरास आलो छ १५ रोजी सदाशिव दिनकर दाजी दि॥ नारो सिवदेव त्यास दाजीनी पत्र नारो सिवदेवास लि॥ की हे गडबड येकनो कसकस वर्तमान आहे हे लेहून पाठवन

---

१ येथून पुढील हस्ताक्षर हरिपत फडक्याचें

* गोपाळ दीक्षित श्रोत्री करवीरकडील वकील

त्यास नारो सिवदेवानी पत्र दाजीस लिहिल की छ १५ रोजी लछुमनराव रासते गडीहून आले हैदरनाइकाचा वकील त्याचा कारभार याच्या विदेमान व्होतो त्यास रासते आले त्याणी वर्तमान सागितल की गडबड आहे खरी परतु नानाही सावध आहेत त्याच्यान व्होत काय ! दुसर येकात सिंद्याचे वचेन नानासाहेबासी आहे की काम पडल्या जवळ येऊन पोहचावे त्यास नाना केवळ याचे भरोसियावर नाहीत सावध आहेत ह्मनऊन नारो सिवदेवान लिहिल परतु मजला इस्वास येत नाही माहाराज, येखादे बेळस मसलत बहुकनी, मनसुबे येकीकड राहातात, अनी व्होनार तेच व्होईल जैस श्रीमत नारायेणरावसाहेबाची आवस्ता जाली त्यासही कोन्ही सागितल असलच त्याच्या ध्यानास न आले तसा परिनाम उतम दिसत नाही छ १६ रोजी सध्याकाळी मागती मोरोबादादा व चितो विठल याजकडील कारकून मागती आले छ १७ रोजी पाटील-बाबासी येकात झाला [1]गकारनामकाचे राहुटीस आहेत गकारनामकास विचारल उतर केल की मजला समाधान नाही भेट त्याची मात्र जाली पुढ जाबसाल तो माझे विदेमानचा आहे कस कस व्होत, हे सरदार तो खिलाडी चहूकड सूत्र लाऊन ठेवावी पुढ जो मनसुबा उतम ते करावे तात्यास ल्याहावे की मी भाऊपना राखीन चिंता नाही छ १७ रोजी जोडी आमची चोरबातमीची गडी असती ते आली त्यान वर्तमान हेच सागितल की सासवडी गडी लोक ह्मनतात परंतु नानासाहेब खुशाल आहेत परतु न जानो कोन समया कस कसा येतो हे विज्ञास

☞ This is a continuation of the news-letter from Mahadji's camp, in which the report spread about Nana Fadnis being arrested at Purandar is mentioned

---

*No 23* ] [ 10 Sept 1777

श्री

विज्ञापना बालाराव गुरुजी स्वार जाले ते समई यासी येकात जाला की श्रीमताची मातुश्री ग्रात चाली मुलास हगवण लागली मातुश्रीची खत करितात चिन्ह सुधे दिसत नाही या अर्थी श्रीमताकडील धोरण पके ठेवावें याच्याही मनात ही गोष्ट ठरली की गुरुजी खरे बोलतात दुसरें नाना पूर्वी येकवचेनी होते आता कारभारसमधी वचेन कोठें चालतें ! त्यास तुम्ही सावध व्हावें पुढील धोरण ठेवावें दुसरें हरिपत होते तोंपावेतों तुह्मा स हरिपतीच खराब केलें व्होलकरास पार पाडलें तुह्मास खराब केलें हारपत साकरेची सुपारी बोलून दाखवनार नाहीं घात करावयासी चुकणार नाहीं येणप्रमाणें भाशण येकात जालें ह्मणून पैविलें त्यास यासही हे गोष्ट खरीच भासली की आदियाप देवी गोवर नाहीं मातुश्री शान जाली, न जाणो पुढें कसकसें आहे या आर्थी बहुत मनसब्यात आहेत मतलब य प्रसगी येसे दिसोन आले की निमित्ये नानावर देऊन जें कर्तव्य तें करावें या मनसब्यात आहेत छ ३ माहे शाबानपासून डाक गडापासुन येथपावेतों बसविली रात्रदिवस मनसबा येकात राणेखान आपण व्होत आहे चिंता काय ! ध्यानातच आहेत सेवेसी श्रुत होये छ ७ माहे साबान हे विज्ञास

☞ This is a news-letter from Mahadji's camp reportig his consultations & plans to Poona

---

[1] गुरुजी !

*No 24* ] [ 30 Sept 1777

श्री

विज्ञापना दिनचर्या की येसाजी सिंदा याजकडील सला बालाराव गुरुजीचे सिवाये सरकारा तच ठरला तीन लक्ष रुपये नगद् द्यावे येणेंप्रमाणें ह्मणतात दिनचर्या राणेखान किंवा कोणे मुस दियाचे मुखानें यैकिले नाहीं याची पत्रें सिलेदार लोक याचे आहेत त्यास गेली कीं तयारींत असावें विजयादशमी जाली ह्मणजे दुसरें बोलाऊ पाठऊ ह्मणजे स्वार होऊन यावें सेवेसी श्रुत होये छ २७ साबान हे विज्ञाप्ति

☞ An offer of peace made by Yesaji Sinde to Mahadji on behalf of Kolhapur is reported from the latter's camp to Nana

---

*No 25* ] [ 10 Oct 1777

श्रीशंकर

विज्ञापना पाटील बाबा छ ७ माहे रमजाण शुक्रवारी कोरेगावचे मुकामास आले रो नारो-गणेश व विसोबा लावहाते सध्याकाली आले फौज हाजार दोन सवादोन पावेतो जमा जाले नित्य लोक येतच आहेत सडी स्वारी आहे रो आयास विचारलें कीं प्राथ काळीं शनवारी मुकाम कोठील ? येरवाड्याचा मुकाम करू म्हणाले सध्याकाळीं नानाचे मरजीस आले तर भेटी होतील नाही तर श्रीमत सुधा सर्वांच्या भेटी रविवारी प्राथकाळी पाचा घटिका आलीकडे म्हणाले छ ७ माहे रमजाण शनवार दोन घटिका रात्र प्राथकालची याच कूच जाले गडबड तो जाली बाजाराचीही तयारी जाली इतकियावर मुकाम जाला तर न कळे परतु राहुट्या पाडल्या शनवार प्राथ काळ हे विज्ञाप्ति

☞ This conveys further news from Mahadji's camp reported to Nana about the former's movements

---

*No 26* ] [ 3 Nov 1777

श्री

विज्ञापना छ २९ रमजानी पाटीलबावाचे कचेरीस गेलो होतों समाधान नाहीं या आर्थी राणेखान आपण उभेता बसले होते राणेखानास विचारलें की ह्योळकर श्रीजेजुरीस आले ह्मणून यैकिलें पाटीलबावाच बोलले की आले तर चिंता काय, गेले तर चिंता काय ? कोठे जातील ? आह्मी नाना तात्या येके विचारें आसलों मग कोणाच्याने काय होणे आहे ? आसे ह्योळकर नवे उभे करणार विनती केली की आपण कृतकर्मे आहेत आत करणापासून चितावर धरलिया सर्व होऊन येईल त्यानी उत्तर केलें की आह्मासी जो नीट चालतो त्यासीं जिवानसी हजर आहों, आणि आह्मासी कटकण्या करतील तर पातशाहा नवे उभे करणार जे व्याहू तें करू सबब की आमची निष्ठा श्रीमताचे पायापासीं व नानासी आहे ह्मणून आह्मास येश ईस्वर देतो इतकियात रायाजी पाटील आले ते ह्मणाले की सदासिवपत दि॥ नारो सिवदेव आमचे बिऱ्हाडास आले होते देशमुखाचे कामाकरता त्यास तीस हजार मुद्दल त्याचे पावणेदोन लक्ष केले ह्मणतात त्यास याचा विचार करून त्यास सागावे गगाजी आव्हाड जाईल इतकियात पाटीलबावा बोलले की तीस हजार मुद्दल द्यावे व्याज देतो कोण ? इतकियात राणेखान हजूच बोलले की दाम दुगुण येसे ह्मणतात इतकियात पाटीलबावा बोल्ले की सदासिवपतास बोलाऊन आणवावें त्यास सागावे की

सर्व द्रिष्ट आज्ञावर आहे तुझी गडास त्याहावें की तिसा हजारावर फडच्या करून घ्यावा येकदा सदाशिवपंताकडून पत्र गडास लेहवावें उत्तर कसकसें येतें मग पुढें त्याप्रमाणें तजवीज करावयास येईल मग रायाजी पाटील हुजूरच बोलले की घोंडोपंतास बिऱ्हाडास जावें ह्मणून सांगावें मग सदासिवपतास बोलाऊन आणवावें इतकियात आह्मीच उठलों मग त्यानी सदासिवपंतास बोलाऊ पाठविलें मग कस कसें ठरलें तें न कळे परंतु सदासिवपंतानी गंगाजी आव्हाड बिदा केला नारो सिवदेवाकडे मग कस कसें ठरलें आसेल तें सदासिवपंतानी त्यास लिहिलें आसेल छ मजकुरी सध्याकाळीं पाटीलबावाकडे गेलों पाटीलबावानी विचारलें की तात्या कोठें आहेत ? तुगभद्रे आलीकडे आहेत ह्मणून सांगितले पाटीलबावा बोलले कीं व्होळकर तिकडे जावयाकरिता मागे पुढें पाहतात हें वर्तमान तात्याचे फौजेंत कळेल त्यास हैदरखान मागती शेर होईल त्याआर्थी व्होळकराची समजोती पाडून तिकडे बिदा करावें आह्मी सहज त्या प्रांती पनाळ्याकडे जात आहोंत तात्यास तिकडे कामकाज पडलें तर आह्मी माघारे फिरोन येऊ की काय ! हैदरखानाचे पारपत्ये करूनच येऊ त्यास तात्यास व इकडे नानासही त्याहावें की पाटीलबावाची जाहागीर वगैरे बदोबस्त करून फौजा जिकडील तिकडे पाठवाव्या माल्हो सिमगा इकडेच लागतो मग फौजा जाव्या कधी ?, काम व्हावें कधीं ? या अर्थी कामाचा निकाल पाडून बिदा कराव्या येसे पाटीलबावा येकात दिनचर्या वर्तमान येकतो ह्मणून त्याहावें आणिकही गोष्टी कितेक कामाकाजाच्या बोलले की आह्मी सर्वस्वे नानाचे तात्याचे मतलब इतकेंही मिथ्या परतु प्रस्तुत कामाचा जाबसाल लागला आहे ह्मणून मिष्ट भाशण करावें आतरयामी खरे खोटे आह्मासीं या प्रकारें बोलावें येकात मनसबा दुसराच हें स्वामीच्या ध्यानात आहेच नित्ये कार्ये लिहू छ २ माहे सवाल हे विज्ञाप

☞ News-letter from Mahadji's camp continued It reports Mahadji's profession of loyalty to the views of Nana & Tatya, but doubts its sincerity

---

*NO 27* ] [ 6 Nov 1777

श्री

विज्ञापना छ ५ सवाली दो प्रहरा पाटीबावा राणेखान येकात उभेताच बसले त्यास पाटीलबावा बोलले की हुडे खाडवे घयावे हुडे न देतील तर रुसवा करून दाबही द्यावा परतु हुडे घयावेंच व्होळकराकडे खरगूण, आम्हाकडे हुडे खाडवे, व्होळकराकडे सुरज, आम्हाकडे भेलसें, त्यास कैसेंही करून हुडे घयावे ममता पुरस ! दाखऊन आसेरही घयावीच निदान दो महिन्याचे वायेदाने आसेर कबूल करावी परतु हुडे सोडू नये राणेखान बोलले की आसेर व हुडे देतील, परतु तुम्हास हैदरखानाचें पारपत्य केलें पाहिजे त्याचे पारपत्ये न केलें तर बटेबाज पुरतेच लोक म्हणतील पाटीलबावा बोलले की आधीं पनाळ्याचे काम जालियावर मग तिकडील कस कसे होतें पुढें जैसें बनल तैसें करावयास येईल हैदरखानाकडे जाऊ परतु वीस हजार फौज ठेविली पाहिजे रुपया बहुत लागेल त्याहीमधें हैदरखानाचा सला नच ठरला तर सहजच छावणी करणें प्राप्त जालें तेव्हा रुपये बहुत लागतील या अर्थी जैसा प्रसग बनेल तैसे करावयास येईल मागती राणखान बोलले की व्होळकराचे बिदाई लेहविले आहे त्याचे उतर कस कसें येतें तें पाहावें व्होळकरही आपले मार्गेन वोढावे त्यास आम्ही कटकण्या[1] करितों हें मुसदियास समजत आहेच तेही कामिंदे[2] आहेत नाना येत्न करतील पाटीलबावा बोलले की हरिपंताकडे न जावें रुपये बहुत खर्च व्हेईल मुसदियास तो हे न समजे

---

१ कटकणी = craft, cunning २ कामिंदा = अकलवान

तरी हे खर्चाकरिता अनमान करतात, आणि युक्ति काहीं केली पाहिजे त्यास मागती ह्मणाले की आधीं पनाळ्याचें काम करावें पुढें जैसें बनेल तैसें करावयास येईल इतकियात सदाशिव दिनकर व भवानी शकर वगैरे मडली गेली मग हे भाशण बोलता राहिले कळावें हे विज्ञास

☞ News-letter from Mahadji's camp continued, reportig Mahadji's desire to have Handia, Khandwa & the fort of Asher for himself

*No 28* ] [ 6 Nov 1777

श्री

श्रीमत राजश्री नानासाहेबाचे सेवेसी—

आज्ञाधार येसाजी रामजी जासूद जथेदारजी ना चेरनावर मस्तक ठेली सा। दडवत विनती उपर येथील क्षेम ता। छ ५ बस्तवार प्रार्थकाल जाणून स्वकीये लेखनआज्ञा साहेबी केली पाहिजे विशेस साहेबी मला मानाजी सिंदे याचे बातमीवर पाठविले त्यास मानाजी सिंदा व भाहोराव सिवदे पढंपुरावर व्हते याचा सरमजाम फौज दोन आडीच हजार व गारदी ग्यारसे भेटली बर नदीपलीकडे मुकाम केला व्हता त्यास आपलेकडू रो प्रतिनिधीकडील राजश्री वासदेवपतभाऊ पढरपुरास आले त्याचा मुकाम पद्माचे तल्यावर राहिले त्याचा व याचा जाबहाषील लागला मग मानाजी सिंदा व भाहोराव चढाई करोवास देवपतावर आले हेही तयारच व्हते यासी व त्यास मगळवारी सध्याकाली लढावी जाली भाहोराव जखमी जाले पाडावात आले गारदी आवघे मारले पडले मानाजी सिंदा पळोन गेला जो राऊत फुटून गेला त्याचे घोडे हिरो(न) घेतले ही दषा जाली पारपत चागले जाले लुटून आवघे घेतल साहेबास विदित व्हय याव्हेर जे वर्तनूक व्हईल ते साहेबास सुरते करू बहुत काय लिहीन कृपा लोभ असो धावा हे विनती

☞ Yesaji Ramji a messenger sends news to Nana Fadnis of a fight having taken place near Pandharpur between Manaji Sinde & the Pratinidhi in which the former was routed & fled

*No 29* ] [ 6 Nov 1777 ?

श्री

विज्ञापना छ ५ सवाल गुरुवारी पाटीलबावाचा गुरु फकीर बीडकर* तो शात जाला, त्याच्या पादुका आहेत त्या आठवे रोजी गुरुवारी जागा आराश करून छेमिने उभे करून उरुस भर वितात दोन प्रहर रात्रपावेतों कथा होती उपरात आपण येकलेंच बसावें, काहीं विचारने आसेल तर येकत्यान बसावें, मग स्वप्न आवस्था होती किवा कैसें आसेल तें न कळे त्यावर छ मजकुरी उरूस जाला तेव्हा पाटीलबावानी विचारलें की आम्ही पनाळ्याकडे व हैदर नाइकाकडे जावें की नाहीं ? तेव्हा दृष्टात जाला की तुमची बुध्धि ठिकाणी नाहीं तुमचे बुध्धीस आतर पडलें तुम्ही स्वता शीश+ करू लागला आमचे ठिकानची आस्था उडाली तुह्मास कळेल तैसें करणें चितास येईल जावें चितास येईल न जावें येणेप्रमाणें रागें भरोन दृष्टात जाला तेच समई बाळाजीपत दि॥ मीरजा रहीमबेग उजेनचे कमावीसदार याजपासीं सागू लागले की आज साहेब रागें भरले आह्मास पनाळ्याकडे वगैरे जावयाची आज्ञा होत नाहीं त्यास राणेखान गणोजी कदम वगैरे पाठ वावे येणेप्रमाणें यैकिलें सत्ये असत्ये न कळे याच्या कळा हेच जाणत सर्व गुणसपन्न दुखण्याचे मिस करावयास बहादर मतलब कोणते गुण सुधे ह्मणून त्याहावे ? असो ये समई जैसा स्वामीनी

* मन्सूर शहा + शिष्य ?

ठराव केला आहे त्याप्रमाणें त्वरा करावी याजपासून कामें तऱ्ही घ्यावी यास किला आताच न दिल्हा तर याची समजोती पडत नाहीं, तेव्हा देणें प्राप्तच जाला परंतु जें करणें तें जलदी करून बंदोबस्त तऱ्ही करावा इतकियावर मर्जी सेवेसी कळावें हे विज्ञाप्त

☞The letter reports Mahadji's commemoration of his preceptor's anniversary & the fresh light he received from that spiritual source The incident reveals Mahadji's religious sentiments

---

*No 30* ] [ 8 Nov 1777

श्री

विज्ञापना छ ७ माहे सेवाल पाटीलबावा प्रहरादिवसा देवघरात बसले व्होते देवाची पूजा जाली इतकियात सदाशिव दिनकर आले मग सर्वत्रास उठविले पाटीलबावा रानेखान सदाशिवपंत बसले आह्मी पडद्याच्या बाहीर दत्तु खिजमतगार व मी बसलो मग या त्रिवर्गांचा येकांत येक घटिका जाला हलूच बोलत व्होते मोव्यान पाटीलबावा बोलिले की आसो इडे घेऊ नाही तर काहीच लागत नाही मुसदी यानीं आह्मास तें मायेत घेतें तर इडे यावे बार महिन्या दो महिन्याचे बो ह्मटलें तर येकू कामेंच करणें तर जलद कामें करून यावीं बाळारायास आह्माकडे बिदा करावें आह्मी पनाळ्यास जाऊ च्यार ठाणी घेऊन दोन हजार हजार फौज पनाळ्याचे भोंवती ठेऊन मागती गडास येऊ गडीं आमचे विचेमानें काम काज घेतील तें करू आह्मी सागू तैसें त्यानी येकावें नाहीं ( तर ) ते सागतील तैस आह्मी येकू दुसरें आह्मास त्यानी आता साफ सागावें की तुमचे जाणें वरीस दोन वरसें होत नाहीं श्रीमत सुधा सर्व बंदोबस्त जालियावेगळें तुमचें जाणें होत नाहीं आता मळमळ काशास ठेविता ! त्याप्रमाणें आह्मासही समजेल की आमचे जाणें दोन वरशें होत नाही त्याप्रमाणें आह्मी अपले घरचा बंदोबस्त तऱ्ही करू सावकार पाहू आता फौज ठेविली पाहिजे त्यास खर्चास दिल्हे पाहिजे आह्मी कैसेंही करू आह्मास समजेल की आमचें जाणें होत नाहीं हिंदुस्थानात आता ये प्रसगी नजेफखान मातबर रोहिले, त्याकेले मोकळा जाला बरें असो जैसें बनेल तैसे तिकडीलही बंदोबस्त करू ह्या गोष्टी आह्मी बोलाव्या तर तुह्मी ह्मणाल की आपले कार्य करून घ्यावें यासाठी येसें बोलतात त्यास आता कामच करणें मग उसीर काशास ! नाही त्याच्या चितात आह्मास काही नच द्यावें तर तैसेंच समजले तर आह्मी पनाळ्यास जाऊ च्यार ठाणी घेऊन देऊन श्रीतुळजापुरावरून हिंदुस्थानात जाऊ इतकी [ पुढील बंद गहाळ ]

☞ This is an incomplete news-letter from Mahadji's camp relating a private talk he had with Sadashiv Dinkar & Ranekhan regarding his demands from the ministers

---

*No 31* ] [ 20 Nov 1777

श्री

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यासी—

दंडवत विनती उपरी आपण स्वदस्तुरें चिठीचें उतर पाठविलें तें पावोन संतोष जाहाला लौकिक हैदरनाईक याजपर्यंत आहे की पाटीलबावा इकडे येतात तीच गोष्ट खरी करावी त्यात आह्मी मसलतीस गुतलों असता भाऊपण्यानें व श्रीमंताचा नक्ष व्हावा ही काळजी आपणास आहे आह्मास संतोष व आपल्यास कीर्तिस्पद ती गोष्ट करावी ह्मणोन लिहिलें तें सविस्तर कळलें येसि

यासी पर्जन्येकाळामुळें रहिमतपुरी छावणी केली दसऱ्याचे मोहर्तें निघोन करवीरचा बंदोबस्त करावा तोंपर्येत आपणाकडील मसलतिचा प्रकार कसा तो कळेल हा विचार चितात आणून सर कारातून आपलीं कामें काजें होणें तीं करून घ्यावीं, याकरिता राजश्री बाळाराव गोविंद पुरधरास पाठविले त्यास जाऊन तीन महिने जाले परतु आमची कामें काजें करून द्यावी हें मर्जीस येत नाहीं गुदस्ता तोतयाची मसलत करून आलियावरी राज्यात खुळें आसतील त्याचा विचार आता पासून करून येक येकाचे जिमेस येक येक काम लावावें ह्मणोन कारभारी यासी सांगितलें हे आप णासही ठाऊकच आहे परतु त्याचे विचारास न आलें विनाकार्ये आह्मास आजपर्यंत ठेऊन घेऊन खराब केलें सरकारचेंही काम जालें नाहीं, आणि आह्मी पेंचात आमची कामें काजें करून देऊन बाळारायाची खानगी केली आसती तरी आजपावेतो करवीरप्राते जाऊन बदोबस्त केला असता ल्होळकराची नेमणूक आपणाकडे ते दसोन गायेकवाडाचे जाबसालाकरिता गेले आह्माकडील कामे (फाटलें) होण्यास प्रथम दिवस आ उपरी कामें करून दिल्ही तर उतम न दिल्ही तरी करवीरचें काम कबूल केलें ते करून देऊन हिंदुस्थानात जावे या आर्थी बाळाराव गोविंद यास बोलाऊ पाठविलें आहे थोडक्याच दिवसात येथून कूच करून करवीराकडे येत असों ल्होईल वर्त मान तें आपणास कळेल धौंशा सामील करून मग आपण नदी उतरून पलीकडे जावयाचा विचार केला, उतम आहे धौंसा व आपण येकत्र जाल्यावरी चित्रदुर्गवाले वगैरे पाळेगार येकत्र करून करी जरब बसवावी वर्तमान वरचेवर लिहीत जावें राज्यातील खुळें मोडून श्रीमताचा दुसहिच काळजी आह्मास आहे आपला भाऊपणा, आपण या मसलतीवर ते मसलत लावी हेंच मानस आहे आपण धौंसा येकत्र जाल्यावरी मसलतीचा डौल कसा पडतो का तसाच प्रकार आसल्यास आह्मी दूर नाहीं वरकडाकडील दुसरे आर्थ चितात न कूजश्री धोंडो भिवराव लिहितील त्याजवरून कळेल रा छ २८ सवाल बहुत काये ताम करावा हे विनती

☞ Mahadji writes in a frank & openhearted manner to Hari pant Phadke expressing his views & plans and offering to assist the ministers heartily in their policy of putting down all influences and persons hostile to the Peshwa's Government

---

*NO 32* ]　　　　[ Received on 3-1-1778

श्री

पौ छ ३ जिल्हेज समान

विनती सेवक नारो सिवदेव सा नमस्कार विज्ञापना राजश्री सदासिवपत यानी पत्री लिहिले होते की माडेरच्या सनदा घेऊन येणे, तेथे गेलियावरी विचारतील त्यास माझे नावे हातचिठी यावी की तुमचे पत्र आलियावरी सदरहु माहालच्या सनदा पाठऊन प्रसग पडल्यास दाखवावयास येईल नाही तरी माझी मजपासीच राहील सुचली विनती लिहिली आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev requests Nana to send him a formal written assurance that the Sanads of Bhander about which Mabadji was quite likely to enquire, would be sent in due course

---

*No 33* ]                                        [ 1 January 1778 ?

श्री

विज्ञापना. मिरजेहून आताच पत्रें आली त्यापैकी मजकुराचे पत्र व तेरदलाहून बातमीचें पत्र आलें ते येणे प्रा पाठविली आहेत राजश्री माहादजी सिंद याणी बहुतच उपद्रव माडिला आहे त्यास आपण स्वदस्तुर पत्र लेहून द्यावें व विसोबा नाईक मिदोरे याची मुले माणसें धरून नेली आहेत ती सोडून द्यावीं त्याजकडील व भगवतराव याचे लढे असतील ते राजश्री गगाधरराव मनास आणितील, त्याजकडे पाठवावे म्हणून ल्याहावें मिरज तालुका व कुरुदवाड रेणदाल व चिकोडी तालुका व तेरदल व जमखडी या माहालास रोखापत्र करू नयें जेथे राखे जाले असतील त्यास मनाचिठी द्यावी म्हणोन पत्रात ल्याहावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ The Patwardhans of Miraj request Nana to restrain Mahadji Sindia from committing aggressions in their territory See Nos 2214–2218 of vol 6 of Khare s series

---

*No 34* ]                                        [ 6 January 1778

श्री

फौज पन।
करू आह्मा
त्यानी आता
जालियावेगळें
समजेल की
रू सावकार
ह्मास सम

विनती सेवक कृतानेक सा। नमस्कार विनती विज्ञापना छ २ जिल्हेजीं पाटील स्वारी करून सटवाजी भोसला वडगावी आहे ह्मणून प्रहर रात्रीं स्वार जाले प्रहर दि गावास आले तों तो आधीच कोल्हापुरास गेला लुगारे राऊत याचे पुढे काही गेले हो दोन कटाळा तीन घोडी आणलीं वडगावापासीं उभे ठाकले बुनगे आणविले येक वडगावापासून मुकाम केला दुसरें दिवसीं स्वार होऊन जोतलिंग कोल्हापूरच्या सुमारे गे डावर त्याचे राऊत होते दोन घटिका दिवस राहिला या अर्थी माघारे मुकामास आले जिल्हेजी पाटीलबावा कूच करून वडगावनजीक मुकाम केला दो प्रहरा गढीस तोफा लाविल्या मोरचे बसले तोफा सरकारच्या फारच चागल्या येक तोफ मात्र फुटली कामातूनच गेली रात्रीं सटवाजी आला ह्मणून अवाई पडली हा सरदार गाढा केलेला पुरुष येशस्वी मग पाटीलबावा त्याच्या तोंडावरच राहिलें छ ५ जिलहेजी दो प्रहरा अलीकडे गढीतील गावचे पाटील कुलकर्णी जमीनदार सेट्या भेटीस आले दोन तीनसें माणसें आहेत त्यास व राघोपत नामे प्रहस्त सरदार आहे त्याचीं मुलें माणसें पनाळ्यात कैदेंत आहत याअर्थी राघोपत व प्यादे हत्यारासुधा सोडावे. येणेप्रमाणे करार ठराऊन निशाण गढीत नेले रायाजी पाटील वगैरे गेले होते गढीत बायका वाणी वगैरे आहेत त्यास पाचा रुपया आलीकडे रस्त व बैल सोडावे पाचा रुपयावरती आसली ते घ्यावी पाटीलबावाचे लोक गढीत गेले निशाण गेले त्याचे लोक बाहेर निघाले पाटीलबावा डेऱ्यास आले. सटवाजी भोंसला कोल्हापुरी आहे दोन हजार फौज दोन हजार माणसे जमाव आहे काही पळोनही जातात रात्रीं दाखला दाखवितात येसाजीचा वकील राघोपत व याचे वकील बापू श्यामराज कृष्णेचे मुकामीहुन गेले होते छ ३ निन्हेनी आले हे ह्मणतात की आह्मास खर्च पडला याची निशा पाहिजे छ ५ जिल्हेजीं वडगावची गढी घेतली मग त्याचा वकील याचा वकील पनाळ्यास गेले सल्याचा डौल आहेच पाटीलबावानी त्याच्या फौजेंत व पनाळ्यात सुत्रें लाविलीं आहेत प्रस्तुत कोल्हापुरास जावें येसें दिसतें गुमटाचे सिरोळ तिकडे सुत्र लाविलें आहे पक्कें ठरलें ह्मणजे मग सिरोळाकडे जाणार छ मजकुरी पाटीलबावा बोलले आबाकडून लेहविले स्वामीस की तोफ मानचर येक व गगनाळा दोन पाठवाव्या तोफ येक

मातबर आहे ते पूर्वी मागितली होती आपण ह्मटलें की ती तोफ आपेसी आहे ती गोष्ट निघाली की तीच तोफ पाठवावी आपेसी आसली तर आह्मापासीं आलिया येयली होईल छ मजकुरी दो प्रहरा आबाकडून पत्रे लेहविलीं वडगावचे वर्तमान याचे अगोधर स्वामीस पोहचेल म्या तेच समई जोडी विदा करावी परतु जोडी नाहीं छ ५ जिल्हेजीं सध्याकाळी श्रीमत तात्याकडील जोडी आली तेव्हा तेच प्राथ कालीं विदा केली आणिक जोड्या दोन पाठवाव्या, येविशई विनती पूर्वी लिहिली आहेच गढीमध्यें गला साठ खडी आहे ह्मणून पाटील वगैरे गावातील ह्मणत होते रायाजी पाटील गढीत आहेत गावातील गु ढें अ ग (?) आहे त्याज पासी झाडा घेतात भाडीं, वस्त्रें मिळून सात उट भरोन जामदारखान्यात आले आम्ही गढीत जात होतों दरवाज्यावर कोणास जाऊ देत नाहींत मग काशास जावे ? काही घोडीही आहेत राघोपत गढीत त्याजकडील ठाणेदार वगैरे कारकून तेही सोडावे सोडले आहेतच उदेक कोल्हापुरावर जाणार श्रीमत बापुसाहेबाचे स्वीस बहुत समाधान नाहीं ह्मणून येथें ह्मणतात श्रीमत तात्याकडील मजकूर त्याहावा तर स्वामीकडे नित्य येतच असेल जाबितजग आला नाहीं येथें पूर्वी ह्मणत होते तैसेंच ह्मनतात व्होळकरास आम्हाप्रमाणें जाहागीर वगैरे किला, दुसरें तात्याकडे न जावें यैसे मुदे, आम्ही चाकरी करून येक मेलसें मात्र तेही काशास पाहिजे ! आम्ही हें कार्य करून जाऊ त्यास हे सरदार येकनिष्ठ हे स्वामीच्या ध्यानात आहेच याचीही समजूत करावीच आणीक गढया करवीराकडील आहेत ते ही येऊन भेटून वगैरे गाव कौल मागतात दुसरा याचा मनसबा की लाहाण मोठी गढी आणिक असेल ते घेऊन मग सिरोळ कोल्हापुरास लागावे वडगावची गढी बरीच होती मनुशे लडवाई नाहीं इकडील कहीची उटे वगैरे छ मजकुरी काही नेली म्हणतात मतलब पाटीबावाची समाधानी ठेवावी कर्णाटकात विदा करावे हा मजकूर पूर्वीचे पत्रीं लिहिला आहेच जाबितजग अद्यािप येऊन पोहोचत नाहीं हें कसकसें श्रीमत तात्यानी मोहगमच लिहिलें आहे छ ६ जिल्हेज प्राथ काल मुकाम वडगाव प्रात करवीर नजीक कोल्हापूर च्यार कोस, पनाळा पाच कोस, जोतलिंग तीन कोस हे विज्ञाप्य

☞ The writer (Naro Shivdev ?) reports the capture of Wadgaon by Mahadji and advises Nana to conciliate Mahadji in his demands and exact from him faithful service in the various tasks of national utility

---

*No 35*] [8 January 1778

श्री

विज्ञापना छ ८ जिल्हेजीं राणेखानाचे राहुटीस गेलो होतो श्रीमत तात्याचें पत्र त्याचे नावे होतें तें दिल्हें राणेखानानीं वाचून म्हणाले की तात्या म्हणतात की पाटीलबावास सागून इकडे येत तो अर्थ करावा त्यास व्होळकरास जहागीर दिल्ही कोणती चाकरी करून दाखविली ! यानी केली न केली ते ध्यानात त्यास व्होळकरानी आड घातली की सिंद्याप्रमाणें जाहागीर किला द्यावा, कर्णाटकचा मोहीम न सागावी यैसे म्हणत अस्ता मागती त्याची खुशामत करतात. जाहागीर वगैरे मागती द्यावयास तयार होतात तस्मात् धणीपणा व दाब काहीच नाही त्यास जाहागीर देतात यैसे ये समई सकट कोणतें याजवर येऊन पडलें आहे ! अहेल्याबाईचा नातू आज उभा केला तर रुपयेही देईल आणि फौजही चागली चागली ठेऊन जिकडे म्हटलें तिकडे जाईल येका दोघाचे पारपत्य केल्यासिवाय कोठे दाब पडतो ? नाना नेटच चागले धरून या लगास

आपणाजवळ बोलाऊन याजला बद्लाम करून सर्वांची पारपत्ये लबाड्या करतील त्याची केली म्हणजे सहजच बदोबस्त जाला बद्लाम हे झाले याअर्थी नेट धरून कामें करावीं राजभारास अदेशे केले म्हणजे कारभार होत नाही श्रीमत रावसाहेबी गंगोबाची आवद घेतली, येका दोघा सरदाराचें निमित्ये ठेऊन डोकी मारलीं, तोंच दाब बसला मतलब याचा विश्वास त्यास येत नाहीसा दिसतो असो याचा त्याचा श्नेह राहून यानी समाधानीने विदा व्हावें हें मानस याजपासी खर्चास नाही तोतया मारला हें काम कबूल केलें यास काय दिल्हे की ( पुढील १ वद गहाळ )

☞ The writer reports his interview with Ranekhan who advocated a policy of severe punishments in order that Nana Fadnis may make his word fully respected in the Maratta Govt, after the model of Peshwa Madhaorao 1

---

*No 36* ] [ 11 January 1778

श्री

विज्ञापना छ ५ जिल्हेजी वडगावची गढी घेतली तें वर्तमान छ ६ जिल्हेजी जोडी विदा केली, सेवेसी पावली आसेल हली छ ८ जिल्हेजी वडगावचे ठाणे घोरपडे कापसीकर शंकरराव ह्मणतात त्याचे हवाला करून कूच करून कोल्हापूर अडीच कोस मुकाम पचेगंगेचे आलीकडे पाऊण कोस केला व्हेरल्याची गढी येक कोस होती ते ठाणे टाकून पळाले याचें ठाण बसलेंच तर पाच गढ्या आसपास आहेत तिकडे स्वार तोफा विदा केल्या सूत्रें आली आहेत काहीं गाव गढीसिवाय होते ते येऊन भेटले काहीं खडणी देऊन रखवालीस राऊत नेऊन वस्ती राखितात बापूजी शामराज व त्याचा वकील राघोपत नामें पूर्वी गेले होते छ ७ जिल्हेजी आले मागती छ ८ जिल्हेजी स्वार जाले पनाळ्यास त्यास बापूजी शामराव भेटले होते विचारले की कस कसे भाषण जाले ह्मणाले की दोन्ही माहाल देतों ह्मणतो सर्वा गोष्टीस राजी मग सत्य बोलो किंवा असत्य परंतु ये समई बोलत आहेच आता येसमई हे येकत नाहींत तीस हजार फौज जमा केली खर्च तीस लक्ष पडला आहे ह्मणतात सल्याचा जाबसाल लागला आहे सिवदी फोडान आपणाकडे आणावी सट वाजी भोसला व येसाजीपासी आहे ते लोक व पनाळ्याची व गुमठाच सिरोळ व कोलापूरची सर्वांकडे सूत्रें लाविली आहेत फितुराने किलाच घ्यावा, मनसब करतात मग घडता कसकसे घडेल ते सेवेसी लिहिण्यात येईल पाच च्यार ठाणी आहेत हे घेऊन मग कोल्हापुरावर चल व्हावा किंवा गुमठाचें सिरोळ तिकटील सिवदीकडे सूत्र लाविले काहीं फुटले तर आधीं तिकडे जावे जैसे बनेल तैसे करावें सिरोळकर भोंसले यास येऊन सामील जाले मिरजकर वकील आहे त्याज वर छ ७ जिल्हेजी रागें भरले की तुमचा मातबर मनुष्ये कोणही येत नाहीं काही लोक येत नाहींत तुह्मी या प्रांतीचे माहितगार आहा पुढें फौजेस रसद पाहिजे लबाड्या कराल तर गावखना विक्या करून घासदाणा घेईन, गाव लुटून फस्त करीन लेहून पाठऊन त्यास बोलाऊन घेणे रस्त आणवने चवदा सेर अधरा सेराची धारण आहे याचा छबिना आद कोसावर रात्रीं उभा राहतो त्याचेही राऊत काही येतात श्रीमत तात्याकडील पत्रें आली पाटीलबावास पत्र होतें तें दिल्हें ह्मणाले की तात्या आह्मास लिहितात की तुह्मी यावे त्यास ज्याम जाहागीर तात्यानी देविली, भाऊपणा केला, आता ते कोठें आहेत ! आड घालून बसलेत की आह्मास निश्चयप्रमाणें जहागीर द्यावी कर्णाटकची मोहीम न सागावी लज्या वाटत नाहीं मोहीम कर्णाटकचा करून यावें होते मग तरही जाहागीर वगैरे सिंचाप्रमाणे द्या ह्मणावें होतें आणि ज कोन्ही येशा गोष्टी

यैकत असतील तेही थोरच आहेत जेव्हा राजभार करणे तेव्हा येका दोघाचें पारपत्ये बरे वजेनें केल्यासिवाय दाब कैसा बसतो ? त्यास देता तें आह्मास घा ह्मणावें आह्मी हैदरखान कसकसा तोही पाहातों दुसरें तात्या आह्मास लिहितात की तुह्मी जलद यावें त्यास आह्मी चाकर आम्ही ये समई न जावे तर कधीं जावे ? परतु आमचा मुलूक देसीं नाहीं सावकाऱ्यात आमची पथ नाहीं तिकडे निदान तीस हजार तरी फौज घेऊन गेलें पाहिजे त्यास आमचा खर्चाचा बदोबस्त करून दिल्हा, अथवा सरकारात वोढ आहे, निदान कर्जाऊ, तर आज स्वार होऊन हैदरखानाचें पारपत्ये करून मग करवीरकराचे कठिण काय ? परतु पोटास पाहिजे इतके बोलोन सउच्याकडे उठले राणेखानास विचारलें की पाटीलबावा बोलले हा मजकूर काही लेहू की काय ? तेव्हा म्हणाले की दिनचर्या येकात बोलतात म्हणून येकतों म्हणून लेहून, बरें त्याचें उतर कस कसें येतें तें पाहू त्यानी खर्चाचा बदोबस्त केलाच आणि हुडें वगैरे दिल्हे तर हे स्वार होतील सरदार जिद्दी* आहे कामच करील तुम्ही दिनचर्या म्हणून लिहीत जावें छ ७ जिल्हेजी पाटीलबावानीं नबाबास पत्रें लिहिलीं की जाबितजग धौसा अद्याप तात्याकडे येऊन सामील होत नाहीं, हे कोण गोष्ट आहे ? त्यास लौकर धौसास तात्याकडे पाठऊन हैदरखानाचें पारपत्ये होय तें करावें म्हणून पत्रें याची गेलीं नबाबास सेवेसी कळावें छ १' जिल्हेज प्रातःकाल मु॥ ना॥ पचेगगा, पाऊण कोस, कोल्हापूर अडीच कास, पनाळा तीन कोस हे विज्ञाप्ति

☞ The news-writer reports Mahadji's conversations to Nana, concerning his undertaking an expedition to the Karnatak for the support of Haripant Tatya, who in his difficulties had written to Mahadji and asked him to come to his help

---

*No* 37 ] [ 12 January 1778

श्री

विज्ञापना छ ११ जिल्हेजी याचे वकील येसाजी सिंद्याकडे गेले होते ते छ मजकुरी आले येसाजी सिंदा व सटवाजी भोंसला दुर्गाबाई राज्याची स्त्री कोल्हापुरातच आहेत फौज गावात नेऊन ठेवली मजबुती करून राहिलेत भाडावे हें मानस आठ पधरा दिवस भाडतीलसें दिसतें सल्याचा डौल लागला आहे बापूजी शामराज भेटले होते म्हणाले की दोन्ही माहाल देतों म्हणतो लेहून देतों परतु आता हे सरदार यैकत नाहीत ह्मणतात की तिस लक्षावाले आलें हे रुपये द्यावे मग सल्याचें बोलणें यैसें आहे येथील मुकामीहून कोल्हापूर दोन कोस आहे त्यास येथून गढी येक तीन कोसावर आहे तेथें याणी फौज तोफा पाठविल्या त्या गढीवाल्यानी गोळी वाजविली याअर्थी कूच जालें त्या गढीचा कटा करावा दोन अडीचसें माणसें आहेत तेथील कटा करून मग सूत्रे लाऊन ठेविलीं आहेत मग आधी कोल्हापूर किंवा गुमटाचे सिरोळा कडे जावें, तें घ्यावें यैसे ह्मणतात ठरता काय ठरेल तें पाहावें जे ठाणी घेतात ते घोरपड्याचे स्वाधीन करतात छ मजकुरी पाटीलबावाकडे गेलों श्रीमत तात्याचे पत्राचे उतर मागितले आबाजी रघुनाथ याजला द्यावे ह्मणून आज्ञा केली पत्रात त्याहावे ह्मणाले की व्होळकरास जहागीर देविली ते बातमी आपणाकडे येतच असल आह्मी हे मोहिमीस गुतलों हे जालियावर पोटास तों पाहिजे पोटाची बेगमी जालिया तुह्माकडील प्रसग कसकसा पडतो त्याप्रमाणें कर्तव्ये तें केलें जाईल येणेप्रमाणें त्याहावे ह्मणाले मजला ह्मणाले की तुह्मी त्याहावें की व्होळकरास

---

* जिद्दी=कजाख, आग्रही, पिच्छा पुरवणारा

जाहागीर देविली भाऊपणा केला आता ते कोठे आहेत आह्मी तोतया मारला हे मोहीम कबूल केली नवरी लश्करवाले आलों आह्मास काय दिल्हे ? मेलसें दो लाखाचें आसेर चऊ महिन्या (?) हडे, समक्ष जें कर्तव्य तें करू दऊ दिलाऊ कटकण्या+ आह्मासी करतात आसो आह्मी चाकरीस कसूर करणार नाहींत त्यास पोटास बेगमी तुह्मी तात्यास लेहून करावी मग आह्मी सिधच आहों नाहीं तर हे मोहीम जाली ह्मणजे श्रीतुळजापुरावरून हिंदुस्थानास जाऊ गडास काशास जावें ? त्याचा विश्वास न्होळकर आह्मी निकामे ते कामाचे असो कोल्हापुरास मोरचे लावावे, त्यास त्याचा जमाव भारी महिना पधरा दिवस लागले तर पोटास नाहीं जैसे बनेल तैसें करीतच आहों येणे प्रमाणे त्याहावें ह्मणाले धवसा तुह्मास येऊन भेटेल परतु धवसा आतरयामी हैदरखानाकडे न्वाबास न कळता त्यास धवसा करील काय ? हैदरखानाकडे जाणार नाहीं परतु लडाईचे समई कमती करील याचा बदोबस्त राखावा येैसें लिहिणें ह्मणाले छ १२ जिल्हेज मुां नजीक कोल्हापूर दोन कोस कूच जाले हे विज्ञाप्त

☞ The writer reports Mahadji's aspersions against the ministers whom he charged with being partial to the interests of Holkar & running down Mahadji, who consequently expressed a desire to retire to the north in disgust

---

*No 38* ] [ 13 January 1778

श्री

विज्ञापना छ १२ जिल्हेजी हिंदुस्थानची पत्रें पाटीलबाबास आलीं त्यात मजकूर की सिवाजी विठल नरवरेचे किल्या आलीकडे होते गोहदवाला चालून आले लडाई जाली सिवाजी विठल यानी गोहदवाल्याचा मोड केला सडा मात्र पळाला तोफा हस्ती च्यार घोडे वगैरे लुटून पस्त केले ह्मणून लिहिलीं आलीं छ १३ जिल्हेजी पाटीलबाबा दो प्रहरा सडे स्वारीनसीं कोल्हापुरास तलाच्यास* गेले चऊ घटिका सटवाजी भोसला बाहेर निघाला हजार फौज दोन हजार पयेदल दरवाज्यापुढेंच होते इकडून पाटील बाबाचे लोक पुढे होते याचे त्याचें तोंड लागलें मागाऊन राणेखान वगैरे लोक जाऊन पोहचले चव्य घोड्यानसीं गावात नेऊन घातले याचे लोक दरवाज्यापावेतों गेले दरवाज्यापुढें मैदान आहे सटवाजीने गावातून बाण व रेहकले तोफा बदुखा बरीच मार दिल्ही इकडील घोडी माणसें पंनास जखमी जाली दाहा पधरा घोडी माणसें मेत जाली पाटीलबाबाचे चितात छ मजकुरी लडाई करावयाची नव्हती जागा पाहून मोरचे बस वावे या अर्थी गेले लडाई जाली सध्याकाल जाला फिरोन आले पूर्वी स्वामीस लिहिले की मी बेसरजामी, मुसाफरीचा सरजाम पाठवावा मोतेबाची मोहर पाठवने ह्मणून विनती लिहिली त्यास मोहर न पाठवावी मागाहून जोडी येईल तेंव्हा पाठवावी किंवा मुरूप उज्याड, प्रस्तुत कामही नाहीं वर्तमान पै दर पै आलें पाहिजे दोन जोड्या श्रीमत तात्याकडे गेल्या येक छ ११ जिल्हेजी पाठविली जोडीविशई विनंति [ पुढील बद गहाळ ]

☞ The writer reports a drawn out fight between Mahadji & the Kolhapur party, in front of the town itself News was received by Mahadji of Shivaji Vithal having routed the Rana of Gohad in a battle at Narwar

---

+ कटकणी=craft, cunning * तलासास, for reconnoitering

*No 39* ] [ 15 January 1778

श्री

विज्ञापना छ १३ जिल्हेजी लडाई जाली पाटीलबावा सडे स्वारीनसीं गेले होते सटवाजी बाहेर निघाला होता यांचें तोंड लागलें ते गावात कोल्हापुरात गेल हे दरवाज्यासीं आटकले माणसें याची दाहा पधरा खेतात राहिले ते छ १४ जिल्हेजी आणले घोडीं मैत जालीं वीस जखमी माणसें साठ घोडी, पाऊणसें [1]मतलबा बैल गा मी ल गा मी लढाई जाली त्याचें कोण्ही जाया जालें नाहीं येक घोडा मात्र याजकडे आला हा मजकूर छ १३ जिल्हेजी सदासिव दिनकर दि॥ नारो सिवदेव याची जाडी सेवेसी आली त्याजबरोबर लिहिला आहे दुसरें छ १४ जिल्हेजीं पाटीलबावा मागती कोल्हापुरास तलाव्यास गेले आलीकडे आद्कोसावर बसले होते त्यास सदाशीव दिनकर बक्षी याजपासीं कोण्ही ग्रहस्थ आहे त्याचा भाऊ श्रीमत तात्याचे लस्करात आहे, त्याचे पत्र आलें बक्षीनें पाटीलबावास वाचून दाखविलें त्यात मजकूर की पौष शु॥ ५ पचेमीचे दिवसीं हैदरखान चालून आला यास बातमी कळताच हे सावध होऊन बाहेर निघाले याच्यानें तोफा वगैरे उभे टाकावयाचा दस्त[2] न पोहोचे, तेव्हा माघोर हटले बुनग्यात आले दुसरे दिवसी हैदरखान चालून आला, तों त्याचा मोड जाला पळोन तुगभद्रा आलीकडे आले काही बाहेर लुटली जाबितजग चवदा कोसावर आहे तो सामील होईल मग काय मनसब करतील ते पाहावें तात्याचे फौजेंत हिंमत नाहीं येणे प्रमाणें लिहिलें बक्षीने वाचून दाखविलें मी घोडा पाणी पाजावयास गेलो होतों मागती पाटीलबावापासीं आलो तों म्हणाले की तुम्हापासीं बोलत होतों की तात्यास परिस्छिन्न ल्याहावें कीं तुगभद्रा उतरू नये सेवट आमचें म्हटलें न यैकिलें सेवट परिनाम यैसा यैकिला सत्ये असत्ये न कळे मग बक्षीस विचारले, हेच त्यानी उत्तर केले हे वर्तमान कसकसें जालें सत्य असत्ये आधी ल्याहावे मजला घोडा पाठविला याचा मजकूर नित्य लिहिणे स्वामीचे पाय माझे मस्तकी आहेत तर सेंकडो घोडी मिळतील कृपा मात्र विछितों दुसरी काशास? छ १५ जिल्हेज प्रहर दिवस हे विज्ञाप्त

☞The news reporter in Mahadji's camp describes a fight at the gate of Kolhapur in which a few men & animals were lost by Mahadji A report of Haripant Phadke's reverse in the Karnatak was also received in Mahadji's camp

---

*No 40* ] [ 16 January 1778

श्री

विज्ञापना छ १५ जिल्हेजीं पाटीलबावा कोल्हापूरच्या चहूमोंवते फिरोन सोये असेल तिकडून मोरचे लावावे या उद्योगें गेले कोल्हापुरातून तोफा सोडल्या तीन घोडी दोन माणसें मैत जाली मोरचे लावावे या उद्योगात आहेत राजश्री बापूजी शामराज याजकडील व त्याजकडील वकील गेले होते ते आले दोन लक्ष देतों ह्मणतो हे वीस लक्ष निदान पधरा मागतात हाही सघहा लाविला आहे गुमठाचे सिरोळ वगैरे सूत्रें लाविलीं आहेत धडता कस कसें घडेल पाहावें छ १३ जिल्हेजीं लडाई जाली कवतुक घ्यानास आले पाचा रुपयावर कोण मरतो पागा वगैरे

---

१ मत्लूब=जरूरीचा, हवा असलेला २ दस्त=अमल, आटोका

हेच काहीं काम करतील वरकड भरण्याची फौज याचा उनेनचा खजिना व कागद छ १४ जिल्हेजी येऊन पोहचला कोण्ही ह्मणतात पाच कोण्ही दाहा ह्मणतात खुलस[1] कळलियावर लिहि ण्यात येईल श्रीमन तात्याकडील वर्तमान मागती छ मनुरी विचारलें येट लस्करचे पत्र नाही ह्मणाले त्या प्रहस्ताचा गाव मिरजप्राती तेथून आले ह्मणाले वर्तमान सत्ये भासत नाहीं स्वामीकडे येत असेल त्याहावे राजश्री गुरुजीबावा व राजश्री बाळाराव निरोप घेऊन स्वार जाले म्हणून यैकिलें उतमच आहे गुरुजीबावा पुरातन मनुशे यावे विहिनच आहे राजश्री मोरोबादादा श्रीपंढरीचे यात्रेस गेले होते मुलास देवी निघाल्या म्हणून माघारे आले म्हणून यैकिलें कृपावत होऊन छ ८ जिल्हेजची पत्रे पाठविलीं ते छ १५ जिल्हेजी पावलीं रागेखानास मात्र दाखविली पाटीलबावास दाखवावी येसा मजकूर नाहीं म्हणाले कितेक कामाचा बंदोबस्त आहे म्हणून या पत्रात अर्थ आला त्यास नानाचा आता बंदोबस्त अधिकच आहे परंतु आम्हीही काही समजो नच बोलत असो मागती त्याहावें की सावधगिरीस अतर करू नयेच येणे प्रमाणें बोलले कितेक राजकारनी मजकूर तुम्हाकडून लेहवावा तर त्यानला वर्तमान कळतच आहे मग काय सागावे म्हणाले छ १६ जिल्हेज मु॥ नजीक कोल्हापूर येक कोस हे विज्ञप्ति

☞ The-news writer reports further fighting near Kolhapur, along with overtures for peace started by the Kolhapur party

---

*No 41* ] [ 16 January 1778

श्री

विनती सेवक कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना यैसीजे येथें दिनचर्या वर्तमान की श्रीमत तात्यासी हैदरखानासी लडाई जाली फौजेंत फितूर जाला मानाजी सिंदा गेला त्यास हैदरखानाने हस्ती पाच वीस हजार फौज तैनाती दिल्ही वरकड लोक आणिक फितुरात तेही जाणार मानाजीची बायको तात्यानी कैद केली इकडील तोफा व हस्ती काही गेले तात्यासाहेबाची बहीर माघारें हटली तात्या सडे जाले जाबितजगाचे सुमारें निघाले यैसें पत्र याचे वकिलाचे आलें म्हणतात दुसरें वर्तमान यैकिलें की राघोजी आंगरे याचे न्याही त्यास आगऱ्याचे लेकीस देवआज्ञा जाली यास पत्रें आलीं दुसरा मजकूर की इंग्रेज म्हणतात श्रीमताचा अभिमान आम्ही धरला, तो सेवटास न्यावा या सुत्रामधें बहुत जण आहेत ये प्रसगीचा मजकूर छ १७ जिल्हेजी पाटीलबावा कूच करून पचेगगा दक्षणतीरी आले कोल्हापूर पाऊणकोस चहू भोवत्या चवक्या बसविल्या पाच सात गड्या घेतल्या बाकी आणिक गड्या पाच च्यार आहेत तिकड छ १८ जिल्हेजीं फौज तोफा पाठवणार गडास लिहिले आहे तेथून तोफ येक मातबर व गरनाला दोन आणविल्या त्या आल्या म्हणजे मोरचे लावणार वडगाव वगैरे ठाणी घेतलीं तो मजकूर पूर्वी लिहिला आहेच सत्याचा डौल आहे कचोली मनोली घ्या म्हणतो यानी खर्च पडला त्याचें तह[2] विसा लक्षाचें लाविलें दोन लाख देऊन म्हणतो ठरना [ पुढील बंद गहाळ ]

☞ News-reporter Dhondo Bhivrao writes further news to Nana from Mahadji's camp

---

1 साफ, नक्की 2 तह=तगादा

*No 43* ] [ 17 January 1778

श्री

विज्ञापना छ २० जिल्हेजी पाटीलबावा तोफा घेऊन गेले तोफा लागू केल्या कोल्हापुरास मोरचे लावता दिसत नाहीं कितेक आदेशे चितात आणून दुसरे सूत्रेंही लाविलीं आहेत धारराव सिंदा याचा कनिष्ठ बधु करवीरकरापासी आहे, त्याचे मारफात राघोपत येतच आहे पोतनसि वगैरे हा मजकूर पूर्वी लिहिला आहेच अडीच लक्षापावेतो आला पधरा हे मागतात स्वामीकडे पत्रें लिहितात त्याची उतरे कसकसी येत असतील त्याप्रमाणें करतील हे विज्ञाप्त

☞The Kolhapur party's overtures to Mahadji for peace are reported to Nana

---

*No 44* ] [ 23 January 1778

श्री

विज्ञापना छ २२ जिल्हेजी पाटीलबावा तोफखाना घेऊन नित्ये जातच असतात छ मजकुरी रकाळें पद्माळें तळें कोल्हापूरचे दक्षणेस आहेत तिकडून तोफा लाविल्या बाहेर पेठ होती ते घेतली करवीरकराचे लोक कांहीं बाहेर निघाले होते ते मोडून आत घातले गावातील आज दहा पधरा माणसें ठार झालीं इकडील पाच सात माणसें पडलीं राणेखानाकडील भवानजी पाटील मातबर मनुशे होता, कारभारी व पागा घेऊन लढाईस वगैरे तोच जात होता, त्यासही डोक्यात गोळी लागली तोही कामास आला त्यासाठीं राणेखान बहुतच कष्टी जाले मोरचे कायेम करावे ऐसे ठरले होतें मागती पाटीलबावानी सागून पाठविलें की जागा मोरचे बसवावयाची नाहीं सध्याकाळीं तोफा काढाडल्या कोल्हापूरचे कुसू मातबर या तोफानीं काम होत नाहीं मातबर तोफ पाहिजे याअर्थी कष्टी मोरच्यास जागा स्वामीचा मठ उत्तरेस आहे तिकडून मात्र मोरचे बसतील, मग भोंवता खदकच आहे छ मजकुरी कुसापावेतों बाहेरील पेठा होत्या त्या जाळून टाकल्या दो घटका रात्रीं तोफा सुद्धा डेऱ्यास आले कळावें छ २३ जिल्हेज प्राथ काळ हे विज्ञाप्त

☞The writer reports a severe fighting at the southern tanks of Kolhapur, where Bhavanji Patil was killed along with some of his men The strong gate of Kolhapur appeared impregnable

---

*No 45* ] [ 23 January 1778

श्री

विज्ञापना छ २१ जिल्हेजी तैलग ब्राह्मण कोल्हापूरचे पचगगेचे तीरी स्वामीचा मठ आहे तेथें गेला तेथून कोल्हापुरात श्रीदेवीचे दर्शनास गेला मागती छ मजकुरी लस्करात आला त्याने वर्तमान सांगितले की बाहेर तोफा पाटीलबावानीं लाविल्या दोन गोळे मात्र गावात आले दोन तीन माणसें जाया जाली देव आज्ञाच जाली या सरदाराचा दबाव बहुत होता आणि आहेच परतु हैदरखानाचें पत्र करवीरास आलें की घाबरे न होणें आह्मी बाजीराव बरवे वगैरे फौजा पाठवितो भवसा आमचे मायेंत आहे तुह्मी हिंमत न सोडावी हरिपताचे पारपत्ये केलच आहे मागतीही करितो त्याजकडील निमे फौज आह्मी आपलीसी करून घेतली आहे तुह्मी हिंमत न

सोडावी यैसे श्री जगदंबेचे देवळात बोलन होते परतु दिनचर्या ब्राह्मण वगैरे घाबरे जाले होते, परतु आता ह्मणतात की राजश्री रामचंद्र गणेश यानीं दोन रोज तोफा लाविल्या होत्या आता प्रमाणें तिकडे गडबड जाली तेव्हा उठोन गेले तैसे आताही हरिपत माघारे हटले पाटीलबावा आठा चऊ दिवसा उठोन जातील यैसे कोल्हापुरात लोक ह्मणतात घाबरे जाले होते याअर्थी खुशाल आहेत दुसरें सटवाजी भोसला येसाजी सिंदा याजपासी जमियेत दीड हजार फौज दोन हजार माणसें छ १९ जिल्हेजीं हजार माणसें आणिक आलीं येणेंप्रमाणें वर्तमान तैलग ब्राह्मण याने सागितले पाटीलबावा तोफा निऱ्ये घेऊन जाऊन दहावीस गोळे मारून सध्याकाळीं माघारे मुकामास येतात आता फौज चागली मिळाली आहे सर्वाचे चितात की हला करावी ज्या लोकानीं अटक पाहिली त्याच्या खातेरमध्यें नाहीं कोल्हापूर घेणें कठिण काय म्हणतात परतु पाटीलबावा केलेला पुरुश यैसी हजारो कामें केलीं करीतच आलेत माणसे जाया करू नयेत सिव्हा करावयास काम लाविलें तोफ चागली ते फुटली तोफ आणावयास सरकारचें व याचें पत्र मिरजेस गेले आली म्हणजे येका दिवसात घेऊ म्हणतात आणि घेतीलच पाटीलबावाचे लोकाची हिंमत हे ध्यानास आली की हैदरखान वरू कसा आहे ते येकदा त्याचा हस्ती पाहू तोफ महाराजानी मातबर न पाठविली गरनाळा लौकर येईनात या आर्थी कष्टी की काम सरकारचे की आमचे घरचे या आर्थी गरनाळा वगैरे पाठवाव्या दिनचर्या वर्तमान हेही यैकिलें की येसाजी सिंदास पनाळयात येऊ देत नाहींत परतु हे मिथ्या आहे पूर्वी आज्ञापत्र आले की डाक बसवावयास ताकीत जाली डाक बसलियावर वर्तमान पै दर पै लिहीत असावें त्यास डाक इसलामपुरापावेतों बसली पुढें बारा कोस लस्कर, त्यास वडगाव लस्कराहून येथून च्यार कोस तेथून पुढें इसलामपूर सात आठ कोस त्यास दरम्यान उज्याडी त्याचे राऊत काही फिरतात तेव्हा येथून पत्रें इसलामपुरास पावतीं करावी तेव्हा तेथून डाक चालेलसें दिसतें आह्मी पत्र पाठवितों, त्यास आमची पत्रें जैसी युक्त बनेल तैसी करितों डाक बसली त्याजसमागमें सरकारचें पत्र नाहीं आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तनुक होईल दोन तीन जोड्या महाराजाकडे आल्या उत्तर देऊन कृपा करणार धणी ह्मणजे श्रीमत तात्याकडे वर्तमान गेले पाहिजे येथून इसलामपुरास पत्रें पावतीं केलीं पाहिजेत कृपा करणार धणी छ २३ जिल्हेज, प्राथकाळ मुकाम पचेगगा दक्षेण तीर नजीक कोल्हापूर आद कोस हे विज्ञात

☞ This is a news-letter from the camp of Mahadji established in front of Kolhapur, it record's some reports about the hopeful condition of the garrison

---

*No 46* ] [ 25 January 1778

श्री

विज्ञापना छ २३ जिल्हेजी पाटीलबावानी कोल्हापुराभोवत्या चवक्या उत्तर दक्षेण पूर्व पश्चम बसविल्या पनाळ्याकडील रस्त बद केली पूर्वी दिवसा तलाव्यास जाऊन सध्याकाळीं मागती मुकामास यावें यैसें होतें छ मजकुरी रात्रीही तेथेच कायम बसविल्या मोरचे नाहीत राऊन चहूभोंवते बसविले पाटीलबावा लस्करचे पुढें राहतात डेऱ्यास येत नाहीत दोन रोज जाले छ २४ जिल्हेजी वाणी दोघे तिघे रस्त घेऊन पनाळयाच्या वाटेने कोल्हापुरात जात होते ते छ २४ जिल्हेजी दो घटिका रात्रीं धरले, प्राथकालीं डोकी मारलीं कोल्हापुरातून छ २४ जिल्हेजी रामाजीपत नामे कारकून व बिंबाजी जाधव नामे मऱ्हाठा भला मनुश आले जिवाजी बलाळ दि॥ बाजीराव बरवे शेणवई आहे पाटीलबावापासीं बरव्याची पागा त्याचे विद्येमाने आबा चिटणीस वगैरे मार

फात जाबसाल लागला आहे सरकारचे जाबसाल नमोदामधे आले आहेत परतु हे सरदार तीस लक्ष मागतात ते तीन साडेतीन पावेतों आले म्हणतात कोण्ही पोतनीस ग्रहस्थ आहे करवीराकडील त्यासी येकात होतो तो म्हणता की कोल्हापूर पनाळा वगैरे येसाजी सटवाजी धरून देतो ऐसे ह्मणतात हा मजकूर पूर्वी लिहिला आहेच त्याचा येकात नमोदामधे येत नाही कळावें छ २५ जिल्हेज प्राथ काल हे विज्ञाप्त

☞ This is a news letter reporting Mahadji's preparations to capture Kolhapur by starving it out

---

*No 47* ] [ 29 January 1778

श्री

**राजश्री रामचद्र नीळकठ गो**

श्री माहादजी सिंदे राम राम सु॥ समान सबैन मया व आलफ मौजे करजवडे आपाजीराव देशमुख येऊन भेटून पनाल्याकडे रस्त जाऊ देऊ नये असा करार केला आहे ह्मणून तुह्मास लिहिले आसे तरी याचे गावास कोणेविसी उपसर्ग न करणें प्यादे पाठविले आसतील ते उठऊन नेणे रस्तेचा वगैरे बदोबस्त देशमुख मशारनिले करितील जाणिजे छ २९ जिल्हेज + हे विनती ○

☞ Ramchandra Nilakanth Deshmukh Chikurdekar is asked by Mahadji to allow Appajirao Deshmukh to watch & prevent provisions going to Kolhapur from Panhala

---

*No 48* ] [ 29 January 1778

श्री

विज्ञापना छ २८ जिल्हेजी पाटीलबावानी तोफा कोल्हापूरचे दक्षणेकडून लाविल्या बुरजाची सपील* झाडून पाडली गावात गोळे टाकले कुसाआलीकडे लोक गेले पाटीलबावा त्याचे तोफेचा मार चुकाऊन बसतात लोक ह्मणाले की सरकारच्या तोफा चागल्या नाहीत गोलनदाज गोळे चागले लावीत नाहीत आपले गोलनदाज ठेवावे आपले तोफेचा गोळा फारच चागला लागतो तेव्हा पाटीलबावा बोलले की आज सरकारचे तोफेने काम चागले केले तेव्हा सर्वत्र म्हणो लागले की सरकारचा तोफखाना फारच चागला येक घटिका दिवस राहता तोफा काहाडल्या पूर्वेस आले तो सटवाजी भोसला बाहेर निघाला पाच सातसे रावतानसी तेव्हा पाटीलबावा माघारे स्वता फिरोन जातीनसी आपण येक तोफेचा गोळा डागला स्वताच तो त्याचे गोलात पडला तेव्हा त्याचा गोल फुटला ते गावात गेले हे माघारे आले इकडील दोन घोडी पडली तीन माणसें जखमी जाली मतलब पाटीलबावा स्वता तोफ फारच चागली लावितात मुक्कामास आले तो याचा कारकून मिरजेस गेला आहे त्याचे पत्र आले की तोफ गरनाळा घेऊन मिरजेहून आठ कोसावर आलों काही राऊत काही बरकदाज पाठवावे त्याजवरून पाटीलबावानी दुसरा कारकून व मिरजकराचे लोक काही येथे आले तेच पाठविले गावातील भला मनुश्ये व कारकून आला होता की मी चुकलों श्रीमत राजेसाहेबाचे वेळेस करार ठरला त्याप्रमाणें राजी तेव्हा सावकार समधी माहाल दिल्हा आता तुम्हास दिल्हा लेहून देतो तुम्हास खर्च पडला थोड्या बहुताने म्हणाल तर हजर आहे यानी उत्तर केलें की तीस लक्षास कवडी कमी करणें नाही दुसरें तुम्हास हैदरखानाची पत्रे आली हेही येकिलें आता आम्हास सला करणें नाहीच

* सपील=तटबदी

वरीस दोन वरषें येथेंच राहू पनाळा घेऊ हरिपताकडे व्होळकर आपा बळवत ह्यास वगैरे विदा केले चिंता नाही भोसलेही येऊन पोहोचले तुम्ही गावात जावे आम्हाकडे न यावें माणसें देऊन मोरचे पार करून दिल्हे कळावें डाक बसलियावर डाकेसमागमें पत्रें रवाना जाली छ २३ छ २५ छ २७ जिल्हेज याची उत्तरें आली नाहीत पावली न पावलीं याचें उत्तर कृपा करणार धणी छ २९ जिल्हेज प्राथ काल हे विज्ञाप्त

☞ This is a news letter reporting the grave condition of the Kolhapur garrison & the great skill which Mahadji personally exhibited in firing guns

---

*No 49* ] [ 29 January 1778

श्री

सेवेसी नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २९ जिल्हेज मुकाम पचगगा दक्षण तीर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष मी वाईहून निघोन परवा याच मुक्कामीं पोहचलों राजश्री पाटीलबाबाची भेटी जाहाली महाकाली तोपेकरिता बावा बोलले आहेत की कसेंही करून ती तोप व गरनाल येथें येईसें जाले पाहिजे करवीर खडकावर सुरग चालवयास जागा नाहीं याजकरिता ती तोप व गरनाल यावी म्हणिजे लवकर फडशा होईल पाटीलबावा सडे होऊन लश्करापुढें फौजसुधा करवीरचे आसपास बदी करून आहेत तमाम चौकीबदी केली सरकारच्या तोफखान्यापैकी येक तोफ वडगावावर जाया जाली ती मिरजेस पोहचाविली वरकड तोफा आहेत त्या व याच्या जिलेबी तोफा नेऊन नित्य शहरावर मारगिरी होत असते बासने[1] लाहान त्याच्या नेमात बारकाम होत नाहीं जातीने स्वारी करून मेहनत करितात काल ती चौ ठिकाणी तोफा लाविल्या आपण स्वत स्वारी करून रकाल्या तल्याकडे तोफा लाविल्या सभोवती मारगिरी होत आहे राजश्री येसाजी सिंदे व सटवाजी भासले दोन अडीच हजार फौज व पाच साहा हजार प्यादा आत आहेत परतु बाहेर निघत नाहींत कदाचित पाच च्यारसें निघोन शहरचे आसऱ्यात असतात इकडील लोक उठले म्हणिजे पलून गावात जातात या प्रकारची लढाई होते रसद आत जात नाहीं बद आहे सवब अडीच तीन पायली धारण आत आहे इकडील गोळे गावात जातात त्यानें घोडें माणूस मरतें अशानें काहीं होत नाहीं फौज वीस पचवीस हजार मिलाली रोज मेरेयास हजारो रु॥ लागतात लाखों रु॥चा पेंच, पैका नाहीं याजकरिता श्रमी होतात थोरली तोप व गरनाल लौकर आली ह्मणजे शहरचा फडशा जलद करून मोकळे होऊ ह्मणतात तर तोफ व गरनाल पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत तह करावयाकरिता येसाजीकडील ग्रहस्त येत असतात चिकोडी मनोली घेऊन सलूक करा ह्मणतात येकत नाहींत तह करणे होते तर रहमतपुरीच फडशा करावा होता आता कोल्हापूर घेऊन राज्याचाच बदोबस्त करावयाचा आहे, असी उत्तरे करितात याउपर होईल वर्तमान ते लेहून पाठऊ × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev, at the requisition of Mahadji, requests Nana to despatch without delay the large cannon Mahakali for the siege operations of Kolhapur Mahadji is reported to be exerting heartily to capture the capital & also the fart of Panhala

---

१ A wrapper or seat, applied figuratively to guns and forts,- Moelsworth

*No 50* ] [ 31 January 1778

श्री

विज्ञापना सटवाजी भोसला हजार स्वारानसीं छ १ मोहरमीं कोल्हापुराहून निघोन पनाळा वगैरे बाहेर निघाला बाहेर निघोन धामधूम करणार. बाई व येसाजी सिंदा कोल्हापुरी आहेत ऐसें वर्तमान ऐकिलें सत्ये असत्ये न कळे हे विज्ञाप

☞ It is reported that Satvaji Bhosla escaped from the siege of Kolhapur & that Yesaji Sindia and the Maharani were in

---

*No 51* ] [ 31 January 1778

श्री

विज्ञापना मातुश्री बाई व सटवाजी भोसला कोल्हापुरी आहेत येसाजी सिंदा पनाळ्यावर गेला सटवाजीपासीं दोन हजार फौज व दोन हजार पायदळ ऐसा जमाव आहे शकरराव घोरपडा म्हसवडकर कोण आहे त्याजकडे येसाजी सिंद्याने सूत्र लाविले की दोन लाख रुपये हुड्या पाठवितों, आम्हाकडे यावें हे बातमी पाटीलबावास कळली पाटीलबावाच्याही जोड्या बातमीस गेल्या आहेत सेवेसी कळावे हे विज्ञाप

☞ It was Yesaji Sindia who escaped to Panhala & not Satvaji Bhosle, who is reported to be resisting the siege of Kolhapur

---

*No 52* ] [ 31 January 1778

श्री

विज्ञापना छ २९ जिल्हेजी पाटीलबावा सध्याकाळपावेतो तोफा लाऊन राहुटीस आले तों बुजी उतरेचे चवकीस आहे ते चवकी मातबर आहे, सबब की पनाळ्याची वाट, या आर्थी त्यास बक्षी आला तो म्हणाला, की माहाराज गावातून येक मनुश आलें त्यास कोण्ही भला मनुशे येणार त्यास पूर्वी आज्ञा जाली होती कीं कोण्हीच येऊ नका त्यास आता आज्ञा जाली तर येतील म्हणाले की बोलाऊन घेणे परतु तीस लक्ष खर्च जाला कवडी कमी करणार नाही मग सदासिव मलार बक्षी त्याजकडील भला मनुश व कारकून वगैरे छ ३० जिल्हेजी घेऊन आला येकात जाला मागती गेले याचा खुलस कळला नाही मागाहून सेवेसी लेहून पाठऊ छ ३० जिल्हेजी मिरजेहून तोफा दोन व गरनाळा येक येथें पोहचली. वर्तमान कळलें उदैक सुरू करू म्हणाले परतु सिवाय मोठी तोफ आल्यासिवाय काम होणार नाही ऐसे बोलले विनती केली की निघाल्या ऐसें जाणावें येतील तेव्हा खऱ्या, म्हणाले छ १ माहे मोहरम प्राथ काल हे विज्ञाप

☞ The garrison of Kolhapur is reported to be offering to adjust a treaty of peace Mahadji waited for the big gun to arrive from Poona, before he would treat

---

*No 53* ] [ Beginning of 1778

श्री

विज्ञापना दिनचर्या वर्तमान म्हणतात की व्होळकर बाहेर निघाले ते कर्णाटक प्राती जाणार म्हणतात त्यास आम्ही दोन मोहिमी केल्या त्यानी कराव्या कदाच ते म्हणतील की आम्ही सिंहगड पुणें पुरधर रक्षिलें त्यास त्याजपासीं फौज कोठें होती ? हरिपत व्होळकर मिळून होते आह्मी वीस हजार फौज ठेविली, तेव्हा तोतयाचे पारपत्ये केलें तीस हजार फौज आता जमा केली सध्या आहेच त्यानी फौज कोठें ठेविली होती ! त्यानी कर्णाटकची मोहीम करावी कदाच आह्मास जाणे प्राप्तच जालें तर रुपाया तों आह्मापासीं नाहीं सरकारचा मुलुख धारवाड व रास्ते वगैरे जो सापडेल तो मारून पोटास तों मिळविले पाहिजे ऐसे ह्मणतात कळावें हे विज्ञाप्त

☞ Mahadji is reported to suggest that Holkar must serve the state equally, and might be asked to succour Haripant Phadke in the Karnatak

---

*NO 54* ] [ Beginning of 1778

श्री

विज्ञापना श्रीमत तात्याकडील पत्र आली व्होती पाटीलबावास हा मजकूर पूर्वी लिहिला आहेच त्या पत्राच उतर पाटीलबावानी लेहून दिल्हे की तुह्मी तुगभद्रा उतरावयाची जलदी नच करावी व्होळकराची बिदाई तुह्माकड जाली ते येऊन पोहचतील दुसर धवसा तुमचे मायेत दिसत नाही परतु ये समई करून घयावी आणि त्यास बोलाऊन न्याव तुम्हापासी पागा वगैरे दाहा बारा हजार फौज आसलच तिघ जन येकत्र व्होऊन मग तुगभद्रा उतरावयाची तजवीज करावी दोन्ही सरदार आलियासिवाय नच उतरावे त्रिवर्ग येकत्र व्होऊन मग उतरावे मग हैदरखानाचे पारपत्ये करण त्रिवर्गास कठिन काये ! दुसर आम्ही करवीरकराची मोहीम कबूल केली आहेच त्याआर्थ त्या प्राती येतच आहे पुढ तुह्माकडील प्रसग ध्यानास आलिया तुमचा आमचा भाऊपना आहे या आर्थी जे करतवे ते कल जाईल वर्तमान आपनाकडील लिहित जावे येजप्रमान पाटीलबावानी तात्यास लिहिल दुसर मजला सागितले की धवशाचा भरवसा नानास तात्यास उभयेतास आहे त्यास धवसा तुह्माकड नाही परतु ये समई मायेत कैसही करून मेलऊन घयावा हे तात्यास ल्याहावे दुसरे तात्याचे बधु व्होलकर मायेचे असता तात्याकड जावयास माग पुढ पाहतात अनी आह्मी येथ आव्हे परतु तात्याकड तैसच काम पडल तर आह्मी गडच्या पत्राची वाट पाहू की काय ? असो व्होळकर तात्याचे मायेचे ह्मनऊन बोलावे तुह्मी आह्मी बोलिलो हे न ल्याहावे दिनचर्या येकतो ह्मनऊन तात्यास ल्याहावे दुसर आमचे जहागिरीच आदियाप ठीक नाही कुटुब ठेवावयास जागा नाही तुह्मासारके बधु असता आमची हे दशा त्यास जाहागीर वगैरे देवोत न देवोत आह्मी मोहीम फते करून न पुसता जाऊ हे तात्यास ल्याहावे की मरजीस आले तर गडास लेहून याचा बदोबस्त मरजीस येईल तर करवन येन प्रमान मजकडून ल्हविल दुसर मिस्ट भासेन बहुत केल की तात्या मोहीमसीर आसता, हैदरखानाच पारपत्ये जाले नसता आम्ही कैस हिंदुस्थानात जावे आता भासेन माग पुढ करण पडल तर समाधाणीची करावी तसमात कार्य करून घयावे ऐसे दिसते असो हा मजकूर तो स्वामीच्या ध्यानात आहेच हे विज्ञाप्त

☞ Dhondo Bhivrao reports Mahadji's advice to Poona, in order to achieve success for the operations going on against

Haidar He offers to go there himself when the Kolhapur affair was concluded

---

*No 55* ] [ 2 Feb 1778

श्री

विज्ञापना करवीरकराचा पोतनीस भगवत कृष्ण नामे याजपासी आला आहे त्याजला गत-वरसीं टुटून घेतले ह्मणून बाहेर पडला आहे हल्लीं याजपासी आला आहे तो सागतो तैसे करतात त्यासी येकात छ २ मोहरमी जाला मग यानी हरि बाबाजी, बारामतीकर बारामतीस राहातात, बाबूजी नाइकाचे शरीरसमधी राजश्री रामचद्र गणेश हिंदुस्थानात गेले होते तेव्हा सिंदे व्होळकर पेशवे तिघाकडून येक वर्ष मामलेत हिंदुस्थानात होती मग भिंड भदावर सिंद्याकडून केलें तेही व काही फाजल याच्या सरकारात राहिले त्याकरिता याजपासी आहेत ग्रहस्त मातबर आहे ह्मणतात त्यास बोलाऊन तेही येकात बसले तेच समई दोनसें राऊत देऊन हरि बावाजी व बाळारायाकडील कारकून दोघास बिदा केलें खुलस कळला नाही तेव्हा कोणास विचारले तेव्हा कळलें की कोल्हापूर पनाळा यामधें लोक आहेत, त्यानी सागून पाठविलें की आम्ही कदीम चाकर त्यास आमचे घरी चवक्या बसवाव्या आम्हास निमित्ये होईल आह्मी निघोन येऊ येसे पोतनीस भग वतपत त्याजपासीं सागून पाठविलें त्यानीं ऐसी विनति केली यानीं हरिबाबाजीस पाठविलें, ऐसें वर्तमान येकिलें सत्ये असत्ये न कळे परतु सत्ये आहेसें वाटतें हरि बावाजी स्वार होऊन गेले कळावे छ ३ मोहरम प्राथ काळ मु॥ पचेगगा दक्षेण तीर नजीक करवीर आदकोस हे विज्ञप्ति

☞ Mahadji has taken into confidence, says the reporter, Bhagwant Krishna Potnis, through whose mediation the garrison of Panhala was to be harassed

---

*No 56* ] [ 4 Feb 1778

श्री

विज्ञापना छ ४ मोहरमी राजश्री बाळाराव व बाळाबाई याची कन्या श्रीतुळजापुरास गेली होती, तिकडून छ १ मिनहूस इसलामपूरचे मुकामी येऊन मिळाली त्यास येथून राऊतही पाच च्यारसें गेले येथून वडगांव तीन साडेतीन कोसावर आहे त्याच्या पलीकडे बाळाराव अद कोसा वर आले इकडून बाळारायाचे कारकून येथें वकील कृष्णाजी अबादास नारो शकर याचे वकील स्वामीपासी त्याचा पुतण्या ते बाळारायास सामोरे जात होते समागमे काही दोन सराफ रहिमत-पूरकर आपले गावास जात होते तेही समागमे होते लस्करापासून सभाजी राजा याचा गुमट दीड कोस पुढें वडगाव दीड कोस तेथें सटवाजी भोसले याच्या राउताची गाठ पडली कृष्णाजी अबादास दि॥ बाळाराव यास जखम येक तरवारीची हातावर लागली घोडीखाल्ते पडले घोडी वस्त्रें वगैरे नेलीं रहिमतपूरकर सराफ त्या उभैतास दोन जखमा माल्याच्या त्याची वस्ताभाव दोन हजार रुपये नगद वगैर कापड काही मोहरा घोडी सुधा नेले तनि माणसें ठार जालीं पाच च्यार जखमीं जालीं इतक्यियात बाळारायाची आवाई आली ते राऊत निघोन गेले कृष्णाजी अबादास उचलोन राउटीस आणिले जखम हल्का आहे पाच टाके लागले बाळाराव गजाचे मागे येऊन राहुट्या दिल्हा सडे बाळाबाईस घेऊन पाटीलबावा बाजाराचे पुढे पाव कास छमिना देऊन आहेत तेथें गेले बाळाबाई वगैरे बाळारावसुधा गेले भेटले मग येकातास बसले येकात जाला,

सध्याकाळ जाला सध्याकाली नारो सिवदेव आले तेही येकातामधें गेले कसकसें बोलणें जालें प्राथ काली समजलिया लिहिण्यात येईल छ मजकुरी कहींची उटे वीस व दाहा पधरा तटे नेली काई जखमी जाली बाळारायाचा कारकून त्याचे भेटीस चालला तेन्हा त्याचे समागमें डाकेचा कासीद बजु नामे, जयेरायमल, स्वामीची पत्रें डाकेची घेऊन आला होता, त्यास खर्चास नवतें रुपया उसना दिल्हा तोही कृष्णाजी आबादासासमागमें फिरोन जात होता तोही लुटला गेला घोंगडी पागोटें जोडा नगद येक रुपया गेला माघारे फिरोन आला त्यास खर्चास दिल्हे त्याची वस्तभाव गेली मर्जीस येईल ते कृपा करणार घणी कोल्हापुरातील वकील वगैरे येतात याजकडील बापूजी शामराज गेलेत प्राथकाली येतील तेन्हा कळेल बाळाराव आले, याजसमागमे आपाजीराम याचे पूर्वीचे दिवान त्याचे ग्रहस्त कोण्ही समागमें आहेत, तेही मागाहून येणार ह्मणतात कोल्हापुरात आता जमाव भारी जाला भोवताले खडक सुरुग मोरचे बसावयास जागा नाहीं सिवाय मोटी तोफ काम होणार नाही याअर्थी कष्टी, पाच रोज तोफा लाविल्या नाहीत मिरजच्या तोफा आल्यात, त्याचा सरजाम बहुता दिवसाचा याअर्थी नवा करतात तयार जालियावर सुरू करतील हरि बाबाजी करवीरचे लोक पनाळा कोल्हापुरात आहेत, त्याची मुलें माणसें धरावयास गेले हा मजकूर पूर्वी लिहिला आहेच छ ५ मोहरम प्राथ काळ हे विज्ञाप्त

☞ Light skirmishing on roads going out from Kolhapur is reported by the news-writer

---

*No 57* ] [ 6 Feb 1778

श्री

विज्ञापना छ ४ मोहरमी बाळाराव येऊन दाखल जाले छ ५ मिनहूस त्रिंबकराव नारायेण भेटले मग येकात जाला छ मजकुरी रात्रीं स्वामीचा मठ कोल्हापूरचे उतरेस होता त्यास स्वामींनी हस्ती वस्तभाव लष्करात आणून ठेविली काही भाडी व धान्ये होतें त्यास छ मजकुरी दो प्रहरा रात्री सटवाजी भोसला येऊन धान्ये भाडी घेऊन गेला स्वामी उपोशण करतात स्वामी कडील कोण्ही येतात त्यास बाजारातून दाळ तादूळ वगैरे सरजाम जाऊ देतात इकडील उपद्रव नाहीं बापूजी शामराज गावात गेले होते, ते आले नाहीत बाळाराव आले ते दिवसीं वडगावचे अलीकडे वाटेस सवाजी राज्याचे गुमटापासीं काही जखमी काही माणसे ठार जाली, लुटून पस्त सटवाजीचे लोकानी केले हा मजकूर छ ५ मोहरमी डाकेत कासदासमागमें पत्र पाठविलें त्या पत्रात लिहिला आहेच त्यास तेथें चवकी शभर राऊत शभर माणसें बसविली प्राथ काली जावें सध्याकाळपावेतों राहावें सध्याकाली उठोन यावें येणेप्रमाणे चवकी बसविली छ ५ मोहरमी श्रमित तात्यासाहेबाकडील जोडी पाटीलबावास तिळ शर्करा घेऊन आली पत्रेंही आहेत पावती केली ह्मणाले की तात्यानी बरीच केली परतु पुढेंही फितूर आहेच डोकी कोणा कोणाची मार-तील ईस्वर तात्यास सलामत राखो फितूर बहुत तात्यानी पत्री लिहिले की आता बदोबस्त जाला परतु काहीच जाला नाही आताही जे जे फितुरात आहेत ते सर्व ध्यानात परतु आम्ही सागितलें ध्यानास येणार नाही इताकियात हरि बाबाजी पनाळा कोल्हापुरात राऊत प्यारे आहेत त्याची मुलें माणसें धरावयास पाठविले होते, त्याचें पत्र आले की दाहा पाच कुटुबे सापडली काही पळाली वस्तभाव बैल काही घोडी वस्तभाव त्याची याद पाठविली पुढें आज्ञेप्रमाणे तलाश करितो ते पाठविलीं त्यास येथें आली आहेत त्याची नाके घयावी कोण्ही ह्मणतात की हात तोडावे कोण्ही ह्मणतात की कोल्हापूरचे दरवाज्यापासीं नेऊन बायका मुलें मारून टाकावी ठरता काय ठरेल तें पाहावें छ ७ मोहरम प्राथ काळ हे विज्ञाप्त

☞ The news-writer says that Mahadji accepted for safe custody into his camp some animals and valuables sent by the Shankaracharya of Kolhapur

---

*No 58* ] [ 6 Feb 1778

श्री

विज्ञापना छ ६ मोहरमी पनाळ्यात राजा आहे त्याची सासू व सासूची आई व मेहुना येथून पाचा कोसावर हस्ती येक आहे घोडीही आहेत बाळकोजी माने रहिमतपूरकर पाटील समागमे घेतला आहे घोडा सरकारचा बसावयास दिल्हा शाहाणा मनुशे आहे त्याचे विद्येमाने पागा व राऊन तयार करऊन दोनसे राऊत दों प्रहरा पाठविले गावात पाणी खारे आहे बाहेरील पाणी तलाव किंवा पचगगा त्यास दिवसा तो पाणी बद केलें रात्रीं नेतील तितके मात्र आहे त्यास छ मजकुरी बक्षीचे मोरच्यावरून काही ब्राम्हण काही गरीब कगाल जात होते मग बक्षीने यास सागून पाठविले त्यास यानी सागून पाठविलें की गोळ्या मारून गावात घालणें आवघयाचा काटच केला पाहिजे मग माघारे गेले दुसरे गाई बैल त्यास पाणी नाहीं कुणबी लोकाची सूत्रें आलीं की निमे घेऊन निमे आम्हास यावी आम्हास बाहेर जाऊ द्यावें, गाईस पाणी गवत मिळत नाहीं त्यासही साफ जाब दिल्हा की बाहेर निघू देणार नाही गावात माणसें बरकदाज ये समई पाच हजार जमाव आहे कळावें छ ७ माहे मोहरम प्राथ काळ हे विज्ञाप्त

☞ The hardships to which the inhabitants & poor residents of the city of Kolhapur were being exposed for want of water are described in this letter by the reporter

---

*No 59* ] [ 6 Feb 1778

श्री

सेवेसी नारो शिवदेव सा नमस्कार विज्ञापना ता छ ७ मोहरम मु॥ पचगगा दक्षणतीर नजीक करवीर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री पाटीलबावानी आज्ञा केली कीं माहाकाली तोपेकरिता आह्मी उभयतास किती पत्रें पाठविलीं, गगाजी बरोबर चिठी पाठविली, परतु तोप येत नाहीं राजश्री बलराव गोविंद याजबरोबर तह करावयाचें सागोन पाठविलें येशास चिकोडी मनोली देतों सलूक करा ह्मणतो साधेल तेथवर नजर साधावी तर साधेल तेथवर हाही प्रकार करण्यात येईल येसाजी सिंद्याचे वर्तन व बुधी नीट नाही कृत्रिमाची मूर्तिच आहे हैदर-नाइकाची याची शाला बुधि वर्तन येक सध्या मतही येकच कागदपत्र परस्परें खेलतात हैदराचा थाराच येथें आहे आह्मी करवीरास आलों त्या सर्धीत अगोधर येक दोन रोज हैदरखानाचा कार कून पाच लक्ष होन घेऊन करवीरास आला पौ लक्ष होन मुबईस रा करावे, च्यार लक्ष फौजेस देऊन फौज ठेऊन आह्माकडे रा करावी यैसी पत्रे घेऊन आला येसाजीने त्याप्रमाणे अमलात आणावे तो दुसरे तिसरे रोजी आह्मी आलो यामुळे तो खेल मोडला यैवज सुधा कारकून माघारा लाऊन दिल्हा येसाजी या खुलात आहे तेव्हा हरतऱ्हा करून सलूक करील वारवार फौजबदी करून कोण्ही चालून येत नाहीं याअन्वयें आज नुकसानी कबूल करील पुढे बदला करील उभयताचे चितात सलूक करून खूल पोसावयाचे आहे की काय ? आमचे मते असा प्रसग पुढे येणार नाहीं श्रीमत रावसाहेब कैलासवासी प्रतापवान होते त्याचे प्रतापापुढे शत्रु सारे दबाले होते

त्यास कैलासवासी होताच घरातच खुलें जाली मग शत्रु प्रबल होतील आश्चिर्य काय ? त्यार पाच वर्षे दौलत खुलामुलें पेंचात येऊन काही बाकी राहिली नाहीं सेवक एकनिष्ठ ज्यास अन्नाचा सकोच आसेल तेच येका वीर्यांपासून जन्मले असे जाणावें त्यानी यावत्‌शक्ति अर्थे प्राणें खर्च होऊन खावदाचे दौलतेचा बदोबस्त करून द्यावा हरामखोरी करणे असेल त्याने खुले करावी, चाकरीस नाहीं ह्मणावे अनेक वीर्यांपासून जन्माची परीक्षा आचरणावरच आहे करवीरचे मसलतीस आमचे इकडे राहाणे जालें हे अनुपयोगी नाही येक तो राजश्री हरिपत तात्याचे सधानावर हैदरखानावर शह, दुसरे येसाजींचे खूलच मोडावें सरकारकामाकरिता आमचे इकडे येणे, लाखों रुाचा पेंच फौजेचा आहे कारभारी उभयता सलूक करा ह्मणत असता फार चागले ह्मणून सलूक करून पेंचातून निघावें खरे. परतु खावद बाल, दौलतेस पेंच राहतो हे ठीक नाहीं याजकरिता फौजेचा पेच जातीवर कबूल केला माहाकाली तोप लौकर आणवणे. आधी तोप रा करावी, मग पत्र वाचावें येसें लेहून पाठवणे सालप्यापावेतों तोप आली ह्मणिजे आम्ही इकडून बैल पाठऊन घेऊन येऊ ती तोप आली ह्मणिजे दो रोजात कोल्हापूर घेतों. हे खूल मोडल्याने सर्वांवर दाब बसला, सारी कामे स्वल्पायासें करून होतील × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Mahadji asks Nana to send the big gun without the least delay, so that the Raja of Kolhapur who was in league with Haidar can be finally & permanently reduced to submission

---

*No 60*] [8 Feb 1778

श्री

विज्ञापना छ ८ मोहरमीं पाटीलबावानी मोहर्त पाहिले तेंव्हा सिके कटार वस्त्रें सरकारची आली ते छ मजकुरी प्रा्थकालचे दाहा घटिका दिवस आलियावर वस्त्रें ध्यावी ऐसें मोहर्त निघालें मग जागा चागली करऊन छमिने देऊन दाहा घटिका जालियावर पाटीलबावा येऊन बसले बाळारायानी सेला पागोटें सरकारचीं वस्त्रें हिरवे पैठणी आले ते उकलोन पदर हातीं दिल्हा पागोटें बाधिलियावर सेला पाघरविला पाटीलबावानी सेल्याचा पदर पुढें केला तेंव्हा बाळारायानी सिके कटार ताडपत्रीचा रुमाल होता वगैरे सरजाम पाटीलबावाचे पेटीमधें घातला मग बाळारायानी पाच मोहरा नजर केल्या मग दोन कोण्ही तीन कोण्ही रुपये नजर करू लागले बाळाराव मजला म्हणो लागले की तुह्मी नजर करावी मग सात रुपये नजर केली त्यास जिवाजी बलाळ यानी बाळारायाची तारीफ बहुत केली की माहाराजाचे पदरी मनुश माळाराव यानी उतर केलें की माझे आहे काय ? तेंव्हड्यावर जिनगानी आह पुढें जिवाजी बलाळ बोलले की सरकार फडणिसाचा कारकून कोण्ही आला नाहीं तारीख घालितो कोण ? तेंव्हा रायाजी पाटील बोलले की नारो सिवदेव घालतील राणेखान ह्मणाले की नारो सिवदेव बिऱ्हाडी आहे धोंडोपताकडून करवावी बाळाराव बोलले की मजला अधिकार नाही की काय ? पाटीलबावानी यैकून मात्र घेतलें नजरा होत होत्याच मग आबा चिटणीस यास बोलाऊन ह्मणाले की कोल्हापूर प्रा। याचे दोन हजाराची नेमणूक, श्रीलक्ष्मीस हजार ब्राह्मण, पाचसे स्वामी यैसे गाव साडेतीन हजाराचे धर्मार्थ देऊन उदक सोडले सनदा करविल्या गाव ल्याहावयाची जागा ठेऊन तयार करविल्या मग तारीख स्वता पाटीलबावानीच घातली सिका आपले हाते केला मग सिके कटार गणोजी नामे खिजमतगार त्याचे स्वाधीन केली तोफा सोडल्या चवघडा सुरू केला इतकियात धारराव सिंदे याजवर इत

राजी होती मागती चवघे मऱ्हाटे होते मिळून त्याजवर कृपा करविली पाचसे राऊत निसबतीस दिल्हे ते धारराव सिंदे इकडे येत होते त्यानी काही माणसें गावातील गवतास व भोई तळ्यात आले होते ते धरून आणिले त्याची नासिके व कान हात घेणे ह्मणून सागितले मग चवघानी अर्ज केला की आज बदवे आसतील ते झाडून सोडावे मुतालकीचे सिके आले ह्मणजे हिंदुस्थान वगैरे राज्यच आलें सोडावे, मग सोडून दिल्हे इतकियात वर्तमान आलें की पनाळ्यात राजा त्याची सासु वगैरे आणावयाची पागा वगैरे पाठविली होती ते राऊत आले की हस्ती बैल चणे बाजरा व राज्याची सासु वगैरे आणली मग कागलकर जामीन जाले, जिमे आपले करून घेतले माघारे पाठविली, हस्ती, बैल, वगैरे रदबदली होती की हस्ती वगैरे आमचे जिमे करणें ठरता काय ठरेल पाहावें छ ७ मोहरमी गावातील बरकदाज व राऊत गाव सोडून पुढें आले मग इकडून राणेखान, रायाजी पाटील, पीरखान पाग्या गेले थोडीसी लढाई जाली इकडील तीन घोडी जखमी जाली येक मैत जालें त्याची काही पडली असतील याजकडील माणसें दोन ठार जाली पाच जखमी इतके मात्र जालें हरिबावाजी नित्ये दहापाचाचीं मुलें माणसें धरितात दुसरे सरकारचे चदीस गला नित्ये हरि बावाजी ज्याची मनुश्ये धरितो त्याचे घरात निघतो तो पाठवीत आहे छ मजकुरी सध्याकाळीं गावातून दोघे ब्राह्मण आले की उपवास पडतो या अर्थी आलों त्यास धरून आणिले मग पाटीलबावानी सोडून द्यावे ह्मणून सागितलें इतकियात भग वत कृष्ण करवीरचे पोतनीस आले त्यानीं विनती केली की हे ब्राह्मण करवीरचे येसाजीचे मायेंत हे बातमीस आलेत लबाडकी धरून आलेत मग सोडले होते माघारे आणून घोरपड्याचे स्वाधीन केले. बेड्या घालविल्या पुढें पाहावे मानाजी सिंदे याचे पत्र यास मागती आले की तात्यास लेहून बायको माझी आणवने दुसरें धारराव सिंदा वगैरे मऱ्हाटे बजीदी करतात की मानाजीची बायको आणून आपणापासी ठेवावी राजश्री तात्यास लिहिले आहे ह्मणतात तेथें मानाजीभोंवती चवकी हजार गारदियाची आहे ह्मणतात हैदरखानास बसवस प्राप्त जाला की हरिपतानी याजला कमती काय केली होती त्यास दगा दिल्हे ! तैसा मजलाही देईल याअर्थी छ ७ मोहरमीं इकडील कही लाव करवीरचे किले पाच च्यार आहेत तेथें गुढें जमा आहे, त्या आर्थी गेली होती दाहा पधरा उटे पचेवीस तटे नेली छ ८ मोहरमी सध्याकाळीं याचा वकील बापूजी शामराज व त्याचा राघोपत कोल्हापुरास गेले होते आले त्यास जुबानी ह्मणत होते की शिवाजी बलाळ दि।। बरवे यास घेऊन येणें ह्मणतो त्यास येकातास बसले कसकसा मनसबा ठरतो, शिवाजी बलाळ गावात जातात की नाहीं, हा खुलासा कळलियावर लिहिण्यात सेवेसी येईल छ मजकुरी सध्याकाळीं पाटीलबावा बुन ग्यात आले रात्रौ देवघरात होते तेथून उठल्यावर बीडकर फकीर याचे गुरु त्याच्या पादुकाची पूजा करून बसले मग धवशाने बदुखा पाठविल्या त्या आणविल्या त्या पाहून मग गोष्ट निघाली पाटीलबावा बोलले की नानापासीं बदुखा कोणीकडून चागल्या आल्या आहेत आह्मास पाठवावी की नाहीं येखादी येणेप्रमाणें बोलले छ ९ मोहरम प्राथ काल रविवार हे विज्ञापना.

☞ The news-writer describes the Darbar which Mahadji held for the acceptance of the dresses and presents sent from Poona, probably received as marks of Mutalikship conferred on Mahadji by the Emperor Other matters of the siege of Kolhapur are also reported

*No 61* ] [ Soon after 8 Feb 1778

श्री

विज्ञापना सेवकाचे पत्राचे उतर छ ९ मोहरमचे पाठविले तें पावलें

माहाकाली तोफ लौकरच रा। होईल ह्मणोन आज्ञा त्यास सासवडीहून तोफ कुभारलवणानजीक गगाजी घेऊन आला पुढें चालेना ह्मणून गगाजी येथें आला त्याजबा। मलजी बुव्या, पागा सेदीडसे स्वार, केशोपत कारकून, च्यारसे बैल माला, तीन हती, पचवीस उट, पचवीस माळदार, सुतार, लोबरा ( लोहारा ) चे दुकान, बलदार इतका सरजाम रा। येथून जाला दोन हजार रु॥ नख्त पाठविले इतके गगाजी घेऊन गेला तोपचे वर्तमानही आले जेजुरी येलीकडे आली आज तोफेची व गगाजी वगैरेची गाठ पडली असेल घेऊन येतील

मानाजी सिंदा व धवशाचा मजकूर अज्ञापिला तो बावास रुत केला

मालवणचा मजकूर आज्ञापिला त्यास आपाजीराव परवा येथें आले याउपर होईल वर्तमान ते लेहून पाठऊ

पूर्वील पत्राचे उतर आले नाही, अपूर्व आहे, ह्मणून आज्ञा आली, त्यास येक वल गाठ पडून बोलणे जाले ते लेहून पाठविले होते फिरून गाठ पडून बोलणें जालें तें बरेच आहे पुरवणी निराळी आहे त्यावरून विदित होईल

त्रिबक सेटीचे पत्र अवलोकनात आलेच असेल अवकाशे जाबसाल उगऊन घ्यावे येणे करून गल पडून अर्थ दिसत नाही करार करून घेणें देणे ते समक्षच व्हावे येसे भाव बोलण्यात आहेत दुसरा लढा नाही आणिकही बोलतच आहो होईल वर्तमान ते विनविल्यास येत जाईल हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports the arrival of the big gun as far as Jejuri & other matters which he was asked to discuss with Mahadji

---

*No 62* ] [ 12 Feb 1778

श्री

पौ छ १५ मोहरम समान

सेवेसी नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १३ मोहरम सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष तोफा व गलनालेचे गाडे अद्यापि तयार जाले नाहीत तयार जाल्यावर गावास लावणार महाकाली तोफेची वाट फार पाहातात काही कागदपत्र आला की नाही ? तोफ सासवडाहून चालली की काय ? दिवसातून दोन तीन वेल पुसत असतात जपमालाच लागली आहे लवकर येई तितकी उपयोगी गुता उरकून मोकळे होऊ ह्मणतात तर तोफ लवकर येऊन पोहचे असे जाले पाहिजे करवीरात दाणा माहाग जाला दीड पायली धारण यैकतो राजश्री येसाजी सिंदे यानी गावातून गरीब गुरवाची राडापोरे बाहेर काढून दिल्ही होती राजश्री पाटीलबावानी जाऊ दिल्ही नाहीत माघारी गावात घातली कोल्हापुरात फौज आहे त्या लोकाची कुटुबे याच प्राती आहेत त्याचे जप्तीस राजश्री हरि बावाजी रा। केले समागमे पाचसें राऊत दिल्हे आहेत हुपरीस जाऊन जप्त्या केल्या आणिखी जागा जागा जप्त्या केल्याचे वर्तमान आलें याउपर होईल वर्तमान ते लेहून पाठऊ + तोफे यावयास विलब लागला यास्तव वरचेवर सागतात त्यास तेथून पुढे एक दोन मजली आली ह्मणिजे हेही साहित्य रा। करीतच आहेत घेऊन येतील तोफेकरिता बावानी राजश्री गणेशपत चक्रदेव पा। ते पावले असतील सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev communicates the straits to which the garrison & residents of Kolhapur were being slowly reduced owing to the siege

No 63 ] [ 14 Feb 1778

श्री

पौ छ १७ मोहरम समान

विज्ञापना छ १४ मोहरमी सध्याकाळचा प्रहर दिवस राहाता सटवाजी भोसला पाचा साताशा लोकानसीं बाहेर निघाला कोल्हापूरचे पछमेस तलाव आहेत तिकडे चवकी धरराव सिंदे व मोरे व लाबहाते आहेत तिकडे चालून आला हेही तयार काही होते बाकी तेही जाले लडाई सुरू जाली धारराव सिंदे यास येक दगड तोंडास लागला व्होट मात्र थोडासा तुटला गोली पाठीस लागली परतु थोडी धबक बसली निंबायेन्हडा गोळा मात्र आला धाररावाचे घोड्यास तीन गोळ्या लागल्या कुसापासी घोडा मैत जाला इकडील तीन माणसें ठार जाली, पधरा जखमी सात घोडी जखमी जाली गडबड जाली तेव्हा राणेखान बाळाराव पीरखान वगैरे लोक गेले गावातील तोफेचा गोळा आला त्याने दोन घोडी मैत जाली कोल्हापुरात गोलदाज आहे त्याची तारीफ पाटीलबावा बहुत करतात की येक राऊत वाटेने चालला तर त्याचा सुमार धरून तो राऊतच हाणावा सर्वत्र इकडून गेलियावर गावास नेऊन घातले त्याची पाच माणसें जागाच ठार जाली जखमा काय आसतील हे न कळे कोण्ही घाटगा कोल्हापुरात सटवाजीचे बरोबरीचा आहे त्यास तीन जखमा तरवारीच्या आहेत मातबर होता त्यासाठी येसाजी बहुत कष्टी जाला दो प्रहरा रात्री बातमी आली दुसरें बक्षी उतरेस आहे त्याच्या चौकीवर रात्री आले तीन माणसें पायेची बक्षीचे चवकीची ठार जाली दोन जखमी मग चहूकडे चवक्या आहेत त्यानी मदत केली मग गावास गेले नारो सिवदेव बुनग्यात असतात मी सडे स्वारीत आहे त्यास लढाईचे समई समागमे गेले पाहिजे येक दोनदा राजश्री नारो सिवदेव याची घोडी मागितली नित्ये काण देतो दुसरे काही लागलें तर बदलामी मासा घोडा या कामाचा, लढाईच्या नाहीं, दरशन-सतोश, मजलकटाऊ आहे कोण्ही चोपदार बोलाऊ आला तर मोठा मातबर द्रिष्टीस पडतो छपनार नाही येविशई विनती लिहिली होती आज्ञाही आली करवीरचे कोल्हापूर पनाळा त्यात लोक आहेत त्याची मुलें माणसें धरतात हें वर्तमान त्यास कळलियावर सूत्रें आली की आह्मी युक्तीचे वाटेने निघोन येतो मुलामाणसास तसदी न द्यावी तोफेचे खाटे वगैरे एका दो दिवसा तयार होतील मग तोफा सुरू करणार मोठे तोफेची वाट पाहातात कळावें छ १५ मोहरम, प्रोथ काळ हे विज्ञाप्त

☞ Dhondo Bhivrav writes an account of the progress of the siege operations, in which Satvaji Bhosla with some followers came out to attack but was repulsed and pushed back into the town

No 64 ] [ 19 Feb 1778

श्री

विज्ञापना हरि बावाजी लोकाची मुलें माणसें धरावयासी यानी पाठविले त्यास त्यानी चिकोडी मनोली दोन्ही महालाचे काही गाव कोणाकडे आहेत वगैरे खडण्या घेऊन छ २० मोहरमी बैल पनास व कुडुबे लोकाची पाच सात बायका व रुपये पचेवीस हजार काही गाई वगैरे

पाठविले मागें गावगणा खडणी घेतच आहेत पाटीलबावानी माहाकाळ तोफ येती तिजला आणावयास सरजाम पाठविला राऊत तीन हजार रुपये नगद बैल येणेप्रमाणें पाठविले कोल्हापुरात महर्गता विशेष जाली त्याजकडील गोपाळशास्त्री वगैरे वजीद[1] आहेत हे रुपये बहुत मागतात दुसरें आता मुद्दा घातला की श्रीमत भाऊसाहेब होते ते समई करार ठरला होता की दिवानगिरी फडणिसी वगैरे कामे करावी त्यास आता त्याप्रमाणें झाडून मुसदी सरकारचे किल्यात असावे येसें पाटीलबावा बोलतात [2] समक्ष येकिलें नाहीं, दिनचर्या येकतो हे विज्ञास

☞ Mahadji's siege presses hard against the garrison of Kolhapur, reports Naro Shivdev

---

*No 65* ] [ 19 Feb 1778

श्री

विज्ञापना राजश्री पाटीलबावाचे चिठीचे व सेवकाचे पत्राचे उतर छ १४ मोहरमची पाठविली ती छ २० मोहरमी पावली ती बावास श्रवण करविली सेवकाचे पत्रीं कलमबदी होती करवीराभोवते खासाच फिरतात गोलीच्या मारात जाऊन बसतात हे त्यानी न करावे राणेखान भाई वगैरे पागे इतबारी आहेत, त्यास पाठवीत जावें आपण चौकसी करावी, येवढे आह्मास यावे आपण खासा ही गोष्ट न करावी ह्मणोन विनती केली बरे ह्मणाले दुसरे करवीरचा तह होत आसल्यास करून मोकले व्हावे सेवटच करावा असी मर्जी आसेल तर यास चार दिवस लागतील कदाचित प्रसग पडल्यास चिठी येईल तर पाच हजार फौज येथील बदोबस्तास ठेऊन आपण खासा फौजसुधा कूच करून चालावे ती गोष्ट मान्य केली सिध आहों जे समई काम पडेल तेव्हा चिठी पाठवावी येथें फौज ठेऊन आह्मी कूच करून चालतों गुता नाहीं ह्मणून सागितले परतु खबर जलद यावी तरीच उपयोगी अगोधर सावध जाल्यासच मनसबा हातास येतो याच अर्थे रहमतपुराहून तिकडे येऊ ह्मणत होतों विचारास आले नाहीं आताही सावधता बरी राखावी धोंडोपताचा प्रकार समेटून घ्यावयाचा करितों बावास सूचना करावी ह्मणून आज्ञा त्यास आज्ञेप्रमाणे सूचना केली उतर जाले जे फार चागले हे अवश्यमेव करावयाचेंच खामखा मेलवून घ्यावे आमचे बधूचा फारसा मनसबा नाहीं मोटा मनसबा धोंडोपताचाच आहे सध्या पैका त्यानी बाहेर काढिला आहे नालबद्या धडका लोकास देतात बातम्या आह्मास आल्या पैका घेऊन आले तेच बोलतात बारा पधरासें आता आहेत नालबदी पाच सा हजारास दिल्ही आणिखी देतात कसेही करून त्यास मेळऊन घयावे चितो विठल यानी लबाड साधन लाविले होते वर्तन त्याचे आम्ही सागोन पाठवीत असता ध्यानास येईना त्याचाही अनुभव आला असेल कुटुबासहित निघोन जाणार होते प्रतिनिधीची फौज पुण्यावर आणून उतरविली, यामुले आटकून पडले त्यास कुटुबसुधा पुण्याबाहेर पडू न द्यावें येसे सागितले आहे * मसलतीच्या पकेपणाविसी सशय नाहीं पत्र आल्यास गुता पडावयाचा नाहीं सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev informs Nana of his talks with Mahadji who expressed his readiness to proceed into Karnatak for Haripant's help

---

१ आर्जवात २ ह्मणजे पनाळ्यावर सर्व कारभार पेशव्याचे मार्फत चालावा असें महादजींचें मागणें. * येथून पुढें हस्ताक्षर नारोशिवदेव याचे असे

*No 66* ] [ 21 Feb 1778

श्री

रा हरिपंत तात्या गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रो माहादजी सिंदे दंडवत विनती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीये कुशळ लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपन छ ४ मोहरमची पत्रे पाठविली ते छ १७ मिनहूस पावोन लेखन अर्थ कळला आह्मी व बाजीतजगानी कृष्णातीराहून कूच करून चालल्याचें वर्तमान येकून हैदरखान हरिहराकडे गेला असी बातमी आली. आह्मी तुगभद्रा उतरोन पलीकडे जाऊ आलीकडे आपण येऊन सोंदे बिदनुराकडे ताण दिल्हा तरी सहजात आयास येऊन फडशा होतो कोल्हापूरचे मसलतीचा गुता लोकर उरकोन इकडे आल्यास मोठे येश घयावयाचा समये आहे ह्मणोन लिहिले तें सविस्तर कळलें येसियासी आपण व जाबितजग येकत्र होऊन तुगभद्रा उतरोन जाण्याचा विचार केला उतम केले आपण व जाबितजग एकत्र असता हैदरखान मैदानात येऊन गाठ घालील हे दुरापास्त तत्रापि चित्रदुर्गकर वगैरे पाळेगार सामील करून घयावे आह्मी करवीरास आल्यावरी दोन तीन पत्रीं वर्तमान लिहिलेंच आहे करवीरास भोंवत्या चवक्या ठेऊन बदी केली गावात धान्याची महर्गता मुळें सलुखाची रदबदल करितात परतु येसाजी सिंदा लबाड बदमामली, आता पेंचात आहे ह्मणून सलुखाची भानगड लाविली सलूख जालियावर पुढे बदमामली करावयास चुकणार नाहीं याकरिता सलूख आगर पारपत्ये करणें तें पकें करावें या अर्थी माहकाली तोफ आणविली आहे ती सालप्यास आली आठा रोजात येईल उपरातिक थोडक्याच दिवसात येथील जरबाने बदोबस्त करून आपल्यास लिहिलें जाईल नबाब डेरेदाखल जाले फौजेची तयारी करितात ह्मणून वर्तमान आहे व्होळकरानी डेरे दिल्हे आहेत यैसे वर्तमान यैकतों आपणाकडे येतात किंवा काय मनसबा करतात तें कळेल तैसे लिहिलें जाईल या मसलतीपासून मोकळे जाल्यावरी आपणाकडून वर्तमान येईल त्याप्रा होईल वर्तमान वरचेवर कळवीत जावें रा छ २२ मोहरम बहुत काये लिहिणें लोभ कीजे हे विनती

☞ Upon receiving Haripant Tatya's call to proceed against Haidar into the Carnatak, Mahadji replies that as soon as the affair of Kolhapur was finally settled, he would be free to undertake the proposed expedition

---

*No 67* ] [ 24 Feb 1778

श्री

विज्ञापना पाटीलबावा येकातास बसले होते मग येकात जाला बापूजी शामराज बाहेर आले माझी गाठ पडली मग त्यास विचारलें की बापूजीपंत, आह्मासही वर्तमान काही सागत जावें मग ते आह्मी निराळे बसलो सल्याचें कसकसे आहे ह्मणून विचारलें ह्मणाले की करवीरकर सर्व गोष्टींस राजी आहेत परतु याजला सला करणे नाहीं दोन महिने काहाडावे आज सला केला तर तात्याकडे जावें लागेल याअर्थी ह्मणावयास जागा की मोहीमशीर आहोंत यात समजावें विस्तार काय सागू? दुसरें हैदरखान येसाजी येकच आहे कोल्हापुरातही वर्तमान आहे की येसाजीस पत्र हैदरखानाचें आलें की धवसा आपलासा केला आह्मी बकापूरचे सुमारे आलों त्यास यैसें असले तर हे सला न करता उठोन जातील याजपासी फौज पाचा रुपयाचा खासा,

तीन रुपयाचा राऊत, पागेस तीन वरेश नालबदी नाहीं लोक मरतो कोण? हैदरखानाने पुढे चल दिल्हा घवसा तिकडे जाला हेंही काहीं खूळ होते येसे येकतों तेव्हा यानी सला न करता उठोन जावें यात काय लौकिक? त्यास यास बरें दिसेल तें करतील. यानी हिंदुस्थान पाहिलें आहे. देस पाहिला नव्हता येसाजी बेटबाज आहे त्यापेक्षा हे अधिक घडता घडेल तें खरें यास मोठा भरोसा माहाकाळ तोफ. त्यास ते आली तर कोल्हापूर घेतील येसाजी निघोन पनाळ्यात बाईसुधा मोरचा उडऊन जाईल मग हे काय करणार? इतक्रियात आबा चिटणीस बाहेर आले मग त्यासी बोलावयास लागले कळावें गिरमाजीपत नामे प्रहस्त याजकडून कमावीसदार भिंड भदावर तेथें होता तो गोहदवाल्यासी मिळाला होता तो सिवाजी विठल यानी कैद केला येथून यानी सदासिव गोपाळ कमावीसदार करून तो उजेनीस होता त्याजला पाठविलें सिवाजी विठल याची पत्रेंही यास आलीं होतीं दुसरें बहीरजी ताकपीर याचे वर्तमान तों पूर्वीच लिहिलें आहे अवाई बहुत दाट आहे की पळोन गेला त्यास राणेखानास मागती विचारलें मुजरदपत्र आलें नाहीं ह्मणाले बाजारी वर्तमान आहे राजश्री आपाजीपत कचेरीस येत असतात कळावें छ २५ मोहरम, प्रात: काळ हे विज्ञाप्त

☞ Mahadji's plans & the Kolhapur overtures of peace are reported by Dhondo Bahirav in this news-letter

---

*No 68* ] [ 28 Feb 1778

श्री

विज्ञापना छ २८ मोहरमी प्रहर दिवस राहता पाटीलबावाचे हुजुरातची चवकी आहे त्याज वर सटवाजी भोसला पाचसे स्वार दोन हजार बरकंदाज दोन गुडगलें[1] छकड्यावर घालून कोल्हापुरातून येका बाणाची खास चालून आला इकडून राणेखान बाळाराव वगैरे गेले दोन घटिका दिवस राहता लडाई सुरू जाली बाळाराव राणेखान उभे होते त्याचे उजवे बाजूस मलार राव पोवार उदाजी पोवाराचा नातू ह्मणतात त्याची जाहागीर सरकारात जप्त केली होती श्रीमत तात्याची त्याजवर इतराजी, याअर्थी जाबगावचे मुकामी यास येऊन भेटले यानीं विनंति करून जाहागीर सोडविली सरकारची पत्रें यास आणली की सिंद्याचे ताबीन राहावें, तो मलारराव पोवार व पीरखान उजवे बाजूस उभे होते तिकडे सटवाजी चालून आला लडाई जाली मलारराव पोवार याचे नाकाचे सेंड्यावर पत्र्याची जखम लागली नाक तुटलें परतु टाके तीन दिल्हे लागेल चिंता नाहीं येक जखम तरवारीची लाहाण डोईत येक दगडाची पाठींत आहे परतु बरे आहे चिंता नाहीं, जखम मातबर नाहीं बरकड सात माणसें जागा ठार जालीं अठरा जखमी नव घोडी जखमी, तीन मैत इकडील येणेप्रमाणे इकडील तिकडील दाहा जादा पडलीं पधरा कमबेश जखमी जाली जागा ठार जालीं ते द्रिष्टीस पडली मग जखमी काय असतील ते न कळे मलारराव पोवार याची जखम सिवावयाकरिता पाटीलबावा राणेखान वगैरे बसले तेव्हा मलारराव पोवार ह्मणाला की सटवाजीस मी वळखत आहे श्रीमत तात्यापासीं आह्मी सटवाजी भोसला होता मी त्याजला पुर्तेपणें वळखत असतों त्यास सटवाजीस माझी तरवारीची जखम लागली व दोन जखमा भाल्याच्या माझे बारगीर याचे हातच्या अगात चिलखत होतें त्याची घोडी आणली त्यास घोडी येक आणली खरी, मग खुद्द सटवाजीची किंवा दुसऱ्याची, त्यास येणेंप्रमाणें मलारराव पोवार बोलला मग पाटीलबावा आपले राहुटीस आले मग राणेखानास विचारलें की सटवाजीस

१ A metal vessel of a particular description Molesworth

जखमा लागल्या की काय हें लेहू की नको ? तेव्हा पाटीलबाबावा बोलले की सटवाजीस जखमा लागल्या येसें येकतों रात्रीच्या समयास सत्ये असत्ये न कळे उदैक बातमी गावातील येईल तेव्हा कळेल सिपायाच्या गोष्टी दोन अधिक उणे बोलत आहेतच आज लडाई बरीच जाली इतकें त्याहाव इतकियात बक्षीने आपले मोरच्यातून दोन माणसे गावातील जात होती ते धरून आणिले त्यानी वर्तमान सागितले की कोल्हापुरात महर्गता बहुत जाली लोक उपवासी मरतात येसाजी सटवाजी यानी मनसबा केला की फालगुण शुध बीज किंवा तीज पावेतो बैलाचे सिंगास टेंभे* बाधून हजार पाचसें येक मनुश्ये मोरच्याकडे पाठवावे तिकडे लडाई पाडावी रात्री मातबर सटवाजीने दोन तीन घटिका लडाई पाडावी तिकडे असावें आणि येसाजी सिंदा बाईस घेऊन सटवाजीसुधा निघोन पनाळयास जाव येसे ठरलें, येसे मानसे धरून आणलीं ते सागत होती कळावे छ २९ मोहरम प्राथकाळ हे विज्ञाप्ति फालगुण शु॥ २ सह तीज मदवार

☞ The writer reports an attack by Satwaji Bhosle on the besiegers in which both sides lost considerably Malharrav Pawar of Dhar received wounds Such is the report of the incident

---

*No 69* ] [ 4 March 1778

श्री

पौ छ ८ सफर समान[1]

विज्ञापना छ ४ माहे सफर सध्याकाळीं गकारनामक मोरच्यातून आले पाटीलबावाचा त्याचा येकात जाला मग बाहेर आले मग विचारलें की खलबत काये काये जालें ? तेव्हा ह्मणाले की पहिल्याने विचारले की तीन रोज जाले, बाळारायाचें आपलें वचेनप्रमाण जालें की त्याने पायावर डोकी ठेविली की तुह्मी वाढविलें, मजपासीं आहे नाहीं हें ध्यानात, या अर्थी समाधान पोकळ केलें लबाड आहे परतु आह्मीच वाढविला दुसरें नारो शिवदेवाचें बाळारायाचें चित शुध नाही, करून द्यावें येसें येकिलें होतें उतर केलें की तजवीज केली होती परतु मागती विचार केला कीं असे करून देऊ नये येसेंच बरें आहे यातच सोये आहे तिसरें विचारलें की व्होळकर वगैरे खूळ उभें ठाकतें हें कसकसें आहे ? त्याचे उतर केले की बकारनामक सवत्सर कोकमठाण तेथें बसोन गोसावी काही आपलेसे करून ठेविले आहेत त्यास नाना नेट धरीचना भाऊपणा राजभारास चालत नाही तेव्हडा बसविला मग खूळ करणार कोण ? त्याजपासी काही घेऊ नये, अरगल्यात बसवावा त्यास जाऊ देतात, याअर्थी कष्टी आहेत कदाच जाऊ द्यावे, मग येत्न करावा, फौजा मेळवाव्या हे काय ? आह्मास पत्रें आली की तुह्मी सडे यावें त्यास तैसाच प्रसग आढळात आला तर तुह्मास ठेऊन आह्मी जाऊ दुसरें विचारलें की हरिपताकडे जावयाचे कसकसें आहे ? त्याचें उतर केले की गडचे लिहितात आम्हाकडे येणे तात्या लिहितात आम्ही चारदा सागितले की नबाबाकडील बदोबस्त करण्याविषयीं नानास तात्यास लिहिणें आमचाही ब तमी थोडी थोडी थेट अटकेपासून आहे कोणकोणत्या मनसब्यात हें सागू आबाजी माहादेव बकापुरात उगाच आला हें तात्यास समजेना इतकियात रायाजी बोलले की आपणास या कामाशीचून गरज काय ? मुत्सद्दी उभयता शहाणे आहेत तोतयाचा बदोबस्त कला होता तैसा आताही बदोबस्त केला असेलच आह्मास मात्र जहागीर वगैरे किला न

---

* टेंभा= मशाल [1] नाना फडणिसाच्या हातची

यावा. हैदरखान नबाब यानी मुलूक घेतला चिंता नाहीं इतकियात पाटीलबावा बोलले की, आता तरी तात्यास ल्याहावें कीं तुह्मास वर्तमान बाहेरील कोण कसें सागतो ! तुह्मास विश्वास मानाजी सिंद्याचा त्यास मानाजीसुधा फौज झाडून तिकडे मिलाली तुह्मी म्हणाल की जो तिकडे जाईल त्याचे घरी आह्मी चवक्या बसऊ त्यास कोणा कोणाचे घरी ह्मणून चवक्या बसवितील तुम्हास ठिकाण राहील तेव्हा बसवाल कीं काय ? इतकियात राणेखान ह्मणाले कीं आपण इतके कशास बोलावें ! मुत्सद्दी शहाणे आहेत

☞ Mahadji's private talks & personal animosities are reported by the news-writer to Nana Fadnis

---

*No 70* ] [ 5 March 1778

श्री

विज्ञापना राजश्री मोरोबादादा श्रीपढंरीस गेले ह्मणतात त्यास अदेशा ध्यावा तर छ ५ सफरची पत्रें आलीं त्यात होळकर वगैरे मजकूर आहे त्या पत्राकडून अदेशा दूरही जाला महाराज ईश्वरी अवतार कोणाच्याने काये होणे आहे हें खरें आहे परतु विश्वास धरू नयेच हे विज्ञाप

☞ Nana Fadnis is advised by Dhondo Bhivrav to be on his guard against Moroba Dada who was reported to have gone to of Pandharpur

---

*No 71* ] [ 5 March 1778

श्री

विज्ञापना माहाकाली तोफ कऱ्हाड येथे आली त्यास येका दो दिवसा येथें दाखल जाली ह्मणजे दो चौ रोजात कोल्हापूरचा फडशा होईल छ ३ माहे सफरी पाटील बावा तलाव्यास गेले होते सटवाजी बाहेर निघाला गोळागोळी जाली दोन च्यार इकडील तिकडील घोडी माणसें कामास आलीं येथें रात्रीं आवाई चोराची होती त्यात लस्करात आवाई पडती की हैदरखानाचा दिवान टिपू बकापुरास आला विसाजी आपाजी धारवाडा आली कडे चिकोडी मनोलीकडे आले टिपूने जमाव करून याचे मोरचे उठऊन कोल्हापुरात जाणार, किंवा बुनग्यावर येऊन पडणार कोल्हापुराहून सटवाजी बाहेर निघणार दोन्ही एकत्र होऊन यास बुडवावें याअर्थी लस्करात रात्रीं अवाई बहुत पडती याची बातमी आहे मागती पाठविली पाटीलबावाचे ध्यानातही नाहीं लोक मात्र लबाड आहेत छ मजकुरी कही याजकडील गुमठाचें सिरोळ त्यासुमारें गेली होती सिलेदार लोक अनिवार याची उटे वगैरे समागमें राऊत होते ते काहीं घेऊन आले पुढें काही गेले होते ते गुमटाचें सिरोळकरानीं शभर तटे पचवीस उटे नेली सल्याचा डौल आहेच नित्ये बोलणें होत आहेच परतु यास यैसें कोण्ही सागितलें की येसाजी पासीं वगैरे पैका बहुत आहे घडता काय वडेल तें पाहावें उभैता स्वामीचीं व सरकारची पत्रें यास आली ह्मणून यैकतो मजकूर काय असेल तो न कळे

☞ Report of Mahadji's operations against Kolhapur is sent to Nana Fadnis

---

*No 72* ]　　　　　　　　　　　　　　[ 5 March 1778

श्री

पौ छ ७ सफर समान

विज्ञापना परशरामपत भाऊ त्याचे मामा त्याजपासी पाच हजार रुपये निमित्य ठेविले की पनाल्याच्या लोकाची कुटुब तुमचे गावात व्होती ते पळविली म्हनऊन घेतली कोन्ही माहाल पर शेरामपत भाऊकडे जप्त सरकारातून व्होता त्याजपासी सालहळचे' रुपये घेतले वरकड धाम धूम हरि बावाजी पाठविला तो बहुतच लोकास उपद्रव देतो मतलब त्याजपासी रुपये आढळले म्हनजे निमित्ये लोकाचे कुटुबाचे ठेऊन रुपये घयावे याचा काही बदोबस्त माहाराज लिहीत असतीलच दारूबद्दल कोळसे वगैरे सरजाम गावास चिथ्या करतात त्यास ते पाहिजेच वरकड उपद्रव बहुत छ ५ सफर हे विज्ञास

☞ Petty skirmishing, and harassing each other are the features of the campaign against Kolhapur as herein reported by the news-writer

---

*No 73* ]　　　　　　　　　　　　　　[ 16 March 1778

श्री

विज्ञापना श्रीमत तात्यासाहेबी यास लिहिलें कीं कितूरवाले यानीं काही जमाव करून सरकार तालुकियात दोन तीन ठाणी घेतली आह्मी तिकडे काही फौज पाठवावी तर हैदरखानाचा आमचा तफावत नव कोसाचा तुह्मी पाच च्यार हजार फौज पाठऊन त्याचे पारपत्य करावें यास पत्र दिल्हें उत्तर जालें की व्होळकरास ल्याहावें ह्मणावें ते भाऊ येकाताचे, त्यास जाहागीर देऊन गेलेत आह्मास येक मेलसें तेही हस्तगत नाही आणिकही काही बोलले त्यास भाई ह्मणाले की हे नानास लेहू नका सरदार आहे रागास्तव च्यार गोष्टी बऱ्या वाईट घरी बोलतात हे विज्ञास

☞ Nana is informed by the newswriter how bitterly jealous Mahadji felt about Tukoji Holkar Haripant wrote to Mahadji to send a detachment to Kittur where Haidar was playing mischief To this request Mahadji replied, "Why don't you ask your friend Tukoji to undertake this task? He is your dearest supporter"

---

*No 74* ]　　　　　　　　　　　　　　[ 22 March 1778

श्री

विज्ञापना सरकारची पत्रे व श्रीमत राजश्री बापूचे पत्र व स्वामीची पत्रें सरकारचे जोडी बरोबर येण्याकरिता बाबाकडे रा जाहाली आहेत मागाहून येतील ह्मणोन आज्ञा हे वर्तमान ऐकून बावानी आशका घेतली कीं सरकारचे व जेष्ठाचे + पत्र येणे स्वाधीन आहे बापूनी पत्र दिल्हे व जेष्ठानी घेऊन पाठविलें याचा अन्वय ध्यानास येत नाहीं होलकर मातबर सरदार हाती घेऊन या तिघा चौघानी ग्रथ रचिला त्यात ते ग्रहस्त आसता आपणाजवळ पत्र दिल्हें कसें ? यातील

---

१ सालाबादचे सालाबाचे　　+ ज्येष्ठ = दादासाहेब ?

अर्थ काय घ्यावा ? येक तर्क दिसतो राजश्री मोरोबा दादा व आपण येक होऊन घाट रचिलाच णाहे, तो सेवटास नेला पाहिजे जेष्ठाचा आमचा घाट काय होतो तो समजला पाहिजे, यास्तव ममतेंत सिरोन समजून घ्यावा त्याप्रमाणे परिमार्जनाची पैरवी होलकर वगैरे याजकडून करवावी हा येक प्रकार दिसतो ही गोष्ट जेष्ठ कल्पनेत आणितीलच अथवा स्वामी ह्मणिजे धनी यासी बइमानी करू नये असा पश्चात्ताप होऊन मार्गावर आले किंवा मोरोबा दादा यरत्यारीने कारभार करू ह्मणतात हीं धास्त कोणते विचारे आह्मास पत्र दिल्हे आहे याचा पुर्ता शोध लेहून आणवणे अथवा आह्मी तिकडे येऊ लागल्यास बापूस सशय होईल तो तोडावयाकरिता जेष्ठानीच युक्ति रचिली आसेल, ते सविस्तर समजले पाहिजे तो करारईद्दार आहे मत्रभेद करावयास चुकणार नाहीं मत्रभेद जाला ह्मणिजे नाशच जाणावा पुर्ता अर्थ लेहून आणवणे ह्मणोन सागितलें तर आशय कसा आहे तो आज्ञापिला पाहिजे × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev in acknowledging Nana's letters to Mahadji requests him on behalf of the latter to explain more clearly the purpose of the letters and the situation at Poona This evidently refers to the plot of Moroba Fadnis to arrest Nana and capture the Government

---

*NO 75* ] [ March 1778

श्री

विज्ञापना राजश्री नारो शकर वकील याचे पत्र बावास आलें कीं जेष्ठानी मजला बोलाऊन खलबतात सागितले, कीं राजश्री पाटीलबावानी पूर्वी मसलत सागितली ते समई आह्मी यैकिले नाहीं यैकितो तर इतके न लावते आता राजश्री बापूचे, आमचे व श्रीमताचे पत्र खिजमतगाराबरोबर बावास पाठविली आहेत, लौकर यावे ह्मणोन लिहिलें आहे तुह्मीही लेहून पाठवणे बावानी लौकर यावेसें करणे राजश्री बाळाराव गेल्यापासून काहीं कागदपत्र पाठवीत नाहींत कारण काय ? त्यानी कागद पाठवीत जावे व बावानी लौकर यावें यावरून बावानी व खिसिख व कास × यानी आश्चिर्य केले पत्राचे उतर देत नवते कासद मागो लागला म्हणोन लेहून दिल्हे जे, पत्र पाठविले ते पावले खिजमतगाराबरोबर श्रीमताचे व कारभारी याचीं पत्रें आलीं होतीं त्याचीं उतरे परभारा पाठविलीं आहेत येथे बावानी व सलाहकारानी आपले मर्जीचा अर्थ ध्यानास आणिला की बालार व कारभारात नसावे याचे पाऊल नीट सरल पडत नाहीं ही गोष्ट बावाचे वगैरेही दाखल्यास आली यावरून निश्चय केला आहे की यास दरबारचे कामात घालू नयेत नारो शकर दरबारी ठेऊ नयेत जेष्ठाची आपली गाठ पडल्यानतर त्याचे विचारे दरबारी कोण ठेवावयाचे ते ठेवावे असा घाट आजपावेतो चालतो असे आहे नारोपतासी खलबत जाले आसेल नसेल न कले येथें वाढऊन लिहितात हे आश्चिर्य करितात असाच क्रम चालल्यास आह्माकडे लटिकपण आणितील की जेष्ठाचे बालारायाचे वाकडे नाही हे समजवितात असें म्हणतील मध्यच्छही लबाड पडोन पुढे बोलणे खुटले बाहेर बाहेर लोकास बालाराव विचारितात की नारोपताचे मनात आम्हासी सलूक करावा न करावा असे आहे दोन वेल मागें सलूक जाले आताही करावा असें यैकतों प्रमाण कशावरून मानावें ? बोलावयास येतील तेव्हा कलेल कदाचित आलेच तर ज्याचे वचनास प्रमाण

---

× खिशिख ह्मणजे मुसलमान राणेखान असावा पण कास हा कोण ? मोडी वाचनात चूक असेल

नाहीं त्याचे सख्य करून सार्थक काय ? मागे दोन वेळ शपथाक्रिया जाल्या दुसरे रोजीं विसरलें तेच पुढें येईल × तूर्त सख्य करून अर्थही दिसत नाही त्यासी सत्य केल्यास आबा व कास व विशिख याचे चितात सशय येईल जे करणे ते तिघाचे विचारे करावे लागते धोंडोपताकडील कारकून आला आहे म्हणऊन रावजींनी बावास सांगितले तेव्हा बावानी त्यास पुसिले की तुह्मावा। गोपाळनाइकाकडील कारकून आला होता तो कोठे आहे ? त्यानी उत्तर केले की आला होता, दोन दिवस राहून परभारे गेला, ह्मणऊन उतर केले पुढे बोलणे काही जाले नाही हाली कार कून याचे ठिकाण आबा व विसिख व कास लाविणार याउपर होईल वर्तमान ते लेहून पाठऊ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना आबास स्वामीच्या लक्षात लाऊन घेतले त्यास कारभार करावयाची उमेद आहे दिवाणजीसी व त्यासी परभारे लाऊन दिल्ही आहे याउपरी होईल ते विनवीन हे विज्ञापना नारो शकर यासी आतील मार बोलणे ते विचारूनच बोलण्यात यावे हे विज्ञापना

☞ This is probably Naro Shivdev's letter to Nana Fadnis informing him of the secret correspondence and intrigues going on between Raghunathrao Dadasaheb, Mahadji & some others

---

*No 76* ] [ 5 April 1778

श्री

सेवेशी विनंती सेवक नारो सिवदेव कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना ता छ ६ रबिला वल स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष करवीर येथील तह ठह-रला चिकोडी मनोली दोन्ही परगणे याच्या सनदा येसाजी सिंद्याने द्याव्या, व वीस लक्ष रुो खडणी करार जाहाली पौ तीन लक्षाची निशा नख्ती द्यावी बाकीच्या यैवजात वोली × द्याव्या आपणाकडील जिवाजी गोपाळ वगैरे पाडाव कोल्हापुरात गेले आहेत ते द्यावे याप्रमाणें करारात आले कराराप्रमाणें चिकोडी मनोलीच्या सनदा व तीन लक्षाची निशा बाकीचे यैवजाच्या वोली व आपले पाडाव ग्रहस्त सुधा निर्गमात आले ह्मणजे राजश्री पाटीलबावाचे कूच होणार याउपरी होईल वर्तमान ते सेवेसी विनती करीन + तीन लक्षाची निशा व वोली व पाडाव ग्रहस्त गेले आहेत, हे येका दो दिवसात येऊन निकाल पडावे याप्रा ठरले आहे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports an end of the Kolhapur compaign by a treaty of peace having been concluded by which twenty lacs Rs fine, and the posts of Manoli and Chikodi, were to be handed over to the Poonaits Kolhapur to grant hostages until the terms are executed ( See Modak's Histroy of Kolhapur p 70 )

---

× ओलीस, Hostages

२

# माहादजी शिंदे

*No 1* ] [ 3 March 1774

श्री

विनती सेवक तुकोजी होलकर कृतानेक दडवत विज्ञापना ता। फाल्गुण व॥ ५ येथास्थित असो विशेष इकडील सर्व अनकूळता होऊन आपली मार्गप्रतीक्षा आहे तरी या दादानी पत्र पाठविले आहे आमचेही पत्र सेवेसी पा। आहे श्रीचा प्रसाद पा। आहे हा घेऊन स्वार त्वरेने होऊन आह्मास सामील व्हावे कोणेविसी सशये आह्मा उभयेतात राहिला नाहीं एकत्र जालो आपण जलद येऊन पावावे सेवेसी अतर आले नाहीं पुडे होणार नाहीं उघडेपणात येथे बाकी राहिली नाहीं आपण क्षणाचा विलब सर्वथा न करावा × सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति +

☞ Tukoji Holkar requests the addressee to come quickly and join him Tukoji is in Malwa at the time

---

*No 2* ] [ 22 June 1774

श्री

पौ छ ३० साफर *

श्रीमत मातुश्री बाईसाहेबाचे शेवेसी –

विनती सेवक तुकोजी होलकर कृतानेक विज्ञापना येथील कुशल जेष्ठ शुध्य ११ साहेबाचे कृपादिष्टीकरून यथास्थित असो विशेष आपणाकडून च्यार पत्रें समागमें आली ते पावोन सतोशावाप्ति जाली लेखनार्थ कळों आला येसियासी श्रीमत राजश्री दादासाहेब याचे आगमन इदुरास जाल्या उपरी त्यासी कित्येक प्रकारेंची भाशणें करून देसी यावयाचे निश्चयात आणून येथून कूच करविलें आहे आमचें लक्ष हेंच कीं सर्व गोष्टीचा बदोबस्त होऊन राज्य येथास्थित चालावें इतर विचार जाणत नाहीं × सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Tukoji Holkar assures Gangabai of his full support in her plans and informs her that he was persuading Raghunathrao to return to Poona

---

*No 3* ] [ 17 August 1776

श्री

विज्ञापना काल पाडेश्वरच्या मुकामी पत्रें चिरजिवाची आली, त्यावरून स्वामीचा मुहूर्त पचमीस किल्यास यावयाचा कळला, आणि श्रीमताचे दर्शनाचा निश्चय राजश्री पाटीलबावाचा जाहाला यास्तव श्रीमत राजश्री बापू यास पत्र पाडेश्वराहून पाठविले उदईक रविवारी दर्शनाचा

---

× अशा खुणेचा अर्थ अक्षर वेगळे असा समजावा + शेवटी मोर्तब सुदचा बदामी शिक्का

* नाना फडणिसाचें हातची अर्थात बाईसाहेब ही सवाई माधवरावाची आई गगाबाई होय.

प्रसग आहे आगोधर मी सेवेसी येईन ह्मणोन विनती लिहिली होती जासुदाने किल्यावर पत्र नेऊन दिल्हे त्यास आज्ञा जाली जे, सिंद्याकडील राजश्री नारो शकर याजबरोबर उतर सागोन पाठवितो कुभारवळणाचे पूर्वेस मुकाम आज शनवारचा जाहाला तेथें राजश्री नारो शकर आले त्यास प्रथम पाटीलबावाकडे गेले जाबसाल कार आसतील ते उरकोन सासवडास जावयाची आज्ञा घेऊन आमचे राहोटीस येऊन वरकड वर्तमान काहीं सागितले नाहीं पत्राचे उतर बोलले जे, तुमचे पत्र आले ते श्रीमत बापूनी आम्हाजवळच दिल्हे आणि तुम्हास आज्ञा केली की सर्वासमागमे भेटीच्या प्रसगास येणे यैसे उतर आले × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ The writer and the addressee are not mentioned The letter refers to Mahadji s visit with the boy Peshwa at Purandar That visit took place in the month of August 1776 and hence the date of the letter

---

*No 4* ] [ 30 June 1774

श्री

छ २४ रावल वैशाख मास

राजश्री हरिपत तात्या गोसावी यासी–

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य श्रो माहादजी सिंदे दडवत विनति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करावे विशेष पेशजी आपणाकडे पत्रें पाठविलीं होती कीं श्रीमतानीं देशास चालावयाचा निश्चय केला कार्ये जावसाल निश्चयाचे बोलणे राहिले ते निर्गम करून लेहून पाठवितों ह्मणोन लिहिले होते श्रीमतास मुतसद्याचा वसवास बहुत, जिवाचे भय परतु तीन वाटे जाबसाल उरकले होते चतुर्थांश राहिले ते निश्चयात आणून आपणास लेहून पाठवावे आणि कूच करावें इकडे श्रीमताचे कूच सेंधव्याचे रोखे करावें, इतक्यात आपली पत्रें राजश्री गुरुजीस व सरदारास आली ती सेमरूडचे घाटात श्रीमताकडे धरली गेली त्यात लिहिलें होते जे यादी तुह्मी पाठविली त्यात दिकती आढळल्या त्याचे मनसबे सुधरावयाचे प्रकार आवल पासून लिहिले होते यामुळें श्रीमतानी [1]बावर खाइला मागती तहावर जाबसाल अणावा लागतो, याकरिता विलब लागला पहिले पत्रानतर निश्चयाचे कागद आपणाकडे गेले नाहीत ह्मणोन सशय येईल तर येऊ न द्यावा मसलत फार दिवसाची बिगडलेली येकाएकी कशी सुधरते हें आपणास न समजेसे नाहीं येका दो दिवसात मागती तहावर आणून निश्चय लेहून पाठवितो तवपावेतो आपला मुकाम आसेल तेथेंच आसावा रा छ १८ रावल × बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनती

☞ Mahadji Sinde asks Haripant to halt where he was, lest Raghunathrao may be scared away

---

*No 5* ] [ 30 August 1776

श्री

विनती उपरी पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर सविस्तर कळला

सिंदे होलकराकडील फौजेचा मजकूर लिहितात, त्यास होलकरास फार सागितले आहे व सिंदे यास दोन पत्रें लेहून मुजरद कारकून रवाना केला व त्याजकडी नारो शकर कारकून याजकडून निकडीची पत्रें लिहिविली आहेत सिंदे याची काही तरा फौज येईल होलकराकडील फौजेविसी

---

१ बावरणें, गोंधळणें

खटपट करीत आहे हरिपंत याच कामात आहेत सिवाजी विठल याजवळ हरिपंत बोलत आहेत. आज उद्या हरिपंत येथे येतील काय ते लेहून पाठऊ परंतु सिवाजी विठल याजवळ जमाव नाही. जातीनिसी आहेत, कसे जातात तत्राप निकडीची खटपट करितो

इग्रजाकडील कुमकेविसीच मात्र तूर्त बोलावयाचे केले आहे ह्मणोन लि।। ते कळले. उत्तम आहे सिंद्यास गगथडीस येक कुरण ताकपिराकडील देविले, दुसऱ्याची मोघम सनद देवितो ह्मणोन लिहिले उत्तम आहे

सदासिवभट दात्ये * याणी येथे येऊन वरचेवर जावे भिवराव [ याणी ] लौकर गेले पो. किंचित ज्वर निघाला म्हणजे पाठवावे

गणेशपंत बेहरे यास निकडीची पत्रे गेली आहेत आज उद्या सोनगडास दाखल होतील पुढे दरमजल जातील

रा छ १५ रजब × चहूकडे त्वरा करावयाची ते करीतच आहो होईल ते खरे हे विनंति

☞ This is Sakharam Bapu's letter addressed probably to his agent Mahadajipant Guruji approving the measures he had taken for the settlement of the demands of Mahadji, who was being coaxed to lead an expedition against the pretender Hence the date

---

*No 82* ] [ 27 August 1776

श्री

पो छ १२ रजब सबा[1]

विनती उपरी मेघफरसन[2] आला सविस्तर बोलणे जाले ते सविस्तर लिहिले, त्यावरून कलले यैशास जितकी उतरे केली तितकी समर्पक आणि खरीच आसी केली फार चागले जाले त्याचा सशय तोडिला बरे केले तोतया कोठवर्ता येतो ! त्याचे मते वीस हजार माणूस मिळाले तेन्हा तो जबर्दस्त आसे भासले परंतु ती माणसे तृणासारखी आहेत हा अनुभव त्यास नाही आसो एकदर त्याचे प्रतियास येईल मुबईकरानी लबाडी केली त्यास याउपरी त्याणी माहाल जबुसर सोडावे कराराप्रो केले नाही तेन्हा बारा लक्ष कोठून द्यावे ? आह्मास मसलत दुसरी पडली, अथवा रुपये द्यावेसे जाले तरी तीन लक्षाचे माहाल त्याणी मागू नयेत, हाही प्रकार आहे याचा विचार माधवरायास पुसावे विचारे जाले तरी बोलावे जबूसर त्याजवळ आहे तेन्हा पैकाही ते मागणार नाहीत याचा विचार करून बोलावे कलकतेकरानी कुमक करावी प्रसग पाडिल्यास हे उत्तम आहे, परतु मागतील काम हें न कले जालेच तरी चेनपटणकर जवल आहेत ते आणावे हैदरासुधा दादाचे पारपत्य करावे ही गोष्ट जरूर व्हावी रा छ १२ रजब हे विनंती

☞ Sakharam Bapu expresses his satisfaction to Nana Fadnis for the friendly relations the latter had established with Mac-

---

* हा पराजपे सावकाराबरोबर तोतयास सोडण्यात सामील होता येथून पुढील अक्षर सखाराम बापूचे

१ पो नाना फडणिसाच्या हातची पत्र सर्व सखाराम बापूच्या हातचे

२ Sir John Macpherson was in the employ of the Nawab of Carnatak and being a friend of Warren Hastings seems to have been befriended by Nana Fadnis

pherson who seems to have met Nana Fadnis about this time Macpherson at this time was not in British employ

---

*No 83* ] [ 30 October 1776

श्री

पौ छ १८ रमजान सबा

विनती शेवक नारो सिवदेव सा। नमस्कार विनती ता। अस्विन वद्य ४ बुधवार साइंकाल च्यार घटका दिवस सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष मंगलवार रात्रीचे पत्र पा। ते पावले असेल भिवराव व विसाजीपंत याजकडील काही बातमी न कळे, याजकरिता ते गेले त्याचे मागे पाटीलबावा यानी फौज तीन हजार काल त्रितीय प्रहरी रा। केली ते पनवेलीस पोहचून त्याचे पत्र आज प्रहर दिवसा आले लोक पुढे लावले याजकरिता कूच करून आज खालापुरास बावा आले येथे त्रितीय प्रहरी पत्रे दोन येकसमईच आली त्याच्या नकलाच करून पाठविल्या आहेत पुढे न यावे ह्मणून लिहिले त्याजवरून मु॥ येथेच करून राहणार बुनगे पाठीमागे टाकिले होते ते येथे आणविले यानी फौज पाठविली ती भिवराव याजपासी पावली बुनगे विसाजीपंताचे लुटले गेले ह्मणऊन पत्री लिहिले आहे त्यास जासूद पत्र घेऊन आले, त्यास पुसले त्यानी सांगितले की गाडदी चालता थकले ते मागून येत होते त्यासी गाठ पडल्यावर तोतयाकडील असतील या प्रमाने कटकट जाली दोनच्यार माणसें जखमी जाली पानसियाकडील तहकीक जालेयावर वस्तभाव त्याचीत्यास दिल्ही याचे फौजेत जाधवाकडीलही दोन राऊत होते त्यानीही लुटले होते तेही त्याजपासून घेतली ह्मणऊन जासूद जबानी सांगत होता बुनगे काही लुटले नाही उभयता पुढे गेले त्याची बातमी वरचेवर कळत जाती त्याप्रा। लोकास समजले असतें ह्मणजे इतके न होते आता याचा फौज त्याजपासी पोहचली, बंदोबस्त येथूनही जाला राजश्री राघोपंत यास बोलाऊन आणून मुलकास ताकीददार घेऊन मुलूक राखणे ह्मणून सांगितले त्याजवरून मार्‍रनिलेस बावाकडे पाठविले त्यानी पनवेलीस मात्र पाच स्वार घेतले ते आज गेले तो फौज अगोधर पोहचून चुकली तेथील वर्तमान काय जाले असेल ते पत्र आलेयावर समजेल वरकड गावगनास ताकीद देत होते, घेतले नाहीत दाहा कोस गाव कोणी वस्तीस राहिला नाही ह्मणतात वस्ती तो नाही ताकीददार असल्यास लोकाची घरे बाचली जाती सेवेसी विदित असावे यास्तव लिहिले आहे पत्राची उतरे यावयास अवकाश पडतो ती लौकर यावयाविसी आज्ञा पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना बावाकडील फौजेत पीरखान व मोरे वगैरे पतके तीन हजाराचे गेले आहेत हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports details of the pursuit of the pretender by Mahadji Sinde near Panwell

---

*No 84* ] [ 2 November 1776

श्री

विज्ञापना राणेखानभाई व राजश्री बाळाराव फौज सुधा तोतयास आणावयास कुलाब्यास रवाना जाहाले त्यासमागमे सेवकासही आज्ञा जाली तयारी जाली तों राजश्री मोरो बापूजी फडके व राजश्री बाबाजी बरवे आले भेटी हाऊन खुलासा त्याचा कळला जे, राजमाचीचे अनुसधान आह्मीच राजश्री भिवराव यास आणून दिल्हे आणि सुवर्णदुर्ग, अजनवेल वगैरे याचीही सूत्रे करावयास जावे च्यार पाच रोज त्याजवळ राहिलो परंतु त्याच्याने साहित्य न जाले म्हणोन

पाटीलबावाकडे आले यानीं काही फौज देऊन उदईक आमची रवानगी करावी हेही काम जरूरचे जाणून कुलाब्यास न गेलो उभयतास पाटीलबावाकडे नेऊन बोलणे करून दिल्हे छ १९ रमजानी उभयताची रवानगी जाहाली गादव्याचे पथक दोन आडीचसे रावताचे समागमे नेमून दिल्हे. छ मजकुरी कोस दीड कोसावर मुक्काम केला पुढे गेले आसतील × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

☞ The writer, probably Naro Shivdev, reports that Mahadji was arranging to gett he pretender into his own custody from the hands of Raghuji Angre

---

*No 85*] [3 November 1776

श्री

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २० रमजान रविवार प्रहर रात्री मुकाम मौजे खालापूर सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री भिवराव येशवत याचे पत्र राजश्री पाटीलबावास व सेवकास आज आले तात्पर्य की तोतयाचा मनसबा आटोपला, श्रीमत राजश्री दादासाहेबाचा मनसबा आटोपावा, वसई पलीकडे तारापुरावर आले आहेत त्याजवर जावें हा भाव त्यावरून पाटील बावास विनती केली जे, तोतया हातास आला पुढें विचार काय ? तोतया आपणाजवळ आल्यावर कदाचित् आपण पुण्यास जावयाची मसलत केली तर हा प्रात रिकामा पडला श्रीमत तारापुरावर आहेत इकडील किलेकरी भयभीत आहेत एखादे मातबर स्थल श्रीमतास वश जाल्यानतर मसलत वाढेल याची वाट काय ? श्रीमताचा वेध असता आपण गेल्यास पेच पडेल तोतयापेक्षा हे विलग जाईल तेव्हा रक्षणास पाच हजार फौज ठेवावी लागेल यैसे विचारिले पाटीलबावानीं उत्तर दिल्हें जे, आह्मी येथून कूच करून श्रीमताचे सुमारें दोन मजली गेलों वर्तमान त्यास कलल्यावर भडकतील हेहि ठीक नाहीं आजपावेतों मनसबे कर करून दमून आहेत फिरून भडकावणे युक्त नव्हे आटपले आहेत त्यास युक्तीने मेलऊन घ्यावे पूर्वी राजश्री नानानी सागितले होते जे, श्रीमताकडे ग्रहस्थ पाठविला आहे त्याजकडील जाबसाल काही आला न आला राजश्री बाबूजी नाईक काही बोलतात ह्मणोन यैकतो होलकराचे विद्यमाने काही जाबसाल आला आसेल येकून कोणीकडून सूत्र आले आसिले तर दार मदार करून मेलऊन घेऊन मसलत आखर करावी हें उत्तम आह्मी त्याचे सुमारे जाऊ लागल्यास ठरून राहाणार नाहीं तच तसीच मर्जी असल्यास तेच करू परतु गेल्यास मागे, ते पुढें यास्तव गीर्दा * जावे हे बरे नानानी ग्रहस्त पाठविला, त्याचे विद्यमाने व नाईक अथवा होलकर याचे मारफत जाबसाल होतच नाही किंवा होतो तो सोईचा नाहीं, असे आसले तर आणिखी कोणीकडून जाबसाल लावावा आह्मास सागतील तर आह्मी कारकून पाठऊन श्रीमताचे हृद्गत मनास आणू याचें उत्तर दो रोजात राजश्री नानाचे आणवणे लिहिताल त्याप्रमाणें वर्तणूक होईल म्हणून त्यावरून विनती केली आसे × परस्पर यैकिल्यात आहे कीं साबाकडे × कागद गेला आहे पुर्ता शोध मनास आणून विनती लिहीन तोतया हातास आलेयावर लौकरच पुणेयास यावयाचाच निश्चय आहे याजकडून साबाचा प्रकार करावयाचा नसला तरी फौज दोन तीन हजार वसईच्या सुमारे आल्यास या प्रातात साब येणार नाहीत तोतयाकडे मिळाले होते यास्तव बदोबस्त जाल्यास बरा सुचले ते विनविले आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports to Nana his conversation with

---

* चहू बाजूनीं × म्ह रघुनाथराव दादाकडे

Mahadji, who having secured the pretender intended returning to Poona He said if he proceeded towards Bassein in pursuit of Raghunathrao, the latter would run away and create fresh trouble It was advisable therefore to conciliate Raghunathrao by peaceful means

---

*No 86* ] [ 5 November 1776

श्री

सेवेसी विनंती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २२ रमजान मगलवार प्रहर रात्री मुकाम खालापूर सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री बालाराव व राणेखान भाई तोतया आणावयास कुलाब्यास राजश्री राघोजी आगरे याचे बोलावण्यावर गेले नागोठण्यास पावले तेथे वर्तमान येकिले जे मुबईहून इग्रजाचे पत्र राघोजी आगरे यास आले जे तोतया आह्माकडे येत होता तो तुम्ही फिताऊन नेला त्याजला आह्माकडे पाठऊन देणे हे येकून त्यानी वर्तमान राजश्री पाटीलबावास लेहून पाठविले नागोठण्याहून निबाजीपत कारकून बालारावजीनी कुलाब्यास पाठविले त्याचे पत्र रावजीस आले तेच बजिनस रावजीनी पाटीलबावाकडे पाठविले ते पत्रेच बजिनस बावानी सेवेसी पाठविली आहेत त्यावरून श्रुत होईल रावजी व भाई आज नागोठण्याहून कूच करून कुलाब्यास गेले वर्तमान येईल ते विनंती करीन इग्रजाकडील पत्राचा लढा दरम्यान आल्याचे वर्तमान लवकर स्वामीस पावल्यास इग्रजाचे वकिलाची पत्रे मुबईकरास जातील, त्वरेने बदोबस्त होईल याजकरिता विनंती केली असे या बदोबस्तास दिरग लागता नये आगरे यास पत्र इग्रजाचे गेले, हा आशय पत्री न येता त्याचे वकिलाची पत्रे इग्रजास जावी व आगरे यासही सरकारचे पत्र जावे यदर्थी राजश्री पाटीलबावानीही पत्र स्वामीस लिहिले आहे त्यावरून विदित होईल × आगरे यानी तोतया स्वाधीन करून दिल्यास इग्रजाचा उपद्रव त्यास न लागे असे जाले पाहिजे पत्रे येऊन इग्रजाचा बदोबस्त जाल्यास येथून निकाल लौकर पडेल मुलकाचा बदोबस्त होऊन येईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev requests Nana to represent to the Govt of Bombay not to interfere with the capture of the pretender effected by the Angria

---

*No 87* ] [ 27 November 1776

श्री

पौ छ १६ सवाल

सेवेसी विनंति सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। कार्तिक वद्य २ बुधवार साइकाल मु॥ मौजे भोसरी सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष कासदाबरोबर विनतीपत्राचे उत्तर पाठविले ते पावले आज्ञा जे शुक्रवारी पुण्याजवळील मुकाम व्हावा शनिवारी भेटी होतील ह्मणून येशास राजश्री पाटीलबावाचे चिठीचा जाब याच अन्वयें होता व सेवकानेही विनती केली त्यास आज्ञेप्रमाणे शुक्रवारी मुळातीरी मुकाम नेमिला उदईक गुरुवारी मी सेवेसी येतो × तोता आणिला मैना लौकर आणवावी ह्मणऊन बावानी चिठीत स्वामीस लिहिले ते ध्यानात

येईल न येईल यास्तव सविस्तर त्याहावयास सांगितले त्यास तोतया हा तोता व मैना ते पराजपे याचा वियोग जाला होता त्यास तीही लौकर यावी सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev communicates to Nana the appointment of his ( Nana's ) visit with Mahadji Sinde There is a humourous tinge obout the pretender and his supporter, the wife of Ram chandrapant Paranjpe

---

*No 88* ] [ 28 November 1776

श्री

विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना तोतया व शिवजीपत* व धोंडोपत+ बेड्या घालावयाच्या यास्तव तीन बेड्या सरकारातून आणवणे म्हणऊन राजश्री पाटीलबावा यानी सांगितले, याजवरून विनती लिहिली आहे तरी आज्ञा होऊन बेड्या तीन येत ते जाले पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev requests Nana at the instance of Mahadji to send three shackles for the pretender and his companions

---

*NO 89* ] [ 17 December 1776

पौ छ ५ जिलकाद सबा

श्री

विनती उपरी रामचद्र नाईक, आपाभट, रामचद्र नाइकाची बाइको, याचे रुजुवातीचा प्रकार आपण लि।। तो कलला राजश्री बापूजी नाईक वानवडीस आले राग भरोन जात होते आपण जाऊन समजावीस केली ह्मणोन लि।। ते कलले उतम आहे तोतया त्याणी पाहिल्यावर खोटा असी त्याची पुर्ती निशा जाली उतम आहे रा। छ ५ जिलकाद + बाईचा प्रकार लिहिला त्यास तोतयाच्या पारपत्यास विलब न करावा उपरात बाईसही सागून पाठऊ आथ गुता ठेववणे ठीक नाही रा। छ मजकूर हे विनती

☞ Sakharam Bapu urges Nana to finish up the affair of the pretender by carrying into execution the culprit's punishment without delay

---

*No 90* ] [ 9 October 1776

श्री

पौ छ २५ साबान सायकाल

सेवेसी नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २५ शाबान बुधवार मु।। विठलवाडी सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष छ २४ चे पत्र सेवकाकडील जासुदाबरोबर आले,

---

* शिवाजी अप्पाजी पराजपे रामचद्र पताचे कुटुबातला धोंडोपत पुरदरे × येथून पुढील अक्षर सखाराम बापूचें नाना फडणिसाच्या हातची पैवस्ती

काल्च दो घटिका रात्री पावलें. सिंहगडची दोन तोंडे दक्षण उतर राखिली पाहिजेत त्यास राजश्री तुकोजी होळकर यास ताकीद जाली, फौज जमा जाल्यावर विचार करावयास येईल पुण्यातील गृहस्ताचा अत लागत नाहीं याचा विचार करावा राजश्री पाटीलबावास उचित आहे दारूगोल्याविसी सनद राजश्री जनार्दन अपाजीस पाठविली आहे, त्याप्रमाणें घेऊन देणें राजश्री हरिपत मूहूर्तेकरून निघाले काहीं फौज जमा जाली ह्मणजे येतील ह्मणून आज्ञा, यैशास दारूगोल्याची सनद राजश्री पाटीलबावास दिल्ही आज्ञेप्रमाणे वर्तमानही सागितले उतर जाले जे सारे मडल जवल असता तोतयाचे लोकानीं किला घतला तो चढे घोडे कसा येतो ! बदी केल्याने वऱ्हील लोक वेधात राहातील दम धरून राहिलेच तर पुढें त्याचा विचार करावयास येईल बदी न जाल्या मोकळे राहिले आज वर्तमान पुण्याहून आले जे सिंहगडचे लोकानी स्वारी करून विसापूर टोकले चौघटिका रात्री वर्तमान यैकिले, सिवापूर नव्हे राझ्यावर दगा केला दोन्ही वर्तमानें पुण्याचीच उद्या खरे खोटें कलेल खोटे जाल्यास उतमच जाले खरे जाल्यास गोष्ट वाईट फौजा व धनी जवल असता किला घेऊन मुल्क मारू लागले तर शेर होतील रयतीवर दाब त्याचा बसेल किल्यावर सग्रह होईल याजकरिता बदी लौकर करणे सलाह आहे सुस्ती होऊच नये पुण्याचे लोक दुलग याचा विचार आह्मास करिता येत नाहीं ही गोष्ट खासा उभयता अगर राजश्री हरिपत तात्याखेरीज होत नाहीं तात्यानी तऱ्ही लवकर यावे त्याचे विचारें पैरवी केली जाईल पुण्याचे लोकानीं सध्याकालच्या सौ घटिका दिवसास पुरधरची मनस्वी अवाई उठविली राजश्री भिवराव पानसियासी तेतयाचे लोकासी लडाई जाली भिवराव निघाले यैशा गपा उठविल्या भिवराव याचे वर्तमान काल किल्याहून मारनिलेचे पत्र आले त्यावरून कलले किले पुरदरचें बजिनस तुमचे पत्र आलें आसे असता लटक्या गपा मारितात यावरून तर्क काय करावा ! × लबाडीच्या खबरी उठवितात याचे ठिकाण लाऊन पारपत्य करावे, असा मनोदय याचा आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev acknowledges letters from Nana and says in reply that Mahadji Sinde was trying to recapture Sinhgad from the supporters of the pretender

---

*No 91*] [3 December 1773?

श्री

पुरवणी स्वामींचे सेवेसी—

जकडील हजार स्वार व पाचशे गाडद् वासीचे * सुमारे ठेविले आहेत की पेंढारी लष्करात येऊ न द्यावे खासा नबाब बहुत उपद्रवामुळे हैराण आहेत फौजेत आपसफितूर जाला याजमुळे पत प्रधानाचा जाबसाल लौकर उरकून द्यावा आणि हैदराबादेस जाऊन पोहचावे विश्वास कोणाचा पटत नाही आज तिसरे प्रहरी वकिलाच्या भेटी होणार आहेत याप्रो पत्र गुरुवार प्रात. काल च्यार घटका दिवसाचे लिहिले आहे त्यात मार लिहिला आहे आज पेंढारी याणी आठ घोडी मोठी व दाहा तटे व दोन उट मोगलाचे लष्करचे घेऊन आले बळवतराव मुढे याचे स्वारानी रा दादाचे लष्करचे कहीचीं तटे धरून नेली होती ती आज झाडून सोडून दिल्ही याणी आपली वोळखून घेतली लोकाचा गवगवा बहुत आहे आज पच दिवस दादा अगदी जेवीत नाहीत येथे पाणी केवल याचे लष्करास कमी आहे याजमुळे येथून कूच होऊन चागले

---

* औसा ?

पाण्यावर मुक्काम करविल्यास चिंता नाही, असे दादा बोलत होते दाण्याची पेवे बहुत निघतात साहा पायली जोरीची धारण जाहाली आहे वरकड जिनस बहुत माहाग नाही कळावे गा छ १८ रमजान गुरुवासर सायकाळ दोन घटका दिवस सेवेसी रुजू होय हे विज्ञापना ?

☞ This is the second sheet of a news-letter addressed to Nana Fadnis, probably from the camp of the Patwardhans who had accompanied Raghunathrao into Karnatak The Dada mentioned in the letter may be Raghunathrao Dada Patwardhan ( See Khare Vol 5 No 1313 )

---

*No 92* ] [ End of 1776

श्री

राजश्री उभयेताचे सेवेसी—

विनती उपरी रत्नागिरीत तोतयाचे वर्तमान मनस्वी उठले होते त्यास रा। रामचद्र नाईक याणी मिरजेहून कारकून पा।, त्याचें पत्र आले की पका बदोबस्त आहे बेडी आहे त्यास मनस्वी वर्तमाने मृषा म्हणोन लि।। त्यास आपण लि।। त्यापरीस आधिकोतर वर्तमाने जे कोणी दोन लक्ष फौ पुणियाहून व पालखी चवरी ऐसी पा। परतु आपलें पत्र नाही तेव्हा सर्व मिथ्या ज्यापक्षी मसलत लाबली आणि भय कोणास नाही, त्यापक्षी नानाप्रकारे उलवणे* उठऊन आपली मर्जी बकरम+ करून घाबरे करावें असो ईश्वर समर्थ आहे हे विनती

☞ The writer informs the two Poona Ministers of the various reports and rumours flying about the country in connection with the rebellion of the pretender

---

*No 93* ] [ End of 1776

श्री

यादी—

मोरो बापूजी याजकडून मोरभटजी आले होते बापूजीपताचा शोध लागेल म्हणोन आले आठ पधरा दिवस होते तोतयास पुसिले की पाणिपत जाल्यावर बापूजीपतास पाहिले होते की काय ? त्याणे सागितले की पाहिला होता तो मागे सुवर्णदुर्गास त्या नावचा येक गृहस्त आला मग तिकडही पळोन गेले

कृष्णभट वैद्य रत्नागिरीहून तीर्थरूपाचे पत्र घेऊन श्रीवर्धनास आले होते त्या पत्रातील मजकूर तर हे बहुत थोर विद्वान आमचे स्नेही आहेत इतकेच लिहिले होते अणखी काही मजकूर होता की काय ते स्मरणात नाही व भटजी च्यार पाच दिवस होते नित्य ऐकावे त्याचे गावचे काम होते व आणखीही रुपये लोकापासून घेतात याचा उपसर्ग न लागावा म्हणोन आले होते वरकड तोतया खरा की खोटा हे काहीच बोलले नाही याशिवाय भटजी म्हणत होते की माझी भेट तोतयाची होईल की काय ? तेव्हा मी म्हटले आपण याल तर भेट होईल येकाद वेळ म्हणावे

---

× उल्वण= embarrassment, disorder, ( Molsworth ) + बकरम=नि सत्व, नि शक्त

माझी भेट कशास ? मी तुम्हासच भेटावयास आलो होतो परतु अजुन भेटले नाही. च्यार पाच दिवस येत होते याखेरीज कृष्ण भटजी याजवल तीर्थरूपाचे पत्र घेऊन आले तेव्हा सदरहु वरते लेहोन दिल्हे आहे याशिवाय वडिलाचा निरोप की तोतया खोटा तुम्ही याचे भरीस पडो नका आमचा काही याजवाचून खोलवा नाही तुम्ही उठोन रत्नागिरीस येणे यैसे भटजीनी आपल्यास सागितले नाही भटजी गावचे व रुपयाचे रद्बदलीस्तव पत्र आणिले व आपणही आले थोरल्या तोतयाची गोष्ट बोलले नाही बापूजीपताचा तोतया खोटा म्हणोन सागितले

भटजीनी आपल्याजवल सागितले की वडिलानी सागितले की आम्हास काही रुपयाची आशा नाही तुम्ही घरी आलेत म्हणजे फार आहे खोटेपणाचा सदर्भ बोलले नाही मी चिंतेत पडिलो आहों यैसे तीर्थरूपानी सागितले म्हणोन भटजी बोलले

☞ During the inquiry about the conduct of the various persons who had joined the predender, the confessions of several were obtained, of which the above is a sampl3 Moro Bapuji is a nehhew of Haripant Phadke, son of Bapujipant who had died at Panipat

३

# पुण्यांतील वायघाटी

*No 94* ] [ 6 April 1778

श्री

विज्ञापना दिनचर्या वर्तमान वगैरे हरि बावाजी धारवाड प्राती गेले त्याचें पत्र आले व लस्करचे लोक कोन्ही आले वर्तमान की चित्रदुर्गवाल्याच्या भेटीस जात व्होते वाटेस घाट व्होता तो बरवे व टिपू याणी येऊन धरला वीस हजार फौज व काही पायदळ व्होत मग याणी चालून घेतले दोन हजार घोडी आनली दोन हस्ती येक दोन तोफा आनली मानसे बहुत मारली काही ब्राह्मन चवघे व सरदार मुसलमान पाच सात धरून आनले मारले बहुत हैदरखान मागे होता हे वर्तमान कळताच आपले स्थलास गेला हे चित्रदुर्गास पोहचले येणेप्रमाणे दिनचर्या दुसरे ह्मनतात की श्रीमत राजश्री मोरोबा दादा वगैरे भेटी जाल्या व्होळकराच्याही जाल्या येणे प्रमाने ह्मनतात आबाजीराव प्रतिनिधि विशालगडकर छ ७ माहे रबिलावली येथ येनार येका दो दिवसा फडच्या व्होन कूचे व्होणार पुढे व्हाईल ते लिहिन्यात येईल नजेफखान जयेपूर पावेतो आला ह्मनतात पुडे अजमिरास येनार येसे पत्र जाट याजपासी आहे त्याची पत्रे आली कोन्ही ह्मनतात की दिलीअलीकडे दोन मजला आला सत्ये असत्ये न कळे छ ७ माहे राबिलावल हे विज्ञाप

☞ This newswriter, probably Dhondo Bhivrao, gives all hearsay news, one item of which is the severe defeat inflicted upon Haider near Chitradurg by Haripant Phadke

---

*No 95* ] [ About 25 April 1778

रोजी पाटीबावापासी येकात दोन घटिका करून स्वार जाले मग पुन्यास गेले किंवा कोनीकड गेले हे कळल नाही दिढा महिन्याउपरातिक आले होते तीन दिवस राहूण स्वार जाले छ २६ रोजी राघो मलार व पाटीलबावा बालाराव येकात बसले दोन घटिका येकात जाला दाहा हजार रुपये राघो मलार यास लग्न करावयास देविले वचेन घेतल की आह्मासी बदमामली करू नये छ माहे रबिलाखरी स्वार होऊन पैठनास लग्न करावयास जानार भोसल्याकडील वकील माधोराव[1] नामे येथ आले पूर्वीही होत्येच केशोपत नामे वकील याचे श्रीमतापासी सुरतेमधे होते ते च्यार महिने गावास गेले होते कोन्ही ह्मनतात की गावास गेले होते कोन्ही ह्मनतात की श्रीमताकड गेले होते येसाजी सिंद्याकडील सूत्र लागली आहेत रो गुरुजी येथ आले, तेव्हा हजार रुपये खर्चास दिल्ह मागती पाचसे दिल्हे खर्चासिवाय क य दिल्ह हे कळल नाही काही दिल्ह ह्मनतात छ २४ रोजी रामचंद्र गणेश याचा वकील कारकून पाटीलबावाकड आला व्होळकराच याच चितसुधेता होती सूत्र लागल आहे हा कितेक मजकूर ध्यानात असावा देवाजीपत वगैरे तिघ येकत्र होनार पुढ मनसबा बहुत याचा तपसील मागाहून लिहून सेवेसी पाठवितो येसाजी सिंद्याकडील जाबसाल यानी व गुरुजीनी स्वामीस लिहिला ह्मणऊन येकिल सत्ये असत्ये न कळे त्याजवरून ध्यानास येईल पाटीलबावा छ १ माहे रबि ( अपूर्ण )

---

[1] माधवराव बापूराव वैद्य

☞ This is the middle one of a letter of three sheets reporting the daily occurrences in Mahadji's camp

*NO 96* ] [ 8 June 1778

श्री

विज्ञापना पाटीलबावा दोन घटका रात्र सूर्यउदय होता सोमवार तेरा घटिका अलीकडे भेटी श्रीमत राजश्री तात्याकडे सदाशिव दिनकर दि॥ नारो सिवदेव व परशरामपत पाठविले की आमच्या भेटी श्रीमताच्या तेरा घटिका आलीकडे, त्यास तुमचे मानकरी वगैरे लवकर निघणार नाहीत याअर्थी उदैक आह्मीच भेटी घेतो अनि तुमचे मानकरी वगैरे चव घटिका रात्री स्वार होतील तर जलद् येणे नाही तर आह्मी स्वार होतो सदासिवपत परशरामपत गेले तेथे काय मनसबा ठरेल पाहावे सदासिवपत दाजी व परशरामपत गेले होते आले श्रीमत तात्याही भेटीस येतात तयारी जाली उभयता मिळून येत आहेत कळावे छ १२ माहे जमादिलावल प्राथकाल पाटीलबावानी स्नान केले आबारीचा हती डेऱ्याजवळ येऊन उभा राहिला आहे लोकाची जिनबदी जाली कळावे हे विज्ञाप

☞ The newswriter reports Mahadji being ready to start for a visit with the Peshwa

*No 97* ] [ 29 July 1778

श्री

विज्ञापना छ ४ माहे रजब प्राथकाली पाटीलबावाचे कूच जाले ढाला पुढे गेल्या डेरे पडले तयारी जाली छ मजकुरी मुकाम वाटेस साहा कोस लोणीच्या आसपास ठरला उदैक दाखल व्हावे यैसे आहे इतकियावर न कळे ऱ्होळकर सडे पुढे गेले फौजेचे कूच आहे यैसें यैकिले पाटीलबावाचा गुरुभाऊ काल छ ३ माहे रजबी आले कळावें छ ४ माहे रजब श्रावण शु॥ ६ बुधवार प्राथ काळ हे विज्ञाप

☞ Mahadji is reported to havd left Poona on his expedition

*No 98* ] [ 22 October 1778

श्रीशकर

विज्ञापना पाटीलबावा भोजनास उठले दतू बोलिला की आज पाटीलबावा ऱ्होळकराकड किंवा सरकारच्या वाडियात जाणार यैसे आहे इतकियावर मरजी न कळे मग भाईस विचारले ह्मणाले की जानार दोहींतून येके ठिकाणी यैसे आहे इतकियावर पाहावे त्यास हें वर्तमान दिन च्यर्या येन्याचा मजकूर सदासिव दिनकर दि॥ नारो सिवदेव यास किंवा आपाजीराम यास समजला आसल त्याणी सेवेसी विनती लिहिली आसल दुसरे प्राथ काली पाटीलबावा बसले होते हैदर नाइकाकडील गोष्टी निघाल्या बाळोबा वगैरे पागे सेनवई आहेत, ते बोलिले की श्रीमताच दैव विचित्र दिसते पनास लाख रुपये हैदरखानाचे पुत्र देऊन याची फौज नेतील स दिसते त्यास छ १ माहे शवालचे दिवसी जिउबा दि॥ बरवे[1] याची पत्र आली ह्मनऊन यैकिले सत्य आसत्य न कळे त्याच्या मारफात सूत्र पाटीलबावाकड काही जाबसाल व्होता यैसे यैकतो काही स्वामीसी

---

१ बाजीराव बरवे रघुनाथराव दादाचा पक्षपाती

बोल्लिे आसतील स्वामाचा त्याचा दुसरा विचार नाहीं बोलत आसतील सिवनेरीत जमाव आहे परतु सरकारचे लोकही खाली आहेत भील काली भोवतालीं लबाडी करतात आस्तु रात्री सध्या करावयास माहाराज बसले होते ते समई आज्ञा जाली की पाटीलबावाची बातमी पोहचली नाहीं। त्यास जासुदाचे जुबानी सागून पाठविले त्याने हैबती नाइकाचा फडनाईक हरजी नामे त्याजपासी सागितले त्यानी विनती केली न केली हे समजले नाही म्या येऊन पुढें विनति करावी तर तो मजकूर दोन तीन पत्री विनती लिहिलीच आहे माहाराज धनी हे विज्ञाप्त

☞ This news- letter is cryptic and cannot be rightly interpreted The date too cannot be properly fixed Mahadji, Tukoji and Nana all must be at Poona, as the letter says

---

*No 99* ] [ About 25 October 1778

श्री

विज्ञापना प्रहर दिवस चढता चिमापा पानसे आले होते त्यापूर्वी बाळाराव व स्वता येकात बसले होते त्यास [1]गकारनामकाचें व पाटीलबावाचें भाशण काल बहुत जालें गकारनामकानी विचारलें की पुढें डौल कारभाराचा कसकसा ठरला ह्मणाले की उदैक वाड्यात जावें लागेंत कसकसें बोलतात तें येकू मग जें कर्तव्य तें करू तुमच्या भावानी भिडेस घातलें [2]मकार नामकास आणावें येसें येकतों सत्य की असत्ये? ह्मणाले की डौल घातला आहे परतु त्याचे आमचें चित शुध पुर्तेपणें नाही दुसरें तो सिपाईगिरीचा तोरा राखितो घाट थोडासा आहे त्यान्ही कामें लाऊन ठेबावीं दुसरें हे ह्मणाले की [3]सकार नामक आता पुर्तेपणें मायेत आले, येसे वाटते ह्मणाले की वाटतें हे खरें आहे परतु त्याचे वचेनाचा विश्वास नाही आणिकही बोलणी राजभाराची जाली बहुत त्यास गकारनामक ह्मणाले की खुलस कळला विना नानानी येका दोघा मातबराची मात्रा ठिकाणी लाविल्यासिवाय दाब बसोन राजभार चालत नाही ह्या कितेक गोष्टी आह्मास बोलता येत नाहीत राजभार चालणें कठिण नाना येकवचेनी, हे बटेबाज नानास विस्वास की ये समई कार्यास आले खरे परतु कसकसे आले हें धोरण ध्यानात नाही दुसरे, जो भला आहे मी तैसे सर्वत्र येसें नानास वाटतें हें कामाचें नाही दुसरें नाना तात्या बातमी पकी ठेवीत नाहीत राजभारास मुख्ये बातमी कितेक गोष्टी तात्यापासी मी येईन तेंव्हा येकात बोलोन देईन मतलब जें करणें ते नानानी तात्यानी विचारून करावें येसे न ह्मणावें की गकारनामक आमचा आहे सकारनामक व हे येसे येकच आहेत ये समई पुर्तेपणें येक जाले दोघेही खिलाडी दुसरें हैदरनाईक आहे ह्मणतात हें कसकसें हे बातमी पकी ठेवा येणेंप्रमाणें भाशण जालें काही दरशनाअती निवेदन करीन दरशन मात्र होतें, परतु बोलावयास कोठे योग सापडतो! विठल सुदर व सवाई जयेसिंग यानी येकातात असावें कोठील बातमी आली येसें कळलें तर आधी उठोन येकावें मग येकात करावा रात्रीं निद्रा केली असली तर उठवावें तेंव्हा राजभार चालतात मुख्ये बातमी दुसरी हिंमत माहाराज सर्व करितात म्या इतला मात्र द्यावा दुसरें [4]बकारनामक बिन्हाडास भोजनास आले वाड्यातून मीही समागमें आलों बिन्हाडी आले मग ह्मणाले की नाना आमची काही गोष्ट काहाडीत असतात किवा नाही! उतर केलें की काही निघाली नाहीं ह्मणाले की आता नारो सिवदेव सदाशिवपत गगाजी आन्हाड

---

१ गोविंदराव गायकवाड २ मोरोबादादा ३ सखारामबापू ४ बाळाराव

आसता कारभार चागलाच होईल मागें जाले तेंही ध्यानास आलें, पुढें होईल तेंही पाहू दुसरे ह्मणाले की तुमची दसऱ्याचीं वस्त्रें सदासिव दिनकर यानी मना केलीं इतके बोलले त्यास सदासिवपत मना करणार नाही परतु न जाणो, कोल्हापुरी होतों तेव्हा सदासिवपत नारोपत बोलले की बाळारायाचें आमचें चितशुध नाही बाळाराव मकारनामकाकडे मिळाला तुह्मी बकारनामकाचे राहुटीस जाऊ नये तेव्हा म्या उतर केले की मजला चहूकडे गेले पाहिजे तेव्हा सदासिवपत बोलले की धोंडोपत तुमचें राहाणें येथें कठिण खायावर खुश्या बसतील उतर केलें की माझी क्रिया शुध आहे तर चिंता नाही त्याउपर नारोपत सदासिवपत यानी आपाजीराम दाभोलकर यासी बोलले की धोंडोपत येथून निघावे येसी युक्त करावी आह्मी नानासी बोललों तर नालीस वाटती त्यास तुह्मी युक्तीचे वाटेने नानासी बोलावें आपाजीराव बोलले की मी नानापासी धोंडोपताची गोष्ट काहाडीन त्याजवर आस्था कसकसी आहे, त्याप्रमाणें बोलण परतु तो ब्राह्मण गरीब दिसतो त्यास आपाजीराम आपणासी काहीं बोलले आसतील इतकी बातमी माझी आहे त्यास सदासिवपत आहे शाहाणा, परतु जिदी, दुसरे समयास हिमत सोडितो बाळाराव बोलले कीं गडबडीचे समई मकारनामकाकडे व सौभाग्येवती चिमाबाईकडे सूत्र लाविले तें खरे आहे असो त्या समयास धीर्य धरणे हे माहाकठीण असे, या अर्थी वस्त्रें मना करविली असतील तर मी कोठे आस्था ठेवितों सारावश स्वामीनी सावध असावें दुसरें सरकारात रोजमरे दोनतीन चढलेत त्यास कार्तिक शुद्ध ५ पचेमीचे मोहर्ते श्रीमत बापू सप्तमी स्वामीचे येसें येकतों त्यास माझी मुलें माणसें येथें आली आहेत पुढें दिपवाली दुसरें घोडी माणसें चारणीस पाठविली तेथें कर्जे पाच रुपये देणें त्यास स्वामी बाहेर डेरे करतील येथूनई कूच होईल, तेव्हा माझी फजिती घोडी आणविली पाहिजेत कुटुब वाटे लाविलें पाहिजे माहाराज माझा काळ बहुतच विषम पोटास आणि कुटुबास इतके मात्र पाहिजे, दुसरी विछा काही नाहीं येक घोडी मात्र चागली इतकेच इतके दिवस कर्जवाम करून चालविलें, पुढें मिळेना या अर्थी कासीयात्रा हे विछा माहाराज मायेबाप गरिबाची कासी विशेष काये लिहू! चासकराविशई विनती प्रायकाली लिहिलीच आहे पचेवीस राऊत चासकरानी देवाठणास बिदा केले की सरकारचा कारकून इकडे येईल आणि जमीदार चासेस नेऊन कैदेंत ठेवावे त्यास चाकरास ताकीद लिहूण की रुजुवात करून जमीदार येथें यावे जें करणें तें समक्ष दुसरें सरकारच्या कारकुनास आज्ञापत्र की रुजुवात करून जमीदार समागमे घेऊन यावे महाराज गरिबाची कासी दुसरें वरकड देवी आसेल त्याप्रमाणें आता देव आनकूळ जाले की पाय दृष्टीस पडले परतु दसऱ्याची वस्त्रें सर्वांस आली तेव्हा मजकडून काही अपराध जाला चौघात लघुत्व वरकड सर्व धण्याचेच आहे भोसले गायक-वाड श्रीमताकडे जाणार फिरग्याकडील कसकसें सर्वे कामाचीं सावधता असावी सकारनामक काही गडबड करितो व्होळकर वगैरे परतु दिनचर्या नाना प्रकारची कचा मजकूर लिहितों परतु स्वामीस सत्य भासनार नाहीं त्यास गकार नामकाचे बोलण्यात सर्व आलें समक्ष विनती करीन सकारनामकानी दोन लक्ष रुपये नगद दिल्हे की तुमचा माझा दुसरा विचार नाहीं, नसावा येसे येकिलें सत्ये आसले न कळे माहाराज सावध, दुसरे लोकाचा बदोबस्त करावा च्यार घटिका खालीं कचेरीत बसत जावे गरिबाचे राम राम नमस्कार होतील कळावे हे विज्ञाप्न

☞ Dhondo Bhivrao Nana's confidential news-agent reports all sorts of gossips of different personalities and warns Nana to be on his guard and not confide too much in any one

*No 100* ] [ 4 July 1779

श्रीशुभ्रा

पौ छ २२ जाकर सु॥ समानीन मया व अलफ आषाढ व॥९ गुरुवार त्रितीय प्रहर विकारी नाम सवत्सरे

राजश्री सखारामपत गोसावी यासी—

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य श्री येशवतराव सिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार दंडवत विनती उपरी येथील क्षेम जाणोन स्वकीये लेखन करीत असिलें पाहिजे विशेष तुह्मी पत्र पाठविले ते पावले राजश्री व्यकटराव यासी तपसिले लिहिले आहे ते विनती करतील, आणि राजश्री शामराव व्यक्टेश व बालाजी रामचद्र विनती करतील त्याचे उतर जलद पाठवावें येसे लिहिले त्यासी राजश्री व्यकटराव यास तुह्मी पत्र पाठविले ते आक्षरशाहा श्रवण होऊन परम सतोश जाहाला राजश्री नाना येकवचनी आणि ज्यास जे वचन देतील ते सिलाशास्वत ही आमची खातरजमा होती तोच आर्थ राजश्री नानाचे सागणीचा लिहिला तेव्हा यापरता लाभ तो काय ? आजीपर्येत आपाजी शामजी वगैरे यानी गैरवाका तेथे येक समजून दिल्हा आणि येथे आह्मास येक समजाऊन देऊन या थरास मसलत आणली * वृथाचा प्रकार पत्रीं काये ल्याहावा ? आजीपर्येत राजश्री नानाचा व आमचा कलह वाढावयास कारण वृथ व आपाजी शामजी वगैरे हेच बरे जाहले ते होऊन गेले इत पर राजश्री नानास परमेश्वरे सिवशाईतरताचे राज्याची ईरशा दिल्ही, आणि त्यास आगत्यवाद, तेव्हा इतरानी करणे ते काय ? तुह्मी आजीपर्येत श्रम केले त्यासी तुमची सचोटी तेथे राहे येसेच घडल, हा खातरा चिताचे ठाई आणान राजश्री व्यकटराव यानी लिहिले आहे त्याजप्रो करून श्रीमन्माहाराज राजश्री स्वामीशेवा करून दाखवणे तुमचे ऊर्जित आणि शेवेचे रूप करून दाखवणे आम्हाकडे त्यापक्षी तुह्मी स्वस्थचिते शेवा करावी राजश्री परशरामपत याजकडे राजश्री शामराव व्यकटेश व बालाजी रामचद्र गेले आहेत तिकडाल ताकिदी व कारकून यासी घेऊन ते आले नतर तुह्मी लि॥ आर्थ व उभयेता विनती करतील तो आर्थ ध्यानी आणोन निश्चयाचा करार करून तुह्माकड लिहून पाठऊ उपरात तुह्मी निसदेहपणे मागले समावें × येथून राजश्री व्यकटराव यासी पाठऊ उभयेताची भेटी जाहाली ह्मणिजे कामाचे फडशे होतील साराश तुह्मास या कामात घातले त्यापक्षी तुमचे हातून काम निभाऊन घेऊन तुमची सचोटी राखू ही खातरदास्त असो देणे ज्या बोलण्यात व्यकटराव त्यापक्षी आम्ही हे पुर्तेपणे चिती आणोन स्वस्तचिते आसणें साराश तुह्मी येण्याविसी विलबावरी न घालविता कोणतही कार्य त्वरेकरून होईल तेच उतम कलावे रा छ १९ माहे जाखर × बहुत काये लिहिणे हे विनती

विराजते
लेखनावधी

● श्री ●
राजा शिवछत्रपती चरणी
तत्पर सुलतानजीसुत यशवत
राव शिंदे सेनासाहेबसुभा
सरसुभेदार
नीरतर

☞ This letter from Yashvantrao Shinde of Kolhapur appears to be written to Sakharampant, an agent of Kolhapur specially

---

● See article 7 p 79 Modak's history of Kolhapur × मागलेस यावे Mangla is a village near Kolhapur

deputed to the court of Poona with a view to conciliate Nana Fadnis, in order to wipe off the sore memories created by the campaign of Mahadji Sinde against Kolhapur The same Sakharampant is alluded to in Yesaji's letter dated 15-2-1782 appearing later on Both the letters should be studied in connection with Mahadji's campaign against Kolhapur

---

*No 101* ] [ About 4 July 1779

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यासी—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रो येशवतराऊ सिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष पुरधराहून पत्र आले होते त्याजवरून लिहिला मजकूर सविस्तर कळला राजश्री रघुनाथराऊ पंडित दादा आले ह्मणोन लिहिले होते ते सर्व वर्तमान कळले याउपरी करनाटकप्राती फौज रवानगी केली आहे दर मजल तिकड येतात ह्मणोन लिहिले त्यास गुदस्ता राजश्री माहादजी सिंदे याचे विद्यमाने तुह्मी आपलेकडील तह केला निभावणीत आले नाहीं राजश्री आपाजी शामजी व बावडेकर याजकडील कारकून व वीरभद्र गोसावी यासी सोडून येवजाचा फडशा केल्यास उतम आहे ह्मणोन लिहिले येसियास पूर्वी कैलासवासी राजश्री नारायेणराऊ पंडित याणी तहाचा करार करून दिल्हा याची माहितगिरी आपणासच आहे त्याप्रमाणे आपण करून देतील कराराप्रमाणे घडल्यास इकडून लढा पडणार नाहीं सुज्ञाप्रति विशेष काये लिहिणे ? लोभ असो दीजे × हे विनंती

☞ This is written by Yashvantrao Shinde of Kolhapur to Nana Fadnis, agreeing on his part to carry out the stipulations of the treaty already arrived at, if the Peshwa would do the same on his part

---

*No 102* ] [ July 1779

श्री

विज्ञापना येसीजे खादेशचे वर्तमान येथें आले केशोपत दातार रणाल्याहून निघोन मालपूर दोडायच्यावर आले राजश्री गणेशपंत बेहेरे व होलकराकडील फौज वाघ वगैरे खादेशात सुल्तानपुरावर होते ते येक होऊन केशोपतावर चालून गेले दोडायच्यावरच लढाई जाली गणेशपतानी केशोपतास मोडला जरीपटका केशोपताचा घेतला सेपनास माणूस फिरगी वगैरे मारले बुनगे लुटून घेतले खासा केसोपत व फिरगी वगैरे पळून गेले पाठीमागें आपली फौज लागली आहे दुसरे वर्तमान असेही येकिले लडाईच्या ठिकाणापासून दोन कोस केशोपत जाऊन तेथे जमून आहे आपली फौज सभोवती आहे जुझ होते स्वामीकडून कुमक त्यास तीन हजार फौज हजार गाडद व तोफा सात आली ती जवळ पावली येका दो रोजात गणेशपतास मिळतील असी वर्तमाने काळ परवा येकिली तिकडेही वर्तमान आले आसेल × कळले ते विदित व्हावे यास्तव लि॥ आहे हे विज्ञापना

---

× येसाजी शिंद्याचे बाळबोध हस्ताक्षर शेवटचें

☞ News is reported to Nana Fadnis of a defeat inflicted at Dodaicha in Khandesh upon Kesopant Datar, a partizan of Raghunathrao, by the combined forces of Ganeshpant and Holkar

---

*No 104* ]                                        [ 28 September 1779

श्री

पौ छ १८ रमजान भाद्रपद वद्य ४ बुधवार साइंकाल

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी —

पोष्य केशवराव जगनाथ सा नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष आपण पत्र हुजरे याजबराबर पो ते पावलें त्यात अन्वये लिहिला कीं श्रीमंताच्या सनदाच्या नकला साहा व श्रीमंत नानाचा कागद हवालदारास व सरनोबतास आहे त्याची नकल ऐसी सात पत्रे ( पा ) ती पावली लिहिला अन्वये ध्यानास आला व आज भौमवारी तिसरे प्रहरास जासूदजोडी पाठविली, त्याजबराबर श्रीमंत राजश्री नानाचें पत्र व आपले पत्र पाठविलें ते पावले यानंतर किले आसेर सिंदे याजकडे द्यावयाबद्दल आपण आला आहा, त्यास असल सनदा आपण ठेविल्या आणि नकला पाठविल्या त्या आह्मास असलाचे जागा आहेत परंतु असल सनदाही पाहिल्या ह्मणजे अन्वये कळेल अ पणही विस्तारेंकरून लिो कोणी कारकून ब्राह्मण माणूस आम्हाकडे पाठवावा त्यासी दोन गोष्टी बोलून, फिरून मागती तुम्हाकडे येईल. आपणाकडून राजश्री भगवतपंत आले आहेत, याजवळ आपलें भाषण जालें आहे तेंव्हा याजपेक्षा अधिकोतर काय असावे ! हुजऱ्यास दींसगत लागली व आपला खिजमतदार भगवतपंताकडे आला होता, त्यास येक दोन दिवस अधिक लागले ह्मणून आपण पत्रीं क्रोधेंकरून लिा त्यास हें काम मसलतीचे आहे आपणास सर्व ठाऊकच आहे येताच याचा जाबसाल कसा होतो ! याजमुळे दींसगत अधिक लागली हाली आपण लिों कीं याचा मजकूर काय तो ल्याहावा देता की न देता ! आह्मी श्रीमंताचे चाकर आज्ञा होईल ती वदून त्याअन्वये वर्तणूक करावी तर असल सनदा झाडून श्रीमंताच्या आपलेजवळ आमचे नावाच्या व हवालदाराचे नावाच्या व सरनोबताच्या ऐशा आहेत त्या पाठवाव्या खेरीज कागद नानाचे सिंद्याचे असतील ते पाठवावे अनमान न करावा निरोप पाठविल्यास आह्मी येऊ त्यास आपणाकडून पंत मारनिल्हे आलेच आहेत तेंव्हा आपण येऊन हैराण व्हावें ते ठीक नाहीं असल सनदा वगैरे कागदपत्र असतील ते झाडून पाठवावे नकलावर समुच्चये करावा आपण कल्पना काहाढतील त्यास आमची तर निशा जाली परंतु सरदार लोक वगैरे आहेत त्याची निशा पडत नाही याजमुळें हालीं लिहिलें आहे त्यास पत्रें असलच पाठवावी पत्रें आल्यानें आज्ञेप्रमाणें निश्चय करून वर्तणूक करू सनदा वगैरे कागद पाठवावयास आपले चितात अंदेशा येईल तो न आणावा आपले तर्फेने भगवतपंत येथे आहेतच तेंव्हा चिंता काय आहे ! असल पत्रें आल्याविरहित खातरजमा सर्वांची पडत नाहीं कृपा करून लिहिल्याप्रमाणें पाठवावें आपणास येऊन दिवसगत जाली आहे, याजकरिता लांबणीवर न घालावें पाठविल्यानें कामाचा बंदोबस्त श्रीमंताच्या आज्ञेप्रमाणें सत्वरच होऊन येईल आपण सुज्ञच आहेत तेथें विस्तारेंकरून काय ल्याहावें ! आह्मी चाकर श्रीमंताचे तेंव्हा अणिकसारिखी गोष्ट होणार नाही ही निशा असो द्यावी आपण चितात काही न आणावे दिकत न घ्यावी असल सनदा व पत्रें ऐसे लिहिल्याप्रमाणें पाठवावे कळले पाहिजे बहुत काय लिहिणे कृपालोभ असो दीजे हे विनंती

☞ The writer Keshav Jagannath writes to Naro Shivdev, asking for the original documents and not merely copies, of the agreements arrived at by the Peshwa's Govt in connection with the delivery of fort Asher to Mahadji Sindia See letter ( below ) dated 16-3-1782

---

*No 104* ] [ 1 November 1779

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी —

सा॥ नमस्कार विज्ञापना छ २१ शवाल सोमवार प्रात काली नारोपत व विसाजीपत* जाम-गावास गेले राजश्री पाटीलबावाचे विद्यमाने निश्चय ठराऊन स्वामीकडे विनति ल्याहावी —

पा॥ नदुरबार येथील मामलत वामनाजी हरीकडे सागून दोन लाख रु॥ सरकारात घ्यावे कलम १

आबाजी नाईक याजकडून येक लाख रु॥ सरकारात घ्यावे कलम १

यादवराव भागवत याजला फाजील पौ येक लाख रु॥ मुदतीने द्यावे पाटीलबावापासी गेलियावर काय ठराव होईल हे न कले कलम १

लाबहाते याजकडून सरजाम पौ रु॥ ५०००० पनास हजार सरकारात देवावे कलम १

येशवतराव गगाधर याचा सरजाम व दरखी काम याचा ठराव होण कलम १

बापूजी होलकर हिंदुस्थानात आहेत पाटीलबावाचे विचारे बदोबस्त करावा कलम १

येणेप्रमाणे जाबसाल ठराऊन यावे यैसे बोलणे सुभेदाराचे विचारे ठराऊन गेले आहेत साडे तीन लाख रु॥ सरकारात दाखला घालावा बाकी राहातील त्याचा जाबसाल पाटीलबावाचे विद्यमान फडशा करावा यैसे वर्तमान येथील आहे श्रुत होय हे विज्ञाप्ति

☞ This appears to be a memorandum of points to be discussed personally with Mahadji in connection with the demands of Holkar It was the divided house of Holkar which was creating trouble for all The writer appears to be Sadashiv Dinakar

---

*No 105* ] [ 15 December 1779

श्री

पौ छ ८ जिल्हेज समानीन

विनती सेवक नारो सिवदेव सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ ६ जिल्हेजपावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीची आज्ञा घेऊन मदवारी निघोन सोमवारी प्रहर दिवसास जामगावास पावलो राजश्री पाटीलबावाची भेट घेतली तेव्हा बोलणे काही जाले नाही काल भाईसी बोलणे स्वच्छतेचे विषई जाले त्यानी मागील सशयाचे बोलले उतर केले की याची उतरे पूर्वीच दाजीस लेहून पाठविलीच होती त्यानी केलीच आहेत त्यात सशयनिवृत्ति जाली असल्यास उतमच आहे नसली जाली तरी येक दोन गोस्टी मातबर सशयाच्या तुह्मी ह्मणता याची निवृत्ति कोणत्या अर्थे होत असेल तो मार्ग सागावा ज्यानी तुह्मास लिहिले असेल अथवा सागितले असेल

---

* लाबहाते,

त्याचा मुकाबला करून लटके जाल्यास पारपत्यच करावे मुकाबला केल्यास पुढें मागे त्याची आबरू रहणार नाही असे ह्मणता, तरी सध्या राजश्री परशरामभाऊ राजश्री तात्या यानी मसलत करून आमचे पारपत्याचे तजविजेन आहेत ह्मणून कोणी लिहिणारानी लिहिले तरी हे तुफान आहे तेथे काही नाही येविसीची शफत आह्मी करितो तुमचा विश्वास साहेबाचे ठाई आहे त्याची उदीवर(?) हात आह्मी ठवितो मग तरी तुमची खातरजमा होती किंवा नाही ? याप्रा बाबासी बोलून सिधात ठराऊन आह्मास सागा समक्ष बोलावे तरी लोकानी मनस्वी लेहून बेलून मरनी स्पष्ट केली आहे बावा बोलतील, उतरे करू जाता मलतेच तपशील लाऊन विक्षेपासच कारण होईल ते ठीक नाही यास्तव तुह्मीच बोलून कोणे तरेने खातरजमा होती याच निश्चय करून सागा, त्याप्रा करू परतु जे बोलणे ते तुह्मीं व बावा उभयतानींच असावे सर्व मडली असल्यास तुह्मी बोलाल ते येकून मात्र घेऊ याप्रा बोलून बावाकडे जाऊन राम राम मात्र करून आलो त्रितीय प्रहरी भाई व ते उभयताच बसून बोलणे जाले उपरातिक रावजी व आबा व गुरुजी आत गेले अगोधर बाईचे बोलणे बरे सडकून जाले होते उपरातिक मडलीसी सामाचे अर्थेच बोलणे जाले, ह्मणऊन वर्तमान कलले आज आमचे बोलणे होईल त्यात भाव समजतील त्याप्रा विनती लिहीन काल होलकराकडील राजश्री बहिरोपत वाफगावाहून येथे आले ते विसाजीपत लावहाते याचे आप्त आहेत, त्यानी येथे बाबापासी वर्तमान सागितले की नारो गणेश यास पत्र राजश्री हरिपत तात्याचे आले त्यात लिहिले की तुह्मासी कितेक मजकूर बोलावयाचे आहेत यास्तव तुह्माकडे राजश्री त्रिंबक विनायक याजला पाठऊन देतो याचे उतर गेले की पाठऊन द्यावे मारनिलेस जावयाविसी सागितले त्यानी उतर केले की सुभेदार व विसाजीपत या उभयताच्या चिठ्या आह्मास येतील तरी आह्मी येऊ याजवरून त्यानी उभयतास चिठ्याविसी विचारले त्यानी उतर केले की जे करणे ते बावावितिरिक्त करावयाचे नाही जो जाबसाल करणे तो त्याचे विद्यमाने करू याप्रा वर्तमान त्यानी सागितले त्याजवरून तर्क चालले की तिकडे सदर्भ लावितात त्यास तात्याचे पत्र गेले होते किंवा नाही हे ल्याहावयाची आज्ञा जाली पा सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ This letter from Naro Shivdev to Nana Fadnis explains the affair of Mahadji's irritation against the latter on hearing a certain rumour that Nana was trying to compass the fall of Mahadji Naro Shivdev was deputed by Nana to meet Mahadji and clear away the misunderstanding This letter is the outcome of that mission Papers throwing further light on the subject are available elsewhere

---

*No 106*] [ 17 December 1779

श्री

पौ छ १० जिल्हेज समानीन

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ ८ जिल्हेज शुक्रवार मध्यान्ह सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री जिवाजी रघुनाथ याची पत्रे वगैरे प्यादाबरोबर रवाना जालीं तीं काल सध्याकाळी येथें पाऊन राजश्री पाटीलबावास प्रावष्ट केली आमदाबादेचे बातमीत चदरराव पवार याची त्याची लडाई जाली दोन तोफा आमदाबादकराच्या

पवारानी नेऊन शेर जाले ही गोष्ट बावास वाईट वाटली आणि बोलले की भगीरथराव व पाराशर दादाजी याची रवानगी महेश्वरावरून आलीमोहनचे रानातून करावयाचे कारण हेच होते की आयते बडोद्यावर जाऊन पावले ह्मणिजे गाइकवाड हे येक जाले ह्मणिजे चद्रराव पवाराचे पारपत्य होऊन आगदी गुजरात त्या फौजेचे पोटी पडली, ह्मणोन तिकडे रवाना केले होते स्वामीचे पत्र आले जे विसाजीपत व भगीरथराव यास कोंडाईबारी व सोनगडास पाठवावे त्यावरून पत्रे सोनगडास जाण्याविसी पाठविली साप्रत आमदाबादेचे असे असे वर्तमान आले तेथे गलाटा जाला त्याचे मदतीस आज फौज जमा करून पाठवावी तेथें पावावयास किती दिवस पाहिजेत, याज करिता विसाजीपत व भगीरथराव वगैरे याची रवानगी महेश्वरावरून आलीमोहनचे रानातून करावी पधरा रोजात बडोद्याजवल पोहचतील कोंडाईबारीकडे पाठवावयास नवी फौज ठेऊन लावावयास येईल तूर्त विसाजीपत आदिकरून यास महेश्वरावर जाऊ द्यावे हे विचारास आल्यास विसाजीपतास पत्र आपले पाठवून द्यावे आह्मी भगीरथराव यास पत्र देऊन दोन्ही पत्रे जलद रवाना करू कोंडाईची तजवीज दुसरी करू ह्मणोन बावानी सागितले त्यावरून विनती केली असे, व बावानीही चिठी लिहिली आहे त्यावरून अर्थ ध्यानास येईल ही सलाह मर्जीस बरीसी पसद जाल्यास राजश्री विसाजी आपाजी यास पत्र पाठ पावयाची आज्ञा होऊन लवकर पत्र येथे यावे ते व बावाचे पत्र भगीरथरायास येसी रवानगी करि तील × मारनिलेस पत्र अगत्य यावे न आल्यास मनसबा सागावा ध्यानास येत नाही ह्मण ण्यात आहे ही फौज तिकडे गेलियावरी सोनगडाकडे लौकरच रा करू ह्मणऊन ह्मणतात भाईची गाठ पडून बोलणे जाले ते वर्तमान पूर्वी लि॥ आहे आमची व बावाची गाठ पडून बोलण्याचे भाव स्वामीचे विदित केले याचे बोलणे बरेच दिसते वाकडे घेतले नाही पक्केपणे बोलणे व्हाव याचे आहे जालेयावर सविस्तर लेहून पाठवीन विशेष वाकडे वोढावयाचे दिसत नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev writing from Jambgaon to Nana Fadnis communicates Mahadji's advice that Visajipant Athavle and Bhagirathrav Sinde instead of going to Kondaibari be at once ordered to proceed via Alimohan for the relief of Ahmadabad against which Chandrarav Pawar was making serious attacks Mahadji is reported to be quite sincere in his proposal of other arrang ments at Kondaibari The writer assures Nana of Mahadji having been quieted after his irritation

---

*No 107*] [21 December 1779

श्री

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ १२ जिल्हेज सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष प्याद्याबरोबर पत्र सादर जाले त्यात आज्ञा जे भगीरथराव व विसा जीपत व पराशरपत याची रवानगी कोंडाईबारी सोनगडाकडे करविली सध्या चद्रराव पवाराची आमदाबादेवर लडाई जाली याजकरिता राजश्री पाटीलबावाचे मानस त्रिवर्ग महेश्वरावरून बडोद्याचे सुमारे आमदाबादेचे कुमकेस पाठवावे तर यास त्या मार्गे जावयास फार दिवस लागतील कुमक होणार नाही यास्तव कोंडाईबारी सोनगडास पाठवावयाचें पूर्वी लेहून पाठविले आहे तीच सलाह चागली त्रिवर्गास सोनगडाकडे रवाना करावे तेथे पावले ह्मणिजे इगरजावर पवार मजकुरावर

गाइकवाड याजवर दाब व आमदाबादकरास हिमत येईल येविसी पाटीलबावास पत्र पाठविले आहे, पावते करून सोनगडाकडेसच रवानगी करवणे त्यास आज्ञेप्रमाणें बावास पत्र पावतें केलें व त्रिव गींचे रवानगीचा निश्चय सोनगडाकडे करून पत्रे रवाना करविली बावानीही उतर दिल्हे ते पाठविले आहे त्यारून अर्थ ध्यानास येईल × याचे बोलण्यात आहे की सोनगडाकडे फौज गेल्यास अमदाबाज दूर पडती त्याची मदत तूर्त होणार नाहीं तेथील मात्र मजबुदी आणि फौज मातबर जाऊन पोहोचे ते जाले पाहिजे मदतीविसा गायकवाड यास पत्रे जावी सेवेसी स्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev communicates Mahadji's approval of Nana's action in asking Visajipant and Bhagirathrav to proceed into Gujrat via Songad

---

*No 108* ] [ 25 December 1779

श्री

पौ छ, १८ जिल्हेज समानीन

सेवेसी विनंती सेवक नारो शिवदेव सा नमस्कार विज्ञापना ता छ १६ जिल्हेज शनवार मध्यान्ह सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष प्याद्याबरोबर पत्र सादर जाले, त्यात आज्ञा जे, सुरत अठाविसीत राजश्री चिंतामण हरि याचा कारकून आहे त्याचें पत्र बातमीचे व अमदाबादेहून बातमीचे पत्र आलें तें राजश्री पाटीलबावास पाठविली आहेत चिठी बाबास लिहिली आहे प्रविष्ट करून बातमीचे पत्रें दाखऊन भगीरथराव व पाराजीपत याचे जाणे बडोद्यावरून आमदाबादेस ठरविणे पाटीलबावाचे विचारास आले ह्मणिजे राजश्री विसाजी आपाजी यास पत्र आमदाबादेकडे जाण्याविसीं लेहून पाठऊ येैशास आज्ञेप्रमाणें चिठी बावास देऊन बातमीची पत्रे दाखविली आमदाबादेकडे फौज भगीरथराव वगैरे यास जाऊ द्यावे, ह्मणून बोललो यैकून रागे भरले जे अगोधर आह्मी तीच तजवीज करून महेश्वरावरून आलीमोहनचे रानातून बडोद्यावर जावयास लेहून पाठविले होते मध्यें तुमचे लिहिल्यावरून कोंडाईबारी सोनगडाकडे जाणे ह्मणून लेहून पाठविलें आमदाबादेवर जुज होऊन दोन तोफा चद्रराव पवाराने नेल्याची पत्रें पुण्याहून आल्यावरून मागती आलीमोहनचे रानातून जाण्याची तजवीज आह्मीच विचारून चिठी पुण्यास पाठविली तुह्माकडून लेहविले तेव्हा भगीरथरायास पुत्र जाला ह्मणून थालनेरावर मुकाम करून होते, तेथून सेंधव्याचे घाटाने सुमार जावयाचा नीट होता परंतु उतर आले जे सोनगडाकडेसच फौज जाऊ देणे लाच्यार जालो तीन च्यार पत्रें येकामागें येक रवाना करून सोनगडाकडे जाण्याविसीं निकडीनें लिहित गेलो थालनेराहून कूच होऊन सोनगडचे सुमारे गेले आता फिरतात कसे असे बोलले परंतु आमदाबादेस पक्का बसल्यास आगदी मसलतच गलाटते, जाणून भगीरथराव व पाराजीपतास पत्रे पाठविली की हजी वलवी (?) कोल्याचा नाईक चाकर ठेऊन तुह्माकडे पाठविला आहे पावला आसेल तो सागेल तेथे नर्मदा उतरून लौकर बडोद्यास जाणे तुह्मी गेल्यानेच पवार मजकुरावर दाब पडेल राजश्री फत्तेसिंगराव गाइकवाड तुह्मास शामील होतील ते व तुह्मी येक होऊन चद्रराव पवाराचे पारपत्य करणे ही गोष्ट न केल्यास निमित्त तुह्मावर येईल असीं पत्रें वायद्याने रा केली आह्मास ह्मणाले भगीरथराव जातील तिकडे विसाजी आपाजी सरकारआज्ञेखेरीज जाणार नाहींत त्यास तुह्मी आपले पत्र विसाजीपतास देणें तेव्हा प्रासच जाले आह्मी पत्र त्यास लेहून दिल्हे परंतु मानितील न मानीत न कळे तर स्वामीचे पत्र मारनिलेस निकडीने वाइयाचें गेले पाहिजे की भगीरथराव जेथे नर्मदा उतरतील तेथे तुह्मीही उतरून लौकर बडोद्यास जाणे असे पत्र त्वरेने पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे × परभारे त्याजकडे जलदीचे जावे व येक पत्र येथेही आले पाहिजे सेवेसी स्रुत

है विज्ञापना गायकवाडचे जाबसालाची यादी काल जासुदाबा। पाठविली आहे पावली असे उत्तराची आज्ञा व्हावी भाडेराचे सनदाविसी जलदी बहुत करितात पत्र लेहून सनदा आणवा ह्मणतात निकडच लाविल्यास पत्र ल्याहावे लागल सूचनार्थ विनविले आहे विज्ञापना बावाचे चिठीचे उतर पा आहे हे विज्ञापना

☞ Naro Shivdev in acceptance of Mahadji's views requests Nana to despatch speedy orders to Visajipant to proceed at once towards Baroda crossing the Nermada at the ferry where Bhagirathrav was to cross The move was necessitated by the British having started an aggressive campaign in Gujrat

---

*No 109* ] [ 30 December 1779

श्री

पौ छ २३ जिल्हेज समानीन

सेवेसी विनंती सेवक नारो शिवदेव सा नमस्कार विज्ञापना ता छ २१ जिल्हेज सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष स्य याबरोबर छ १८ चा पत्रें सादर जालीं ती पावलीं राजश्री पाटीलबावाचे पत्र पावते करुन जाब घेऊन पाठविला आहे वरकड मजकुराची आज्ञा पत्रीं जाल्या प्रमाणे बावास स्रुत केले उतरे जाली ती कलबदीवरून विदित होईल

पाटीलबावाचे गुरुदर्शनास बीडास जाणे ये समईं युक्त नाहीं गेल्यास लोक तर्क काय करितील हे बावास कलतच आहे आमदाबादेवर पेच मातबर, इग्रजावर शह नाहीं विस्तारयुक्त पत्रीं आज्ञा ते पत्रच दाखविले उतर जालें जे जाणे अगत्यच, परतु पत्रीं लिहिल्यावरून बीडास जाणें मौकूफ केलें फौजेस पत्रें पाठविली आहेत निकडीने जमा करितों येथेंच उरुस करून आज्ञा घेऊन कूच करून कासारबारीवर जाऊन फौजा पुढे लाऊन देऊन आह्मी पाठीवर जातो, असे उतर जाले

मुरारराव जाधवाचा मजकूर आज्ञापिला तो बावास विदित केला उतर जालें ते दुसरे जोडी बरोबरील पत्रीं विनविले आहे त्यावरून विदित होईल सरकारातून लोक पाठऊन पारपत्य जरूर करावे, थोडकेच आले तर त्याबरोबर आह्मीही लोक देऊ असे उतर जाल जर सरकारचे थोडके आणि काहीं जमाव बावाचा द्यावयाचा असल्यास आगोधर आज्ञापत्र यावें ह्मणिजे यास सागून लोकाची तयारी केली पाहिजे यास्तव आगोधर सूचना यास करावी लागेल

राज बहादर व सिवराम नाईक याचें बोल्लो जाबसाल ठरावयाचा आहे सागतील ठरेल ते विनती करीन

चितो विठल व सदाशिव रामचद्र याचा मजकूर, मी येतो समक्ष विनती करीन

छ १० व छ १२ चीं पत्रें पावली बावास स्रुत केली उतर मसलत वगैरे जाबसाल लिहिण्यात आले व येतात

पाटीलबावास बीडास जाण्याकरिता पत्र आणविले ते युक्त नाहीं ह्मणून आज्ञा आली ते उतमच जाले पत्रावरून बीडचे जाणे मौकूफ केले

भाडेरच्या सनदा मी येथे आसता याव्या असी येथील मर्जी खरीच, परतु मीच आज्ञा घेतली आहे घऊन यतों ह्मणून करार केला आहे

स्वारी बाहेर निघान साडे तीन महिने जाले चारा पाणी याचा तोटा याजकरिता दहाबारा कोसी चारा पाण्याची सोय पाहून जावे हे बरे बावास विचारणे उतर करितील ते लेहून पाठवणे

ह्मणून आज्ञा हे बाबास विचारले उत्तर जाले जे कोणते दखावर जाणार हे कलत नाहीं दुसरे ज्या दखावर जाणे तिकडे मोहिमेस जाणें प्राप्तच आले मागे पुण्याचा व श्रीमताचा बंदोबस्त इतकाही विचार पाहून कर्तव्य ते करावें × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports Mahadji's agreement to accept Nana s suggestions to proceed into Gujrat immediately Various other points of administrative interest are also answered in this letter

---

*No 110* ] [ 1779

श्री

विज्ञापना पाटीलबाबाकडील येक पत्राचा जाब घेऊन काल्चे फतेमारींतून जोडी गेली मागून आले ते जाबाकरिता राहिले आहेत काय जाब दिल्हा समजला नाही कलावे दुसरे रा रामचंद्रपंत मेहेंदले यासी कैदेत आज उभयता दितेपुत्रास बारा उपोशणे जाहाली स्नान देखील नाहीं काही दूध प्राशन करितात ह्मणोन आज जनराल यासी विच रिले त्यावरून भोजनाची सोय होय असा प्रकार करितो ह्मटले आहे अनाजी बेहेरे व दे न मुसलमान आज साष्टीहून येथे आले तुरुगात कैद ठेविले ह्मणोन कलले काय निमित्य समजले नाही वरकड अधिकोतर काही वर्तमान समजले नाही हे विज्ञापना

☞ This appears to be a news etter from Bombay sent to Poona for Nana Fadnis There is mention of the Governor of Bombay The date cannot be fixed

---

*No 111* ] Received on 24-1-1780 [ January 1780

श्री

पौ छ १६ मोहरम पौश

विज्ञापना ऐसीजे राजश्री सिवाजी विठल येक मास आष्ट्यात महूर्ताने बाहेर निघोन डेऱ्यात आहेत बाबाचे बालाऊ त्यास गेले, त्यावरून त्यानीच यावें परतु बारगीर पागे पागेचे व सिलेदारांचा गवगवा यामुळे राजश्री चिमणाजीपंतास त्यानीं पाठविले आले बाबासी भेटून बोलून निरोप घेऊन आष्ट्यास गेल ते वर्तमान निराळे पुरवणीत लिनविलें आहे चिमणाजीपंत आष्ट्यास पावले गवगव्याची तजवीज करावी तों सिवाजीपंत बापूचा पुत्र धाकटा दाजीबा म्हणून होता त्यास देवआज्ञा जाली त्याची स्त्री गोविंद कृष्ण अजमेरकर याचे पुत्राची कन्या ती सहगमन कली येणेंकरून व पू कार विकल जाले हिमत सोडली म्हणोन फारच घाबरून चिमणाजीपतानी लेहून पाठविलें समाधान होईसे पत्र बापूस पाठविणे म्हणोन लिहिले होते त्यावरून आम्ही तो पत्र समाधानार्थ पाठवितोंच स्वामीचे व सरकारचे पत्र समाधान व धीर भरवशाविसी सादर जाली पाहिजेत × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ The writer requests Nana Fadnis to write a condolence letter to Shivaji Vithal Vinchurkar on the death of his son, as he seemed to have been stricken down with grief Mahadji wrote a similar letter, informs the writer

---

*NO 112* ]                                                  [ January 1780

श्री शंकर

विनती उपरी नजफखान याणी जैपूरप्राती सरदाराकडील माहालास उपद्रव केला हे ठीक नव्हे त्याचे माहाल त्याजकडे मुदामतप्रो चालावे प्रस्तुत इग्रजासी विरुध आहे याजकरिता भोसले नबाब हैदरनाईक याणी त्यासी सरकारलक्षाने कलह लाविला आहे त्याप्रो त्या प्राती उभयता सरदारापैकी येक जण आलियास नबाबानी भेटोन येकत्र होऊन आतरवेदी व गगापार रोहिलखड येथे दगा करून मुलूख सर करावा याप्रो आमलात आणावे याच आन्वये त्याजकडून पहिले बोलणे आहे यैसे जालियास पका श्रेह उभयपक्षी व्हावा, तेव्हा त्यांणी सरकारतालुका मेरट व सरदाराकडील दोन प्रगणे गणमुक्तेस्वर व आनूपशहर सोडावे पाच हजार फौज नेहमी दिलीस नबाबाजवळ राहील नबाबानी श्रीमतासी भाऊपणा पगडीबदल करावा मेरट सोडावयाचा करार व पगडी यैसे पाठवावी येथूनही पगडी व फौजेची रवानगी होईल नबाबास थोरपणा ईश्वरानेच दिल्हे परतु थोराचा श्रेह राखिलियास उतम उभयता यकत्र जालियास लाहोर व आटकपर्यंत सीकाचा मनसबा आहे इग्रजाचा श्रेह बिघाड नबाबाचे इतल्यासिवाय काही होणार नाही साराश नबाबानी श्रेह श्रीमताचा मर्यादावा दिलीचा सरकारचा आहे तलेगावचे मुकामी बोलणे जाले ते स्मरण धरून हा कारभार आमलात आणावा पाच वर्षे जाऊन जाली सरकारचे मातबर कार्य जाले नाही सूचना लिहिली आसे हे कार्य जालियास श्रयस्कर आसे इकडे गुजराथ प्राती कोकण प्राती फौजाची रवानगी होऊन बदोबस्त करीतच आहो या प्रसगी सरदार भोसले व गाइकवाड नवाब व हैदरनाईक सर्व इग्रजाचे मसलतीस आनकूल त्याप्रो नजब खान याणीही आसावे दिलीच्या बादशाचे प्रकार सैदाचे आमलात थोरले नाना व महमदशाहाचे वेलेस राऊसाहेब, आहमदशाहाचे वेलेस तुह्मी होताच आलीकडे पाणिपत तर पहिलेच आहे प्रस्तुत उभयतानी मिलोन तुह्मास खेचीवाडियातून प्रयागास व यमुनेस पाठविले तोही प्रकार सर्व ध्यानातच आहे ते वेलेस बाजी बिघडली याजकरिता हाली दिली हस्तगत श्रेहाने होऊन मोठे मनसब नबाबानी व सरकारचे फौजानी करावे तो प्रकार आमलात आणावा तेव्हा यैसे जालियास तुमचे कराणियाचे आर्थ ध्यानास येतील [ पुढील बद गहाळ ]

☞ This is the first sheet of a long letter which appears to come from Purushottam Mahadev Hingne at Delhi to the Peshwa, recommending him to establish a friendly understanding with the Emperor and his Vazir Najafkhan in order that a simultaneous movement against the British in north and eastern India may be effected with advantage to the Maratha estate

---

*No 113* ]                                                  [ 5 Februry 1780

श्री

पो छ ७ सफर समानीन हा प्यादे बहिरजीकडील

विज्ञापना यैसीजे आज शनवारी मौजे पूर पा धुले येथील मुकामी गुजरातचे वर्तमान आले जे, इगरज डबईवर आहेत उभयता सरदार दरमजल येतात, यैकून विचारात पडले आहेत, राजश्री फतेसिंगराव गाइकवाड यानी बडोयाची मजबुती करून आपण पाच सात हजार

फौज व पाच सात हजार प्यादा इतके जमावानसीं बडोदे सोडून तीन च्यार कोस इग्रजाकडे चालून आले चौ कोसाचे अतर राहिलें आहे आगोधर फतेसिंगराव ठरून राहातील भरवसा नवता परत ठरून राहिले इगरज जवल आले आसता बडोद्याची बलकटी केली डबईकरास धीर भरवशाची पत्रे पाठविलीं कुमकही पाठवणार होते मध्यें फितूर करणारानीं केला त्याचे पारपत्य केले यावरून बावाची मर्जी प्रसन्न होऊन स्तव त्याचा केला, आणि कागद त्यास पाठविले की आह्मी लौकर येऊन पोहचतो असी धीर भरवशाची पत्रे दररोज येक यैसी दोन तीन पत्रें गाइकवाडास रवाना केलीं आज चौकोसाचे अतर राहिल्याचे वर्तमान यैकून फारच मर्जी गाइकवाडावर खूष जाली तारीफ होते असो इगरजाचे वर्तमानावरून विचार पडला कीं आह्मी आलीमोहनचे रानातून जातों कदाचित इगरज भडोच जबूसर दाहा दाहा कोसाचे आतऱ्याने आहे त्या आसऱ्यास गेले तर पुढें विचार कसा करावा? मोरचे लाऊ झटल्यास, जागा मजबूत, आत लढवई इगरज, सरजाम जगी पोख्त, मसलत लाबते हातास येत नाहीं तेव्हा आलीमोहनचे रानातून जावें की कोंडाईबारीस जाऊन खाली फौजा घालून अठाविसीत सुरतेपावेतो दगा करावा येणेकरून ठाणी अठाविसीतील उठतील सुरतेपावेतो फौज फिरल्यास इगरज जलमार्गें सुरतेस येतील येके जागा लडाई पाडितील हेही सलाच आहे असा मनसबा होत आहे पकी सलाह कोणती ठरती? सेधव्याचे बारीने अलीमोहनचे रानातून जाणे ठरल्यास राजश्री विसाजीपत त्रिवर्गास सुरत अठाविसीत घालावें खासाच कोंडाईबारीकडे जाले तर विसाजीपत त्रिवर्गानी गाइकवाडास शामील व्हावे अशा कल्पना आहेत ठरेल ते विनती करीन × बहुतेक कोंडाईबारीच ठरेल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro shivdev reports progress of the English moves in Gujrat and the check exercised on them by the armies of Sindia and other Sadars fast proceeding to those parts Mahadji's plan of campaign is communicated.

---

*No 114* ] [ 11 February 1780

श्री

पौ छ १० सफर समानीत हा साडणीस्वार

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ ५ सफर मुकाम नजीक नेर भाबरे सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष साडणीस्वारासमागमे छ २८ मोहरमची पत्रे सादर जाली ती याच मुकामी काल पावली राजश्री पाटीलबावास पत्र होते तें प्रविष्ट करून जाब घेऊन पाठविला आहे पूर्व्या मुकामीहून सरकारचे प्यादे दोन जोड्या रवाना केल्या त्याजबरोबर तपसीलवार वर्तमान लिहिले आहे, त्यावरून सर्वार्थ ध्यानास येतील राजश्री पाराजीपताचे खर्चाचे बेगमीकरिता वारवार आज्ञा येते त्यास त्रिवर्ग रेवातीरास गेले राजश्री फत्तेसिंगराव गाइकवाड यास पत्रे बावाची राहोरीचे मुकामापासोन दर मजलेस रा। होत गेली आजपावेतो दाहा पत्रें पाठविली लौकर येऊन पोंचतों व राजश्री विसाजी आपाजी आदिकरून त्रिवर्ग पुढें रा। केले, ते जलद येऊन पोंहचतील ह्मणोन लिहिलें गेलें पत्रे त्यास पाऊन त्याचा कारकून विसाजीपताकडे आला जे लौकर यावें कारकुन याजवल पावला त्याचे उतर गेले नाहीं ते इगरजात मिलाले हे वर्तमान विसाजीपतास कलल्यावर सदेह जाला तेव्हा पत्रें बावास पाठविली त्यास येक पत्र काल पाठविले ते पावलेच असेल आज दोन पत्रे रेवातीराहून आली ती सेवेसी पाठविली आहेत त्यावरून सकलार्थ विदित होतील येथे दोन मुकाम करावयास कारण गाइकवाड इग्रज

येऊ जाले, तेव्हा पका मनसबा त्याचा जाला आपणही पकेच होऊन जावे म्हणोन आपली कुटुबे व भाई व कारभारी सरदार वगैरे लश्करात कबिले होते ते झाडून उजनीस रा केले आज दोन कोस त्याचा मुकाम पाठीमागे केला उदईक त्याचे कूच होऊन सेंधव्याचे घाटाचे सुमारे जातील उभयता सरदाराचे कूच होऊन साकरी मोसल्याची येथे मुकामास जाणार कुटुबाचे रवानगीत आमचे जाबसाल जाले नाहीत साकरीचे मुकामी जाबसाल उरकनील आज्ञेप्रमाणे मी येथे राहीन म्हणतो त्याचीच निकड जाण्याविसी आहे साकरीवरून निरोप देणार राजश्री त्रिंबकराव नारायण यास समागमे न्यावे असा ऊहू+ जाला आहे उदईक काय निश्चय होईल तो कलेल × वरकड कितेक अर्थ बोलण्याचे ते पत्री कोठवर ल्याहावे ? समक्षच विनती करीन होळकराकडील उभयता कारभारी याची कटकटीचे अर्थ पूर्वी लि॥ च आहे परतु तूर्त मसलतीस जाणे यावस्तव सर्व गोस्टी येकीकडे ठेऊन राजश्री नारोपत याचे समाधान करून वाकडे दिसू दिल्हे नाही पुढे विसाजीपताचे याचे समाधान करून भावास मेळऊन घेऊन मसलत पुढे राहिली आहे ही सिधीस न्यावी हाच विचार दिसतो अमदाबादकरास पत्रे वरचेवर जातात की हे येऊन पोहचले तुम्ही खातरजमा ठेऊन कचे न होता गुजावयास अनमान न करणे हेही दरमजल नर्मदातीरास जाणार यात्रा नित्य बोलण्यात येते तरतूदही चालली आहे गायकवाड राजश्री विसाजीपत वगैरे जाऊन पोहचले असता त्यानी इग्रजासमागमे जावयाचे नव्हते गायकवाड बा। गेले येणेकरून अमदाबाजकरानी कचे न व्हावे येसे म्हणतात राजश्री चिंतोविठल यास जावे म्हणऊन एक दोन वेळ सागितले असता त्याच्या ध्यानास येत नाही सनदा आणिल्या त्या मजपासीच आहेत न आल्यास माघाऱ्या आणाव्या लागतील होळकराकडील राजश्री दादाजी गगाधर याजचा। पाऊण लक्षाचा जाबसाल तरी राजश्री माधवराव व बाजीपत येथे आहेत ते करीतच आहेत तूर्त होता दिसत नाही होळकराची फौज आहे त्यासच रोजमरा मिळत नाही ही अवस्था आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro shivdev reports from Mahadji's camp the plan of campaign the latter had adopted for a successful opposition to the English, particulary because Fatesingrav Gaikwad had joined them

---

*No 115* ] [ 28 February 1780

श्री

राजश्री बाळाजीपत नाना गोसावी यासी —

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य श्रो येशवतराव सिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार दडवत विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करावे विशेष आपणाकडील वर्तमान कळले त्यावरून सतोष पावलो राज्यातील फितुर राजकारणाचे मुळे उपडले आपली निष्ठा राजश्री प्रधान पताचे ठाई तदनुसार सर्व गोष्टी घडत जातात ग्रहस्तान नाना प्रकार आमच्या बुद्धीस भेद करविला नागो शामजीच्या हातून वरचेवर निरोप येत जे फौज ठेवा, मानकरी राज्यातील चाकर तुमच भगवतराव प्रतिनिधि यास आपाजी शामजी यानी सामील करून दिल्हे रामचद्र नाइकाचे तालुकियात स्वाऱ्या करा, म्हणोन सागितले आहे आसे सागत हे प्रत्येक्ष त्याचे चिरजीव सभाह्याभ्यातर याचे ठाई त्याचा विस्वास त्यापक्षी याच न येकता आमचा परिणाम काये ? राजश्री माहादजी सिंदे वगैरे फौजा येऊन आमची वात हत जाहाली पेचाखाली आलो मनुष्ये

---

+ ऊहापोह

पणाचा विच्यार किमपि राहिला नाही आमचा आत नात पाहून आपण जी आज्ञा करणे ती करावी येथील मर्जी आपणा वितरिक्त नाही आपाजी शामजी याचे विदेमान नादी लागले होते त्याजकडून आतर दिशला यास्तव त्याची वास्ता सोडिली साप्रत सर्वप्रकारे आपले आहों. आपाजी शामजीन माहादजी सिंदे वगैरे फौजा आणोन आपणासही पन्नास लक्षाचा पेच पाडिला आपली दौलत थोर, परतु ह्या गोष्टी ध्यानात आसतीलच आमच्या व आपल्या द्वेशास कारण हे प्रस्तुत आपली मद् येता ज णोन करवीरास आलो व्यकटराव घारपडे पाच ल्यारशे राऊत घेऊन त्याच्या सिवाऱ्या करितात अ ह्मी आपल्या मर्जीस्तव स्वस्त आहो याचा बदोबस्त आपण करावा आमची अ त नात पाहून आमच्या हातून निभाव असा विचार करून राजश्री बालाजी रामचद्र याची रवानगी करावी या छ २२ सफर बहुत काये लिहिणे लोभ कीजे × हे विनती

☞ Yashavantrav Shinde writes to Nana Fadnis on behalf of the Kolhapur State how Appaji Shyamji and others created trouble and acted faithlessly He requests Nana to settle matters favourably and in a friendly manner This is of the same tenour as the letter dated 1-7-1779 above

---

*No 116* ] [ 5 March 1780 *

श्री

राजश्री बालाजीपत नाना गोसावी यासी —

अखडित लक्ष्मीआलकृत राजमान्य श्रो येशवतराव सिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार दडवत विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन कराव विशेष पेशजी अ पणास सविस्तर मजकूर लिहिला आहे आपाजी शामजी व नागो शामजी यानी आह्मास व आपणास खर्चाखाली आणोन या थरास आणिल आह्माकडून आतर काय ? याचा करार, सातारच्यास भेद केला आहे, ठाण घालून देतो, तेथ आहे त्याच पारपत्ये करितो, साताऱ्याचा भेद ग्रहस्ताच्या मारफतीचा आहे यास्तव तुह्मी फौज ठेवावी येथून भगवतरायास फौज ठेवणेविसी सुचेना सर्व विशये समजुन देऊन करविली आहे जे, सातारा फितला तेव्हा सर्व राज्ये श्रीमत छेत्रपति स्वामीच होणार. तुम्ही पदरच मातबर शेवक सातारा घेऊन सर्व मानकरी यास आनकूल करून घेऊन राज्याचा बदोबस्त करावा येविसी सर्वांच मत आहे ऐस सागून भगवरायाकडील फौज आह्माकड पाठविली आह्मास सर्व राज्याचा लोभ दाखविला काटकाचा विश्वास नाही आपण विश्वास मानून ग्रहस्ताचा बदोबस्त जाहाला आसता आद्यापि जवळ ठेविले आहेत त्यास देशाहून बाहेर घालवावयासी योग्य आहेत ग्रहस्ताच्या सर्व राजकारणात पेसे होत आम्ही सर्वप्रकारें आपले आहो सदयचित आसावें राजश्री बालाजी रामचद्र यासी आपणाकड पाठवले आहेत त्यापासी निश्चयार्थ सागावा इत पर आमचे पाऊल वाकड पडावयाच नाही घराऊ रीतीन जे करणे ते करावें छ २८ सफर बहुत काय लिहिणे लोभ कीजे + हे विनती

☞ Yashavantrav Shinde requests Nana not to trust Appaji Shyamji who had played greatest mischief The writer agrees to follow the advice of the addressee

---

* This cannot be in 1779 in view of letters already printed.

*No 117* ]　　　　　　　　　　　　　　　　[ *14* April 1780

श्रीशभुप्रा

राजश्री बालाजीपत गोसावी यासी —

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य श्रो येशवतराव सिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार दडवत विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष राजश्री रामचद्र माहादेव व राजश्री आपाजी शामजी याचे वियमानचे देणे ते रुजुवातीमुले ठरेल त्याची बाकी थावी उपरात हुकेरी तालुका वगैरे ठाणी व खेडी करारप्रो सरकारात स्वाधीन करावी याप्रो करार त्याजवरून राजश्री रामचद्रपत व राजश्री नरसीपत यास कित्येक प्रकार सागोन आपणाकडे पाठविले आहेत हे निशा पटऊन देतील उपरातिक हुकेरी तालुका व फुटगाव करारा प्रो राजश्री विठलपत याचे स्वाधीन करावे येविसी श्रीमन्माराज राजश्री स्वामीचे आज्ञापत्र आपणास सादर आहे कलले पाहिजे रवाना छ ८ माहे राकर बहुत काय लिहिणे हे विनती

☞ Yashavantrav Shinde sends his agents to Nana and requests him to adjust all disputes in a conciliatory spirit

४

# पुण्यांतील वाटघाटी

*No 118* ] [ 22 April 1780

श्री

विज्ञापना छ १६ राकर उभयता सरदार आह्मासह इग्रजाचे पछाडीवर गेलो मार्गी राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यास त्याजकडील फही व दोन तीन पलटणें सावलीकडे गेल्याची बातमी त्यास लागली त्याजवरून ते धाऊन त्याजवर गेले गाठ पडली लावचे पल्यामुळे लोक थोडे पोंहोचले तथापि तुकोजीबावानी जातीने नीट होऊन लढाई चागली केली येक पलटण सिखस्त करून कहींतील उट वगैरे पाडले निकड चागली केली इतक्यात दुसरे पलटणाने तोफाची मारगिरी करून कुमक चागली केली याजकडील घोडे माणूस ठार व जाया फार जाले जातीची खैर जाली राहिली कही पोटी घालोन तोफा सुरू करून पलटणे उभी राहिली हेही मार चुकाऊन घेरा देऊन उभे राहिले तोफाचे आवाज यैकताच पाटील बावाची स्वारी तिकडे चालली दाहा कोस गेलो होतो, आणिक सात कोस गेलो तिसरा प्रहरा तुकोजीबावाजवल पावलो पाटीबावाचीही मर्जी ते दिवसी प्रसन्न जाली पुढे पलटणे बुडवावीं, आपल्या तोफाही लागू कराव्या असें होते परतु इग्रज तयार जाल्याची बातमी पाटीलबावाजवल आली त्याजवरून पुन गोटास मध्यरात्री आलो सात आठ गावाची मजल पडली पाणी मिळाले नाहीं दाहा प्रहरा जिन उतरला लष्कर हैराण फार जाले नतर तिसरे दिवसी इग्रज माघारा कूच करून गेला हे वृत्त पूर्वी लि॥ होते कळले असेल हे विज्ञापना

☞ This is a report sent to Nana Fadnis by his correspondent with the Maratha armies fighting against the British in Gujrat A severe action took place near Savli between Holkar's troops and the British, with considerable losses on both sides The British armies retired

---

*No 119* ] [ 21 April 1780

श्री

पौ छ २५ राकर समानीन हा॥ डाक

सेवेसी विनती सेवक सदाशिव दिनकर सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ १५ राकर शुक्रवार प्रहर दिवस मु॥ मौजे मलाव ता॥ हालोल पायागडाचे पूर्वेस च्यार कोस स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष छ १९ रावलची पत्रें सादर डाकेबरोबर आली ती येच समई पावली आगोधर छ १२ रावलची पत्रें याच अन्वयें सादर जालीं ती छ ११ चे रोजीं पावलीं यैयास मी व्यथिस्ट मूतखडे जोंधळ्याहून मोठे पडतात यामुळे बुनग्यात असतो, परवा तसाच राजश्री बावाकडे गेलों तो इग्रजाचे कूच जालें बावाची सडी स्वारी पाचदेवल्यावर होती तेथें इंग्रज आला. बावा तीन कोस बुनग्याचे मुकामावर आले तेथें गाठ घातली येक रात्र राहिलों काळ दोन प्रहर पर्यंत होतों बोलणें पुष्कळ जाले पत्रजाब ल्हेहावयास राजश्री आबा चिटणीस यास सागितले की निरोप घेऊन पत्रें बावाची आली म्हणिजे रवाना करितों हैदरखानाचे पत्रा-

विसी रदबदल फार जाली पत्र देत नाहींत राजश्री मुधोजी भोसले यासही पत्र देत नाहींत या बोलण्याचे तपसील फार आहेत ते मागाहून विनंता करीन फकीरा कासद निा परसराम मिरधा इनामी वायद्यानें रवाना केला आहे वायद्यास पावेल त्याजबरोबर पत्रीं सविस्तर विनंती केली आहे विदित होईल सेवेसी श्रुत होय परवा इग्रज कूच करून पाचदेवल्यावर आला वीस पचवीस तोफा त्याने डागल्या इकडून कोण्ही उठले नाहींत पाच सात बाण टाकिले पौ दोन तीन लागू जाले तेणेंकरून इग्रजाची दोन माणसे मेली दोन तीन जखमी जाले वरकड बाण फुटले इतके कृत्य इकडील जाले मुकामास आल्यावर दोन तुरुक स्वार इग्रजातून आले ते याचे चौकीचे स्वारानीं आणिले त्यानी बावाजवळ बोलले की इग्रजाची कैद भारी बेमुरवत ताप सोसवत नाहीं ह्मणून पलून आलों आणखी आमचे लोक फुटून जाणार हे ऐकून बावानी त्यास पाग्याचे स्वाधीन करून दोघास वीस रुा खर्चास दिल्हे त्या तुरुक स्वाराचे पत्र पाग्याचे माणसाबरोबर इग्रजाचे लस्करात गेलें आहे, आणिखी येतात की दगा आहे कळल्यासरखी विनती करीन जुज नित्य आहे सध्याकाळ पावेतों भोजने होत नसतात यामुळे पत्रे लेहावयास बनत नाहीं इग्रजापासून दो तीं कोसावर सडे राहतात रात्रीसही तयार राहाणे पडते यामुळे पत्रास दिरंग लागतो सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Sadashiv Dinkar informs Nana Fadnis how assiduously Mahadji was exerting to put down the English in this aggressive war and how the latter were practically exhausted

---

*No 120* ] [ 29 April 1780

श्री

राजश्री नारो सिवदेव गोसावी यासी—

दडवत विनति उपरी राजश्री बाबूराव वैद्य सरकारातून महेश्वरास गगाजल निर्मळ मातुश्री अहिल्याबाई होळकर याजकडे येणार त्यास इकडून कोणी महेश्वरास पाठवाव ह्मणोन मातुश्रीनी लिहिले होते त्यास राजश्री तुकोजी होळकर यांची व मातुश्रीची शुद्धता व्हावी याजकरिता वैद्य येऊन बोलणार तरी येविसीची माहितगारी पेशजी पासून तुह्मास आहे तरी आपण महेश्वरास मातुश्रीकडे जावे वैद्य बोलावयासी येतात त्याचे बोलणे यैकून तुह्मी माहितगिरीने त्यासी बोलावे ज्या समई मातुश्रीचे पत्र येईल त्या समई तुह्मी महेस्वरास जावे रा छ २३ शाबर × बहुत काये लिहिणे हे विनती

☞ Naro Shivdev is asked by Mahadji to proceed to Mahesvar for setting right the disputes between Tukoji and Ahalyabai and the disorders of the Holkar State, an object for the attainment of which Baburao Vaidya had been specially deputed from Poona Naro Shivdev was asked to effect a reconciliation between Ahalya bai and Tukoji

---

*NO 121* ] [ 23 July 1780

श्री

श्रीमन राजश्री नाना स्वामी गोसावी यासी—

श्री हरकूबाई होळकर दडवत विनती उपर येथील कुशल ता अशाड वा ७ मुकाम महेस्वर जाणोन स्वकीये कुशल लेखन आज्ञा करीत असिले पाहिजे विशष राजश्री तुक ( ला ! ) अपा तात्येर

यानी सरंजाम मेळऊन बडवाणी पेटी घालोन पछमेकडोन येऊन गुलज्यारखानावर छापा घालोन धरावे येसे केले होते त्यासी मुकाम मजकुरी कितीकाही भये घातले की हे तुह्मी काय खूल करिता ? त्याजवरून सरंजाम माघारा आनविला उपरातिक पालत लाऊन धरावे येसा योग केला होता तों अफवा येकतो की दक्षणत पलटणे अली त्याजवरोन हे काम राहिले बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति

☞ Harkubai Holkar informs Nana Fadnis why the party of troops sent against Guljarkhan had been recalled

---

*No 129* ] [ About 15 August 1780

श्री

विज्ञापना येसीजे तुम्ही राजश्री विसाजी आपाजी यास पत्रें छ १९ रजबची पाठविली ती छ ११ साबानी पावली त्यातील साराश, गुजराथेंतून उजनीस छावणीस आले, तों गोहद्कर जाट व इग्रज याणी ग्वालेर मार्गे टाकून नरवरानजीक येऊन अत्रीवर छावणी केली नजफखानानी फौज पाठऊन होलकराकडील जयपूर प्रातातील रामपुरा व टोंकतोडा येथील अमल उठऊन आपला बसविला दोघाच्या उमेदी चाजत बर्सात माळव्यात यावें, गुजराथची मसलत स्वतसिद्ध उभीच आहे गोविंदराव गाइकवाड गुजराथेंत रवाना केले त्याची कुमक जाली पाहिजे असे ती चौ प्रकारचे अदेशे पुढे उभे ठाकले हें वर्तमान पुण्यास ल्याहावें, तेथून सलाह लिहून पाठवितील तसे करण्यात येईल विसा रोजात उतरे आणवावी असे राजश्री पाटीलबावानी सागितले ह्मणून तर येक गाडराचे पारपत्य बाजत बरसात गेलें याजमुळें इतक्याही मसलती उभारल्या, लिहिल्या त्या खऱ्या आहेत त्यास येविसीं तुह्माकडील पत्रे छ २५ रजबची आली होती त्याची उतरे दोन रवा नग्या येक डाकेबराबर व येक कासीद जोडीबराबर छ १४ साबानी जाहाल्या आहेत ती पत्रे पावतील त्या अन्वये ठरावात आणून उतरे जलद यावी साराश हिंदुस्थान व गुजरात कोंडाईबारी व कल्याण प्रात च्यार जागा मसलत पडली याखेरीज खादेशप्राती साप्रत त्याणी पेशकदमी * केली नदूरबारेस केसोपत दातार येऊन लबाडी केली कोंकण प्राती सरकारचे जागे त्याची बलकटी राहिली पाहिजे असे जाताचे मसलतीचा उपराला राखणे फौजा व सरंजामाची तरतूद करणे त्यास पैका किती पाहिजे दौलतीत काहीं शक्त राहिली आहे नाहीं, हें सर्व पाटीलबावास माहित गारी आहे मनुष्यमात्राच्या तऱ्हा व रीती कोण कोण्या जातीच्या जाल्या व होतात तो अनुभव निरतर आहेच यात येक येक निश्चतेविसीं व सरकारची दौलत व घरोबा राखणेविसीं येक पाटील बावाचा मात्र भरवसा आहे, तसे ईश्वर यशही त्यास देईल चिंता नाहीं सदरहु अन्वये मसलती प्राप्त इतक्याही जागा वेध पाडून शत्रूस जरब बसवणे त्याचे प्रकार पूर्वी लि॥ आहेत त्याप्रो अमलात येई ते करावें उतरे प्रत्योतरें जावीं, मग करावें, इतके फुरसतीचे दिवस राहिले नाहींत ह्मणून पत्री आज्ञा जाली × येविसीचे अर्थ अलाहिदा पुरवणीस लि॥ आहेत, त्याजवरून विदित होतील सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Sadashiv Dinkar writes to Nana Fadnis in reply to his letters which are fully quoted here and which explain, the plans suggested by Nana for Mahadji's adoption

---

* प्रवेश

*No 123* ] [ 4 November 1780

श्री

पौ छ १३ रमजान इहिदे समानीन ह्मा डाक

सेवेसी विनती सेवक नारो सिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ ४ रमजान मु।। उजेन स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष आज्ञा घेऊन स्वार होऊन जामगावास आलो तेथें शरीर भोगामुळें च्यार मुक्काम जाले नंतर तसाच तेथून निघोन दर मजल चाललो पर्जन्यामुळे लहानमोठ्या मजला होत छ २५ शाबान रविवारी येथे पावलो ते दिवसीही ज्वर आला त्याची निवृत्ति जाल्यावर गुरुवारी राजश्री पाटीलबावा याचे दर्शन जाले आज्ञेप्रमाणे सर्वार्थ बोलण्यात आले स्वामींचे पत्र स्वदस्तुरचे प्रविष्ट केलें विनती केली कीं देसी शत्रूनें हिमत भारी धरून आटोपाविसीं आक्रमशक्त्यावलंबन केलें दवलत खावंदाची सरक्षणविसीं अधिकार व हिमत व निष्ठा श्रीनें आपणास दिल्ही आहे त्याप्रमाणे वर्तनही दृष्टीगोचर जाले पुढेही येशाधिकारी आपण आहेत आपली स्वारी देसी गेल्यानंतर श्रीमंताचे व आपले दर्शन होऊन येकत्र मसलत केल्यास शत्रु पादाक्रांत व पराभवास पावतील खावंदाचे दौलतीचा बंदो-बस्त होईल मोठे यश पदरी पडेल विलंबास काल राहिला नाहीं त्वरा जालिया फार उपयोग उतर जालें जे तुह्मी ह्मणता ते प्रमाण, परंतु मसलती निकडील तिकडे विखरल्या आहेत त्या जेथील तेथे आटोपल्या तरीच हाती चढतील हिंदुस्थानातून खुष्कीतून अडविण्यास इंग्रजास मार्ग मिळाला, वर्जायास * कोणी नाहीं सुजाउतदौलाचा मुलूक कासी प्रयाग पावेतो अगोधरच दाबला होता अलीकडे अंतरवेद रोहिलखंड घेऊन दिली आगरा येथें कोठीस जागा मागोन बलेंच कोठी घालावी असी हिकमत धरितात गोहदकर जाटानें ग्वालेर किला व प्रांताकरिता इंग्रजाची पलटणे कुमकेस आणून ग्वालेर किला घ्यावा आशाबध्ध होऊन इंगरज आणिले त्या इंगरजानी दगा करून ग्वालेरचा किला घेऊन गोहदकरावर दृष्ट फिरविली किला आपणच आटोपून थाणा † केला तेव्हा दिली आगरे धरून ग्वालेरपावेतों मुलूक मागे टाकून पुढें चाल धरली पातशाही मुलूक त्याचे आहारी पडला नजबखान साहेब फौज असता पातशासुधा लाच्यार जाले हिंमत असती तर अंतरवेद रोहिल खंड राखते ते न जाले येकट्याच्याने इंग्रजासी बिघाड करवत नाहीं आपले फौजेची कुमक इच्छितात श्रीमंताची फौज त्यास अनुकूल जाली तर हिमत धरून बिघाड करतील येविसीं राजश्री पुरुषोत्तम माहादेव हिंगणे याची पत्रें सरकारात आली आह्मासही मारनिलेचे पत्र व पातशा व नजफखान याची पत्रे आली व येनान त्याची उतरे अद्याप गेली नाहीत याचे कारण पुण्याहून आह्मास बरचेबर पत्रे येतात जे उभयता सरदारानीं कोंडाईबारीस यावे या अनमानास्तव अदेशा आहे मसलत कबूल करून येतो ह्मणून लेहून पाठविल्यास जाणेच प्राप्त जाणे न जालें तर पातशा नजबखान देखील इंगरजास मिलतील कलकत्याहून नवा कपू येऊन कानपुरास दाखल जाला ग्वालेरचे थाण्यास येतो बरसातीत यमुना न उतरवे तर दसऱ्यास उतरोन येतील ह्मणजे दक्षणेकडे कूच जालेच आह्मी देसी गेल्यास इकडील गत काय? माळवा गेला तर फौज आह्माजवळ कोणत्या यैवजावर राहील? यास्तव इकडील बंदोबस्त राहाण्याचा विचार काय तो करणे आह्मी देसी येतों आह्मी विनती केली जे, मसलत हिंदुस्थानची आपण यथार्थ सांगितली देसी सर्व प्रकारे बिघा तेथील बंदोबस्त न करिता ठीक नाहीं हिंदुस्थानचे बंदोबस्तास उभयता सरदाराकडील फौजा जाऊन शह मजबूत राखून खाशा स्वाऱ्या देसी जाव्या सरकारची फौज हिंदुस्थानात पाठविल्यास आल्याकरिता कोणी मातबर कर्ता पाठविला पाहिजे त्याची नेमणूक सरदाराकडून व्हावी अगर सरकारातून कोणास नेमावें तेही तजवीज आपण स्याहावी ह्मणून तीन च्यार पत्री लेहून पाठविलें

---

* अडविण्यास † आटोप, व्यवस्था, a place to stay in Molesworth

तत्रापि मोघमच राहिले आता तर निकडच बसली तथाप आपण उभयतानी फौजेची तयारी करावी आळा राखी असी मातबर तजवीज करावी सरकारची फौज दाहा बारा हजार इकडील कुमकेस येईल त्यानी व आपल्यानी येक चिते बदोबस्त करावा उभयता सरदार खाशानी देसी जावे उतर जाले जे गुदस्ता तोही प्रकार केला परिणाम समजला राजश्री विसाजी गोविंद निा बुधेले मातबर जमाव घेऊन गढ्या मटल्याचे राज्य सोडविले त्याचा उपयोग काय ? तीच फौज सरकारची पतर्के व खडेराव हरि आबोजी इगले यास सामील होऊन गोहदकर व इग्रजाचे पारपत्य केलें असतें, तर हें खूल मोडून इकडील बदोबस्त केला असता. मग नवेही राज्य सोडवावयास येते बदोबस्त होता जुन्याचाच बदोबस्त नाहीं नव्याची गत काय ? आता हिंदुस्थान इगरजानीं बळावले येक सरदार खासा हिंदुस्थानात जाईल, रात्र दिवस परम साहास होतील, तरीच काय होणे ते होईल चौ घरचे च्यार गेल्याने व्यर्थ आहे टकरून पाठीमागे झोंबडें घेऊन देशास येतील खासा सरदार हिंदुस्थानात जाईल, त्याने आजपासोन पातशा नजफखान रोहिले पठाण सुज्यातदौलाचा लेक व लहान थोर राजे रजवाडे याजकडे राजकारणे खेलऊन मेलऊन घयावें दसरा होताच पातशा नजब खान रोहिले पठाण सुज्यातदौलाचा लेक याजकडून अतरवेद रोहिलखडात कलागत लाऊन द्यावी. ह्मणजे पलटणे जेथील तेथे अटकून पुढील चाल राहिली सरदाराने इकडून निघोन सर्व राजे मेलऊन ग्वालेरचे इगरजावर जाऊन तुडवावें असेच जागा जागा टोकले तरीच आयास येतील येका सरदारान कोंडाईबारी आटोपावी रात्र दिवस मेहनत करून इगरज दमवावे तुडवावे मुबईकर सरकारचे फौजेकडे आहेत बोरघाट व कोंडाईबारी दोन्ही मसलता जवळ जवळ आहेत येरून येराची ( हेरून, हेराची ) बातमी राखून परस्परे कुमक करीत जावी विनती केली जे, सर्वांस कारण आधीं आपली व श्रीमताची भेट व्हावी येकचित्त होऊन मनसबा करावा इकडे राण खाली पडतें तर फौजेचा जथ सिरोंज भेलशाच सुमारे करवावा उभयता खाशानी लाब लाब मजली करून देसी जावें श्रीमतासी भेटून येकचित जाल्यावर येके जागा राहून येक येक मसलत पुर्ती ठिकाणी लावीत जावी इगरजाचा नीस (?) काढीत जावा बरें दिसल्यास तसेंच करावें निर निराली मसलत करून भिन्न भिन्न जावें हेंच पक्के ठरले तर मसलती वाटून घेऊन आपआपले कामावर जावें आधींच बाबाची निष्ठा स्वामिकार्यावर सदृढ व स्वामींचे दर्शन होणे मोटा उपयोग जाणून कोणेही प्रकारें खावदाचे दौलतीचा बदोबस्त व्हावा असें चितात आणून विनती मान्य करावी या समतास येथीलही कारभारी अनकूल होऊन बावास विनति केली ती मान्य करून सल्हा सागितली ती निराली पुरवणी विनविली आहे मनन होऊन उतर फार लवकर यावयाची आज्ञा जाली पाहिजे होलकर हिंदुस्थान कबूल करीत असल्यास बगाल्यापावेतों सोडवीत जावें असा जिमा लाऊन मसलत त्यास सागावी आह्मी कोंडाईबारीस येऊ हिंदुस्थान कबूल न करीत तर कोंडाईबारीस जावें श्रम सायास करून इगरज मोडावे आह्मी हिंदुस्थानात जाऊन चाकरी करू × पत्राचे उतराची आज्ञा लौकर जाली पाहिजे उतराची प्रतीक्षा आहे उतर आलि यावरी मुहुर्तानें बाहेर निघणार सेवेसी स्रुत होय हे विज्ञापना

☞ Noro Shivdev after leaving Jamgaon writes to Nana from Ujjain the conversations and discussions he held with Mahadji on the conduct of the operations against the English and the best method of overcoming them Several moves are suggested and Nana s answers requested back quickly Mahadji's sincere devotion to Peshwa's interest is quite apparent in this communication

*No 124* ]　　　　　　　　　　[ 12 September 1780

श्री

सेवेसी विनति सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १२ रमजान स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष छ १३ व छ १४ शाबानची पत्रें सदाशिव दिनकर याचे नावे सादर जाली होती तीं त्याचे जाब आमचे प्रतिक्षेस्तव अटकले होते ते लौकर पावावे याजकरिता डाकेबरोबर पाठविले आसत त्यातील अर्थाचे मनन होऊन जाब सादर जाले पाहिजेत

मानाजी सिंदे कोल्हापुरी आहेत तेथून सावताचे वाडीस जाऊन तिकडून मुबईस जावें असा मनसबा त्यानें केला हे वर्तमान राजश्री पाटीलबावास कलले त्यावरून बावानी सागितले जे येविसींचा बदोबस्त लौकर होऊन मानाजी सिंदा सावताचे वाडीकडे जाऊ न पावे ते केले पाहिजे सावतासही ये विसी सावध व ताकीद जाली पाहिजे × ह्मणून बावानी सागितले कलम १

ग्वालेरचा किला इग्रजानीं दगा करूल घेतला गोहदकरास न देता आपणच बदोबस्त केला. गोहदकरासी फिरून गोष्ट सागितली होती त्यावरून रजवाडे लाहान मोठे येक होऊन ग्वाले-रची रसद बद करणार होते काल राजश्री गगाधर गोविंद बुंदेले याचें पत्र बावास आले लिहिले होते जे, सात लक्ष रुो नरत घेऊन ग्वालेरचा किला गोहदकर जाटाचे हवालीं करावा असा निश्चय इगरजानी करून किल्ल्यावरील जकिरा दारूगोला तोफा आदिकरून उतरून घेऊन खाली केला असे लिहिले होते इगरज बेइमान हें सर्वांस कललेंच आहे किला जाटास मिलाल्यानें दुसरी तऱ्हा होते की मिलत नाहींत पाहावे × याउपरी येईल वर्तमान सेवेसी विनवीन कलम १

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना राजश्री हरिपत तात्या याचे निखालसी विसीच्या बोलण्याचा प्रकार चालला आहे निश्चयात येईल त्याप्रा। लेहून पाठवीन साराश, स्वामीचे मरजी वितरिक्त हे होणार नाहींतसे दिसते हे विज्ञापना राजश्री चिंतो विठल वगैरे देसी पाठवावयाचा निश्चय जाला आहे जाधवाचे स्वार मजबा। दिल्हे आहेत ते राजश्री बावाकडीलही लोक घेऊन रा। करितो हे विज्ञापना

☞ Naro Shivdev writing from Mahadji's camp at Ujjain suggests to Nana that Manaji Sinde may be hotly pursued He also writes an account of the capture of Gwalior by the English

---

*No 125* ]　　　　　　　　　　[ 25 October 1780

श्री

विज्ञापना यैसीजे राजश्री चिंतो विठल मदोसरी होते ते उजनीस आणिले पुढें रवानगी करावयाकरिता बजिदी होती स्वामीची आज्ञा दो ती पत्रीं आली जे गारदी कारकून रवाना केले आहेत, पावतील पका बदोबस्त करून रवाना करणे त्यावरून गाडदी व कारकुनाची प्रतीक्षा होती आले नाहींत राजश्री पाटीलबावा येथेच स्वाधीन करून घया ह्मणत होते आह्माजवल यैवज ह्मणण्यास वाघोलकर जाधवाचे शभर राऊत तैनातीचे व राजश्री कृष्णाजी व सदाशिवराव पवार याचे शभर स्वार देवासाहून आणिले येकून दोनसे याजबरोबर लावणे, खातरजमा होईना आधी चिंतोपत गुणाची वस्तु बऱ्हाणपूरपावेतो मार्गातील अनेक अदेशे, खादेशात इग्रजाचा बखेडा, यास्तव बावास विनती केली कीं आजव्यापावेतो आपण पोहचाऊन द्यावे जाधवाचे व पवार मिलून दोनसे स्वार समागमे देतों अजठ्यात याचे हवाला करावे तेथून पुण्यास घेऊन जातील तेंव्हा

बावानी बऱ्हाणपुरास पोहचाऊन देतों कबूल करून पीरखान पाग्या याचे स्वाधीन चिंतोपंत होते, त्यास आज्ञा केली की चिंतो विठल यास बऱ्हाणपुरास घेऊन जाणे जातीने पीरखान आजारी लघनाईत बारगीर पागेचे शमर सवासे माणूस घरासभोंवते चौकीस होते. त्यापैकी येका जणाबरोबर चिंतोपतानी बावास सागान पाठविले जे पुण्यास पाठऊ नये येथे राहतो जाच ह्मणाल तर प्राण देईन असा निरोप पाठऊन आपण घरचे दरवाजे आतून बद केले निरप बावाजवळ गेल्यानतर त्यानी राजश्री रघुनाथपत फराशखानी याजबरोबर सागोन पाठविले जे पुण्यास पाठवीत नाही तुह्मी बऱ्हाणपुरी जाऊन राहावें पुढे तुमचे विचारे करणे ते करायास येईल तरी चिंतोपत यैकेनात विश्वास येईना तेव्हा राजश्री रायाजी पाटील यास खातरजमा करावयास पाठविले की बऱ्हाणपुरास जावें पुढें जाऊ नये आह्मीही पाठवीत नाही तत्रापि खातरजमा जालीच नाही मी प्राण देतों यैसे उतर केले पाटील व रघुनाथपत फराशखानी तेथून बाहेर निघता चौकीदारास ताकीद केली की चौक्या बाहेर आहेत आठ दाहा माणूस पलगाचे चौकीस जागत राहाणे उभयता निघोन बावाकडे आले पाहाटेची साहा घटिका रात्र राहाता वर्तमान बावाकडे गेले जे चिंतो विठल पळून गेले हे कलताच बावा बाहेर येऊन मागोमाग राऊत पिटले जिनके मार्ग होते तितक्यानी जागा जागा लोक पिटले गावातही दगा मातबर जाला घरोघर झाडे घेतले ठिकाण लागले नाही राऊत दाहा बारा कोसावरील फिरून धार बदनावर दाहोद पर्यंत गेले, ते आद्यापि आले नाहीत घरी चिंतोपताची स्त्री व कन्या दोघी होत्या त्यानी विष भक्षून मेल्या त्याची दहनें जाली राहता घरी चिंतोपताची भावजई विधवा व येक मूल पुनव्या म्हणतात दोघे आहत चिंतोपत पळाल्यामुळें पीरखान जमादार पाग्यास दुखणाईत उचलून वाड्यात नेले डोचके मारा ह्मणून आज्ञा जाली दुखणकरू ह्मणोन रदबदल्या जाल्या तेव्हा कोठडीत कोंडून ठेविला बारगीर चौकीचे धरून नेऊन मुश्का बाधून येक रोज टाकिले कारकुनास डागला दुसरे रोजी काल छ १३ सवाल गुरुवारी मारायास नेले त्या काली पाच च्यार आसाम्या कबूल आल्या जे आह्मी काढून दिल्हा दाखला पता सागतो यास्तव माघारे आणिले याउपर दाखला पता सागतात किंवा बारगीरच जिवे जातील पाहावे × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना '

☞ Naro Shivdev writes a graphic account of the flight of Chinto Vithal Rairikar from his custody at Ujjain A similar account of this incident exists in Appaji Rao's letter of the same date

---

*No 126* ] [ 13 October 1780

श्री

पौ छ २३ सवाल इहिदे समानीन हा एक

विनती सेवक नारो शिवदेव सा नमस्कार विज्ञापना ता छ १४ शवाल शुक्रवार प्रहर रात्री मुक्काम उजेन स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष काल विनतीपत्र डाकेत रवाना केलें तें प्रविष्ट होऊन राजश्री चिंतो विठल पीरखान पाग्याचे बारगिराचे चौकीतून पळून गेले, त्याची स्त्री व कन्या चौकीत आत घरात होत्या त्यानी विष भक्षून मेल्या त्याचे दहन जाहालें हें वर्तमान विदित जाले आसेल चिंतो विठल पळून गेल्याची फाळजी राजश्री पाटीलबावास फार लागली याची कारणें अनक आहेत सारे शहरची वेशी नाके गल्या धरून चौक्या व शहरचे आसपास बदी करून झाडे घयावयास प्रारभ केला कुशाबा कारकून मारनिलेकडील धरून

आणून कालच मारहाण केला आसता कबूल आला नाहीं आज दो प्रहरा बाबूराव चिंतोपताचा मेहुणा कुटुंबसुधा सापडला तो धरून आणून सामापचारे सेवटी साडस देखील लाविले परतु कबूल आला नाहीं शोध घेता घेता सध्याकाळीं चिंतो विठल्ही आबदालपुऱ्यात सापडले ते दोन घटिका रात्रीस धरून वाड्यात आणिले राजश्री रायाजी पाटील व दतु खिजमतगार याचे मेहनतीची शर्त जाली. आज तीन च्यार रोज दिवस रात्र यानी मेहनत करून धरून आणला तोंच पायात बेडी घालून वाड्यात गाडद्याच्या चौकींत ठेविला वर्तमान स्वामीस कलावयाकरिता विनती केली असे चिंतोपत सापडल्यानतर बाबाचे भोजन स्वच्छतेने जाले व झोपही घेतील दोन तीन दिवस भोजन निद्रा देखील वर्जिली होती असी स्थित बाबाची जाली होती त्याचे सार्थक सापडल्याने जाले सेवेसी स्रुत होय हे विज्ञापना

☞ After a great deal of search and tremendous exertions Chinto Vithal was found concealed in a house at Ujjain, was arrested and given in shackles into the charge of guards Then only could Mahadji breathe a sigh of relief, reports Naro Shivdeo

---

*No 127*] [16 October 1780

श्री

पौ छ २५ सवाल इहिदे समानीन हा। डाक

सेवेसी विनता सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १७ शवाल मुकाम उजेन स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री चिंतो विठल पीरखान पाग्याचे चौकीतून पळून गेले त्याचा स्त्री व कन्या विष खाऊन मेल्या त्याचे दहन जालें हे वर्तमान पूर्वी विनविले नतर शहरची आगदी बदी नाके गल्या व शहरचे आसपासची चौक्या ठेऊन तकडबद करून झाडे घेत चालले त्यात आगोधर बाबूराव चिंतोपताचा मेहुणा सापडला तो धरून आणून साडेसाखाली तोडला तेव्हा निलेपत बक्षी रहमनपूरकर नि॥ प्रतिनिधि येथें व्यकटराव कासी बुद्देले याजसमागमें आहेत ते घाबरून सागावयास आले जे, चिंतो विठल आज प्रात कालीं आमचे घरास आले आहेत हे यैकताच त्यासही धरून आणिले, बेडी घालून वाड्यापुढे गाडद्याच्या पाहऱ्यात ठविले हे वर्तमान छ १४ मिनहुम विनतीपत्रीं लेहून पाठविले पावले आसेल राजश्री रायाजी पाटील व दतू खिजमतगार यानी मेहनतीची शर्त केली त्रिंबकराव देशमुखही या प्रसगी बरेच उपयोगी पडले बारकाईने शोध बरे लाविले नारो गोपाल, त्रिंबकजी भालेराव व गोगटे हेही कैदेंत आहेत सर्वांची रवानगी पुण्यास करावी परतु औघया मूर्ति गुणाच्या येकत्र आसता काय फद करतील न कळे यास्तव नारो गोपाल व भालेराव गोगटे तिघास मौकूफ करून चिंतो विठल व बाबूराव कुशाबा राडा पोरासुधा रवाना करावयाचा निश्चय करून राजश्री पाटीलबावानी आह्मास बोलाऊन नेऊन आज्ञा केली कीं चिंतोपतास आपले स्वाधीन करून घेऊन रवाना करणे उतर दिल्हे जे, आह्मानवल वाघोलकर जाधवाचे शभर स्वार देवासकर पवाराचे स्वार शभर येकून दोनशे आहेत इतक्या सामानसी रवाना करवत न ईत अजळ्यापावेतों आपण पोहचाऊन यावे, उडणगावी जाधव व पवाराचे स्वाधीन करावे तेथून पुण्या(स) घेऊन जातील तेव्हा मान्य जाले जे बऱ्हाणपुरास पोहचाविता तुमचे दोनसें राऊत समागमे देणे त्यानी बऱ्हाणपुराहून पुढे घेऊन जावें असें ह्मणतात आह्मी उडणगावी पोहचवा ह्मणतों कबूल केल्यास उतम, नाहीं तर बऱ्हाण पुरपावेतो पाठवितो ह्मणतील तेच यैकून रवाना करावे लागतील आज व्यतिपातामुळे मुकाम जाला उद्ईक रवाना होतील देवासकर पवाराचे व वाघोलकर जाधवाचे मिळून दोनसे स्वार समागमे

देतो ते बऱ्हाणपुराहून पुढे घेऊन येतील त्यांदेशांत इग्रजाचा दगा आहे याजकरिता स्वामीनी कारकुनासमागमे गाडदी देऊन इकडे रवाना केले आसल्यास बरेच जाले बऱ्हाणपुरी याची त्याची गाठ पडेल जमावाने सभालून जाताल रवाना नमले जाल तर आता रवानगीविसी आज्ञा जाली पाहिजे मातबर जमाव बऱ्हाणपूरपावेतो येऊन यास सभालून नेत तें जालें पाहिजे येथून राऊत आह्मी समागमें देतों त्याची नावनिसी कारकून व गाडदी सरकारातून रवाना होतील त्यास कलली पाहिजे, याजकरिता लिहिली असे बिनपसील—

पागा नि॥ पवार देवासकर

१ सुभानजी ताबे पाग्या सरदार नि॥ कृष्णाजी पवार

२ नि॥ सदाशिवराव पवार

 १ बहिरजी सावत पाग्या सरदार

 १ बालाजी अनत कारकून ह्॥ सरदार सिपाही

 ——

 २

——

३ येकूण राऊत शभर

नि॥ जाधव वाघोल आमचे तैनातीस स्वार सरकारातून दिल्हे होते ते आज्ञे प्रमाणे रवाना केले त्याचे सरदार

१ सेटिबा जाधव सरदार नि॥ सभाजी जाधवराव

१ रुजाजी देरगा सरदार नि॥ मलोजी जाधवराव

——

२ येकून स्वार शभर

सदरहूची नावनिसी कारकून गारद्यास माहित असावी, याकरिता लिहिली आहे × आणिकही येथे आहेत त्यापैकी त्याच ममतात कोण कोण आहेत याची चौकसी होत आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports the capture of Chinto Vithal, who along with his companions was being despatched to Poona under proper escort (Chinto Vithal was thereafter confined in the fort of Satara where he died in June 1783 )

---

*No 128* ] [ October 1780

श्री

विज्ञापना ऐसीजे राजश्री गोविंदराव गाइकवाड याची रवानगी अमदाबादेकडे केली ह्मणोन पूर्वी लिहिले आले होते त्यास त्याजबराबर फौजा किती आहे, अमदाबाज प्राती जाऊन धान्य पिकलेलें इग्रज व फत्तेसिंग याचे हाती न जाय असे व्हावें त्यास अघाप तिकडे जाऊन हगामा सुरू केला नाही तर त्याजबराबर फौज देऊन तिकडे रवानगी लवकर होय असे करावे बरसातीचे दिवस ही गेले याजकरिता ते फौजमुद्रा अमदाबाज प्राती जाऊन तिकडे जाल पोल प्राताची होय असे करावें ऐन हगामाचे दिवस गुजराथ प्राती फौज लवकर गेली असता त्याचे हाती ऐवज जाणार नाही आपले फौजेची हुशारी याकरिता लवकर गोविंदराव याचे जाणे व्हावे प्रस्तुत गोविंदराव कोठे आहेत, फौज किती हे लिहून पाठवणे ह्मणोन पत्री आज्ञा सादर जाली + राजश्री पाटील बावास पुसिले त्यानी सागितले की गोविंदराव महीकाठास गेले पाणी उतरले ह्मणजे पार होतील तूर्त त्याजपासी च्यार हजार फौज व च्यार हजार पाचे माणूस जमा जाले आहे देसी पतके जुनी त्याची आहेत त्यास पत्रे गेली आहेत ते लोक निघून येतील, त्यास आज्ञा होऊन बऱ्हानपूरचे मार्गे येत असें जाले पाहिजे दुसरी वाट त्यास निभाऊन जायास नाही ह्मणऊन

सागितले त्याजवरून विनती लिहिली आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ In reply to Nana's inquiry about the task assigned by Mahadji to Govindrao Gaikwad, the writer says that Govindrao had reached the river Mahi and was to be joined by his Deccani followers shortly from Poona

---

*No 129* ] [ 11 November 1780

श्री

विज्ञापना ऐसीजे छ २७ रमजानपासून डाकेबराबर सात रवानग्या पत्राच्या केल्या येकाही पत्राचे उतर अद्याप येत नाहीं आह्मी आश्विन वा ७ स निघतो ह्मणोन पत्रें पाठविली त्यास दीड महीना होऊन गेला राजश्री पाटीलबावा कधीं निघतात हेंही वारवार लिहिलें आश्विन वद्य सप्तमीस आह्मी निघोन खडकीवर येऊन मुकाम केला त्यासही पाऊण महिना होऊन गेला असो कार्तिकमास गेला अद्याप उभयता सरदार आपलाले घरीं फौजाची तरतूद नाहीं मसलतीचा निश्चय नाहीं श्रावणपासून पत्रें पाठवीत गेलों कीं भाद्रपदअखेर कोंडाईबारीवर फौज यावी त्यासही ठिकाण नाहीं गाडर आपले सरजामानसी खुषकीनें वसईनजीक आला वसईची वरकड ठाणी तालुक्यातील घेतलीं येक वसई फक्त राहिली त्यास मवैकरानी मोर्चेबदाचे वगैरे सामान बेसुमार केले ते धारावीस आणून ठेविले कार्तिकी पौर्णिमेचे भरतें समुद्रास येते त्या दिवसी पाण्यातून व खुषकीने येलगार किल्यावर करणार ह्मणोन बातमी आली पूर्वी रास्त्याचे पथक व मुसा नारज वसईकडे रवाना केले ह्मणोन लिहिलें होतें परतु इग्रजाचे सामान भारी थोडे फौजेने उपराला होणार नाहीं याकरता राजश्री रामचद्र गणेश व बाजीपत याबराबर गायकवाड निंबाळकर वगैरे हुजरात पाच सात हजार देऊन मागाहून रवानगी करितो पैक्याचे ओढीमुळे प्रसग कठिण पडला आहे आणि मसलत तर सारी इकडेच मुबैकरसुधा भारी पडली आहे सरदार उभयता आपले घरीं परिणाम दौलतीचा ईश्वराधीन आहे आमच्याने होईल तेथवर करितों ईश्वरइछा असेल तशा बुध्दी सरदारास होतील लिहिण्याची बोलण्याची आवधि याउपर काही राहिली नाही वेध नाहीं या करता त्याणी गुजराथ मोकली टाकून वसईकडे जाले सर्व विचार मनसबा ध्यानात आणून पाहावा ह्मणोन पत्र सादर जाले × हे पत्रच बजिनस बाबास दाखविले उतर जाले जे लिहितात हे खरें आहे आमचा विचार होता की सोबत्याची घरची कटकट आहे त्याचें सरय करून देऊन फौजेचा बदोबस्त करून येऊन गुजराथची मसलत त्याजकडे लाऊन द्यावी आह्मास सरकारची पत्रे आली त्याजवरून हिदुस्तानात पातशाहा व राजे रजवाडे यास पत्रे लेहून पाठविलीच आहेत तिकडे आपली फौजे पुढे वाटेस लाऊन देऊन आपण पाचसे राऊत घेऊन सडे येऊन भेट घेऊन अपले मसलतीस जावे यास्तव राजश्री बाळाराव त्याजकडे पाठविले ते दोन महिने जाऊन बसले जाबसाल निर्गतीत न ये याजकारता होळकराकडील वकील बोलाऊन आणून त्यास सागितले कीं आह्मी फौज हिंदुस्तानात रा करितो तुह्मी फौज कोंडाईबारीकडे रा करा तुमचे माहाल इग्रजानी घेतले आहेत, ती ठाणी उठवून देऊन बारीवर असावे तो तुह्मी व आह्मी श्रीमताकडे जाऊ ते आज्ञा करितील त्याप्रो करावें याचे उतर येक वेळ जाले की तुह्मास सोडून आह्मास काही करावयाचे नाहीं याचे उतर आह्मी सागून पाठविले की तुह्मी ह्मणता हे खरेच आहे परतु श्रीमताची आज्ञा आहे की पातशाहाची पत्रे इग्रजाचे मसलतीविसीची आली आहेत, त्या मसलतीस तुह्मी जावे होळकरास कोंडाईबारीची मसलत नेमली आहे, त्यानी ती मसलत करावी ह्मणऊन पत्रे येतात याचा विचार काय ? याचे उतर होळकरानी सागून पाठविले की उतम आहे गुजराथची मसलत करून येऊन तुह्मासही येऊन सामील होऊ घरचा बखेडा पडला आहे, याचा बदोबस्त जाला ह्मणजे लौकरच जाऊ असी उतरे

येत गेली घरचा बखेडा तुटेना यास्तव बाळाराव उठोन आले तें सविस्तर वर्तमान तुह्मास सागितले तुह्मी लिहिलेच असेल होलकरास टाकून यावे तरी कोंडाईबारीचा बदोबस्त कसा होतो? या सदेहाकरिता दिवसगत लागली धण्याचे पायासी आमरणात क्रित्रिम करणे नाहीं जी चाकरी आह्मास सागितली त्याचा बोभाट पडू द्यावयाचा नाही आमचे विचारे येथूनच मसलतीस जावे असे होते परतु ग्रा लौकिक मनस्वी जाला आहे यास्तव भेटी होऊन परस्पर स्वच्छता होऊन आपल्या कार्यास जावे ते होलकराचे हिसक्यामुळे दिवसगत लागून गुजरात मोकली पडून इग्रजाचा जमाव कुल वसईकडे जाऊन सारीच मसलत सरकारातच पडली सरकारात मुलूक राहिला नाही खर्चाचा पेच भारी ते पत्रे लिहितात यात काही अतर नाही याजकरिता आह्मी निघोन देशास यावयाचा निश्चय करून मुहूर्ताने डेरेदाखल जालों तों इग्रजाची सा पलटणे नरवर सिपरीजवल आलीं त्याचे पत्र आले त्याची नकल दिल्ही ती तुह्मी रा केलीच आहे त्याजवरून ध्यानास आले असेल हे टाकून देसी यावे तरी सिपरीकर कमावीसदाराचे पत्र आले त्यात लिहिले आहे की नरवरचा राजा जमावसुधा इग्रजास सामील झाला त्यासी इग्रजानीं करार केला की जो मुलूक सुटेल त्यापैकी निमे तुम्हास देऊ या आशेस लागून नरवरकर आणिक किरकोल रजवाडे यास मेलऊन घेणार तेव्हा इग्रज व रजवाडे येकदर जाल्यास ठीक नाही यास्तव पुढे फौज राजश्री आबाजी इगले याजबा रा केली आहे व पेंढारी दाहा हजार जमा करावयास सागितले होते, ते जमा जाले आता लौकरच गाठ पडून त्याचे वर्तमान येईल, त्याजा विचार करावयास येईल येविसी राजश्री बावानी पत्र स्वामीस लेहून दिल्हे ते सेवेसी पाठविले आहे त्याजवरून विदित होईल पत्री कित्येक अर्थ ल्याहावयाचे आहेत नाहीत, यास्तव राजश्री रामजी पाटील जाधव यास पाठवितो ते सविस्तर अर्थ समजावितील, म्हणऊन बावा बोलले रामजी पाटील याची रा येका दो दिवसात लौकरच होईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports to Nana his discussions with Mahadji on the subject of protecting the Maratha Kingdom against the aggrssion of the English and other enemies, with particular reference to the threatened campaign against Bassen Mahadji admitted the charges levelled against him by Nana and promised to do his best to meet the situation See Mahadji's own letter No 123 ( Gwalior Vol ) of obout the same date

---

*No 130* ] [ November 1780

श्री

विज्ञापना येसीजे राजश्री फतेसिंगराव गाइकवाड यानी बडोयाहून कूच करून मही उतरून बारसदास मुकाम करून सरकारवाड्यात राहिले आहेत गोंदबाची व सरदाराची कुरकूर बडो-यातच लागली होती गोंदबाने विचार केला होता की सिबदीचा दगा सरदारावर करवावा हें वर्तमान सरदारास कलले तेथे कलताच पारपत्य गोंदबाचे करावें चितात होते काबू बनला नाही राजश्री गोविंदराव गाइकवाड मही उतरणार याचे निमित्त करून बडोयाहून कूच करून बोरसदास गेले वाड्यात राहिले गोंदबाही गावातच राहिले तेथे सधि साधून गोंदबास धरून कैद केले पाई बेडी घातली नारो गोपाल गोंदबाचा भाऊ पधरा रोज त्याजवल आला होता, त्याजलाही बेडी घातली आणिखी ग्रहस्त समागम होते ते सारेच कैद करून बेड्या घातल्या येकूनवीस

आसाम्या कैद केल्या गोपाळरावही धरले असें वर्तमान राजश्री पाटीलबावाजवळ आलें फत्तेसिंगाकडील येक ग्रहस्त येथे बावाकडे आला आहे येऊन भेटला जाबसाल होईल तो विनंती करीन परस्परे वर्तमान येकिले जे बावासी सख्य करून याचे हातून सरकारात सूत्र लाऊन कृपा सपादून घ्यावी तथ्य कळल्यावर विनंती करीन सेवसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports the arrest and confinement, of Govind Gopal Kamtekar the Divan of Fatesing Gaikwad at Borsad in Gujrat This man was responsible for the defection of Fate sing Gaikwad and was considered to be a great source of fevil to the Poona Govt Along with him all his followers numbering 20 were also kept under restraint

---

*No 131* ] [ 28 November 1780

श्री

सेवेसी विनंती सेवक नारो सिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १ जिल्हेज मुकाम नजीक ग्वालेर स्वामीच कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष अज्ञापत्र सादर जाले त्यात आज्ञा जे, राजश्री सदाशिव पवार याजविसी मजकुराचे पत्र राजश्री पाटीलबावास लिहिले आहे ते तुह्मी वाचून पाहून त्याप्रमाणे पाटीलबावासी बोलून आनंदराव पवार याजला इकडे पाठऊन देवणे, सदाशिव पवार याचे माहाली व कारकुनास आनंदरायाकडील हरयेकविसीं उपद्रव लागतो त्याचा बदोबस्त करून उपद्रव न लागे असें करवणें येशास राजश्री पाटीलबावा यास व कृष्णाजी पवार[1] आनंदराव पवार,[2] त्रिंबकराव ह्मके देशमुख व रायाजी पाटील इतक्यास पत्रें सरकारचीं सादर जालीं त्यात आनंदराव पवार याचें असल पत्र नवतें, नकल होतीं पत्र सर्वीस पावती करून पत्रान्वयाचा जाबसाल बावास विचारिला त्यानी उतर दिल्हे जे सदाशिव पवार आनंदराव पवार जिवाजी पवाराचे पुत्र येकोदर दौलत जिवाजी पवाराची तिचे वाटेकरी दोघेही होत चाकरी सरकारची दोघानी करावी वडील सदाशिव पवार त्यानी आनंदराव यास येकवट ठेऊन संतोष राखून चालवावें ते न होता निराली वाटणी देऊन चाकरी घ्यावी असें असावें, ते काहीच नाही मातुश्री आनंदराव याजकडे आसता काही खर्चास देईनात मग वाटणी कोण देतो असें जाले तेव्हा आनंदरावानी सरकारात विनंती करून आह्मास सरकारचें आज्ञापत्र आणिलें कीं उभयताची वाटणी करून देणे ते पत्र आह्मी देसी असताच पावलें तों सदाशिव पवार देशीं नवते नतर आह्मी गुजरातचे स्वारीस गेलों आनंदराव समागमे आले सरकारचाकरी करू लागले खर्चास पनास साठ हजार रुो आह्मी दिल्हे सरजामपैकी येक रुा बधूनीं दिल्हा नाहीं आह्मी गुजरातेंतून उजनीस आलों तेव्हा राजश्री कृष्णाजी पवार व सदाशिव पवार आले तेव्हा सदाशिव पवार यास बोध करावयाचा तो केला त्यानी बधूस देवाशास घेऊन गेले कीं निमे वाटणी देतो आनंदराव देवाशास जाऊन राहिले तत्रापि सदाशिव पवार यानीं कराराप्रमाणे वर्तणूक न केली आम्ही उजनीहून इकडे स्वारीस आलों उपरात आनंदराव पवार देशास गेले मागाहून सदाशिव पवारही देशास गेले तेथे आनंदरायानी रदबदल करविली आसताही सदाशिव पवारानी काही मनास आणिले नाहीं पदरी खर्च सरदारीचा, पागा घोडीं हती शागीर्दपेशा तो चालतो कसा? लाचार होऊन उठोन आह्माकडे येता देवाशास गेले तेथें मातुश्री व मुलें लेकरे ठेवावीं आणि खाशानी आह्माकडे यावे, असा मनसबा केला तों जेष्टाकडील गोपाळराव फडनीस व

---

[1] देवास मोठी पाती [2] देवास छोटी पाती

कद्दू वगैरे प्रहस्त आहेत, त्यांनी कलह केला यांनी न येकून मातुश्रीस मुलालेंकरासहित तेथें ठेऊन इकडे आले म्हटल वर्तमान सांगितल्यावरून आश्चर्य वाटलें जे सदाशिव पवार यांनी उजनीत करार करून नेले असता त्यांची वाटणी दिल्ही नाही आणि मातुश्री त्यांची व मुले लेकरे देखील देवाशात ठेऊं न देत तेव्हा तेच धणी, हे चोर जाले कीं काय! खावदाची आज्ञा असता आज-पावेतो हैगई जाली आताही टाला दिल्यास धण्याचा शब्द लागेल यास्तव आनंदराव यास सांगितलें जे, येकायेकी उतावळी करूल, यासही शब्द लागेल तूर्त तुम्ही देवाशाचे आपले वाटणीची जप्ती करणे आणि तूर्त खर्च चालवणे त्यावरून त्यांनी जप्ती करून कादार देवाशास पाठविला सदाशिव पवार याजकडील फडनीस तेथें होता त्याने इंदुरी जाऊन ला तेव्हा याचेही कादारास फौज जमा करणें प्राप्त जालें त सदाशिव पवाराची आहे जेष्ट बधू पासोन आद्यापि गैरसाल जालें नाहीं येथें सरकारचाकरीवरच आहेत पोटास तों पाहिजे राजश्री बाळाजी गंगाधर याजपासोन घेतात गुजरातेंत आह्मी खर्च चालविला वारवार कोण चालवितो सरंजाम पैकी खर्च चालावा या अर्थें मारनिलेपासून खर्चास घेतात श्रीमंताची आज्ञा आली जे आनंद-रायानी हुजूर यावें, येथें मनास आणून आज्ञा करणे ते करू. तेंही उतम मोहीम सरकारची यांचें पथक तैनातीस, ते चाकरीस खासा असावा अनायासें आनंदराव आले आहेत चाकरी करितील आह्मी देशी जाऊं, हेही समागमे येतील निमे वाटणी श्रीमंत कृपालु होऊन देवितील न आता त्यास ताकीद जाल्यास उतम अथवा देशी आल्यासही आज्ञा करणार धनीच आहेत याच अन्वयें बावानी श्रीमंताचे पत्राचे उतर व स्वामीचे पत्राचे उतर दिल्हें तें पाठविलें आहे त्यावरून सर्वार्थ ध्यानास येतील दरकडार्ची उतरें घेऊन पाठविली आहेत आनंदराव पवार नकलेवरून उतर करें यावे ह्मणत होते सेवटीं समजले कीं आज्ञापत्र खावदाचें खरें कृत्रिम दरम्यान होऊन असल ठेऊन नकल पाठविली तीच सिरसावद्य ह्मणून उत्तर दिल्हे, तें पाठविले आहे ही पत्रे पवाराचे जासुदाबरोबर न पाठवणे डाकेत रवा करणे, असे बावानी सांगितलें त्यावरून डाकेत पाठविले असत × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev, upon enquiry from Nana, gives a full account of the dispute of the Pawar brothers of Dewas (two branches ) as related by Mahadji and leaves it to Nana to take what ever final decision would be considered proper and necessary The report was made upon the advice of Mahadji

---

*NO 132* ] [ November 1780

श्री

विज्ञापना ऐसीजे सटवाजी भोसले करवीराकडे होते त्याचे राजकारण आले होतें कीं पेशजी सरकारात होतो त्याप्रो करार करून ठेवावें व अकरा लक्षाचा कनवा सरकारात गुतला आहे तो माघारा द्यावा याप्रो राजश्री परशरामपंत भाऊ याजकडे बोलणे लागले होते त्यांनी येथे लिहून पाठविले त्याचे उतर येथून पाठविले कीं प्रस्तुत इग्रजाची मसलत इकडे दरकार जाहाली शत्रूकडील येक येक फुटाफूट होईल ती बरीच होत असल्यास करावें त्यावरून सटवाजी भोसले आपले सरंजामसुधा निरजेस येऊन भाऊस भेटले अकरा लक्ष रुपयाचा कनवा सटवाजी भोसले याचा ठेविला असता येसाजी सिंदा त्याप्रो येक रुपया देतो ही गोष्ट घडत नाहीं जबरदस्तीच्या पोटी सर्व गोष्टी आहेत तेव्हा कनवा येऊन फलही नाही, द्यावा लागेल, व करवीरकराचेही राज-कारण भाऊकडे आले आहे कीं सामानगड किल्ला खाली पनास हजाराचा मुलूक आहे त्यासुद्धा

तीन लक्षास सरकारात ठेवावा यैवज दिल्ह्यावर तालुका सोडावा व मनोली दिढा लक्षास गाहाण ठेवावी पन्नास रोख द्यावे येकून पाचा लक्षाचा करार चिकोडी तालुका तिन्हाइताकडे अमानत ठेवावा साहुकाराचे यैवजाची रुजुवात होऊन ऐवज ठरेल त्याची तोड पडल्यावर सोडावा, याप्रो बोलत आहेत म्हणोन भाऊनी लिहून पाठविले याचेही उत्तर पाठविलें की याप्रो खातरजमा जाहाल्यावर तह करून फौजसुधा तुम्ही मोकले घेऊन इकडे यावें याप्रो तह जाल्यावर वरकड ठाणी गुदस्ता त्याकडील घेतली आहेत ती सोडावी व राजश्री पाटीलबावाचे वेळेस चिकोडी मनोलीचे वगैरे कागद घेतले आहेत ते माघारा द्यावे याप्रो त्याचे बोलणे आहे येथूनही आपाजी शामजी वगैरे सोडावे म्हणोन लिहिले आहे हें वर्तमान राजश्री पाटीलबावास सागावे म्हणून पत्री आज्ञा सादर जाली × आज्ञेप्रा सविस्तर विदित केले उत्तर जाले जे तूर्त जे आटोपात येईल, कराराप्रा निभावितील, तरी उत्तमच आहे सटवाजी भोसले फुटोन आले हे उत्तम जाले खत द्यावयाचे जाले तरी द्यावे सर्व गोष्टी जबरदस्तीच्या आहेत हेही खरेच आहे गुा राजश्री परशराम पत भाऊ यानी तिकडील कामकाज फार चागले केले येणे करून बहुत सतोष त्याचा वाटला, म्हणऊन तारीफ करीत हाते त्याजरयेपुळे भोसल आले तहही होईल याप्रा उत्तर जाले हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports Mahadji's satisfaction at the desertion of Satvaji Bhosle from the state of Kolhapur and his willingness and decision to serve the Poona party The point was purposely referred to Mahadji's judgment, as he was acquainted with the intricacies of the Kolhapur situation

---

*No 133* ] [ after 14 December 1780 ?

श्री

विज्ञापना येसीजे राजश्री कृष्णाजी व सदाशिवराव पवार याचे कर्जपटीचे फडशाविसीं पूर्वी आज्ञा येके पत्री दिढा लक्षास फडशा करणे, पुरवणीत सवालक्षावर निर्गम करणे छ १७ जिल्हेजचे पत्री आज्ञा सादर जाली जे, सवामध्येंही पाच सात कमती आल्यास फडशा करून यैवजाचा निर्गम होई ते करणें येशास येथें जाबसाल तो विदित व्हावा, याजकरिता विनती केली येथें उत्तर येकच करितो की सोडवण्याचा अखत्यार आमचा नाहीं जाबता दोन लक्ष बाराचा आला त्याप्रमाणें फडशा करून द्यावा नवद हजारावर चढत नाहींत त्यातही बोभाट सागतात की देशात जलगाव व नेवासे दोही माहालची जप्ती केली हिंदुस्थानात पा हमीरपुरची जप्ती राजश्री बालाजी गोविंद याजकडे सरकारची आज्ञा आल्यावरून त्यानी जप्ती केली जप्तीची रीत सरकारचा कारकून यैवजाचे जप्तीस बसावा सरजाम्याचा कादार माहाली राहून अमल करील यैवज नेऊ न पावे असी बदोबस्ती करावी होती, ते न करिता अगदी आमचा कादारच लुटून घेतला आमची पागा तेथे होती ती व वस्तवानी कादाराची देखील लुटून घेऊन कादार उठऊन दिल्हा माहालचा अमल बालाजी गोविंदाचा कादार करितो, वसूल नेतो सध्या तीस हजार शा रसद कादारापासून घ्यावयाचा करार ठराऊन येक दो रोजात भरणा घ्यावा तो हा जप्तीचा प्रकार जाला तीस हजार बुडाले, व माहालचा वसूलही चालला फडशा जाल्यावर धनी कृपा करून जप्ती मोकली करितील परतु आर्धी घोडीं पिर्ढी लुटून नेल्यामुळें आबरू गेली दुसरे मोकलिक जाल्यावर सागरकराचे कादार यैवजास हात पाय लावितील आम्ही वाद कोणासी घालावा ! सरकारचा पका देणें सकट पडेल, यैसे जाबसाल करितात येथें,जाबसाल होत होत नवद हजारापावेतों

आजपावेतों अधिक चढत नाहींत कशीयकोशीय व कारभारी यास निकडी बऱ्याच होतात नवदावर चाल होत नाही उमेद दिसत नाहीं असेही करिता वोढावोढ करिता दाहा हजार आणखी कबूल आले तर न कले लाखावर आले तर चौपन हजार पाहिला वसूल दिल्हान्त आहे. सेताळीस हजार राहिले त्यात जप्तीचा हिसका आहे यैवज तो मजरा मागतील त्यास कसें करावें ? जप्ती उठेल मग रुजुवात होईल असे जाबसाल पडतील यास मुदत फुरसत होईल तर जाब साल उरकतील येविसी आज्ञा काय ते सादर जाली पाहिजे × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev refers the dispute of the Pawar brothers to Nana's decision after communicating how difficult it was to exact from them the amounts due to Govt on account of past arrears, owing to the departure from the recognized rules regarding such attachments made by the clerk deputed for the purpose

---

*No 134* ] [ December 1780

श्री

विज्ञापना राजश्री तुकोजीबाबा याजकडे कितेक वर्तमाने येतातो, बाईनी राजश्री बाबूराव यास सागितली त्यानी पत्री लिहिली आहेत, त्याजवरून विदित होतील मौजे निफाड व नादूर पा॥ चादवड दोनी गाव बाईकडे खासगीस आहेत यैवज वसूल जाला तो बाईकडे आला हाली राजश्री तुकोजीबावा यानी वरात करून बाईकडील कमावीसदाराचे घरी चौकी बसविली आहे येविसी त्यास आज्ञा होईल चौकी उठोन कमावीसदारास उपद्रव न व्हावा येविसो बाईनी बहुत सागितले त्याजवरून विनती लिहिली आहे याचा बदोबस्त होऊन कमावीसदारास तसदी न होय ते करणार स्वामी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev on behalf of Ahalyabai requests Nana to restrain Tukoji Holkar from appropriating to himself the receipts of certain villages in the Deccan which were assigned to Ahalyabai

---

*No 135* ] [ Middle of December 1780
Received on 1 January *1781*

श्री

पौ छ ५ मोहरम इहिदे समानीन हा एक

विज्ञापना येसीजे छ ११ जिल्हेजची पत्रे डाकेबराबर सादर जाली ती छ १८ मिनहुस पावली त्यात आज्ञा जे होळकराच्या घरची कटकट पाटीलबावाच दरम्यान येऊन समजुत करते तर विलब न लागता माध्यस्तद्वारा काम होणे कलतच आहे आह्मी येथून पत्रें मसलती ठराऊन कोठे पाठविली की हिंदुस्थानचे मसलतीवर पाटीलबावानी जावें आमची पत्रें पूर्वी गेली, त्यात उतम पक्ष पाटीलबावानी कोंडाईबारीकडे येऊन इग्रजाची मसलत करावी होलकरानी हिंदुस्थानात जावें हे नच होय, त्यापक्षीं होलकरास फौजसुधा भाद्रपदअखेर कोंडाईबारीवर येऊन पोहचन असे करून मग पाटीलबावानी हिंदुस्थानचे मसलतीवर नमूद व्हावे या लिहिण्याचे अर्थ होलकरानी कोंडाईबारीकडे येऊन मसलत करण्यास देसी येण्यास हिसके काय काय पडतात याची पकी बलकटी होलकराची करून घेऊनच ज्यात दौलतेस व मसलतीस पेंच न पडे असेच पाटीलबावा करतील तरच होलकरास इकडील मसलतीवर पाठऊन आपण हिंदुस्थानचे मसलतीस

नमूद होतील हा अर्थ येथील लिहिण्याचा असता इतक्या गोष्टीची खातरजमा पाटीलबावाची जाली नसता आह्मास सरकारची पत्रें हिंदुस्थानचे मसलतीविषई आली ह्मणतात हें कसें घडते ? होलकराविषई खातरजमा होणारच नाही तेंव्हा पाटीलबावा सहजच इकडील मसलतीस येतील दुसरा प्रकार होलकर मसलत कसी करितील व कसें होईल ही खातरजमा नसता इकडे पेंच पडावयाजोगे करून आपण हिंदुस्थानची मसलत करतील हें कदापि करणार नाहीत, ही आमची खातरजमा होती राजे रजवाडे यास पत्रें पाठविली हें उतम केले परतु मसलतीचा ठराव होणे तो भेट जाल्यावर व्हावा ते समई जे उपयोगी चागले ते घडावें असें होतें तें तूर्त राहिलेसे दिसते बरें तथापि हिंदुस्थानात फौज लाऊन देऊन सडे भेटीस यावयाचा विचार होता तर फौज तरी कोठे गेली ? यास होलकराच्या घरच्या कटकटेचा काही गुता नवता तसी फौज भारी गेली असती अथवा अद्यापही भारी फौजेची रवानगी केली असता पलटणाचे पारपत्य होते होलकराचे वकील बोलाऊन आणून त्याकडे सागोन पाठविले व त्याणी उतरें सागोन पाठविली हे शास्त्रार्थ मात्र बोलण्याचे जाहले. मसलतीस फलादेश काय जाहाला ? बालण्यात आले त्याप्रो त्याकडून करिवण्यात आणले असतें तर असो होलकरास टाकून यावे तर कोंडाईबारीचा बदोबस्त कसा होतो ? या सदेहाकरिता दिवसगत लागली असें लिहिता, त्यास होलकरास टाकून येणे न जाहाले. यामुले तरी कोंडाईबारीचा बदोबस्त जाला की काय, या गोष्टीस दिवसगतीचे साधन हें कसें पाहावें ? धण्याचे पायासी कृत्रिम करणे नाहीं ह्मणतात, तरी हें त्याच्या वशपरपरेत घडले नाही व पुढेही पाटीलबावाची निष्ठा तसीच आहे परतु हें बोलणे सामान्याचे * होय हे थोर सरदार याचे करण्यातच शोभा दिवसे दिवस येत असावी शत्रूचीं पारपत्यें करीत जावीं हेंच चागले जी चाकरी आह्मास सागितली त्याचा बोभाट पडू द्यावयाचा नाही. येथूनच मसलतीस जावें असें होतें परतु गुदस्ता लौकिक जाहाल्यास्तव भेटी होऊन आपलाले कार्यास जावें, तें होलकराच्या हिसक्यामुले दिवसगत लागून सरकारातच मसलत पडली ह्मणोन लिो, त्यास श्रीमत लहान, चाकरी या थोर सरदारास कोण सागतो ? मोठे होत तों श्रीमताची दौलत रक्षावी, उणें पडेल तेथे सभालावें, या गोष्टीची साधने असतील तीं करावीं असे असता इकडील मसलतीचे काही लक्ष मनात न ठेविता येथूनच मसलतीस जावें असें होतें ह्मणून ह्मणतात हें काय ? होलकराच्या हिसक्यामुले, दिवसगत लागते असे समजताच आपण आधी इकडे यावयाचे होते सरकारातच मसलत पडली मुलूक राहिला नाही खर्चाचा पेंच भारी, याछ अतर नाही ह्मणतात याची शोभा हेच होती की आश्विन मासी वीस वीस हजार फौजेनसी इग्रजावर जाऊन उभे राहाते आणि सरकारवर कसाला पडू न देते तर हें मनात आल्याचे सार्थक होते श्रीमतावर लडाई पडली असता अद्याप या लिहिण्याखालींच दिवस गेल तेंव्हा परिणाम ईश्वराधीन आहे मुहूर्तानें डेरे दाखल जाहाला तों इग्रजाची पलटणे सिप्रीजवल आलीं व नरवरवाला त्यास सामील जाहाला, व आणिक रजवाडे मेलऊन घेणार ह्मणोन लिो त्यास, पूर्वी आषाढमासीं पाटीलबावाची पत्रें आली होती कीं तमाम राजे रजवाडे याची राजकारणे ठीक करून मिलऊन घेऊ नरवरवाला तों नजीक होता असे असता त्यास मिलऊन घेण्याचे कसे घडले ? असो वरकड तरी राजे रजवाडे वगैरे कोण कोण हिंदुस्थानच्या राजकारणास पके करून घेतले हें तरी ल्याहावें गोहदवाला तों पूर्वीच इग्रजास मिलोन ग्वालेर घेतली भूपालवाला सिबदी ठेवितो, इग्रजाकडे लक्ष आहे नरवरवाला अलीकडे मिलाला तेव्हा तिवे तिकडे मिलले असें दिसते आणखीही लहान मोठे ज्याकडे राजकारणे लाविली असतील त्याची लक्षे कसी आहेत हे कलले नाहीं गोहदवाल्याचे व इग्रजाचें वाकडे आले ह्मणून ऐकत होतो त्याचे काय जाले ते लिहिणे पातशाहा नजफखान याचें तरी राजकारण पके करून इग्रजावर मसलतीस नमूद करतो असे

* सामान्य गृहस्थाचें

पाटीलबावाचे लिहिण्यात पूर्वी आलेच होते त्याचे काय जाले ते लिहून पाठवावे इंगळ्याबराबर फौज रवाना केली व पेंढारी दाहा हजार जमा जाले लौकरच गाठ पडून वर्तमान येईल ह्मणोन लि॥ त्यास पेंढारी यानीच इंग्रजाचे पारपत्य होते असे नाहीं सामान चागले असल्यास पाच साहा पलटणाचे पारपत्य व्हावयास दिवसगत लागणार नाहीं रामजी पाटील रवाना जालेच आहेत येथें आल्यावर काय मजकूर बोलतील तो कळेल आता विस्तार किती ल्याहावे ? जे त्याचे थोंर-पणास उचित ते करतील ह्मणोन विस्तारयुक्त आज्ञापत्र सादर जाले × यैशास स्वामींनी देशी कोंडाईबारीचे मसलतीस यावयाकरिता दर पत्री लिहीत गेले परंतु यास आस्था हिंदुस्थानात जाऊन चाकरी करून दाखवावी या अर्थे यानीच दोघास दोन मसलती नेमाव्या ह्मणून लेहून पाठवीत होते होलकर तिकडील जाणे कबूल करितील हिंदुस्थान भारी, कबूल करणार नाहींत, यास्तव स्वामीस व होलकरास असें लिहीत होते त्याचे घरीं कटकट निर्माण जाली तेच समई आपण खासा दरम्यान जाऊन तुकोजीबावास व बाईस चागला बोध करिते तर कलह उठता आगर सरकार उपयोगास चागले दिसतें तसे करून सरकारकाम करावयाचे होते, हें प्रमा-णच यास दोघाची भीड दुसर दरम्यान गेले आसता कोण्ही वृत्तीवर न आल्यास चागले समजा-ऊन सागणे प्राप्त कोण बोढील, केले काय, बाईच्या विचारास सुप्रवृत्ति न आल्यास बोलता येईल तुकोजी बावाच न मानीत तर त्यास बुझाऊन सागू जाता, त्यास सरकार चाकरीची उमेद असता बुजविले निमित येईल या अनमानास्तव माध्यस्तीने बदोबस्त करावयास गेले त्याचा परिणाम जाला ते वर्तमान सविस्तर श्रवणास आलें नाशच जाला सेवट तुकोजीबावाची बाईची तूट पडून तुकोजीबावा सेंधव्याची बारी उतरून गेले त्यानी वाकडे व रखमाजीपत सेवेसी पाठविले ते पावले आसतील दर्शनाती भाव त्याचे ध्यानास येतील स्वामींचे आज्ञेप्रमाणे पातशाहा नजफखान यास पत्रे इंग्रजाचे मसलतीकरिता पाठविलीं परस्परे कौलनामे व त्याकडील नानकुराणाचेही अर्थ लेहून पाठविले, येकजण सरदार खामखा हिंदुस्थानात येता लिहिले नेत्र तुकोजीबावाकडे राहिले जे याचे घरचा कलह तुटला ह्मणिजे उभयता मिळून देशास जाऊन स्वामींची भेटी घेऊन होलकर तिकडे ठेवावे, आपण आज्ञा घेऊन हिंदुस्थानात यावे पातशा नजफखानाजवळ सचोटी राहून मसलतीस उपयोग पडेल सारेच अर्थ होलकराचे माध्यस्तीमुळे विलग पडले त्यास इकडे ठेऊन देशास जाता बाईत त्यात काय फिसाद उभा राहील न कळे येणेकरून शत्रूस सवडी होतील अशा अदेशात वृथा काळ गेला हिंदुस्थान आगर देश येकही मसलतीस उपयोग न जाला मागेच देशी जाऊन स्वामींची भेटी घेतली आसती तर च्यार आठ रोजात मनसबे बोलून आज्ञा घेऊन इकडे येते ग्वालेरचे पलटणावर मोहिमेस सिध होते ते न जालें आता ग्वालेरचीं पलटणे सिपरीवर आलीं त्याची पत्रे तसीं आलीं त्यास टाळून जाण गैरसलाह आबूजी इंगळे पुढे रवाना केले, ते राजगडीं आहेत च्यार पाच हजार फौज व काही पेंढार जमा जाले आहे इंगरज दोन पलटणे नरवरावर, च्यार पलटणें सिपरीवरती जेथाल तेथेच आहेत ते इंगल्याचा शह राखून आहेत चालून येत नाहींत इंगळे त्याचा शह राखतात चालून थोडक्यानिसी जावत नाहीं त्याजवळ तोफा दारूगोळा, हे सडे, राजे रजवाडे आपआपले जागा सभाळून दोहोकडे राजकारणें राखून डावे उजवे दस्तदराजीही* करितात गोहदकर आपले जागाच आहे इंग्रजासीं मिळाला, परंतु वचकून आहे आद्यापि ग्वालेर दस्ताऊन बसलेच आहेत, माझे हवाला न केली, डाव चालल्यास गोहद घेनील असा वचक चितात ठेवितो तत्रापि उघडा होऊ सकत नाहीं राजश्री गगाधर गोविंद यासी राजकारण लाविले आहे की तुमची आमची भेटी व्हावी इंग्रजाच पारपत्याचा विचार मी सागतों असी पत्रें गगाधर

× Here ends Nana's detailed letter and begins the writers reply * दस्तदराजी=जुलूम, बडखोरी

पंताची बावास आली नतर दुसरी पत्रे आली जे, आम्ही भेटीस जाटाचे जातो ठरेल मजकूर तो लेहून पाठऊ दतियेकर राज्यानेही बावाकडे वकील ल्य्यू दुव्या ह्मणोन पाठविला होता तो मागती इकडून तिकडे गेला आहे बाहेर इकडेही राजकारण आहे आतून इगरजासीही बोलतो म्हणायास जागा होते की येकाकी आह्मी उघडे जाल्यास इगरज आमचे पारपत्य करितील असी परिभाषा, आतून चेष्टा येक परगणा आलपूर ता। भाडेर होलकराचा जेथे मल्हारजी होलकराची छत्री आहे तो दतियेकराने गोहदकराचे आज्ञेने दाबला आहे, तो सोडून देणे गंगाधर गोविंद ह्मणतात, त्यणे गोहदकराचा उजूर केला तेव्हा गगाधरपतानी गोहदकराकडून दतियेकरास परगणा सोडून देणे असी ताकीद करविली आसता सोडीत नाहीं गगाधरपताची गोहदकराची भेटी होऊन मजकूर काय ठरतो तो त्याचे पत्र आल्यावर कळेल, ती विनती होईल पाटीलबावानी राजश्री सिवाजी विठल यास बोलाऊ पाठविले त्याजकडील चिमणाजीपत आले त्याचा मजकूर निराळे पुरवणीत विनविला आहे, त्यावरून ध्यानास येईल बावाचे मानस आपण वीस पचवीस कोस उतरेकडे व्हावे, आणिखी फौज पाच हजार पुढे रा। करावी इगले त्यास येक करून पुढे इग्रजावर लावावे इगरज पुढे आले तर आपण झडपावे मागे सरले तर सिवाजी विठल व पवार व बळवतराव धोंडदेव यास इगल्यास येक करून सोपून आपण मागे कूच देशाकडे करावें अहिल्या बाईचे मानस पाटीलबावानी हिंदुस्थानात जाऊ नये, देशास जावें गादी खावदाची जतन करावी हिंदुस्थानात च्यार पाच हजार फौज मी पाठऊन इगरजास ठासून राखिते नच यैकत तर आणखी फौज ठेऊन पुस्तपन्हा चागला करीन हेही वर्तमान निराळे पुरवणीवरून विदित होईल भोपाळवाले सिबदी ठेवितात येवजापुरती ठेवितील इगरज पुढे वाढून आल्यास सामील होतील ते पुढे न आल्यास जागा सोडून इग्रजाकडे जात नाहींत येक वकील भोपाळकराचा बावाजवळ आहे त्यासी गोडच बोलतात कागदपत्र येतात जातात पातशाहा नजफखानाचे पत्राचे जाब आले सरदार देशी जातील, हिंदुस्थानात येणार नाहींत असा सदेह राखितात इगरजाचे पारप त्यास आह्मी सिध आहो कौल बेलभडार सरदाराचा येईल त्याप्रमाणे आह्मी कौलनामा लेहून नानकुराण देऊ म्हणतात राजश्री पुरुषोतम माहादेव यास बावानी लिहिले होते जे आम्हाकडील कौल आगर बेलभडाराचा उजूर करितील तर तुम्ही आपला जिमा करून घ्यावा आणि त्याचा कौल नानकुराण घेऊन पाठवावा त्याचे उतर पुरुषोतमपतानी लिहिले आहे जे पातशा कोमलज्ञानी लालची आहे इगरेजानी च्यार लक्ष दरमाहा कबूल करितात, ही गोष्ट नजफखानास पथ्य नाहीं तोरा इग्रजाच्या हातास गेल्यास आपण निर्माल्य व्हावे इगरज आपणासहित पातशाहाचा बदोबस्त करितील हें चागले नाहीं नजफखानाने पातशाची मर्जी फिरऊन इगरजाचा वकील काढून दिल्हा सरदाराची वाट पाहातात की लौकर आले म्हणिजे आम्ही फौज पनास हजार व तोफखाना व प्यादा मबलग घेऊन निघतों आधी सरदारानी यावे असे बोलतात कौलनामा व बेलभडाराचा जिमा आम्ही आपला घेतला तेव्हा नजफखानानीं कौलनामा नानकुराण देतों कबूल केले आहे हातास आले म्हणिजे पाठऊन देतों असे लिहिले आहे हे वर्तमान पुण्यास लेहून पाठविलें आहे ह्मणून राजश्री देवराव हिंगणे यानी सागितले त्या पत्रावरून साकल्य विदित होईल कलकते उजाड जालें फरासिसाची व इगरजाची कटकट जाहाजावरून वाढली फरासीस चालीस पलटणे कलकत्यास आली लडाई लागली साहा पलटणे इगरजाची कतल केली लडाई होतच आहे कलकते उजाड होऊन पाहाडात गेले फक्त सिबदी आत लडवई मात्र आहे असे वर्तमान लखनऊस आले तेथून पाचा साहा रोजानी दिलीस आले दिलीहून तेरा रोजानी येथे वर्तमान आले म्हणोन देवराव हिंगण्यानी सागितले. हा मजकूर पुण्यास लिहिता राहिला ह्मणून त्याचे सागित ल्यावरून विनती केली भोसल्यानी कलकत्याहून चौदा कोसावर मुलूक जाळला हेही त्याचेच

सागणे महमद्अलींखान हैदरखानासी भेटले ही बातमी कलकत्याची लखनऊकडून आली त्याचेच सागणे आहे × सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

☞ This is a long important letter addressed to Nana Fadnis by, it seems, Naro Shivdev At the beginning Nana's letter to which this is a reply is quoted in full and then the general situation in the north, the troubles in Holkor's house, the advance of the British and the views and movements of the various potentates in Malwa and Bundelkhand are graphically described The letter helps one to read and understand the real characters of several prominent persons in Maratha Govt at the time It is interesting to note a reference to Ahalyabai Holkar who is reported to have asked Mahadji to proceed to Kondaibari to protect the Peshwa's dominions and in that case she assured him that she would alone do all that was needful in respect of all political and military affairs in the north

---

*No 136* ] [ 25 December 1780

श्री

विनती सेवक नारो सिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। मार्गसीर्ष वद्य अमावास्या मु॥ इदूर सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीकडील पत्रे वसईकडील तीन खानगियात निकडीचा मार लिा आला राजश्री पाटीलबावाची पत्रे प्रविस्ट केली पत्राचे उतर काय यावे या विचारात पडले आहेत बावाचे मते अवी सिपरीकडे जाऊन इग्रजाची पलटणे आली आहेत याचे पारपत्यच करून जावें हें न करिता गेल्यास लैकिक नीट नाही या विचारातच राहिले, तों अहिल्याबाई यानी बावास सागुन पा। की आधी येऊन भेटी घेणे मग तुमचे आमचे विचारे जे कर्तव्य ते करावे बाईचे मते इकडील मसलत आपण कबूल करून याची या देशास करावी ह्मणऊन परस्परे येकिन्यात येते बाईच्या निरोपावरून बावा कूच करून मु॥ मजकुरी आले महेस्वरास सडेच जातात बरकड फौज उजेनीसच ठेविली आहे तेथें गेल्यावरी सिधात ठरेल त्याप्रा। सेवेसी लेहून पाठवीन येके खानगीचे पत्राचे जाब अलाहिदा पुरवणियात लिहिले आहेत, त्याजवरून सेवेसी विदित होतील सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports Mahadji's departure for Mahashwar at the request of Ahalyabai for a personal discussion with him, regarding war measures tobe taken by both

---

*No 137* ] [ End of December 1780

श्री

विज्ञापना ऐसीजे वसईचे उपराल्यास उभयता सरदारानी यावें ह्मणोन अलाहिदा पुरवणी लिहिली आहे त्यास जर हें न त्याहावें तर पुढें मार्गें ह्मणतील की वसईसारखी जागा असाच प्रसंग होता तर आह्माला जलद कलवावयाचे होते आम्ही जलदीने येऊन उपराला करून सरका-

रचे स्थळ राखिले आसते श्रीमत कैलासवाशी व उभयता कैलासवाशी सरदार याणी मोटे प्रत्ने करून घेतले त्याचे सार्थक आह्मी जिवत असता करतो [ फाटलें आहे ]-विणार असे चितात येऊन ग्वालेरीकडे पलटणे आली आहेत त्याचे पारपत्य करणें जरूर, असा बाहाणा काढून इकडे यावयाचे सोडतील ते ठीक नाहीं इकडे आलियावर तेही दौलत रक्षिणार आहेत उतम मसलत तेच करितील यास्तव तुम्ही येथील विचार आशय पहाल तसे करावे पुरवणी दाखविली असता निकडीने येऊन वसईचा उपराला करतात असे चितातून असल्यास मोठे येकनिष्ठपणाची गोष्ट व लौकिकाची मनात असली तर पुरवणी दाखवावी त्याप्रो जलदीनें येऊन पोंहचतील तर आणि इकडे कसेही होऊ असाच निश्चय असला तर दाखववयाचें कारणच नाहीं कदाचित् ह्मणतील की पचवीस तीस हजार फौजेची तरतूद सरकारची असता उपराल्यास पेंच काय ? तरी ही गोष्ट खरी परतु तीस हजार फौजेची तरतूद केली पौ च्यार हजार गणेशपत बेहेरे याबराबर आहे म गाहून येक हजार आणखी पाठविली येकूण पाच हजार त्याची लढाई केसोपत दातारासी चाललीच आहे राजश्री परशरामपत भाऊकडे करवीरचे व कितूरचे मसलतीस पाच सात हजार गुतलीच आहे श्रीमताजवल दोन हजार, आह्माजवल दोन हजार, चिमापा पानसीयाबराबर पाच हजार ते बोरघाटाकडे पलटणे आली आहेत, त्यावर लढाई होत आहे रामचद्र गणेश याबराबर दाहा हजार त्यास आडवी पलटणें तीन व तुरुकस्वार आले तिकडे गुतणे प्राप्त राताजन परगण्याकडे नरसिंगराव गोविंद व आनदराव जाधव याणी फौज काहीं जमा केली व करून दगा करणार, याकरिता मुढे वगैरे पागा फौज मिलोन दोन हजार पाठविली येकूण येकतीस बतीस हजार फौज प्रस्तुत याप्रो गुतली जागा जागा कामे पडली तेव्हा पोख्त उपराला होऊन इग्रेजाचे पारपत्य कसें होतें हे सविस्तर अर्थ पाटील बावास समजावले असता उपयोग पडतो असे असल्यास सागावे परतु साराश यासमई पाटीलबावानीं उपेक्षा केल्यास परिणाम ईश्वराकडे गादी बळकट तर सर्व सरदाऱ्या काईम पूर्वीही लिहण्यात हेंच यत गेले आहे कीं पाटीलबावा कोठेही असोत इष्ट इकडे असावी त्याचे कारण हेंच आणखीही च्यार पाच हजार फौज नवी ठेवितो परिणाम लावणार ईश्वर आहे ह्मणोन आज्ञापत्र सादर जाले हेंच पत्र बजिनस दाखविले उतर जाले जे मसलतीचे प्रकार लिहिले इतकेही प्रमाण आजपावेतो सोबत्याचा बदोबस्त करून देऊन त्याचा या देसी करून कोंडाईबारीचा बदोबस्त त्यानी राखावा यैसे होते त्याचा घरकलह लागला आहे बाईच्या विचारे समजावीश होणे ते आमचे विद्यमाने व्हावी सुभेदाराच्या व दिवाणजीच्या मते आमचे विद्यमाने समजावीश करू नये यामुळें जे होईल ते सुखे हो हा विचार करून बाहेर निघाले तेव्हा त्याजकडे कारकून पाठविले त्याजबा उतर आले ते सविस्तर तुह्मास सागितले त्याप्रा तुम्ही लिहिलेच असेल अलीकडे ते निघोन मर्दान्याचा धाट नर्मदेचा उतरोन कसरावदावर गेले आहेत सुलतानजी लाबहाते बाईकडे जाबसालास जातात येतात अद्याप सौरस्वाचा विचार होऊन येत नाहीं फौजही त्याजपासी विशेष तूर्त नाहीं दसीहून लोक आणविले असतील तरी न कळे परतु त्याची घरची समजावीश पडून फौज जमा होऊन सरकार कामावर उपयोगी लौकर पडतीलसे दिसत नाही त्यानी वाकडे व रख माजीपत पुणियास पाठविले आहेत त्यासी बोलून हरतजविजे गाठून घेऊन सरकारकामावर पडे ते करावे त्यासी बोलावयास आह्माकडील सशय धरू नये याचे पर्याय तुह्मासी बोललो त्याप्रा तुम्ही लिहिलेच आहेत व राजश्री रामजी पा पाठविले आहेत तेही बोलतील त्याप्रा उपयोगी तूर्त पडत ते करावे होलकराचे मोठे मुदे दोन येक आमचे बा नसावे दुसरे बाईचा बदोबस्त करावा त्यासी आम्हाबरोबर न आल आणि स्वतत्र मसलत कबूल करीत असतील, उतम आहे आमची गुता नाही बाईच्या बदोबस्ताचे म्हणतील तरी तूर्त कबूल करावे त्यात तोड काही राखावी यात सरकार उपयोगीच आहे आधीच त्याचे वृतीस घर आहे नाही हे विदितच आहे

घरचाही काच वारल्यास कोणे वेळेस काय करितील हा भरवसा आहे नाहीं हे नानास विदितच आहे परंतु तूर्त सरकारकाम होय ते अर्थे त्यासी बोलून गाठून घ्यावे त्यास वाकडे तेथे जाऊन बोलणे होऊन उतर प्रत्योतर येण्या जाण्यास अवकाश तेथे तरीं वसईस निकड भारी पडली बाहेरून मदत होऊन माचेयास शह पाडिल्यावाचून ठीक नाहीं इकडे सिपरीवर पलटणे आली. त्याचे पत्र आले त्याची नकल तुम्ही पुणेयास पा। आहे शह साडून जावे तरी ते मुलकाचा बंदो बस्त करीत येण्याचा विचार दिसतो, आणिक नव पलटणे आली ह्मणऊन वर्तमान आहे वसईस तरी निकड पडली असता न जाव हे टीक नाही यास्तव सिधात ठराविला की राजश्री सिवाजी विठल बापू यास बोलाऊन आणून त्याजसमागमे सरकारची पतके पवार व बलवतराव धोंडदेव ही दोनी पतके व आपली फौज तीन च्यार हजार बा। द्यावी पुढे आबाजी इंगले गले आहेत त्यानी यानी येक होऊन सर्वांनी बापूचे विचारे वर्तावे याप्रा। इकडील मसलत त्याचे गला घालून आपण निघोन देसी जावे हा विचार ठरून बापूस पत्र पा। आह ते आले ह्मणिजे त्यासी बोलावे ते कबूल करितील किंवा न करितील इतका मात्र सशय आहे ते आलियावरी होईल वर्तमान लेहून पाठवीन पत्राचा अन्वय येकून वाकडे काही घेतले नाही वसईवर दाटी जाली येणेकरून खिन्न आहेत सर्व अर्थ सिवाजीपंत बापू आले यावर समजतील बोलण्यात तरी येते की इकडील बंदोबस्त करून लौकर निघोन मोठ्या मोठ्या मजलींनी जाऊन पोहचावे होलकर पुढे गेले तरी उतमच जाले न गेले तरी आह्मी जातच आहो वाटेवरच आहेत त्यासही घेऊन जाऊ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ When Goddard threatened Bassein, Nana asked Mahadji to come to its relief at once Mahadji gave the excuse that the British advance through Bundelkhand required his presence in the north He proposed Holkar for the task Incidentally the dis order in Holkar's administration is well analysed by Mahadji in this letter and reported by Naro Shivdev

---

*No 138* ] [ January 1781 ?

श्री

विज्ञापना राजश्री पाटीलबावाचे स्थितिनीतीचे सविस्तर वृत पूर्वी लिहिलेच आहे उजेनी जवलून निघणे लौकर न होये इग्रजानी सिपरी घेऊन पुढे चाल केली, सुरजेपावेतो आल्याची वर्तमान येऊ लागली येथे फौजेचा बंदोबस्त नाही कोणी बोलावे तरी बावाची गाठच न पडे हे पाहोन राणेखानभाई यानी काही बोलण्यात बावाची स्थित ठेविली नाही मग साहुकार बोलाऊन पैवजाची तरतूद केली समय पाहून राजश्री आबाजी नाईक वानवले यानी तीन लक्ष रुपये रोकडे दिल्हे दोन लक्ष चैत्र मासी द्यावयाचा करार केला गावातील साहुकारापासून दोन लक्षाची तरतूद करून लोकास चिठ्या करून देऊन भाईनी येथून कूच करून दर मजल चालले आजपावेतो भेलस्यास पोहचले असतील बावास मागेच ठेऊन फौज घेऊन भाई पुढे गेले असतील राजगडवाले व राघोगडवाल खेची फौजेस येऊन मिळाले भूपालवाले याचे पत्र शाहाजापूर नावे मु॥ आले होते की आह्मी फौजसुधा येतो तही येतील बुदेले याचे पत्र आलेच होते की आपली स्वारी या प्राते आली ह्मणजे आह्मी येतो तही दाहा हजार फौजसुधा येऊन सामील होणार बावाकडील लोक मागून गेले तेही सुजालपूरचे रानात पोहचले बावाजवल फौज दाहा हजार जमा होईल पुढे

अबोजी इगले व सदाशिव मल्हार माजी बक्षी गेले आहेत त्याची व इग्रजाची तफावत चौपाचा कोसाची आहे पेंढारी व फौज आसपास जाल पोल करितात त्याजकडील लोक पुढे काही वाढून तुरक स्वार येतात याची त्याची जुजे होत येत आहेत आता बावाची फौज जवल पोहचली याउपरी येईल वर्तमान ते विनवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना राजश्री सदासिवपत दाजी यास घरास जावयाचा निरोप घेतला ते घरास जातील मी उजेनीस आहे बावाचे पत्र आलेयावर लस्करात जाईन हे विज्ञापना

☞ Naro Shivdev writes from Ujjainh ow Ranekhan Bhai remonstrated with Mahadji on his callous inactivity in the face of onrushing enemies Upon the remonstrance Mahadji becoming alive to his responsibility made the necessary preparations to proceed to the front with all possible haste

---

*NO 139* ] [ 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे दिल्लीहून पातशाहाकडून खवास सुलतानखा न्हावी येथे आला आहे समागमे येक रथ दोनच्यार घोडी काही उटे वगैरे प्यादे वीस पचवीस याप्रमाणे जमाव बरावर आहे काल राजश्री पाटीलबावा याची भेट त्याणे घेऊन पातशाहाची थैली होती ती दिल्ही त्यातील मजकूर भेलशाची तबाखू व चिकणसुपारी पाठऊन द्यावी य.प्रमाणे पत्री फर्माष वरकड खवासाचे जबानी बोलणे जे पातशहा नजफखान इग्रजावर मोहिमेची तरतूद करीत आहेत परतु सरदाराची मार्गप्रतीक्षा करितात या अन्वये पत्रेंही जात येत आहेत साराश सरदाराचे जाणे लवकर त्या प्राती घडावें म्हणजे इग्रजावर मोहिमेची तरतूद करून पारपत्य घडेल म्हणोन बोलतो आतील अर्थ या कामगारीस आला किंवा ब.तमीस पाठविला हे कळेल त्यासारिखें विनविले जाईल × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports to Nana the arrival at Mahadji's camp of an agent named Sultankhan from the Emperor proposing a combined campaign against the aggressive English move The writer proposes to supply further details later

---

*No 140* ] [ January 1781 ?

श्री

विज्ञापना ऐसीजे येके दिवसीं राजश्री पाटीलबावा याजकडे जाऊन येकातात विनती केली जे, सिंद्यानी परपरागत श्रीमताची सेवा येकनिष्ठ कसी केली हे प्रसिद्ध आहे आपण सर्वांपेक्षा सेवा जास्त केली पहिले दौलतेचें तारुण्य त्या भरावर पहिले सिंद्यानी बाहेर तरवारा मारून मुलूक रुपया मेलऊन खावदाकडे पाठवीत गेले खावदाचे घरचे बदोबस्ताची मेहनत त्याजवर पडली नाहीं, ती गोष्ट आपणास प्राप्त जाली तेव्हा देशीं जाऊन शत्रूचीं पारपत्यें करून खावदाचे घरचा व दौलतेचा बदोबस्त करून लौकिक मेलविला असें आसता गुदस्तापासून माघारा आली गुजरात गेली हे दृष्टीस पाहिलें, परतु गाडर इगरजाचे पारपत्य न जाले तो सुरतेस गेला आपण गुजरातेत

छावणी करिते तर गाडर सुरतेतच राहाता वसईकडे जाऊ न पावता उजनीस छावणी जाल्यामुळें इंगरज मोकला जाला त्याने वसईस वेध लाऊन घेतली,हे अपलौकिक लोकोत्तरी काय आहेत श्रवण करावे आयुष मर्यादा नियम औतारादिकासही जाले आहेत सेवटील दिवस त्यासही टलला नाहीं तेथे मनुष्यास सेवटील दिवस टलतो असे नाहीं येक दिवस सेवटचा निश्चय येईल यात संदेह नाहीं आपण विद्यमान आसता अपलौकिकाच्या गोष्टी आपले कानीं यैकाव्या हें ठीक नाहीं याचा विचार करावा उतर जालें जे, हिंदुस्थानची मसलत करा, अतरवेद् सोडवून बगाल्यास वेध लावणे ह्मणोन पत्रें पुण्याचीं आलीं, तर आज येवढे मनसब्यास दिवस राहिले नाहीत सिपरीवरील पलटणाचे पारपत्य केले पाहिजे त्याजवर पहिले आभूजी इंगले रवाना केले त्याचे फौजेची पत्रें पाच हजाराची हाजरी आली सदाशिव मल्हार माजी बक्षी याची हली रवानगी पाच हजार फौजेची केली आगरेकर माजी किलेदार आला आहे, त्याची च्यार पलटणें चाकर ठेविली त्यास हती बक्षीस दिल्हा, रवाना केला येकून चौदा हजार फौज चाकर रवाना केली इंगले तर सिपरीवर गेले बारा कोमाचे अतर इंगरजासीं राहिले होते पाच सा हजार पेंढारी इंगल्याबरोबर आहेत त्याबरोबर काहीं फौज देऊन पुढें पाठविले होते इंगरजाची रसद ग्वालेरीकडून येत होती त्याची याची गाठ पडली, ती रसदमारून आणिली इंगल्यासाही गाठ पडली आसेल राघोगडवाला खीची राजा च्यार पाच हजार इंगल्यास शामील जाला याविगले च्यार हजार बैरागी व आठ हजार गोसावी इंगल्याचे कुमकेस रवाना केले, तेही जाऊन भेटतील जमाव,बराच जाला आहे इंग्रजाची याची गाठ पडून कसे होते इतकी वाट पाहतो आह्मास येक वेल श्रीमंत राजश्री नानाची भेटी जरूर घेणें भेटी घेऊन मसलत सागतील ती कबूल करून येईन बाद्चरसात मसल्तीस जाऊ पुन्हा ह्मटलें जे हिंदुस्थानची मातबर मसलत बातबरसात करणे तर छावणी उजनीत करून भाद्रपदमासी निघाल्यास साधेल तेव्हा आज निघोन देशास जावे दोन महिने श्रीमंताजवल राहून वैशाखमासी आज्ञा घेतल्यास उजनची छावणी होईल चैत्र वैशाखात देशाकडे कूच केल्यास उपयोग कोणता ' × असी बोलणी पुष्कल जाली व होतात परतु तूर्त फल सरकार उपयोगास काही दिसत नाही बोलण्यामुले येखाद समयी बेमरजी मात्र होती प्रातच आहे सेवेसी श्रुत हाय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev informs Nana of his talks with Mahadji to whom the writer pointed out, how his ancestors worked and died in the cause of their master, and who now feels baffled by various enemies Mahadji thereupon promised to exert himself to the utmost

---

*No 141*] [18 January 1781

श्री गजानन प्रसन्न

श्रीमंत राजश्री नानास्वामी स्वामीचे सेवेसी—

विनंती सेवक बाबूराव भास्कर सा नमस्कार विनंती येथील कुशल ता पौष वद्य ९ नवमी दक्षणी भृगुवारपर्यंत आपल्या कृपावलोकनेकरून यथास्थित असे विज्ञापना पूर्वी आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा कीं च्यार महिने त्या प्रांतीं राहाणे, काहीं येक संकेतही होता पुढे आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तावे या रीतीची आज्ञा होती आलीकडे दोन विनंती पत्रें सेवेसी पाठविलीं आहेत च्यार मास जाले अद्यापि आज्ञापत्रें सादर न जालीं कलकत्यास इष्टिनसाहेब सुभा आहे त्याचा बक्षी कुल फौजेचा मुखितयार जरनेल इष्टबिलसाहेब* आहे त्याची सला मसलत इष्टिन मानितो

* John Stables Member of Council

त्याचा आमचा भाऊपणा बहुत आहे व जरनेलाचा दिवाण मुनसी गुलामबख्त आहे त्याचा आमचा भाऊपणा विशेष त्यास आह्मी सरकारच्या सलुकाविसी व आपल्या रोजगाराविसी पत्रे लिहिली होती त्याची उतरे अठराव्ये दिवसी हमीरपुरी च्यार शत कोसावर येऊन पावली डाक आहे जरनेल साहेब तीन वर्षे नबाब आसफत्‌दौल्याचे सुभ्यावर होते तव्हाचा त्याचा आमचा श्नेह आज वर्षभर कलकत्यास गले होते फिरोन या प्रातास लौकरच फौजसुधा येणार सरकारची मरजी सलूख करावयाची असिल्यास श्रीमताच्या नावे व आपल्या नावे इष्टिनसाहेबास व जरनेल साहेब व गुलामबख्त मुनसी यासी पत्रे पाठवावी कलकत्यास रवाना करू वकील पाठवावयाचा असिल्यास पाठवावा अगर मजला आज्ञा करावयाची असिल्यास आज्ञा करावी मीच जाईन आह्मी सरकारचे चाकर कायावाचा मने धने प्राणे सरकारकाम करावे कलकत्याहून आह्मास जरनेल साहेब गुलामबख्त मुनसीचे पत्र यैसी दोन पत्रे आली ती सेवेसी पा आहेत सेवेसी स्रुत होय हे विज्ञापना

☞ Baburao Bhaskar, one of Peshwa's employees in the north writes to Nana Fadnis offering his services in establishing peace with Warren Hastings whose confidental adviser General Stables was one of the best friends of the writer, through whom he says peace can be quickly arranged

---

*No 142* ] [ Soon after 22 January 1781

श्री

विज्ञापना यैसीजे छ १९ मोहरमची पत्रें डाकेबराबर सादर जाहली ती छ २६ मिनहूस पावली हिंदुस्थानची मसलत राजश्री सिवाजी विठल यांचे गली घालून सिप्रीवरील पलटणाचे पारपत्य हे य असी तर्तूद करून द्यावी त्याणी पलटणाचे पारपत्य करून गोहजकर जाटास फुटतील तर मेलऊन घ्यावें पुढे मसलत होईल तितकी करावी असें त्यास सागून पाटीलबावानी लाब पल्याच्या तोफा काही बराबर घेऊन जलदीने सुरतेवर जाऊन मारगिरी सुरू करावी येणेकरून लौकिकही होईल की वसई इंग्रेजानी घेतली हें कलताच पाटीलबावानी जाऊन सुरतेवर मारगिरी सुरू केली पाटीलबावा सुरतेकडे गेले असता गाडर अडचणीतून तिकडे निघेल, तेव्हा सहजच साऱ्या फौजा येक होऊन गाडराचे पारपत्य घडेल येणेकरून इकडील बंदर किनाऱ्याचे जाग्यास इंग्रज लागू पावणार नाहीं प्रस्तुत दिवस थोडे राहिले यास ही मसलत चागली व परस्परे मसलतीस समीपता सर्वा गोष्टीस उपयोगी जाणोन लिहिले आहे तरी याउपरी मसलतीचेच निश्चय ठरावण्याचे विवचनेत दिवस न घालविता हाच निश्चय करून जलदी करावी आह्मी आपल्या तर्फेने जे सुचेल ते लिहितों प्रस्तुत सुरतेकडे जमाव इंग्रेजाचा विशेष नाही जलदीने सुरतेकडे जावें सुरतेवर तोफा मारल्याने सुरत येते की काय ? शह देऊन उगेच उठणे ठीक नाहीं, असा अदेशा करतील तर असे चितात आणू नये सुरत घ्यावयास तोफा मारतात असा अर्थ नाहीं गाडराने अडचणीतून निघावें, दाब पडावा हीच मसलत ध्यानात आणून करावें गाडर जवल येऊ लागला ह्मणजे तो शह सोडून गाडरावरच मसलत पाडावी ही मसलत बरी आहे सुरतेकडे आले असता सला ममलत करण्यास जवल पडेल माघ मास आला, अद्याप विचाराच खाली दिवस गेले पुढे परिणाम काय हे ईश्वर जाणे ह्मणोन आज्ञापत्र सादर जहाले, त्यास इंग्रज सिपरीजवल होते इकडून आबोजी इंगले फौजसुधा दाहा कोसावर गेले पेंढारियानी आसपास रसद येत होती त्यास उपद्रव दिल्हा याजमुळे इंग्रजानी निकड करून सिपरीचे ठाणे जुजून घेतले गावातील माणूस फार मारले गेले जाधवाकडील कमावीसदार होता तो जुजात ठार जाला ह्मणऊन बोलतात तहकीक वर्तमान आले नाही आलि

यावरी लेहून पाठवीन पूर्वी सा पलटणे होती च्यार पलटणे गोहदवाल्याजवळ होती तीही यात येऊन मिळाली यो दाहा पलटणे जाली त्यानी सिपरी घऊन पु तीन कोस आले सुरजेवर येणार म्हनऊन भेलस्याहून व आबोजीबावाकडून पत्रे आली. पुढे आबोजीबावा यकटेच होते अलीकडे सदासिव मल्हार माजी बक्षी व त्रिंबकजी इगळ या उभयतासमागमे फौज सात हजार गेली आहे हे व आबोजीबावा येकत्र होऊन वर्तमान येईल त्यासारिखे बावाची स्वारी जाणार पौर्णिमेपावेतो उडाले नजीक उजेन दोन कोस येथेच आहेत नतर कूच होणार राजे रजवाडे यास पत्रे आबोजीबावाचा दिल्ही हाती त्यानी ज्याची त्याजकडे पाठविली येतो ह्मणऊन पत्रे येतात परतु कोणी आले नाहीत बलाबल पाहातात प्रसगानसार वर्तणूक करितील भेलस्यावर येणार ह्मणऊन पत्रे येतात परतु येथे तरतूद ह्मणाल तरी नित्य जी दिनचर्या आहे तीच आहे दिनचर्येचे अर्थ पूर्वी लिहिलेच आहेत येथून कूच जाल्यानतर काय तरतूद करितील ती पाहावी स्वामीनी जे सुरतेचे मसलतीचे अर्थ लिहिल त्यास तूर्त तरी सिपरीचे पलटणाचाच मजकूर भारी पडत चालला तेव्हा दुसरीकडील मसलत होणे हे ध्यानास आणावे आजपावेतो याप्रा वर्तमान आहे पुढे होईल ते लेहून पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports the capture of Sipri by the British and their advance towards Bhilsa and Sironj, events which, he says, prevent Mahadji undertaking a rapid dash on Surat as suggested to him by Nana

---

*No 143* ] [ Received on 6 February 1781
27 January 1781 ?

श्री

पौ छ १२ सफर इहिदे समानीन हाा डाक

विज्ञापना ऐसीजे छ १७ जिल्हेजची आज्ञापत्रे सादर जाली ते छ २५ मिनहूस पावली पत्री आज्ञा जे पवार याजकडील कर्जपटीचा मजकूर तर पूर्वी निदान सवा लक्षावर उरकावें ह्मणोन लिहून पाठविलेच आहे ते नवदपावेतों बोलतात वोढी तो सर्वांच्या आहेत परतु सर्वांनी मिळोन सरकार रक्षावें यास्तव सवा लक्षावर ठराव करून ऐवजाचा भरणा लौकर करावा निदान पाच सात अलीकडे पलीकडे करून विल्हेस लावावें याउपर गुता ठेऊ नये सिवाजी विठल याकडील माहा लचा झाडा व आकाराची बेरीज लिहून पाठविला तो पावला त्यास तिसामधे फौजेचे सरजामाची कर्जपटी सर्वांवर बसली त्या सालचा आकार बापूकडील सरजामाचा धरून फडशा करीत असले तर करावा ही गोष्ट फार न्यायतीनें * लिहिली आहे त्यासी बोलोन ऐवजाचा भरणा लौकर होई ते करावें, ह्मणोन आज्ञा सादर जाली ऐसीयास पवाराकडील कर्जपटीविशी रदबदल फार जाली फडशा होईना बावाचे कूच महेश्वराकडे जालें पवाराचे कारभारी दोन तीन मजली समागमे आले तेव्हा मोठे रदबदलीने येक लक्ष दाहा हजार आख बावानी घातला तो करार ठरला त्याची नेमणूक बावाचे करारांची झाली ती राजश्री आपाजीराव याजवळ आहे दाखविली असेल जमा येक लक्ष दाहा हजार ११००००

पैकी वसूल मजरा दिल्हा सरकारातून वराता जाल्याची यादी आली होती त्याप्रमाणे —

---

* न्यायत=भीड सवलत

५०००० सेट्याची वरात
१३९६४॥ पा वण येथील कादाराची वरात
७५०० मोरो वेंकाजी याचे पागेची वरात

७१४६४॥

बाकी ——————————— ३८५३५॥ ——————————— को

माघमासी द्यावे आखेर माघ १२५३५॥ | पा हमीरपूर वगैरे येथील जपत्या सरकारातून जाल्या त्यायैवजी तकूब राहिले २५०००

रुजुवात जप्तीची जाल्यावर याजकडे बाकी निघाल्यास यानी सरकारात द्यावें सरकारात वसूल जास्त पडेल तर सरकारातून द्यावे

याप्रमाणे फडशा होऊन विनतीपत्र स्वामीस जपत्या उठवावयाविसी पवाराजवळ दिल्हे आहे, पावले असेल साप्रत छ १९ मोहरमचे आज्ञापत्र सादर जाले जे पवाराचे कर्जपटीचा फडशा करणे, त्यापैकी सेट्याची वरात पनास हजाराची मात्र मजरा देऊन बाकी यैवजाची निशा घेऊन पाठवणे त्यास या आगोधर फडशा होऊन वराताची याद सरकारची आली होती त्याप्रमाणे मजरा दिल्हे आहेत याखेरीज सेट्याचा कारकून तोफखान्याचे पचवीस हजाराचे वरातेचा तगादा करितो यैवज न पुरला ह्मणून ती वरात गालून टाकली हालीचे आज्ञापत्रावरून देवासकराचे कारभारी बोलाविले आहेत सेट्याचे वराते खेरीज यैवज न देणे असी ताकीद करितो परतु चौदा हजार वणीचे कादाराबा राजश्री बापूराव केशव* याचे मारफत दिल्हे ह्मणतात मोरो वेंकाजीचे वरातेचे साडे सात व साडेबारा राहिले ते येकून वीस हजार मागतो यैवज आल्यावर पाठऊन देतो तेथें मोरो वेंकाजी गडबड करितील राजश्री सिवाजी विठल याचे कारकून येथें आहेत त्याजकडून तिसाचा आकार आणविला आहे आल्यावर जावसाल होईल तो विनती करीन बहुतकरून बापू हुजूर येतीलसे दिसते त्याचे गळी मसलत घालावी असी पत्रें स्वामीची येतात त्याची तरतूद येथे दिसत नाही तरतूद होतच नाही कदाचित जाला तर गुदस्ताचे वर्तणुकेवरून निभाव कलतच आहे याची फौज न घेता जातीने फौज धरून चाकरी करावी तर आधीच वोढगस्त त्यातही यदा धुळे, सोनगीर व पाटोदे तिन्ही माहाल दंग्यात अगदी उडाले यामुळे पेंचात फार आले याजवळ राहून परिणाम कसा लागेल? त्यारसे पागा व दोन तीनसें सिलेदार जवळ असोन चाकरी येकही नाही पैका आगावर पडला, आणि चाकरीस चोर हें ठीक नाही हुजूर जावें असें मानस त्याचे दिसतें × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ In reply to Nana's urgent inquiries, Naro Shivdev reports the settlement of the outstanding accounts with the Pawars of Dewas and with Shivaji Vithal Vinchurkar

---

*No 144* ] [ Received on 6 February 1781
27 January *1*781 ?

श्री

पौ छ १२ सफर इहिदे समानीन हा॥ डाक

विज्ञापना यैसीजे छ २१ जिल्हेजचे पत्र डाकेबराबर सादर जाहले ते छ २८ मिनहूस पावले रामचद्र गणेश इग्रजाचे लडाईवर निधन पावले, हें पूर्वी लिहिले गेलेच आहे त्यावर दुसरे दिवसीं राजश्री बाजीपत वसईचे उपराल्यास दाहा बारा हजार फौज सुद्धा जवळ असता विसाजी

---

* Surnamed Thakur one of Nana's confidants

केशव लेले याणी हरामखोरी करून इग्रजाचा कौल घेऊन किला इग्रजाचे स्वाधीन केला बदुखा सारे माणसाच्या इग्रजाने घेऊन मोडून दिल्हे ते बाजीपताचे लस्करात आले किल्यात साहित्य सरजाम दोन वर्षांची बेगमी पोख्त होती अवध्यानीच हरामखोरी करून फौजा उपराल्यास जवल पोहचल्या असता किला शत्रूस दिल्हा फार गोष्ट वाईट जाली याचे श्रम अत करण जाणत असेल पत्री काय लिहावें ? शत्रु सेर होऊन मोकला जाहला राजश्री हरिपत सुद्धा वीस बावीस हजार फौज व पाच हजार गाडदी घाटाखाली आहेत परतु जागा अडचणीच्या आहेत पुढें गाडर मनसबा दुसरे बदर किनारा किल्याच्या गली पडतो किंवा इकडे चाल करतो हें कलेल त्यासारिखे लेहून पाठऊ किल्यात सामान सरजाम पोख्त सरदार चागले चागले नामी इतबारी व पाच हजार माणूस चागले, तोफा दारुगोला यथास्थित, किल्यात व बाहेर सरकारच्या फौजा भारी, उपराल्यास असोन हरामखोरी करून किला इग्रजास दिल्हा असें कोठेही पाहिले नाहीं साष्टीचा किला इग्रजानी जमींदोज करून हला केली आत शिरले तरी लडाईच लोकानी करून खर्च जाहाले, राहिले पाडाव गेले परतु शरण गेले नाहींत व कौल घेतला नाही व तेथे इतके माणूस व सरजाम उपरालाही नवता हे श्रम काय ल्याहावे ह्मणोन पत्री आज्ञा सादर जाली × वसईचे वर्तमान येकून श्रमी बहुत जाले परतु ईर्शा येऊन पारपत्याचा विचार तूर्त तरी दिसत नाही साल मजकुरी तरी आम्हापासून काहींच घडले नाहीं करून दाखऊ तेव्हाच तुह्मासी बोलू ह्मणतात परतु तो दिवस कोणता येईल तो पाहावा सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports that he communicated to Mahadji the sad news of the death of Ramchandra Ganesh Kanade on his way to the relief of Bassein, and of the fall of that strong and valuable fort to the English, notwithstanding the strength of the garrison of the armaments, owing to the treachery of Visaji Keshav Lele Mahadji heard the news and said he would try to retrive the position

---

*No 145* ] [ Received on 6 February 1781
27 January 1781 ?

श्री

पौ छ १२ सफर इहिदे समानीन ह॥ डाक

विज्ञापना येसीजे छ ११ मोहरमची पत्रें डाकेबराबर सादर जाहाली ती छ १८ मिनहूस पावली पत्रीं आज्ञा जे, मागील मनसब्याची चाल व निश्चय होत जातात त्यावर पुढील धारेवट मनसब्याचे आगे बाधून करावे ते सारेच येकीकडे राहात गेले व पुढे जातही आहे असो प्रस्तुत विचार पाहाता तीस हजार फौज सात हजार गाडद कोंकणात व येथें मिलून आहे होलकरही येत आहेत मग त्याची फौज पाच सात हजार काय होईल ते मिलून चालीस हजार जाहली याखेरीज गणेशपत बेहेरे याबराबर पाच हजार व मागाहून दुर्गोजी भापकर च्यार हजार फौजसुधा त्याकडे रवाना केले व होलकराकडील येक सरदार दोन हजार फौज व पेंढार मिलून सुरत आठाविसीकडे जावयाचें केलें गाडर वसई वज्रजोगिणीची अडचणीची जागा धरून बसला आहे तेथे फौजेचा उपाय नाही कदाचित सुरतेकडे जाऊ लागला तर हरिपत होलकरसुधा फौज घेऊन पाठीवर जातील, कदाचित घाट चढून आला तर फौज भारी आहे होणे जाणे श्रीमताचे दैवेकरून घडेल तें खरें,

परतु यात पाहता चालीस हजार फौज बाल्गून इतका खर्च आगावर आणि आपला मुलूक लुटला जातो काम काहींच हात नाहीं यास्तव इग्रजाचे तालुक्यात लडाई पाडून त्याचा मुलूक ताराज जाहला असता मराठी त्याची होऊन जरबेंत येईल याची तोड सिपरीवरील पलटणाचे पारपत्य राजश्री पाटीलबावानी जाऊन करावे आणि पातशहा नजफखान वगैरे मिळऊन घेऊन अतरवदी तील इग्रजाचा अमल उठऊन ताराज करावा पातशाहा पाटीलबावा येक जाहाले असता दुसरीं पलटणे मागाहून येतात त्याचे पारपत्य सहजात हेईल अतरवदीतील मुलूक सुटोन बगाल्यावर शह बसेल इग्रज घाबरे होऊन पाहिजे तसा तह करतील त्या प्रानी पैकाही मिळेल येश येऊन नक्ष होईल जलदीने मन घालून केल्यास व्हावयाजोगें आहे ग्वालेर टाकून पुढें कसें जावें ह्मणतील तर ग्वालेरचे शहावर राजश्री सिवाजी विठल याबराबर सरकारची पथके वगैरे ठावीं, हे सभाल- तील विना अतरवेद् व बगाल्याचे मुलखास हात घातल्यावेरीज इग्रजास आच बसत नाहीं, मसलत शेवटास जात नाहीं, दौलत पेचात येते, हें पुर्ते समजावें सुरत अठाविसी मारली तर इग्रजाचे काय जाते? सरकारचाच मुलूक त्याणी सा च्यार महिने अमल केला, तो जाळून टाकिला त्याचें काय गेले? त्याणे त्यास आच लागत नाहीं सुचला विचार ल्याहावा ह्मणून लिहिलें नूर्त हिंदुस्थानची मसलत घडत नसल्यास राजश्री सिवाजी विठल व पवार व बलवतराव घेंडदेव हे सरकारची पथके व अबोजी इगले येक करून देऊन नागूचे गळी मसलत घालून शिपरी कडील इग्रजावर पाठवावे पाटीलबावानी फौज व लाब लाब पल्याच्या तोफा घेऊन येऊन सुरतेवर माराव्या असे जाले असता गाडर तिकडे यावयास निघेल तो पाठीवर हरिपत होलकर सुद्धा येतील सहजच मैदानात आलियावर पाटीलबावानी व यानी सर्वानी मिळून गाडराचे पारपत्य केले असता हेंही काम चागलेच होईल दोन प्रकार लिहिले यातून येक कोणता तो लौकर घडावा ह्मणोन आज्ञापत्र सादर जाहाले, ते बाबास वाचून दाखविले याचे उतर निश्चयात्मक येकही होऊन येत नाहीं उतर जाले की सिपरीचे पलटणावर फौज आबोजी इगले याजबा रा जाली हाली सदासिव मल्हार याजबा फौज पाच हजार रा केली याची त्याची गाठ पडून पारपत्य जाल्यास उतम न जाल्यास आह्मीच जाऊन पारपत्य करून देशास येतो तूर्त हिंदुस्तानची मसलत करावयाचे दिवस राहिले नाहीत व पातशाहा व नजफखान याचे नानकुराण[1] आचाप आले नाही यास्तव देसी येऊन श्रीमताचे व इस्ट दैवताची दर्शने घेऊन येऊन बाजदबरसात हिंदुस्तानची मसलत होईल राजश्री सिवाजी विठल याचा मुलूक काही गेला व खराबीखाली आला यास्तव खर्चाची मदत करून मसलत त्यास सागावी ही मसलत पूर्वी होती ती राहिली सदासिव मल्हार याची रा[2] केली सिवाजी विठल वगैरे यास त्याचे समागमे जा ह्मणतात दुसरे याचे बा॥ जावयास त्याची सोये पडत नाही गतवर्षी निमिते आणिली होती यास्तव जात नाही बाबाचा निरोप घेऊन स्वामीकडे यावयाच्या विचारात आहेत सिपरीचे पलटणाचे पारपत्य जाल्यावेरीज देसी आथवा गुजराथेस जावयाचा प्रकार कसा घडतो नित्यानित्य बोलनच आहे होईल ते मागाहून लेहून पाठऊ सेवेसी स्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev quotes an important letter of Nana putting forth weighty plans of campaign in order to overcome the English and proposing for Mahadji to make a dash into the British territory of Bengal and the Doab He returns Mahadji's answer that the season had too far advanced for the execution of

---

१ भाकरीची शपथ  २ रवानगी

the plan during the current year, but that he would undertake it after the rains

---

*No 146* ] [ 14 February 1781

श्री

पौ छ १ रावल इहिदे समानीन आवसीची प्रहर रात्र हा। डाक

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २० माहे सफर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष आबूजी इगले फौज घेऊन पुढे गेले होते त्याच्याने इगरज सांभालवले नाहीत सदाशिव मल्हार माजी बक्षीही फौज देऊन रवाना केले व त्रिंबकजी इगलही गेले आद्यापि दोघही इगले व सदाशिव मल्हार बक्षी येक जाले नाहीं बावा चेही कूच होऊन तराणे उजनीहून नव कोस होलकराचा परगणा आहे, येथे काल मुकामास आले तों आबूजी इगले याचें पत्र आले जे इगरज सिरोंजेस आले भोपाळकरानी तीन लक्ष रुो इगरजास देऊ केले भेलसे घेऊन यावे ते इगरजानी कबूल करून दर मजल भेलशास जातात याप्रमाणे वर्तमान आल्यावरून राजश्री पाटीलबावानीही भेलशास जलद जावेसे मानस आहे फौज दाहा हजार पुढे आहे ह्मणतात दोन तीन हजार या समागमे आहे राजश्री सिवाजी विठल व पवार हेही मिलतील बलवतराव धोंडदेव आगाधरच आबूजी इगल्याकडे गेले आहेत पुढे होईल वर्तमान ते विनती करीन छ २ सफर व छ ११ सफर दोन्ही रवानग्याची पत्रे स्वामीची पावली त्याचे जाब मागाहून रवाना करितों डाक उजनीपावेतो आहे पुढे नाही याजकरिता डाकेचा कारकून नारो हरि उजनीत आबाजी नाईक वानवले याचे घरी ठेविला आहे लस्करात दोन च्यार जोड्या कासद नवे चाकर ठेऊन येक दोन जोडी आपणाजवल व येक दोन जोडी नारो हरीजवल ठेवितो छुटे कासदाबरोबर लस्करातून उजनीस नारोपंताजवल पत्रे पाठवीत जाऊ तेथून डाकेबरोबर पत्रे सेवेसी पावतील स्वामीची पत्रे डाकेत नारोपंताजवल येतील, ते तून छुटे जासुदाबरोबर आह्माकडे येतील × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports the capture of Sironje by the English and their advance against Bhilsa Mahadji therefore pushed his base in order to retard British progress.

---

*No 134* ] [ 22 February 1781

श्री

पौ छ ८ रावल इहिदे समानीन हा। डाक

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २८ सफर मुकाम उजेन स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष छ २ सफर व छ ११ सफरची पत्रे डाकेत सादर जाली त्याची उतरे पुरवण्या निरनिराल्यात विनविली आहेत, त्यावरून विदित होतील सरकार येवज राजश्री पाटीलबावाकडून येणे, त्यायेवजी दाहा लक्ष रुो सरकारात वोढ याजकरिता त्यानी द्यावे परतु मिलत असल्यास मागणे, नाही तर चर्चा न करणे त्यास येविसी पूर्वी इटाविले होते उत्तर जाले ते विनती केली आताही त्याप्रमाणेच उतर जाले × राजश्री रावो पंत गुरुजी तेथे आहेत सरकारचा येवज किती होतो ते त्तुवानीने याद असावी सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev was asked by Nana to request Mahadji

to make the payment of ten lacs due from him to Govt Mahadji gave the same reply as before, viz that correct accounts should be communicated

---

*NO 147* ] [ 28 February 1781

श्री

पौ छ १२ रावल इहिदे समान फाल्गुन शु॥ १३

विनंती सेवक नारो सिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ ४ रावल पावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष शरीरप्रकृति नीट नाही यास्तव उजेनीस आलो हे पूर्वी सेवेसी लिहिलेच आहे राजश्री पाटीलबाबा दरकूच खामखेडेनजीक मेलसे पाच कोस येथे गेले इग्रज सिपरीपासून सुरजेपावेतो ठाणी बसवीत आले तो राजश्री आबोजी इगले व सदासिव मल्हार बक्षी याच्या त्याच्या लडाया होत आहेत सुरजेस आले ते समई इग्रजाकडील तुरुकस्वार वाढून आले होते त्याजवर नेहटाने लढाई करून काही मारले काही पळाले दोन च्यार स्वार धरून आणिले तों बाबा आले हे वर्तमान यैकून पुढे यावयाचे महकूफ होऊन सुरजे जवळ मु॥ करीत राहिले राणेखान भाई पुढें फौज घेऊन गेले रजवाडेही येत चालले आहेत खेची व राजगडवाले आलेच आहेत इग्रज सुरजेजवळ आहेत त्याचे आसपास फौजा जाऊन पोहोचल्या रसद बाहेरील बद केली सुरजेस राहिले यामुळें रसद बाहेरील बद केली सुरजेत राहिले यामुळे रसद त्यास मिळाली तूर्त तेथेच आहेत सिपरी पासून ठाणी बसवीत इग्रज आले तीं ठाणी चदेरीकर राजे याने उठविली ते पाटीलबावास यऊन सामील होणार ह्मणून पत्र लस्करातून छ २९ सफरचे आले याउपरी वर्तमान येईल त्याप्रा। विनवीन इग्रेजाचा सदर्भ आला आहे की आह्मास माघारे जाऊ द्या ह्मणतात असे लिहिल्यात आले आहे पके लिहिले येईल तेव्हा लेहून पाठवीन स्वामीकडील वर्तमान इग्रजाचे येत नाहीं ह्मणऊन तेथे बापोजी रघुनाथ कारकून ठेविले आहेत, त्याजपासी ह्मणत होते परभारे त्यास वर्तमान कळले की गाडर बोरघाट चढून वर्ते आले याजवरून पुसत होते सेवेसी स्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev informs Nana of the arrest of the English advance beyond Sironj by Mahadji

---

*No 148* ] [ January 1781 ?

श्री

विज्ञापना यैसीजे सिप्रीचे पलटणाचे पारपत्य राजश्री पाटीलबावानी सिवाजी विठल वगैरे पथके समागमे घेऊन जाऊन करून पातशाहास मेलऊन घेऊन अतरवेदीतून बगाल्यावर जाऊन शह द्यावा हे पूर्वी लिहून पाठविले होते त्यावर ही मसलत चागली, परतु दिवस थाडे राहात चालले याकरता राजश्री सिवाजी विठल याचे गळी हिंदुस्थानची मसलत घालून पाटीलबावानी सुरतेवर जावे हाही मनसबा बरा जाणून दोन तीन वेळ लेहून पाठविले आद्याप निश्चय ठरून उतर येत नाहीं तेव्हा काय समजावें ? वारवार पत्रें बहुत गेलीं लिहिण्याची बाकी राहिली नाहीं माघ मास निघोन गेला सिप्रीच्या पलटणाचेही पारपत्य जाले नाहीं आणि सुरतेकडेही येणे जाले नाहीं असो ईश्वरे नेमिले आसेल तसें व त्याचे थोरपणास उचित ते करतील ह्मणून छ ११ सफरचे पत्रीं आज्ञा हेही पत्र पाटीलबावास दाखविलें मजकूर यैकून उतर दिल्हे जे मसलत चागली लिहिली आहे परतु इगले जाऊन त्यासी भिडले

आसता इग्रजानीं मिप्री घेऊन पुढें चाल धरिली भोपाळकराने त्यास लगवाड लाविली कीं तीन लक्ष रु॥ देतो, भेलसें घेऊन देणें आम्ही मार्गे कूच केले म्हणिजे इग्रज पुढें येऊन भेलशास लागतील. भोपाळकर शामील होईल भेलसे घेऊन आगदी माळवा हाताखालीं घालून बऱ्हाणपुरास ठेप देतील यास्तव आम्हासच इगरजाचे पारपत्यास गेले पाहिजे याचे पारपत्य करून देशास चालतो, असें उतर केलें आणि दरकूच इग्रजावर चालले सुजालपुरापुढे नवघोसावर मुक्काचे वर्तमान आले फौज घेऊन पुढे भाई गेले म्हणऊन वर्तमान आले आम्ही होतो तेव्हाच भाई बोलत होते की सुजालपुरापासून पुढें जाऊ, गेले असतील लस्करात होतो तेथे शरीरप्रकृत नीट नाहीं याजकरिता राजश्री सदाशिवपत दाजीचे भाचे बापोजी रघुनाथ व गगाजीस लस्करात ठेऊन ऊजेनीस आलो कासिदाच्या जोड्या तेथें ठेविल्या आहेत वर्तमान लिहिण्यात येईल पाटीलबावाची डाक लस्करापासून येथ पावेतो आहे येथून पुणें यापावेतो सरकारची डाक आहे पत्रे येतील सेवेसी स्रुत होय हे विज्ञापना राजश्री सिवाजी विठल व बलवतराव धोंडदेव व पवार तीनी पतके पाटीलबावास सामील जाली हे विज्ञापना

☞ Naro Shivdev writing to Nana from Sujalpur, conveys Mahadji's preoccupation in Malwa in confronting the English and his inability to leave his present quarters for any other undertaking and explains Mahadji's fear as to how, the British would advance right up to Barhanpur, if he were to withdraw from Malwa.

---

*No 150* ] [ 2 March 1781

श्री

पौ छ १४ रावल इहिदे समानीन ह्या डाक तिसरा प्रहर

विनती सेवक नारो सिवदेव कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना ता छ ६ रावल पावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष इग्रजाची फौज सुरजेनजीक आहे त्यानीं आपले सभोवत्या बातेऱ्या बाधून मुक्काम करून आहेत राजश्री आबोजी इगले व सदासिव मल्हार हे फौज सुधा त्याचे पिछाडीस तीन कोसावर आहेत राणेखान भाई च्यार हजार फौज घेऊन गेले त इग्रजाचे आगाडीस तीन कोसावर आहेत भाई तलाव्यास गेले होते याजवर तुरुकस्वार वाढून आले होते, त्याजवर यानी निकड केली माहादजी शाबरे पाटील याचा लेक बावाकडे आहे त्यानें पुढे वाढून तुरुक स्वार येक ठार केला व येक जखमी होऊन निघोन गेला आणिकही लोक वाढून गेले होते, त्यातही काही जखमी निकड बसवावी तो स्वार माघारे तोफखान्याचे आश्रयानें गेले शाबरे मार याचा घोडा पडला घोडीस गोळी व सगीनीच्या जखमा दोन लागल्या शाबरे यास दोन जखमा लागल्या परतु कुशल आहेत पाटीलबावा छ १ रावली नानखेडी ना॥ सुरज पाच कोस तेथे गेले तेच दिवसी बुनगे तेथे ठेऊन खासा सडे होऊन तोफखाना बा॥ घेऊन राणेखान भाईजवळ गेले फौज पुढिली व मागील पेढारे सुधा वीस हजार जमा जली राजश्री सिवाजी विठल व राजश्री बलवतराव धोंडदेव हे फौजसुधा बावास भेटले पोवारही गेले तेही मिळाले असतील श्रीमताचे प्रतापे पारपत्य लौकरच व्हावेसे आहे सेवेसी स्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports speedy preperations on the part of Mahadji for an attack on the English at or near Sironj and hopes a decisive victory would soon be achieved

---

*No 151* ] [ 10 March 1781

श्री

पौ छ २२ रावल

विनती सेवक नारो सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनती ता छ १४ रावल मद्-वारपावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री पाटीलबावा यानी सुरजेहून पत्र स्वामीस पाठविले ते सेवेसी पाठविले आहे व बातनीचे पत्र आले तेच बजिनस पत्र बद २ पाठ-विले आहेत त्याजवरून सविस्तर विदित होईल बावानी नरसिंगराव दि॥ हैदरखान याचे पत्राचा लखोटा व दुसरा लखोटा राजश्री त्रिंबकराव आपानी दोनी लखोटे पा। ते पाठविले आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना *

☞ Naro Shivdev forwards letters from Mahadji and others to Nana, one of which was concerning Haidar Ali's requisition

*No 152* ] [ 11 March 1781

श्री

पौ छ २० रावल इहिदे समानीन

सेवेसी विनती सेवक सदाशिव दिनकर सा॥ नमस्कार विज्ञापना ता। फाल्गुन वद्य १ रविवार मुक्काम शहर बऱ्हाणपूर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री पाटीलबावाची स्वारी भेलशाकडे गेली राजश्री नारो शिवदेव व मी समागमे होतों त्यास नारो शिवदेव यास शरीरी ज्वरबाधा जाली माझें शरीर तर फारच विकल जाले बोलणे चालणे देखील होईना तसेच शाहाजापूरपावेतों समागमे गेलो दिवसाचा दिवस व्यथा अधिक होऊं लागली यास्तव नारोपतानी व मी बावाचा निरोप घेऊन उजनीस आलों नारोपंत उजनीत राहिले मी पाटीलबावापासोन घरास जावयाचा निरोप घेतलाच होता उजनीहून नारोपताचा निरोप घेऊन तेथील बदरक्याबरोबर× महेश्वरास आलों महेश्वरीहून अहिल्याबाईपासोन स्वार घेऊन येथें आलों येथून राऊत घेऊन घरास जाईन औषध उपाय करीन स्वामीकृपेवरून आरोग्य होईल वरकड मजकूर पुरवण्या निराल्या विनविल्या आहेत त्यावरून विदित होईल त्याचे जाब सादर होण्याविषयी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev and Sadashiv Dinkar both became ill in Mahadji's camp and started to return to the Deccan after taking the latter's leave. Naropant stayed at Ujjain and Sadashiv Dinkar reached Barhanpur and wrote this letter

*No 153* ] [ 15 March 1781

श्री

पौ छ २८ रावल प्रातःकाळ

सेवेसी विनती सेवक नारो सिवदेव सा॥ नमस्कार विज्ञापना ता। छ १९ रावल गुरुवार प्रातःकालपावेतो वर्तमान येथास्थित असो विशेष काल साइंकाली सावकारात पत्र आली त्यातील मजकूर सुरजेंत इग्रज होता तेथे मोर्चे पेशजीपासून होते त्याच्या चौकसीस खासा सरदार हिंडत होता त्याजला तोफेचा गोळा लागला उपरात त्याच्या लोकानी सदुकेंत घालोन शहरातून निघाले

* ऐ. प व यादी १९३० के 270, 277 291 × बदरका= संरक्षक शिपाई

ह्मणऊन सावकाऱ्यात लिहिले आहे आणिकही वर्तमान आहे की दोन पलटणे अगदी बुडविली बुनगा लुटले दारू हाती बावाकडे आले त्यास गुरुवार छ १२ रावलचे पत्र बातमीचे आले तेच बजिनस सेवेसी पा त्याजवरून विदित जालेच असेल. त्या आलीकडे आपले पत्र अथवा बावाचे वाडियात पत्र आली नाहीत परंतु बाहेर सावकारियात लिहिले आहे की इग्रज येके विहिरीजवळ मुा करून राहिले आहेत. बावाकडील मारगिरी नित्य होत आहे इग्रज घाबर बहुत जाले आहेत दो चौ रोजात सारेच फडऱ्यात येतील आपले पत्र आले नाही, यास्तव च्यार दिवस पत्र लिहिले नव्हते निकडीची लढाई असता वर्तमान लिहिले नाही, यास्तव परभारे वर्तमाने आली ती सेवेसी लिहिली आहेत पक्के वर्तमान येईल त्याप्रा विनवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports a successful action fought by Mahadji against the English near Sironj

---

*No 154* ] [ 27 March 1781

श्री

पौ छ ९ राकर इहिदे समानीन

विनंती सेवक नारो सिवदेव सा नमस्कार विज्ञापना ता छ १ रावल मगळवारपावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीची पत्रे

१ छ ३० सफर
१ छ ९ रावल
१ छ १९ रावल
१ छ २१ रावल
४

या प्रा च्यार रायाची पत्रे राजश्री पाटीलबावा याजकडे रा केली आहेत छ ३० सफर व छ ९ रावलची पत्रे तेथे पोहचून जाब आला की पत्रे येतात ती वाचून पाहावयास सोय पडत नाही येके राची पत्रे वाचून मात्र पाहिली दुसरे रा पत्रे आली हीही सधि पाहून दाखवितो पहिल्या पत्राचे उत्तराविसी नित्य विचारितो देतो ह्मणतात नित्य स्वारी करून जाऊन मुा असल्यास मोवते उभे राहून तोफाचे गोळे व बाणाची मारगिरी करितात रात्रीस मुा येतात जेवणे जाली ह्मणजे घोड्यावर जिन ठेऊन तयार होऊन बसतात मेहनत खासा जातीनेच करितात यास्तव मरजी पाहून विचारावे लागते कूच जाल्यास जाबसालाचे नीट पडत नाही गोळा गोळीमुळे नित्य थोडी माणसे जखमी व ठार होतात कारभार सर्व जातीनेच करणे पडतो सदी पाहून उतरे घेऊन पाठवितो ह्मणऊन राजश्री बापोजी रघुनाथ यानी लिहिले होते व पत्रे पाठवावयासी कासीद मिळत नाहीत याजकरिता येथून डाक रा केली ते पोहचली असावी काल डाकेत पत्र रा केले आहे सुरू जालियावरी पत्रे लवकर येतील छ २० रावलचे पत्र बापोजी रघुनाथ याचे आले तेच सेवेसी पा आहे त्याजवरून विदित होईल प्रतिपदेस साइकाली जोडी सावकारियात आली ती काल तहकीक* करून वर्तमान मनास आणिता इग्रज कुलारस येथे गेले ते माहाल जाधवाकडे आहे सिपरीचे बरोबरच आहे तेथून ग्वालेर छतीस कोस सागतात ग्वालेरीहून येक पलटण व तीन तोफा याचे मदतीस येतात त्याजवर बावाकडील फौज धाऊन गेली आहे ह्मणऊन जबानी सागतात कागद काही दिसल्यात आला नाही येथे बावाकडून कारभारी आहेत त्याची चौकसी करावी ते त्याजपासून घडत नाही येथे कारभारी कबिले याजबा राजश्री बाळाजीपत मीर्जा आहेत

---

* तहकीक= निश्चित

त्याजकडे जावसाल येत जात असतो त्याजकडही पत्रे बाबाकडील विशेष येत नाहीत पत्रे आली तरी ऐवज खर्चास पाठवणे ह्मणऊन येत असतात येथील साहुकारापासून ऐवज करार कला होता त्यापैकी कोणाकडे बाकी साकी राहिली आहे. ते घेऊन रा करितात याप्रा इकडील वर्तमान आहे पवाराकडील ऐवजपैकी सेव्याची वरात चालीस हजाराची जाली तो ऐवज लौकर त्यास पावता करणे ह्मणऊन आज्ञा त्याजवरून त्याजकडील कारकुनानी वर्तमान सागितले ते तपसील अलाहिदा पुरवण्यास लि॥ आहेत त्याजवरून विदित होईल कारकुनाची खातरजमा करून सेव्याकडील कारकून बा देऊन देवासियासी रा केले सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev writes to Nana that owing to night and day occupation of Mahadji in the work of carrying on a fight against, the English, there was no opportunity for the writer to show letters to and obtain replies from Mahadji

---

*No 155* ] [ 30 March 1781

श्री

पौ छ १२ राकर इहिदे समानीन

विनती सेवक नारो सिवदेव सा नमस्कार विज्ञापना ता छ ४ राकर सुक्रवार दोन प्रहर पावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीचे पत्रे छ १० सफरची आली ती लस्करात पाठविली होती, त्याचे उतरे जाली ता मालुमाती जमेस धरून उतरे लिहिली तीच बजिनस सेवेसी पाठविली आहेत त्याजवरून विदित होईल यावेगळी पत्रे बिता

६ मालुमाताचे पत्राचे जाब पुरवण्या
२ बाबाची पत्रे व पुरवणी यो
५ बापोजी रघुनाथ याची पत्रे व पुरवण्या बातनीच्या

१३

या प्रो तेरा पाठविली आहेत त्याजवरून विदित होईल महत्पूरचे गढीपासून कूच करून कुलारस ऊर्फ कोलारचे मु॥ ची सातवे दिवसी गुरुवारी रात्रीस येथे आली ती सेवेसी पा आहेत छ ९ रावलची पत्रे स्वामीची आली लस्करात पा ता पावलियाचा जाब आला पत्राची उतरे आलियावरी सेवेसी पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना राजश्री खडेराव पवार* पाटीलबाबाकडे गेले आहेत त्याचे पतक हुजूरचाकरीस आहे तरी बाबास सागून त्यास पाठविणे ह्मणऊन आज्ञा त्यास खडेराव लोणावाड्याकडे आपले लग्न करावयास गेले होते ते लग्न करून आले धारेस आहेत ह्मणऊन वर्तमान आहे बाबाकडे गेले नाहीत तेथे कोणी सागितले असेल न कळे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev forwords several letters to Nana Fadnis

---

*No 156* ] [ 5 April 1781

श्री

छ ११ राकर

राजश्री हरिपत गोमावी यासी—

दडवत विनती उपरी आज गुरुवारी घाटमाथ्याहून आमचे कूच होऊन कोलव्याचे घाटे

---

* Khanderao Pawar died in February 1784

उतरून घाटाखालीं राजश्री परशरामपंत याजअलीकडे दोन कोसावर मुकाम जाला घाटात आडवणीमुळें लस्करची दाटण बहुत जाली प्रहररात्रपावेतों लस्कर दरोबस्त मुकामास पावेल काल राजश्री पाराशर दादाजी वगैरे पथके च्यार हजार फौज रवाना केली, ते परशरामपंत याच्यापुढें येका कोसावर आहेत आमचेही उदईक कूच होऊन ते व आम्ही येक होऊ रा छ १० साकर सु॥ इहिदे समानीन मया व आलफ. × बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती

मोर्तब
सुद

☞ Tukoji Holkar informs Haripant that he and Parasharambhau will join the next morning

---

*No 157* ]                                                            [ 23 April 1781

श्री

पौ छ ६ जावल इहिदे समानीन सायकालचा प्रहर दिवस

विनती सेवक नारो सिवदेव सा॥ नमस्कार विनंती ता॥ छ २८ सावरपावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री पाटीलबावा याचे लस्करातून दिनचर्येचे बातमीचे पत्र चिरंजीव राजश्री पाडुरंग रघुनाथ बापू याचे आले ते सेवेसी पा॥ आहे त्याजवरून कलेल राजश्री राजाराम आत्याजी पारनेरकर यास बावानी नजफखान याजकडे पाठविले कोणे अर्थे पाठविले हे समजले नाही त्याजबा॥ राजश्री [ गोविंदराव ] कृष्ण राजश्री कृष्णराव उभयता नि॥ मातुश्री आहिल्याबाई होलकर हे उभयता गेले बा॥ मावसीबाईची पागा दिल्ही ह्मणऊन बाईकडील कारकून लस्करात आहे त्यानी राजश्री आबाजी नाईक वानवले यास लिहिले होते उमरावगीर गोसावी फौज घेऊन आले ह्मणऊन सावकारियात बातमी आली ती पूर्वी सेवेसी लिहिले होते त्या आलीकडे फिरून वर्तमान काही आले नाही बापूचे पत्रात तारीख बेनिसावी आहे परंतु रा॥ छ २३ रोजची आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev informs Nana that Mahadji has sent his Vakils to Najafkhan at Delhi

---

*No 158* ]                                                            [ About 23 April 1781

श्री

विज्ञापना राजश्री पाटीलबावा यानी राजश्री राजाराम अत्याजी नजफखान याजकडे पाठविले होते ते अनूपगिरी याजपासी आहेत ते जयेपूर प्रातात आहेत. त्याचे विद्यमाने होलकर याजकडील रामपुरा वगैरे दोन माहाल जप्तीत आले होते ते मोकळे करून घेतले पुढें इग्रजाचे मसलतीस नजफ यानी आनकूल व्हावे येविसीचे बोलणे गोसावी मार याचे विद्यमाने लाविले आहे त्याचे उतर त्यानी केले की जाटवाडा व जयेपूर प्रात दोनी प्रिथ्वीपतीकडे आहेत. यासी बोलून येथाप्रा करार जालियास सामील व्हावें याप्रा पत्रे पाटीलबावाकडे पा॥ आहेत ह्मणऊन

---

× येथून पुढील अक्षर तुकोजी होळकराचें

राजारामपंत मजकूर याच येथे आजच आले ते वर्तमान कळावे यास्तव लिहिले आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Mahadji's conversation on the subject of Najafkhan joining the Marathas are further continued and reported in this letter

---

*No 159* ] [ April 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे नजफखान याजकडे मीर अली नकीचा पुत्र पाठविला होता तो फिरोन येथे आला आहे नजफखानाकडील येक मुसलमान बराबर घेऊन आला आहे त्याणे राजश्री पाटीलबावा याची भेट घेऊन तिकडील वर्तमान सांगितले जे, नजफखानाचा खजीर इंग्रजाचे पारपत्याविषई फार मजबूद आहे व तरतूद करतात त्यावर त्याचे बोलणे जाहले त्यातील भाव नजफखानानी सांगोन पाठविले की तुह्मी इकडे यावे ह्मणज तुह्मी आम्ही मिलोन इंग्रजाचा मुलूक घ्यावा त्यात प्राचीन आमचा मुलूक जितका असेल तो तर आमचा आम्ही घेऊ इंग्रजाचा मुलूक बगाला तुह्मी आम्ही मिलोन काबीज करून मुलकात अमल बसल्यानतर तीन हिसे आमचे व येक हिसा तुमचा याप्रमाणे करार असेल तर आम्ही इंग्रजाचे पारपत्यास हमराह होतो हे बोलणे ऐकून वकिलास बिन्हाडी जावयास निरोप दिल्हा त्यावर अद्यापपावेतो त्यासी भाषण जाहले नाही शिप्रीवर पलटणाचा जमाव भारी जाहला आहे त्या समई आपण ह्मणू तितके ऐकतील असी काबू अटकलून वकील पाठविला आहे बावाही तूर्त समेटीचेच अर्थ त्यासी बोलोन रवाना करणार आहेत येविषईचे बोलणे होईल ते मागाहून विनती करीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev communicates the terms on which Najafkhan was ready to join Mahadji in expelling the English from Malwa and Bundelkhand

---

*No 160* ] [ 2 May 1781

श्री

वडिलाचे सेवेसी पांडुरंग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना ता छ ७ जमादिलावल* भौमवार प्रात कालपावेतों वडिलाचे आसीर्वादे सुखरूप असे विशेष छ ३ मिनहूपावेतों इकडील वर्तमान विनतीपत्रे डाकेबराबर सेवेसी पाठविली त्यावरून निवेदन जाले असेल त्याउपरचे वर्तमान छ ५ रविवारचे दिवसी मागील च्यार घटका रात्री राजश्री आबोजी इंगले याजवर छापा आला तेव्हा गाफल होते बातमीस छबीना इंगले याजकडील होता तो मार्ग चुकाऊन छापा आला इंगले याची फौज सारी बापू मल्हार व राजबा देशमुख याबराबर देऊन पुढे राजश्री सदासिव मल्हार याकडे पाठविले आहेत आबोजी इंगले खासा जातीने शभर दीडशे स्वारानसी भाईचे बाजूवर राहिले होते त्याचे नजीक सिमथरवाला राजधर दोनतीनसे लोकानसी राहिला होता छबिन्याचे भरवशावर होते तों छापा अकस्मात गोटानजीक येऊन सिलक × जाली तेव्हा सिमथरवाल्याकडील पायचे लोक तोंडावर अगाडीस घालोन घोड्यावर जिन होतेच

* जर्त्रीत बुधवार आहे × बंदुकाचे बार

सामान्न निघाले दोन उटे मोबाकडील व पाच सात बैल ठाण्याचे गेले त्यावर इगले व राजधर इकडून माईस बातमी आली तेव्हा भाई फौजसुधा जाऊन पोहचले छाप्याचे पलटणाची व याची लडाई होत होत फौजेने बाणाची मारगिरी करीत पलटणे त्याचे गोटापावेतो रेटीत घातली दोन तीन घोडी तुरुकस्वाराची भाईकडे आली काही तेलगे मारले सिमथरवाले राजधर याचे पायास गोळी लागली राजधराकडील काही बुनगे छाप्यात गेले पाच सात माणसे तलावर ठार जखमी जाहले वरकड साभाळून आले

डोंगरीवर पलटणे होती ती शेसईच पलटणास सामील व्हावयाकरिता तेथून कूच करून मोहनगडचे सुमारास आली त्याचे मुकाबल्यावर या सदासिव मल्हार व इगले याची फौज व गोसावी बैरागी आहेत ते तेथेच मुकाम करून आहेत चदेरीवाला व खेची दोघे तिकडून उठोन येथे बावाजवळ आले ते प्रस्तुत येथेच आहेत खर्चाचा बदोबस्त करून द्यावा ह्मणजे पुढे जाऊ ह्मणतात चदेरीवाल्याची हाजिरी जाहाली तीनसे स्वार हाजरीस भरले खेचीची हाजरी अद्याप जाली नाही जाल्यावर त्याच अन्वये हेही होईल पाईचे प्यादे चदेरीवाल्याजवळ दोन अडीचसे पावेतो आहेत खेचीकडे दीडदोनसे पावेतो आले त्यासमई जमाव बरेच होते त्यात हरसाल बहुत होती लडाईचा समय आला खर्चाची अनुपत्य होऊ लागली फुकट का मरावे हा अर्थ समजोन आपआपली वाट धरली राहाताना जमाव याप्रो राहिला

शेसईची पलटणे शेसईसच आहेत त्याचे मुकाबल्यावर भाई फौज घेऊन असतात बावाचा मुकाम आहे त्याच जाग्यावर कालीसिंद नदीचे ऐल तीरी पचावली नजीक आहे

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ The writer Pandurang Raghunath reports a surprise attack by the English regiments upon Ambuji Ingle, without any serious results

---

*No 161* ] [ After 2 May 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे छ ७ जमादिलावलच आज्ञापत्र सादर जाले ते पावले पत्री आज्ञा की पा जेनाबाद व माजरोद प्रात खानदेश येथील मामलतीचा राजश्री नारो कृष्ण सरसुभा प्रात मजकूर याणी साहा साला इस्ताव्याची यादी ठराऊन हुजूर पाठविली आहे त्यास तुमचे लिहिल्यावरून मारानिलेकडे पेस्तर साला पासून मामलत सागावयाचा करार केला आहे आणि मारानिलेनी तुह्माकडे कारकून पाठवावा येविसीचे पत्र मारानिलेस सादर केले आहे त्यास तुह्माजवळ कारकून आल्यावर इस्ताव्याची यादी तुह्मी समजोन आत फितूर गानबर नाहाल्यास मुलूक सिरस्तेप्रमाणे मजुरा द्यावयाविसीचे बोलणं सिंदे याजजवळ बोलोन त्याचे कागदपत्र करून घेऊन हुजूर पाठवणे हुजूर आल्यावर इस्ताव्याप्रमाणे पेस्तर सालापासून मारानिलेकडे मामलत करार करून सनदा करून दिल्हा जातील ह्मणोन आज्ञापत्र राजश्री विठल हरि कारकून दि॥ वासुदेव राम यानी दिल्हे त्यासी गु॥ जाबसाल जाला तो मारानिलेचेच साक्षीनें जाला होता मामलत राजश्री वासुदेव राम याजकडे सागावी मरनसाला ( ! ) त्या प्रा पुढे सागतील सरकारात सनदा पाठवाव्या आणि मामलत सरकारातून सागावी हे कबूल करणार नाहीत राजश्री वासुदेव राम यानी मला पत्र लिहिले त्यात लिहिले की सनदा सरकारात पाठऊन द्याव्या आह्मी सनदपत्रे सरकारची घेऊ असें न जाल्यास परभारें मामलत सरकारातून लिहिले असता करावयास ठीक

पडणार नाही त्यास परभारे मामलत त्यानी करून याचा येवज यास द्यावा, जाजती होईल सरकारात पावते करावे या प्रा होईल यासिवाय होणार नाहीं हिसेबासी कटकट सालास पडेल यास्तव वासुदेवपतास आज्ञा होऊन मामलत आपले नावे करून घेणें असे त्याचें पत्र त्याच्या कारकुनास व येक (मला) येसी दोनी पत्रें त्याचीं आलीं ह्मणजे बाबासी बोलून होईल वर्तमान सेवेसी निवेदन होईल माझ्या लिहिल्यावरून राजश्री नारो कृष्ण सुभेदार याजकडे मामलत सागावयाचा करार सरकारातून केला आहे ह्मणऊन आज्ञा, त्यास सर सुभेदार याजकडे मामलत सागतील असे आले नाहीं ग्रा च्या करारा प्रा सागतात त्यास वासुदेव पत याजकडे मामलत सागावयाचा करार आहे त्या प्रा जालें तरी होईल सर सुभेदाराकडे परिच्छिन्न सागणार नाहीं येविसी आज्ञा येईल त्या प्रो वर्तणूक करू सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ This letter is a reply to Nana's proposal about the management of the districts of Jainabad and Majrad being entrusted to Naro Krishna Darve with the consent of Mahadji

---

*No 162*] [5 May 1781

श्री

विज्ञापना येसीजे गोहदकर राणा याचे चितात इग्रजासीं स्नेह राखून ग्वालेर किला देतात तो घ्यावा येविसीं रा गिरमाजी मल्हार याचें पत्र पाटीलबावास आलें तो मजकूर पूर्वी विनविला आहे त्या उपर रा गगाधर गोविंद येथें आले त्याचें बावाचें खलबत जालें जे गोहदकरासीं आपल्यासीं स्नेह आहे त्यापक्षीं त्यास मेलऊन घेऊन इग्रजाचे पारपत्यास येऊन सामील होतसें करावें त्यावरून त्याणीं काहीं मुद्दे गोहदकराकडील बावास सागितले, त्याची तोड जोड बावानीं त्यासीं बोलोन पत्रें त्याकडून गोहदकरास पाठवावयाचा निश्चय काल केला आहे आज उद्या मागती दुसरे खलबत होऊन पत्रें जाणार गिरमाजी मल्हार यास उठोन येण्याविसींची पत्रें बावाची गेली

जालमसिंग कोटेकर याजकडील काही पायचे लोक भाईकडे पाठवावयाविसीं लालाजी बलाल याचे विद्यमान बोलणें लाविलें त्याजकडील उतर साफ जाहले जे, आमचा लोक आह्मा-खेरीज पुढें जावयाचा नाहीं खासा स्वारी आपली जे दिवसी इग्रजाच लडाईस निघेल ते दिवसीं आम्ही जमियतसुधा लडाईस सिद्ध आहो छ ९ शनवारचे दिवसीं बावा त्याचे डेऱ्यास गेले होते येक घोडा त्याणीं नजर केला चार घटका बसोन गोटास आले हाड्याचे सागान बरेंच आहे परतु जे दिवसी बावा लडाईस निघतील ते दिवसीं हाडे हमराहा होतील त्यातही हाड्याचे बोलणें आहे जे तोफा आह्मापासी लावपल्याच्या नाहींत आपण तोफा आणवाव्या लढाईचे समई आपण आमचे पाठीसी उभे राहून तमाशा पहावा याप्रमाण भाषणे होतात घडून येईल ते खरे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Mahadji's overtures with the Rana of Gohad through Gangadhar Govind and with Zalim singh of Kotah through Lalaji Ballal are reported in this paper

---

*No 163* ] [ 6 May 1781

श्री

वडिलाचे सेवेसी पाडुरग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना ता। छ ११ जमादिलावल रविवार प्रात कालपावेतों वडिलाचे आसीर्वादे सुखरूप असे विशेष इकडील वर्तमान छ ८ मिनहूपावेतों विनतीपत्रे डाकेबराबर सेवेसी पाठविली, ती प्रविष्ट होऊन निवेदन जाहाले असेल त्याउपरचें वर्तमान

राजगडास दोन पलटणे रस्त आणावयाकरता गेली ह्मणोन छ ८ मिनहूचे दिवसी विनविले होतें ती पलटणे रस्त घेऊन शेसईस आली वाटेवर पेंढारी याणी लगट करून पाच सात बैल भरतीचे मात्र आणिले त्याउपर शेसईहून दोन पलटणे येक तर्फ समागमे घेऊन पनास पाऊणसे बैल रस्त भरून छ ९ शुक्रवारचे रात्री कुलारसास यावयाकरिता निघाली हे वर्तमान भाईस कळताच भाई फौजसुधा कुलारसचे सुमारे आले त्याआधीच पलटणें रस्तसुधा कुलारसास पावली. त्यावर भाई फौजसुधा कुलारसानजीक रात्रीचे उभेच होते, तों मागील च्यार घटका रात्रीस पलटणे रस्त पोहचाऊन फिरान शेसईस जावयाकरिता निघाली तेंव्हा वाटेवर भाईनी गाठ घालोन बाणाची मारागिरी करीत पागच करोलानी निकड करून बावीस प्यादे तेलग ठार व दोन गोरे व येक कुपणीचा सुभेदार ठार मारून सिवाय जखमी करून तीन निशाणे पाडाव करून आणिली व च्यार पाच राहुट्या दोन बिचोबे, दोन चादण्या कुलारसाहून छकड्यावर लादून नेत होते ते पाडाव करून आणले काही दोन च्यार जखमी कुलारसाहून डोलीत घालान पलटण शेसईस घेऊन जात होते, ते डोल्यासुधा तसेच मार्गात टाकून व खेतात मुडदे ठार पडत गेले ते तसेच सोडून शेसईस गेले पागेचे लोकानी मेहनत चागली केली याप्रमाणें भाईची चिठी बावास आली निशाणे वगैरे पाडाव इंग्रजाकडील आले ते भाईनी लस्करात बावाकडे पाठविले ते दृष्टीने पाहिले इकडील नऊ दाहा घोडी व काही लोक ठार जखमी जाहले काही गोसावी जखमी जाले याप्रमाणे लढाई जाहली

डोंगरीवर पलटणे आहेत ती त्या जाग्यावरच आहेत त्याचे मुकाबल्यास राजश्री सदासिव मल्हार वगैरे फौज आहे त्याचा मुकाम डोंगरीनजीक आहे नवलविशेष अधिकोतर विनवावयाजोगे साप्रत येका दोहो दिवसात काही घडल नाहीं

राजश्री गगाधर गोविंद याबराबर सात आठसे स्वार घर पागा सामान चागले व राजश्री सिवराव हरि याबराबर अडीच तीनसे स्वार पो। उभयता खाशाजवळ काही लोक राहून बाकी फौज भाईकडे रवाना जाहली श्रीमत राजश्री पाटीलबावा याचा मुकाम आहे त्याच जागा कालीसिंद नदीचे ऐलतीरी पचावलीनजीक आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Pandurang Raghunath reports an action fought near Kolaras in which the British regiments sustained a severe defeat from the Marathas

---

*NO 164* ] [ Received on 16 May 1781

श्री

पौ छ २१ जावल इहिदे समानीन ह्या। डाक

विज्ञापना चिरजीव बापूजी रघुनाथ याच्या चिठ्या तान दोन रवाग्यात आल्या त्या कचे वर्तमान समजावे यास्तव पाठविल्या आहेत प्रगटात कोणास देवील रामजी पा। बाबही न

कलाव्या. सारे राजे रजवाडे आले आहेत तोफाही नेविल्या आहेत या उपरी होईल वर्तमान ते निवेदन करीन इग्रजाचो पलटणे कलकत्याहून कोणी दोन सागतात कोणी तीन ह्मणतात आली ते काल्पीस येऊन ठाणे बसविले ह्मणऊन सावकारी वर्तमान आहे पूर्वी सिपरीस पलटणे आली तेव्हा राजश्री बाळाजी गोविंद यासी करार जाला की तूर्त तुमचे मुलकाचे वाटेस जात नाही तुह्मी आडवे न व्हावे दक्षणपावेतो आमल बसल्यावर आह्मी तुमचेच आहो. याप्रा बोलणे होऊन ते पुढे आले आता काल्पी घेतली असल्यास तूर्त पेच त्याजवरच पडला आहे कोणी ह्मणतात की बाबाकडे फौज अगर्दी घेऊन यावी लागेल, यास्तव निमित्त त्यानीच उभे केले आहे हे प्रमाण दिसत नाही येकिले वर्तमान कळावे यास्तव लिहिले आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev in forwarding Bapuji Raghunath's news letters to Nana, alludes to a secret understanding between Balaji Govind and the British

---

*No 165* ] [ June 1781 ?

श्री

विज्ञापना ऐसीजे गोहदकराकडील अनुसधान राजश्री सिवाजीपत बापू याजकडे राण्याचे कागद पत्र आले जे, राजश्री चिमणाजीपतास गणेशखेड्यास पाठवावें व गिरमाजी मल्हार यास पत्र आले जे, तुह्मी व चिमणाजीपत गणेशखेड्यास यावें, ह्मणजे येथून मातबर पाठऊन बोलणें निश्चयात आणिलें जाईल त्यावरून श्रीमत राजश्री पाटीलबावानीं या विषईचा विचार करून गिरमाजी पताची रवानगी गणेशखेड्यास केली तेथें राण्याकडील मातबर येऊन बोलणें जाहल्या वर गिरमाजीपतानीं येथें येऊन निवेदन करावें राजकारण पक्कें आढळल्यावर येथून चिमणाजी पतास राजकारण सिद्ध करावयाकरता पाठवावें गोहदकराचा व राजश्री गगाधरपत बुंधेले याचा स्नेह यामुळें जोंपर्यंत त्याचे हातें राजकारण घडेल तेथपावेतों दुसऱ्याचे हातें घडावयाचें नाहीं असें असता गगाधरपताची रवानगी येथून जाहल्यास कमेष महिना जाहला अद्याप गोहद कराचा येक कागद देखील नाहीं आणि राजश्री सिवाजीपत बापूस व गिरमाजी मल्हार यास दोन तीन पत्रें आलीं जे, येण्यास दिरग न करावा व त्याकडील मुनसी छोटखानी वकीलही आला जे, चिमणाजीपतानीं व गिरमाजीपतानीं चलावें त्यावरून गिरमाजीपताची रवानगी पाटील बावानीं राजश्री सिवाजीपत बापू मिळोन उभयताचे विचारें गणेशखेड्यास जाहली सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev explains why Giramajipant was despatched to the Rana of Gohad and what the nature of the mission was on which he was engaged

---

*No 166* ] [ 2 June 1781

श्री

वडिलाचे सेवेसी पाडुरग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार विज्ञापना ता छ ९ जमादिलाखर शनवार सायकाळ पावेतों मुा नाा पचावली पाा रणोद वडिलाचे आसीर्वादे यथास्थित असे विशेष छ ६ मिनहूचे रोजीं डाकेबराबर विनतीपत्रें सेवेसी पाठविलीं तीं प्रविष्ट होऊन इकडील वर्तमान निवेदन जाहले असेल त्या उपरचें वर्तमान भाई फौज घेऊन शेसई कोलारसचे दरम्यान आहेत त्याच जागा आहेत अबोजी इगले राजगडाकडे गाव मारतात

गोसावी स्वार पाच हजार झाशीकडून आणावी नवे आले त्यास श्रीमंत राजश्री पाटीलबावानी आणविले ते छ ७ मिनहूचे रोजीं यथें आल्यावर बावा त्याचे गोटात जाऊन सिस्टाचारी करून परस्परें भेटी जाहल्यावर दुसरे दिवशीं काहीं खचाचा बगमी त्याची करून देऊन गोसावी याची खानगी माईकडे केली

राजश्री बळवंतराव घोंडदेव याचे स्वीस समाधान नाहीं ह्मणोन देवरीहून त्यास पत्र आलें त्यावरून मारनिल्हीं आपले कारकुना बराबर फौज ठेऊन खासा जातानें शेंननास स्वार बराबर घेऊन बावाचा निरोप घऊन देवरीस गल

इग्रजांचीं पलटण कालरस व शसई व डोंगरी ह्या जागा आहत ती प्रस्तु (त) आपलाल्या जागाच आहेत कोलारसातील तोफा न्यावयास पलटणें यणार ह्मणान बातम्या येतात

जालमसिंग काटकर छ ७ मिनहूचे राजीं निरोप घेऊन काल्यास गले काहीं जमीयत दोन तीनसें स्वार व दान तीनसें पाईचीं माणसें तुबकदार × इतका जमाव लालाजी बलाल याजवळ ठेऊन गेले आहेत

श्रीमंत राजश्री पाटीलबावाचा मुकाम आहे त्या स्थळीं आहे विचार करीत असतात जे तोफा न्यावयाकरिता पलटणें शेसई व डोंगरीची जमा होऊन कोलारसास येऊन तोफा नेणार साप्रत इकडेही गोसावी व बैरागी मिळोन कमपत्र दाहाहजार पावेतों पाईचे माणूस तुबकदार जमाव जाहला तोफा न्यावयास येतील ते दिवसीं निकड करून लडाई मातबर करावी येकीकडे बैरागी व येक बाजू गोसावी व येक बाजूनें करोल सदरहूचे पाठीमागें फौजेचा मरणा याप्रा तरतूद करून लडाई मातबर करावी असा विचार होत अ ह घडून येईल तें खरें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Mahadji's preparations for a final action by strengthening his own position and gathering more allies are reported in this letter by Pandurang Raghunath

---

*No 167* ] [ 4 June 1781

श्री

वडिलासे सेवेसी पांडुरग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार विज्ञापना ता छ ११ जमादिलाखर सोमवार दोनप्रहर दिवसपर्यंत यथास्थित असे विशेष छ ९ मिनहूचे दिवसीं डाके बराबर विनंतीपत्रें सेवेसी पाठविलीं, तीं प्रविष्ट होऊन इकडील वर्तमान निवेदन जाहले असेल त्या उपरचे वर्तमान इग्रजाचा मुकाम कोलारस शेसई डोंगरी ह्या जागा धरून पलटणें आहेत, तीं आपलाले जागाच आहेत तोफा न्यावयाकरिता कोलारसास शेसई डोंगरीची पलटणे येणार अशा बातम्या येतात परतु अद्याप येत नाहींत राजश्री राणेखान भाई फौजसुद्धा कोलारस व शेसईचे दरम्यान अ हेत गोसावी बैरागी व सदाशिव मल्हार हेही भाईजवळच आहेत तोफा नेतेसमई निकड करून लडाई म तबर करावी असा विचार अ हे घडोन येईल तें खरें श्रीमंत राजश्री पाटीलबावा याचा मुकाम नजीक पचावली काळीसिंद नदीचे ऐलतीरीं आहे त्या जागाच आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ The dispositions of Mahadji's field forces near Kolaras are detailed in this letter

---

× तुबक is a musket, तुबकदार=provided with muskets

*NO 168* ] [ 5 June 1781

श्री

वडिलाचे सेवेसी पाडुरग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार विज्ञापना ता छ १२ जमादिलाखर बुधवार प्रथम प्रहर दिवसपर्यंत वडिलाचे आसीर्वादे सुखरूप असे विशेष छ १० मिनहूच रोजीं डाकेबरावर विनतीपत्रें पाठविली ते प्रविष्ट होऊन इकडील वर्तमान निवेदन जाले असेल त्याउपरचें वर्तमान इग्रजाची पलटणें कोलारस व शेसई व डोंगरी या जागा आहेत ती आपलाले जागाच आहेत राजश्री भाई फौजसुधा कोलारस व शेसईचे दरम्यान आहेत गोसावी बैरागी व सदासिव मल्हार भाईजवल आहेत अचोजी इगळे राजगडाकडे गाव मारीत होते ते प्रस्तुत येथें बाबाजवल आले आहेत राजगडाकडे शिसोयाचे दोन गाव मात्र मारले इग्रजाकडे ग्वालेरीहून रस्त येणार ह्मणोन बातम्या येतात व तोफा न्यावयाकरिता पलटणें शेसई व डोंगरीची मिळोन कोलारसास येणार हेही बातम्या आठ दिवस जाले येतात परतु ते कोणेसमई येताल त्याजवर निरुड कसकसी होईल हें घडल्यावर कळेल प्रस्तुत आधी × व आभाळ व काहीं काहीं पर्जन्यही येखाद दिवस पडतो गोसावी व बैरागी मिळोन पाईचे माणूस दाहा हजार तुबकदार जाले त्याचा उमेद लढाईची चागली आहे प्रसगानसार घडोन येईल तें खरें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Duststorms preceding monsoon weather are reported by **Pandurang Raghunath**

---

*No 169* ] [ After 15 June 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे छ २२ जा खरचे पत्र सादर जाहाले पत्री आज्ञा, बापूजी पताकडून पाटिल बावानी पत्रें लिहिविली, ती पाठविली ती पाहिली मजकूर सविस्तर कळला त्याची उत्तरे अलाहिदा लिहिली आहेत, त्यावरून कळेल तुह्मी उत्तर पाटीलबावाकडे चागलें लिहून पाठविलेंत आह्मींही तुमचे नावे अलाहिदा पत्र लिहून पाठविलें आहे तिकडील मसलत भारी होत चालली. तेव्हा बरसाती आलीकडे उरकणें कलतच आहे च्यार महिने अवकाश इग्रजास पड ल्यावर आपली पलटणें जमा करून भारी होऊन वरकडही राजे रजवाडे अनकूल करून घेतील या करिता यदा पाटीलबावानी छावणी इग्रजाचे शहावर करावी हें चागलें राजे रजवाडे यास समजेल कीं हे पारपत्य केल्याखेरीज पिछा सोडीत नाहीं तेव्हा राजकारणें करू पावणार नाहींत इकडे अनकूल होतील ते करून घ्यावयासी येतील यास्तव छावणी जरूर व्हावी गतवर्षीच्या जेष्ठापासून मसलतीच्या तर्तुदा व लिहिणी होत गेली आता देसीची फौज येऊन न्यावी हें ध्यानात आले त्याची तरी तर्तूद लौकर व्हावी पाटीलबावा येकटे असता मसलत सभाळणार नाहीं, याचा विचार अवल सालापासून व्हावा ह्मणोन लिहिले, त्यास कोणता विचार कसा करावयाचा तो सविस्तर लिहून पाठवावा सरकारचाही सर्व अर्थ तुमचे ध्यानात आहेच ह्मणोन आज्ञा यास बावा छावणी इग्रजाचे शहावर करीतच आहेत व येविसी पूर्वी लिहित्यात आले, ती पत्रें गेलीं आहेत वारवार येविसींच लिहिले गेल्यास ठीक नाहीं यास्तव पुरवणी पा नाहीं वरकड मसलतींचे अर्थ तरी इकडील द्रिष्टीस आले ते त्याहावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Nana learns & approves Mahadji's plan of quartering

---

× उत्तर हिंदुस्थानात वावटळ सुटून दिवसा अधार होतो त्यास आधी ह्मणतात

his troops in front of the English regiments during the rainy season

---

*No 170* ] [ 18 June 1781

श्री

पौ छ १० रजब इसने आषाढ

वडिलांचे सेवेसी, पाडुरंग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २५ जमादिलाखर सोमवार मध्यरात्र पावेतों मु॥ नो[×] पचावली पा। रणोद प्रांत अहिरवाडा वडिलांचे आसीर्वादे यथास्थित असे विशेष छ २४ मिनहूचे दिवसी शेसईहून कोलारसास इग्रजा‑कडील रस्त येणार हे बातमी राजश्री भाईकडे आली त्यास भाई प्रस्तुत दोन तीन दिवस जाहले कीं श्रीमंत राजश्री पाटीलबावाच्या भेटीस आले ते येथेंच होते याणीं राजश्री रायाजी पाटील व बाळोबा पागनीस पुढें फौजेंत होते, त्याकडे सागोन पाठविले बातमी पकी होती त्याप्रो इग्रजाची रस्त मागील प्रहर रात्रीं शेसईहून निघाली, त्याची बातमी रावोन वर्तमान येताच रायाजी पाटील व पागनीस व सदासिव मल्हार व इगळे याकडील फौज व पेंढारी मिळोन रस्तेवर जाऊन गाठ घालोन लडाई चांगली करून तीन साडे तीनसें बैल रस्तेचा पाडाव करून आणला चालीस पनास माणूस इग्रजाकडील मारले याजकडीलही दाहा वीस घोडीं माणसें ठार व जखमी मिळोन जाहली इग्रजाकडील पाच सात तुरुक स्वार ठार मारून त्याची घोडीं आणलीं याप्रमाणें लडाई जाहाली व छ मजकुरीं कोलारसातून दोन तेलगे पळोन येथें आले त्याणीं सागितलें कीं करनेल मेवर डोंगरीस आहे त्याचे चित्तात अमावास्येचे सधींत येक वेळ छाप्याची गलबल करून पाहावी या उद्देशें तो कोलारसास येणार आहे याप्रमाणें सागितलें इकडेही रात्रीचे चौकी पहाऱ्याचा बदो‑बस्त व लष्करात हुशारी बरीच आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Pandurang Raghunath reports an action with the forging party of the British, in which a severe defeat was sustained by them

---

*No 171* ] [ June 1781

श्री

विज्ञापना येसीजे राजश्री धारराव सिंदे याचा कारकून बक्षी लढाईत पाडाव इग्रजाकडे गेला होता, त्याला अडीच महिने जाहले कोलारसात होता त्यास इग्रजानीं दहा रुपये खर्चास देऊन सोडून दिल्हा त्याणें इग्रजाकडील वर्तमान सागितलें —

दीड पलटण व दाहा तोफा कोलारसात आहेत

शेसईस दीड पलटण चार तोफा

सिप्रीस खासा करनेल मेवर चार पलटणे व राणा गोहदकर तीन हजार फौज व दोन पलटणे, पाचसे तुरुक स्वार मेवराचे वीस तोफा याप्रो तेथें आहेत

डोंगरीस येक पलटण व च्यार तोफा

धारण सागितली —

८।१ गहू रुपयाचे अकरा सेर ८।= हर भरे बारा सेर

---

× नो=नजीक

८८२ तूप दोन सेर सवादोन सेर. ८८३ साखर तीन सेर

याप्रो जिनसाचा भाव आहे मोटामल साहुकारे इटावेकर पाच हजार बैल रस्तेचे घेऊन राण्याबराबर आला आहे त्याचीच पुरवणी रस्तेची मोठी आहे छावणी आइत त्या जाग्यावरच करतील असीही बोलवा आहे की कोलारस व शेसई सिप्री डोंगरी या जागाचा बदोबस्त करून देऊन खासा करनेल व राणा नरवरास छावणीस जाणार

सिरोंजेवर कुमक* इग्रज आठ पलटणे घेऊन आला त्यात कुमकाची सहा पलटणे व गोहदकराकडील केसरीसिंग दोन पलटणे येकून आठ पलटणे, पाचसे तुरुक स्वार, चौदा तोफा, तीन गरनाळा याप्रो जमाव होता त्यावर करनेल मेवर नवा सरदार दोन पलटणे व पाचसे तुरुक स्वार घेऊन आला, त्या सुद्धा दाहा पलटणे जाहली पैकी कुमक अतर वेदीत गेला त्या बराबर त्याजकडील तुरुक स्वार पाचसे व पलटणाचे प्यादे दोन अडीचसे इतका जमाव त्या बराबर गेला व आज पावेतो लडाईत ठार व जखमी मिळोन गणती बारासे तेरासे पावेतो जाहली काही पळोन गेले येकूण दोन पलटणे करनेल नवी घेऊन आला त्याचे मोबदल्यास कुमकाबरोबरची दोन पलटणे गेली, मेली, जखमी जाली येकूण मागनी करनेल मेवराचे जमावासुद्धा आठ पलटणे व पाचसे तुरुक स्वार या खेरीज राणा तीन हजार फौज व दोन पलटणे याप्रो इग्रजाचा जमाव खराखुरा आहे ह्मणोन सागितले कालपीस पलटणे आली होती पौ तीन पलटणे गेली येक पलटण काल्पीचे किल्यात आहे राजे रजवाड्यापौ गोहदकर त्यात मिळाला नरवरकर मिळाला खेचीचे अनुसधान लागले आहे चदेरीचा मुख्य राजा ज्यासी राजधर चदेरीकरासी कलह होता तो इग्रजाकडे गेला खेचीने अनुसधान इग्रजाकडे लाविले आहे भूपालास पोहोचलो ह्मणजे मग आह्मास कमी काय असे तर इग्रज आपले तोंडानेच ह्मणतात तेव्हा भूपालवाले सामील होऊन चुकले इग्रज इकडे यावयाचीच मार्ग प्रतीक्षा करितात तीन लक्ष रुो इग्रजास द्यावे त्याणी मेलसे घेऊन भूपालवाल्याचे स्वाधीन करावे याप्रो सकेत आहे

तोफाचे गाडे वगैरे सरजाम तयार करतात

श्रावण मासी माळव्यात चाल करावी असे आहे तरतूद लडाईची भारी करितात

याप्रो त्याणे सागितले सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Items of useful news from the British side as obtained from Dharrao Sinde's clerk who was released by the English, are communicated in this letter

---

*No 172* ] [ 3 July 1781

श्री

पौ छ १० रजब

विज्ञापना येसीजे पा महतपूर चदेरीकराने दुडी करून माहाल घेतला होता त्याविसी श्रीमत राजश्री पाटीलबावा यास विनती करून माहाल सोडविला सरकारातून महतपूरची कमावीस कृष्णाजी तानदेव याजकडे आहे त्यास मारनिलेकडील कोणी कारकून देखील प्रतगी नाही तेव्हा माहाल करावा कोणाचे स्वाधीन ? कृष्णाजी तानदेव आहे यास राहतात य करिता राजश्री सिवाजीपत बापू याचे पत्र त्याजकडे पाठवून तूर्त ठाण्यात कोणी पाहिजे याकरिता बापूकडील

---

* Col Conmac

कारकून पाठविला त्यास महिना सवा महिना जाहाला कृष्णाजी तानदेव याचे उत्तर आलें कीं कारकून पाठऊन देतो महतपुराकरिता सरकारचीही पत्रें आणिली आहेत असें लिहिलें परंतु अद्याप मारनिलेकडील कारकून येत नाहा परगणा दरोबस्त उज्याड जाहाला होता कसब्यात मात्र दाहा वीस गोरगरीब होते दिवस लावणीचे ज्याची कमावीस त्यास काळजी नाहीं कारकून यावयास दिवसगत लागेल, यामुळे तेथील जमीदार लस्करात म(ज) जवळ येऊन खातरी मागो लागले त्या वरून त्याची खातरदास्त करून लोक पळून गेले होते त्यास कौलपत्र पाठवून दाहा गावची वस्ती करऊन लोक लावणीस लाविले दोन गाव राहिले आहेत ते खिरयावाला रूपजी चंद्रेगिकराचा कारभारी याचे दहशतीमुळे वसत नवते तेव्हा त्यास पत्रें श्रीमंत राजश्री पाटीलबावाची पाठऊन तेही गाव वस्ती करविले कसब्यांतील किरसान * व वाणी वगैरे पळून सराई व पछार व रणोद येसे आपआपले याग्याने गेले होते तेथें जमीदार व बापूकडील कारकून पाठऊन तमाम लोक समजाऊन आणले प्रस्तुत श्रीमंताचे पुण्यप्रतापें महतपूर कसबा व परगण्याचे बारा गाव दरोबस्त वस्ती करून लावणी सुरू केली लोक आपआपले उद्मास लागले आहेत कृष्णाजी तानदेव याकडील कारकून आला ह्मणजे महाल साभाळतील जमीदारास कागदपत्र मागितले आहेत तगादा सख्त तो नाहीं. नकळे तगादा करू गेल्यास काहीं सशय धरितील, अथवा लावणींत खूळ करितील याकरिता सारे येकीकडे ठेऊन तूर्त माहाल लावणीस घातला पुढे कमाविसदार दों चौ रोजात येणार आहे आला ह्मणजे माहिनगारीनें कलेल तसें करील सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ How the district of Mahatpur has been resettled and cultivated is reported to Poona

---

*No 173*] [3 July 1781

श्री

पौ छ १० रजब

विज्ञापना येसीजे श्रीमताचें पत्र आपले नावें सादर जाहलें जें नबाब निजाम आलीखान बहादूर याचे सरकारात शहर बऱ्हाणपूर येथील बदुखा व शेरबचे * वगैरे जिन्नस खरीदी साठास जातो त्यास कमाविसदार हासलाविशीं दिकत करतात व काही पैकाही घेतला याविषई नबाबानी येक दोन वेला लिहिलें असे तर राजश्री पाटील बावा यास सागोन शहर मजकूरचे कमाविसदारास पत्र घेऊन पाठवावें कीं, नबाबाकडील जिन्नस शहरात खरीदी होईल त्यास जकातीं वगैरे कोणेविसी उपद्रव न करणें येवज घतला असेल तो माघारा दणे येसी लिहून दोन पत्रें ध्यावी येक परभारें शरहास जावें व इकडे पाठवावें विषय थोडा आणि नबाबानी एक दोन वेला लिहिलें याकरिता जरूर पत्रें घेऊन पा ह्मणोन छ २१ जमादिलावलचे पत्रीं आज्ञा जाहाली तें पत्र श्रीमंत राजश्री पाटीलबावा यास दाखऊन आज्ञा प्रो सदरहू अन्वये दोन पत्रें शहरचे कमाविसदार विनाजी विठल याचें नावें घेऊन पाठविलीं आहेत प्रविष्ट होतील. श्रीमंत राजश्री पाटील बावानीं सागितलें कीं, सरकारच्या आज्ञे प्रो आह्मीं पत्रें दिल्हीं, परंतु आह्माकडील बदुखा वगैरे जिनस शहर औरंगाबादेस खरीद होतो त्यास हासील घेतात येविसी नबाबाकडीलही ताकीद शहरचे तालुकदारास असावी कीं सिंद्याकडील बदुखा वगैरे जिन्नस शहर औरंगाबादेस रवा होईल त्यास हासीलाविसीं तगादा न करणें याप्रमाणें त्याचेही पत्र यावें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Exemption from excise taxes on the purchase of guns

---

+ किरसान=शेतकरी * शराब=Wines

and wines at Burhanpur was claimed by Nizamali Khan and is here granted by Mahadji with an addition that the Nizam should grant the same exemption to the Marathas at Aurangabad

*No 174* ] [ After 6 July 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे श्रीमतांचें पत्र आपले नावें सादर जाहले जे माधवराव तुकदेव व मानाजी सिंदे वगैरे मिळोन दोन तीन हजार फौज जमा केली आण खूळ करावे या उद्योगात होते ही बातमी येताच त्याजवर प्रतिनिधीकडील फौज पाठविली त्यांची व माधवराव वगैरे याची गाठ गोपाळपूर नजीक पढरपूर येथे पडोन लढाई जाहाली माधवराव यास जखमा लागोन पनास पाऊणसे लोकानसी पळोन गेले वरकड फौज लुटून पस्त केली, ह्मणोन छ १३ रजबचे पत्री आज्ञा. याप्रमाणें वर्तमान श्रीमंत राजश्री पाटीलबावा यास निवेदन केले ऐकून बेऊन संतोष पावले मानाजी सिंदा तेव्हडा हस्तगत जाहाला असता ह्मणजे गुनाच उरकला असता तरी प्रतिनिधी कडील फौजेनें चांगली केली याप्रमाणें उतरे जाहली सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ A defeat inflicted on Manaji Sindia Phakde by the troops of the Pratinidhi is reported to Mahadji, who was gratified to hear it

*No 175* ] [ 7 July 1781

श्री

वडिलांचे सेवेसी पांडुरंग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १४ रजब मु॥ नजीक पचावली पा। रणोद वडिलांचे आसीर्वादे यथास्थित असें विशेष श्रीमंत राजश्री पाटीलबावा याचा मुक्काम सडेस्वारीचा पचावली नजीक खासा स्वारी होते व राजश्री राणेखान भाई वगैरे मंडळी फौजसुधा अगाडीस इंग्रजाचे मुकाबल्यावर राहून लढाया करीत होते आधींच पाटील बावाची सडी स्वारी, त्यापेक्षा केवळ जरारे घोडे राऊत याप्रो। भाई नेहेमी तीन महिने पुढें राहून लढाया करीत हाते साप्रत छावणीचे दिवस आले असता मृग आर्द्रा दोन नक्षत्राचा पर्जन्य तसाच सोसून इंग्रजाचे मुकाबल्यावर कोलारस व शेसईचे दरम्यान राहिले होते त्यावर छ ८ मिनहूचे रोजीं पर्जन्य मातबर पडला झड बसली सिंदनदीस पूर आला नेहेमीचा उतार मोडला इकडून रस्त पोंहचेना आधीं येथेंच महर्गता विशेष जाहाली हरभरे दोन पायली, आटा रुपयाचा सात सेर साडेसाहा सेर. याप्रो। दाहा बारा दिवस जाहले आहे नदीस उतार होता तोंपर्यंत येथून रस्त पुढें पोंहचली नदीचा उतार मोडला, झड नेहेमीं बसली, तेव्हा दोन दिवस पुढील फौजेंत हरभरे पाचसेर व आटा रुपयाचा पाचशेर, साडे पाचसेर याप्रमाणें धारण जाहली पर्जन्य नेहेमीं लागला, त्यावरून पाटीलबावानीं विचार करून पुढें फौजा होत्या त्या दरोबस्त भाईसुधा व गोसावी बैरागी तमाम बोलाऊन घेतले आता या मुकामावरही राहावयाची सोय नाहीं जगल नेहेमीं, कालीबावरे, आसपास छावणी करिता जागा शोधून आणविली, परतु जागा छावणीचे उपयोगाची नाहीं व या मुकामाचे पाठीमागें चौकोसावर बिजराणीची नदी मातबर आहे तेथेंही पर्जन्यकाळी उतार मोडतो तेव्हा रस्तचे सकट यामुळें विचार करून काळाबाग नवी सराई व शाहा दौरा याचे आसपास छावणी करावयाजोगी जागा पहावयाकरिता बिनीवाले पा।

आहेत ते आल्यानंतर येथून कूच करून छावणीचे जाग्यास जाणार इंग्रज कोलारस व शेसई व सिप्री व डोंगरी या जागा गड्याचा आसरा धरून आहेत रस्त वरचेवर राण्याचे मुलकातून येत असते खासा गोहदकर राणा व इंग्रजाचे पलटणाचा सरदार करनेल मेवर * हे उभयता सिप्रीस आहेत तेव्हा त्याची छावणी ज्या ज्या स्थळीं पलटणें आहेत तेथेंच छावणीचा निश्चय जाहाला ह्मणून बातम्या येतात कोणी असेंही पाटीलबावा जवळ सागतात जे, कोलारस व शेसई व सिप्री व डोंगरी ह्या जागा रस्तेची पुरवणी करून देऊन बदोबस्त करून खासा करनेल मेवर व राणा हे उभयता नरवरास छावणीस जाणार या उपर येथील वर्तमान ते विनती करीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ The writer reports that Mahadji had shifted his encampment to another spot owing to rains and flooded rivers

---

*No 176* ] [ 9 July 1781

श्री

पौ छ २४ रजब इसने समानीन ह्या डाक

विनती सेवक नारो सिवदेव कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १६ रजब पावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री पाटीलबावाचे लस्करातून पत्रें चिरजीव राजश्री पाडुरग रघुनाथ याची पुरवणीसुधा तीन पा। आहेत त्याजवरून सविस्तर विदित होईल गोहदकर जाट फौजसुधा येऊन इंग्रजास सामील होऊन येक लढाई जाली तेव्हा दिवसेदिवस मसलत भारी होत चालली भोपाळकर त्याच खेलात आहेत वरक्ड राजे रजवाडे तरी जबरदस्तीचे आहेत मदतीस आल्यास खर्चास द्यावें लागतें आणि उपयोगही दिसोन आला नाही पुढें होईल वर्तमान ते लिहिण्यात येईल इंग्रजास पायेबद मागे बसल्याखेरीज जरब बसत नाहीं भोसले याची फौज बगालेयात गेली त्यानी सलूख करून चेनापटणाकडे मदत गेली त्यास वाट दिल्ही तेव्हा कलकत्याहून इकडे मदत येईल त्याचे वाटेस कश्यास जातील? असा प्रसग तूर्तचा दिसतो ती विनती लिहिली आहे सेवेसी

☞ Naro Shivdev reports that the British were getting strength daily on acconnt of several local chiefs siding with them, like the Rana of Gohad Also the intrigue of Nagpurkar Bhonsle with the British can be seen in this letter

---

*No 177* ] [ 18 July 1781

श्री

विनती सेवक नारो सिवदेव कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २५ रजबपावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री यादवराव पवार याजकडील कर्जपटीचा फडच्या होणे याजकरिता त्याजकडील कारकून पाठवणे कारकून न आल्यास त्याजकडील सरजामाची जप्ती होईल याप्रा। पवार मजकूर यासही पत्र होते ते त्याजकडे पाठविले होते त्याजवरून त्यानी राजश्री पाटीलबावा यास आपले सविस्तर वर्तमान समजाविले त्यातील अर्थ पाहाता हलाखी बहुत देण्याचा पेच भारी स्वारीत समागमे आहेत खर्चाची बहुत विपती यास्तव पवार मार याजकडील

* Col Muir

पटीची माफी व्हावी, येविसी बावानीही पत्र स्वामीस लिहिले आहे मारनिले छावणीस आहेत. सरजाम मोकासबाबेचा, त्यात कादार सिबदीतच जातो हे सर्व अर्थ स्वामीस विदित आहेत. याजविसी बावानी बहुत प्रकारे सागितले ह्मणऊन चिरजीव पाडुरग रघुनाथ यानी लिहिले होते त्याजवरून विनतीपत्र सेवेसी लिहिले आहे कृपा करून कर्जपटीची माफी होय ते करणार स्वामी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev submits Mahadji's recommendation to Nana for granting an exemption from payment of the debt imposition to Yadaorao Pawar, who was at this time on active service under Mahadji

---

*No 178* ] [ 20 July 1781

श्री

वडिलाचे सेवेसी पाडुरग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २७ रजब मु॥ नजीक बुढा डोंगर पचावलीचे मुकामीहून कूच करून काल छ २६ मिनहूचे रोजी दीड कोस माघारा निपाण जाग्यावर श्रीमत राजश्री पाटीलबावा फौजसुधा येऊन मुकाम केला फौजा तलावा करावयास जात असतात काही माणसे बातमीदार वगैरे सापडतात, तीं घेऊन येतात इग्रज कोलारस व शेसई व सिप्री व डोंगरी ह्या जागा आहेत तसेच आहेत खासा कर्नेल मेवर शेसईस आहे गोहदकर राणा झरीस गेला ह्मणोन पूर्वी विनविले होतें त्यावर बातमीची माणसे आली त्याणी सागितले, शेसईस वैरणीचा तोटा व बाहेरून वैरण आणावयास इकडील तलाव्याचे भय अशा अडचणीकरता राणा शेसईहून कूच करून शिप्रीस जाऊन मुकाम केला आहे त्याचे मुकाबल्यास तलावे करावयाकरता बापूजी मल्हार नि॥ आबोजी इगळे याबराबर ( बारा ) हजार स्वार व राजश्री बलवतराव धोंडदेव याचे पथक याची रवानगी जाहाली त्याणी जाऊन गणेशखेड्यास राहून शाहाबादेकडून रस्त आणवावी, छावणीस गणेशखेड्यावर राहावे, तेथून शेसई सिप्री डोंगरी या रानात तलाव करीत असावे याप्रमाणे निश्चय ठरून गणेश खेड्यास गेले येथून गणेशखेडे आठ कोस पश्चमेस तेथून शाहाबाद आठ नऊ कोस पश्चमेस आहे गणेशखेड्याहून शिप्री साहा सात कोस याप्रमाणे आहे राजश्री गगाधर गोविंद खोडची घाटी उतरून गेल्यानतर भोंवतीचे मुकामीहून पत्र आले होते त्या उपर त्याजकडील पत्र आले नाही आल्यानतर विनती करीन साप्रत पाटीलबावा या मुकामास आहेत येथेही पाण्याची व जाग्याची चागली सोय नाहीं दिवस पर्जन्यकाल राहुल्या सरंजाम लोकाचे बहुत करून बुणग्यात आहेत बुणगे येथून तीस कोसावर अरुण व सिरोंज याचे दरम्यान आहे ते कचनारचे सराईस आणविले आहे आषाढ अखेर इग्रजाचे मुकाबल्यावरच गेला अद्याप सडी स्वारीच आहे पर्ज्यन्य नेहेमी लागला नाहीं, यामुळे काही स्थित आहे यापुढे पाहावें सेवेसी श्रुत होय अद्याप छावणीचा निश्चय नाहीं घटकेत विचार होतो काल्या बागावर जावें घटकेत सराईच्या व शाडौ याचे दरम्यान छावणी करावी असे विचार होतात निश्चय ठरून येखादे स्थळास जातील तेव्हा खरे बावाचे मानस आहे कीं मुकाबला इग्रजाचा सोडून छावणीस जाऊ नये असीच सडे स्वारी नसी इग्रजाच्या छातीवर छावणीस राहून तलावे इग्रजा सभोवते करीत जावे यावर साऱ्याचे विचारे पधरा कोसाच्या मुफासल्याने राहून बुणगे आणवावे असे विचार होतात निश्चय जाहल्यावर विनती करीन श्रुत होय हे विज्ञापना इग्रजावर पाच महिने सडी स्वारी जाहल्याने घोडी माणसास मेहनत फार पडली व साप्रत महर्गता भारी जाहल्याने घोडी गलाली आहेत

याकरिता येखाद् थाग्यास दोन महिने राहून घोडी हुशार करावी असे कारभारी बोलतात हे विज्ञापना

☞ Pandurang Raghunath reports the hardships and troubles which Mahadji had to sustain in having to oppose the British constantly for several months at a stretch

---

*No 179* ] [ 30 July 1781

श्री

वडिलांचे सेवेसी पांडुरंग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना तागाईत छ ८ साबान मुा। नजीक बुंदा डोंगर वडिलांचे आसीर्वादे ययास्थित असे विशेष श्रीमंताचीं पत्रें छ ७ रजबच्या पुरवण्या च्यार आपल्या नावें सादर जाहल्या विता —

१ इंग्रजाचें पारपत्य विना बंगाला मारल्याखेरीज घडत नाहीं व जरबेनें तह होत नाहीं त्यास बंगाल्याकडील मजकूर येथें कोणी बोलतो जे, आपले पदरचे च्यार सों खर्च करून फौज ठेऊन बंगाल्यात जाऊन मसलत करितो या विषईची पुरवणी जोडगिरी बंद ३

१ माधवराव टुकदेव व मानाजी सिंदे याचें पारपत्य केल्याचें वर्तमान

१ त्रिंबकराव माहादेव कांकिडे याजकडे कर्जपटीचा यैवज येणें त्याविषई चिठी

१ इकडील वर्तमानाची विनतीपत्रे गेली त्याचे उत्तर गोसावी व जालमसिंग वगैरे

४

सदरहु च्यार पुरवणीपत्रें सादर जाहली त्याप्रमाणें श्रीमंत राजश्री पाटीलबावा यासीं बोलून तिही पुरवण्याचीं उत्तरें जाहाली, ती व या रवानगीपूर्वी आणखी रवानग्याचीं पत्रें सादर जाहालीं होतीं, त्याप्रमाणें येथें बोलून याचीं उत्तरें होत गेलीं तीं पूर्वी विनविली आहेत व त्यापैकीं काहीं जाबसाल राहिले होते, त्याचा झाडा काढून दहकपटीचा जाबसाल खेरीज करून वरकड जाब सालाचीं उत्तरे जाहाली त्याप्रमाणें निरनिराळीं विनतीपत्रें विनविलीं आहेत, त्याजवरून सविस्तर ध्यानास येईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Pandurang Raghunath informs Nana, of his having despatched replies of Mahadji to the various items submitted to him

---

*No 180* ] [ August 1781

श्री

सेवेसी विनती सेवक सदासिव दिनकर साष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे किले वदन येथील सरजामाचे गावपैकी मौजे देगाव आनंदराव बाबर पागा याजकडे सरकारातून द्यावयाचा ठरतो ह्मणून आइकतों त्यास किल्याचे घेऱ्यातील लगता गाव व वेठबेगारीचे वगैरे बेगमीचा महाराजापासून किल्याचे घेऱ्याचे गाव हालतच नाहीत व दुसऱ्याचा शिर्कावही त्यात नाहीं पहिला नादगाव तारगाव तर्पेतील घोरपडे याजकडे दिल्हा तो कमतीच पडला किल्यासून दूर तरी होता हा तर केवळ किल्याचे पाईच कबेश दोन हजाराचे जमेचा वेळेस आवेळेस वेठ बेगारीस उपयोग तो गाव उणा जाल्यास मग वेठ वेगार आदिकरून किल्यास आडचणच आहे दुसरेयाचा आमल घेऱ्यात शिरतो किल्याचा समंध नाजूक त्यात दुसरेयाची खटपट घेऱ्यात येते सरजामा

तही कमती पडते वर्तमान श्रुत व्हावें ह्मणून विनंती केली असे स्वाम आज्ञा करणार धनी आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Sadashiv Dinkar represents to Nana not to give away the village of Degaon to Anandrao Babar, the suggestion being in the interest of Government as begarees (labourers) were obtainable from Degaon.

---

*No 181* ] [ 9 August 1781

श्री

वडिलाचे सेवेसी पाडूरग रघुनाथ चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १८ साबान मु॥ नो। बुढा डोंगर सडी स्वारी वडिलाचे आसीर्वादे यथास्थित असे विशेष साप्रत इकडील वर्तमान

श्रीमत राजश्री पाटीलबावा फौज सुधा या मुकामीं सडे होते साप्रत काहीं राहुट्या वगैरे कार्योकारण पर्जन्याचा सरजाम बुनग्यातून येथेंच आणविला थोरले बुनगे कचनारचे सराईवर आहे सडी छावणी या मुकामीं आहे

राजश्री गगाधर गोविंद बुधेले व सिवराव हरि व पाटीलबावाकडील सदासिव मल्हार हे त्रिवर्ग फौजसुद्धा कन्हे-यानजीक मुकामी गेल्यानतर गगाधरपताचें व सदासिव मल्हार यांचें पत्र आले होते त्यात लिहिलें आहे जे, राणाकडून मीरजी मुसलमान आह्माकडे रवाना जाहाला आहे तो आल्यानतर त्याचे बोलणे होईल ते मागाहून लिहून पाठऊ याप्रों पत्रें पाटील बावास आलीं या लस्करात रस्त भेलशाकडून व काहीं अहीरवाडेयातून येत आहे इतके दिवस दाण्याचा तोडा ( टा ) होता आठ सेराची धारण जाहाली होती साप्रत हरभरे तीन सवातीन पायली, व आटा बारा सेर तूप कधीं तीन सेर कधीं अडीच सेर, याप्रमाणें निरख आहे रस्त येऊ लागल्यावर याप्रमाणें निरख राहतो नाहीं ते दिवशीं महर्गता होते

इग्रजाचा छावणी खासा कर्नेल मेवर शेसईस आहे कोलारसातील तोफा मोठमोठ्या शेसईस घेऊन गेले काहीं दोन च्यार धाकट्या तोफा व एक पलटण छावणीस कोलारसात आहे

गोहदकर राणा याची छावणी शिप्रीचे उत्तरेस च्यार कोस कुवरपूर ह्मणून जागा आहे, तेथें आपले सरजामासुधा आहे इग्रजास रस्त गोहदकराकडून व नरवरकराकडून पूर्ववत् प्रमाणें येत आहे

इगल्याची फौज घेऊन रा। बापू मल्हार छावणीस गणेशखेड्यावर आहेत इग्रजाची रस्त राजगडाकडून येईल ती व कहीकबाडास येतील ते मारावे धरावे रस्त येऊ देऊ नये याकरिता रा। जाहाली परतु अद्याप काहीं अमलात आलें नाहीं

नरवरकराकडेही अनुसधान श्रीमत राजश्री पाटील बावानीं लाविलें आहे खटपट करून पाहातात. रागड्याची जात दगाबाज भरवसा नाहीं पाटीलबावा इग्रजाचे मुकाबल्यावर सडे छावणीस राहिलें, तेव्हा बाद बरसात पारपत्य करतील असें समजोन त्याचीही अनुसधानें आहेत घडोन येईल ते खरे

साप्रत या मुकामीं आठ दिवस जहाले नेहमीं पर्जन्य लागला आहे हे विज्ञापना

☞ Pandurang Raghunath reports news from Mahadji's camp to Poona on several points concerning the situation of the two opposing armies

---

*No 182* ] [ After 7 August 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे गोहद्कर राणा याजकडील येक दोन पत्रें आलीं कीं राजश्री चिमणाजी खंडेराव नि॥ राजश्री सिवाजी विठल यास व गिरमाजी मल्हार यास पाठवावें त्यावर येथे श्रीमत राजश्री पाटीलबावा याजवळ विचार असा ठरला जे, नकळे खरें किंवा खोटे राजकारण करितो त्याचा विश्वास नाहीं त्यापक्षीं गिरमाजी पतास आधी पाठऊन खुलासा ध्यानास आणावा तदनतर चिमणाजी पतास पाठवावें राण्याची पत्रे दोन तीन आली कीं, या उभयताचे पाठवण्यास दिरंग करू नये त्यावरून गिरमाजी पताची रवानगी राण्याकडे केली हें वर्तमान पूर्वी विनविलें होतें त्या उपर गिरमाजीपत राण्याकडें जाऊन त्याचे बोलणे होऊन निश्चय असा जाहला जे, आम्ही शिप्रीस येतों तिकडून चिमणाजीपतानीं शिप्रीस यावें गिरमाजीपतानी लिहिले होते कीं, राणाजीचें बोलणे आहे जे तुह्मी आपल्या तोफा घ्याव्या, बेदावा इग्रजास लिहून द्यावा, त्याणीं यमुनापार जावें, तुह्मी पाठलाग करू नये, सुखरूप जाऊ द्यावें त्याणी तुमच्या मुलकात यमुना उतरून येऊ नये, तुह्मी त्याच्या मुलकात यमुनापार जाऊ नये, आम्ही मुलूक घेतला तो आह्माकडे असावा याचीही उत्तरें बावानीं योजली होती परतु गिरमाजीपताच्यानें तोड मोड पडावयाची नाहीं, याकरिता चिमणाजीपतास सागितले की, तुह्मी जावें हें चागलें जाबसालाच्या तोडीजोडींत ते कायल होऊन आपला मतलब घडे असें जालें पाहिजे तितक्यात आणखी गिरमाजीपताचें पत्र आलें कीं, राणा सिप्रीस आला याजकडे तथा नाहीं त्याचे अत.-कर्णापासून आपला स्नेह करावयाचें मानस आहे जाबसालाच्या तोडी जोडी आपल्या मर्जीप्रोंच घडतील चिमणाजीपताची रवानगी लवकर व्हावी त्यावरून चिमणाजीपताची रवानगी पाटील बावानीं राण्याकडे केली त्याबराबर जाबसाल सागोन पाठविले —

तुह्मी ह्मणता कीं, तोफा तुमच्या नेल्या त्या घेऊन बेदावा इग्रजास लिहून द्यावा, तर आमचे बोलणे इग्रजाकडील येक अक्षर नाहीं तुह्मी मात्र सरकार लक्षात मिळून इग्रजाची रस्त बद करून आह्माकडे येऊन सामील व्हावें तुम्ही आम्ही मिळोन इग्रजाचें पारपत्य करावें हा मुख्य पक्ष हें न होय तर माघारा फिरोन ग्वालेरीस जावें, रस्त इग्रजाकडे पाठऊ नये, व त्याची येईल ती येऊ देऊ नये तोफा इग्रजानें नेल्या त्या घेऊन बेदावा लिहून द्यावा ह्मणोन तर हा जाबसाल तुह्मीही करू नये याचा बेदावा श्रीमताचे पुण्यप्रतापें याचे पारपत्य करून कलकत्याच्या तोफा घेऊन येईन ते दिवसी बेदावा होईल दरम्यान होत नाहीं याविसींचा आग्रह तुह्मी धरू नये, आम्हीं ऐकणार नाहीं

इग्रजाचें बोलणें बोलतो हें न घडल्यास सरकार लक्षात मिळू नये, असें चितात येईल तर याचीही चिंता नाहीं केवळ तुह्मी सामील जाहल्यानेंच राज्य इग्रज घेतील व त्याचे पारपत्य घडणार नाहीं असा अर्थ नाहीं देसीहून वीस हजार फौज आणखी आणविली आहे बरसात सरताच इग्रजाचें पारपत्य यथास्थित करून मग तुमचाही स्नेह करू

तोफा तुह्मी घेऊन पलटणें आलीं आहेत, हीं माघारी जातात, यास उपद्रव देऊ नये याणीं यमुना पार जावें तुह्मीं यमुना पार जाऊन याचे मुलकास उपद्रव देऊ नये ह्मणोन, तर त्याणी आमच्या तोफा घेऊन जावें आह्मास तोफा नकोत त्याचे विचारास येईल तसें त्याणी करावे आह्मास कळेल तसें आम्ही करू याविषईचा मनसबा परस्परे विचारावयाचे कारण नाहीं

आम्ही तुह्माकडे सामील होऊन इग्रजाचे पारपत्य इकडे केल्यास दावा आह्माकडे लागतो याकरता यास यमुनापार जाऊ द्यावें ह्मणोन, तर तुह्मी ज्यापक्षीं माहाल मुलुक लिहून मागता त्यापक्षीं मग इग्रजासी गरज काय ! जो मनोदय आमचा असेल त्यास तुह्मी अनकूल व्हावें

ह्या तोडी सांगोन पाठविल्या याजवर राण्याची समजूत पडून त्याणे अनकूल होऊन इंग्रजाची रस्त बंद करून आह्माकडे येऊन सामील होऊन थाच मैदानात इंग्रजाचे पारपत्य करावें हें चांगले हें विचारास न ये, त्यापक्षीं सेवटली तोड इंग्रजानें यमुनापार जावें त्याचे मार्गे आह्मास त्याचे मुल्कात जाणें आहेच तेव्हा आह्माबराबर सामील होऊन यमुनापार इंग्रजाचे पारपत्यास चलावें मग अनमान करू नये

याप्रमाणें चिमणाजीपतास सांगोन त्याची रवानगी राण्याकडे सिप्रीस जाहली तेथून अद्याप पत्र आले नाहीं दोन तीन दिवस जाहले, गेले आहेत छ २६ साबानचे दिवसीं येथून रवाना जाहाले नीट मार्गानें सिप्री येथून नऊ दहा कोस परंतु दरम्यान शेसईस इंग्रज आहे, यामुळें नीट मार्ग सोडून राजगडाकडून सिप्रीस गेले त्या मार्गाने वीस कोस आहे यामुळें दोन दिवस जाण्यास लागले आज उद्या मारनिलेचे पत्र येईल त्या प्रमाणें सेवेसी विनंती करीन श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports to Nana the negotiations that were going on between Mahadji and the Rana of Gohad for bringing about an evacuation of Malwa by the English The terms dictated by Mahadji are mentioned which show his powerful grasp of the situation

---

*No 183* ] [ 25 August 1781

श्री

पौ छ १४ रमजान इसने हा डाक

विनंती सेवक नारो सिवदेव कृतानेक सा। नमस्कार विनंती ता। छ ५ रमजानपावेतो सेव काचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री पाटीलबावाचा मु।। पचावलीपासून दीड कोस आलीकडे आहे गोहदकर राणा याचे अनुसधान आतून बावाकडे लागले आहे हे पूर्वी पत्री लिहिलेच आहे अलीकडे इंग्रज यानीं गोहदकराचे विद्यमाने लाविले आहे की तुमच्या तोफा आह्मी आणिल्या आहेत त्या देतो आह्मी निघोन इटावियास जातो आह्मास जाऊ द्यावे त्यास सलूख करून जाऊ द्यावे तरी हैदरखान यास कळल्यास ते शब्द लावितील व करावे तरी रजवाडे याचे पेठ्यात सिरले आहेत येणेकरून मसलत आपल्याच प्रातात पडली येणेकरून मुलूक सरकारचा खराब होतो हेही ठीक नाही तेव्हा सर्वांचे विचारे ठरले आहे की सलूक तरी करू नये गोहदकराचे विद्यमाने तोफा देऊन जात असल्यास जाऊ द्यावे आणि पुढे कजिया अतरवेदीत घाडावा हा विचार करून बोलणे राजश्री सिवाजी विठल याचे विद्यमाने लागले गोहदकर याने मारनिले कडील राजश्री चिमणाजीपत यास बोलाविले आहे त्याची रवानगी केली त्यासी बोलणे जालिया वरी सविस्तर अर्थ समजेल ह्मणऊन आतील वर्तमान कळले ते सेवेसी विदित व्हावे याजकरिता लिहिले आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना हे वर्तमान तूर्त प्रगटात येऊ नये हे विज्ञापना

☞ An offer by the British to retire to Itawa is forwarded to Mahadji and reported to Poona by Naro Shivadev

*No 184* ] [ 25 August 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे राजश्री चिमणाजीपंत दादा याची रवानगी राण्याकडे शिंदीस जाहली त्याचें राण्याचें बोलणें होऊन राणाजीनें प्रथमच बोलणें लाविलें, कीं इंग्रजाचीं पलटणें आम्हींच आणली आहेत तेव्हा आधीं त्याचा तुमचा सलूख व्हावा म्हणजे पलटणें माघारा जातील मग यमुना पार गेल्यानंतर तुमच्या विचारास येऊन अंतरवेदींत स्वारी इंग्रजाचे पारपत्यास गेली तर मी हमराहा स्वारींपुढें आहे परंतु येथें त्याच्या तुमच्या भेटी व्हाव्या, तोफा तुमच्या व हत्ती माघारा घ्यावे आणि पलटणास जाऊं द्यावे त्याजवरून चिमणाजीपंतानीं राजश्री पाटीलबावा यास लिहून पाठविलें कीं, प्रथम राण्याचीं पत्रें एक दोन वेळ आलीं, मागून मुनसी आला त्यावर गिरमाजी मामा येथें आले त्याचीं दोन तीन पत्रें आलीं, परंतु त्यांत कोठेंही इंग्रजाचा सलूख करावा असें आढळलें नाहीं, आणि आता तर प्रथमच मुद्दा राणाजीनें इंग्रजाचे सलुखाचा घातला आहे तेव्हा कसें करावें ! आपली आज्ञा कीं, त्याणीं इंग्रजाचें बोलणें बोलू नये, आपण ऐकू नये राण्यास मात्र अनकूल करून घ्यावें येथील प्रकार असा आहे पुढें या विसींची आज्ञा काय त्यावर त्याणीं सारे कारभारी मिळोन विचार केला कीं आधीं चिमणाजीपंतास पाठऊं नये आता ते काय म्हणतात, कसें म्हणतात हें ध्यानास आणून त्याप्रो उत्तरें प्रसंगोचित करावयास येतील त्यावर हा विचार बावाचे चित्तास येईना उत्तर करीनात न जाला राण्याचा स्नेह तर आजच पेशवाई बुडाली नाहीं श्रीमंताचे पुण्यप्रतापें राण्यासुद्धा इंग्रजाचें पारपत्य करीन यावत् शक्ति व प्राण खर्च होय तोंपर्यंत मी आपले तोंडानें इंग्रजाच्या सलुखाचे अक्षर काढणार नाहीं गोहदकर इंग्रजाचे सलुखाखेरीज अनुकूल होत नाहीं, असें परिछिन्न आहे, त्यापक्षीं चिमणाजीपंतानीं उठोन यावें त्याउपर राजश्री सिवाजीपंत बापू यास बोलाऊन आणून विचार पुसला कीं याचें कसें करावें ! गिरमाजीपंत गेले त्याबराबर कारकून दिल्हा असता खुलासा कांहीं समजला नाहीं पत्रें निखालस आलीं कीं चिमणाजीपंतास जलद् पाठवावें आता येथील गुंता नाहीं त्यावरून पाठविले आणि आता हें खूळ निघालें तेव्हा याचा विचार कसा करावा ? सलूख करावयाचाच नाहीं यासाठीं जें घडणार तें घडेल इंग्रजाचीं पलटणें याप्रांतीं आलीं त्यास गोहदकर सामील जाहल्यामुळें पुढें चाल करीत आले तेव्हा नरवरकरही मेळऊन त्यानीं घेतले रस्त वरचेवर पोंहोचू लागली, यामुळें ते या जागा बळावले त्यामुळें आणखीही राजे रजवाड्याचीं अनुसंधानें आतून गुप्तरूपें त्याकडे लागलीं याकरिता मुख्य गोहदकराचा खेळ आहे तो मोडावा, त्यास मेळऊन घेऊन इंग्रजाचें पारपत्य करावें यासाठीं प्रसंग जाणोन त्याणें जसजसें लिहून मागितलें तसें तूर्त लिहून दिल्हें असतां चिमणाजीपंतासी असा मुद्दा घातला तेव्हा राण्याचा सलूख राहिला त्यावर बापूनीं उत्तर केलें कीं या पलटणात सारें खूळ राण्याचें आहे वरचेवर रस्त त्याचे मुलकातून येती नरवरकर हाताखालीं घेतला आहे, त्यामुळें आणखीही कोणाची गुप्तरूपें अनुसंधानें इंग्रजाकडे लागलींच आहेत खेचीं चंदेरीकर भूपाळवाले कोटेकर याचीं झाडून अनुसंधानें गुप्तरूपें गोहदकराचे विद्यमानें इंग्रजाकडे आहेत फक्त भरवसा आपले जातीचा त्यात आपल्या जवळ फौज आहे तेही समजलीच आहे, व यात माणूस किती आहे तें ध्यानात आहे देसींहून फौज आणवायाची तरतूद आपण करिता असें आज तीन महिने आह्मी ऐकतों, परंतु पैक्याविना फौज येणें समजलीच आहे सांप्रत जी फौज आपल्याजवळ आहे त्यास पैका मिळत नाहीं खाया वाचून सिलेदार व बारगीर उठोन जावयाच्या लागास आहेत यासच पैका मिळत नाहीं तेव्हा देसची फौज कशावर येईल! राण्यासुधा इंग्रजाचें पारपत्य करावें हें उचित आहे, व यातच लौकिक परंतु ह्या गोष्टी बलाबल पाहून आहेत राण्याचे मनें पलटणें आणलीं तसीं यमुना उतरून माघारा

घाल्वावी उपरांत पारपत्य जाल्यावर आपल्याकडे शह नाहीं, असें असलें तर यातही काय गेलें ! राणा अनुकूल होऊन आपले प्रांतांतील पलटणें घालवितो, उत्तम आहे पलटणें यमुनापार जाऊं द्यावीं. मागून आपण यमुना उतरून अंतरवेदींत जाऊन इंग्रजाच्या मुलकांत लढाई पाडावी ही मसलत चांगलीच आहे कोणेही तऱ्हेनें राणा इंग्रजास मिळाला तो फोडून आपले लष्करांत मेळऊन घेतल्यानें वरकड इकडील राजे रजवाडे यांचीं अनुसधानें इंग्रजाकडे राहाणार नाहींत तेव्हा पुढें पाऊल इंग्रजास टाकणें कठिण पडेल घडावयाचें नाहीं राणा आपल्यावरील निमित्त दूर करावया करिता पलटणें अंतरवेदींत घालवितो पुढें आपण यमुना उतरून गेल्यास सामील होऊन इंग्रजाचे पारपत्यास हमराहा होतो ही मसलत आपले उपयोगीच आहे कोणे रीतीनें बोलणें बोलतात तें ऐकून घ्यावें केवळ सलूख होऊन भेटी परस्परें जाहल्यास हें वर्तमान हैदरखानास कळल्यानंतर संदेह उत्पन्न होऊन राज्यास अपाय घडेल हा पेंच मोठाच आहे अशी भवति न भवति बोलण्याची परस्परें जहाली त्यावर सिद्धांत सारे मिळोन असा ठरला जे, राण्याचा आग्रह आहे त्यापक्षीं इंग्रजानें कूच करून यमुनापार जावें मागाहून आपण अंतरवेदींत जाऊन नजबखान वगैरे मेळऊन घेऊन इंग्रजाचें पारपत्य करावें, यांत कांहीं आपला दस्ताऐवज जात नाहीं असी तोड चिमणाजी पंतास लिहून पाठविली त्यावरून मारनिलेनी राण्यास विचारलें कीं, तुह्मीं कोणे रीतीचा सलूख इंग्रजासीं करा ह्मणता ? भेटीचा प्रकार परस्परें घडतच नाहीं, याकरता न जाला तुमचा स्नेह तर राहिला आह्मीं उठोन जातों मोठा आग्रह याकरिता कीं, या प्रांतीं त्याचें पारपत्य होऊं नये तर तुमचे मर्जीकरिता आह्मास मान्य आहे इंग्रजानीं कूच करून अंतरवेदींत जावें आह्मीं पाठलाग करीत नाहीं तेव्हा राण्यानें इंग्रजाकडील कारभारी फोड साहेब व पाक साहेब हे उभयता शेसईहून बोलाऊन कोलारास नेऊन चिमणाजीपंताच्या त्याच्या भेटी करविल्या तेव्हा त्याणी बोलणे लाविलें जे, तुह्मींही श्रीमंताचे सरदार मुखत्यार आहांत व आह्मींही आपले धन्याचे अखत्यारी आहों केवळ तुमचा आमचाच सलूख व्हावा असें आह्मीं ह्मणत नाहीं परंतु तुह्मीं मोठा तह हैदरखानाचा व सरकारचा आमचा करून द्यावा यास चार साहा महिने जाबसाल जाण्यायेण्यास पाहिजेत तोंपर्यंत आह्मीं कानपुरास जातों तुह्मीं आपले मुलकांत राहावें, यमुना उतरून आमचे मुलकांत येऊं नये शह उभयपक्षीं कायम असावा, सोडूं नये जाबसाल लिहून पाठवावा आपण सरकार व हैदरखान यांचा आमचा सलुख करून द्यावा तुमच्या तोफ, व हत्ती आहेत ते आम्हीं कोलारसांत अथवा शेसइस घेऊन जातों तुम्हीं घेऊन जाव्या परंतु तह चौमहिन्यांत तुमच्यानें न घडला तर मग आह्मास फलल तसें आह्मी करावें तुह्मास सुचेल तें तुह्मीं करावें याप्रमाणें निश्चय ठरल्यानंतर फोडसाहेब व पाकसाहेब ह्मणूं लागले कीं चिमणाजीपंत दादानीं लष्करास जातांना शेसईचे मार्गें करनेल मेवराची भेट घेऊन जावें त्यावरून राणा व चिमणाजीपंत व इंग्रजाकडील दोघे कारभारी असे शेसईस येऊन कर्नेल मेवर याच्या भेटी जाहाल्या बोलल्या अन्वयें मेवराजवळ बोलणें होऊन सिद्धांत कूच करून जाण्याचा ठरला चिमणाजीपंत दरबारास बसलेच आहेत तों एक जासूद गॉडराकडील सुरतेहून आला त्याणें काठींतून कागद काढून मवरोचे स्वाधीन केला त्यांत काय अर्थ असेल हें नकले परंतु बोलण्याचा नाद लाऊन सेवटीं ते दिवसीं चिमणाजीपंतास त्याणें ठेऊन घेतलें सिष्टाचार केला तृतीय प्रहरीं फिरोन दरबार जाहला तेव्हा चिमणाजीपंतास बोलाऊन सांगितलें कीं, निश्चय कूच करून अंतरवेदींत जाण्याचा ठरलाच आहे परंतु आमचा मुख्य कलकत्तेकर सरदार लखनौस आला ह्मणोन बातमी आली त्यास आम्हीं पत्र लिहितों उत्तर आणून कूच करून जातों यास अठरा रोजाची मुदत म्हणोन सांगितलें तेव्हा चिमणाजीपंतानीं राण्यास म्हटलें कीं, हें काय, प्रातःकालीं निश्चय तसा ठरला, आतां हें बोलणें नवेंच दिसतें त्यावरून राण्यानें यासीं उत्तर केलें, कीं अठरा दिवस कांहीं लांब नाहींत आखर रमजान पावेतों परीक्षा

आहे याचें पसेंही असो मनकडून मीं चुकलों नाहीं याउपर त्याचे विचारास येईल तसें करितील मी परिछिन्न आता ग्वालेरीस जातों त्यावरून राणा व चिमणाजीपत फिरोन शेसईहून शिप्रीस गेले राणा कूच करून ग्वालेरीस आपले सरजामसुधा गेला उपरातिक चिमणाजीपत कूच करून राजगडचे मार्गे लष्करात आले याप्रमाणें वर्तमान आहे इग्रजाची जात दगाबाज, तसीच राणाच्याहीही विश्वास नाहीं घडोन येईल तें खरें आखर रमजान पावेतों परीक्षा आहे होईल वर्तमान तें मागाहून विनती करीन सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना

☞ This is an important paper containing an account of the negotiations for peace started with Mahadji by the Rana of Gohad on behalf of the British An armistice for 18 days was suggested by Col Muir The letter is by Naro Shivdev to Nana

---

*No 185* ] [ 5 September 1781

श्री

पौ छ १ सवाल प्रात काल सुा इसने समानीन

विनती सेवक नारो सिवदेव सा। नमस्कार विनती ता। छ २१ रमजान पावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष सुरतेहून इग्रजाचीं दोन पलटणे भडोचेस आली ती या प्रांती येणार ह्मणऊन वर्तमान बातमीच आले आहे, त्यास राजश्री पाटीलबाबा तरी शहास गुतले आहेत त्यापक्षीं इकडे गलबल जाल्यास सोडून यावयाचें ठीक पडणार नाहीं तेव्हा गोस्टी फार वाईट माल्व्यात अगदी रान खाली आहे यास्तव राजश्री गणेशपत खानदेशात आहेत व राजश्री तुकोजी बाबा होलकर या उभयताचा फौज खानदेशचा बदोबस्त रखून इकडे फौज यावयाचा विचार होईल तरी उतम आहे कोणी येक नावाचा सरदार या प्रांतीं आलियास इकडीलही मामलेदार वगैरे आहेत तेही सर्व जमा होतील यास्तव राजश्री गणेशपत यानी बातनी ठेविलीच असेल इकडे येतात असे समजल्यास त्यानी इकडील मदत जरूर करणे येविसी सरकारची (ताकीद) त्यास व्हावी बाबाचे कबिले येथे आहेत तेव्हा इकडीलही सावधतेविषई अर्थ ध्यानात असावा, यास्तव विनती लिहिली आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना मानाजी सिंदे व सटवाजी भोंसले सुरतेकडे आले आहेत कोणे समई काय मसलत देतील न कळे हे रान खाली आहे हे बातनी त्यास आहे हे विज्ञापना

☞ Naro Shivdev suggests to Nana to keep strong parties in Khandesh in order to prevent British regiments from Surat rendering succour to the forces in Malwa

---

*No 186* ] [ Middle of September 1781

श्री

विज्ञापना राजश्री पाटीलबावा खुद शिरोंजेवरील पलटणाचे पारपत्यास गेले येणेकरून जय चागला पडून इग्रजावरी जरब बसेल यात गुता नाही परतु येक गोष्ट चितात आली ती लिहितों युक्तीस आरास पाटीलबावासी बोलून सूचना करून पक्के करून ठेवावे कोणती ह्मणाल तरी पलटणानी दगाबाजीने आमून सदर्भ लाविला अथवा मधोरें ग्वालेरीस जातो ह्मणाले आथवा तुमचे तालुक्यालेरीज दुसरे वाटेने येतो तुह्मी आह्मावरी निकड करू नये असी बोलणी कदाचित त्याणी लाविली तर न ऐकता पारपत्याचाच विचार करावा नाही तर सर्व प्रकारे मसलतीचा

नाश व बद्‌लौकिक बदनक्ष असे होईल असे करणार नाही हे खातरजमाच आहे परंतु गुदस्ता गाडरानें आपली मसलत करावयाची ती समाप्तीस नेऊन सुरतेस छावणीस गेला याचा अर्थ तो माघारा गेला असें मानून उभयता सरदार मसलतीचा पिछा अगदी सोडून उजेन इंदुरास आले पेच केवढा बसला? याकरता यदा तरी असें न व्हावे ह्मणोन सूचनार्थ लिहिले आहे ह्मणऊन आज्ञा, त्यास या गोस्टीचा आदेशा सेवकास होताच याजवरून आपाजीपतास लिहिले होते त्याचे उत्तर आले ते सेवेसी पा पावले असेल आणिकही सूचना वरचेवर लिहीत असतो स्वामीची पत्रे छ १७ रोजची सावान १७( १ ८ १७८१ ) पुरवण्या दोन आल्या त्याची उत्तरे लिहिली आहेत आणिक पत्रे लस्करात गेली त्याचा झाडा अलाहिदा पुरवणीस लिहिला आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev accepts Nana's warning and communicates it to Mahadji, not to put trust in the words and promises of the British, from the instance of Goddard of last year, and to take proper precautions in the present negotiations

---

*No 187* ] [ September 1781

श्री

विज्ञापना ऐसीजे श्रीमत राजश्री पाटीलबावा यांणी सांगितले की हैदरखानाकडून बातमी करिता कारकून आला याणे येथें राहून मसलतीचें वगैरे वर्तमान व पुढील तरतूद काय करितात, कोणे रितीची करितात, मसलतीविषई नेट आहे की उपेक्षा आहे हे चाल चरित्र शोधून बातमी लिहीत जावी, या करिता त्याणी पाठविले आहेत त्याचा बंदोबस्त हैदरखानाचे चालीप्रों करावा तर तो मार्ग आपले येथील नाहीं नवें करू गेल्यास तूर्तच संशय हैदरखानास पडून मसलतीस व्यग्र पडेल, अथवा आपलेच घरचा बंदोबस्त करीन ह्मटल्यास त्यास पहिले पासून ठावकेच नाहीं जसें त्यास आवडेल तसें मनस्वी त्याणें बोलावें, त्याचा आटोप नवाच होईल ह्मटल्यास घडत नाहीं व खानास तर संशय मोठा, बातमीचा कारकून मनसब्याचे धोरण न समजता भलतेंच वर्तमान खुषामदीकरिता लिहील येविसींचा बंदोबस्त येऱ्हवीं घडावयाचा नाहीं माणूस छोटेखानी, समज थोडका या करता काहीं अर्थद्वारें त्यास मेळऊन घेऊन आपण सांगावें तसें त्याणे हैदरखानास लिहीत जावें असें केलें आहे, त्याविसींची चिंता नाही याप्रो पाटीलबावानीं सांगितलें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Mahadji accepts Nana's suggestion that Haider's Vakil in Mahadji's camp should be induced to write to his master only such news as was desirable that Haidar should know Otherwise the Maratha interests would suffer, if news reached Haidar about the confused state of Maratha affairs

---

*No 188* ] [ September 1781

श्री

इटावेयाहून बातमी राजश्री गंगाधर गोविंद बुंधेले याजकडे आली, त्याणी राजश्री पाटीलबावा यास पत्र लिहिलें त्याची नक्कल

" इष्टीन साहेब कलकत्त्याहून येऊन श्री काशीस दाखल जाहला त्याचे भेटीस काशीकर राजे चेतसिंग आले होते त्यास इग्रजानीं पाहाऱ्यात ठेविले त्याणी आपले बधु सुजानसिंग यास रामनगरास लिहिलें ते चार हजार फौजेनसी येऊन इग्रजासीं लढाई केली हजारबारासें माणूस दोहींकडील ठार पडलें परतु चेतसिंगास काढून घेऊन गेले उपरात बाबू अवसानसिंग इग्रजाकडे राहतात, त्यास इग्रजानीं चेतसिंगाचें राज्य देऊन काहीं फौज त्याची होती व काहीं इग्रजानें दिली ते घेऊन अवसानसिंग चेतसिंगावर गेले त्या उभयताची लढाई रामनगरानजीक जाहाली अवसानसिंगाचा मोड जाहाला, लोक बहुत मारले गेल, झाडून फौज लुटली, लोक पळताना गगेंत बहुत बुडोन मेले चेतसिंगाची जीत जहाली व गंगेतून कलकत्त्याहून इग्रजाच्या नावा माल भरून येत होत्या व इकडून फरुकाबादेकडे जात होत्या, चेतसिंगानें झाडून लुटल्या व चेतसिंगाकडील कोणी जमीनदार पाच हजार फौजेनसी रात्रीं इष्टीन साहेब याजवर येऊन छापा घातला फौज झाडून लुटली, दोनसे गोरे मारिले व तेलगेही बहुत मारिले गेले इष्टीन खासा जखमी होऊन पळोन ( चिनाडगडास )* गेला त्याचा पाठलाग राजाच्या फौजेने करून चिनाडगड घेरला आहे तेथें लढाई होत आहे इष्टिनाचा कबिला राजानें धरून आणला, हें वर्तमान श्री काशीहून इटाव्यास सहावे दिवसीं आले नवाब असफतदौला सर्व सरदारसुधा श्रीस इग्रजास भेटावयास जात होते, त्याचा मुकाम हसनपूर बधुऱ्यावर होता प्रयागास जावयाचें वर्तमान होतें राजानें नवाबास लि॥ होते कीं, मी पहिल्यापासून तुमचा आहे कदाचित सरकारची मर्जी फिरगीयाकडील कुमक करावयाची असल्यास मीही सिद्धच आहे याप्रमाणें अर्जी लिहिली होती त्यावर भाद्रपद शु॥ ७ श्री काशीहून पश्चिमेस चार कोसावर मोहनची सराई आहे, तेथें लढाई जाहली त्यात इष्टिन साहेब मारला येणें प्रमाणें वर्तमान आलें राजानें आपल्या राज्यात सालमजकूरचे खरीफाचा अमल माफ करून ताकीद केली कीं, इग्रजाचा माणूस सापडेल तेथें मारावा येणें प्रमाणें लिहिलें आलें ह्मणोन लिहिलें आहे "

☞ News is forwarded by Gangadhar Govind to Mahadji, of the rising of Chetsingh at Benares against Warren Hastings, who was reported to be wounded or killed The rising commenced on 16 August 1781

---

*No 189* ] [ September 1781

श्री

विज्ञापना राजश्री सदासिवपत याजकडे गाव मौजे गाडगाव खुर्द पा जलगाव दिल्हा आहे त्यास पूर्वी सुभेदारानी कर्जपटीविसी तगादा करीत होते, त्यास मनाचिठी स्वामींनी दिल्ही अलीकडे राजश्री सिवरामपत थत्ते यानी गावास रोखा करून राऊत पाठविले आहेत कीं कर्जपटी व दाहियेकपटी व जमीदारपटी याचा येऊन फडच्या करणे त्यास स्वामींनी मनाचिठी कर्जपटीविसी पा आहे, ती त्याजकडे पा आहे मनाचिठी देऊन राऊत उठऊन नेतील न नेतील हे न कळे कृपा करून सिवरामपतास पत्र द्यावयाची आज्ञा व्हावी की तिनी पटियाचा गावास तगादा न करणे. याप्रा आज्ञा अगत्यरूप जाली पाहिजे मारनिले कारा दिवसानी घरास गेले आहेत तेथे उपद्रव लागल्यास लौकिकात ठीक नाही दहियकपटी व जमीदारपटी या दोहींचा जाबसाल मी

* 16 miles southwest of Benares

सेवेसी आलेयावर करीन तोपावेतो सिवरामपतास मनाचिठी जे मारनिलेच्या गावास रोखा अगदी न करणे ह्मणऊन पत्र देणार स्वामी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev requests Nana not to cause molestation to Sadashiv Dinkar for the dues which he owes to Government, and for which the writer undertakes to be responsible

---

*No 190* ] [ September 1781

श्री

विज्ञापना श्रीकाशीस इग्रजाचे पारपत्य श्रीने यथास्थित केले आहे कुल जमीदार त्या प्रांतीचे पारपत्यास प्रवर्तले आहेत दिलीहून फौज पाठवावयाची मसलत करितीलच तिकडे पाटीलबावा याचे जाणे जाल्यास मसलत चागलीच होईल परतु फौज मातबर असल्याविना सर्वावर दाब बसुन सरकारकाम होणार नाही यास्तव सरकारची फौज आल्यास फार चागले पडेल गतवर्षी बोलण्यात होते की कोणी मातबर माणूस योजून त्याजबा फौज द्यावी आणि त्याजसमागमे उभयता सरदाराकडील फौज गेल्यास अतरवेद वगैरे बदोबस्त होईल ते गोस्टी बावाचे विचारास न आली त्याजवरून राहिले आता त्यानी खासगत मसलतीस गेले तेव्हा सर्व अर्थ ध्यानास आले आता सरकारातून मदत व्हावी हा आहेच परतु बेलावयास त्याहा वयास सकोच करितात असो त्याजवरच टाकिल्याने मातबर मसलत होणे कठिणसे दिसते अतरवेदीत सर्व जमा जाल्यास याची फौज हलकी दिसेल यास्तव फौजेची तरतूद होऊन राजश्री सिवाजी विठल याजकडे भरणा व्हावा सरकारवाटणीचा ऐवज त्याजकडे देवावा झासी व बुदेले यांची चौकसी जाल्यास सरकारातही ऐवज पावत नाही चौकसीच करू लागल्यास त्यासही भारी पडेल, आणि सरकारचे ऐवजाची तरतूद करितील, फौज मातबर जाल्यास पैकाही मिळेल फौज वाढून सरकारमदत जाली तरी होऊ सके ज सेही आहे इग्रजाचे पारपत्य श्रीस जाले आहे येणेकरून इग्रज पाऊल विचारूनच टाकितील मसलतीचे अर्थ सर्व स्वामीच्या ध्यानात आहेत धोरण ध्यानास आणून कर्तव्य न कर्तव्याची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत सुचली विनती लिहिली आहे फौज पाठवावयाची तजवीज होत असल्यास पत्री आज्ञा यावी ह्मणजे मी निघोन लस्करात बावाकडे जाईन फौजच्या खर्चाचा विचार ते काय सागतात तो मनास आणून सेवेसी विनवीन फौज आल्यास पुढे खर्च लागेल त्याचा जिमा कबूल केल्यास तेथून रा करणे ते सरकारातून तजवीज होऊन करावी लागेल दुसरे कोणी मुतालकीचा सिका देऊन पाठऊ ह्मटल्यास बावाचे ध्यानास येणार नाही सिवाजी विठल समागमे आहेतच यास्तव दुसरा अर्थ ध्यानास येणार नाही दुसरी फौज मातबर असल्यास कामही चागलेच होईल परतु महत्व मात्र त्याजकडे राखिले असता गुता पडणार नाही सरकारची फौज असल्यास सरकारकामे दावानेच होतील कोणी उच बोटू पावणार नाही समय चागला अनयासे आला आहे या समई फौज मातबर असल्यास उपयोगी पडेलसे वाटले याजवरून विनती लिहिली आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev suggests to Nana that the present was a crucial moment for starting an immediate offensive against the English, as the rising of Chetsingh against Hastings had roused the spirits of oppressed powers in north India He requests Nana to send a large force from the Deccan to support Mahadji

---

*No 191* ] [ 16 October 1781 ?

श्री

विज्ञापना येसीज महेश्वरी आसता अहिल्याबाई होलकर यानी बोलाऊन नेऊन बोलली की राजश्री पाटीलबावासमागमे तुह्मी व राजश्री नारो शिवदेव आला तेसमई बावानी व तुम्ही श्रीमताचे पत्राचा आशय सागितला जे, प्रस्तुत सरकारात मसलत व राजश्री तुकोजी बावा होलकर हुजूरचाकरीस आले आसता तुम्ही त्याजकडील कारभाराची घालमेल करिता ती करू नये त्यास आपली अमर्यादा करावयाची नाहीं केलीही नाहीं याचें उतर मी दिल्हे ते तुम्ही लेहून पाठविलेच असाल मी घालमेल दोन माहालची केली त्याचा तपसील सागितला तिसरा मल्हारगड या खेरीज घालमेल न केली सरकारची आज्ञा आसी आली ती मान्य केली कारण कीं येक सरकार बरें तर आह्मी सारे बरे व समयास तुकोजीबावा चाकरीस गेले वरत जाणून श्रीमतानी आज्ञा केली ती उतम आहे ती मानून त्याप्रमाणे वर्तणूक केली, सरकारलक्षावाचून काही करावयाचेही नाही असा निश्चय करून उगीच राहिली याचा अर्थ तुकोजीबावानी काय समजले आसतील न कले आता चाल आणिखी धरिली आमचे काण्ही देसी होते त्यास धरिले कारकून मंडली पारनेरकर आम्हाजवल आहेत ते येथे राहु न पावत, याजकरिता महिपतराव रावजीपताचे भाचे त्याजवल लिहिण्याचे कामात आहेत, त्यास ताकीद कली की लक्ष्मणपत वगैरे पारनेकर महेश्वरी आहेत, त्यास आणून हाजर करणे ते त्याचे काबूतच होते करार केला कीं आणून हाजर करितों येथे लक्ष्मणपत वगैरे यास लेहून पाठविले की तुह्मी येथे येणे वर्तमान तेथे जाले ते महिपतरायानी लेहून पाठविले त्यावरून हे ग्रहस्त विकल जाले तेंव्हा यास पाठविले पाहिजे पाठऊ परतु पुढे अंदेशा पडतो मी सरकारलक्ष व सरकारचे आज्ञेप्रमाणे पुढील कर्तव्य सोडून उगीच राहिली त्यानी काय चितात समजले असतील नकले आमची माणसें धरिलीं आह्माजवलील कारकून नेऊ लागले पुढे माझीच आबरू घेऊ लागल्यास कसें करावें वर्तणूक सरकारआज्ञेने करावी त्यास हें वर्तमान श्रीमतास कलावें ते आज्ञा करिताल तसी वर्तणूक करावी त्यास तुम्ही हे वर्तमान श्रीमतास लेहून पाठवणे श्रीमताचा विचार तर मजवर अंतःकर्णापासून कृपाच आहे प्रस्तुत मोहिमेची गरज याजकरिता त्यावें मनोधारण हे मीही जाणते तत्रापि यानी वर्तणूक या प्रकारची आरंभिली उद्या माझी आबरू घऊ लागतील तर आबरू कसी वाचवावी ? पुढे असे किती दिवस राहावें ? निर्णय काय होता तो कलावा, त्याप्रमाणे आपला विचार पाहावा असी बआबरू करून घेऊन राहावेल कोणास ? याजपेक्षा देशातर बरें तेंही श्रीमताचेच आज्ञेने करावे कामाचे अर्थ आजपावेतो समजत आले आताही समजतात असो आपली आबरू राहावी पुढें करावें काय ? इतके कलले पाहिजे हे मजकूर तुम्ही श्रीमतास लेहून उतर आणवणे राजश्री माधवराव गगाधर यास बदनाम करितात यानी बाईस बहकाविले ह्मणतात तर मी अज्ञान नाही की भूल देऊन बहकावितात बापापासोन याच दौलतेत वाहडले तेथे हेही आहेत उगेच बदनाम करणें तस्मात येथ काणी राहू नये तेंव्हा मी काय करावें ? याचे उतर आणवणे त्यावरून विनती केली असे उत्तर सादर होईल त्याप्रमाणे बाईस लेहून पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ This appears to be Sadashiv Dinkar's letter to Nana forwarding Ahalyabai's complaint against Tukoji who defied her orders and wishes and behaved in an insubordinate manner towards her See in this connection No 148, Mahadji Sindia's Letters, which more fully explains the same subject

---

*No 192* ] [ October 1781 ?

श्री

पुरवणी शेवेसी विनंती यैसीजे नवाबसाहेब याजकडे दिलीहून बातनी आली जे, इंग्रजा कडील मातबरासमागमें रुपयाच्या आबाऱ्यासहित दाहा बारा हाती व वस्त्रे व जवाहीर व तोफ ताफ जिनस घेऊन पातशाहाकडे आला आहे व त्याचे बोलण्यात भाव आहे जे, सरकारचा मुलूक फौजेच्या व सरदाराच्या सरजामास आहे तो आपले जिमे करून यावा, आह्मी तूर्त करोड रुो देतों व पुढें यैवज आकारेल तो करारप्रमाणें पावता करीत जाऊ ह्मणून बोलल्यानतर नवाब नजबखा यानी यैकून पादशाहाजवलील लोकाच्या चितात हे गोष्टी आली परतु पादशाहाचे हाजूर आर्ज केला कीं हे बोलणें सर्व मायावी, लबाड, परिछिन्न, उपयोगी नव्हे यैसे बोलिले ह्मणून लिा आहे त्यावरून नबाबसाहेब बोलिले कीं तथे सरदारात उमदा लायक येक नजबखा मात्र आहे त्यानी दूरदेसीने समजोन जबाब बहुत दुरुस्त दिल्हा ह्मणून बोलिले कलावे लोभ करावा हे विनती

☞ Krishnarao Narayan Joshi, the Peshwa's agent with Haidarali Khan reports news received by Haidar from Delhi that the English had sent presents to the Emperor and his Vazir Nagafkhan to win them over to their side but that Najafkhan understood the false game and rejected the proposal

---

*NO 193* ] [ 18 November 1781

श्री

अज सुभा राजश्री माहादजी सिंदे ताल जमीदार तपे पिपलोदा वगैरे गाव नि॥ गोपाल सभाजी पा मडावल सु॥ इसने समानीन मया व आलफ साल मजकुरी तपे मजकूरचे गाव गोपाल सभाजी याजकडे देविले आहेत, तरी तुह्मी मारनिलेकडील कमाविसदारासी रुजू राहून वसूल देणें रा खडेराव हरि याणी टीपा घेतल्या त्या मावाऱ्या देविल्या आहेत, तरी वसूल गोपाल सभाजी कडील कारदाराकडे देणें जाणिजे छ १ जिल्हेज

☞ Gopal Sambhaji is appointed by Mahadji to manage the district of Piploda in Mandawal

---

*No 194* ] [ November 1781

श्री

विज्ञापना यैसीजे राजश्री गगाधर गोविंद बुधेले व सिवराम हरि ह्मसीकर व सदासिव मल्हार पाटीलबावाकडून असे त्रिवर्ग राणाचे अनुसधाकरिता कन्हेऱ्याकडे जाऊन गोहदकर राणा याचे प्रातातील एक दोन गाव मारून काहीं गुरें व माणसें आणलीं हें वर्तमान पूर्वी विनविलें होतें. त्यास गगाधरपताचे राजकारणास दिरग पाहिला राजकारण होता दिसेना व राण्याचा कागदपत्र देखील त्याजकडे येईना व इकडे त्यास राण्याची दोन तीन . मुनसी छोटखानी आला कागद पत्र येऊ जाऊ लागले त्यावर राजश्री सिवाजीपत बापू यास पत्रें राण्याचीं येक दोन आली कीं, चिमणाजीपत व गिरमाजीपत यास पाठ वावे त्यावरून आह्मीं गिरमाजीपत पाठविले ते जाऊन त्याचे खातरजमेचें पत्र आलें ह्मणोन

चिमणाजी पंताची रवानगी जाहाली याजवर काय घडोन येईल तें खरें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

☞ Naro Shivdev explains the nature of the negotiation on which Chimnajipant was sent by Mahadji to the Rana of Gohad

*No 195* ]

श्री

विज्ञापना राजश्री विसाजीपंत लाबहात्ये यास मातुश्री बाईनी निर्माल्यवत येथें ठेविले आहे. यास्तव त्यानी हरकूबाईचे हातून सधान राजश्री तुकोजी बावाकडे लाविले आहे येथे मुकुंदराव राजश्री नारोपताचे भाचे आहेत, त्यासी खलबते अतून होऊ लागली हें वर्तमान बाईस कळले त्याजवरून उभयतास जरब देऊन ताकीद करून खलबत बद जाले कारकून आतून जात येत असतात विसाजीपताकडील कारकून बहिरोपत राजश्री पाटीलबावाजवळ होता तो बाईस सागून तेथे जाऊ दिला नाहीं तो लबाड फार आहे गतवर्षी राजश्री हरिपत तात्या याचे विरुध भाव नित्यानित्य समजावयास तोच येत होता तो तेथे असल्यास वाईट यास्तव युक्तीनेंच तेथून काहाडिला तो येथे होता, आज पधरा वीस दिवस येथें नाही बऱ्हाणपुरास गेला आहे ह्मणऊन सागतात बावाकडे गेला असता तरी कळते, तत्रापि शोध करावयाविसी लिहिले आहे नारोपताकडे सधान सौभाग्यवती रखमाबाईचे आतून लावावे याअर्थे तेथेच गेला असावेसे दिसते याचा शोध बारकाईने लागला पाहिजे लबाड फारच आहे तेथें गेला असल्यास खेल करावयास चुकणार नाहीं राजश्री रामजी पाटील याची त्याची वळख पूर्ती आहे त्यासही शोधाविसी आज्ञा व्हावी सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना

☞ Naro Shivdev requests Nana Fadnis to beware of a clerk named Bahiropant who had played great mischief at Indore with Ahilyabai and who was thereupon removed by her and had now probably gone to Poona

*No 196* ] [ Early 1782

श्री

विज्ञापना येथीजे इग्रज कूच करून माघारा गेला गोहदकरास टाकून यमुना उतरून जातील ह्मणजे तूर्त या प्रातीचा वाद तुटला येथील प्रकार तर लोकाचा गवगवा आहे इग्रजाचा तुमचा सलूख जाहाला आता आह्मास निरोप द्यावा असे बहुतकरून ह्मणतात, व कोणी उठोन जातील असेंही दिसोन येते येथे लोकाचे आगतस्वागत आहे तें सर्व आपल्या ध्यानातच आहे गोसावी बैरागी याचीही तारीख बद करणार, तेव्हा यमुना उतरून अतरवेदीची मसलत करण्याचा अर्थ ध्यानात यावयाजोगाच आहे इग्रज कूच करून शिप्रीस गेले त्याचे बोलण्यात होते कीं आमचे कूच जाले ह्मणजे तुह्मीही कूच करून शहर सोडून डावे उजवे जिकडे तुह्मास जावयाचे असेल तिकडे कूच करावें त्यावरून याणी येथून दीड कोसाचे कूच पूर्वेस इदार नदीवर नेमिले आहे प्रात काळी तेथे जातील पुढे चदेरीच्या राज्याचा बदोबस्त करून बुधेलखडात उतरून खुम न गुमान यानवलोन ज्यार खो मेलउन काहीं दतियेकरापासोन ज्यार खो मेलवावे,

याप्रो कालहरण करनील असा रंग दिसतो नजरग्वान वगैरे यांनकडील प्रकार तर प्रथम दिवसच आहे उजनीत होते तेव्हा तरी भ्रम होता तो इकडे येऊन सारा गमावला आता आयुर्भाव बोलण्यात आणतात, परंतु दुसऱ्याचे अन कर्णी जरब तिळभर नाही असा प्रकार आहे पाहाव पुढे काय योजतात खुमान गुमानजवळूनही च्यार सो मिळणे दुरोपास्त अहेत साऱ्या गोष्टी व दाव येके इग्रजाचे पारपत्यावर होता तो अर्थ समजला आता कोणी राजे रजवाडे जरूर दबतील याच्या जवळ तोफा आहेत, यास कोणी मिळून च्यार सो दिल्हे तर न कळे सारा प्रकार आपल्या ध्यानातच आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports that Mahadji's allies were all leaving to their destinations now that the war with the English was closed by a peace already negotiated

---

*No 197* ] [ 15 February 1782

श्री शंभु प्रसन्न

छत्रपति

पौ छ १ राकर इसने चैत्र

राजश्री माधवराव पंडित प्रधान गोसावी यांसी—

छ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री यशवंतराव सिंदे सेनासाहेब सुभा सरखेदार दंडवत विनती उपरी येथील कुशल ता छ २ जालावल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष तहाचे बोलणे राजश्री सखारामपंत आपणासी बोलनात आणि करावयाची यादी श्रीमंत माहाराज राजश्री स्वामी यांणी आज्ञा करून पाठविली आहे याअन्वये खातरजमेनिसी निभावणी होईल येविसी राजश्री विठलराव यांणी लिहिले आहे त्यावरून कळेल बहुत काय लिहिणे लोभ कीजे § हे विनंती

☞ Yesaji Shinde from Kolhapur sends the draft treaty agreed upon for the Pashwa's ratification See letter dated 4 July 1779 above

---

*NO 198* ] [ 16 March 1782

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसी—

विनंती सेवक केशवराव जगनाथ मुक्काम किले असेर चरणावर मस्तक ठेऊन सा नमस्कार विज्ञापना तागाईत छ १ रावरपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष राजश्री नाना फडणीस याची पैवजी किला सिंदे याचे स्वाधीन करावा म्हणोन पाच सात पत्रे आली व हाली राजश्री बालाजी नारायेण कारकून मुनरद पत्र घेऊन आले त्याजवरून हाली येथून राजश्री भगवंत येशवंत यासी सेवेसी पाठविले आहेत, विनंती करितील जागा हिंदुस्थानचे सरदेची खासा स्वारी हिंदुस्थानात जानेमगई खासी माणसे ठेवावयास पुण्या आलीकडे जागा येवढीच मातबर सरकारात अहे, याजकरिता सेवेसी विनंती लिहिली आहे सिंदे यास याचे ऐवजी दुसरा किला देणार स्वामी धनी आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Keshavrav Jagannath the keeper of the fort of Asicr

---

§ पुढील अक्षरें बाळबोधींत येसाजी शिंद्याच्या हातचीं

tenders his advice to the Peshava not to hand over the fort to Sindia as that was the only place of security on the high road to the north See letter dated 28-9-1779 above

---

*No 199* ] [ 23 March 1782

पौ छ ३ रजब सलास समानीन

श्रीगजानन

श्रीमत राजश्री नाना स्वाम स्वामीचे सेवेसी—

आज्ञाधारक बाबूराव भास्कर सा। नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। चैत्र शुध १ पूर्व पत्रत्रयानुरोधेन येथास्थित साप्रत स्वामी श्रीमुखारविंदात् समित अमृताक्षरनिस्र(सृ)त चिरंजीवानी लिहिली मजसहवर्तमान चालीस पनास ब्राह्मण आन च्यार मास मुमूर्षु होते ते सावध जाले नाना स्वामी येक्वचनी सत्यप्रतिज्ञ हा अर्थ दिगत प्रसिध या शद्वाचे माटी (री?) व माझा मुखेकरून या प्राती जाले होते, ते लोक आह्मास मृषावादी ह्मणत होते आपली अमृतवाक्ये स्वणे त्याचीही खातरजमा जाली सिंद्यानी हा अर्थ सपूर्ण बिगाडिला हे निमित्य त्यास हाली सिंद्याचे पत्र आपणास आहे तें सेवेसी पाठविलें आहे ह्मासी तालुक्याची मामल्याची रीत चैत्रे पोर्णिमेस वेबाकी पोर्णिमेपासून पुढें लावणीची तरतूद जेष्ठ शुद्ध चतुर्थीस अवल साल आजपासून अखेर सालास दिवस त्रेपन येथून पत्रे स्वामीस प्रविष्ट होणे व स्वामीकडून सदा ताकीद पत्रे येणें यास चालीस पचेचालीस दिवस लागतात येथे दुसरे दरबार सिंद्याचे तेथून फौऊज आणायास पधरा दिवस लागतील

को न याति वशं लोके मुखे पिंडेन पुरित ॥ मृदगो मुखलेपेन करोति मधुर ध्वनिं ॥ १ ॥

अवल साल जाल्यानतर आठ पधरा दिवस त्याजकडे मामलत राहिल्यास हिसेरसीदीची मोठी कट कट पडेल याजकरिता मज अनाथ दीनावर कृपा करणें श्रीमत पतप्रधान स्वामीच्या घरची रीत आजपर्यंत चालली तीच चालवणें स्वामी सत्यप्रतिज्ञ, हा शद्व विधिनिर्मित यास दोष न येणें

अद्यापि नोज्झति हर किल कालकूट कूर्मो बिभर्ति धरणीं खलु पृष्ठभागे ॥
अभोनिधिर्वहति दु सहवाडवाग्निमगीकृत सुकृतिन परिपालयति ॥

पूर्वपत्री स्वामीस दस्तायेवज लिहिला आहे सिंद्याकडील दरबारखर्च परभारा साधू व सरकारकिफायत करून दाखऊ हे अर्थ स्वामींच्या कृपेने व आमच्या कारस्थानीनें होणे यदा अवलसालाअलीकडे आह्मास ईस्वर सर्व घडवील चिंता नाहीं बहुत विस्तारे ल्याहावे तरी पिष्ट पेषणदोष येतो माजी ग्रहस्त सिंद्याकडे लाख दोन लाख द्यायास सिध आहेत परतु आह्मी आपले कृपापात्र स्वामीची आज्ञा या अर्थी थोड्यावरच सिंद्यानी कृपा केली बारा वर्षे ज्याणी द्रव्यसपादन केलें, धन्यास दगा दिल्हा, त्याचे दहा पाच द्यावयासी त्याचें काय गेलें?

सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पडित । याचा सारासार विचार धण्यास ध्यानास असावा याच्या रुजवातीविसी सेवकास आज्ञापत्र सिंद्याकडील अमीन यावा रुजुवात जाल्यानतर बारा वर्षांचें ब्रह्म स्वामीच्या द्रिष्टीस पडेल चतुर्दश विद्या चतुशष्टि कला या कलयुगीं ईश्वरें स्वामीच्या ठाई ठेविल्या आहेत आह्मी अल्पमति काये ल्याहावे? कदाचित च्यार दिवस च्यान्हवीतीरी जावे तरी गणेश सभाजीचे जे अनक ते आह्मास कालातक येथून कोशावर मार्गी मेडा त्याच्या पुढे कोशावर ह्मसी

गर्वेराढ्या जगति विदिता केतकी स्वर्णवर्णा
पद्मभ्रात्या क्षुधितमधुप पुष्पमध्ये पपात ॥

अधीभूत कुसुमरजसा कटकैच्छिन्नपक्ष
स्थातु गतु द्वयमपि सखे नैव शक्तो द्विरेफ ॥

बालाजी गोविंद झासीवाल्याची स्तुति व आमची निंदा लिहीत आहेत ते स्वामीच्या ध्यानातच आहे राजश्री अबाजी इगले सिंद्याजवल मुख्य व मातबर माणूस आहेत, ते आह्मावर बहुत कृपा करितात कारण आपले कृपेवर त्यास कृपापत्र आपले अबोजी इगले यास कीं, तुह्मी सरकारचे आहा, तुह्मावर सरकारची कृपा आहे, खातरजमा असों देणे ऐसे पत्र कृपा करून पाठ वावे येणेकरून आमची मातबरी राहेल व आमचे कार्यास उपयोगी पडल झासीवाले वारवार ह्मणतात कीं नाना स्वामीचे खुणेचे पत्र आह्मास पाहिजे त्यास काये खूण असेल त्याप्रों पत्र पाठवावें ह्मणजे दिकत पडणार नाहीं × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Baburao Bhaskar the Peshwa s agent at Hamirpur ( on the Jumna opposite Kalpi ) requests Nana Fadnis to continue the management of the Jhansi district to him as was promised He writes there are others who are not favourably disposed to him and who would compass his ruin The letter is interesting and typical of the double government of northern affairs See letter above dated 18-1-1781

— —

*No 200* ] [ 10 April 1782

श्री

चिरजव विज्यईभव राजश्री बाबा * यासी प्रति बाबुराव भास्कर आसीर्वाद उपरी येथील कुशल ता। दक्षणी चैत्र वद्य त्रयोदसी मु॥ झासी जाणोन स्वकीये लिहीत असिले पा। विशेष तुह्मी गोपाल जमातदाराबरोबर पत्रे आपला व श्रीमताची व श्रीमत राजश्री नाना स्वामीची व अडीच हजार रुपयाची वरात झासीवर पाटविली ती पावली पौष अमावास्येस पत्रामावे दिवसी गोपाल पावला त्याजबरोबर कासीद आपण दिल्हा होता तो सागराजवल मृत्यु पावला गोपाल पधरा दिवस तेथे दुखणा पडिला होता वरात राजश्री रघुनाथराव सुभेदार याजकडे पाटविली रुपया न उगवे तेव्हा आह्मी आजे तीन महिन्यात रुपये मोठे मेहनतीने सवटे करून उगवले आता यावे तरी उपणकाल मारी मुगसीतली पडिल्यावर स्वार होऊन येतो राजश्री बाजी जगनाथ झासीच फडणीस देसी येणार ते आह्मी समागमे येऊ आमचे मानस या प्रातीच काही मामलत करावी, कराधारेस बर्ती सवादोन लक्षाच्या हुड्या सावकारी तयार केल्या होत्या परतु सिंदे कूच करून गुजरातेत गेले, सरकारात रुसले, हे वर्तमान आले याजकरिता हुड्या माघाऱ्या सावकारास दिल्हा वरातेचा ऐवजाकरिता झासीस आलो श्रम मेहनत करून महिन्याच्या मुदतीने सावकारी हवाला टवाला घेतला काल्पीचा सुभा श्रीमत सागतील तरी लाख रुपयाच्या चिठ्या बशर्त ठाणे दाखल जाल्यावर यावे ऐसा सावकारी पाठवितो ठाणे दाखल जाल्यावर येका मासात लाख रुपयाच्या हुड्या आह्मी पाठऊ येथे दोन लक्ष रसद जुन्याचा आकार दर वरी असेल त्याजवर दोन आणी साल मजुरी इजाफा देऊ पुढे पाच साला दरम्यान लक्ष्मण शकराची जमा आकारू गडनाई हमीरपूर इन्याकडे यावे स्वार सरकारी सिबदी प्राचीनप्रमाणे यावी कचा जमाखर्च प्रतिवर्षी सरकारात दाखऊ वेतन पोटात करावे नाना स्वामीस विनती करावी की आमचे चाल

---

× निराळें अक्षर * पुढें ता। १४-७-१७८२ च्या पत्रात ' आबा ' आहे खरें कोणतें ?

वगे तरी हे काम आह्मास सागावे खुमानसिंग गुमानसिंग पाच हजार फौजेनसी मदतीस ठीक केले आहेत व या प्राता सरकारी फौज व सिंद्याची फौज आहे त्यास तार्कीदपत्र कीं याचा अमल दखल करून देणे ह्मणजे अमल सहजात बसेल सरकार किफायतही आहे प्राचीन सुभा लक्ष्मण शंकर, पुढे हरि विठल, गोपाळराव बापूजी, गणेश संभाजी पुढे गर्दी जाली बाळाजी गोविंदानी ठाणी बसविली, त्याजकडच राहिली नाना स्वामीस कृपा करून काम सागणे तरी पत्र माझे नावें कीं तुह्मास सरकारातून मामलत सागो लाख रुपये बरातीं तूर्त पा। या प्रा। पत्र आल्या नतर हुड्या पाटवितो केशो शकर व बलवतराव वाकडे यास कळो न यावे व मुठयास तूर्त न कळावे गुप्तरूपे येकान्ती स्वहस्ताक्षर अथवा तुह्मी लेहून दस्कत करून घ्यावे पत्र आले ह्मणजे हुड्या पाटवितो सनदासमई सर्वास कळेल मग चिंता नाही या प्रातीं फौजा येत असिल्यास च्यार महिने येथे राहू अतरवेदच सर्व जमीदार मथुरावादेपासून प्रयागपर्यंत पनास हजार प्यादा व पाच हजार स्वार तयार केले आहेत काल्पीवर फौज येताच अमल बसवावा याजकरिता हवेली, कुरा, बिंदकी, हसवा, जफरपूर बिरवलाचे, शाहापूर, अकबरपूर, इटावे, डेरापूर, मंगलपूर या माहालच्या सनदा पाटवाव्या अमल बसल्यावर रसदही देऊ अगर या प्रातीं सरकारतर्फेने कोणी सरदार येईल त्याची दिवाणगिरी कृपा करून सागतील तरी सरकारनुकसान न होता आमचा कालक्षेप चालेल, व सरकारकिफायेत बहुत होईल कारण कीं या प्रातीची माहीतगारी बहुत दिवसानी पाहुई आदिकरून राजे रजवाडे सर्व जाणतात सर्वाची राजकारणे आहेत नाना गरीबनवाज आहेत गगासागरपर्यंत यश प्रसिद्ध होईल फलाणा ग्रहस्त मोटला होता त्याचा नानानीं जीर्णोद्धार केला परकीय ग्रहस्त बहुत वाढविले, आह्मी तर त्याचे पितामह दौहित्र × आमचे चालविल्यास विशेष पुण्य पुरुषार्थ येश कीर्ति आहे हीही न बने, या प्रातीं सिंदेच सरदार हाऊन आले तरी त्यास पत्र कीं फलाणे सरकारचे सिलकी चाकर त्या प्रातीं आहेत त्यास फलाणा दरमाहा देऊन त्याच्या हाते कामकाज राजे रजवाडेयाचे वगैरे घेणे ह्मणजे आह्मी कालक्षेप इतक्या पत्रावरच करू काल्पीपरगण्यातील गाजीखानाची ज्यागीर जप्त झाली कमावीस बाळ जी गोविंदाकडे सागितली तीज्यागीर आह्माकडे सागतील तरी पचवीस हजार रसदेच्या हुड्या पाठऊ व गुदस्तापेक्षा सवाई सरकारात जाजती देऊ तरी येविसी नानास विनती करून ठीक करून त्याहाव हुड्या पाठऊ पो कनारची फडणिसी बापूराव काणे याजकडे ती सरकारातून दूर करणें अवश्यक आहे आह्मा कडे सागितल्यास सरकार किफायेत करून दाखऊ पाच हजार रसदेच्या हुड्या पाठऊ येविसी विनती करावी अगर विसाजी गोविंद याणी गढे-मडल्याचे संस्थान नवे मेळविले तेथील फडणिसी अगर दिवाणगिरी सागतील, तरी शोध करावा. पूर्वी तुह्मास लि॥ हाते कीं आपली पत्रें नानास दाखवावी तुह्मी अनमान केला हाली त्यास विनतीं लि॥ आहे कीं चिरंजीवास पत्रे लि॥ आहेत ती आपण वाचून पाहावी तुह्मी अष्ट प्रहर जवळ असता दुसरा समय येकात पाहून पत्रें वाचून दाखवावी अनमान सहसा न करावा आमचे मानस वर्ष दोन वर्ष या प्रातीं राहून रोजगार करून मग देसी यावे येविसी नानास विनती करून ठीक करावे त्याची मरजी खामखा देसीच यावे ऐसी असिल्यास निघोन येऊ कडप्पाधारचे सिद्याकडून ठीक असिल्यास लहून पाठवावे बरातीं हुड्या पाठऊ कलकत्ताच्या वकिलीविसी पूर्वी लि॥ होते आज्ञा जाली असती तरी आजपर्यंत सदूख होऊन कर्नेल गाडर सुरतेहून कलकत्तास गेला असता अद्यापही सरकारची मरजी असिल्यास घडेल इग्रज सर्व स्नेही आहेत काल्पीचे काम सागितल्यास खुमानगुमानाकडून सरकारात पाच सात लक्षाचा लाभही घडेल राजश्री हरिपत तात्याचीही कृपा संपादून घ्यावी तेही आह्मावर कृपाच करितात तीर्थस्वरूप कैलासवासी बाबा मजवर बहुत कृपा

+ मेहेरबाने !

करीत होते, व तात्यावरही करीत होते तें तात्या सर्व जाणतात, त्याअन्वये आह्मावर कृपाच करितील श्रीमतानीं त्याचे नाव अज्यातशत्रु धर्मराज ब्राह्मणाची काशी असी अभिधानें दिल्हीं होतीं आमच्या दैवयोगे विपरीत होन असिल्यास वर्तनें अमल दखल पातु त्यास कबूल करावी सरकार यैवजाबरोबर तोही यैवज पाठऊ राजश्री बाजीपत फडणीस याचे पत्र तात्यास पा आहे ते द्यावे राजश्री रघुनाथ हरि याविसी विनती श्रीमतास करून भाडेर याजकडे राहून सिंदास ऐलच मोबदला होये ते करावे न केल्यास झासी कन्हेरा अनन होत नाही झासी, कन्हेरा, ग्वालेर, गुन्सराई ग्यारच जागे मातबर सर्व विनती करून रघुनाथरावजीस खानरनमेचे नानाचे पत्र पाठवावे राजश्री सदासिवपत जोगलेकर याणी चिरंजीव राजश्री नाना गोविंदपत याचा यैवज घेऊन सिबदी ठेविली तो यैवज तुह्मी सदा सदासिव हरीकडे लाविला त्याजकडून पावला नाही त्यास पूवा आपला विषम काल होता साप्रति श्रीगजाननरूपी नाना कृपावत आहेत तरी त्यास तचीं पोहचऊन त्यायैवजापैकी निमे सदाशिवपत व निमे गोविंदपत त्यास तुर्त सदासिवपताचा यैवज पठऊन त्याच्या बगूची चिठी याच जोडीबरोबर पाठवावी त्याचा तगादा येथें भारी आहे आह्मानवळ यैवज असता तरी देतों परतु येथें भजावयाचे कठिण त्या अर्थी नाना कृपा करितात त्या अर्थी सर्व कामे घडतील उर्जितही होईल सेवटवर उपेक्षा करणार नाही हा भरवसा आहे राजश्री बाजीपत फडणीस थोर मनुष्य विपत्रकाली आमच्या खर्चाखेचाचा घरमर्थ केला मर्द माणूस आहेत मीर नईम (?) व गोसावी याच्या लढाईत बहुत कामकाज केले सर्व राजे रजवाडे यासी सद्भाव, सर्वासी स्नेह, सावकारात सनपत मातबर सुभ्याच्या योग्यतेचे आहेत पुण्यात येतील तेन्हा तुह्मास त्याच्या दर्शनाचा लाभही घडेल विश्वासराव कासीजवळून अमर रा॥ आह्मी कोच बनारस घेतले ख्त लिहून दिल्हे आहे अर्कोटी ७१ पाऊणसे होतात ते देसी येणार हिसेब करून आपला यैवज घ्यावा हे रुपये मनुरा देऊन खत मागोन घ्यावे अताजी हरि सोनी नागावेकर त्याजकडे दोनसे रुपये मुद्दल, बारा वर्षे जाली त्याचे दिल्हे आहे त्याजवरून कोच बनारस पाऊणसे घेतले कलचे बहुत काये लिहिणे लोभ करावा गोविंदराव व सूर्याजी सुखरूप आहेत हे आसीर्वाद

☞ Baburao Bhaskar writes, it seems, from Hamirpur to his son at Poona, requesting him to meet Nana and arrange to secure the management of some districts in the north for the writer The writer is related to Nana Fadnis, and as such makes various proposals in his interest, for each of which he asks a definite bargain to be effected with Nana

---

*No 201* ] [ 13 July 1781

## श्रीगजानन प्रसन्न

पौ छ रजब सन सलास समानी

श्रीमत राजश्री नाना स्वामी स्वामीचे सेवेसी विनती सेवक बाबूराव भास्कर सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ वैशाख शुध सतमी कृपाकटाक्षे येथास्तित असे विज्ञापना झासीच्या कामाविसी चिरंजीवास आज्ञा केली होती त्या आज्ञेप्रमाणे वर्तनें अमल दखल केला झासी, कन्हेरा, पनास हजाराची चिठी श्रीनाथ दुबे व लाल दुब सावकार मानबर चरखारी व मऊराणीपुरा येथे राहातात, रजवाड्यात ल्होपलआचा वेव्हार त्याचा आहे हुडी पत्र लिहित नाही बाबाजी प्रल्हादाचे चिरंजीव बापूस व अताजी म लढाटे नागनाथ दाखल पुसवावा साव

फार बहुत मातबर आहेत झाशीचा अजमास थोरवट आढळात आला तो सेवेसी लि॥ आहे व काल्पीच्या सुभ्याचा अर्थ व कनार वगैरे येथील अर्थ अलाहिदा विनतीपत्री लि॥ आहे झाशीच्या कामाचा अर्थ अलाहिदा दुन तीन पत्री लिहिला आहे पोटास पोटन नेमून द्यावे सेवा शपथपूर्वक अकृत्रिमपणे करून द्यावऊ मामला साल दरसाल वाढऊ रसद जाजती देऊ नव्हे सरकारचा रात्रू सहजात त्यले खाली व्हावी हा अर्थ लि॥ आहे त्यात जसा अर्थ मरजीस येईल सुभ्याचे काम रघुनाथ हरींनी बहुत बिघडले विनाफौज बनत नाहीं सुभ्यास बहुत फौज ठेवावी तरी जागा थोडी सरकारची पथके सिंद्याच्या तैनातीस आहेत आज्ञा जाल्यास सहजात बदोबस्त घडेल येके भाटेरीस रसद पाऊण लक्ष यदा सिंद्यास दिल्ही सरकारात खावयास काणता टका (?) मिळत नव्हती मामल्याची काल्पी झाशी घालमेल करून लक्षोपलक्ष रुपयाची सरकार किफायेत करावी हे मानस असिल्यास हाच अवसर आहे सिंदे या प्रांती आहेत तों सर्व गोष्टी घडतील सिंद्यासी आह्मी ठीक करून ठेविले आहे गुता नाहीं

मृदंगो मुखलेपेन करोति मधुर ध्वनिं ॥

सरकारच्या सनदा मात्र आल्या पाहिजेत निशा घेऊन ठाणी बसऊन द्यावे येसी पत्रे आल्यास निशा सावकारी तयार आहे झाशी काल्पी हे स्वतंत्र सार्वभौम आपण म्हणवितात श्रीमंतास जाणतच नाहीं आह्मास आपण या प्रांती कामकाज सांगणार आज दोन वर्षे जाली हे सर्वांस कळले आहे झाशी काल्पीवाळे आपली निंदा करितात ते आइकोन आह्मास मृत्यु प्राय होते आमची निंदा थट्टा करितात आह्मी मानतो आहो आपण साक्षात ईश्वर आपली निंदा आइकवत नाहीं पक्ष सुरत अतुरवेदीचा अमल बसवावा येविसी आह्मी सरजाम करून सिंद्यास पत्र लि॥ होते प्रयागपर्यंत सहजात अमल बसवितो त्याचे उत्तर आले ते सेवेसी पा॥ आहे इकडील जमीदार मामलेदार वगैरे सर्व जाणतात की हे श्रीमंताचे आप्त यामुळे जमीदार सर्व मानितात आजत आहेत विज्ञप्ति लक्षोपलक्षाची सरकारची किफायेत व रसद देत असता व आपले वचन युधिष्ठिर सदृश आज दोन वर्षे असता व फौजही या प्रांती आली येसे असोन मामलत न होय तेंव्हा आमचे दैव प्रतिकूल आहे

आशाया परम दुःख नैराश्य परमसुखं ॥

आह्मास या प्रांती मातबर रोजगार न सांगावा येसे मानस असिल्यास काल्पी व कनार दोन्ही फडणिशी रिकाम्या आहेत त्या सांगाव्या ताही अर्थ न घडे तरी फाजिलाच्या येवजी काल्पी परगण्यात गाव द्यावा तेथे स्नान संध्यादि षट्कर्मे करूत स्वामीस व राज्यास कल्याण इछून राहू हाही अर्थ न सभवे तरी तसेच ल्याहावे नचाच अगर दुसरे कोणाचेही आर्जव करून पोट भरू मातबर रोजगार केल्यावाचून देसी यणे नाहीं हा संकल्प येक वर्ष प्रयागचा सुभा केला तो धर्म खाते जाले आज दोन अडीच वर्षे स्वामी आज्ञेने येथे आहो ततखा तो कोणी मानीतच नाही मासामध्ये च्यार व्रते दोन वरदकृष्ण चतुर्थी दोन येकादसी येणे च्यार सांप्रत ईश्वरीकृपेने तीसही दिवस व्रत होते सावकारमामल्यास लाखो खावयास तयार भक्षावयास पैसा देत नाही झाशीचा दिवाण रघुनाथ बापूजी याजला आपले स्वहस्ताक्षरपत्र आले जे येवज जरूर देणे ह्मणजे येवज पटेल सांगशा काम सांगोन सनदा जलद याव्या अखेरसाली अमल बसऊ, तगाई कौल देऊन लावणी करू कोण्ही येक सुभा सांगावा अगर दोन्ही रसद वगैरे सर्व तयारी आहे, काहीच सांगणे नसिल्यास साफ आज्ञा करावी, तदनुसार वर्तणूक करू आपल्या आज्ञेवाचून काही करिता येत नाही याजकरिता विनती लि॥ असे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Baburao Bhaskar repeats his request to Nana to confer

upon him the management of some districts in Bundelkhand He seems a prolific writer

---

*No 202* ] [ 20 April 1782

श्री

श्रीमत राजश्री नानास्वामी स्वामीचे सेवेसी—

विनंती सेवक बाबूराव भास्कर सा। नमस्कार विज्ञापना वैशाख शुध सप्तमी स्वामीकृपेने वर्तमान यथास्थित विज्ञापना राजे खुमानसिंग व गुमानसिंग यास श्रीराजे जगतराज यांणी राज्य दिल्हे असता पाहाडसिंग राज्याधिकारी नसता जबरदस्ती जैतपूरास्त तेथे जाऊन जागा दाबिली येविसी उभयता राज्यांनी कैलासवासी श्रीमतास विनंती करून दरबारखर्चसुधा सवा पाचलक्ष रुपये कबूल करून सरकारची फौज देऊन जैतपूर यास घेऊन द्यावे, याप्रमाणे ठराव जाला जैतपूर घेऊन द्यावे त्या समई दोन लक्ष रुपये द्यावे, बाकी तीन लक्ष रुपये राहिले ते तीन वर्षात द्यावे दर साल लक्ष रुपयाची जागा लाऊन द्यावी तो ऐवज सरकारच्या कारकुनाने उगऊन घेत जावा याप्रमाणे किस्तबंदीचा कागद व करार श्रीमंताच्या निसबतीसी आहे राज्यांनी लागू होऊन काम करून घ्यावे तरी श्रीमंत राजश्री दादासाहेब गोहदेहून त्वरेने गेले विसाजी कृष्ण या प्रांती आलेच नाहीत सिंदे होळकर यांच्या नावे सरकारची ताकीद आहे की याचा अमल करून देणे हाली सिंदे या प्रांती आले आहेत त्यांजकडे याचे वकील आहेत पूर्वील कारभार त्यांच्याच विद्यमानचा आहे त्यांणी कबूल केले आहे या समई कार्य करून देतो ऐसे मान्य केले आहे सवारीच्यापैकी शकुनप्रमाणे काही देतात याजकरिता सिंद्याकडील स्वार कारकून येथे आले आहेत राजे खुमानसिंग याची आमची भेटी जाली त्यांणी कितेक वर्तमान सांगितले की आम्ही श्रीमंताच्या पदरचे वितीयविभागाचे श्रीमंत आमचे बंधु, हाली श्रीमत राजश्री नानास्वामी मुख्यत्वे आहेत, त्यांची आम्हावर कृपा असावी श्रीमंत चालवीत होते तसे आमचे चालवावे आम्ही सर्व प्रकारे त्यांचे आहो सिंद्यास सरकारचे पत्र पाठवावे की पूर्वी याच्या कामाचा करार होऊन तुम्हास सरकारची आज्ञा आहे त्याप्रमाणे कार्य करून द्यावे. याप्रमाणे राज्यांचे मानस राज्यांचेही पत्र आपणास आहे हे राजे मातबर. या प्रांती कितेक वेळ राजीबिराजी जाली परंतु हे सरकारच्याच लक्षात राहून अमल रक्षीत गेले याचे सरकाराविना दुसरे लक्ष नाही आपण याजवर कृपा करून सरकारपक्षीच लावावे सिंदे काम करून देतच आहेत तेव्हा तोच सबल पक्ष होतो सरकारचे पत्र आल्याने सबल पक्ष सरकारचा, रुपयाचा वसुलाविसी मजकडे आज्ञा जाली तरी मीच कारकून ठेवीन आज्ञेप्रमाणे जिकडील तिकडे ऐवज पावता होत जाईल श्रीमंताच्या पत्राची नकल सेवेसी पाठविली आहे वरकड गुप्त कितेक अर्थ आहेत ते चिरंजीव सविस्तरे विनंती करितील सेवेसी श्रुत होय हे विनंती

☞ Baburao Bhaskar requests Nana Fadnis to interest himself in the cause of Khuman Sing and Guman Singh, who had been deprived of their rights to the seat of Jetpur by Pahad Singh Nana is requested to carry out the terms of the contract arrived at by Peshwa Madhaorao I

---

*No 203* ] [ After May 1782

श्री

विज्ञापना ऐसीजे. छ १२ जावलचे पत्र सादर जाले त्यात आज्ञा जे, मुबईत इग्रजानी दवडी पिटली कीं श्रीमताचा व इग्रजाचा तहनामा व कल्याण बेलापूर वगैरे जागा जागाचा जिनस झाडून व घराचे इमारतीची लाकडे देखील मुबै साष्टीस नेतात व तमाम कल्याणापासून देखील गुजरातचे माहालचा वसूल रयतेपासून फार निकडीने डोईवर धोंडे देखील देऊन नेतात याप्रमाणे बातम्या चहूकडील आल्या व येत आहेत त्यास तह होऊन स्नेह जाला असता अशा गोष्टी इग्रजानी करू नयेत हे वर्तमान तुह्मी राजश्री पाटीलबावास सागावे ह्मणोन आज्ञापिलें त्यावरून सदरहू अन्वये सविस्तर राजश्री पाटीलबावा यासी बोललों त्याणीही इद्रसेनास सागून त्याकडून ताकीद करविली आहे दगड धोंडा इमारतीची लाकडे त्याणी नेऊ नयेत वसूल जबर दस्तीने घेतात ह्मणोन लिहिले त्यास याउपर सरकारच्या मुलकाची इग्रजास आशा काय? जितके सापडेल तितकेच त्याचे या बुद्धीने ते रयतीवर निकड करून पैका वसूल करीत असतील त्यास सरकारचे किले कोट मुलूख सरकारात घ्यावा हे आह्मी किती दिवस बोलतों परतु इतके दिवस ध्यानास आले नाहीं आता असे लिहितात यास काय करावे असो इद्रसेनासी बोलून त्याकडून ताकीद करवितो ह्मणोन पाटीलबावा बोलले आहेत परंतु इद्रसेनासी नेहटून बोलून जाबसाल होतीलसे दिसत नाहीं सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev in reply to Nana's requisition asked Mahadji to prevent the English at Bombay, now that the war had been closed by a treaty of peace, from exacting forced labour and articles of daily consumption out of Maratha territories adjoining Bombay Mahadji promised to represent the matter through Anderson An instance like this proves why Nana felt the need of an independent British Resident at Poona

---

*No 204* ] [ 25 August 1781

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनती ऐसीजे इग्रजाकडील वर्तमान तरी टिपूसी येक लढाई जाली करनेल ह्मणान कोणी साहेब पलटणाचा सरदार होता तो मार्गात लढाईत ठार जाला ह्मणून कलकत्त्यास पत्रे आली त्यानतर इटिनसाहेबानी स्वता मदराजास जावयाची तयारी केली आणि लखनऊस करनेल मारकिनसाहेब X आहेत यास पत्रे आली कीं तुरुकस्वार पाच हजार चाकर ठेऊन जलद पाठवणे त्यावरून करनेल मजकुरानी तुरुकस्वाराची निगादास्त भारी केली इटिनसाहेबाची सिध्धता होती इतक्यात शरिरास गैरआरामी बहुत जाली यास्तव साप्रत मदराजास जावयाचा विचार राहिला फौज रवाना करितात व कान्हपूर वगैरे या प्राती कपू आहेत त्यासही निकडीची पत्रे आली आहेत कीं फौज जलद रवाना करणे त्यास येथूनही पलटणा व तुरुकस्वार जाणार आहेत इग्रजास टिपूची ममलत भारी पडली आहे करनेलकर साहेबास समाधान जाल्यावर खुद मदराजेस तिकडे जाणार ऐसा विचार ठरण्यात आला आहे ह्मणून श्रवणात आले ते सेवेसी विनती लि॥ आहे पुढे प्रत्यास येईल ते विनती लिहू X बहुत

कार्ये लि॥ कृपा केली पाहिजे हे विनंती

☞News about Warren Hastings going to Madras personally to supervise the operations against Tipu is reported

---

*No 205* ] [ 9 August 1781

श्री

पौ ३ १९ रमजान सन सलाम समानीन श्रावण मास

श्रीमत राजश्री नानास्वामी स्वामीचे सवेसी—

विनंती सेवक बाबूराव भास्कर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। आषाढ शुध चतुर्थी मुक्काम मोधा नजीक हमीरपूर सात कोस स्वामीच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष राजे खुमानसिंग याचे प्रकर्ण पूर्वी सेवेसी लिहिले होते व राज्याही पत्र सेवेसी लिहिले होतें पत्रार्थ श्रीमत राजश्री दादासाहेब गोहदेच्या स्वारीस आले होते त्यासमई राजे खुमानसिंग व राजे गुमानसिंग उभयतानी सवा पाच लक्ष रुपये सरकारात नजर दरबारखर्च सुधा कबूल करून जेतपुरी ठाणे बसऊन देऊन येवज सरकारात द्यावा, त्यापैकी काही वसूल सरकारात दिल्हा आहे त्याची कबजे आहेत सिंद्यानी याचा पक्ष केलाच आहे ठाणे जेतपुरी बसऊन देतच आहेत, त्यास तो येवज सरकारात घ्यावा सिंद्यास ताकीदपत्र पाठवावे जेतपुरी ठाणे बसऊन देणे येणेकरून राज सरकारच्या लगी राहातील या अन्वये विनंतीपत्र पूर्वी लिहिले होतें त्यास राजे खुमानसिंग व गुमानसिंग उभयेता सापत्न बंधु जेष्टीचे खुमानसिंग, वयसा जेष्टही खुमानसिंग धाकटीचे गुमानसिंग राज्यास अनाधिकारी परंतु राजे जगतराज याची कृपा यामुळे अर्ध राज्यास अधिकारी जाले राजश्री विसाजी कृष्ण या प्रांती आले त्यासमई कैलासवासी श्रीमत राजश्री रावसाहेबाची व गुमानसिंग याची पागडबदली मारनिलेचे विद्यमाने काही नजर देऊन भाऊपणा जाला त्यासमई श्रीमत कृपालु होऊन जेतपुराविशई जो नजराणा करार केला होता तो माफ करून सिंदे होल्कर व बालाजी गोविंद यास ताकीदपत्रे दिली की, राजे गुमानसिंग याचा आमचा भाऊपणा जाला जेतपुरी याचे ठाणे बसऊन देणे ती पत्रें राजे गुमानसिंगानी आपल्या नावें आणविली राजे खुमानसिंग याचे नाव न लिहिले तीं पत्रें यास आजपर्यंत दाखविली नव्हती फौजाही या प्रांती आल्या नव्हत्या सिंदे हाली या प्रांती आले तों राजे गुमानसिंग यास शरीरी वेथा जाली, आठ दाहा महिनेपर्यंत बहुत व्यथित जाले फौजा या प्रांती आल्या कार्य करावयाचा अवसर हाच जाणोन राजे खुमानसिंग याणी वकील सिंद्याकडे पाठविले सरकारचे आज्ञेप्रमाणे जेतपुरी आमचे ठाणे बसऊन द्यावे, सरकारचा येवज ती साल पटऊन देऊ, तूर्त शकुनार्थ काही देतों त्याजवरून लस्करातून कारकून येथे आला आम्ही आपल्या कार्यास चरखारीस आलो होतों राज्यास ज्यनमुखे श्रवण जालें की नाना फडनिसाचे हे कृपापात्र आहेत हें जाणोन सविस्तर वर्तमान आह्माकडून सेवेसी लेहविले व राजे यानी पत्रें सेवेसी लिहिली राजे काया वाचा मनसा सरकारचे लक्षात आहेत खुमानसिंग व गुमानसिंग याचा राज्याचा विभाग बरोबर च्यार रुो सरकारात नजराणा लागेल तो उभयतानी द्यावा लाभ होईल तो उभयेतानी घ्यावा याजकरिता राजे खुमानसिंग राजे गुमानसिंगाचे भेटीस गेले सिंद्याचा शकुनार्थ येवज ठरला आहे तो निमे तुह्मी व निमे आह्मी द्यावा हुजूर पुणे यास पत्रें लिहिली आहेत तेथून सिंदे यास ताकीदपत्रें येतील तोही येवज ती साल पटऊन द्यावा हेही तजवीज असावी तेव्हा राजे मानसिंगानी उतर दिल्हें की कैलासवासी श्रीमत राजश्री रावसाहेब याचा आमचा पगडीबदल

भाऊपणा जाला त्या समंई नजराणा माफ करून राजश्री सिंदे होलकर व बालाजी गोविंद यास पत्रें दिली कीं नजराणा माफ केला जैतपुरी ठाणे बसवून देणे ती पत्रे दाखविली याणी वाचून पाहिली याणी त्यास निषेद केला कीं ही पत्रे येऊन आठ वर्षे जाली तुह्मी आह्मास का न दाखविली ? त्याणी उतर केले कीं प्रसगच पडिला नाहीं परतु न दाखवावयाचा भाव आपल्याच नावे पत्रे आणविलीं आपण राज्य करावे यास विभाग न द्यावा राजे गुमानसिंग बहुत कुत्रिम बहुत छलक सरकारात लक्ष थोडें राजे गुमानसिंग याचे लक्ष सरकारात सरकार किफायेत असावी व सरकारचे कार्य करावे हेच याचे लक्ष शूरत्व सेनाबल बुधींबल सावधता राज्यनीतीचे गुण सर्वे ईसरें याचे ठाई ठेविले आहेत श्रीमत कैलासवासीने यास नजर माफ केली हे यास कलले याजवर आह्मास बलाऊ पाठविलें कीं अज्ञातपणें श्रीमतास विनती तुह्माकडून लेहविली व आह्मीही पत्रें लिहिलीं त्यास तुह्मी श्रीमतास पत्रें लेहून अज्ञात दोष माफ करवणें आह्मी खासगत श्रीमत राजश्री नानाचे सेवेसी हाजीर आहों त्याचाच अवलब आह्मास रावणें याचा अर्थ सविस्तरें चिरजीव आबाचे पत्रीं लिहिला आहे ते विनती करितील याचे लक्ष आपले चरणावाचून नाहीं नादरशाई व आबदाअलीची गर्दी व पाणिपत व सुज्यातदौलाशाई इतकेही प्रलय या प्राती जाले परतु जो मामलेदार व जो ग्रहस्त व सरकारचे लोक जे याजवल आले त्याचे सगोपन करून जसें पुण्यात श्रीमताजवल राहावें तैसें आपलेजवल ठेऊन बरदास्त केली सरकारचे मामलेदार लढाई भिडाई ( स गेली ) त्याचीही मदत केली याची स्थले ऐसी आहेत हा प्रात डगाई ह्मणवितो या स्थलीहून पूर्व समुद्र बगालापावेतों अमल करावा हे मात्र कायेम असल्यास सरकारचाच अमल आहे सरकारची पत्रें नजराणा माफ केल्याचीं सरदाराचे नावे आहेत ती पत्रें राजे गुमानसिंग याजवल आहेत त्याच्या नकला करून आणविल्या आहेत त्या आल्यावर सेवेसी पाठऊन देऊ या राज्यास बालाजी गोविंद व सिंदे याजकडे नजर नजराणा खर्च बहुत असतो सरकार आपणच, कृपा केल्यानें खासगत आपली सेवा व सरकारचा नजराणा प्रतिवर्षी याजकडून मिलत जाईल येकादें काम हुजुरून पका बदोबस्त जाल्यास याचे लक्ष हुजुरच राहेल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Baburao Bhaskar makes this representaion to Nana on behalf of Khuman Singh who was desirous of obtaining the possession of Jetpur through Maratha help The writer espouses his cause and seeks Nana's favourable attention to his request The writer's son Aba who was at Poona was also asked to help in the matter

---

*No 206* ] [ 13 August 1782

श्री

**श्रीमत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी—**

पो गोपाल सभाजी कृतानेक सा नमस्कार विनती विज्ञापना ता छ ६ माहे रमजान मु॥ किले भेलसे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामींनी कृपा करून साल मजकूरचे रसदेचा ठराव करून आज्ञापत्र सादर केले, त्याजवरून पाऊणलाख रुपयाच्या हुड्या साडेच्यार साडेच्यार रोजाचे मुदतीच्या पाठविल्या आहेत चिरजीव राजश्री सदाशिव नारायेण सेवेसी विनती करील बाकी यैवज राहिला आहे त्याची तजवीज करून मी घेऊन येतो येथे सावकाराचा या प्राते रीत आहे की नगद पैका पदरी घातल्यास जितका यैवज द्यावा

तितक्याची हुडी देतात जाजती मागितली तरी देत नाहीं, यैसी रीत आहे पो मजकूरचे वर्तमान तरी साल मजकुरी जेष्टापासून पाऊस पडो लागला तो येक सतत भाद्रपद शु॥ ७ पावेतो लागला खरीफ बुडाले तेथून नेहमीच राहिला तो आज्यावेतो राहिला आहे रबीची सेते वालोन गेलीं परतु बीजभरण देऊन पेरणी करविली आहे करणसिंग गिराशा पो मजकुरी राहातो तो गुदस्ता जप्तीमध्ये मिलोन फित्यासी जुजत होता साल मजकूर परगणे यात धामधूम माडली आहे तूर्त सामदाम करून सत्वरच निघोन येतो बाकीच्या येवजाची हर कोणा साहुकाराची वरात जाहाली तर येथे देणे या पत्रामागे अणखी हुडी काही पाठवितो आणि मीही सेवेसी येतो बहुत काय लिहू लोभ कीजे हे विनती

☞ Gopal Sambhaji keeper of Bhilsa sends portions of Govt dues to Nana Fadnis and writes further to say that he was himself coming to Poona with the balance due from him

---

*No 207* ] [ Soon After 21 August 1782

श्री

विज्ञापना स्वामींचे कारकुनीविसीचे बोलणे जाले ते चिरंजीव पाडुरग रघुनाथ यानी पुरवणी पत्री लिहिले आहे त्याजवरून विदित होईल राजश्री बाळाराव यानी करार ठराविला त्या यादीची नकल येथे नाही यास्तव विनती लिहिली आहे कृपा करून नकल पाठवावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत राजश्री रघो मल्हार यास आश्वासनपत्राविसी विनती लिहिली आहे पाठवा वयाविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत त्याचे सरकारकामाविसी लक्ष उतम आहे राजश्री बाळाराव यास शरीरव्यथेने बहुत श्रमी लष्करात केले यास्तव निरोप घेऊन ते उजेनीस छ ११ रमजानी आले शरीर फारच विकल पोटात शूल होतो आन जात नाही वैद्य औषध देतात पथ्य होत नाही यैसे आहे येथे आलियावरी रुपयाची तुला केली याउपरी होईल त्याप्रा विनवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports among other matters, that Balarao Govind the Devan of Sindia had been taken ill and gone to Ujjain

---

*No 208* ] [ 23 September 1782

श्री

श्रीमत राजश्री नानास्वामी स्वामींचे सेवेसी

विनती सेवक बापूराव भास्कर सा। नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। दक्षणी भाद्रपद वद्य द्वितीया आपल्या कृपावलोकनेकरून यथास्थित असे विशेष पूर्वी सेवेसी सविस्तरे विनतीपत्र लिहिलेच आहे, सावकारी हुड्या बशर्त अमल दखल ठाणे ज्ञात लक्षा रुपयाच्या चिठ्या तयार केल्या आहेत, त्याचा तपशील —

| | |
|---|---|
| झासीत | कुरा ज्याहानाबाद लाला |
| २०००० दीनानाथ चौधरी नथन | सिव गोपाल |
| | २०००० |
| २०००० माहाराज लुया | कडा सहज्यातपूर देसराज |

सीतलप्रसाद
२००००

२०००० राघो बलाल चादोरकर

६००००

येकूण लक्षाच्या हुड्या सिध केल्या परतु मगल्सूत्र पाहिजे सरकारच्या मोहरेनसी पत्र कीं तुह्मास अमुक सुभा सागतो हुड्या रसदेच्या बशर्ती आल्यावर सनद पाठऊ याप्रा पत्र आले ह्मणजे चिठ्या पाठवितो ह्मणजे सनदा ठे [ पुढील बद गहाळ ]

☞ Baburao Bhaskar sends Nana the particulars of the Hundees of one lakh, which will be forwarded on receipt of the Nana's assuarance of investing him with the subhaship

---

*NO 209* ] [ 31 October 1782

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी —

विनती सेवक गोपाल सभाजी कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना तागायेत छ २३ जिलकाद मुा। किले भेलसे स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष पा। खाम खेडापैकी भूपालकर पठाण यासी पाचा हजाराचे तनख्याचे गाव ठाण्यासुधा यावयाविसी सरकारातून सनद दिल्ही त्यास ते सनद घेऊन येथे आले ऐशास पा। मजकूरचा तनखा पनास पचावन हजार साचा आहे हाली वसुली दाहा अकरा हजार आहे त्यास तनख्याचे गाव पाचा हजाराचे देतो, परतु ते घेत नाहीं वसुली पाचा हजाराचे मागतात पा। मजकूरचा गावपटा जाला ह्मणोन आहे तेथे गढी आहे सरकारचे ठाणे तेथे असते त्यास ते ठाणे मागत त न दिल्हे तरी मोर्चे लाऊन घ्यावे ऐसा त्याचा मानस आहे ठाण्याची जागा त्यास द्यावी तेव्हा सरकारचे गावचा वसूल होणे फलतच आहे याजकरिता येविसीचा बदोबस्त पका करून आज्ञा कर्तव्य ते करावी पा। भेलसे हा माहाल सिंदे यासी सरकारातून देणार ऐशास आमचे बंज व बाकी पा। मजकुरी येणे व सिबदीचे देणे आहे येविसी स्वामीस पेशजी विनता पत्रे लि॥ आहेत व चिरजीव रा। सदासिव नारायेण याणी विनती केलीच असेल तरी बंज व सिबदीचे देणे व बाकी याचा फडच्या पका करून तेथेच घ्यावा फडच्या न जाल्यास सावकार व सिबदी बाहेर निघो देणार नाहीं तेव्हा जुज करणे प्राप्त जाले तरी येविसीचा बदोबस्त करून घेणार [ अपूर्ण ]

☞ Gopal Sambhaji represents to Nana the trouble created by the Nawab of Bhopal and by Mahadji Sindia owing to the transfar of Bhilsa from the writer's possession He requests settlement of the points in dispute

---

*No 210* ] [ 9 November 1782

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी —

विनती सेवक गोपाल सभाजी कृतानक साष्टाग नमस्कार विज्ञापना तागायेत कार्तिक शुद्ध ४ मुा। किले भेलसे स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष पा। भेलसे

हा माहाल सरकारातून सिंदेयासी जाहागीर देतात ह्मणोन आफवा ऐकत होतो परतु गोष्ट प्रमाण आहे ऐसे न वाटे ( का ) की माळव्यामध्ये सस्थानिक जागा मातबर तोफखाना सरजाम पोक्त ऐसी सरकारात येवढीच आहे हे कदापि देणार नाहीत ह्मणोन आह्मी स्वस्थ होतो त्यास हाली चिरजीव राजश्री सदासिव नारायेण याचे पत्र आजच आले की श्रीमत राजश्री नानानी मजपासी सागितले जे पा॥ मजकूर हा माहाल सिंदेयासी जाहागीर देतो तरी गोपाळ सभाजी यासी तुह्मी लेहून तेथील उगावगा जेथवर होईल तेथवर करून घेणे ह्मणोन स्वामीची आज्ञा जाली त्यावरून चिरजीव याणी लि॥ ऐशास पा॥ मजकुरी पेरणीचा हगाम त्यास सरकारातून बीज द्यावे ही पधत राजश्री सिंदे तुकदेव याचे आमलापासून आहे सरकारातून बीज न दिल्हे तरी परगणा पडतो रयेत आपल्याजवळून बीज ऐकदर पेरीत नाही ऐसा प्रकार येथील आणि हगाम चुकल्यास बीज पेरले तर होत नाही ऐसे जाणोन लाख रुपयाचे बीज देऊन पेरणी केली पैकी कमबेस पाऊण लक्षाचे बीज आह्मीच आपले जातीवर दिल्हे आहे बाकीचे परभारें सावकाराकडून उगवणी घालून देखिलें येकूण लाख रुपयाचे बीज द्यावें लागलें व सालेसाल बाकी माहाली निघाली ते आमचे रदकर्जी लि॥ आहे परतु ते माहाली तैसीच राहिली व परगण्यावर आफती भारी पडल्या त्यामुळें वसूल न जाला याजकरिता सिबदीचे देणे तैसेच राहिले, साहा महिने सिबदीचे चढले आहेत सरकारात तीं साला दीड लक्ष फाजील निघाले तो ऐवज सावकाराचा तैसाच देणे आहे स्वामींनी माहाल सिंद्यास दिल्हा असेल तिऱ्हा देतील त्यास त्याजकडून कोण्ही सरदार येथे अमल बसवावयासी येईल ते समई किल्यातून आमचे निघणे सावकार व सिबदी होऊ देणार नाही प्राणासीच गाठ घालतील तेव्हा मोठाच घोर आहे मुलामाणसासुधा येथे प्राणच जाईल ऐसा प्रकार दिसतो ऐशास आमचा बीजाचा ऐवज व सिबदीचा साठा महिनियाचा ऐवज व सालेसाल बाकी माहाली आहे ऐसी तीन कलमाची निशा सिंद्यापासून सरकारातून करून घेऊन मजला पार पाडावें आणि स्वामीचे चरण द्रिष्टीस पडत तो अर्थ करणार स्वाम समर्थ आहेत तीं साला दीड लक्ष फाजील आहे त्यास आम्ही स्वामीचे चरणापासी येऊ तेव्हा स्वाम माझी मुक्तता करून देतीलच परतु बीज व सिबदीचे देण्यापासून येथून सुटका जाल्यास स्वामीचे चरण द्रिष्टीस पडतील तरी मजला पार पाडणार स्वाम समर्थ आहेत + हिसेरसीद बेहेड्याप्रा॥ सिबदी वगैरे व बीज गावगनावार खत आहेत त्याचा ऐवज निशा त्याणी येथे द्यावी नकदीचा सालमजकुरी वसूल काही आलाच नाही तरी तो याप्रा॥ कमीच त्यातही जोरीची सवगणी कार्तिक अखेरीस लागल मार्गशीरसपौशा चालीस पनास हजार वसूल येतो त्यासही घालमेल जाहाल्यास रागडे लोक येक पैसा देणार नाही तूर्त लाख रु॥ रसदेची तरतूद करून हुड्या पाठवाव्या तों हें वर्तमान आले मी गरीब निराश्रित, मला आश्रा स्वामीखेरीज कोण आहे स्वाम विष्णूचा अवतार आहेत, आणि मजवर पहिल्यापासून पूर्ण कृपा आहे मजला या सकटातून काढून चरणापासी स्वामी नेतील सिंदे यासी याप्रा॥ करार ठराऊन द्यावे बहुत काय लिहू लोभ कीजे हे विनंती

☞ Gopal Sambhaji, upon learning that the district of Bhilsa was to be transferred from his management to that of Sindia, makes a most touching appeal to Nana to vouchsafe to him the reimbursement of all the outstanding amounts which are due to the writer on account of his management for the seveal years past

---

*No 211* ] [ 11 November 1782

श्री

सेवेसी गोपाळ सभाजी कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना तागायेत छ ५ जिल्हेज मु॥ किले

भेलसे स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष पा। भलसे हा माहाल सरकारातून सिंदे यासी जाहागीर दिल्ही त्यास सनद देतेसमई आमचे बीज व बाकी व सिबंदीचे हिसे रसीद देणेयाचा करारमदार हुजूर सिंदे याजपासून ठराऊन घेतला आहे ह्मणोन चिरंजीव रा। सदासिव नारायेण याणी लिहिले होते त्यास रा। खंडेराव हरि नि॥ सिंदे याजकडे पा। मजकूरच्या सनदा सिंदे याणी पाठविल्या त्यास ते सुज्यालपुरानजीक येऊन फौज जमा करीत आहेत खेची व उमट व भूपालवाले याची फौज आणावयासी तमाम पत्रे पा। आहेत दाहा पाच हजार फौज जमा करून भेलसे जुजोन घ्यावे ऐसा त्याचा मानस आहे तरी बीज व सिबंदीचे देणेयाची निशा न करिता ते जुजो लागले, तरी आह्मासही जुजणे प्राप्त जाले याजकरिता सिंदेयासी सरकारची ताकीद होऊन त्याचे पत्र खंडेराव हरि यासी निघून जे करारमदार ठरला आहे तेणेप्रो। खोर निशा करून देणे, नाहाक बखेडा न करणे, ह्मणोन देववावे नाही तर जुजणे प्राप्तच आहे दुसरे हिंदुस्थानचे स्वारीचा तोफखाना व जंकिरा आहे येविसी आह्मास दुसरी आज्ञा सरकारची आसावी सिंदे यास असावी की किला तोफा व जंकिरा देवावा ह्मणोन आज्ञा असा (वी) सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Gopal Sambhaji presents to Nana how he was compelled to take arms in self-defence against Sindia's move to take away Bhilsa by force from the writer He appeals to Nana to prohibit Sindia from proceeding to extremities

---

*No 212* ] [ 12 November 1782

श्री

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ ६ जिल्हेज मुकाम नजीक ग्वालेर स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री पाटीलबावा यानी बोलाऊन सांगितले जे राजश्री बलवंतराव धोंडदेव सरकार आज्ञेप्रमाणे आह्मा जवळ सरकारचाकरीस आहेत चाकरी बेउजूर करितात गुता पडत नाहीं, परंतु वोढगस्तीचा प्रकार फारच आहे त्याचे निवारण होऊन चाकरीस पुष्टबल हे खावंदाचे कृपेवर आहे प्रस्तुत इमजाचा तह होऊन प्रांत गुजराथचे महाल सुटले आहेत त्यात पा। बलवाड्याचा (बलसाड ?) माहाल आहे तो याचा यास प्राप्त जाला पाहिजे येविसी आह्मी श्रीमंत राजश्री नाना यास पत्र दिल्हे आहे तुह्मीही पत्र लेहून देणे त्यावरून विनती लिहिली असे व बावानी पत्र लिहिले आहे त्यावरून अर्थ विदित होईल कृपा करणार स्वामी समर्थ आहेत × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev at the instance of Mahadji requests Nana to confer upon Balavantrav Dhondadev some districts in Gujrat in view of the faithful services he was rendering and the distressful condition of his financial affairs

---

*No 213* ] [ 11 November 1782

श्री

यादी तोफखाना किले भेलसे येथे पथराड व किले मजकूर
पथराडापैकी —

फते लस्कर मोठी १ चाळीस सेरी * लाब चौदा हाती तोफ
गणेश सोंड पाच सेर १
महताप साहा सेरी १
गरनाला
१ मलकी
२ पथरगडपैकी

३
मुलूक जत मोठी १ बेचाळीस सेरी तोफ नव हाती
चादबिबी छतीस सेरी १
गरूड जबूर १
दागिने ९ नव
किले मजकूर पैकी
महबूब १ सेर दाहा १ माहालक्षुमी १ लाहान गरनाल १
येकून पाच दागिने येणे प्रमाणे यावेरीज जकिरा दारू गोळी सिसे वगैरे सरजाम आहे

☞ Gopal Sambhaji submits to Nana this list of guns in the fort of Bhilsa, belonging to the Peshwa's Government

* इतक्या वजनाचा गोळा फेकणारी

---

*No 214* ] [ 17 November 1782

श्री

**श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी—**

विनती सेवक गोपाल सभाजी कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना तागायेत छ ११ जिल्हेज मु॥ किले भेलसे स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष पा। मजकूर हा माहाल आपण सिंदे यासी सरजामात दिल्हा सरकारच्या सनदा सिंदे याणी राजश्री खडेराव हरि त्याचेच कमावीसदार याजकडे पाठविल्या त्याणी कारकुनासमागमे सनदाच्या नकला आह्माकडे रवाना केल्या त्या सनदेमध्यें आज्ञा जे, सालमजकुरी बीज व तगाई तुह्मी पा। मजकुरी दिल्ही आहे ते व्याजसुधा व सिबदीचे हिसेरसीदाप्रमाणें ऐवज निघेल तो घेऊन दरोबस्त परगणा ठाण्या सुधा व जगी सरजामसुधा सिंदे याचे हवाली करून कबज घेणे व माहाली बाकी आहे ते दार किती नादार किती त्याची रुजुवात करून दार बाकी असेल ते हे वसूल करून सरकारात देतील ह्मणोन सनदेत आज्ञा ऐशास सन सबामध्यें पावणेदोन लक्ष रुा। रसद सरकारात भरली तो ऐवज सावकाराचा देणे तसाच आहे येथील जमाबदी जेष्टमासी होते उप्रात वसूल होत असतो त्यास आस्वीनमासपासून सिंद्यास परगणा देतात ह्मणोन वर्तमाने रोज येत गेली त्यामुळें पैका वसुलात सुरलीतपणे न आला परगणियात बाकी चालीस पनास हजार पावेतो राहिली तो ऐवज सावकाराचा रसदेपौ राहिला तो परभारा सिंदे वसूल करून सरकारात देतील ह्मणोन सनदेत आज्ञा तरी सावकार ऐवज घेतलियाबेगल आह्मास कैसे सोडतील याजकरिता सेवेसी विज्ञाप्ति लि॥ आहे ऐशास बाकीचा ऐवज रुजुवातीने निघेल तो द्यावा ह्मणोन सिंदे यासी पत्र असावे आणि त्याचे पत्र खडेराव हरि यासी पाठवावयाविसी आज्ञा करावी राजश्री राघो पाडुरग याणी दिवाणगिरी बाबत पाच हजार रुा। सरकारात दिल्हे होते तो ऐवज आपण आह्माकडून त्यास देऊन सन समानचे रसदेत मजुरा पडतील ह्मणोन सनद करून दिल्ही तो ऐवज आह्मी सन समानचे सायेरचे

वसुलांत मजुरा घेतला तो व्याजसुधा यावयाविसी सिंद्यास सरकारचे पत्र सादर होऊन पाच हजार रुा व्याजसुधा सालमजकूरचे वसुलात मजुरा पडत तो अर्थ करावा जगी सामान त्याचे स्वाधीन करणें ह्मणोन आज्ञा परंतु पथरगडच्या थोरल्या तोफासुधा तोफखाना व जंबरा वगैरे सरजाम हिंदुस्थानचे स्वारीचा आहे, त्याची काहीच आज्ञा नाहीं तरी येविसी सरकारचे आज्ञापत्र आसावे दुसरे आपले पत्रात पा भेलसे व खामखेडा आहे परंतु सरकारचे सनदेत पा खामखेड्याचे नाव नाहीं हमेशा सनदपत्र सरकारची येतात, परंतु जमीदाराचे नावे आमचे नावे भेलशाची वेघली व खामखेड्याची वेघली असतात, आणि ह्या संनदेत खामखेडा नाही तरी खामखड्याची, सनद आलाहिदा सादर करावयासी आज्ञा करावी येणेप्रा पत्रें सरकारची असावी ते आली ह्मणजे व बाकीचा व बीज तगाईचा ऐवज व राघो पांडुरग यासी पाच हजार रुा देविले तो ऐवज व्याजसुधा व सिबदीचा ऐवज त्याणीं दिल्हा ह्मणजे परगणा किल्यासुधा त्याचे स्वाधीन करू आणि याप्रमाणे त्याणी न केले तरी सावकार व सिबदी बाहेर येऊ देणार नाहीं तेव्हा जुजणे प्राप्तच जाले याजकरिता स्वामीनी कृपालु होऊन सदरहु लिहिलें आहे त्याचे मनन करून माझी मुक्तता होय ते करणार स्वाम समर्थ आहेत मजला स्वामीच्या पायाखेरीज आश्रा दुसरा नाहीं सिंदे याजकडील खंडेराव फौज जमा करीत आहेत दोन च्यार हजार जमा जाहाले आहेत दाहा हजार जमा होऊन आले तरी चिंता नाही स्वामीचे पुण्यप्रतापे आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Gopal Sambhaji makes a stirring appeal to Nana Fadnis pointing out the several items of past dealings which must be settled before he could hand over the fort of Bhilsa to Sindia Othewise he says he would have to fight Sindia's troops in self-defence

---

*No 215* ] [ 10 December 1782

पौ छ १७ सफर सलास

श्री

### श्रीमत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी—

आज्ञाधारक बाबूराव भास्कर सा नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता मार्गेसीर सुध ६ मुक्काम सिमथर स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विज्ञापना स्वामींनी कृपालु होऊन झाशीचे सुभ्याच्या सनदा पाठविल्या राजश्री माहादजी सिंदे याचा आमचा करार कीं सरकारातून तुम्ही काम करून आणाल त्याची सरबरा आह्मी करून त्याजवरून हुजूरची पत्रे व सनदा त्याजकडेस पाठविल्या ते गोहोदच्या शाहास आटकले होते त्यामुळें आज उद्या करून च्यार मास जाहाले हाली पागा वगैरे सरजाम द्यावयासी सिधता केली थोडक्या दिवसात आमल करून घेतो सिंदे याजकडून कामास विलंब लागला ह्मणून आह्मी दोन हजार फौज ठेऊन स्वार वगैरे सरजाम करून धसाणेच्या घाटावर आलो, तों झासीवाले याही घाटोघाट चौक्या बसविल्या मग आह्मी फौजेचा जोरा करून पार उतरोन आलो त्या सगरोवा ता झासी येथें नजीक मुकाम केले त्याजवरून राजश्री रघुनाथ हरि याही पागा वगैरे सरजाम झासीहून पो. आह्मावर छापा घालावा असा विचार करून रागडे जमीदार यासी कोणास काही गाव देऊ करून आह्मासी गोळी वाजविली आम्हास सरकारची आज्ञा लडावयाची नव्हेती याजमुळे आम्ही टाला देऊन सिमथरेकडे आलो आजपावेंतो च्यालीस हजार रुा खर्च जाहाले झासीवाले याही खरीपाचा आमल घेतला रबीचा वसूल आम्हाकडे आलियास सरकारकामावर पडतील त्यास सिंदे

यासी व रघुनाथ हरि यासी निक्षुणता की (!) पत्रे सरकारची आलियासी कोण गोष्टीचा आडथला होणार नाही हा नक्ष सर्व स्वामीचा आहे झासीस गेलियावर पेस्तर सालापैकीही काही ऐवज हुजूर पावेल × ताकीदपत्रे आली असती तरी काम पूर्वीच होते त्यावद्वानी कृपा करून अवकृपा केली ताकीदपत्रास विलंब जाला आपण येकवचनी ही कीर्त प्रसिद्ध पैका सरकारात करारापा पावेल चिंता नाही कृपा करून ताकीदपत्रास सत्वर आज्ञा जाली पा वरकड वर्तमान चिरंजिवाच्या पत्रावरून निवेदन होईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Baburao Bhaskar to whose management Jhansi had been transferred, reports to Nana how Raghunath Hari the former administrator of the district refused to hand over its possession and had prepared to defend it by force of arms The writer requests a speedy settlement of the disptue From letters of Baburao Baskar and Gopal Sambhaji one gets a clear idea of the disordered and mismanaged condition of the Maratha Govt particulary with regard to district administration

---

*No 216* ] [ 1782

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी—

विनती कीं येथून खलिते पत्रे व शुके पातशाही पाठविले आहेत — वितपसील पत्रे,

१ खलिता श्रीमताचे नावे आफ्राशाहाबखानाचा

२ शुके पातशाही श्रीमताचे नावे

१ खलिता श्रीमताचे नावे गुलाम महमदखान अबदालीचा वकील

२ आपले नावे खलिते

१ आफराशाहाबखान याचा

१ गुलाम महमदखान अबदालीचा वकील

२

१ शाहा आबदाली याची रकम श्रीमताचे नावे

२ शाहा आबदाली याची रकम तीर्थस्वरूप राजश्री पुरुषोत्तम महादेव याचे नावे

९

सदरहू नव पत्रे पाठविली आहेत घेऊन स्नेहविधीची उतरे पाठवावी सेवेसी श्रुत होय हे विनती

☞ The writer [ Hingane ? ] forwards to Nana Fadnis the firmans issued by the Emperor and letters of grandees addressed to the Peshwa

---

*No 517* ] [ End of 1782

श्री

यादी बाबूराय भास्कर सु॥ खलास समानीन मया व अलफ

१ फाजिलांचे यैवजी अडीच हजार रुपयाची वरात मडल्याचे यैवजी बाळाजी गोविंद याजवर व रघुनाथ हरि ता झासी याजवर अडीच हजार येकूण पाच हजाराच्या वराता दिल्ह्या परतु यैवज ते देत नाहीत वराता आज दोन वर्षे फिरतात तो यैवज देवावा व आलिकडे स्वामींनी कृपा केली यामुळें वीस पचवीस हजाराचे पेचात आलो केवल प्राणासी गाठ आहे हिंदुस्थान प्राती वक्र § व पत होती ती गेली बरे दैवयोग दाहा वर्षे ता मजकूरचा रुपया सरकारात येत नवता या पर्यायेकरून तरी ऐवज आला आल्प द्रव्य व श्रम न करता स्वामींनी त्याजवर कृपा केली आस्तु आमचे प्राण वाच विल्याने स्वामीस श्रेयस्कर आहे, तरी पहिल्या वराता फिरल्या, तो यैवज व आलीकडे जे मर्जीस येईल तो यैवज कृपा करून नख्त देवावा

१ आबाजी बाबूराव यास आज दोन वर्षे सरकारातून खर्चास काहीच पावले नाही व ससारास उपजीविका दुसरा हिंक × काडीमात्र नाही पुण्यातील सवसार दोन तीन वर्षांत अन्नवस्त्राचे देणे फार जाहाले आहे अत पर अबरू राहात नाही उपेक्षा न करावी कृपा करून मागील लढा तुटे व पुढे सा च्यार महिने विनती करावी न लागे यैसी खर्चास देवावयाची आज्ञा केली पाहिजे

☞ Baburav Bhaskar implores Nana Fadnis to intercede in his behalf and save him from the utter financial ruin which was threatening him

---

*No 218* ] [ End of 1782 ?

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी—

विनती ऐसीजे भूपालवाला पठाण यानी च्यार घोडे व काही वस्त्रे येणेप्रमाणे पाठविली आहेत पत्रात काये मजकूर लिहिला आहे हे काही समजले नाहीं व रवलोजी सिंदे साबाजी सिंदे याचे नातू दोन हजार स्वारानसी चाकरीचें उद्देशेकरून आले आहेत याची आस्ता विशेष नाहीं परतु भोये धरून पडले आहेत + अद्यापि हजरी गणती होऊन रोजमुरा चालू जाला नाहीं याप्रमाणें आहेत बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती

☞ Nana Fadnis is advised of the affairs of the Nabab of Bhopal and of Ravlogi Sinde

---

*No 219* ] [ Early 1783

श्री

विज्ञापना यैसीजे तुह्मी राजश्री विठल नारायण यास बऱ्हाणपुरी सनगाची फर्मास सागोन पाच हजार रुपयाची वरात बराणपुरावर दिल्ही त्यापैकी येक हजार रुो पावले बाकी च्यार हजार रुो पाववयाचे राहिले यामुळें सरकारचे सनगास अडथला पडला आहे पैका पदरी पडल्या विना सणगे तयार होत नाहीत याकरिता कमाविसदारास ताकीद पाठऊन यैवज पदरी पडे ते करणे पनास हजाराचे कापड लग्नाकरता बऱ्हाणपुरी येणे, त्यापैकी कमकसर वीस हजाराचे आलें

---

§ वाकडेपणा, धाक × हिंक=हिम्मत, आधार. + भुई धरून पडणें, = निराश होऊन बसणें

बाकी लौकर येई असी ताकीद करवणे ह्मणून आज्ञा सादर जाहली यावरून राजश्री पाटीलबावासी बोलले त्यानीही राजश्री विनायक विठल कामदार शहर मजकूर यास ताकीद केली आहे परंतु प्रस्तुत शहरचे मामलतीची घालमेल येथून होणार यामुळें विनोबासी निश्चूण बोलता येत नाहीं मामलतीचा ठराव आठा पधरा रोजात जाहाला ह्मणजे कमावीसदारास निक्षूण ताकीद करवितों × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Mahadu informs Nana through Naro Shivdev that he would shortly arrange to have the required clothes prepared at Barhanpur as requested by Nana for the marriage of the Peshwa

---

*No 220* ] [ 8 April 1783 ?

श्री

स्मरणार्थ यजमान स्वामीजवळ बोलावेयाचे कलमे छ १५ जमादिलावल

सिंदे यानीं इग्रजासी सध्या राजकारण कबूल न केल्यास इग्रज हिंदुस्थानचे सस्थानिकास आगर पाछाहासी सधान करितील त्यास हिंदुस्थानात मातबर सस्थाने जयनगर व मारवाड त्याची उमेद इग्रजास सामील करोन घेऊन दुसरे राज्य मेलवावे ही दिसत नाहीं आहे ते रक्षावे कारण त्यात पैकेकरी कोणी नाहीं, व इतमाम हिमतीचेही कोणी नाहीत आणि सध्या ते सरका राशी दुशमिर्नात आहेत, तेव्हा आमच्या दुशमानाचे साहित्य मदत इग्रज आजच तहात आतर पाडोन करीत नाही राहिले पाछाय त्यास पाछायतीचा बदोबस्त करोन इग्रजास फल नाहीं तूर्त सिंदे यानी जमाव पाडोन आपली जरब रक्षावी आलीकडे कोणी येत नाही असे दिसतें

टिपू इग्रज येक जाले तर कसें याचा विचार हिंदुस्थानात टिपूची जरब इग्रजावर थोडी बहुत तूर्त आहे याजवर त्यास अधिक दौलत होऊन वाढावे हें मानस इग्रजाचे नाहीं कसाही त्यास तोडावा, त्याची कुमक करील तेव्हा सर्वांस जरबेत आनोन टिपू प्रबळ जाल्याने इग्रजाचा परिणाम काय? त्यात टिपू बदमामली, त्याचा इतबार इग्रजास सर्वथैव पडावयाचा नाही आणि त्याचे वाढणेयाचाही इग्रजास सतोष नाहीं त्यासी मिळोन कुमक करणे हा मनसबा दिसत नाही

तूर्त सिंदे यानीं हिंदुस्थानात आब गमाविला आहे, याजमुळे हरतजविजेने हिंदुस्थानचे सस्थानिकाचे पारपत्य करण्यासाठी साधने मनात आणितील, त्यास गनिमी जमावाने काम होईल तें होऊ इग्रजाचे मदतीने बदोबस्त नलगे याचा केवळ आज खोलबा आहे असेही नाही भाऊसाहेबामागे रावसाहेबानी आपला इकडील बदोबस्त सारा जाल्यावर हिंदुस्थानात फौजा पाठविल्या तसे आताही विलबाने जाल्यास चिंता नाही १

इग्रजाच्यानें सिंदे याचा कुमक करोन दरोबस्त सस्थाने मोडवत नाहीं व दरोबस्त मोडोन टाकावी यात पाछायाची मर्जीही नाहीं सध्या इग्रज कुमकेचा लोभ दाखवील, पुढे सस्थानिकाच्या बऱ्यावाचेही सधान तोच रक्षील आजच सर्व दौलत हातीं लागत्ये असे घडत नाही

हिंदुस्थानचा बदोबस्त सिंदे यानी इग्रजास घेऊन करावा आणि टिपूचें पारपत्यासही इग्रज षरीक, माध्यस्त सिंदे, मसलत टिपूची, यातील विचार बहुत वाकडे दिसतात आधीच इग्रज त्यात अनुपान सिंदे यातील बारीक विचारे सर्व आर्थ ध्यानात आणोन कर्णे ते करावे

इतक्या समधापेक्षा न जाले राजकारण तरी पुरवलेंसें वाटतें १

इग्रजास सध्या सशय फरासीस टिपूचा वाढला आहे याजमुळे सध्या मसलत करणे कदा चित तर कुमकेच्या लोभानें पत प्रधानासी मात्र करील दुसरेकडे सधान लाऊन पेशवे यासी बिघाड याच्यानें होत नाहीं तसेंच टिपूसी सधान स्नेहाचे करीत नाहीं

येथें वकिलास सूचना माध्यस्तानी केल्यास तेथीलही जावसाल बिघडील ह्मणावें तर याने इकडील मजकूर बोलण्याचा दाहा वेळा या मागेच लि॥ आहे सिंदे याजकडील वकिलास कलकते याहून निश्चयाचा जाब येणे तो आजपर्यंत आलाही असेल पुढे नवीन काय लिहितो ? याचे लिहिण्यावर आनमान करणे तर पहिलेच त्याणी उतर हिमतीचे लिहिले असेल आणि सुरळीत लि॥ आसिले तर आता पुन्हा हिमत घेऊन काय लिहितो ? १

सध्या सिंदे यास जावसाल लिहिणे त्यास पर्याय सध्या फरासिसाकडे टिपूचे वकील गेले आहेत, हा सशय इग्रजास होऊन काही टिपूसी आतून सिलसिला गोडीचा लाविला आहे तथाप टिपूकडोन विशेष गोडी पडत नाही त्यास राव पत प्रधान याजकडील तुमचे निखाल सतेचा खातरजमा आह्मास नाही, हे भासवावे या भेदप्रपचाने आपले मिळऊन घ्यावे या राज कारणात आहेत कोणी गुप्तपणे छोटेखानी सिलसिलेयास त्याजकडे गेला आहे ह्मणोन उगेच वर्तमान आल आहे याचा शोध पकेपणे समजावा ह्मणोन शोधाचा पैगाम केला आहे हे खरे खोटे समजावे इतक्यात कलकतेयाहून वकिलाचा जाब आला आसेल तोही समजावा व लेहून पा॥ नतर विचार ठरेल तो लेहून पाठऊ याचे बोलणेयाचा इतबार पटत नाही यात काय जमाव आसतील ते समजत नाही येथेही वकील आहे तो येविसी खुलासा काढीत होता परतु जाब साल इकडील मोघमच आलाप ठेविला आहे हा मजकूर कसा —[ अपूर्ण ]

☞ This is a private memorandum of points prepared probably by Nana Fadnis, preparatory to discussing them with Mahadji Shindia This appears to refer to Maratha undertakings after the treaty of Salbye was concluded

---

*No 221* ] [ 23 May 1783

श्री

पौ छ १४ साबान आर्बा समानीन आषाढ मास

## श्रीगजानन

### श्रीमत राजश्री नाना स्वामी स्वामींचे सेवेसी—

विनती सेवक बापूराव भास्कर कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ वैशाख वद्य ७ मुकाम समथर स्वामींचे कृपेकरून पूर्वपत्र चतुष्टयाच्या अन्वये येथास्थित असों विशेष रा॥ वासुदेवपतासमागमे पत्र पाठविलें तें पावोन सविस्तरे श्रवण जालेच असेल यानतर प्रस्तुत राजश्री रघुनाथ हरि यानी तो मजकूरचा अजमास जमाखर्चाचा इजमहाली करून कारकुनाबरोबर सेवेसी पाठविला आहे, व राजश्री हरिपत तात्याची बारा वर्षांची कारकुनीची × सनवात बाकी व हालसालची कारकुनी मिळोन येक तालुका साल मजकुरी लाऊन देणार यालेरीज बाजीपताचे अतस्त सनवात वोढत आले असेल त्याची निशा देणार, त्यास अजमास पाठवावयास व याच्या कारकुन्याच्या खात्र्या करणें हे इद्रजाल विद्या आहेत माहामत्री आहेत ते अद्रज्याल (जाणता) त जैसे दिलींचें बुरचे लाडू पूर्वी बारा वर्षे जागीर अनभविली तसीच पुढें अनभवावी परतु सिंदेसाहेबाची फौज या प्राती आहे तोपर्यंत आपले केल्याने तगिरी होईल या भयेकरूनच अद्रजालादि कारस्थाने करून च्यार महिने काढावे, पुन तत्रैवेताळ (?) पुन्हा अक्षय व्हावें स्वामीची मर्जी असली तर हरिपताचे कारकुनीची सनवात बाकी व बाजीपताचे अतस्त सनवात, कारकीर्द रघुनाथ हरि, स्वामी आज्ञाकरून देवितील तर आम्ही रोखच देऊ झांसीच्या मामलतीमध्यें

लाभाचा अर्थ सर्वांस समजला आहे परंतु आपण ज्यगत् प्रभु साक्षात नारायणावतार आम्ही आपले सेवक

सेवाधर्म परमगहनो योगिनामप्यगम्य ।

वास्तव देह वा पातयेत् अर्थ वा साधतेत् स्वामीच्या वचनयाशास मालिन्य न व्हावें, याजकरिता आह्मास करणे प्राप्त यमधर्मराज्य याणी असावधपणें सावित्रीस वर दिल्हा की ज्यन्मसावित्री भव त्या वचनास्तव तिचा भ्रतार सजीव राज्यलक्ष्मी सर्वसपत्य देणे आली त्या रीतींचेच आपले देणे वरदान त्रैलोक्यप्रसिध ते गोष्ट प्रसिध अक्षय राहावी हा आमचा भाव कदाचित त्यासच स्थापावे, हेच आपले मानस असल्यास धण्यापुढे सेवकाचा उपाय काये ? बासष्ट हजार रुपये सावकाराचे व सिबदीचे देणे त्यास स्वामीनी कृपालु होऊन झासीवाल्या जवळून बासष्ट हजाराची सावकारी हुडी लस्करचे सावकारावर दर्शनी घेऊन सेवकास आज्ञा करावी हुड्या आह्माकडे येऊन पावत व सिंद्यास येक ताकीदपत्र आह्मास कासीपर्यंत पोचाऊन द्यावें कारण दाहा वीस ग्रहस्त आह्माजवल आहेत काही रघुनाथ हरींचे तालुक्यात राहातात, व काही बालाजी गोविंद याचे तालुकेयात राहातात ते सर्व आह्माबराबर निघतील तेव्हा इद्रासहतक्षकाये स्वाहा ते हे मिलोन करितील याकरिता सिंद्यानी पोचाविल्यास चिंता नाहीं नाही तरी चालीस पनास कुटुबाचा घात जाल्याचे पातक आमच्या मस्तकीं परंतु ज्या प्रभूच्या आज्ञेने आम्ही केले ते पातक न होऊ देणे तिकडे कदाचित जर कृपाच करणे तर अखेर सालास दिवस राहिले आणखी सतावीस या आलीकडे सा पत्रें रघुनाथ हरीस सरकारची व खासगी व सा पत्रें सिंद्यास व खुणेचे पत्र खासगत रघुनाथ हरीस येऊन पावली बर पूर्वदस्ता यैवजाप्रमाणे सर्व गोष्टी घडतील सिबदींची कटकट पडणार नाहीं सर्व पेच उलगडतात पूर्वी माहालचे आकाराविसीं व खर्चवेचाविसीं स्वामीस दस्तायैवजी पत्रें लि॥ आहेत, त्यात अंतर पडणार नाहीं कृपावत होऊन सदा पत्रें अविलबे पाठविलीं पाहिजेत सेवेसी श्रुत होय × जलदी जाल्यास सरकारकिफायत खर्चवेच परभारा साधेल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

आलीकडील वर्तमान तालुके झासी पो महू येथील दुरुदुरुगाव मातबर होता तो रघुनाथ बापूजी याणी मारून लुटून पस्त केला आसाम्या धरून दाड केला व गावची लूट मिलोन सवा दोन लाख रुो घेतले याप्रों तो तालगाव येथील जमीनदार बगराय धरून चालीस हजार दाड घेतला याप्रो तोयात लूट करून खराब करीत आहेत दुरुदुरुचे सावकार व जमीनदार यानी सेवेसी विनतीपत्र लि॥ आहे त्यास अभय पत्र कृपावत होऊन देविले पाहिजे आज्ञा होईल तर सेवेसी येऊन लुटीची वगैरे रुजुवात करून देतील किंवा आज्ञा जालियास राजश्री सिंद्याकडे रुजुवात करितील वरकड मार्गे दुव्यास लुटून पाचा लाखास खराब केलें तें सेवेसी लिहिलेच होते रा रघुनाथ हरि दिवाण यानी पुणियाची आवाई घातली आहे दोन चार महिने आवाईखाली घालून च्यार महिने काढावे हे विज्ञापना

☞ Baburao Bhaskar reports his having arrieved at his last gasp and being compelled to seek resort at Benares and begs Nana Fadnis to save him bv speedy letters of intervention in his case He was recalled to the Deccan by Nana Fadnis See Gwalior Letters No 322

——

§ सनवात = अनेक वर्षांची चालत आलेली हिशेबाची बाकी

*No 222*] [June 1783 ?

श्री

विज्ञापना ऐसीजे छ १२ जाखरचे* पत्र सादर जालें त्यात आज्ञा जे राजश्री पाटीलबावानी सागितले की इंद्रसेन तहाचे जाबसालाकरिता येथें आला माणूस मातबर व शाहाणा व इंग्रजाचा विश्वासु आणि दोस्ती जाली हे मुस्तकिमX चालावी हेंच लक्ष अत कर्णा पासून त्याचे आहे हाली तहाचे कामात मेहनतही फार केली व पुढही उपयोगी पडेल त्याचे मनोगत सरकारातून राखावे यात पुढे मागे उपयोग आहे असे जणोन त्यास खासगत जातीस दोन लक्ष रुपयाची जागीर द्यावयाचा करार केला आहे त्यास सदरहु दोन लक्ष रुपयाची जागा इंगरजाच्या मुलकालगती द्यावी लागते याची योजना सुरत अठाविसीचे तालुक्यातं† करून इंद्रसेनाचे नावे सनदा याव्या याप्रमाणे सांगितले व त्यानींही लिहिले आहे त्यावरून निवेदन होईल ह्मणून लिहिलें त्यास पूर्वीपासोन इंग्रजाचे वकील येऊन तहनामे जाले मागें पुरंदरास इपटेनही आला होता, त्याने तह केला परतु वकिलास काहीं जागीर सरकारातून दिल्ही नाहीं गुदस्ता उदिंग्टिन आला होता त्याचे तर साष्टीसुधा बोलणे होते ते इंद्रसेनाच्यानेही जाले नाहीं इंग्रजाचे तह मुस्तकिम चालणे याचे अनभव पाटीलबावासही आलेच आहेत येथून सुचवावे असें नाहीं असें असता दोन लक्षाचे जागिरीच्या सनदा पाठउन द्याव्या ह्मणून लिहिले त्यास हा तह जाला आहे याप्रमाणे मुस्तकिम इंग्रज चालतात, मुबैकर काही दिकत करीत नाहींत, तहाप्रमाणे निश्चूण चालतात असें पक्के असल्यास गायकवाडाचे मुलकापैकी सरकारऐवजाखेरीज पनास पाऊण लाख निदान लाख खोपावेतो जागा लाऊन द्यावयाचें करावे तह इंग्रजानी पूर्वी केले, त्याप्रमाणे त्यानी कोठे निभावले आहेत ! याकरता लिहिले आहे पक्के करतात असें आहे तरच लाऊन द्यावी त्याच्या चाली काय त्याहाव्या ? आपल काम साधन आहे तर इंग्रजाची यख्त्यारी दूर जाली, विलायतचा हुकूम फलाण्याकडे आला, तेव्हा याचें काय चालतें, असेही ह्मणतील पगडीवाल्याचे दौलतीत खाशापावेतो बोलणी जातात, जाबसाल होतात, वाजवीविसीं शरमही पावतात इंग्रजाचे विलायतीहून काय हुकूम येतात, हे करतात काय व तगिरी बहालीचाही अत लागत नाहीं, असे प्रकार आहेत हैदरखानाची मसलत सेवटास गेली तर इंग्रेज कोणास चैन पडो देत नाहींत, हे अनभव येतील येकासी गोड बोलून स्नेह करून भुलऊन येकास पेचात आणावे त्याचें जालियावर दुसऱ्यास करावे असें करून सर्वाच्या दौलती ते घेणार हा इरादा त्याचा पका आहे पहिलीं पत्रें येत गेलीं परतु इंद्रसेनास जागीर द्यावयाचे कोठे लिहिलें आलें नाही हाली मुस्तकिम तह चालविणार याकरता गायकवाडाचे जागिरीपैकी निदान येकलाखाची जागीर सरकार ऐवजासिवाय द्यावयाचे बोलून लिहून पाठवणे सनदा पाठऊन देऊ ह्मणोन आज्ञा सादर जाली व या अन्वयाचे पत्र राजश्री पाटीलबावासही सादर होते तें प्रविष्ट करून आज्ञेप्रमाणे बोललों उतर जाले की इंद्रसेनाचे मनोगत राखल्यास सरकार उपयोगीच आहे याकरिता हालीं त्यासी बोलून दीड लक्ष रुपेची वसुली जागा त्यास लाऊन द्यावी, याप्रमाणे ठराव जाला आहे पनास पाऊण लाख निदान येक लाख पावेतों गायकवाडाचे मुलकापो सरकारऐवजाखेरीज लाऊन द्यावयाविसींचे बोलून लिहून पाठवावे सनदा पाठऊन देऊ, ह्मणोन श्रीमंतानी लिहिले, त्यास सध्याच गायकवाडाचे मुलकापो जागीर लाऊन देणो ह्मटल्यास ठीक दिसत नाहीं याकरिता इंद्रसेनास सरकारतालुक्यात दीड लाख रुपयाची वसुली जागा लाऊन द्यावी याचा मोबदला गायकवाडापासून सरकारात घेतल्यास चिंता नाही × असे ह्मणतात सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports to Nana Mahadji's request for

---

* 15 May 1783 × कायम, निश्चित † झाशी परगण्यात देण्याची पहिली सूचना होती

a jagir being assigned to D Anderson for the services he rendered by him duing the negotiations of peace Nana in his reply crit cised the strange ways of English policy in emphatic and memorable terms, hesitating to accept Mahadji's proposal

---

*NO 223* ] [ June 1783

श्री

विज्ञापना ऐसीजे छ १२ जाकरचे आज्ञापत्र सादर जाले जे, इद्रसेनास जागीर दीड लक्षाची द्यावयाचा करार याप्रमाणे तेथे राजश्री आपाजीराम यासी वगैरे याजवल बोलण्यात आसता तुह्मी आपले पत्रात दोन लक्षाची लेहून पाठविली यावरून अपूर्व वाटलें ह्मणोन आज्ञा सादर जाली त्यास राजश्री पाटीलबावा बोलले व त्याणी पत्र स्वामीस लिहिले त्या अन्वये मजलाही आज्ञा जाली तेव्हा त्याच्या सागितल्याप्रमाणे लिहिलें दोन लक्षाची जागीर द्यावी लागते असें त्यानीं आपले पत्री लिहिले असता दिढाचा मजकूर आह्मीच मधून ल्याहावा तर तिकडूनही पुढें मागे आह्माकडे शब्द येणार अलीकडे येथील मर्जीची स्थित रीत विलक्षण आहे यामुलें बहुत जपावें लागतें पाटील बावानी सागितले त्याप्रमाणे लिहिले व बजिनस त्याणीही स्वामीस लिहिलें होतें असें असता शेवकाकडे शब्द लाऊन पत्रीं आज्ञा सादर जाह्ली अस्तु पाटीलबावानीं ल्याहावयास सागितले दीड लाख आणि आह्मी लिहिले दोन लाख असें घडलें नाहीं × बोलतात येक व लिहावयास सागतात येक यास उपाय नाहीं आता तरी नित्य ह्मणतात की वकील काय लिहितात हे समजत नाहीं दादासाहेब इकडे आल्यास आह्मी भारी होऊ हे लिहिले आमचेंच स्वामीकडे गेले असा संदेह त्यास जाला आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ See No 231, Gwalior letters, which refers to the same subject as the grant of a jagir to D Anderson suggested by Mahadji and alluded to in this letter

---

*No 224* ] [ Early June 1783

श्री

विज्ञापना ऐसीजे छ १२ जाकरचे पत्र सादर जालें त्यात आज्ञा जे टिपू मियाचे पत्र व त्याचे लश्करात राजश्री आनदराव निंबाजी व गणेश केशव आहेत त्याचे पत्र आलें त्यात लिहिले आहे की छ २१ जावलपावेतो बिदनूर किल्यातील व बाहेरील गोलागोली चालत होती किल्यात मार बहुत बहुत होऊ लागला, तेणेकडून किल्यातील इग्रजाचे लोक बहिमन होऊन टिपूकडे कौल मागावयास येक इगरज पाठविला त्याने येऊन अर्ज केला जे आपणास हत्यारेसुधा जावयास कौल दिल्हा ह्मणजे आह्मीं किला खाली करून देता त्यावर यानी उतर केले कीं आमची मालियत किल्यातील जरजवाहिरसुधा व आमचे चोर तुह्माकडे आहेत ते द्यावे कोडयाल बदर व होनावर वगैरे आमची मकाने तुह्मी घेतलीं ती सोडून द्यावी आणि हत्यारें सोडून जावें ह्मणून सागितलें इग्रजानी हत्यारसुधा जाऊ द्यावे ह्मणून बहुत बजिदी केली परतु उपाय नाही चालला तेव्हा सागितले मुद्दे कबूल करून छ २५ जावली साइकालचा च्यार घटिका दिवस असता इग्रज आपला जमावसुधा बाहेर निघते समई तदूर ( = बदूक? ) व हत्यारे टिपूपुढे ठऊन किल्यापासुन एका कोसावर तलाव आहे तेथे इग्रजास पाहारा देऊन उतरविले येक डेरा दिल्हा भोवता बिकट पाहारा च्यार हजार बार चौगिर्दा आहेत टोपीवाले इगरज दोन हजार पावेतो, त्यात पचवीस तीस

पालखीनशीन व मुख्य जनराल मतीस × नामे इंग्रज आहे यासिवाय तीन च्यार हजारपावेतों बार इतकी जमियत बाहेर घेऊन उतरले किल्ला हस्तगत होऊन निशाण व लोक किल्यावर दाखल जाले प्रस्तुत इकडील बंदोबस्ताकरिता आठ च्यार मुकाम येथें आहेत इकडील बंदोबस्त करून इंग्रजानी करार केला आहे त्याप्रमाणे घाटाखालील कोडयाल बंदर व होनावर वगैरे ठाणी मोकली होऊन पुढे कूच करून चेनापटणाकडे जातों जनराल मतीस याने चौदा कलमाची यादी लेहून दिल्ही आहे, त्यात चेनापटनवाल्याचा सलूख करून देविनों ह्मणून कलम लिहिले आहे याप्रमाणें वर्तमानाची पत्रें छ ११ जाकरी आली राजश्री पाटीलबाबास सागणे इतका जमाव इंग्रजाचा बिदनूरचे किल्यात व साहित्य मुबलग असता टिपूचे मारगिरीपुढें कौलास येऊन कैदेत आले पुढे फरासीस व टिपू येक होऊन चेनापटणावर जावयाचा इरादा आहे हे ईल ते लेहून पाठऊ ह्मणोन आज्ञा सादर जाहाली हें पत्रच बजिनस राजश्री पाटीलबावा यास दाखविले टिपूमिया याणी जुरतीने * इंग्रजापासून बिदनूरसारखी जागा हस्तगत करून आतील इंग्रजाचे सरदार पालखीनशीन पचवीस तीस व मुख्य जनराल व दोन हजार इंग्रज यासिवाय तीन च्यार हजारपावेतों बार येकूण पाच साहा हजार माणूस धरून कैद केले मोठी शर्त केली याप्रमाणे पाटीलबावानीं टिपूमियाचा स्तव केला पुढें फरासीस व टिपूमिया उभयता मिळोन चेनापटनावर जावयाचा इरादा आहे ह्मणोन आज्ञापिले याचे उत्तर पाटीलबावानी केले ते निराले पुरवणीपत्रात विनविलेच आहे त्या वरून ध्यानास येईल × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdeo communicated to Mahadji news reported by Nana from Poona, of the English garrison of Bidnur under Genral Mathews having surrendered to Tipu on severe terms and of the intention of Tipu and the French to attack Madras

---

*NO 225* ] [ 11 July 1783

श्री

विज्ञापना ऐसीजे छ ९ जाखरचे आज्ञापत्र सादर जाले जे राजश्री पाटीलबावानी सागितले की सुजातदौलाचा पुत्र मीर्जा जगली व जाबतेखानाचा लेक गुलामकादर व हाफीज रहमत याचा लेक हुरमतखान रोहिले हे तिघे येथे आले आहेत ही माणसे मातबर प्रसग पडल्यास हिंदुस्थानात सरकारच्या उपयोगी पडतील असे आहे, व अनूपगिरि गोसावी नजफखानाचे पदरीं होता तो हाली मीर्जा सफीकडून जाबसालास आला आहे माणसे थोरल्या उपयोगाची आहेत याचे मनोधारण राखून बाळगून ठेविल्याने प्रसगास उपयोगी पड तील याचे खर्चाचे बेगमीविसी जागाजुगा लाऊन द्यावयाविसी सरकारात ल्याहावें तर तोही प्रकार समजलाच आहे यास येक तोड योजली आहे जे, या प्रांतीं सवस्थानिकानी सरकारची जागा दाबली आहे ती अथवा त्याजकडील नवी सोडऊन तूर्त यास खर्चाचे बेगमीस लाऊन द्यावी येविसीं सरकारची परवानगी आल्यास सस्थानिकापासून जागा सोडऊन द्यावयासी येईल याप्रों बोलले व स्वामीसही पत्र त्याणी लि॥ आहे त्यावरून ध्यानास येईल ह्मणोन लि॥ ते कळलें त्यास ही माणसें प्रसगानरूप आली आहेत मातबर तेव्हा याचे मनोधारण रखावें, प्रसगास हिंदुस्थानात सरकार उपयोगी पडतील याकरता त्याचे खर्चास जागाजुगा नेमून द्यावयाची, त्यास सरकारचा प्रकार तर आपले ध्यानातच आहे याकरता सवस्थानिकानी सरकारची जागा दाबली आहे, ती अथवा त्याची सोडऊन द्यावयाची तोड लिहिली, त्यास सवस्थानिकानी सरकारची

---

× Mathews * मेहनतीनें, धिक्तीनें

जागा कोण कोणती दाबली आहे व नवी सोडवावयाची कोणाकडील त्याचे माहाल व बेरीज लाऊन लिहून पाठवावे ह्मणजे समजोन लिहून पाठऊ ह्मणोन आज्ञा याप्रमाणे राजश्री पाटीलबावा यासही पत्र सादर होते तें प्रविष्ठ केले परतु मागती अद्याप त्याणी या गोष्टीचा उलेख काढला नाही सुज्यातदौलाचा पुत्र मीर्जा जगली यास सावणी तालुका झासीपौ लाऊन देऊन सनद लिहून दिल्ही सावणी दतियेकरानी दाबली होती ती त्यापासून सोडऊन पाटीलबावानी आपले सिक्याची सनद मीर्जा जगली यास करून दिल्ही आहे तालुका झासीचा होय असें समजून त्या कडे दिल्हा याउपर होईल ते मागाहून विनती करीन हाली याविसीं पाटीलबावानी स्वामीस पत्र लिहिले ते पाठविले आहे त्यावरून ध्यानास येईल × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev communicates to Nana Mahadji's replies to the representations of several prominent grandees of Delhi who had come to seek shelter with him, such as Mirza Jangli, Gulam Kadar, Hurmat Khan and Anupgir Gosavi

---

*No 226* ] [ 14 July 1783

श्री

पौ छ ६ रमजान सन आर्बा समानीन ह्या डाक

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १३ साबान मु॥ नजीक किले ग्वालेर स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमाम यथास्थित असें विशेष राजश्री पाटीलबावा याणी ग्वालेर किल्यास मोर्चे लाविल्याचें वर्तमान वरचेवर विनविलेच आहे तोफाची मारगिरी व सुरग लाऊन जागा बहुत पाडली आता मोर्चे वरील दिवाली पावेतों जाऊन पोहचले याउपर हला करावयाजोगी वाट जाली आहे परतु माणूस जाया होईल याकरता च्यार दिवस दम खाऊन जें करणें तें करावे, असा विचार करितात साराश किला लवकरच हस्तगत व्हावा असें आहे होईल ते मागाहून लिहून पाठवीन वरकड इकडील वर्तमान निराली विनतीपत्रें लिहिली आहेत त्यावरून निवेदन होईल × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports Mahadji s efforts to capture Gwalior, which was on the point of falling

---

*No 227* ] [ 19 July 1783

श्री

पौ छ २० रमजान

सेवेसी विनती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १८ साबान मु॥ नजीक किले ग्वालेर स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष छ २९ जमादिलाखरचे पत्र सादर जाले ते श्रिमत राजश्री रावसाहेब याचे लग्नाची सनगे तिवट येक व दोला जाफरखानी येक येकून दोन सनगे तुह्माकरिता पाठविली आहेत घेणे व राजश्री माहादजी सिंदे व त्याच्या स्त्रिया व आबा चिटणीस वगैरे यास पोषाख सनगे पाठविली याची याद अलाहिदा आहे त्याप्रमाणे ज्याची त्यास पोहचती करून उतरे घेऊन पाठवणे ह्मणोन आज्ञा येसियासी आज्ञेप्रमाणे यादीच्या अन्वये पोषाख सनगे राजश्री पाटीलबावा वगैरे मडळी यास पावती करून उतरें घेऊन पाठविली आहेत प्रविष्ठ होतील लग्नाची वस्त्रें सान्यास आली आणि

राजश्री माधवराव गगाधर यास आली नाहींत यावरून भाई वगैरे मडली वस्त्रे घेत नव्हते भाई ह्मणू लागले आमची वस्त्रे माधवराव यास देऊन प्रसग रक्षावा आह्मास नसली तर चिंता नाहीं परतु वस्त्रे माधवरायास आली नाहींत हे बाबास कळल्यावर सतोष वाटणार नाहीं ह्मणतील कीं होळकरानी मना केली आसतील अथवा काय बोलतील न कळे वस्त्रे माधवराव यास न यावयास कारण काय? असा त्याकडे अपराध कोणता आहे? समस्तास आली आणि त्यास येकऱ्यासच आली नाहीत यात ठीक दिसत नाहीं शेवटीं जामदारखान्यातून तुह्मी सनगे विकत घेऊन साऱ्या बराबर बहुमान सन्मान त्याचाही रक्षावा युक्त आहे याप्रमाणे बोलले तदनतर आह्मी विचार पाहिला कीं विस्मरण होऊन वस्त्रे आली नाहीत असें ह्मणावें तर ही गोष्ट कसी घडेल? घडावयाची नाहीं तेव्हा समजूनच आली नाहींत असे असता येथे आह्मी विकत घेऊन द्यावी त्यास वस्त्रास पैका पडेल त्यास चिंता नाहीं परतु सरकारातून आली नसता आह्मी येथे द्यावी हें सामर्थ्य आमचे नाहीं फार जाले तर श्रीमतास लिहून पाठऊ तेथून उतर येईल त्याप्रमाणे करू प्रस्तुत ज्यास ज्यास आली आहेत त्याणीं घ्यावी तेव्हा मोठ्या प्रयासें भाई वगैरे मडळीनी वस्त्रे घेतली × त्यास वस्त्रे यावीं हे सर्वांचे मानस आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev brings to Nana's notice that among the dresses sent from Poona for several persons serving in the north, on account of the young Peshwa's wedding ceremony, none was received for Madhaorao Gangadhar the Holkar's agent The writer begs to be informed whether the omission was intentional

---

*No 228* ] [ 31 July 1783

श्री

पौ छ २० रमजान आर्बा समानीन ह्या डाक

सेवेसी विनती सेवक नारो सिवदेव सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ १ रमजान मु॥ नजीक किले ग्वालेर स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री पाटीलबावा याणी ग्वालेर किल्यास आज च्यार महिने मोर्चे लाऊन किला जेर केलाच होता हालीं छ मजकुरी श्रावण शुध्ध द्वितीया गुरुवारींचे मागील प्रहर रात्र राहाता पाटीलबावा कडील लोकानी हला करून किला घेतला च्यार पाचसे माणूस राण्याकडील लोकानी हला करून किला घेतला च्यार पाचसे माणूस राण्याकडील मारले गेले राजधर कारभारी किल्यावर होता व आणखी दोन च्यार मातबर माणसे होतीं तीं कटून मेली राण्याची धाकटी स्त्री किल्यावर धनी ती दारू पसरून उडून गेली वरकड लोकानी कौल घेतला पाटीलबावाकडीलही लोक ठार जखमी जाहले आहेत, त्याचा तपसील मागाहून लिहून पाठवीन साराश श्रीमताचे पुण्यप्रतापे करून आज प्रथम दोहो घटका दिवसास किला फते होऊन निशाण दाखल जाहाले × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports the capture of Gwalior by Mahadji Sindia The Gohad Rana's wife and followers either fell fighting or killed themselves

---

*No 229* ] [ July 1783

श्री

विज्ञापना यैसीजे छ ९ जाकरचे आज्ञापत्र सादर जाले जे सरकारचा व इग्रजाचा तह ठरला त्यात श्रीमत राजश्री दादासाहेबास दरमाहा पचवीस हजार रु॥ द्यावे, त्याणी स्वस्थ असावें असा करार आहे त्यास कदाचित पुढें दादासाहेबाकडील अधिक उणे बोलणे निघेल तर येकू नये व करावयाचे नाही याप्रमाणें तुह्मी राजश्री पाटीलबावासी पकेपणे बोलून ठेवावे रा॥ केसोपत तेथे गेले आहेत तलेगावावर जाले तसे श्रीमत करा ह्मणतील तर साफ करू नये व येकू नये ह्मणोन आज्ञा सादर जाहाली हें पत्रच बजिनस राजश्री पाटीलबावा यास दाखविलें उतर जाले कीं आह्माकडे तर याप्रमाणे लिहिले आणि सुरतेस श्रीमत राजश्री दादा साहेबाकडे परभारा पुण्याहून पैगाम देसी येण्याचा गेला त्यात कमजाजती बोलणे लाविले आहे, याचा शोध आह्मासही कळला आहे परतु आम्ही तहनाम्याप्रमाणे बोलावे तिकडून परभारा अधिक बोलणे लावावें ह्मणजे इकडील नाद तोडून सहजच तिकडे जाऊ नयेत इकडे यावे असें आमचे गावीही नाही मुख्य इग्रजाच्या घराहून खूल काढून आणावें याकरिता इद्र सेनासी किती वेळ भवति न भवति केली तेव्हा त्याणे आग्रह सोडून सुरत मुबैवाल्यास पत्रें लिहून दादासाहेबाच्या खर्चाचे बद केले ह्मणून त्याणी यावयाचा सदर्भ लाविला मुख्य सर कारचें काम कोणीकडूनही व्हावे याप्रमाणे बावाचे बोलणे जाहले त्यावर हाली दोन तीन खानग्याचीं पत्रें आली त्यात दादासाहेबानीं तिकडे येण्याचा सदर्भ लाऊन गोदातीरी यावें असें राजकारण लाविलें आहे, त्यास ही गोष्ट घडल्यावर फार चागलीच आहे × याप्रा॥ बोलले सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports Mahadji's explanations in answer to Nana's queries that he ( Mahadji ) was never anxious to have Raghunathrao in his own custody and that he was perfectly satisfied if the latter went to Poona direct

---

*No 230* ] [ Received on 5 August 1783

श्री

पौ॥ छ ६ रमजान सन आर्बा समानीन ह॥ डाक

विज्ञापना यैसीजे छ १२ जावलचें पत्र सादर जालें त्यात आज्ञा जे बिदनूर हैदरखाना कडील इग्रजानी घेतले हे पूर्वी लिहिलेच होते आलीकडे बातम्यावरून शोध करता बिदनुरात हैदरखानानी अधिकारी ठेविला होता त्याची व टिपूमियाची चितशुधी पूर्वीपासूनच काहीसी नवती याकरिता त्याने इग्रजाकडे फितूर करून बिदनूर दिल्हें हे वर्तमान टिपूस कळल्यावर आर काटच्या तोंडावर काहीं फौज ठेऊन आपण जमाव सुधा घेऊन बिदनुराजवळ दाखल जाला बाहे रून मोर्चेबदी केली बिदनूर लौकरच घेऊन फिरून आर्काटाकडे जातो ह्मणून पत्रें टिपूची आली बिदनुरात इग्रजाचा जमाव सा सात हजार आहे ह्मणून बातमीत आहे मुसाभुसी फरासीस गुडलूर बदरास पचेतालीस जाहाजानसी येऊन खुषकीस उतरला त्याबराबर पाच हजार गोरा खुषकीस उतरला आहे बाकी तीन च्यार हजार गोरा मागाहून उतरणार याप्रमाणें टिपूचें लिहिलें आलें आहे व फरासीचा वकील येथे मुसा मुतर्ण आहे त्याचेही लिहिलें आलें आहे व दुसऱ्याही दोन तीन बातम्या आल्या टिपूने आपले वकिलास पत्रें लिहिलीं आहेत त्यात बिदनूर जलदीनें घेऊन आर्काटाकडे जाऊ, फरासीस आपण येक होऊन चेनापटणास लागून चेनापटण घेतो यासमई

श्रीमतानींही इग्रजास ताण बसवावा याप्रमाणें विस्तारे लिहिले आहे हें वर्तमान सविस्तर राजश्री पाटीलबाबास सागावें पाच महिने हैदरखानास मरून जाले चेनापटणास इग्रजाचा भारी जमाव असता दबूनच आहेत त्यात हाली फरासीस येऊन टिपूस शामील होणार एक बिदनूर मात्र इग्रजानी फितुरानें घेतलें तेही टिपू आपले हिकमतीनें घेणार आणि चेनापटणाच्या इग्रजाचें पार पत्य करणार तेव्हा सरकारचा व इग्रजाचा तह ठहरला, त्याप्रमाणें टिपूस इग्रजाचा मुलुक व पाडाव सोडून द्यावे हे लिहिले असता व बोलले असता केवळ आइकले असे दिसत नाहीं तेव्हा पुढें मसलत करावयाची त्यास फरासीस व टिपू येक त्याचे दारमदारही आतून पके जालेच असतील याचा विचार कसा हेंही पुसून लिहून पाठवणें × येविसीचें बोलणे जाले तो मजकूर अलाहिदा पुरवणीस लिहिला आहे, त्याजवरून विदित होईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev receives news from Nana Fadnis of the threatening combination of Tipu and the French and seeks Mahadji's advice for preventing any evil consequences The writer sends the reply separately in a supplement

---

*No 231* ] [ Received on 5 August 1783

श्री

पौ छ ६ रमजान आर्बा समानीन हा। एक

विज्ञापना ऐसीजे छ २२ जावलचे आज्ञापत्र सादर जाले इग्रजाकडील सरदार च्यार पाचसे माणसानसी जाहाजात बसोन मचैहून जात असता धुळपाची त्याची गाठ दर्यात पडली इग्रजासी सलूख जाला हे वर्तमान धुळपास कळले नव्हते सबब लडाई मोठीच तेथे जाली इग्रजाचीं जाहाजे पाडाव करून आणिली त्यात सरदार व माणसे धरली आली त्याउपर मचै कराचे पत्र सरकारात आलें कीं राव सिंदे याचे मारफात सलूख जाला असे असता धुळपानी इग्रजी जाहाजे व सरदार पाडाव करून नेले ते सोडून देवावे त्याचे उत्तर इकडून मचैकरास गेले कीं तह जाल्याचा मजकूर राव सिंदे याणीही सरकारात लिहिला, परतु कितेक तहनाम्यातील शर्तो नमूदास येणे आहेत, त्या आल्यानतर सरदारही सोडले जातील सरकारात सरदार आले ते आपल्यापासीं आहेत असे जाणावें याप्रो जाब दिल्हा हे फचे वर्तमान पाटीलबाबास कळावे सबब लिहिले असें तरी सदरहु मजकूर पाटीलबाबास सागावा ह्मणोन आज्ञा यैसियासी हें पत्र आल्यापूर्वी दोन दिवस राजश्री पाटीलबाबास वर्तमान जाहाजे पाडाव करून नेल्याचे इद्रसेनाने सागून पाठविलें होते त्यावरून मर्जी बहुत खटी होती आम्ही तर ब्रह्मावर्तास गेलो होतों चिरंजीव पाडुरग रघुनाथ लस्करात ठेविला होता त्याकडून पाटीलबाबानी स्वामीस पत्र लिहिविले व त्याणींही लिहिलें परतु त्या दिवसात आठ पधरा रोज मर्जी ठीक नव्हती मोठा कडाड होता सबब हा मजकूर त्यास सागितला नाहीं या पत्रातही जाबसाल तीक्ष्ण लागावयाजोगा होता याकरिता मागाहून दुसरे पत्र येईल तेव्हा दाखऊ असें ह्मणून दाखविलें नाहीं त्यावर अलीकडे येक दोन पत्रें स्वामींकडून सादर जाली त्यात जाहाजे व जाहाजावरील लोक दस्त केले होते ते सोडून देविले ह्मणोन आज्ञापिले तीं पत्रेंच पाटीलबाबास दाखविली तेव्हापासून थोडकासा त्यास सतोष वाटला नाहीं तर केवळच मर्जी गेली होती यामुळें रवानग्याचे जाब देखील उत्तरे प्रत्युत्तरें घड होईनात याकरिता दिवसगत लागली × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev writes to Nana Fadnis informing him of the severe irritation which Mahadji felt at the news of Dhulap

having captured English vassels and taken several English men prisoners after the treaty was concluded They were however released subsequently

*No 232* ] [ After 4 August 1783

श्री

विज्ञापना ऐसीजे श्रीमत राजश्री दादासाहेबाचे राहाणे कुमारीस जाले प्रायश्चितही × केलें ही पुरवणी राजश्री पाटीलबावानी पाहून आह्मास लेहावयाविसी सांगितलें, श्रीमतास कुमारीस ठेविले हे उत्तम केलें करार मदार परस्परे वर्तणुका कसकशा कराव्या त्याचे डौल चालवावयाचा ठराव कसा जाला, कुमार्ग सुमार्ग कोणता चालेल असींच सर्व कृत्यें याचा विचार शुभाशुभाचा केलाच असेल आह्मास कळले पाहिजे श्रीमत सौभाग्यादिसंपन्न मातुश्री आनंदीबाई यास चिरंजिवासहवर्तमान पुण्यास न्यावेसे ठरलें ह्मणोन ऐकतों तर ही गोष्ट सहसा न घडावी येका वाड्यात राहिल्यानें कोण समय कसा येईल कळत नाहीं राजश्री नानानी हा विचार केलाच आसेल तथापि थोरली गोष्ट आहे बुधीस अंतर करू नये या अर्थे आह्मी लिहिले आहे तुह्मीही लेहून पाठवावें त्यावरून विनंती केली असे × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev communicates to Nana Mahadji's advice not to remove Anandibai to Poona and allow her to live at the same palace where the Peshwa was staying, as their neighbourhood would be dangerous to the Peshwa's life

*No 233* ] [ 12 October 1783

श्रीगजानन प्रसन्न

पौ छ ३ जिल्हेज आर्बा समानीन

सेवेसी विनंती सेवक नारो शिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १५ माहे जिलकाद मुकाम नजीक किले ग्वालेर स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष छ १० शवालची आज्ञापत्रें सादर जालीं त्याबरोबर टिपूमियांचे थैलीपत्र व नूर महंमदखान याचा लाखोटा राजश्री पाटीलबावा यास त्यासहवर्तमान पोहचोन थैली व नूरमहंमदखानाचा लाखोटा व स्वामींचें पत्र पाटीलबाबास पावती केली त्याचे जाबसाल व्हावे तर इंग्रज मिंडेस राहिले सबब जाबसाल जाले नाहींत कलकत्याहून करनेल पापनसाहेब आला तो मिंडेस इंद्रसेनाजवळ पावला इंद्रसेनास समाधान नवते सबब सारेच तेथे होते आता इंद्रसेनास समाधान जाले त्यानें लेहून पाठविले जे आह्मी ग्वालेरचे मुकामास पापनसहवर्तमान येतों. त्याप्रमाणे त्याची प्रतीक्षा आहे ते येऊन जाबसाल होतील, ह्मणिजे पाटीलबावास जाब मागू देतील ते रवाना होतील × सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports to Nana that Mahadji would give his answers to the letters from Poona after he had talked with D Anderson and Popham who were shortly going to visit him near Gwalior

× The penance was performed on 4 August 1783

*No 234* ] [ 22 October 1783

श्री

१ पौ छ १४ जिल्हेज आर्बा हा। डाक ( हस्ताक्षर नाना फडणिस )

सेवेसी विनंति सेवक नारो सिवदेव सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २५ जिलकाद् मु॥ ग्वालेरीहून पूर्वेस दोन कोस गोहदेचे सुमारे मुरारनदी, स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री पाटीलबावा यांणी ग्वालेरचा सुभा राजश्री खंडेराव हरि याजकडे सांगोन किल्याचा बंदोबस्त त्याकडे सोपून गोहदेकडील तरतुदेकरिता मुकाम मजकुरी येऊन राहिले आहेत राणा गोहदेत आहे याउपर मसलतीचा विचार कसा टरतो तो ठरल्यावर मागाहून लिहून पाठवीन वरकड सविस्तर निराली विनंतीपत्रे विनविली आहेत त्यावरून निवेदन होईल × सेवेसी श्रुत हे विज्ञापना

☞ Naro Shivdev writes to Nana informing him that Mahadji had arrived at Gwalior for the purpose of proceeding against the fort of Gohad

---

*No 235* ] [ 1783 ?

श्री

विज्ञापना ऐसीजे श्रीमत राजश्री पाटीलबावाकडून राजश्री येशवतराव वाबळे वस्त्रें घेऊन जयपूर प्रांतीं गेले होते तिकडे जाऊन जयपूरकराची येक गढी होती त्यात सिरले त्यावर जयपूरकरानीं सांगोन पाठविलें कीं तुह्मास जिकडे यावयाचे असेल तिकडे जाणें गढी आमची सोडून देणें असें पाच सात वेल सांगोन पाठविलें असता ऐकिलें नाहीं गढी सोडल्याची आहे मी सोडली होय असें जयपूरकरास सांगोन पाठवीत त्यावरून त्याणी चार पाच हजार फौज पाठऊन येशवतराव वाबळे याचा गोट हजार पाचसें लुटारे पेंढारी जमा होते ते झाडून लुटले खासा येशवतराव व त्याचे दोघे पुत्र याखेरीज आणखी सापडले ते धरून जयपुरीं नेले याप्रमाणें कोट्याहून वर्तमान श्रीमत राजश्री पाटीलबावाकडे आलें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ News received from Kotah by Mahadji is forwarded by Naro Shivdev to Poona to the effect that Yashvantrao Wable, a commander in Sindia s army, was deputed to Jaypur with some dresses to be delivered, he was taken prisoner by the authorities of Jaypur

---

*No 236* ] [ Received 27 January 1784

श्री

पौ छ ४ रावल आर्बा

विज्ञापना श्रीमताची पत्रें सुज्याउद्दौलास राजश्री गोपालराव गोविंद याचे विद्यमाने गेली आहेत अतरवेदी ग्वालेर झासीस उमेदवार करून कुमकेस यावे ह्मणोन लिहिलें आहे ऐशास वजिरानी नियत बदलून अमल उठविलाच आहे मालव्यास सुभेदार करून पाठविला तो ग्वालेर प्रतापपलीकडे आलाच आहे श्रीमताचाही आश्रय गेल्याने दस्तावेजच जाहाला यावरून वजिरास उमेद वाटली त्याचे मानस या करारप्रमाणे कारभारी यानी मुदे कबूल केले तर श्रीमताची कुमक न करावी मुतसदी मुदे कबूल न करीत तर श्रीमताची कुमक करावी ऐसे वर्तमान आले आपणास

कळावे ह्मणून लिहिले असे + सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना झासी प्राते वगैरे सरकारअमलात गडबड फार जाली आहे राजश्री रघुनाथ हरि व बाळाजी गोविंद यांचीं पत्रे हमेश येका दो दिवसा आड या सरदारास येतात तो तपसील कोठवर ल्याहावा हे विज्ञापना

☞ Naro Shivdev informs Nana of a rebellious movement in Bundelkhand intended to put down the Maratha power, and of the letters received by Mahadji from Raghunath Hari and Balaji Govind to that effect

———

*No 237* ] [ 20 July 1784

श्री

विज्ञापना ऐसीजे छ २ रमजान पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष

रामपुरकर प्रिथिवीसिंग याचा बधु सालुमुदस्ता कोदरूकुवर धरून आणून कैदेंत ठेविला होता त्यास सोडवावयाकरिता फदफितूर किल्यात सिबदीसी करून सोडून न्यावा बाई दान महिने बाहेर होती किल्यात लेकवला सटवाजी होता रामपुऱ्याकडून घोडी १ व भील दोघे सधानावर आले होते हे वर्तमान किल्यात सटवाजी होता त्यास कळलें त्याणे ते भील व घोडी सुधा धरून आणले दोघास हास्तीचे पाई देऊन मारले गावचा पुरबिया भेदला होता तोही हस्तीचे पाई देऊन मारला कोदरूकुवर त्यास बाईनीं परवानगी पाठऊन मारून टाकले याप्रमाणे हस्तीचे पाई देऊन च्यार माणसे मारली कलम १

बापूजी माहादेव हिंगणे बुदीस होते समागमे तुटुबे व गणपतराव त्याचे चिरजीव होते त्यास बापूजीराव यास समाधान नव्हते त्याकरिता काल जाहाला गणपतराव बुदीस उतरेकडील शाहा फिरगी श्रेह जाहाला फिरगियाणी सा पलटणे दिलीस रखवालीस रवाना केली आहेत राजश्री पाटील बावाकडून राजश्री सदाशिव मल्हार फिरगियाकडे गेले आहेत ते येतील तोंपावेतो माघारे पाटीलबावा फिरत नाहींत ऐसे वर्तमान ऐकिले ते सेवेसी लिहिले असे कलम — १

इकडे प्रजन्य नाबूद गेला मृगनक्षत्राचा प्रजन्य जाला तितकाच पुढे येक मास प्रजन्य नाही माहागाई जाली आहे वैरण मिळत नाही पुडे श्रीकृपा करील तें खरे कलम — १

येकून कलमे चार आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev reports the rebels at Rampura having been punished and, the illness and death of Bapuji Mahadev Hingne at Bundi

———

*No 238* ] [ January 1785

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी —

विनती ऐसीजे छ १५ सफरी पातशाहास सिकारीस घेऊन गेले होते सिकार जालियावर येकसे येक मोहोर नजर केली पातशाहानी सरचस्ता पागोटे बमये गोशवारा व दुकेसी तुरा व दाना केशाचे आस्तराचा शालेचा कुडता दिधला व छ २३ तारखेस पातशाचे येथे आफराशाहाब खानाकडील जमीचे जाबसालासाठीं गेल होते त्यासमई बदूक चालवावयाच्या गोष्टी निघाल्या

त्याजवरून यानी आरशात पाहून पाठीमागे भाल्यावर नारगीचे निशान लाविले त्या च्यार निशानें गोळीनें चौवाराने पाडली १ पातशाहा बहुत खुशाल होऊन सरबरता पागोटे बमये गोष वारा व किनखापी कुडता व शालचा पटका येणेप्रमाणे दिधला वरकड लोकास खिलत वगैरे पात शाचे येथून व रो पाटीलबावाचे येथून आले आहेत ते वर्तमान यैकबारा पारसी पाठविल्या आहेत, त्याजवरून श्रुत होईल बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती

☞ Mahadji's visit to the Emperor near Agra is reported to Nana Fadnis An interesting reference to Mahadji's skill in shoot ing is added

---

*No 239* ] [ 24 June 1785

श्री

रामचद्र वा ब्याहारी कासीद दिलीहून शाहा इमानुद्दीन फकीर याजकडून पत्रे व मेवा वगैरे तबरूक * आजुऱ्याने + घेऊन आला त्यास आजुरा सुा सीत समानीन २५ रुो पचवीस रुो छ १६ साबानी पावले असेत

☞ A present of Rs 25 was paid to a special messenger sent from Delhi to Mahadji

---

*No 240* ] [ 21 November 1785

श्री

यादी गीर्दनवाई × छ १८ मोहरम सोमवार सीत समानीन तुकोजी होळकर याचे लष्करचा मुकाम मौजे वानवडीनजीक आजतागाईत होता हाली आज प्रातकाली कूच जाहाले मौजे हडप सरानजीक वोढ्याचे पाण्यावर मुकामाची जागा नेमली आहे, तेथे मुकाम होईल खासा स्वारी नवघटका दिवस आल्यावर मुकामास जातील यैसे आहे

☞ Tukoji Holkar who had encamped at Wanavdi removed his camp to Hadapsar

---

*No 241* ] [ Probably 1786 ?

श्री

विज्ञापना राणेखानभाई काही रोगामुळे निरोप घ्यावयास बावाजवळ गेले तेसमई राहाऊन मग बावा त्याचे राहोटीस जाऊन त्याचे समाधान करून पूर्ववत कार्यभागात आहेत सेवेसी कळावे यास्तव लिहिले आहे त्याचा विचार आहे की येक पुत्र स्वामीपासी ठेवावा येविसी व त्याचे जावई साहेबखान टोके याजविसीच्या बदोबस्ताविसी पूर्वी सेवेसी विनती लिहिली आहे व राजश्री रामजी पाटील यास सविस्तर लिहिले आहे त्यानी विनती केला असेल त्यास राजश्री चिमणाजी खडेराव यानी इकडे येऊन हिसेब समजाऊन यावा येविसी ताकीद त्यास व्हावी व भाईवर दृष्टी देऊन तोशीस माफ जाली पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Shivdev requests Nana to secure the adhesion of

---

* Tabarruk— consecrated gifts for a saint's shrine or from the Emperor + आजुरा—Wages of a day labourer × कोटाचें सरक्षण

Ranekhan Bhai, who out of anger with Mahadji was preparing to leave him, but was afterwards conciliated and restored to his former offices by Mahadji

---

*No 242* ] [ 1786 ?

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी—

विनंती ऐसीजे राजश्री पाटीलबावानी आपले मुत्सद्यापासून च्यार लक्ष रुपये घेतले बि तपसील —

| | |
|---|---|
| १ सदाशिवपंत फडणीस | १ भवानी शकर पोतनीस |
| आसामी | |
| | १ राघोपंत दप्तरणीस |
| १ मोदी | |
| | १ मुजमदार कृष्णाजीपंत |
| १ कृष्णाजीपंत चिटणीस | |
| ३ | ३ |

सदरहू सा आसाम्या मिळून चार लक्ष रुपये घेतले व लस्करात खर्चाची ओढ ह्मणून सदासिवपंत फडणीस व भवानी शंकर पोतनीस यास उजेनीस रवाना केले आहेत की तेथे ऐवजाची तरतूद करून लस्करात ऐवज पावता करावा ह्मणोन रवाना केले आहेत × ते ग्वाल्हेरीहून आपली कुटुंब घेउन पुढे उजेनीस जाणार ह्मणून श्रवणात आले त्याजवरून विनंती लिहिली आहे बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती

☞ Nana Fadnis is informed that Mahadji had borrowed 4 lacs from his officials for easing his own financial stringency

---

*No 243* ] [ June 1786

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी

विनंती ऐसीजे रो आबाजी इंगले याचे बधु विठोजी ईगले याजसमागमे फौज व पलटणे मिळून दोन हजार जमावानसी जैपुराकडे रावराजा प्रतापसिंग याजपासी पाठविले आहेत जात समयी सोन्याचा कडीजोड वस्त्र ५ येणेप्रमाणें देऊन विदा केले रावराजा व नजबकुलीखान व हे फौज येकत्र होऊन जैपुरकरावर दबाव घालून मामल्याचा पैका वसूल करून घ्यावा जर त्यानी पैका न दिल्हा तर त्याचा मुलूक जप्त करून आपली ठाणी बसवून पैका वसूल करावा याप्रमाणे कार * ठरला आहे पुढे प्रत्यास येईल ते विनंती लिहू जैपूरकरानींही तूर्त पचवीसा हजाराची हुंडी पाठविली आहे व कोन्ही त्याजकडील कारभारीही जाबसालास येणार आहेत ह्मणूनही वर्तमान आहे बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती

Vithoji Ingle is deputed by Mahadji for the recovery of his claimes upon Jaipur

---

* करार ?

*No 244* ] [ After 16 June 1786

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी —

विनंती ऐसीजे जैपूरचा मामला तिरसष्टि लक्षाचा मागून बाकी चालत आली होती ते व गुदस्ता तेवीस लक्ष ठैरले होते त्याची बाकी येकूण कुल तिरसट लक्ष ठैरले त्यापैकी येकवीस लक्ष रुपये रजपूत सरंजामी राज्याचे भाऊबंद आहेत त्याजवर देविलें, व येकवीस लक्षा रुपयाचे माहाल लाऊन दिधलें, व येकवीस लक्ष रुपये नख्त देणे करार, त्यापैकी आकरा लक्षाचा भरणा नख्त सात लक्ष रुपये व जवाहीर तीन लक्ष रुपये व हाती घोडे पशमीना किनखाप वगैरे किरकोळी कापड लाख रुो येणेप्रमाणे आकरा लक्षाचा भरणा करून दिधला बाकी दाहा लक्ष रुपये राहेले त्याचा सा महिन्याचा करार, त्यापैकी तीन महिने गुजरले, बाकी तीन महिन्यानी दाहा लक्षाची बेबाकी करून द्यावी ह्मणून करार याप्रमाणे मामलत फडशा होऊन दाहा लक्षाचे व रजपुताकडे येकवीस लक्ष, यात हसिलीस व येकविसा लक्षाचे प्रगणे आहेत, त्याचे माफजतीस रुो रायाजी पाटील पाच पलटण व पाच हजार फौज बमये × नजबकुलीखान व रावराजा यास जैपूर प्राती ठेविले आणि आपण व पातशाहा कूच करून डिगस* आले नजबकुलीखान व रायाजी पाटील व बोहरा खुशालीराम व महत बालानद वगैरे सरदारास वस्त्रे हती च्यार व घोडे ८ व जेगे सिरपेच जोड दाहा व मोत्याच्या कठ्या च्यार येणेप्रमाणे बहुमान देऊन जैपुराकडे बिदा केले आहेत ज्याप्रमाणे करारमदार ठैरला आहे त्याप्रमाणे वसुलात आला तर उतम आहे जर यात आतर पडेल तर विजेया दशमीचे मुहूर्तेकरून पुन्हा जैपुराकडे स्वारी करावी आणि राजे पृथ्वीसिंग याचा पुत्र मानसिंग यास राजी बसऊन मागील पैक्याचा फडशा करून घ्यावा, आणि पुढे सरकारची नजर व मामल्याचा पैका सालाबादचा घेणे त्याजकरिता सरकारचे दरकदार व फौज ठेऊन राज्याचा बदोबस्त आपले काबूत ठेवावा याप्रमाणे सला ठैरली आहे पुढे आमलात येईल ते विनती लिहू बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती

☞ Appaji Ram's letter to Nana Fadnis from Mahadji's camp, describing Mahadji's claimes on Jaipur and the arrangements agreed upon for realising these dues and his plan for the future control of that kingdom

---

*No 245* ] [ 7 October 1786 ?

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी—

विनंती सेवक बाबूराव भास्कर + साष्टाग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। छ १४ जिल्हेज मुा पाछापूर यथास्थित असे विशेष टिपूकडील फौज सैदसाहेब व लाली वगैरे व स्वार कुसुम (तुरुक?) सोला हजार व स्वार दोन हजार, तोफा येकवीस ऐसे छ [ १ ] रोजी तेगूरचे आलीकडे आमचे सिवेत मुकाम करून सारी फौज व तीन तोफा येऊन तेगूरवेसीजवल चालून आले जुज जालें उपरात ते माघारे गेले परंतु बाहेर निघोन नित्य जुज होते चवथे दिवसी येऊन गोल्याचे मारात ढाला दिल्ह्या डेरे मारच खाऊन दिल्हे दिवसभर जुज जालें दाहावे तारिखेस च्यारी

---

* Arrived at Digon 16 June 1786 and left for Delhi on 22 June

× बरोबर. + झाशीचे सुभ्यावर होता, त्यास नानानें स १७८४ च्या जून महिन्यात दक्षिणेंत बोलावून घेतलें पहा ग्वा पत्रें न ३२४

प्रहर रात्र समये तोफा ते तयार होते व आह्मी गोल्याचे मारात त्याजवळ उभे होतो प्रातःकाळी तोफा बाण व सारी फौज मिळोन चोहोकडून हला केली टेकड्या किल्याजवळ आहेत त्याजवर तोफा चढऊन मार केला व दरवाजे याजवर मार केला बाण गोळे याजपुढे माणूस घाबरे जाहाले दाहा घोडी ठार जाली दोन अडीचशे माणूस ठार जालें व जखमी फार जाले तेंव्हा लोकाल्यानें दम न निघे तेंव्हा निघाले ते स्वार व लैना व तोफा मागे लागले दोन कोसपर्यंत लडाई होत आली पाच सात गुलटण्या जाल्या तेंव्हा ते उभे राहिले आह्मी देसनुरास आलो तेथे गढीत वर्ते पाणी नाही तेंव्हा काही लोक व काही फाटक ठेऊन येथे आलो, तो त्याजकडील फौज येऊन ठाणे त्याणी घातले त्याचा मार भारी व जरब मोठी, स्थळ नाकारें पाच दिवस जुज मेहेनत केली आहे तीं परस्परे स्वामीस कळेल जागा गेली त्यापक्षी पालहाल काय ल्याहावा ? पुरधरे मजमदारा कडील कारकून व सदासिवपत इयम फडणीस याणी मेहनत चागली केली सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

☞ Baburao Bhasker whose numerous letters have already gone before, sends news of a defeat inflicted on the Maratha troops at Tegur near Pachhapur (Belgaum Dt ) by the forces of Tipu helped by the French

---

*No 246* ] [ 1787

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी—

विनंती यैसीजे जगनाथपत नामे राजश्री सदासिव मल्हार याजकडून लखनऊस इंग्रेजाकडे वकालतीस गेले आहेत त्यास तेथे पावल्यानतर साोची भेट घेऊन राजश्री पाटीलबावाकडील पत्रे खलिते नजर केले व स्नेहाच्या गोष्टी परस्परे सरदाराच्या निवेदन केल्यानतर हैदरबेगखानाची मुलाजमत केली खानमारानी खिलत तीन पारचे देऊन बहुत ममतेच्या गोष्टी सागितल्या नवाबाची मुलाजमत होणार आहे सेवेसी श्रुत होय पुढे श्रवणात येईल ते विनंती लिहू × बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती

☞ This is Appaji Ram s letter to Nana communicating Mahadji's despatch of Jagannathpant with presents on a mission to Lucknow

---

*No 247* ] [ 9 June 1787

श्री

पौ छ २५ रमजान सन समान समानीन आषाढ

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी—

विनंती सेवक शकराजी सखदेव कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। छ २२ माहे शाबान मुकाम नजीक खुशालगड जाणून स्वानदलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष आपण छ ९ जमादिलाखरचे पत्र पाठविले ते छ ४ शाबानी पावले पत्री आज्ञा की तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे व विलायेती मेवा तलाश करून पाठवावा, ह्मणून आज्ञा त्यास पेशजी पत्रे सेवेसी पाठविली आहेत ते पावलीच आसतील, त्याजवरून श्रुत जालेच आसल हाली वर्तमान सविस्तर लिहिले आहे त्याजवरून ध्यानारूढ होईल विलायेती मेव्याचे दिवस

नाहीत कार्तिक मार्गेस्वर मासी मेवा येत आसतो त्यास मेवा इगामसीर आलियावर सेवेसी प्रविस्ट होईल कृपा करणार स्वामी समर्थ आहेत बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती

☞ Shankarji Sakhdev, Hingne's clerk reports, to Nana that dry fruit was not available at that season.

---

*NO 248* ] [ 2 October 1787

श्री

विनती सेवक आनदराव गगाधर सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १९ जिल्हेज मगलवार प्रात काल मु॥ मौजे वाफगाव येथे येथास्थित आसे विशेष आज कपिलाशेस्टीचा पर्वकाल आहे याकरिता येथील मडली भीमास्नानास मौजे खरपुडीनजीक का॥ खेड रा। काशीराव व रा। मल्हारराव व रा। बापूजी व रा। भिकाजी होलकर व सौ रखमाबाई व सौ आनदीबाई व सौ गौतमाबाई व बापूजी होलकर याची स्त्री सौ जनाबाई व रा। नारोपत कुटुबसुद्दा व रा। पाराशरपत कुटुबसुद्दा यांप्रा। प्रात काळी निघोन मौजे मार येथे गेले सध्याकाळी माघारे येतील रा। सुभेदार याची प्रकृत चागली नाहीं याकरिता येथे आहेत दानधर्म जे करणे ते येथे करतील चिरजीवास धर्मादाव करावयास दर आ। रा। पनास व बायकास दर आ। रुपये पचवीस याप्रमाणे जामदारखान्यापैकी देविले याखेरीज जाजती लागले तर आपलाले खासगीपैकी खर्च करतील सौ रखमाबाईकडे जाजती धर्मादाव व्हाईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Tukoji Holkar and the various members of his family are reported by Anandrao Gangadhar Chandrachud to have come to the river Bhima for the auspicious occasion of Kapila Shashthi

---

*No 249* ] [ 6 October 1787

श्री

विनती सेवक आनदराव गगाधर सा। नमस्कार विज्ञापना ता। छ २३ जिल्हेज शनवार सध्याकाळ मु॥ मौजे वाफगाव येथे येथास्थित आसे विशेष रा। सुभेदार याची प्रकृत जे आहे त्याप्रमाण आहे कपिला षस्टीस सुभेदारानी वाफगावी दान वगैरे धर्म केला बारा गोदान ब्राह्मणास दिली दर दोन पुतल्या व दोन रुपये, याखेरीज सवासे ब्राह्मणास दर आ॥ पुतली १ व रुपया येक याप्रमाण दिली सौ रखमाबाई याणी भीमातीरी येकसे आठ नरबदे बाण दर ब्राह्मणास बाण येक व रुपया येक याप्रमाण याखेरीज गोदान बारा दर गोदानास दक्षेना पुतल्या दोन व रुपये दोन यावे पाच गोदान ब्राह्मणास दिली इकल्यात चेतुर्थ दिवसाचा गुता जाला यामुळे पुढे गोदान व्होण ते राहिली काल नवमीपासून सुभेदाराच्या येथे पितृपक्ष चाली लागला आहे त्रिंबाजी कृष्ण व रामचंद्र गणेश याचे स्वारीत हिंदुस्थानात सरकार हिसेब होलकर याजकडील जाला, त्याऐवजी रा। गणपतराव गद्रे यास आरुणचे फाजलाचे नव हजार रुपये होलकर याजकडून देविले होलकर याणी मारानिलेचे रुपये दिले वरात गद्रे याजकडे राहिली हली वरात काढून गद्रे सरकारात रुपया घेतात म्हणोन रा। नारोपत परचुरे याणी लिहिल त्यावरून येथ गद्रे याच खात काढून पाहून रा। सुभेदार याचे पत्र घेऊन रा। परचुरे याजकडे पाठविले आहे त्यास रुपये पावले आहेत धर्मदास पागे नि॥ होलकर हे रा। पाटीलबावाबराबर होते बावानी जैपूर प्रातीं जप्तीस पाठविले होते आलीकडे रागडे याणी गडबड केली, त्यावेळस धर्मदास जेपूरकरासी

मिळोन राहिले किंवा च्यार रोज बऱ्याव करून राहिले त्यावरून सरकारातून मारानिलेचे घरची जप्ती करावयास रो खडेराव नरहर यास सांगितले त्यानी कारकून का सेवगावास पाठविला त्यावरून तेथील कमावीसदारान हा मजकूर लिहिला येथून सुभेदारानी मामलेदारास लिहिले, पागे मार याचे घरची देखरेख तुह्मी करण बहादरसिंग वकील दिलीस आहे त्याच पत्र पचविसा रोजाचे आले आन्वये गुलामकादर वगैरे दिलीस आले बादशाची भेट जाली कारभारी फकीर लाडोजी देसमुखाबराबर पलोन गेला त्याचे घर जप्त केले सुज्यातदौलाचे पुत्रास बोलाविले आहे रागड्यासी राजकारणी पत्रे पाठवितात रागडे याणी आमदनीचे पुत्राबराबर दाहा हजार फौज देऊन पाटीलबावाचे सुमारे पाठविले आहे ह्मणोन लि॥ आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ This is a report about the charities paid by the Holkars on their pilgrimage and other affairs conducted by Tukoji

---

*No 250* ] [ 1787

श्री

पु॥ श्रीमत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी—

विनती ऐसीजे सोपरवाला राजा मृत्य पावला त्याचा भाऊ येऊन रावराजा प्रतापसिंग याचे विदेमाने राजश्री पाटीलबावा याची भेट घेऊन आपले पुतन्याचे नावे राज्याचा टिका करार केला त्यास सरकारची नजर च्यार लाख तीस हजार ठेराऊन गणेशपत नामे ग्रहस्त सरकारतरफेने हती घोडा जेगा सिरपेच मोत्याची कठी वस्त्रे समागमे देऊन पाठविला आहे याप्रमाणेच जो येथे कारभारास मुलाचा चुलता आला होता त्यास हती घोडा मात्र न दिधला वरकड वस्त्रे व जेगा सिरपेच मोत्याची कठी येणेप्रमाणे सनमान करून बिदा केले सोपरचे राज्याची मुख्तरी मुलाचे चुलत्याकडे सांगितली व रुपयाचा जिमा त्याचा केला त्याप्रमाणे करारमदार होऊन त्यास बिदा केले ते कूच करून आपले स्थलास गेले बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती

☞ Appaji Ram reports that upon the death of the chief of Sopar, his nephew has been installed on the chiefship by Mahadji

---

*No 251* ] [ June 1789

श्री

राजश्री अलीबाहादर

असीर्वाद उपर तुह्मी छ ६ रमजानचे पत्र पाठविले ते पावले इसमाइल बेगावर आह्मी आपल्याकडून बळवतराव सदाशिव रवाना केले त्यास सांगितलें की तुह्मी पुढ दरमजल निघोन जावें त्याचे बराबरील लोकास पचवीस हजार रुपये कर्ज काढून दिल्हे त्यावर त्याचे बोलणे पडले की पालखी द्यावी व येक पागा द्यावी, भोसले व पुरंदरे सरदार द्यावे, व आह्मी सांगितलें की सरदाराचे लोक झाडून येतात पागाहि घेऊन जावी त्यावरून त्याणी पागे यास सांगितलें तेंव्हा पागे बोलले की आमचे रोजमरे द्यावे व नालबदी पौ काहीं द्यावें त्यावरून सदासीवपतानी आह्मास सांगितलें की पैक्याची तजवीज करावी तेंव्हा आह्मी सांगितले की आमचा हात चालेतो पावेतो कर्ज घेतले तुह्मी दिवाण आहा कर्जाची सोये पहावी तें त्याचे मनास अले नाहीं तेंव्हा आह्मी सांगितलें की पचवीस हजार रुपये घेतले त्यापैकी तेरा हजार रुपये वाटले बारा हजार यशवतराव नाइकास देऊन पाचशें लोक काढावे असें निश्चयात आणले परतु त्यासी आड पालखीविसी पडली त्याचे

उतर केले की पुण्यास लिहून पाठऊन परवानगी आणून देवितों, सिलेदारासारखे अडऊन घेऊ नये तेव्हा ते बोलले कीं आह्मी आपले लोकास बोलाऊन घेतो व कितेक प्रकारे बोलले, त्यावरून जरूर जाणून पालखी दिल्ही व दुसरे बोलणे सदासिव पताचे दोघाचौघा जवळ पडले कीं पाटीलबावानीं आमचा विचार पुण्यास लिहून पाठविलें आहे कीं सरजामी फौज घेऊन सदासिवपंतानी आह्माजवळ रहावें इतल्यर्थी* फौज घेऊन अलीबाहा (द्) र याणी देसास जाव व आह्मीहि पत्र पुण्यास लिहिली आहेत असे बालतात ऐकिल वर्तमन लिहिले अ हे राजश्री हरिपत तात्यास सदासिवपतानी लिहिले आहे असे तेच बोलत होते ह्मणोन विस्तारे लिहिलें तें कलले, त्यास तुह्माकडे सरदारींचें थोरपण आहे तेव्हा सर्वास पोटात घेऊन चालिवणे योग्य सदासिव पतानीहि मनापासून तुह्मासी सरळ चालावें तुह्मी चागल्या गोष्टी सागत असता त्याणी असे करू नये व तुह्मीं जें करणे तें त्यास घेऊन करीत असावे असें असता ते वाकडे उदासपणें चालू लागल्यास तुह्मी थोरपण करून घराऊ रीतीनें चौघाच्या साक्षीणे दोनदा च्यारदा सागून बोलून समेटावें असेंहि असून त्याणी वाकडी चाल धरल्यास चिंता नाहीं तुह्मी होऊन वाकडे दाखऊ नये पाटील (बा) वाची पत्रे या मजकुराची अद्यापपावेतो तर येथे अली नाहींत व आली तऱ्ही उतर समर्पकच जातील, तुह्मी येविसी चिंता करू नये व सदासिवपताचे पत्र हरिपत तात्यास आले असेंहि आढळात येत नाहीं राजश्री पाटीलबावाची चाल सदेह न पडावयाचे तेथे पाडतील, दुई नसेल तेथे करतील, त्यास दुई दिसू देऊ नये येविसी सदासिवपत यासही आह्मीं सूचना लिहून पाठवितो तुह्मीं लिहिले अर्थ सदासिवपत यास ल्याहावे तर तुह्मीच गिला लिहिला असे दिसतें, यास्तव सूचना मात्र मोघम लिहून पाठवितों

☞ Nana Fadnis writes an admonishing letter to Ali Bahadar asking him to be generous and conciliatory in his dealings with his Diwan Sadashivpant and not show him distrust

---

*No 252* ] [ June 1789

श्री

तुह्मी पत्र पाठविल ते पावलें. बाबाराव वकील यास आह्मी जाबसालात घातले नाहीं आमची वळखी नवती, परतु पाटीलबावानी बोलण्यात घातल होळकर व सिवाजीपत बापू वगैरे आणखी कितेकाकडून सफाईचे सदर्प लाविले, परतु कोणाच्यानेही न होये असे समजून यावयास केले व ऐवज दिल्हा, परतु सरकारातूनच दिल्हा ऐसे पूर्तेपणें दाखविले नाहीं गोसावी मुक्त जाला सबब त्याणें दिल्हे या प्रो परियाय दाखविला गोसावी यासही सागितल त्याणे मान्य केले ऐवकाश पडल्यास सरकारात खर्च पुरवावयाचा नाहीं अलीकडे गोसाव्याची नेहमी मुक्तता होईल असे दिसोन येतें व ज्या ग्रहस्ताकडे पत्र पाठविली त्याची उतरे आली तें पाटीलबावाचे कानावर घालीत गेलो त्याणी सागितले की जाबसाल होत असल्यास करावे अळस नसावा त्याचे बोलणे आहे कीं अजमेर सरकारात देवितो, उदेपुरची खडणी देवितो, आमचा मात्र बदोबस्त करून द्यावा, त्यास अलीकडे पाटीलबावानी सागितले जे हे महकूब करावे त्याचें पारपत्यच करू त्यावरून हाली सिलसिला बंद केला कौलनामा तर पूर्वीच जाऊन चुकला त्याचाही पेच नये असे करतो ह्मणून लिो त्यास कोणाच्याच हातून सफाइचा जाबसाल सेवटास न जाये व पाटीलबावानीहि बाबाराव याचेच हातून बोलविले तेव्हा याचेच हातून बोलावे सफाई करणे प्राप्त तेव्हा केल तें बरेंच केले ऐवज दिल्हा तो सरकारातून नाहीं, गोसाव्याकडून दिल्हा असे दाखविलें हें बरें केले परतु पूर्वी तुमच्या लिहि

---

* प्रामाणिक, विश्वासु

ण्यात बारीक आक्षराच्या पूर्वणीत स्वल्प तुटावयाकरता आह्मास पचवीस हजार रुपये देऊ केले आहेत असे लिहिले आणि हाली आह्मी दिल्हे असे लिहिलें यावरून पूर्वी लिहिल ते समजुन लिहिल नाही असे दिसले असो ऐवज गोसाव्यापासोन उगऊन घ्यावा ह्मणजे सरकारात खर्च पडणार नाही व इतके ऐवजास गोसावी माहाग नाही तुह्मी ग्रहस्ताकडे पत्र पाठविलें व त्याची उतरें अली, त्यात अजमेर देवितो व खडणीचा पैका देवितो असे असता पारपत्य करणार व तुह्माकडूनही सिलसिला बद करविला त्यावरून तुह्मी बद केला उतम केले फऊलनाम्याचे तुम्हावर दोष न येई असी तोड काये योजाल ते लिहून पाठवावी तुम्ही स्वछ रीतीने काही येक परियाय लाऊन बोलाल तोच दस्तावेज तुमचा धरून दोष लावतील येविसी सभाळून दोष न येई असे करावे रुपये माघारा घ्यावयाचा मजकूर यत्न करून पाहून परतु माघारा येणे कठिन पाटीलबावाच्या कानावर घातल तर माघारा अल्यास येईल, परतु त्या ग्रहस्तासी फारच वाकडे पडेल हे अतरथ बहुत सरकार कामाचे उपयोगी पडेल तो ग्रहस्त शरमिंदा राहील, पुढ आपण लिहितील त्या प्रो करण्यात येईल ह्मणून लिो त्यास रुपये माघारा घ्यावयाचे करू नये व येथूनहि माघारा रुपये घ्यावे असे लिहिले नाही येथून कागद गेला त्याचा अर्थच तुमचे मनात आला नाही असे दिसतें, व बारीक पुर्वणीचे पत्र तुह्मी लिहिल त्यात स्वल्प तुटावयाकरता आह्मास पचवीस हजार रुपये देऊ केले आहेत असी अक्षरे स्पष्ट असे लिो होते, या करता त्याचे उतर लिहून पाठविले होते तो मजकूरच तुमचे चितात अला नाही असे दिसतें पहिल्या पत्रावरून दरबारखर्च तुह्मी घेतला असे समजण्यात आले हाली तुह्मी दिल्हे हे समजले त्यापक्षी माघारा घेणे ठीक नाही यात तुमची अगदीच पत जाते सदरहू ऐवज गोसाव्यापासोन उगऊन घ्यावा

☞ This is an incomplete letter from Nana Fadnis to Ali-Bahadar whose complaints against Mahadji are answered by Nana

---

*No 253* ] [ 31 July 1790

श्री

पुा सेवेसी विज्ञापना ताा छ १८ जिलकाद शेनवार

१ राो पाटीलबावाकडील तीन जाबसाल नारोपत घेऊन आले त्याची उतरे सुभेदारानी केली देवशाकडे फौज पाठवावी तर जागा जागा फौज पाठवावी हे खरे परतु पैका पाहिजे इस्मालबेगाबाबद व रोहिलखड वगैरे वाटणी द्यावी फौज जाईल राो आलीबहादूर याचा जाबसाल केला त्याप्रमाण घडल्यास तेही फौज पाठवितील तुह्मी बोलला त्याप्रमाण परभारा निकाल पडावा श्रीमतास इनामी सनदा व बहुमान आणला तो श्रीमताकडे रवाना करावा फरमानबाडी करण काय आहे आमचे देव धर्म धणी सर्व श्रीमत आहेत दुसर जाणत नाही श्रीमताच्या लग्नाच्या वेलस सातारकर राजे याचे भेटीचा आक्षेप कारभारी याणी केला परतु राज्यासी कारण नाही आसे जाणून न गेलो याप्रमाण पाडुरग राम वकील निा सिंदे याजबराबर सागून पाठविले कलम

१ राो सुभेदारानी परवाच्या दिवसी राो आलीबहादूर यास पाच सात खासे सुद्धा भोजनास बलाविले भोजनोतर काही बोलण जाले विशेष नाही तूर्त उभयेता समदुखी जाले आहेत कलम

१ छ १९ रा रविवार सुभेदारानी नवी तोफ तयार करून तख्तावर घातली तीन बार खाली केले च्यार बार गोळे घालून केले सात कोसाचा पला गोळा वजन पका आडीच पाव आहे कलम

१ छ २० शो इदुवार इकडील फौज व कपू साबरानजीक गेले बिजेसिंगाकडील लोक साबरानजीक होते ते माघार गेले याचे कारण समजत नाही यास पुरतेपण पोटी घेतात किंवा बिजेसिंग हावालदील जाला, त्यास काहीं द्वी गत जाली ह्मणोन माघार गेले हे कलत नाहीं कलम

१ छ २१ रो मगलवार रो सुभेदाराकडील रामचंद्र धोडोजी व च्यारसे लोक जाऊन हिंडोनात ठाण घालून होते पुढे ठाणी सोडवावी वजीरपूर ह्मणोन ठाणे तेथ जाऊन बारासे रुपये खडणी केली खुशालगडीहून काही जमात व गावगुड मिलोन रामचंद्र धोंडाजीस उथलोन दिले काही माणस जखमी काही ठार जाली काही घोडी गेली मारनिले पलोन बालमगडास आले हे बातमी आली त्यावरून सुभेदारानी त्याचे कुमकस नन्हेखान याचे गाडदी तीनसे पाठविले च्यार पाचसे सिलदार पाठवणार कलम

१ वृंदावणी पहिलेपासून होलकर याचा वाडा छेत्राचा आहे आलीकडे पुढे बखल रिकामी जाणून ते जागा वाड्यात घेऊन भिंतीस काम लाविले काही काम वरते आले हे बातमी बावास कलली त्यावरून बावानी आपाराव व तात्या खोटेकर कोणी कारकून पाठऊन तेथील नक्षा आण विला होलकर यासही सागून पाठविले त्यावर दुसरे दिवसी बावानी कामावरील माणसे धरून नेली कलम

१ उदेपूरकर राणाजीने जमात करून बेगुस मोरचे लाविले कोट्याची कुमक दाहा हजार पावेतो आली म्हणोन जगताप याचे पत्र आले कलम हे विज्ञापना

☞ Various items of Mahadji's daily life and Tukoji Holkar's doings are reported in this paper to Nana Fadnis at Poona

*No 254* ] [ 22 October 1792

श्री

मीर्जा गुलशन बेग खुषवख्त बाषद्

सुज्यात तहवर दस्त गाहा आजी महादजी शिंदे सलाम सुा। सलास तिसेन मया व आलफ राजश्री धोंडो गोपाळ× याजकडे ताा पिंपळोदा पाो मडावल आहे तेथील जमीदार ताा मजकुरी मनस्वी बाकी ठेवून मारनिलेचे कारकुनास मानीत नाहींत याकरिता याणी आपले कडून सभाजी परशराम पाठविले आहेत तरी साल मजकुरापासोन आमल करतील व बाकी जमीदाराकडील वसूल करून कुळास तगादे करतील त्याचे कामकाज लागल्यास हरएकविसी साहित्य करीत जाणे व मागील बाकी जमीदारास निक्षूण ताकीद करून वसूल होय तें करणें येविसींचा फिरोन बोभाटा येऊ न देणें माजी आमलाचे कारकून दिकत करतील तरी त्यास ताकीद करून फडशा करून देवणें जाणिजे छ ५ रावल जादा काय लिहिणें हे किताबत मोर्तबसूद

☞ Mahadji Sinde asks Gulshan Beg to render all the help he can to Dhondo Gopal in enforcing his claims on Panth Piploda

*No 255* ] [ 22 October 1785

श्री

**राजश्री रावजी वेंकाजी नि॥ खंडेराव हरि गोसावी यास**

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेो महादजी शिंदे दंडवत सुा। सलास तिसैन मया व अलफ राजश्री धोंडो गोपाळ याजकडे ताो पिंपळोदा पाा मडावल आहे, तेथील जमीदार

× गोपाळ सभाजी खाडेकर याचा पुत्र

अमल सुरळीत न देता मारनिलचे कारकुनास मानीत नाहींत, त्यास निक्षून ताकीद करून बदोबस्त करून देण्याविसीं पेशजी तुह्मास लिहिलें असता जमीदारास ताकीद केली नाहीं व ता मजकूरचा गला जकीरा तुह्मी नेला तोही याचा यास माघारे देत नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जाले त्यावरून हें पत्र तुह्मास सादर केलें असे तरी ता मजकूरचे जमीदारास ताकीद करून व याचा जकीरा नेला असेल तो याचा यास माघारे देणे येविसीचा फिरोन बोभाट येऊ न देणें जाणिजे छ ५ रावल बहुत काय लिहिणे हे विनती मोर्तबसूद

☞ This is to the same purport as the preceding Mahadji asks help being rendered to Dhondo Gopal of Panth Piploda

---

*No 256* ] [ 23 November 1792

श्री

यादी चौकसी जगली शाहाजादा सुजातदौला याचा पुत्रक छ ८ राकर सन सलास तिसैन प्रात.काली आठा घटिका दिवसास सरकारच्या वाड्यात दिलीदरवाज्याचे आत येऊन हावदा जवळ कारज्यापासी बसला त्यावेलचे पाहारेकरी लोक होते त्याची नावनिसी———आसामी

१ पागा दि॥ नीलकठराव रामचद्र स्वार छबिन्यास चाकरीस दाजी अनत चौकात पायउतारा लोक

१ दरवाज्याबाहेर-आबदुला गाडदी दि॥ बर्वे आलीखान डावे बाजूस

१ सेटी निकम मराठा गाडदी दि॥

उजवे बाजूस बाहेर दरवाज्यात

१ गोविंदा जराडा खिजमतगार नि॥ खाजिलिब (?) व महादू बर्का

१ राघो बलाळ कारकून———नि॥ हुजूर हशम

४ मराठे गाडदी

१ माणकोजी गोरे

१ सटवाजी बनकर

१ भवानजी गौळी

१ येसजी गाइकवाड

४

४ परदेसी प्यादे दि॥ हाय आसामी

नि॥ शागीर्द पेशा

१ भवानसिग जमादार

१ छटुसिग जमादार

१ हसराम दि॥ भवानसिग

१ लछीराम दि॥ छटुसिंग

४

सदरहु च्यार असामी याणी दरवाज्याच्या आतले बाजूस पुसिले की तुह्मी कोण आहा जाऊ नका आसे ह्मणोन आडवे जाले तेव्हा त्याणी आपले नाव न सागता सिवीगाली देऊ लागले आणि रेटून दिली दरवाज्याचे आतील चौकात डावे बाजूकडे उतरले

☞ This is a report about Jangli Shahzada ( a son of

Shuja-ud-daulah and a refugee at the Poona Court ) having tres passed into the Peshwa's Palace

---

*No 257* ] [ 4 November 1793

श्री

राजश्री चिमाजी माणकर गोसावी यासी

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद सु॥ आर्बा तिसैन मया व अलफ अजमुद्दौला† दि॥ नवाब निजामअलीखान बाहादर हे नवाबास न पुसता औरंगाबादेहून निघोन गेले त्यास प्रा॥ राजापुरी येथे सापडल्यास आटक करून हुजूर लेहून पाठवणें जाणिजे छ २९ रबिलावल बहुत काय लिहिणें *

सदाशिव केशव—प्रा॥ कल्याण व नेरळ
आप्पाजी विष्णु—ता॥ बेलापूर
गणपतरावजी—ता॥ वसई
मोरो बापूजी—ता॥ सुवर्णदुर्ग
रघुनाथ त्रिंबक—ता॥ अजनवेल
बाळाजी गोविंद—( तुह्माकडील तालुका ) !
निळो गोपाळ का॥ दार

पो नवापूर—प्रा॥ नवापूर
नारो कृष्ण—प्रा॥ खानदेश
हरि चिंतामण—प्रा॥ गुजराथ
आबाजी कृष्ण—तालुके अमदाबाद
रघुनाथ हरि—झासी




☞ A circular letter issued by the Peshwa ordering the arrest of Azim-ud-doula, the Diwan of Nizam Ali Khan who is said to have disappeared from Aurangabad

---

† मश्रूममुल्क * याच मजकुराचीं पत्रें वरील मडळीस पाठविलीं असून एक अलीबहादर यास खासगी स्वरूपाचें आहे पत्रातील माहिती नवीन आहे

*No 258* ] [ 30 December 1793

श्री

मीर्जा गुलशेन बेग कामदार पो मदोसर वगैरे माबय खुशवस्तबाषद्

छ सुज्यावत तहवर दस्तगाह आजी महादजी सिंदे दुवा सुा आर्बा तिसेन मया व आलफ राजश्री धोंडो गोपाल व जनार्दन गोपाल याचे जाहागिरीचे गाव तपे पिपलोद पो मडावळ येथें आहेत, त्यास जमीदार याणी आमलात खलल करून गावगन्ना मनस्वी बाक्या ठेविल्या व यासी न पुसता गढ्या बांधिल्या आहेत, कामदार याची रुजुवात करून बाकीचे फडशे करीत नाहींत, गावची खराबी करितात, म्हणून विदित जाले त्याजवरून हें पत्र सादर केलें आहे तरी मारनिले कडील सभाजी परशराम कारकून गावचे कामावर आहेत त्याचा हरयेक विसी उपराला करून गावास ताकीद करून मागील बाकी येणें त्याची रुजुवात होवून फडशा करवणे व गावगन्ना गढ्या यासी न पुसता बांधल्या आहेत त्या पाडून टाकवणे, गावगन्ना याचा आमल सुरळीत चालवणे व हरएक विशी याचे साहित्य करीत जाणें जाणिजे छ २६ जौवल जादा काय लिहिणें हे कितावत

☞ Mahadji Sinde repeats his requests to Gulshan Beg to render all possible help to Dhondo Gopal and Janardan Gopal in establishing their authority in Panth Piploda

भाग पहिला
महादजी शिंदे यांचीं पत्रें
समाप्त

सातारा, ऐतिहासिक लेखमाला

२

भाग दुसरा

# पेशव्यांचा कारभार

*No 259* ] [ 1713

श्री

जाबिता आकार मुकासे गाव दि॥ राजश्री असानद सुहुर सन सलास अशर मया अलफ दस्त बा॥ साल गुदस्ता

| | गु॥ टके | गला खंडी |
|---|---|---|
| मौजे वेगरे ता॥ मुठेखोरे | ८२॥ | ४॥=॥ |
| मौजे वरसगाव ता॥ मोसेखोरे | ७५॥ | ४। |
| मौजे सगमनेर ता॥ हिरडसमावल | ३४॥। | १॥ |
| मौजे अगसोले ता॥ रोहिडखोरे | ४॥६ | २॥ |
| मौजे कातवडी ता॥ कानदखोरे | १०।६ | ॥। |
| | २०७॥। | १३॥।=॥ |

यास बावती व पटया देखील जो आकार होईल त्याची चौथाई जिल्हेकडे, वसूल घ्यावयाचा तह राजश्री स्वामींनी केला आहे त्याप्रमाणे आकार

| | गु॥ टके | गला खंडी |
|---|---|---|
| गावगना यैन दस्त | २०७॥। | १३॥।=॥ |
| दाहिजा तह | २०॥। | १।=॥। |
| नख्ता सदर गला दर खंडी<br>सदे टके १० मण ८२ | | |
| राजपटी तहबा॥<br>दाहिजाप्रमाणें बेरीज | २०॥। | १।=॥। |
| गलेपटी दर खंडीस<br>गला कैली ८२ येक | | १।=॥। |
| भेटीपटी जिल्हेची पचोत्राप्रमाणे | १०।६ | ॥४ |
| | २५१॥६ | १८॥४॥। |

याची चौथाई रुपये

२० गु॥ टके ६५ दर रुपयास ३।

१८७॥ गला खंडी ४॥३॥। दर खंडीस रुपये

तसैरराहाप्रमाणे ४०

२०७॥

सदरहुप्रा दोनीसे साडेसात रुपये यैवज खेरीज माहाल मजकूर साल गुदस्ताच्या दस्ताप्रा आकार होत आहे याखेरीज नवी वसाहात गाव ता॥ मोसेखोरे दख

मौजे पलस १ अडमाल १

येणेप्रा दोनी गाव आहेत त्याचा अकार व सदरहू वसाहाती गावीचा अकार पेस्तर पाहाणी मुळे जाजती होईल त्या हिसेबामुळे पेस्तर जाजती बेरीज होईल ते लेहून पाठऊन

☞ King Shahu assigned to one Ashanand the Mokasa of certain villages, enjoining him to colonize them and bring them to a prosperous condition The terms of such improvement of villages are expressly stated in this paper including Govt dues

---

*No 260* ] [ 10 February 1716

श्री

**श्रीमत् क्षत्रियेकुलावतंस महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी,—**

विनंती सेवक बालाजी विश्वनाथ प्रधान कृतानेक विज्ञापना सेवकाचे वर्तमान ता' छ २६ सफर मु॥ मौजे सतीसवदी* यथास्थित असे विनंती स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा कीं भोजजी पाटील आकलखोपकर हुजूर रुजू आहे, त्यास कैदेस ठेवावासे नाहीं, ह्मणून सोडून देणे यैसी आज्ञा केली, तरी येसाजी थोरात, विठोजी चव्हाण, भोजजी पाटील, सताजी सूर्यवंसी हे येकच आहेत जितकी स्वारी येसाजी, विठोजी करीत त्यास ते दोघे सामील होत ह्मणून दाये मुद्दे खरे जाले तेही आपले तोंडे कबूल जाले कडपूरचा पाटील आष्टीमध्ये होता त्याणी याचे आगी लाविले भिलवडीचे ठाणें सताजीचे हवाला होते तेथे सिदोजी थोरात याची बाइको सापडली पनालकर सर्नोबताची घोडी सापडली यैसी हरामखोरी त्याजकडे खरीखुरी जाली, ह्मणून कैद करून खड केला आहे त्याचा निर्गम त्याणी करून दिव्हिया सोडून देऊनही पण रुजू होत ह्मणून आज्ञा केली तरी सताजी, भोजजी दोघेही येकच प्रति यैसी लबाडी केली यावरी हराम खोरीचा मुलाहिजा करावासा नाहीं सेवेसी विदित व्हावे ह्मणून लिहिलें असे येसाजी चाटवा व कृष्णाजी थोरात त्याचे गावात भोजजी दिल्हा आहे आह्मी कोणाचे बोले करितोसे नाहीं सेवेसी विदित जाले पाहिजे सेवेसी श्रुत होये विज्ञापना

श्री
शाहू नरपती हर्षनिधान
बाळाजी विश्वनाथ
मुख्य प्रधान

☞ The Peshwa Balaji Vishvanath explains to King Shahu why Bhojji Patil could not be set at liberty as he was an accom plice of the Thorat rebels

---

*No 261* ] [ 1734-35

श्री

तेरीज सरजाम लष्कर सु॥ खमस सलासीन मया व अलफ-

---

* ता अथणी जि बेळगाव

| अज | बेरीज रुपये | पैकी वजा | बाकी बेरीज रु | म्यानमुलकी | परमुलकी |
|---|---|---|---|---|---|
| रा फतेसिंग-भोसले | ४२७२३७५ | १२६२२५० | ३०१०१२५ | ३०१०१२५ | ० |
| सेनापति व सेनाखास खेल व विठोजी थो व कालोजी भोसले | ११०१७१२५ | ३८४८०० | १०६३२३२५ | ११३२३२५ | ९५००००० |
| भोसले पथके ३ | २०४३००० | ० | २०४३००० | २०४३००० | ० |
| रा चिमणाजी बलाल | ३०३२९०० | ९४७०० | २९३८२०० | ९३८२०० | २०००००० |
| सरलष्कर दा॥ पथके | २४२२३०० | १०४८५० | २३१७४५० | १३१७४५० | १०००००० |
| त्रिंबकराव सोमवसी व कडू | २७१७०० | ३०००० | २४१७०० | २४१७०० | ० |
| संभुसिंग जाधवराव | २८४९७५ | ० | २८४९७५ | २८४९७५ | ० |
| खंडोजी जाधव भोइजकर | २५७४०० | १३२४०० | १२५००० | १२५००० | ० |
| कृष्णाजी पवार | ५२१७०० | १०००० | ५११७०० | ५११७०० | ० |
| दमाजी पिसाल | १०३५०० | ३५०० | १००००० | १००००० | ० |
| परशराम श्रीनिवास | ५६७१५० | ५६७१५० | ० | ० | ० |
| | २४७९४१२५ | २५८९६५० | २२२०४४७५ | ९७०४४७५ | १२५००००० |

☞ Assignments made to the various Sardars for rendering military service during the time of Peshwa Bajirao I are clearly set down in this paper

---

*No 262* ] [ 5 May 1737 ?

श्री

**श्रीमत सदायशवत धर्मपरायण राजश्री राऊ स्वामीजींचे सेवेसी—**

सेवक चरणरज वेंकाजीराम साष्टांग नमस्कार विनंति विशेष येथील कुशल तागाईत छ १५ मोहरम मुकाम आग्रे जाणून यथास्थित असे यानतर गगाभागीरथी मातुश्री यात्रेस गेली, ते समई राजश्री सवाई जयसिंगजींनी फौज समागमे दिली होती, त्यामधे दिलीपासिंगाचे दल हरोल* होता दीडसे स्वार आहेत सवाईजीकडे चाकर आहेत बरा मातबर चतुर आहेत त्यावर माउलींनीही बहुत कृपा केली ऐशियास त्याचा हेत आहे की, आपला पुत्र सरकारात चाकर ठेवावे सेंभरपनास राउतानसी चाकर ठेवावे त्यात आपली आज्ञेप्रमाणे स्वार आणतील सांप्रत गगातीरी अतर्वेदीस राहत होती कुटुब बराबर होते त्यास सादतखानाचे याचे त्याचे बनत नाही हे हकीकत आपली सांगतील तूर्त जगतराय बुदेल्यास पत्र द्यावे की दिलीपासिंगाचा कुटुंबास जागा मातबर हे सांगतील ते देणे तेथे कुटुब ठेवितील आणि आपण तील आज्ञेप्रमाणे चाकरी करतील स्वारही बरे मातबर शिपाई चागले आहेत याजवर कृपा केली पाहिजे मातुश्रीचीही आज्ञा यास आहे मातुश्री समागम देवास नत होती येथवर कृपा जाणोन स्वामीचा आश्रय करून स्वामीपाशी तूर्त उमराय पाठविला तरी जगतराय बुदेले यास पत्र कुटुबाविशी द्यावे नौकरीस कौल द्यावा हे विनंती †

---

* चिनी, आघाडीचा भाग † सातारा म्यूझियममधील पारसनिसांच्या नकलेवरून यापुढील चार पत्रेंही नकलेवरूनच घेतलीं आहेत पे द भा १० ले ६६ मध्यें आलेला दीपासिंग हाच वरील सरदार असावा काय? पत्र लेखक वेंकाजीराम हा बाजीरावाचा वकील सवाई जयसिंगाजवळ होता याचीं पत्रें इ स ए चर्चा यात छापलीं आहेत

☞ Vyankaji Ram, the Peshwa's agent recommends to Baji rao to entertain into his service Dilipshingh's troops, who were deputed by Sawai Jaysingh to accompany Bajirao's mother in her pilgrimage as a guard

---

*No 263* ] [ 23 May 1737

श्री

**श्रीमत सदायशवत धर्मपरायण राजश्री बाजीराऊ स्वामीजींचे सेवेसी—**

सेवक वेंकाजीराम साष्टाग नमस्कार विनति उपरी येथील कुशल तागाईत छ ४ माहे सफर मुक्काम आग्रे जाणून स्वामींनी निजानदे लेखनाज्ञा केली पाहिजे यानतर स्वामींनी कृपा करून स्मरण केलें तरी आपण दास स्वामींचे आहोत सर्व प्रकारे अभिमान स्वामीस असला पाहिजे येथील वर्तमान तरी यथास्थित असे रा॰ सवाई जयसिंगजींची निष्ठा जे आहे तेच आहे अतराय दिसत नाही आताच अतरायचे कारण नाही पातशहाच्या भेटी होतील प्रसग कैसा होतो, ते जालियावर जे निवडणे ते निवडेल राजश्री स्वामीस विनती करावी कीं आपण त्यास वारवार हे गोष्ट न बोलावी हेही भरवसा पुरा धरितात भक्ताची प्रीति आहे त्याहीवर कृपा आहे अतर दिसत नाही पुढे जें वर्तमान घडेल ते लिहून पाठऊ मागे दोनी पत्रे कासदे पाठविले ते उतर पावीत नाहीत बसुन राहतात त्यावरून कासदे कोस स्मरास जायास विरा (?) घालीत नाहीत आता आमचे कासद व परभारे उताराबद्दले बसले त्यास उतारे देऊन वाटे लाविले पाहिजे विशेष काये लिहिणे? कृपा निरतर असो दीजे ही विनती

☞ Vyankaji Ram assures Bajirao of the sincere friendship which Sawai Jaysingh entertained towards both King Shahu and the Peshwa, who are advised not to entertain any suspicions about his sincerity

---

*NO 264* ] [ 18 March 1738

श्रीव्यकटेश

दशमी बुधवार ( = 1? or 31 May 1733 )

**श्रीमत सदायशवत धर्मपरायण राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी—**

सेवक चरणरज वेंकाजीराम साष्टाग नमस्कार विनती उपरी येथील कुशल तागाईत छ ८ माहे जिल्हेज मुकाम बसोवा शहर यथास्थित असे स्वामींनी पत्र पाठविले ते पावून परम सतोष जाला पूर्वी कासिदाबरोबर पत्रे पाठविली होती, तेही स्वामीस पावली असतील त्यावरून वर्तमान विदित जाले असेल साप्रत थैल्या दोन पाठविल्या त्याप्रमाणे पावन्या केल्या त्या आल्यावर उभयतास बहुत सतोष जाला ह्मणू लागले जे आपणास भरवसा न होता, परतु राजश्रीच्या इमानाची शर्त जाली तरी आपली क्रिया आहे तेच आहे आपण इमानास डगत नाही राजश्री अह्मासी भाऊपणा धरिताती आणि आमच्या मुलुकातून फौज काढिली त्यानें तसनस फार जाला मागती मागून खानदवरा व सादतखान त्याच मार्गे आले मुलुखाचे वाटोळे जाल्यावर मग आमचे थोरपण [ अपूर्ण ]

☞ Vyankaji Ram reports to Bajirao the cordial and sincere regard which Sawai Jaysingh entertained for the former.

*No 265* ] [ March 1739

श्री

( हा भाग नष्ट )

विचार करून महमदशाहा याजवळून अटकपलीकडील मुलूक लिहून घेऊन सादतखानाचे हवेलींत येऊन राहिला आहे जर निघून गेला तरी दो ती दिवसी वर्तमान येईल ते लिहून पाठऊन म्हणून लि॥ आहे यैसियास नादरशा गेलियावरी बाबूराऊ* याची व जागाची लिहिली येतील ते वर्तमान लिहून पाठऊन लोभ असो दीजे हा आसीर्वाद

☞ This is a fragmentary letter communicating to the Peshwa the news from Delhi about Nadir Shah's arrival there

---

*No 266* ] [ March 1739, Received on 17 April 1739

श्री

छ १९ मोहरम

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी-

विनंती महमदखान बंगश यास लष्करात भेटलो स्नेह बहुत केला त्यास त्याच्या मनात हेच की इरानी येऊन हिंदुस्थान घेतले पातशाही बुडाली ऐशियास याची पैर्वी जरी राऊ मनावरी धरून बुडवावयासी करितील तरी आह्मी चालीस हजार पठाण जमा करितो रायानी आह्मी येक विचारे होऊन पारिपत्य करावे येविशी त्याची आमची बोली विशेष जाहाली दरम्याने खिजरखान दाऊदखानाचे चुलते आहेत तेही त्यासमागमे होते ऐशियास ते तोहमासकुलीसी राजकारण राखोन प्रस्तुत निरोप घेऊन फरुखनगरास गेले आहेत त्यास स्वामीचे समत जालियाचे वर्तमान त्याजला पूर्वसंकेतपुरसर पत्र लिहून पाठविले असे त्याचे बुद्धीने उतर समर्पकच येईल ज्या प्रकारे येईल ते वर्तमान सेवेसी विनंती करू विदित होय हे विनंती

☞ Bajirao's agent at Delhi communicates to him a proposal made by Mohammad Khan Bangash seeking Bajirao's co-operation for turning back Nadirshah, who had despoiled the empire

---

*No 267* ] [ Received on 10 May 1739

श्री

पौ छ १२ सफर नकल

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी—

विनंती सवाई जयसिंग याणी राणाजीस से पनास पत्रे लिहिली की तुह्मी दाहा वीस कोसी येणे, तुह्मी आह्मी मिलोन फौजबंदी करून दौड करू त्यास राणाजी हरगी(ज)× जात नाहीत जे कझलबाज§ इरानी जैशा दक्षणी फौजा पचवीस तीस कोश धावतात तैसे हेही आहेत सादतखानाचे व कमरदीखानाचे स्वार नादरशाहाने चाकर ठेविले ते सर्व टोपीवालेच दौड करून आले तर आपले हाल कलतच आहे नाहाक मरावे अगर येथे आले आणि ते आलेच तर दारूगोली सामान आहे महना दोन महिने युध्य जाहाले आणि राऊ आले तर सहजच आह्मी सामील होऊ

---

* बाबूराव मल्हार बर्वे पेशव्याचा वकील × बिलकूल § लालटोपीचे अढवय्ये शिपाई

राऊ न आले तर डा(डों)गरात जावयास जागा आहे ऐसी मसलत दौलतराम व्यास याजला सांगोन आज राणाजीही रवाना केले सेमर स्वार बराबर दिल्हे शाहापुरियाचा उमेदसिंगही मर्द माणूस ह्मणोन सवाईने चालीस हजार रु॥ देऊन चाकर ठेविले तोही शाहापुराहून जमियेत घेऊन गेला येथे राजश्री कुसाजी गणेश स्वामीच आज्ञापत्र सेवकाचे नावे व राजे उमेदसिंगजींचे नावे आणिले, त्यावरून सेवकाने उमेदसिंगजीस पत्र लिहिले होते त्यास स्वामीची नजर पाठविली ते पावलीच असेल, व कुसाजी गणेश याचे विशई नुन्या वा श्रीचद पचोली यास लिहून पाठविले तूर्त त्याचे पोटिस्त चालीस लाविले फौजेची आमदानी जालियावरी श्रीचद पचोलीच पुढे होऊन खडणी करील तूर्त श्रीचदास रयतलोक ह्मणतात जे, तुह्मीच आमची खराबी करिता बद्दल हजार पाचसे तऱ्ही फौज आली ह्मणजे स्वारीचे किनाराचे परगणे हातास येतील गुमानसिंगाने सांगितले की रायाने विस्वासराऊ जोग यास तीन हजार राऊत ठेवणे ह्मणोन आज्ञा केली आहे त्यास सेवकाचे विचारास गोष्ट आली जे मद (?) सारेच पठाण हमेशा युधात येशस्वी आणि मर्दाने, अलजपुरी पठाण व हे (ए)कच बिरादरी, परतु त्याहून विशेषे हे मर्दाने आहेत स्वामीची आज्ञा येईल तर चिरजीव रा सिधेश्वर गणेश जातीनसी माळा फिरवितात वगैरे स्वार उतम शे दोनसे पठाण येऊन जमातवारी करून स्वामिसेवा करितील विनाआज्ञाच येथून पाठवीत होतो कदाचित तेथे गरज नसिली तर खर्च खात माघारा येतील बद्दल न पाठविले गुमानसिंगाचे जबानीने आइकिले की निगादास्त करितात बद्दल विनती सेवेसी लिहिली असे जर स्वामीची स्वारी सत्वरीच नर्मदेवरी येईल तर राणाजीपासीच चाकर राहून सेवेसी येऊन पोहोचतील येविशी जैसी आज्ञा येईल तेणेप्रमाणे वर्तणूक होईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Bajirao's agent at Jaipur informs him of the preparations made by Sawai Jaysingh, the Rana of Udepur and others for opposing Nadirshah and invites the Peshwa's cooperation

---

*No 268* ] [ Received on 31 May 1739

श्री

छ ४ रविलावल

आसीर्वाद उपरी महमदशाहा याची पातशाही गेली होती, परतु ईश्वरें पातशाही काईम राखिली त्यास आपण राजकारण राखून अमीरूलउमरा यासारखें व्हावें पोटास फौजास लागेल ते आम्ही पातशाही माल पैदा करून त्यात घेऊन उरला पैका खजाना दाखल व्हावा या फौजेस जागिरा अलाहिदा मागाव्या आणि सर्वांस राजी करोन आणि पातशाही बदोबस्त करून द्यावा, आणि हा लौकिक मोठा आहे, कैसा ह्मणाल तरी जीर्णोधार देवालयाचा केल्यास नवीन लिंगाचे स्थापनेपेक्षा अधिकोत्तर आहे महमदशाहाचे पातशाहीचा बदोबस्त केल्यास लौकिक मोठा आहे मोडून टाकिल्यात लौकिक नाहीं दुसरी गोष्ट हजारों चोर पोर खातील आणि पातशाही मोडल्याचें श्रेय आपणाकडे दुसरें राजश्री छत्रपति स्वामीही पातशाही इच्छित नाहीं जीर्णोधार केल्यास सतोष मानितील, ह्मणून राजश्री बाबूराव मल्हार यानीं लिहिलें आहे दुसरें यानीं लिहिलें आहे जे हा विचार चित्तास उत्तम भासेल तरी सतारकुलीखान गाजुदीखानाकडील येथें कामातून बोलावून आणून त्यासी दक्षिणेच्या बदोबस्ताविसीं गाजुदीखानाही रवाना करावें आम्ही ते दुसरा पदार्थ नाहीं समाधान करू ह्मणजे दक्षिण निर्व्याकुल होईल महमदशाहाकडेही राजकारण स्वामीस त्यानीं हातीं धरावें आणि बदोबस्त करून द्यावा येविशीं चालणा करू यामध्यें जैसी आज्ञा होईल तैसी वर्तणूक करू नादिरशहा गेला तेव्हा चहूकडे वळवळ करून कज्या करून

दाखवावा उचित नाहीं ह्मणून लिहिलें आहे याचा विचार काय त्यास लिहून पाठवावा तें लिहिलें पाहिजे लोभ असो दीजे हीं विनती †

☞ Bajirao is advised to help the Emperor to regain his position, now that Nadirshah had departed The letter contains an important statement of Maratha policy, viz not to subvert the Mughal Empire but to resuscitate it

---

श्री

*No 269* ] [ 6 June 1739

सेवेसी विज्ञापना स्वामीचे कृपावलोकनेंकरून जेश्ट शुध बुधवार पर्येंत सेवकाचे वर्तमान इंद्रप्रस्थी कुशल आसे पूर्वी पत्रें सेवेसी लिहिलीं आहेत राजश्री बाजीराउ पडित प्रधान याकडून राजश्री बाबूराव मल्हार व धोंडोपत * आले नबाबास फार वेथा होती परम श्रम पावले पुन्हा जन्म जाला मुख्यासही पुन्हा जन्म जाला श्रिस्टीचे भाग्य प्रतिपाल होणे, यानिमित्य उभयता वाचले याचे भेटीस तीन वार लागले वेथेमुळे खानदौरा व वजीर याचे भेटीस गेले नवाबास आरोग्य जालें मग भेटीस गेले आता काली मुख्याकडे नवाब गेले होते आनि बोलीचाली सुरू जाली आहे पाहावे काय होते ते आह्मास आज्ञा वरचेवर आली कीं आह्मी नवाबापासी राहाणें आज्ञाप्रा आसो परतु स्वामिकार्ये नाहीं कीं आमकें कार्ये दिलीतील प्रसग नाव समर्थ प्रा राहावे खरें स्वामी कृपाळु होऊन आज्ञा करितील तेंव्हा येऊ नवाबानी नवी फौज ठेविली ते दूर केली वरकड फौज दक्षिणी दक्षणेस रवाना केली हुजूर पाचसें सातसें स्वार दोन हजार प्यादा मात्र ठेऊन वरकड वाटे लाविले आजसरी खानही रवाना जाले त्यासमागमें रत्नाकर सोनदेऊही पाठ विले सेवक मात्र आहे येथे स्वामिकार्ये आसतें सेवक राहाता तर येथायोग्य होते तैसे मयाराम आहेत मजही आज्ञाप्रा राजश्री प्रधान माळवे प्रातें आहेत वरचेवर सेवेसी वृत्त लिहितील आसतील सेवेसी श्रुत होय वरकड सविस्तर वर्तमान लाला मयाराम लिहितात सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

नवाब आसफज्याह यानी छ १ रबिलावली आह्मास बोलाऊन खिलवतात सागितलें माहाराजाचा व आपला श्नेह त्याची रोटी व आमचा जान त्याजवळ आहे यैसियास पहिले आम लासाठी मुज्याएतखानाची ते आवस्था जाली साप्रत आलग व मदनगड हे दोन किले मावल्यानी घेतले नासरजगाचे तो पत्र नाही परतु तेथून खबर पातशाहास खुद गुजारली त्याणी नवाबाकडे पाठविली तेन्हा आह्मास बोलाऊन आसे सागून आज्ञा केली की माहाराजास लिहिणे श्नेहाच्या विचारात हे गोस्ट काय ! माहराजाची पत्रे आह्मास समाधानाची येतात आह्मीही त्यास लिहितो असतो तर तुह्मी हे वर्तमान लिहून किले ज्याही घेतले आसतील त्यास ताकीद करून नासरजग याचे विद्यमाने किलेदाराचे हवाले करवणे नवाबाचे सागितल्यावरून सेवेसी विनती लिहिली आहे सेवकास तो वरचेवर आज्ञा की नवाबाजवळ राहणे आज्ञेप्रा आहो त्यास मोगलाई या प्रकारची त्यामध्ये मुख्य पादशाहा येथे हे सेवकास काय ह्मणत आसतील ते सेवेसी परस्परे श्रुत होत आसेल नवाब ह्मणो लागले की नासरजगास आह्मी माह(रा)जाचे भरवसियाने ठेऊन आलो आसता हे गोस्ट कैसी आहे ! नवाबानी फार श्रमी होऊन बोलिले आहेत हे पादशहात आहेत, आमिराचा इतफाक नाही यैसे मनात आणू नये त्यास माहाराज समर्थ आहेत आज्ञा त्याप्रो सेवेसी लिहिल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ This is a news letter reporting the affairs of Delhi after

---

† सातारा म्यूझियममधील पारसनिसांनीं करून ठेवलेल्या नकलेवरून * धोंडो गोविंद

the departure of Nadirshah, and the plans and intentions of Nizam-ul-Mulk

---

*No 270* ] [ Early 1739

श्री

विनती उपरी साप्रत वर्तमान येसे आहे पहिले फरुखसियेर पातशाहाचे वेळेस पैद् माहालिकखा-नाजवळ माल्ल्याचा दिवाण होता या प्रातास कुल वाकिफ आहे देशमुलूक पाहून गेला आहे तो इन राच्या (इरानच्या) मुलकास जाऊन दैवयोगे तेथील पाद्शाहाचा वजीर जाला कितेक फौज व लोक त्याचे हुकुमात जाले आणि काबू पाहून पातशहास मारिले आणि आपण आपले नाव तेंच तमाचकुलीखान ठेऊन पाद्शाहा जाला आहे फौज व सरजाम भारी, खजाना पुष्कल, तिकडील मुलुक तमाम काबीज केला त्यानतर इकडील पातशाईच्या सरहदेस खदार थोर जागा व किल्ला भारी आहे तेथें स्वारी करून फार दीस भाडण जाले तिन्हाइत मातबर पठाण ते स्थली होते त्याचा गुलामानीं फितवा करून दरवाजे उघडोन किला इरानेकरास दिल्हा तेथे त्यानीं आपला बदोबस्त केला त्याउपरी लस्करास आज्ञा केली कीं चालीस मुकाम आहित तदनतर फार दूर जाणे, मोहीम मसलत आहेत तयार राहाणें इकडे यावयाचा विचारात आहेत याचा मुलूक दखानीत येतो सरजाम सामान फार, पातशहाची जाली उभी राहेत तैसा आहमिकिफ (?) उभा राहतो पासष्ट हजार स्वारावर चालतो त्याचा वेलची आला आहे मागून आणिकही खबर स्वार येतो त्या चिंतेत आवघे आहेत जिकरियाखान आबदुल समद्खानाचा पुत्र याजपाशी खजाना नाव फौज भारी आहे जमाव करीत आहे परतु यासी रागी आहे त्यानीं मुल्तान देखील घेतले १

याजकडील पठाण खुबयारखान लटी वगैरे काबूल व कशमीर व थटा देशात दोन लक्षपर्यंत जमा होतील परतु याचा समय विपरीत येशाचे नाव नाहीं इरानकरासी धार कोणी घेतोसे दिसत नाहीं जिकडील तिकडे विराम पावतात ईश्वर इच्छेने घडेल ते पहावे १

राजश्री आभयेसिंगानीं साभर घेतले आजमेरच्या विचारास लागले तेही घेतलेच आसेल ऐसा वार्घेत चालले आहेत हुकूमआद्कलम काही राहिला नाहीं १

राजाधिराज याही चाकरीचे नाते धरून मुलूक इजारा केला आहे त्याचा प्रसग फावले तेथवर आपले हस्तगत किले होते तेथपर्यंत करितात बऱ्हाणमुलूक सादतखान यानी फौजबदी करून बैसले पैलाव पूर्व देशात आपले बळें आहेत येथील आज्ञा हुकूम मान्य नाहीं आगरियाचा मुलूक जाटाखाले चबले अलिकडील गुनला आहे ते अधिस्टाण जाटाचेच जाले १

येथे वजीर आजम केवलवनी त्याचा एक मार्ग पातशहानी बोलाऊन मारितो म्हटलें तर सिध दुसरा विचार काही वेडे वाकडे जाणत ना येकनिस्ट आहेत १

आसफज्याह गतवरशी आले आगरे माळवे हे सुभे घेतले खजाना घेतला दिग्विजये केला तो प्रसग प्रसिधच आहे आता हुजूर आहेत वेथा फारच कठिण जाली होती फार श्रम जाले परतु श्रीकृपेनें आरोग्य होऊन कुशलरूप आहेत १

खानदौरा, सुरत व पराक्रमाची चर्चा करू नये परतु मुख्य त्याचे लगामी मसलतीस ते आहेत त्याचा विचार आपणासाठी आवघे बुडले तर बुडो परतु आपले देवार्जन महत्व जतन आसावे १

दिलीत धुध ती कोणावर मार्ग चालत नाहीं मुख्य दुर्गात आपला बदोबस्त करून सुखरूप विशेये सुखात नम न आहेत मागे वेथाही फारच कठिण सेवटी समयास काही बाकी नव्हती परतु श्रीकृपेने जनविस्वाचे भागे मुख्यास क्षेम होऊन सुखरूप आहेत. १

नवाब आसफज्या यास पुत्र जाला आहे त्याची शादी करितात पातशाहानी नौबत वाज वावयाचा हुकूम दिल्हा या शादीच्या आनंदास वजीर देखील सहकुटुंब येऊन शादी केली १

आलग व मदनगड हे दोन किले घेतले ह्मणून वर्तमान पातशाहास आर्ज गुजरली त्यानी ते वर्तमान नवाबापासी पाठविले यानी सागोन पाठविले, आह्मी येथे आहो मागे हा विचार होतो आह्मास नवाबानी बोलाऊन आज्ञा केली महाराजाचे भरवसियाने नासरजगास ठेऊन आलो मागे श्रेहाच्या विचारात हे काय ! तुह्मी महाराजास लिहिणे नवाबाच्या सागितल्यावरून लिा। आहे १

नवाबास वेथा फारच जाली होती आरोग्य जाल्यानतर माहाराजास आपले वर्तमान श्रेहा-करिता थैली पाठविली आहे त्याचे उतर सभजस श्रेहयुक्त पाठवावे राजश्री रघोजी भोसले यानीही येंदा नाव केले दिल्लीत त्याचा लौकिक जैसा तैसा जाला आहे बराच जाला आहे

☞ This is a report conveying news from Delhi regarding the antecedents and the plans of Nadirshah The report explains the situation and the circumstances of the Emperor and his grandees

---

*No 271* ] [ 1739

श्री

नकल बापूराव

पुरवणी श्रीमन राजश्री पतप्रधान स्वामीचे सेवेसी विनती

वगैरे सवाजीकडील सर्व गेले येथे कोण्ही नाही आह्मी येथे आहो आह्मास पुंजी ह्मणजे स्वामीचे पुणे आहे अधपुत्राचे समागमे जीव जगवितो पुढे निघावयाचा प्रसग देखोन तरी त्याचे विचारे निघोन राहिले विनती इकडील प्रसग निर्वी श्रिस्ट होत्या नाही हे जोपरयत निश्चयरूप हाय, आमचे लिहिले सेवेसी पोहचे तोपरयन करारप्रमाणे सिवाये मालवा (?) दखल कोठे न करावा इतकी विनती मान्य आसो धावी यात तफावत पडल्यास आमचे जीव जगणे कठिण होईल आपले करारात तफावत पडल करारात तफावत आमिरलउमराव आहे तोपरयत होऊन आला पाहिजे यास्तव विनती लिहिली आहे विदित होय हे विनती

☞ The Peshwa's agent reports to him news from Delhi and advises him to keep to his word

---

*No 272* ] [ 17 July 1739

श्री

नकल

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराव पडित प्रधान ता। रुमाल नाईक भील सु॥ अर्बा मया व अलफ तुह्मी विनतीपत्र पा। प्रविष्ट होऊन सविस्तर विदित जाले तुह्माविसी रा। दुलबाजी झेडे व नारो भिकाजी यानी लि॥ त्याजवरून कळो जाले तरी तुह्मी कोणे गोष्टीचा वसवस न धरिता रा। दुलबाजी झेडे व नारो भिकाजी यास रुजू होऊन मारनिलेसमागमे हुजूर भेटी येणे भेटीनतर जे आज्ञा करणे ते केली जाईल हरयेकविसी गौरव करून चालविले जाईल जाणिजे छ २१ रबिलाखर आज्ञाप्रमाण •

☞ Bajirao invites Rumal Naik Bhill for a personal interview He was the leader of the Kolis, who had rebelled

श्री

*No 273* ] [ 29 September 1739

नकल

मु॥ राजश्री दुलबाजी झेडे व नारो भिकाजी[1] गोसावी यासी—

सु॥ आर्बैन मया व अलफ वरघाटचे भील कौलास आले त्यास कौल द्यावे तलघाटचेही कौल घेतीलच त्यासही कौल देणे गल्यात लाखेरर सिके करून रयेतावियास लावणे जे कौल न घेतील त्याचे पारपत्य करणे कौल घेऊन नाईक माणूस रहतावियाने आस्तील त्याचा हाक पका मुद्दामत जो काही आसेल तो चालवोन रयेतेस उपसर्ग न लागे, मुलूक आबाद होये ते करणे येविसी राजश्री पिलाजी जाधवराव यास लि॥ आहे ते आपल्या कमाविसदारास लिहितील ते व तुह्मी मिलोन भिलाचा बदोबस्त करणे रुमाल नाईक शहरी मोगलाईकडे आला आहे त्याजकडे पेगाम करून कौल स आला तरी आणने न यव तरी त्याच्या तलाशात राहून पारपत्य करणे जाणिजे छ ६ रजब आज्ञा प्रमाण

☞ This letter conveys the Peshwa's instructions about the suppression of the rising of the Kolis above and below the Ghats, and about the rehabilitation of the disturbed territory

---

श्री

*No 274* ] [ 23 December 1739

नकल

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराव पडित प्रधान ता॥ केम नाईक सु॥ आर्बैन मया व अलफ रो॥ दुलबाजी झेडे व नारो भिकाजी यास तुह्मी भेटून आपली हकीकत किनेक सागितली ते साकल्य मारनिलेनी हुजूर विदित केली त्याजवरून तुह्मास आज्ञापत्र सादर केले असे तरी कोणेविसी वसवास न धरिता दर्शनास येणे जाणिजे छ ३ सवाल आज्ञा प्रमाण

☞ Kem Naik Bhill who had rebelled is invited by Bajirao for a personal visit

---

श्री

*No 275* ] [ 14 Junuary 1740

आसीर्वाद उपर तुह्मी जासुदासमागमें पत्र पाठविले ते शनवारी सध्याकाल जाल्यावर ती घटका रात्री पावले मस्तानीची भेट पूर्वी दोन च्यार वेल जाली, तेव्हा समागमे माणसे घेऊन चितात सदेह धरून येत असे त्यावरून तुझ्या चितात सदेह असला तर यावेसे नाही त्यावरून येकटी माणसे समागमे न आणता येऊन भेटून गेली हे वर्तमान सौभाग्यवती ताईस कलले, त्यानी कृष्णभटाजवल भाषण करणे ते केले तुह्मासही लिहून पाठवितील यास्तव जाले वृत ते लिहिले असे व ताईचे वर्तणुकेचा अर्थ लिहिला आहे ह्मणून लिहिले ते कलले येसियास रावता असल्याने कार्य करावयास तजवीज फार लागणार नाही, येसे आम्ही तुह्मास लिहिलेच होते

---

१ पेशवे दप्तर भा ९-२१ मध्ये आलेला नारो भिकाजी व हा एकच असावेत

तुह्मी रावना राखून ठेवला आहे उत्तम आहे कार्य करणे तेव्हा अडचण पडणार नाही छ २५ सवाल सोमवार प्रात काळ प्रहर दिवस *

☞ Chimaji Appa writes to his Nephew Nanasaheb asking him to gain the confidence of Mas'ani, with a view to her being arrested upon which they had decided

No 276 ] [ 26 January 1740

श्री

नकल

राजमान्य राजश्री नारो भिकाजी दि॥ राजश्री बापूजी मेघशाम गोसावी यासी–

सेवक बाजीराव बल्लाल प्रधान नमस्कार सु॥ अर्बैन मया व अलफ स्वादेश प्राते भील आहेत त्याचा हाक प्रगण्यात गावगना आहे त्याजविसी प्रगण्यास ताकीदपत्रे सादर केली आहेत तरी तुह्मी जमीदारास ताकीद करून पेशजीपासून सुदामत चालत असेल त्याप्रमाणें भीलास हाक पावते करणे जाणिजे छ ७ जिलकाद आज्ञा प्रमाण

☞ Bajirao instructs Naro Bhikaji to pay to the Bhills the rights which they were accustomed to have in every village in accordance with former usage

No 277 ] [ 29 June 1745

श्री

पा: छ २२ जमादिलाखर

विनंती उपरी स्वामीनी पत्रे छ ४ जमादिलावलची धसाणनदीचे मुकामीची पत्रे पाठविली ती छ ८ जमादिलाखरी पावली तेथे लिहिले ते सविस्तर कळले त्याची उत्तरे पूर्वीच सेवेसी पाठविली आहेत प्रस्तुत अधिकोतर लिहिजेसे नाही राणबामल्हारच्या भेटी जाल्या बुंदेलियाचा मामला विल्हे लागलियावर होईल वर्तमान ते लेहून पाठऊन ह्मणून लिहिले ऐसियास प्रस्तुत आपण कोठे आहेत, पुढे कोणतो मनसुबा योजिला आहे तो लेहून पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे वरकड पाच हजार रोयाचे आरसे आद गज, गज, दोन गज पावेतो खरीदी करून ठेवणे ह्मणून आज्ञा ऐसियास स्वामीनी पूर्वी येविसी लिहिले होते, त्यावरून तरतूद केली आहे त्याप्रो खरीदी करून ठेवितो वरकड कितेक फर्मासीविसी आज्ञा केली तर जे तरतूद करणे ते करून रा। छ ९ जमादिलाखर बहुत काय लिहिणे हे विनंती

☞ The Peshwa is informed by his agent in the north that he would procure and supply the looking-glasses as orderd Ranoji

* सर्व पत्र चिमाजी अप्पाच्या हातचें आहे पारसनिसानीं मस्तानीच्या सबधात इतिहास सग्रहात पाच पत्रें ( ऐ चर्चा ३-१-४ व ऐ टि २-७ ) छापलीं आहेत ता २६-१-१७४० रोजीं नानासाहेब पेशव्यानें मस्तानीस कैद केलें त्यापूर्वी त्याला तिच्यासबधात काय काय कारस्थानें करावीं लागलीं तें या पत्रावरून दिसून येतें ता १७ सवालचे ह्मा आठ दिवसापूर्वीचें चिमाजी अप्पानें नानासाहेबाला लिहिलेलें एक पत्र व आणखी पाच सहा पत्रें ' पेशवे दप्तरांतील निवडक पत्रें भा १ ' मध्यें छापलीं आहेत

Sinde d ed on 3 July 1745 and hence the date of the letter can be determined.

---

*No 278* ] [ 28 July 1746

श्री

राजश्री सुलतानजी निकम गोसावी यासी,—

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद सु॥ सबा अर्बैन मया व अलफ तुमचे प्रयोजन आहे तरी तुह्मी पत्रदर्शनी हुजूर येणे घोडादेखील येणे जाणिजे छ २० रजब * बहुत काय लिहिणे *

☞ Sultanji Nikam is asked by the Peshwa to come to his presence without delay

---

*NO 279* ] [ 9 July 1747

श्री

राजश्री नेगोजी भोसले गोसावी यासी,—

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद सु॥ समान आर्बैन मया अलफ बालसुंदर हती सरकारचा याचे राबणुकेस सिरगावचा माहार पधरा दिवस करार केला असे पधरा दिवस राबवणे जाजती न राबवणे जाणिजे छ ११ रजब माहार राबाव यास येईल त्यास दररोज केली मापे ८८१ येक सेर प्रो अडिसेरी दाणे जोरी बाजरी देणे जाणिजे छ मार × गतवर्षी देत असला तरी या वर्षीही देणे याउपर पधरा दिवस जालियाउपर दुसरे माहार देविले जातील जाणिजे छ मार ×

☞ Negoji Bhosle is ordered by the Peshwa to entertain the Mahar of Sirgaon for a fortnight in order to tame the Govt elephant named Sundar

---

*No 280* ] [ 1749 ?

श्री

| | |
|---|---|
| १ शाहू माहाराज | १ रामराजे |
| १ सभाजी राजे | १ मल्हारजी होळकर |
| १ नानासाहेब | १ जनकोजी शिंदे |
| १ जनार्दन बाबा | १ जानोजी भोसले |
| १ भाऊ | १ साबाजी भोसले |
| १ विश्वासराव | १ दमाजी गायकवाड |
| १ माधवराव | १ समशेर बहादर |
| १ नारायणराव | १ येसवतराव पवार |
| १ माहादोबा | १ रायाजी पवार |
| १ रामचद्र बाबा | १ जानोजी निंबाळकर |

---

* पत्राचे बाजूला पेशव्याच्या नावाचा सिक्का व शेवटी लेखनसीमेचा सिक्का

× लेखाचे बाजूला व शेवटीं पेशव्याचे सिक्के

१ बाबूराव फडणीस
१ बाबा
१ त्रिंबकराव मामा
१ माधवराव मामा
१ आबा पुरधरे
१ विठ्ठल शिवदेव
१ नारो शंकर
१ त्रिंबकराव सिवदेव
१ धोंडो दत्तात्रय
१ नाना पुरधरे
१ बलवतराव गणपत
१ गोपालराव
१ गोविंद् शिवराम
१ कृष्णराव पार (स) नीस
१ आयाबा मजमदार
१ आबा मजमदार
१ महिपतराव चिटणीस
१ नारो आपाजी
१ गगाधर यशवत
१ अताजी माणकेश्वर
१ रामाजी अनत दाभोलकर
१ रामाजी माहादेव
१ शकराजी केशव
१ विसाजीपत आठवले
१ बालकोबा
१ अताजीपत तात्या
१ भिकाजीपत आणा
१ माहादाजीपत
१ चिमणाजी नारायण सचिव
१ येमाजीपत
१ गमाजीपत
१ दिनकर महादेव
१ मोरो बलाल पटवर्धन
१ वासुदेव जोसी
१ नारो त्रिंबक सोमण
१ नारोपत राजमाचकर
१ कृष्णराव चासकर
१ नारो रामचद्र
१ कोनेरपत एकबोटे
१ लक्ष्मणपत एकबोटे
१ रामचद्र जाधवराव
१ कविजग
१ मानाजी आगरे
१ मुजफरजग
१ इभ्रामखान
१ पिलाजी जाधव
१ सटवोजी जाधव
१ जानोजी ढमढेरे
१ माहादजी नाईक निंबालकर
१ चिमणगिरि
१ कृष्णा पलाडे
१ खडोजी माणकर
१ रुद्राजी धुलप
१ इद्रोजी कदम
१ सोनजी भापकर
१ तुकोजी शिंदे
१ अबरोजी सिंदा
१ राणोजी सिंदा
१ बहीरजी सिंदा
१ मीरखान टोके
१ राम सावत
१ रुकनुत दौला
१ शाहाजीनाईक निंबालकर
१ नागोजी सिंदे
१ बालोजी पलाडे
१ आपाजी मुढे
१ हरभट केलकर
१ गोविंदभट काले
१ भैरव जोसी
१ पाडुरग जोसी
१ वासुदेव दीक्षित
१ धोंडजोसी श्रीवर्धनकर
१ बालभट उपाध्ये
१ शकरभट चक्रदेव
१ विश्वजित याजी
१ बाबा वैद्य
१ शिवराम बावा
१ जयदेव जोशी चौककर
१ धरणीधर देव चिंचवड

१ जिवाजीपंत अणा
१ राघो शिवराम
१ सदाशिवपंत गद्रे
१ रामाजीनाईक भिडे
१ आबाजीनाईक जोशी
१ गोविंद हरि
१ नीलकंठराव
१ भगवंतराव बर्जुजी
१ येशवंतराव पोतनीस
१ येशवंतराव पानशी
१ भिवराव पानशी
१ गोविंदराव गोले
१ दादोपंत वाघ
१ बाजी हरि
१ बाबूराव दीक्षित
१ रामाजीपंत बर्वे
१ थोरले गुरुजी
१ बाबूराव लिमये
१ बापूजीपंत
१ गणेशपंत पेंडसे
१ निळोपंत
१ हरिपंत भानु
१ आपाजीपंत भानु
१ रामचंद्रपंत भानु
१ इच्छाराम शंकर
१ गंगाधर परशराम
१ जगोबा ऐतोले
१ सदाशिव बाबाजी वैद्य
१ राघो गोविंद
१ गोविंद बलाल बुंदेले
१ माहादाजी गोविंद
१ गोविंद शाम (रा) ज
१ सदाशिव रघुनाथ घाणेकर
१ हरि सिवराम
१ गणेशपंत दामले
१ रामचंद्रपंत परचुरे
१ नारायणराव घोरपडे
१ चिंतो अनंत
१ आपाजीराव गाडगीळ
१ शामराव अंबाजी
१ दादा फडके
१ कोंड दीक्षित
१ शंकरभट पटवर्धन
१ भैरालभट पुराणिक
१ बाबूभट पालदे
१ लक्ष्मणभट वैद्य
१ बालकृष्णशास्त्री
१ कृष्णशास्त्री
१ अपाभट करंदीकर
१ बापूभट घारपुरे
१ कुटुंबशास्त्री
१ बाबूराव सिवराम अमात्य
१ हरिपंत भावे
१ भगवंतरा (व) प्रतिनिधि
१ बाबाजी प्रल्हाद
१ हैबतराव भवानीशंकर
१ शामजीपंत दि॥ मजकूर
१ आबा पेठे
१ जगनाथपंत आसेरकर
१ रामचंद्रपंत भुसकुट्याचे पुत्र
१ आनंदराव सचिव
१ कोनेरराव त्रिंबक
१ भवानराव प्रतिनिधि
१ बाबूजीनाईक जोशी
१ रंगराव माहादेव वोढेकर
१ कुशाबा पानसी
१ जगनाथपंत पेंढरकर
० पांडुरंगपंत घाणेकर
१ आबाजी महादेव
१ अंबाजीपंत फडके
१ विष्णुपंत गद्रे
१ मोरो माधवराव
० आपाजीराव गाडगील
१ खंडोपंत मामा
१ गोपाळ संभाजी
१ जगनाथ देव
१ बच्याजीपंत बर्वे
१ गंगाधर शंकर
१ नारो कोनेर

१ गंगाधर शामराव
१ मल्हाररपंत
१ दाजी त्रिंबक
१ बाजीराव बावडेकर
१ नरसिंगराव घोरपडे
१ गणपतराव मेहेंदळे
१ हरि दामोदर
१ रघु राजवाडे
१ खंडोपंत पानसी
१ मोरोबा नाईक तांबेकर
१ गोविंद मल्हार
१ विठ्ठलराव मल्हार
१ माधवराव शिवदेव
१ शंकराजीपंत
१ परशराम माहादेव वकील
१ सिवाजी बाबाजी
१ यादोपंत जोग
१ माहादाजी यादव भिडे
१ पांडुरंगपंत खेडकर घाणेकर
१ सदाशिवपंत येकाक्ष
१ बालोबा मांडवगणे
१ मोरो विठल
१ लक्षुमणपंत धडफले
१ गोपाळपंत देशपांडे
१ विष्णु विश्वनाथ राणिदे
१ मल्हारराव रास्ते
१ भिकाजी नाईक रास्ते
१ कृष्णाजी नाईक रास्ते
१ नाना रास्ते
१ मोरोपंत गोले
१ गोपाळराव बापूजी
१ शिवाजी बलाल
१ कृष्णाजी नाईक कोलटकर
१ कृष्णाजी नाईक भिडे
१ तुबाजीपंत
१ लक्षुमण बलाल गुणे
१ रामाजी बलाल गुणे
१ बाबुराव कोनेर
१ नाना जोसी

१ बलवंतराव वैद्य
१ अंताजीपंत गुरुजी
१ हरि अनंत दाभोलकर
१ राणोजी शिंदे
१ दत्ताजी सिंदे
० सुभानजी जाधव
१ बगाजीपंत देशपांडे
१ रेणकोपंत
१ शिवाजीपंत भोसल्याकडील
१ भगवंतनाईक थत्ते
१ महादशेट वीरकर
१ सिदापासेट वीरकर
१ घनशेट फरजे
१ मल्हारराव रेटरेकर
१ नारायणराव बापूजी रेटरेकर
१ यमाणा चिकोडकर
१ कृष्णाजीपंत बागलकोटकर
१ राहूजी महादेव
१ राघो लक्षुमण
१ बाबाजी पुरंधरे
१ खंडो गोमाजी
१ धोंडोबानाईक नवाले
१ आत्माराम नाईक नवाले
१ नारोपंत वाडदेकर
१ शंकराजीनाईक भिडे
१ सिवराम नाईक भिडे
१ लक्षुमणपंत दि॥ भिडे
१ रामकृष्ण गोविंद पैठणकर
१ गोविंदपंत तुटके
१ गंगाधर बलाल वोक
२ राघोपंत कोशे व चिरंजीव
१ गोपाळपंत कोशे
१ नारोपंत कुरणे
१ भिकाजीपंत फडके
१ निलकंठ शिवराम
१ येशवंतराव भास्कर
१ आपो सखाराम
१ वामनराव गोविंद
१ नारो बाबाजी पारनेरकर

१ बालाजी येमाजी रामचंद्र बसवंत

१ गंगाधरपंत मेहेंदळे
१ रामचंद्रपंत मेहेंदळे

☞ This is an ample list containing names of all important persons at Maratha Court or in Maratha employ about the last days of King Shahu A similar list of inhabitants of Poona for the year 1793-94 has been published by Parasnis in Itihas-Sangraha ऐ टि भा ६ ले २ A similar list will be found at no 54, vol 45 of P D selections

---

*No 281* ] [ June 1750

श्री

पुा। तीर्थरूप राजश्री नाना व ता। राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी—

विनंती बाबूजी नाइकास वस्त्रे जाहाली * मातबर गुता बा कितेक प्रकारच्या हिकिर्ती नाइकाच्या वस्त्राचे समई येऊन खाल्या परंतु खामाखा राजश्रीस बरे वजेने आर्जे समयोचित समर्पक ठीक करून वस्त्रे बहुमान येथास्तित नाइकाच्या मर्जीनरूप केला सांप्रत राजश्री आम्ही कारभार करावा व आपण ऐकावे या गोष्टीवर तूर्त वजे ( ? ) दर्याबाईच्या सरंजामाचे अभिषेकरून आहेत आम्हीही बहुत नरम मर्जीने आहो दरबारास जात असतो किरकोळ आपल्याकडील कामे करून घ्यावी, येविसीची याद पूर्वी सेवेसी पाठविली होती त्याप्रमाणे या दोचौ रोजात दरबारास जाऊन लिया उपरी स्वामीनी याद राजश्रीसी बो ली तिचा मार करावा येविसीचे सवि सेवेसी लिहिले आहे त्याचे उतर आले ह्मण उदैक येमाजीपंताची माणसे × बाडावर आहेत ती आमचे हवाला करावी येविसीचे बोलणे स्वामीच्या, आज्ञेप्रमाणे राजश्री पाहिजे राजश्री नाठ होऊन जाबसाल करतात किंवा समज्यजपणे चितात सर्व अर्थ दूरदेसी आणून आमचे हवाली माणसे करतात भाऊ गडावर आहेत त्यास मिलाली भेटी जाहाल्या चिमणोबाचे पत्र आले, ते सेवेसी पाठविले आसे येथून बोधे, बरगे, धायगुडे, सेल्के, साल्पेकर, भास्कर हरीकडील मिळोन दोडशे राऊत मारनिलेकडील पाठविले लखजी बोध्या मग आमचा घोडा येडका त्यास फार दिवस राहुटीही देऊन रवाना केले —राऊत सुलतानराव जाधव व आत्माराम हे दोघे चालीस पन्नास आहेत कळले पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Trimbak Sadashiv Purandhare writes to Balaji Bajirao from Satara, communicating the attitude of Chhatrapati Ramraja and the appointments made by him

---

*No 282* ] [ 14 October 1750

श्री

यादी
किले

४ सरकारात ठेवावे
१ चादवड

माहाल यावे
४ दौलताबाद सरकारपैकी
१ राजदेबर

---

* पहा पेशवे दप्तर भाग ६ ले ७३ × पहा पे द भा ६ ले ७४

| | |
|---|---|
| १ धोडप | १ ग्यालिसगाव |
| १ हर्षे | १ मेहुणबारे |
| १ रामसेज | १ माणिकपुज |
| ४ | ८ |
| १२ यावे | १ ज॰गाव प्रा। वराड |
| | ५ |

१ खला
१ जवला
१ हणमत
१ काचना
१ अचला
१ देवर
१ राजदेवर
१ मार्कंडी
१ सोनगड
१ पेमगिरि
१ इद्राई
१ निंबगिरि
जवलचा हणमत्या
१२
१६

नासरजगाचे वेलेस अमल चालत आला त्याप्रो चालवावा जफ्तमुळे व जागा जागा कमावीसदार उपद्रव करितात त्यास ताकीद करावी जो कोणी लबाडी कराल त्यास दूर करावें याप्रमाणे करार

याप्रमाणे तहाचा मजकूर जाला असे यावेरीज फिरकोली कामे सदरहू य द राघो गणेश याजकडे ऊ ५ जिल्हेजी रवाना केली असे

☞ This is a provisional list of forts and districts for a treaty of exchange between the Nizam and the Peshwa

---

*No 283* ] [ 5 October 1753

श्री

**राजश्री बाबाजी विठल गोसावी यासी,—**

अखडितलक्षुमी अलकृत राजमान्ये श्रो हैबतराव जाधवराव दडवत सु॥ सन आर्बेन खमसेन मया अलफ सन ११६१ मामलती राजश्री नारो माहादेव याजकडे सागितली आहे याचे तरफेने तूर्त दखलगिरीस रा पाठविले आहेत तरी तुह्मी व हे येक्त्र होऊन येक्या विचारे कामकाज करीत जाणे सुसार वगैरे सालमारचा पैसा जो व किंमत येईल तो याचे स्वाधीन करणे याचे इतल्यासिवाय कामकाज न करणे जे कामकाज करणे ते तुह्मी व हे येकत्र विचारे राहून करीत जाणे बहुत काये लिहिणे रा छ १७ जिल्हेज मार्तब सुद ×

☞ Babaji Vithal is instructed by Haibatrao Jadhav to work the mamlat in full cooperation with Naro Mahadev

---

× येथें दुसरा शिक्का आहे तो,-श्री राजा शाहू चरणी दृढभाव सभाजी सुत सताजी जाधवराव

*No 284* ] [ 4 Noveber 1753

श्री

छ १५ सफर

श्रीगजानन

श्रीमत स्वामींचे सेवेसी

विनंती कासीद येक मारफत मिर्धा लालदास तेविसा दिवसाचे वाइदाने जरूरी पत्रासहित मुजरद जयेनगराहून पाठविला असे करार रुपये २२ बावीस त्यासी ज्या रीतीने पावेल त्याप्रों अजुरा सरकारातून इनायत होय रा छ ८ माहे मोहरम प्रथमकाल हे विज्ञापि

☞ The Peshwa is informed by his agent, at Jaipur that a special messenger Laldas was despatched by him with letters on a stipulation of Rs 22 being paid to him

---

*No 285* ] [ 12 December 1753 ?

श्री

छ २० रबिलावल

श्रीगजानन

श्रीमत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसी,—

आज्ञाधारक गोविंद तमाजी* कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत छ २५ माहे सफर मुक्काम जयेनगराहून पैलाड कसबे मनोहरपूर स्वामींचे प्रतापें येथास्थित असे विशेष येथील प्रसंग तर पूर्वी मुजरद कासिदासमागमें लेखन करून विनंतीपत्र सेवेसी पाठविलें असे त्याजवरून सर्व अवगत जाहलें असेल, व हालींही जें काहीं नवल विशेष प्रत्येक पुर्वणीवरून श्रुत होणार. मागतीं जे काहीं होऊन येईल विनंती सो केली जाईल सार्वभौम तर छ १७ तरिखेस दाखल दिलीस जाहले, व वजिरुलमुमालिकही निशापातीX बगश व रोहिल्याकडील झाडून घेऊन लवकरच येणार कुचाची तयारी कुल कारखानेजात जसेचे तसेच ठेविले वजीर अल्यानतर अगरें व अजमेर या प्रांती कूच होणार, ऐसी वर्तमानी ऐकिली जाते विदित होये बहुत काये लिहिणे कृपा असो दिधली पाहिजे हे विज्ञापि

☞ Govind Tamaji sends news to the Peshwa from Delhi regarding the movements and plans of the Emperor

---

*No 286* ] [ 12 November 1755

श्री

नकल

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दाक्षित स्वामींचे सेवेसी,—

विद्यार्थी बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जावे विशेष वेदमूर्ति राजश्री हरिहरभट † अठवले कासीकर यासी वर्षासण पेस्तर साल

---

* Guaranteed quota of troops

X उपनाव गलगलेकर, मृत्यु १७५५

† पेशवे दप्तर भा ९ ले १९ मधील हरभट हाच काय ?

सन सबापासून शो ७५ पाउनसे रुपये करार करून देविले असेत तर पुढील सालापासून सदरहू पाऊनसे रुपये देत जावे आणि कबज घ्यावे रवाना छ ७ सफर सुा सन सीत खमसैन मया व अलफ वराणसी श्रीमध्ये × पावीत जावे रवाना छ मजकूर बहुत काये लिहिणे हे विनती

☞ Balaji Bajirao instructs Vasudev Dikshit to pay an annuity of Rs 75 at Benares to Harihar Bhat Athavle

———

*No 287* ] [ 11 January 1756

श्री

श्रीमंत राजश्री दादा स्वामींचे सेवेसी,—

विनंती सेवक गोविंद बलाल कृतानेक सा नमस्कार विनंती ता पौष्य शुद्ध दशमीपावेतो स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष अतरवेदप्रांती वजिरानी फिसाद करून तमाम दक्षणी आमल उठवावा हा विचार करून सैद आली असकर कुबरा याजला पा सकोराबाद वगैरे परगणियाच्या सनदा सिरपाव देऊन दिलीहून रवानगी केली त्याज बरोबर सा हजार फौज दाहा बारा हजार प्यादे सकोराबादेस येऊन दाखल जाला तेव्हा जमीदार सर्व जाऊन मिळाले गवारी जात जाजती सैदाबरोबर जमा जाली सकोराबादेस ठाणे बसलें याजमुळें तमाम आतरवेदींत दगा जाला गवार जागजागा टूटू लागले पैसा कोणी देईना सर्वास वारें लागलें आम्ही कालिंजराकडे जाऊन बुंदेल्याकडील कामकाज करावे यास्तव जेतपुरास गेलो तेथे राजे जगतराजजी याजवल रा हरिपतंदी* होते भेट जाली बुंदेल्याकडील कार्य करावे तों इतकियात सकुराबादेकडे फिसाद जाली आतरवेदींत दगा जाला ह्मणौन वर्तमान आलें तेव्हा आम्ही व रा हरिपत सुधा कूच करून दरमजलीनी येमुना उतरोन सैद सकुराबादेहून निघोन इटायेचें ठाणे कायेम करावें इटायेहून चौकोशावर येऊन राहिला इटायेस पोहचला नाहीं तों आगोदर आम्ही इटायेस अलो मोगल इटायेस आगोदर पोंहचता तर बहुतच भारी होता आम्ही दुसरे दिवशीं पुस शुध आष्टमीस भृगुवारीं आम्ही तयारी करून मोगलावर गेलो त्याची आमची गाठ पडली बाण जेजाला तोफें रेहकले याचा मार परस्परे सा घटकापावेतों जाला मोगल भारी खातरेस आणीना जोम विशेष आगोदर पहिले दिवशीं रात्रीस लाहान थोर मराठे सरदार आणून रा हरिपतानी व आम्ही सांगितलें कीं मोगल भारी आहे निदानची गोष्ट येऊन पडली माघारे सरलों तर गवारापुढें निभाव होणार नाही, आणि आतरवेदचा दस्त उठेल, बदनक्षी होईल यास्तव मरावें कीं मारावें, दुसरा विचार नाही, हा इत्यर्थ केलाच होता जुज होऊ लागलें तेव्हा मोगलाकडे आराब बहुत थोडी माणसें जाया होऊ लागलीं तेव्हा सर्व लोकास सागोन स्वामींचे चरणाचे चितात स्मरण करून मोगलावर पसर केली दोन घटका भलीसी तरवार चालली मराठे लोकानी मोठीसी शर्त केली हें त्याचेंच काम आहे खासा असकरआली व त्याचा पुत्र उमरेना हतीच्या हौद्यातच जिवें मारले नागर वगैरे मातबर माणूस दिलीहून सरदार सैदाबरोबर पनास साठपावेतो मारले गेले यासिवाय प्यादे स्वार दीड दोन हजारपावेतो माणूस कापलें तीन हती रा हरिपताकडे आले नगारे निशानें पालखी रथ घोडे वगैरे डेरा सर्व लुटलें सैद निसनाबूद केला आमचे जीव या समई वाचावे येसें नव्हतें परतु स्वामींची पूर्ण कृपा आह्मावर ह्मणून सर्व उत्तम जाले स्वामींच्या प्रतापेंकरून शत्रूचा नाश जाला आम्ही स्वामींचे बारगीर चरणरज, जीवित्वाची अशा धरीत नाही सर्व होतें ते स्वामींच्या प्रतापें होतें अतरवेद

× ह्म काशीमध्ये * हरि दामोदर नेवाळकर, झाशीच्या राणीचा पूर्वज

मातबर जागा हमेशा पाच हजार फौज दक्षणी आह्माजवळ आसावी कामे बहुत मातबर येऊन पडतात, तेऱ्हा फौजेखेरीज आम्ही काय करावे ? रागडे लोक हरामजादे फौजेखेरीज दबत नाहीत फौज पाठवावी ह्मणून विनतीपत्रें स्वामीस लिहीतच गेलों स्वामीनी फौज न पाठविली आम्ही सेवक लोकानी होईल वर्तमान तें सेवेसी लिहावें, फौज पाठवणार स्वामी धणी आहेत सैद मारला ह्मणून वजीर विषाद मानितील आणि मागती फौज रवाना करितील तर दस्त कसा राहील ते पाहावे × कुरा कडा (,करा कुडा) बाबत त्याणे विशम बहुत मानून हे कर्म केले त्यास आशाडमासी रा गगाधर बाजीराऊ याजकडील पथक व मानाजी धायेगुडे देशास ते समई सैद सलाबतखान व हमरुलाखान यास वजिराने सनदे दिली ते पाच हजार फौज व आरब मरून (?) येत होते ते समई जागा जाते हे पाहोन तीन लाख रुो दिलीस कुराचे इजारेयाचे देऊन सलूख केला अलिकडे गुपालराउ आले फिसाद जाली त्याजवर वजिराने कजिया केला त्यास सैद पाठविले त्याचे पारपत्य जाले परतु विना दोहीतून येक जालिया विना येथे ठीक होणार नाही पाच हजार फौज उतम मराठी आसावी तर बसून राखोन सलूख राखिला पाहिजे उगेच काही होत नाही दिली सा मजली त्याचेजवळ जागा सलूख जालियाविना रयेत पैसा न देई याजकरिता प्रस्तुत त्यासी सलूख केला दोन लाख रुो इजारा कुराबाबत आणिक दिल्हे पुढे आपली जबरदस्ती जाली यावर होणें ते होऊन पनास लक्ष रुोयाची जागा सोडून द्यावी कजि यावर गोष्ट पडते पैसा बुडतो, याजकरिता सलूख केला जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे वरचेवर लिहीत जाऊन सेवेसी सायत चिरजीव बाबूराऊ यास लिहिले आहे ते विदित करील सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Govind Ballal Kher sends news of his fights in the territory of the Doab to Raghunathrao Dada, mentioning the hard struggles he had to wage in capturing important stations

---

*No 288* ] [ 27 September 1756

श्री

श्रीमत मातुश्री बाईसाहेबाचे सेवेसी,—

विनती सेवक गोविंद बलाळ कृतानेक सा नमस्कार विनती ता आश्विन शुध त्रितीया पावेतों साहेबाचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष अज्ञापत्र सादर जाले देसचे व दिलीचें वर्तमान लिहिणे ह्मणोन आज्ञा त्यास पातशाहा व वजीर दिलीहून बाहिर निघाले आहेत अतरवेदीत यावे, बखेडा करावा येसा त्याचा मनसबा होता याजकरिता आह्मी आगरि याकडे येऊन वजिरासी सलूक केला कजिया वारून माघारे फिरोन इटावे याकडे आलों इकडील बदोबस्त करून देशास जाऊ प्यादे पाठविले आहेत पावतील कुणबिणी मागऊन देतों श्रीमत स्वामी पुणियात आहेत वरचेवर वर्तमान आपणास लिहीत जाऊन, येथे फौजसुधा चिरजीव बाबास ठेऊन आह्मी देशास जाऊन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना येवजाची हुडी पाठविली ती सेवेसी पावलीच असेल हे विज्ञापना

☞ Govind Ballal Kher writes news from the court of Delhi to Sagunabai Peshwe

---

*No 239* ] [ 1756-57

श्री

नकल भाऊसाहेबाचे हातचे मखलासीची

यादी कलमे नि॥ गोविंद्राव मु॥ सबा खमसेन जामनेर वरणगाव येथील जाजती यैवज तिसाला पावला रुो २७३९० यासी वासिलात

६८१९ आनद्रामाकडे यैवज गेला चाकरी जाहली सबब

१२००० सिबदी जाजती पडल सबब दरसाल ब्यार हजार प्रो

२५०० मागील बाकी मारानिलेची ५७९२॥ पैकी उगऊन देवावे बाकी सोडावे

२१३१९

बाकी यैवज रुो

६०७१ सादर आहे

मोकासियाची वाजवी बाकी आसल ते ताकीद करून देवावी

गायेकवाडाकडील कर्जाचा नवा हिसा सुटणार नाही, आथवा हिसा वजा होणार नाही यैवज हिसे नेमल्याप्रोच पावेल लौकर केल्या सारियाची नेमणूक फिरल यास्तव करता येत नाही

मल्हार गोविंदाकडे मारानिलेचें कर्ज आहे त्यास सरकारचे नजरेबाबत फार करून फिटले थोडेसें राहिले ते पेस्तर सालात फिटतील बाकी यैवज राहील तो त्यास पोटास थोडेसें देणे पडल ते देऊन कर्जाचा दरसाल हिसा मल्हार गोविंदास येईल त्यात दोन हिसे देऊन गोविंद्रामाचें कर्ज वारावें येक हिसियात वरकडास देत जावें

खेड गाव नारायेण येथीचा आकार तिसाला ७०३०॥। पैकी हिसेबी सनदी वगैरे फडशाप्रो वासिलाद होऊन बाकी यैवज रुो २०११।–॥ दोन हजार सवा आकरा रुपये दीड आणा सरकारात घ्यावे

प्रो जामनेर मारानिलेकडे होता त्याचा मल्ल्याचा यैवज व सिवाय वेतन येकदर धरून त्यात वासिलात सरकाररुजु वगैरे सनदी माहाली व्याज व तोटा दरबारखर्च भोजनें वगैरे जाहले ते मजुरा देऊन बाकी यैवज मारानिलेकडे राहील तो सरकारात घ्यावा येकदर जमेपैकी मारानिलेचे बाकीप्रो मजकुरी असल ते सन मजकुरी सरकारातून घावी माहली सरकारातून उगऊन घ्यावी खरी रुजू होईल ते येणेप्रो करावी

मागील फाजीलबा पेशजी खमस सीत मिलोन रुो ३१२९१ पैकी सूट वजा न घ्यावे ६२९१ बाकी २५००० पचवीस हजार

हिसेबी फाजील नख्त रुो ५९८४। ( कापड आख १५६३ माफ करावें ) पैकी हुजरातच्या आसाम्याचा सीतचा यैवज रुो ५००० बाकी फाजील ९८४। पुढे धरावे

सन सबा नालबदी नख्त रुो १४००० रु कापड आख ५००० पाच हजार

बिदरूरचे कतबेबाबत सरकारातून विल्हेसिवाय जाजती मारानिलेनी यैवज दिल्हा रुो ब॥ याद मारानिले रुो ७४४११॥ याचा फडशा सन आर्बामध्ये जाहला की सरकारपावतीसिवाय जाजती यैवज दिल्हा हा रुजुमोइया * सभाजीराजे याजकडील पाहून करावा आसा करार होऊन त्यायैवजी पनास हजार रुो दिल्हे बाकी २४४११॥ चोवीस हजार च्यारसें साडेआकरा हा यैवज तूर्त वोढ सबब देत नाही पुढें सोईने कोठे घावा रुजूमोइयाही आणवावा सदरहु क्षेपनिक्षेप मारानिलेस येखादे जागा नेमून घावें

☞ This is an account submitted to and passed by Sada-

* Actual verification

shiv Rao Bhau, of the revenue receipts of the district of Jamner managed by one Govindrao

---

*No 290* ] [ Received 3 July 1757

श्री

छ १५ सवाल

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत रा पंतप्रधान स्वामीचे सेवेसी—

विनंती सर्व राणाजीचे प्रधान त्यांची चोरीचे रुपये सापडले याकरिता तेही श्रमी व सदासिव माहादव, विष्णु माहादेव याणी तर सर्वास रुशवत* देऊन आपले केले येक दौलतराउ प्रभु मात्र सरकारचे कामावर आहे त्याणे दादासाहेबास सांगितले आहे परंतु वरकड हुजूरचे सर्वत्र विष्णुपंताची हिमायेत× करून सरकारचा पैका बुडवितात दादासाहेब तर बहुताचे आयेकून विचारात पडतात त्यास दादासाहेबास खोलून लिहिले पाहिजे सर्व मंडली चोरीची आशा धरून सरकारकाम बुडवितात हें ध्यानास आणून सदासिव बलाल याची साह्यता केलियाने सरकारकाम करावे चोर पोर अर्ज करतील ते न आयकावी दुसरी विनंती की राणाजीस धमकावितात की सदासिव बलाल यास ठेवाल तर तुमचा मुलक मारू शेवक नर्मदातीरी पोह चलियावर विठल सिवदेऊ याणी विष्णु माहादेव याचे सांगितल्यावरून येक गाव मातबर लुटला व दाहा वीस गावची गुरे नेली तेव्हा राणाजीचे प्रधानाने दादासाहेबास विनंती केली की आम्ही विष्णु माहादेव विठल सिवदेव याचे तरफेने तहासिलेस नेतो ऐसा करार केला तेव्हा उदे पुरचे मुलकातून दादासाहेब निघोन गेले व पुढेही सरकारची पत्रें आलियावर मागती फौज पाठऊन राणाजीचे गाव मारतील तर शेवकाचे येथे राहिल्याने राणाजीचा देशाची खराबी जालिया तोही अर्थ येथे राणाजी तर बालक आहे, परंतु प्रधानादिकापैकी येक दोन शेवकाकडे आहेत, ते ह्मणतात की श्रीमंत रा पंत प्रधान स्वामीपासून आमचे देशाचा बदोबस्त करून ठेवणे त्यास शेवकाची विनंती हेच की शेवकापासी घरची घोडी दाहा वीस आहेत वरकड रामराऊ नील कंठ याणी राऊत १० समागमे दिल्हे की रामराऊ प्रमाणिक त्यासही सरकारकामाचे अगत्य तैसेच रा जनकोजी सिंदे याणीही तमाम कमावीसदारास पत्रे दिल्ही आहेत सिंदेही येकनिश्ट बहुत, की स्वामीनी स्वमुखे समक्ष बहुत सांगितले आहे ते हा काल्पावेतो तों स्वामीचे आज्ञे प्रमाणे आहेत या प्रांती येतील तेव्हा विष्णु माहादेव मागती लबाडी करील तर न कले त्यास येक विनंती हेच की सदासिव बलाल उदेपुरी आहेत तवर मेवाडात रा मल्हारजी होलकर अथवा सिंदे अथवा सरकारची दादासाहेबाची फौज याचे मुलकात येक राऊत न ये फौज आली तर सरहदेवर काव्ड ( ? ) टाकून फौज जाये ऐसी ताकीदपत्रें सर्व सरदारास शपतपूर्वक येतील तर शेवकाचा येथे राहिल्याचा धर्म आणि सरकारचा पैका नवा साधतो निमे राणाजीस पहिलेच आज्ञा आहे ते देऊन उरला पैका सरकारात पावेल तूर्त विष्णु माहादेव सिंयाची तगिरी आये कून विठल सिवदेव याजपासी राहून सरकारकाम बुडवितात स्वामीधर्मी चाकर आहेत सर्व ध्यानास आणावे शेवक तर आज्ञाधारक आसे जे आज्ञा कराव्या ते करून कृपापत्री सनाथ केले पाहिजे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ This appears to be the final sheet of a letter to the

---

* Bribe × Support or protection

Peshwa from his agent in the north, reporting the depredations committed by Maratha troops in Udepur

*No 291* ] [ 1758

श्री

यादी मतालिब राजश्री वजागतमाहा सु॥ समान खमसैन मया व अलफ

राजश्री पंत प्रधान याचा आमचा घरोबा वडिलापासोन चालत आले आला त्यात आह्मा पासून अंतर जाले नाहीं व होणार नाहीं आमची दौलत घेतली आहे ते द्यावी, ह्मणोन विनती आहे आमचे आह्मास देऊन सेवा घयावी १

कार्य सिध जाल्यावर श्रीमंताजवळ विनती करून तुमचे मनोदयानरूप होईल

मसलतीमुळे लोकास देणे घेणे केल्याविना माणूस उमेदवारीने झटणार नाही त्याचा सरंजाम करावा लागल तो येक लक्ष पधरा हजारा खेरीज द्यावा १

सरकारचे लोकास काजाकामामुळे बक्षीस पावल त्याप्रा। तुमचे लोकास अगोधर देऊन

योजले कार्य सकट भेदेकरून साध्य जाले तर बरेच जाले नाहीं तर मोर्चबंदी करून बसावेच लागल शामल डावाडाव करू लागल त्याचा बंदोबस्त उभयेपक्षीकडून जाला पाहिजे, व करावा लागेल हरयेक बोलीचालीचा मजकूर आमचे विद्यमानासिवाय नसावा १

बोलाचाली होणे ती तुमचे विद्यमाने होईल परभारी करणार नाही

सध्या खानगीस व सरजामास रुो
१५००० लोकाचे रोजमरे यास
१००० गरनालाचे कारखानियास
३०० कारीगर
२०० मजूरकरे
५०० खा। मालास
१०००
१६०००

पैकी अकरा हजार पावले याची निशा करून द्यावी सदरहु साला हजार रुो येक लक्ष पंधरा हजारात वजा न करावे १

पधरा हजारपैकी दाहा हजार रोख देविले आहेत हे नमणुकेखेरीज नमणुकेत धरणार नाहीं

जजिरेयाचे अनुसधान केलियाचा अर्थ कलविल्यावरून निशा करून घ्यावयाचा अर्थ अलाहिदा पत्रात लिहिला आहे त्याप्रा। प्रत्ययास आले पाहिजे ह्मणजे चिताची निशा होईल १

सदरहु कलमाचा निशा जाला सागण्यात सुधे दिसते

शामलाची ठिकाणे जंजिरा, पद्मदुर्ग, उदेरी तीन ठिकाणे आहेत श्रीकृपेने फते जालियावर उदेरी आमचे तालुकियात आहे ते आह्माकडे करार करून द्यावी १

तुमचे तालुकेयासंनिध आहे श्रीमंताजवळ विनती करून तुमचे नि॥ लाऊ

राजपूर प्रातीची सरदेसमुखी आह्मास श्रीमंत स्वामींनी दिल्ही आहे, ते आह्माकडे चालती करावी १

महदकार्य जाल्यावर श्रीमंताजवळ विनती करून काम करून घेऊन

मसलतीस व मोर्चेबंदीस लोक राहातील त्यास रोजमरा सेन्याप्रा। दरमहा देत जावा व

दारूगोल्याचा सरजाम लागेल तो द्यावा लोकास सेराची बेगमी करून द्यावी सेरा दर सो १२ प्रो करार करून द्यावा खेरीज अडिसेरी १

समते अडिसेरी बारा सो प्रो जदीद् माणूस ठेवाल त्याची हजिरी घेऊन हजिरी देऊन सिरिस्ता इयामी–

☞ This appears to be a settlement of the disputes which the Peshwa had with the Angre of Kolıba with a view to the conquest of Janjıra The demands of the Angre and the replıes by the Peshwa are detaıled The papar ıs ıncomplete

---

*No 292* ] [ 12 May 1759

श्री

छ १४ रमजान सन तिसा वैशाख सनदा लिहिण

यादी निसबत राजश्री मल्हारजी होळकर व जनकोजी सिंदे सु॥ तिसा खमसैन मया आलफ छ ५ रमजान वैशाख कर्जपटी वगैरे करार कलमे ५००००४ पनास लाख च्यार सो ता

नि॥ होळकर

कर्जपटी वगैरे यैवज कर्जाबद्दल क्षेपनिक्षेप द्यावा सो

२००००० १ किता कर्जपेटी
१००००० १ किता

३००००० २

तीस लाख दोन सो यासी वाइदे

७५००० १ तुर्त आषाढमास अखेरचा पुण्यात यैवज द्यावयाची सावकारी निशा करून द्यावी विष्णु माहादेव गर्दे याचा हवाला फरमावा

७५००० १ कार्तिक शुध प्रतिपदा सन सितैन सावकारबरोबर द्यावे त्याचे पदरी यैवज उजेनीस घालावा तेथे निशा करून द्यावी

१५००००० सन सितैन दसरियास वराता मशारनिलेवर करावा त्यास यैवज क्षेप निक्षेप वरातास पावते करावे

७५०००० जेष्ठ आखेर सितैन
७५०००० सन इहिदे सितैनचे आश्विनआखेर

१५०००००

३००००० २

येणे प्रो तीस लाख दोन सो क्षेपनिक्षेप पावते करावे करार करावे करार

सालाबाज बाबती वगैरे कलमाचा यैवज हिसेब रुजुवातप्रो सितैन आश्विनमासी कापडकरी यास यैवज पावता करावा त्याची निशा करून देवावी करार देणे येणेप्रो करार

नि॥ जनकोजी सिंदे कर्जपटी सो

२००००० २ तीस लाख दोन सो यासी वाइदे क्षेप निक्षेप यैवज द्यावा

५०००० १ आषाढ मास निशा
५०००० १ कार्तिक शुध सन सितैन

१०००००० सितैन दसरियास वराता कराव्या त्यास यैवज पावता करावा जेष्टअखेर पाच लाख व सन इहिदे सितैनचे आश्विनआखेर पावते करावे पाच लाख येणेप्रो दाहा लाख शो

२००००० २

वीस लाख दोन शो येणेप्रो करार करावे आषाढमासचे पाच व कार्तिकचे पाच दाहा तुर्त जाताच सिंद्याची भेट जालियावर सावकारास ज्यास देऊ त्यास काही उजेनी पाच देसी पाच याप्रो दाहा लाख दोन शो कार्तिक मास सितैन ता पावते करावे राहिले दाहा लाख शो वरातदारास पुढे नेमले हप्तेप्रो द्यावे येणेप्रो करार करावे करार

सालाबाज यैवजप्रो सन तिसाचा व मागील वैशाख समानात पावता करावयाचा करार आहे तो त्यास सागून यैवज देसी पाठवावा आगर ज्यास वरात देऊ त्यास दसरा सितैनपर्यंत पावावे करार

पा सुलतानपूर कुकडमुढे पहिलेपासून वजा आहे ते वजा करावे व मोकासा बाडे वगैरे पहिलेपासून तह नेमणूक सरकार आमलात आसेल त्याप्रो त्याचे चालवावे फकीर भट ब्राह्मण वगैरे इनाम आसेल तो चालवावा त्यासिवाय सरकार आमल मागे कई बाबती सरदेशमुखी पेसकजी दिवाणी दस्तुरी वगैरे कुल सरकार आमल जागीर मल्हारजी होलकर सरजाम हाली करार करून सनद द्यावी सनद पैवस्तागिरीपासून याकडे आमल द्यावा सरकारचे कमाविसदारानी यावे, जागिरीची सनद द्यावी देणे

शाहाजी दाभाडे जेरामसा व घासीराम या तिघास दूर करावे दुसरे सालस आमलदार ठेवावे त्याणी सेजारीला कोणासी ढवलाढवल कजिया करू नये सिवेचे वगैरे इनसाफ आसतील ते वाजवी करावे आट पडेल तेथे दिव्य घेऊन सेवट करावा उगाच कोणाचा आग्रह न करावा वाजबीप्रो करावे तिघास येकदर कमाविसीवरून दूर करावे सेजारील पा त्याची रयेत आणू नये आश्रा देऊ नये याचीही सरकारचे पा ठेऊ नये

येसवतराव पवार हुजूर आहेत त्याचे कोटे वगैरे किरकोल सुद्रामत समाईक माहालचा यैवज मागील व पुढे येथास्थित त्यास यैवज वाटियाचा पावता करीत जावा करावा

☞ This is an agreement passed to the Peshwa by Malharji Holkar and Jankoji Sinde undertaking to pay off the former's debts

---

*No 293* ] [ 25 May 1759

श्री

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूरावजी दादा स्वामीचे सेवेसी—**

विनती सेवक माहादाजी नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनती ता माहे जेस्ट वद्य १४ रोज शुक्रवार[1] [ मुकाम ] मऊ नजीक महोबा राजे हिंदुपत याचे लस्करी कृपेकरून समस्त सुखरूप आसो यानतरी बहुता दिवसी कृपा मेहेरबानगी करून पत्र पाठविले ते येका महिनेयाने हिंदुस्तानी मिति जेस्ट वद्य ११ रोज मगलवारी[2] दोन प्रहरा पावले परम सतोष जाहाला यैमेच

१ या पत्रात लेखकानेंच म्हटल्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानी पद्धतीप्रमाणें महिने दिले आहेत म्ह उत्तरेंतील ज्येष्ठ वद्य तो दक्षिणी गणनेप्रमाणें वैशाख वद्य समजला पाहिजे २ म्ह वै व ११

सदैव पत्र पाठऊन सेवकाचा साभाल करीत आसावा विशेष पत्री आज्ञा आली की राजे जगत राजजी परलाक * जाहाले त्याचे राज्यामध्ये दिवाण पाहाडसिंग यासी व दिवाण खुमानसिंग दिवाण गुमानसिंग यासी कजिया लागला आहे त्यासी तेथील सविस्तर वर्तमान राजे देवाज्ञा जाहाले त्यापासुन आजपावेतों जाहाले आसेल ते तहकीक करून लिहून पाठवणें, राजे यानी जात्येसमई राज्याचा येकत्यार कोणास दिला आहे, च्यार रजवाडे आहेत त्याची व राजे हिंदुपतजी याची मरजी कोणा कडे आहे, राज्यायोग्य कोण आहे, हे लिहिणे ह्मणून आज्ञा आली त्यासी इकडील वर्तमान तरी राजश्री राजे जगतराजजी जेतपुरीहून कूच्य करून मौजे कुरा नजीक रामपूर येथे होते शरिरी आजार प्राप्त जाहाला आतश्याली दिवाण पाहाडसिंग नजीक होते माहाराणी साईकुवरजीचा दरोबस्त राजेयाचे घरामध्ये येकत्यार होता, ती समागमे होती व आणखी राणी व कुवर ठाकूर याच्यामध्ये राव हिंमतसिग पवार राजधर तिवारी बाजीराव वाबले सर्व होते त्याचे उरपुरु (?) राजे निजधामास जात्येसमई दिवाण पाहाडसिंग यासी बोलाऊन दरोबस्त राज्याचा येकत्यार दिला राणी लेक भाऊबद सर्व पाहाडसिंग याचे हाती दिले राजे याचा काल होताच दिवाण पाहाडसिंग याणी कूच्य केले ते दरोबस्त फौजेसुद्धा जेतपुरास आले तेथे राजे याचे दहन केले आणि आणि सर्व बदोबस्त केला राणी व कुल ठाकूर सर्व पाहाडसिंग याजपासी राहिले जेतपूरचा किलेदार रुजू जाहाला शहर सोडून बाहीर डेरे देऊन राहिले दिवाण खुमानसिंग व गुमानसिग परगणे सेवडा येथे आपले जाहागिरीमध्ये होते त्यासी वर्तमान श्रुत होताच राजश्री गोपालरावजी चदेरीच्या जागेयात होते त्यासी बोलाविले येकत्र होऊन जेतपुरास दिवाण पाहाडसिंग याजवर आले लडाई जाहाली पैगाम न चालिला तेवा कूच्य करून माघारा तीन कोस मौजे गुरखा आहे तेथे जाऊन राहिले मुलकामध्यें दगा केला दिवाण पाहाडसिग याणी भीरभार राखोन राजे याचा रुपया पैसा होता तो खर्च केला दिवाण खुमानसिंग दिवाण गुमानसिग याजकडे राजेयाची राणी आमर लेक भाऊबद येकदर कोणी नाहीत याचामध्ये राव किसुनसिग मात्र आहेत परतु समागमे नाहीत आल्येगडी आहेत त्याचा लेक लाल दिवाणसमागमें आहेत राजश्री गोपालरावजी गुमानसिंग याचे पलेयार आताकरणापासून आहेत राजश्री राजे हिंदुपतजी कालिंजरी होते आपसामध्यें कजिया पावोन मऊस आले दिवाण खुमानसिंग गुमानसिंग याजकडे भले माणूस पाठऊन बहुत समजाऊन सागितले त्याचे चितास गोस्ट न आली राजेयापासी मऊस आले उरपुरु रदबदल जाहाली काही न आइकत पाहाडसिंग राजे होतील आणि आह्मीही उभयेता राजे होऊ, येसी रदबदल करीत त्याजवर राजे याचे चितास गोस्ट न आली तेवा कूच्य करून गेले तिसरे दिवसी जेस्ट वद्य प्रतिपदा रविवारी जाऊन पाहाडसिंग यासी लडाई केली सचाकालच्या प्रहरा दिवसा पासून आर्धरात्रपावेतो जुज जाहाले दिवाण पाहाडसिंग याणी हातीवर बसोन परस (?) केली दिवाण खुमानसिंग गुमानसिंग याचा मोड जाहाला कोसभर माघारा डेऱ्यापावेतो पोहचाविले दिवाण पाहाडसिंग याची फते जाहाली खासे दिवाण पाहाडसिंग यासी कानाखाले गोली लागली हातीस बेसुमार जखमा लागल्या आहेत दोन तीनसे माणूस दोहीकडील पडिले घाईल बहुत आहेत मातबार जुज जाहालें च्यार तरफ शभर तीर पाहाडसिंग याणी चालविले ज्यास तीर लागला आहे त्याचे शरीरामध्ये राहिला नाही येसे शरसधान केलें याजउपरी दिवाण पाहाडसिंग जेथील तेथेच जेतपुरी आहेत दिवाण खुमानसिंग गुमानसिंग जेतपुरापासून दोन कोशावर ड सरकोन राहिले आहेत फौज दोहीकडे बरोबर होती परतु लडाई मारले त्याजमुले खुमानसिंग गुमानसिंग याजकडील सिबदी आखर उठोन गेली पहाडसिग जातीनिसी मर्द आणि लाहान थोर भाऊबद सर्व समागमे आहेत रयेत रजावद आजपावेतों कोणास काडीमात्र उपद्रव दिला नाही त्याजमुले

---

* डिसेंबर १७५८ मध्यें

तीन वेळ लडाई जितले जेतपूर कुळपाहाड चरग्वारी तिनी किले पाहाडसिंग याजकडे आहेत याजखेरीज राज्यस्थाने आहेत येक आज्येगडचा किला मात्र गुमानसिंग याजकडे आहे राज्यामध्ये आज मा महिने गर्दी जाहाली आहे त्याजमुळे मुलूक उज्याड जाहाला आता आखेर साल आले वस्ती कोठुन होणार ? च्यार रजवाडे आहेत त्याची मरजी व राजे हिंदुपत याची मरजी दिवाण पाहाडसिंग याजकडे आहे लेकास टाकून नातवाकडे मर्जी कसी होईल, आणि पाहाडसिंग कसे आइकतात ! राजे मर्जी घेऊन पाहात होते परतु पाहाडसिंग याणी साफ सांगितले की मी जिवत आहे तो दुसरा राजा होणार नाही माझ्यामागें जे होणार ते होतील त्याजवरून राजे यानी रदबदल करावयाची सोडिली तीर्थस्वरूप राजश्री पत स्वामीनी जे लिहिणे ते स्वामीस लिहिलेच आहे हाली आपली पत्रे आली ते बजिनस तीर्थरूपाकडे पाठविली आहेत तेथेहून जबाब आलिया मुजरद जोडी करून स्वामीकडे रवाना करू प्रस्तुत तीर्थरूप दिलीपलीकडे कुरुक्षेत्री आहेत राजश्री सिंदे यासी भेटी जाहालियावर विदा होऊन आतरवेद्प्राते येतील जाहाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे येक पत्र राजे हिंदुपतजी याणी स्वामीस लिहिले आहे त्याचे उतरी राजेयासी पाठवावे बहुत काये लिहिणें कृपा लोभ आसो दिला पाहिजे हे विज्ञापना

☞ Mahadji Narayan sends to Baburao Dada Govind Ballal's brother a full report of the happenings and conditions prevailing in Bundelkhand upon the death of Jagatraj Bundella

---

*No 294* ] [ 6 December 1759

श्री

यादी करार छ १५ राकर सुll सितैन मया व अलफ बाबूराव कोनेर याजकडे झासीची मामलेत सांगितली आहे त्यास दरसाल वर्षासन १५००० पधरा हजार करारपैकीं सालमजकूरचा भरणा घ्यावा रुपये-

१०००० तूर्त

५००० हाली घ्यावे

५००० चहू महिन्याची निशा सावकारावर चिठी

१००००

५००० अखेर साली मारनिलेनी पाठऊन द्यावे

१५००० येणेप्रमाणें पध्रा हजार रुपये

विसाजीपत जोग याजकडे बाबती सरदेसमुखी प्रात वराड येथील मख्ता सांगितला त्यास सालमजकूरचा करार रुपये १५०० दीड हजार रुो तूर्तच द्यावे याप्रमाणें करार छ ७ जाखर पासून येका महिन्यानी द्यावे ह्मणून बाबूराव फडणीस याही आज्ञा केली असे

विसाजी बलाल याजकडे झासीचे कामकाजाबा फडशा आला त्याजबा करारबाll पत्र नानाचे ५०० रुो हवाला बाबूजी नाईक दातार श्रावण शुध १ शके १६८२ मध्यें घ्यावे *

आले असेत सन इहिदे सितैनात

☞ The revenue management of Jhansi is entrusted to Baburao Konher Kolhatkar by the Peshwa on certain stipulations which are detailed in this paper

---

* म ११-८-१७६०

*No 295* ] [ 23 March 1760 ]

श्री

चिरंजीव राजश्री बाळाजी जनार्दन यासी सदाशिव चिमणाजी आसीर्वाद उपरी येथील वर्तमान ता। चैत्र शुध ७ सप्तमीपावेतो श्रीकृपेकरून सुखरूप आसो विशेष तुह्माकडील वर्तमान बहुत दिवस कळत न होते हली रा। नारोपत फाटक * आले त्यानी कितीक गोष्टी सांगितले, त्याजवरून सर्व आर्थ ध्यानात आला इकडील वर्तमान मारानिलेचे पत्रावरून सविस्तर कळेल बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद पत्राच उतर आल्यावर खातरजमाचे पत्र येईल कळावे स्वाम हिंदुस्थान जातीसमई कुटुंब तुमचे घ्यावयास कारण काय ते तुह्मास ठाऊक आसल उतर आल्यावर सविस्तर लिहून पाठऊ §

☞ Sadashivrao Bhau writes to Nana Fadnis why the latter's wife was asked to accompany the party

*No 296* ] [ 7 May 1760

श्री

श्रीमत राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी—

विनती सेवक बापूजी बलाल † सा। नमस्कार विनती येथील वर्तमान ता। छ २० रमजान मु॥ नजीक सिरोंज येथास्थित असे विशेष इकडील वर्तमान तर पठाण अतरवेदीत रामगड ह्मणोन जाटाचा किला आहे तेथे आहे सिंदे होळकर जैनगर प्राती आहेत अत पर त्याच्याने पठाणावर जावत नाही सलाबतखा पली ( कडे ) आहे श्रीमताची फौज ताजी ज'त आहे त्यास येंदा फौजेमध्ये घोड्यास रोग तमाशाचा जाला आहे येक दोन दिवस घोडे आडतें आणि मरते येणे करून लोकाची घरें बुडाली हाल फौजेत नाहीं परतु दरमजल जात आहेत राजे रजवाडे सर्वास पत्रे पाठविली आहेत आद्याप कोणी सामील जाले नाहीं पठाणानीं मलकाजमानीस + सुज्यातदौलाकडे पाठविलें आहे ती गगा उतरोन त्याजकडे गेली सुज्यातदौलास वजिरी यावी बगा लियास शाहाजादा गेला आहे, त्यास पातशाही यावी मीरबक्षी नजीब(खा)नास यावी सरहद व लाहोर, हे सुभे अबदालीस यावें दिलीचे पातशाहाची मदत करीत जावी या प्रों घराऊ विचार जाला आहे सुज्यातदौलाकडे श्रीमताचें राजकारण आहे याचे समताविना कबूल करणार नाहीं पठाणाचे काही बुनगे त्याचे देशास गेले खासा लि॥ प्रों बदोबस्त करून जाणार असी बोली आहे श्रीमत येकायेकी जाऊन गली पडत नाहीं धीरे धीरे जात आहेत याप्रमाणें इकडील वर्तमान आहे स्वामीस कळावें ह्मणोन लि॥ आहे पुढें होईल ते लिहून पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ This is an important account of the movements and plans of Sadashivrao Bhau during the period of his march towards the north The letter is written to the Peshwa by Bapuji Ballal Phadke

---

* नारोबा फाटक गवई नारायण रावाचे खुनात मारला गेला तो हा असावा § हें पत्र सर्व सदाशिवराव भाऊच्या हातचें आहे तो ता १३ मार्च १७६० रोजीं पटदुराहून पानिपतच्या स्वारीवर निघाला प्रस्तुत पत्र लिहिताना त्याचा मुक्काम बऱ्हाणपूरच्या आसपास असावा

† फडके + बादशहा महमदशहाची बायको व अहमदशहाची सावत्र आई

*No 297* ] [ 20 August 1760

श्री

श्रीमत राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी—

विनंती सेवक बापूजी बल्लाळ सा। नमस्कार विनंती येथील वर्तमान ता। छ ८ मोहरम मु॥ इंद्रप्रस्थ येथास्थित असे विशेष इकडील वर्तमान तरी आबदाली व सुज्यातदौला व नजीबखान व अहमखान व रोहिले सारी फौज पलीकडे येमुनेच्या पधरा दिवस आली दोनच्यारदा तोफाचे गोळे मारिले काही त्यांचे लष्करात गेले त्यांणी टाकिले तेही आपले लष्करात आले सुज्यातदौला काही सलुखाच्या गोष्टी बोलतात भवानीशंकरपंत× गेले, आले, व त्याजकडीलही भला माणूस आला येमुनेचे पाणी उतरावयाची वाट पाहातात पटाणाची फौज भारी आहे आपली फौज मातबर जमा जाली आहे तूर्त या प्रमाणे मनसबा आहे पुढे होईल ते लिहून पाठऊ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Bapuji Ballal Phadke sends news to the Peshwa about the situation at Delhi and the negotiations that were going on between Sadashivrao and Abdali

---

*NO 298* ] [ 26 August 1760

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र बावाजी गोसावी यासी—

स्नो बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष पा। बोधन येथील फडणिसी रा। बाबूराव कृष्ण+ याजकडे सागोन पाठविले असेत तरी याजपासून पा। मजकूरचे फडणिसीचे प्रयोजन घेऊन रोजमुरा दीडमाही रु॥ ५० पनास रु॥ प्रमाणे देविले असेत पा। मजकूर पैकी पावीत जाणे जाणिजे छ १४ मोहरम सु॥ इहिदे सितैन मया आलफ बहुत काये लिहिणे

लेखन सीमा

☞ Baburao Krishna is awarded by the Peshwa the Fadnisi of the district of Bodhan ( near Surat )

---

*No 299* ] [ 1760

श्री

नकल

राजश्री जनकोजी शिंदे गोसावी यासी-

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री मोरो बाबूराव आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष आपणाकडे आमचा वर्षासनाचा ऐवज सन तिसा व सितैन व सन इहिदे तीसाला ऐवज येणे, त्याजपा। राजश्री

× पहा पेशवे दप्तर भा २७ ले २५६ + उपनाम आपटे

त्रिंबक दताजी याचे गुजारतीने रुपये ६००० साहा हजार घेतले आपणास कलावे झणोन लिहिले असे सु॥ इहिदे सितैन मया अलफ बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनती

☞ Moro Baburao Phadnis acknowledges receipt of Rs 6000 for annuity paid to him by Jankoji Sindia

---

*No. 300* ] [ 12 December 1760

श्री

पौ छ ४ जमावल सध्याकाल घटी रात्र दोन मदवासरे

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचद्रपत नातू† स्वामीचे शेवेसी,-**

पो बालाजी जनार्दन सा॥ नमस्कार विनती उपरी येथील कुशल ता छ ३ जमादिलावल-पावेतों सुखरूप असों विशेष प्रस्तुत तुझाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर निरतर पत्री सतोषवीत जावे इकडील मजकूर तर कार्तिक वद्ये अमावास्येस अबदालीशी लडाई जाली दीड हजारपावेतो माणूस त्याचे ठार कापले व दोन हजार जखमी जाले आपणाकडील पाउण शेपर्यंत ठार व तीनशें जखमी याप्रो जाहाले मग हे फिरले तोही गेला ईश्वरें बरेंच यश दिल्हें होतें परतु बलवतराव गणपत यास गोली लागून देवआज्ञा जाली मोठे वाईट जाहालें ईश्वरी सतेस उपाय नाही मामीनी समागमें अग्निप्रवेश केला जे काली जें होणार तें होते त्यास उपाय कोणाचाही नाही बरें असो तुझास तीन च्यार पत्रें पाठविली परतु येकाही पत्राचें उतर न आलें याजवरून बहुतच अपूर्व वाटले होतें परतु अताच पत्र तुमचे येकुणतिसावे§ तारखेचे आलें त्यात लिहिलेंत कीं स्वामीकडून पत्रच येत नाही याजवरून असें दिसोन आलें की आह्माकडून पत्रे गेली ती तुह्मास पावलीच नाही त्यात तीन च्यार पत्रीं काही मजकूर विशेष नव्हता येका पत्रात मजकूर लिहिला होता तो हाली या पत्री लिहितों, हा पुर्ना मनन करून करावें माहादेवाचें ध्यान तयार जाहालें असेल तें आपणाजवल जतन सर्दीचा उपद्रव न होय असे ठेऊन त्या ध्यानासच खर्च कारीगराची मजुरी व रग वगैरे काय बसलें त्याची तपशीलवार याद लिहून पाठविणें म्हणजे किती खर्च बसला हेंही कलेल व चित्राचे हशियास काय खर्च बसला तोही लिहून पाठविणें, व माहादेवाचे ध्यानाचा हशिया फार चागला केला असेलच मध्यम रीतीचा केला अशिला तर त्या कारीगाराकडून काढऊन दुसरा हशिया करवणें तो फारच चागला सोनेरी ज्या पेक्षा अधिक हशिया म्हणजे नाही असा करवणें चागलाच असल्यानतर न काढणें तसेंच जतन ठेवणें मग ध्यानाच्या कारीगरास काम नाही, रिकामा, यास्तव दुसरी तसबीर अशी काढवावी की पर्वतातून गगा निघाली ती पुढें भूमीवर चालली गेली तिचे तीराशीं

१ येक तपश्वी विभूत लाऊन जटाधारी ध्यानस्त बसला आहे झाडाखाला,

१ येक झाडास पाय टागून खाली डोकी करून धूम्रपान करतो जटाधारी,

१ येक विभूति लाऊन जटाधारी झाडाखाली बसून पचाग्निसाधन करतो,

१ येक जटाधारी विभूति लाऊन पायाचे येक अगुष्टावरी उभा,

१ येक जटाधारी विभूत लाऊन नाक धरून सारे प्राण कपालात नेले असा भाव काढावा वरतें झाड

५

---

† पेशवे दप्तर भा २ ले १४४ चा लेखक जयपूरचा बातमीदार रामचद्र तुकदेव व प्रस्तुत रामचद्रपत नातू एकच असावेत असें वाटतें पत्रात उल्लेखिलेलीं चित्रें-जयपूरच्याच कारागिरा कडून तयार करावयाचीं असलीं पाहिजेत § ह्म ता ८-१२-१७६० चें

येणे प्रों पाच जण गगेचे तीराशी काढावे कोणी कोणास दिसेना अशी मध्ये कदाचित येक दोन झाडें काढवावी याप्रों हें चित्र तयार करवावें तुह्मी पुर्ते उमजलेत नाही तर न काढवणे नाही तर नाश मात्र होईल असें न करणें धोंडाजी नाईक याचे मारफातीनें नथमल जोहरी यास आणून त्याजपाशी सगयेगम दगडाची मूठ घोड्याची आहे, वरतें जडाव आहे, ती सवगशी सापडल्यास नाइकाचे गुजारतीने घेणें, नाहीं तर न घेवें पडवलाची भाजी मिलाली तर पाठऊन देणें हरिबक्ष चौधरी याणी आज्ञाकारणें वही देऊ केली ती दिलीत तयार जाली आहे यासाठीं त्याणी आपले सावकारकडून करविली होती त्यास पत्र त्यानी पारशी दिल्हें आहे, त्याजवर नाव ठिकाण आहे पारसनिसाकडून वाचऊन ठिकाण लाऊन वही आपणाजवल ठेवणें व किसनचदाकडे हस्तिदंती मेणाची सुरी दिल्ही होती ती तयार जाली असेल ती व पोथीची पत्रे व चित्रें इथिये* लावावयास दिल्ही होती ती असें आपणाजवल जतन ठेवणें नाजूक जिनस फार आहेत, याजकरिता सदूक करून बहुन निगेने खराब काडीमात्र न होता जतन ठेवीत जाणें, आणि आज पावेतों तयार जाहालें काय, नाहीं काय, याची याद तपशीलवार [ फाटलें आहे ] नाही तर न पाठवणें बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनती

आशि गोविंदभट उपाध्ये याचे अनेक आशिर्वाद आपण पत्री लिहिले की श्रीमतास स्मरण देत जावे त्यास अतर पडणार नाहीं आपण मात्र पत्राचे उतर पाठऊन द्यावे कृपा करीत जावी हे आशिर्वाद

☞ Nana Fadnis writes to Ramchandrapant Natu to execute certain specified paintings and works of art by the experts of Jaipur The letter is wholly in Nana's hand The last three lines are in a different Balbodh hand

---

*No 301* ] [ 10 February 1761

श्री

बा। आबदाली याणी गुलराज वकील याजबराबर राजश्री नानासाहेब यास वस्त्रें पाठविलीं§ तीं जमा गु॥ सावरोजी उदरा छ १० साबान सन ईहिदे सितैन खासा स्वारी प्रात हिंदुस्थान मुकाम अनतपूर पा। सिरोंज कापड सनगे येकूण किमत रुो

| | | |
|---|---|---|
| ४० | चीरामुकसी | १ |
| १०० | कुडती सनानाकेस | १ |
| १४० | | २ |

☞ A dress of honor sent by Abdali to the Peshwa is specified in this paper

---

*No 302* ] [ 18 September 1761

श्री

पौ छ २६ रावल इसने सितेन इा। जासूद चिमाजी बालाजी व जाखोजी धुळजी जथ कचाजी जासूद —

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गो—

विनती उपरी सेरजग व गालबजग यास ऐवज पुण्यात देविला त्यास येक मास जाहाला

* इतिहास ऐ पहा पेशवे दफ्तर २ पा १७३, व इ स ऐ टि १५६

अद्यापि ऐवज पावला नाही ज्यास ऐवज न द्यावयाचा त्यास पुण्यात पावतो, ज्यास तूर्त द्यावा त्याचा हा प्रकार. हे उभयता मोगलाईतून सरकारात आले मातबर माणूस स्वारीसमागमे जरूर असावयाचे असे असोन राजश्री सखाराम भगवत याणी ऐवज काय समजोन न दिल्हा ! असो पत्र पावताच ऐवज त्यास रोख पोतापैकी देऊन त्यास लष्करात पाठऊन देणे येविसी राजश्री माधवराव विश्वनाथ यास लिहिलेच आहे तर त्यास सागोन ऐवज देऊन पाठऊन देणे आजपर्यंत पुण्यात ऐवज पावला तो पावला याउपरी येथील परवानगीसिवाय येक पैसा न देणे लोकाकडे सरकारचा ऐवज रसदाचा वगैरे येणे तो निकडीने वसूल करून ऐवज जमा करून लस्करात रवाना करीत जाणे रा छ १९ रबिलावल सुा इसने सितैन मया व अलफ * टकसालेचा मजकूर माधवरायाचे पत्री लिहिला आहे त्याप्रो गोकरे दागिने आसतील त्याच्या अधेल्या करून पाठवणे छ मजकूर हे विनती

☞ This is Raghunathrao's letter to Nana Fadnis asking him to be very scrupulous about expenditure and exact rigorously all amounts due to Government

---

*No 303* ] [ 9 November 1761

श्री

**राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गो,—**

विनती उपरी स्वारी लाब गेलियावर ऐवजाची वोढ पडेल याजकरिता दोन लक्षोपर्यंत तर्तूद कर्जाची असावी सावकारासी बोलून ठेवणे असा मजकूर भाद्रपद मासापासून तुह्मासी बोलत होतो, व तुह्मीही कबूल केले असे लक्षुमण नाईक चाबुकस्वार याणी लाख दोन लक्षाची तर्तूद करावी असी रुबरू गाठ तुह्मी वानवडीचे मुकामी नाइकाची घातली होती त्यास येथे लक्ष्मणनाइकाजवळ ऐवज मनास आणिता त्याच्याने तर्तूद होत नाही सांप्रत निकडीचे दिवस मोगलासी लवकरच गाठ पडेल, याजकरिता निकड करून तुमच्याने जितकी कर्जाची तर्तूद होईल तितकी करावी व फौज जमा होत चालिली, रोजमरेयास ऐवज बेमबलग पाहिजे, याजकरिता कर्जाची तर्तूद तुमच्याने होईल तितकी करणे * रा छ ११ रबिलाकर हे विनती

☞ Nana Fadnis is asked to negotiate immediately a loan of two lacs in view of possible outbreak of hostilities with the Nizam

---

*No 304* ] [ 10 December 1762

श्री

पाो छ २६ जोवल मार्गसीर्ष सन सलास

**राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गो,—**

विनती उपरी खासा स्वारी कर्नाटक प्राते सातारियाचा गुता उरकून मजल दरमजल होणार ऐश्यास कर्नाटक प्रातीचे सालगुदस्त व साल तिगस्ताच्या खडण्याच्या बाक्या साक्याचा यैवज येणे त्यास त्याचा फडशा जाला पाहिजे याजकरिता कागद पत्र आकारून बाकी येण्याचे हिसेब लवकर आकारून पाठऊन देणे जरूर प्रयोजन आहे तर लवकर पाठवणे जाणिजे छ २३ जोवल सुा सलास सितैन मया व आलफ × बहुत काय लिहिणे हे विनती

☞ Peshwa Madhaorao asks Nana Fadnis for an account

---

* येथून अक्षर निराळें × येथून हस्ताक्षर माधवराव पेशव्यांचें

sheet showing the balance due to government from the various officials, so that steps can be taken to realize funds for the expenses of an expedition into Karnatak which the Peshwa proposed to undertake

---

*No 305* ] [ 26 April 1763

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण स्वामी गो,—

सेवक बाळाजी जनार्दन सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ १२ सवाल-पावेतो यथास्थित आहे वि॥ राजश्री जानोजी भोसले फौजसुधा पुणियाकडे येणार असी बातमी आजच आली आहे तरी तुह्मी सातारा किल्याचा बंदोबस्त उतम प्रकारे राखून बहुत खबरदारीने असणे चौकी पाहरे वरिचेवरी फेरमुबादला करणे * श्रीमंत पलीकडे राहिले भोसले इकडे आले यास्तव बहुत खबरदारी करणे बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती

☞ Baburao Krishna Apte is instucted by Nana Fadnis to be on his guard against the trouble that Janoji Bhosle was reported to be causing

---

*No 306* ] [ 5 September 1763

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गो,—

पो माधवराव बलाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष तुह्मी पत्र पाठविलें ते पावले स्वामीकडून पत्र येऊन साभाळ होत नाही मोगलाची फौज बुडविले परस्परे ऐकिले सविस्तर ल्याहावयास आज्ञा करावी ह्मणून लि॥ ते कळले ऐशास मोगल मोडलियाचे वर्तमान तुह्मास लिहिलेच आहे पत्र पावले असेल, व तुह्मास दोन तीन पत्रें दर्शनास यावयाकरिता पाठविलीच आहेत, पावली असतील सत्वर यावयाचे करणें इकडील वर्तमान तरी शहरासमीप सा साता कोसावरी स्वारी दाखल जाली निजामअलीखान शहरात आहेत श्रीकृपेकडून पारपत्य लौकरीच होईल तुह्मास कळावें याजकरिता लिहिले असे × ता छ २९ सफर गुरुजींनी पत्री लिहिले आहे त्यावरून कळेल तुह्मी हे पत्र पावताच सत्वर येणे जरूर पत्र पावताच यावे गुरुजी तुमचे चिंतन रात्र दिवस करीत असतात अन खात नाहीत जवळ कोणास येऊ देत नाहीत याची मर्जी बहुत तुह्माविसी हैराण आहेत बळे बळे येक येक घास गिळतात आग्रह केला तर ब्राह्मण्यपण करीन ह्मणतात प्रस्तुत तुपाची मात्र तेजगी आहे तरी प्रस्तुत तूप माहाग जाहाले आहे तर येक बुधला तुपाचा पाठवणे तरच तुमची भेट होईल त्याच्या सागतल्यावरून लिहिले आहे हे विनंती

☞ Madhaorao Peshwa communicates the details of his hostilities with the Nizam, which he hopes will soon come to an end The Peshwa also writes about Mahadaji Ballal Guruji yearning for the company of Nana Fadnis

---

* येथून पुढील अक्षर नानाचें × येथून पुढील अक्षर माधवराव पेशव्याचें

*No 307* ] [ 20 October 1763

श्री

**अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री माहादाजी नारायेण व सदासिव रघुनाथ कामदार जकाती प्रा पुणे व जुनर गोसावी यासी,—**

सेवक माधवराव बलाळ प्रधान नमस्कार सु॥ आर्बा सितैन मया व अलफ प्रा मजकूर येथील जकातीची फडणिसी पेशजींपासून राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस याची आहे, त्याप्रमाणे करार करून देऊन हे सनद तुम्हास सादर केली असे तरी माारनिले आपले तर्फेने कारकून पाठ वितील त्याचे हाते प्रा मजकूर येथील जकातीचे फडणिसीचे कामकाज घेत जाऊन वेतन पेशजी प्रमाणे पार्वत जाणे × जाणिजे छ १२ साफर + आज्ञा प्रमाण [ लेखन सीमा ]

☞ Balaji Janardan is granted the Fadnisi of the jikat collection of Poona and Junner

---

*No 308* ] [ 26 October 1763

श्री

**अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री भिवराव बापूजी गोसावी यासी —**

सेवक माधवराव बलाळ प्रधान नमस्कार सु॥ आर्बा सितैन मया अलफ किले चाकण येथील सबनिस राजश्री बाळाजी जनार्दन फडनीस याजकडे पेशजीपासून आहे त्याप्रमाणे हाली करार करून हे सनद सादर केली असे तरी माारनिलेकडील कारकून येईल त्याचे हाते किले मजकूरचे सबनिसीचे प्रयोजन घेऊन वेतन पेशजीप्रमाणे पावीत जाणे × जाणिजे छ १८ साफर + बहुत काय लिहिणे [ लेखन सीमा ]

---

*No 309* ] [ 23 December 1763

श्री

यादी राजश्री गोविंद कृष्ण* सा। उदेपूर सन अर्बासितैन मया व अलफ

| | |
|---|---|
| मागील रुपये | स्वार |
| १०० सन सितैन पौ | ७५ पहिले |
| ३०० इहिदे | ४२५ जाजती |
| ३०० इसने | ५०० |
| ३०० सलास | दर १॥ रुपये |
| २०० आर्बा | ७५० |
| रु॥ ७५ | तूर्त |
| २०० सरथान | ७५० स्वाराचे |
| | ६०० माहालचे |
| १२०० | १३५० |
| पैकी तूर्त घ्यावे | साडे तेरासे रुपये तूर्त |

× पुढील अक्षर नाना फडणिसाचें + पुढील अक्षर माधवराव पेशव्याचें

* पुढें गोविंद कृष्ण याची वकिलात १७८० च्या सुमाराम काढून घेतली त्यासबधात पहा इ स.म द भा १ ले १०

| | |
|---|---|
| १०० सिनैन | साडेतेरासे घेतले |
| ३०० इहिदे | २१ जाकर सन आर्बेन |
| २०० इसने पैकी | शभर रुपये सितैनचे |
| ६०० | बाकी नाहीं ह्मणता |
| बाकी | त्यास रुजू करून यावे |
| १०० इसने | वसुलात आले असिले |
| ३०० सलास | तर मजुरा द्यावे याप्रो |
| २०० आर्बा | करार |
| ६०० | |

येणेप्रमाणे हिशेब गु॥ शामराव माहादेव दि॥ मजकूर हिसेबाची रुजुवात करता अम्हाकडे निघेल ते आह्मी देऊ व अधिक फाजील साल पावले असेल ते स्वामीनी मजुरा द्यावे ता १७ जाकर सुा आर्बा सके १६८५

☞ Govind Krishna submits an account of his office emoluments and agrees to pay back whatever may remain due after the adjustment of his accounts

---

*No 310* ] [ 5 February 1764

श्री

पौ छ १९ रमजान

**श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति साहेबाचे सेवेसी,—**

विनती सेवेसी सेवक रघोजी पानसरे हवालदार व कारकून दि॥ श्री सु॥ किले प्रतापगड कृतानेक विज्ञापना ता छ २ माहे साबान सन आर्बा सितैनपर्यंत सेवकाचे व दिमत मजकूरचे वर्तमान यथास्थित असे सेवेसी विज्ञापना ऐसीजे साहेबाचे आज्ञापत्र सादर जाहले तेथे आज्ञा की श्रीकारणे सक्रमणाचे तीळ शर्करायुक्त थैली एक पा आहे ती श्रीस अर्पण करून उतर पाठवणे ह्मणून आज्ञा आज्ञेप्रमाणे तिळगूळ श्रीस समर्पून साहेबाकारणे श्रीचा प्रसाद आगारा मलवट मानाजी गरुड व मावजी सकपाळ याजबा पाठविला आहे घेऊन स्वीकार करणार साहेब समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना ×

☞ Ramraja presents the customary offering of the Sankrant season to the deity of Pratapgad.

---

× लेखाचे शेवटी अष्टकानी शिक्का लेखकाचे नावाचा पण अस्पष्ट फक्त खालील अक्षरें दिसतात—श्री राजा
राम छत्रपति
दायक

*No 311* ] [ 22 March 1764

श्री

पौ छ ४ सवाल सन आर्बा चैत्र

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी,—**

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये (कुशल) लिहिणे विशेष तुह्माकडून तपसीलवार वर्तमान लिहून पत्र येत नाही तरी प्रस्तुत तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब कोठे आहेत, शरीरप्रकृत कसी आहे, पुढे काय कर्तव्य आहे हे सविस्तर वर्तमानाची बातमी तुह्मास कलती किंवा नाही? या प्रांती लस्कर आल्यावर काय काय बातमी वडिलास जाती, इकडील वर्तमान अयेकून काय ह्मणत आहेत, मल्हारबा वडिलाजवळ आले होते त्याशी काय काय बोलणे जाहाले, हे सविस्तर वर्तमान मनास आणून लिहिणे आणखीही वर्तमान नवलविशेष आढलेल ते लिहीत जाणे तीर्थरूप मातुश्री बाईचा राहावयाचा निश्च(य) कोठे जाहाला, तीर्थस्वरूपासी व बाईसी काय बोलणे जाले याचा शोध करणे पुण्याचे मुकामी मातुश्रीकडे मामा * आले होते ह्मणून ऐकिले त्यास येऊन काय बोलले, हे सविस्तर वृत्त लिहून पाठवणे रा छ १८ रमजान बहुत काय लिहिणे हे विनंती

☞ The Peshwa asks Nana Fadnis to inform him of the present attitude and movements of Raghunathrao, his mother Gopikabai and their conversation with each other

---

*No 312* ] [ March 1764 ?

श्री

**पु॥ राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गो॰,—**

विनंती उपरी तुह्मी पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान कळले मोगलाकडील वगैरे बारीक मोठा मजकूर लिहिला तो सर्व कळो आला याच प्रकारे जे होईल ते लिहून पाठवीत जाणे × मोगलाकडे वडिलाची पत्रे काय गेली आहे ती लिहून पा॰ हे विनंती

☞ Madhaorao acknowledges Nana's letter to him and asks him to communicate his uncle's dealings with the Nizam

---

*NO 313* ] [ 1 August 1764

श्री

पौ छ २५ सफर

**तीर्थरुप मातुश्री बाई वडिलाचे सेवेसी,**

अपत्ये माधवरायानें चरणावरी मस्तक ठेऊन सष्टाग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता छ २ सफर मु॥ नजीक नरगुद येथे वडिलाचे आसीर्वादे करून सुखरूप असो विशेष वडिली पत्र पा ते

---

* मामा म्हणजे रास्ते असावे रास्त्यानें माधवरावाचा हुकूम मानला नाहीं ह्मणून त्याजवर त्याची इतराजी झाली, त्या कामीं मातुश्रीची शिफारस माधवरावानें मानली नाहीं, ह्मणून ती रागानें पुणें सोडून गेली, या गोष्टीस या पत्रात आधार मिळतो सर्व पत्र माधवराव पेशव्याच्या हातचें आहे × येथून पुढील अक्षर माधवरावाचें,

पावले लिहिले वर्तमान कळले  वडिली अनद्राव रास्त्याविसी लिहिले ते त्यास सागितले त्यावरून मारनिलेनी सेवेसी पत्र लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल इकडील वर्तमान तर हैदर प्रस्तुत हानगलास आहे दुर्गकर निरोप घेऊन गेला मिरावर त्याची इतराजीच आहे व मीरपैजुला ही नाखुशच आहे त्याचे लोक बहुत पळतात लस्करचा धर सुटला आहे प्रस्तुत त्याचा विचार सलूक जाहाला तर करावा हा भाव दिसतो माहादसेटीचा कागद गेला आहे, त्याचे उत्तर आज उद्या येईल, त्यानतर सर्व अर्थ कळेल तशासारखे सेवेसी लिहीन वाडिलास विदित व्हावे हे विज्ञापना †

☞ The Peshwa writes to his mother informing her of his negotiations with her brother Anandrao The Peshwa communicates to her the progress of his expedition against Haidarali

---

*No 314* ] [ 1 March 1766

श्री

नकल

**राजमान्य राजश्री रामचद्र कृष्ण गोसावी यासी—**

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सु॥ सीत सितैन मया व अलफ देशमुखीकडे साल मजकुरी बेहेडेयासी जदीद* परकी आसामी मजमदार व फडणीस व दफ्तरदार व किता आा येक येकूण च्यार आसाम्या पुणे यासी करार केल्या त्यास वतनी कामावर सरकारचे दर कदाराचे प्रयोजन नाही तर जे कारकून पाठविले असतील ते दूर करून सालमजकुरी वेतन पावले असेल ते माघारे परतोन घेणे जाणिजे छ १९ माहे रमजान आज्ञा प्रमाण

☞ Ramchandra Krishna is informed by the Peshwa of his having dismissed the four new employees appointed for the management of the Deshmukhi

---

*No 315* ] [ 8 September 1767

श्री

**श्रीमत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी,—**

पो॥ चितो विठल व आबाजी माहादे(व) सा॥ नमस्कार विनती येथील कुशल ता॥ छ १४ शाकर भाद्रपद वद्य प्रतिपदा मु॥ कुरटगाव नजीक कोटरे (कटेरे?) जाणून स्वकीय कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष आपणाकडे येथू(न) राजश्री चिंतोपत गेले तेथे बोलणे जाहालें ते सर्व मार निलेनी सागितलें त्यास जे आपण तेथें मान्य केलें ते उचित आहे येथें कोणविसीं संदेह नाही श्रीमताची मर्जी तिकडून श्रीमतानी सर्व फौज घेऊन यावें आणि बुधवारी भेटी व्हाव्या मागे फौज ठेविली आसिली तरी फौजेची वाटनी व्हावी बुधवारी साइंकालपावेतों सत्वर यावें गुरुवारी श्रीमतास ठीक नक्षत्र नाही सबब त्वरा करून बुधवारी साइंकालपावेतों यावें बहुत काये लिहिणे लोभाची वृद्धि करावी हे विनती

☞ Chinto Vithal and Abaji Mahadev write to Sakharam

† सर्व पत्र माधवराव पेशव्याच्या हातचें * New

Bapu communicating Raghunathrao's acceptance of the Peshwa's terms and the former's wish for an interview with the latter

No 316 ] [ 24 January 17↓8

श्री

पु॥ राजश्री बाबूराव कृष्ण गोसावी यास,—

सु॥ समान सितैन मया व अलफ तुह्मी राजश्री बालाजी जनार्दन यास पत्र पाठविले लिहिला मजकूर सविस्तर याणी निवेदन केला त्याचा खुलासा—

किल्याचे नेमणुकेचे कारकून आले नाही ह्मणोन लिहिले, तरी कारकुनास ताकीद केली आहे लौकरच येतील तुह्मी जुने कारकुनापौ दोन कारकून माहितगार म्हणोन ठेविले आहेत ह्मणून लिहिले, त्यास जुने कारकून न ठेवणे

धोंडो केशव याणी किल्याच्या गावास कमावीसदार ठेऊन सासे रुा जाजती खर्च वाढविला म्हणोन लिहिले, तरी त्या गावचे कामकाज किल्याकडे वोढणे कमावीसदार वगैरे सासे रुपये खर्च वोढला आहे त्याचे प्रयोजन नाही दूर करणे

किल्याचे घेऱ्यास पनास माणूस परवारी पाहिजे त्यास नवे ठेऊन नेमणुकप्रो वाईट आसामी दूर करितो ह्मणून लिहिले त्यास परवारी हुजरून पाठविले जातील तुह्मी नवे न ठेवणे

प्यादे व बारगीर यास जावयाची ताकीद केली असे येऊन पावतील

येणेप्रमाणे कलमे च्यार लिहिलेप्रो करणे जाणिजे छ ३ रमजान आज्ञा प्रमाण

☞ The Peshwa instructs Baburao Krishna on certain changes in the garrison employed for the fort of Satara

No 317 ] [ 17 February 1768

श्री*

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गोसावी यासी,-

सेवक माधवराव बलाळ प्रधान नमस्कार सु॥ समान सितैन मया व अलफ श्रीमत महाराज राजश्री स्वामी यास फार बरे वाटत नाही ह्मणोन तुह्मी विनतीपत्र पाठविले त्यास फारच बरे वाटत नसेल आणि उतारही नसला तर खाली शहरात उतरून उपाये करावा ह्मणोन चिरंजीव राजश्री बज्याबास लिहिले आहे उतार नसल्यास उतरो देत जाणिजे छ २७ रमजान

☞ Baburao Krishna is instructed to allow the Chhatrapati to come down to the town if he did not recover from his ailment at his residence on the fort

No 318 ] [ 23 February 1768

श्री

पौ

राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गोसावी यासी,—

सेवक माधवराव बलाळ प्रधान नमस्कार सु॥ समान सितैन मया व अलफ तुम्ही छ २ सवालचे विनतीपत्र पाठविले ते छ ३ मिनहूस पावले राजश्री स्वामीस समाधान फार वाटत नाही

* सर्व पत्र नाना फडणिसाच्या हातचें

याजमुळे आजच खाली उतरले म्हणोन विस्तारे लिहिले ते कळले ऐस्यास माहाराजाची शरीर-भावना वरचेवर लिहीत जाणे जाणिजे छ ४ सवाल आज्ञा प्रमाण

☞ Baburao Krishna is asked to report the Chhatrapati's health frequently to Poona

---

*No 319* ] [ 19 March 1768

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधर यशवंत स्वामी गोसावी यासी—

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष राजश्री पुरुषोतम माहादेव यास तुह्माकडे पाठविले आहेत याचे हातून सरकार उपयोगी राजकारण व वकालतीचे कामकाज घेत जाणे जाणिजे छ २९ शवाल सुा समान सितैन मया व अलफ × बहुत काय लिहिणे मागनिलेपासून त्या प्रातीचे कामकाज घेत जाणे बापूजी माहादेवास हुजूर आणिविले आहेत ते येतील याजपासून वकिलीचे काम घेत जाणे याजपासून अंतर पडल्यास हुजूर शोध पका करून लिहून पा। हे विनंती

☞ The Peshwa orders Gangadhar Yashvant to restore Bapuji Mahadev and Purushottam Mahadeo to their former duties at Delhi

---

*No 320* ] [ 21 April 1768

श्री

पो छ ८ जिल्हेज वैशाख मास

**राजश्री बाबूराव कृष्ण गो यास,—**

सुा समान सितैन मया व अलफ तुमची व नागोजी सिंदे याची चित शुध नहीं म्हणोन ऐकण्यात आले त्यास तुम्ही जाऊ लागला ते समई उभयतानी यकमते राहून सरकार काम करावे म्हणोन आज्ञा केली असता असा प्रकार ऐकण्यात आला ही गोष्ट काय आहे ? आज्ञेप्रों तुम्ही व ते यकमते राहून सरकार चाकरी येकनिष्ठेने करीत जाणे यास अंतर जाल्यास परिछिन्न कार्यास येणार नाही जाणिजे छ १ जिल्हेज + सविस्तर बज्याबास लिहिले आहे त्याप्रमाणे करणे छ मार

☞ Baburro Krishna is asked by the Peshwa to work in harmony with Nagoji Shinde and is warned against disagreement and discord with him

---

*No 321* ] [ Nov or December 1768

§ पो छ १ साबान तिसा मार्गसीर्ष इ॥ मल्हारजी कापडा खिजमतगार

श्री[१]

**राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी—**

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल

---

§ वैवरती नाना फडणिसाच्या हातचे, सर्व पत्र माधवरावाच्या हातचे

लिहिणे विशेष. तुह्माकडील वर्तमान नवलविशेष काही कलत नाही तरी प्रस्तुत तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबाची मर्जी कसी आहे, प्रकृत कसी आहे हे लिहिणे चवकी पाहाऱ्याचा बदोबस्त येथास्थित आहेच शहरातील मात्र बदोबस्त करणे इग्रेजाकडील वर्तमान विसोबाकडूनx आणऊन लिहीत जाणे भोसल्याकडील बातमी नीट राखणे भोसल्यानी येणे तर परलीवरून यावे याप्रमाणे पत्रे पा आहेत तिकडून आल्यास चिंता नाही आलीकडून नगरावरून येऊ लाग ल्यास तीर्थस्वरूपास च्यार दिवस सिहगडावर न्यावे यास्तव बातमी नीट राखणे चिठी फाडून टाकणे आधी तर हे होत नाही असेही कर्ता तसेच बनल्यास लिहिल्याप्रो करणे तुमची प्रकृत प्रस्तुत कसी आहे ते लिहिणे हे विनती भोसल्याच्या लस्करात बातमीस माणसे निवडून लाव चालणारी ठेवणे, आणि वकिलास पत्रे ताकीद करून तुह्मी लिहिणे हे विनती

☞ Madhaorao Ballal instructs Nana Fadnis to watch the movements and dealings of Raghunathrao and report the same to him

---

*No 322* ] [ 1768

श्री

श्रीराव सपुत्रो

चिरजीव यासी चितो विठल, चितो अनत वगैरे बलाऊ पाठविले लौकरच येतील आप णही सखाराम गोविंद, सिवराम गोपालराव वगैरे सारेच बलावावे आजचे दिवसात फडशा जाहा ल्यास उतम आहे कारभाराचा खोलवा कारभारियाचे येणे याजमुले पडतो सावकार लौकर येतीलच लौकर बलावणी जावी हे आसीर्वाद

☞ This appears to be Raghunathrao's instructions to his son ( Amritrao ? ) to call the required individuals and finish the concerted project in the course of the day

---

*No 323* ] [ 15 April 1769

श्री

पौ छ २१ जिल्हेज तिसा चैत्र हा। गुरुजीबावा

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी —

विनती उपरी इकडील वर्तमान सविस्तर पूर्वी लिहिलेच आहे, त्यावरून कललेच असेल प्रस्तुतचे वर्तमान तर भोसले भेटीस यावयास निघालेच आहेत लवकरच भेट होईल कलावे तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबानी निघोन जावयाचे केले होते ते सविस्तर तुमच्या पत्रावरून कलले त्यास ही गोष्ट न कलावयाची परतु तुमचे सावधपणामुलेच कलून पता लागला हे फार उतम जाहाले पुढेही जपून जेथवर पता लागेल तो लावणे फार चौकसीमुले पता लाऊन पारपत्य केलेत यावरून फार सतोष जाहाला रा छ ७ जिल्हेज बहुत काय लिहिणे हे विनती *

☞ The Peshwa writes to Nana Fadnis highly commending the steps he took in prevecting Raghunathrao breaking away from his confinement

---

× विसाजी केशव लेले * सर्व पत्र माधवरावाच्या हातचें

No 324 ] [ 17 April 1770

श्री

पौ छ २१ मोहरम

**तीर्थरूप मातुश्री बाईसाहेब, वडिलाचे सेवेसी,—**

अपत्य नारायणरायानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टाग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। छ २० जिल्हेजपावेतो मुा देवरायदुर्ग येथे सुखरूप असो विशेष इकडील वर्तमान तर हैदर खान श्रीरगपटण येथे आला सर्व येक जागा जाहाले आह्मी किलेमारास मोर्चे लाविले आहेत. लवकरच येईल पुढे होईल ते लिहिन वडिलाची व माझी शरीरप्रकृत उतम आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Narayanrao writes to his mother from Devraydurg in Karnatak communicating the progress of the operations against Haidar

---

No 3?5 ] [ ?

श्री

**श्रीमत माहराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी,—**

विनती शेवक माधवराव बलाल प्रधान कृतानेक विज्ञापना तागाईत छ १७ रमजानपावेतो कृपेकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष सरकारची आज्ञा घेऊन निघालो ते फौजसुधा ग्वालेरी मुकामी दाखल जाहालो तिकडून सुज्यातदौला फौजसुधा मजलदरमजल कूच करून येत होता[ही] बातमी समजली नतर सडी फौज घेऊन जयपूर येथे रात्री छपा घालून खासा पाडाव करून फौजसुधा कालपीस यमुनानदी उतरून सागरास आलो स्वामीचे पुण्यप्रतापे फते होऊन येश आले [ सरकार ] लोकानी लढाईत कामे बहुत केली काही लोक जखमी जाहाले त्यास योग्यता पाहून बक्षीस दिल्हे आणि सर्वाचा सतोष राखून हुशारी राखिली आहे खजिना जवाहीर हत्ती घोडे वगैरे लूट सरकारात व फौजत बहुत आली याचा तपशील मागाहून शेवसी लिहून पाठवितो साराष स्वामीचा पुण्यप्रताप मोठा येणेकरून शत्रु शरण आला शेवेसी श्रुत हे विज्ञापना ?

☞ This is a spurious letter addressed apparently by the Peshwa to the Chhatrapati It will serve as a sample of forged letters in those days Madhaorao did not go to North India

---

No 326 ] [ 22 March 1771

श्री

नकल

**अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य राजश्री रघुनाथ हरि गोसावी यासी,—**

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष तालुके झासी येथील बक्षीगिरी राजश्री बाजी बलाल फडके याचे नावें होती ते साल मजकुरापासून मशारनिलेचे पुत्र राजश्री विठल बाजी याचे नावे करार करून वेतन साबिना पेशजीप्रमाणें नख्त रुपये ५०० कापड आख २०० येकूण पाचशे सो व दोनशें कापड आख पेशजी

प्रमाणें करार करून देऊन हे सनद सादर केली असे तरी बक्षीगिरीचें कामकाज मशारनिलेचे हातें तालुके मजकूर येथील फौजेची गणती व किलेहाय व ठाणी व माहालानिहाय सिबंदीची हुजिरी दरोबस्त घेऊन नरत रुो पाचशें याची नेमणूक बेहेऱ्यास करून दिल्हीच आहे त्याप्रमाणें मालिना पावीत जाणें कापड आख दोनशे हुजुरून पावतील जाणिजे छ ५ जिल्हेज सु॥ इहिदे सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे

☞ Raghunath Hari Nevalker, the ancestor of the famous Rani of Jhanshi, is asked by the Peshwa to entrust the office of Bakshi of Jhanshi to Vithal Baji who was appointed to the post of his father

---

*No 327* ] [ 2 March 1772

पौ छ २७ जिलकाद इसने माघ

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी,—

विनंती उपरी तुह्मी दोन पत्रें छ २१ जिलकादचे येक पाठविलें येथील कागदाचें उतर व दुसरें छ २३ रोजचें तीं पावली

प्रथम पत्राचा मुख्यार्थ की करारप्रमाणें तुह्मी नेहमी चालल्यास आह्मी नेहमी चालू किरकोळ कलमात कमजाजती जाल्यास नीट करू नीट केल्यास आम्हापासूनही अतर होणार नाही गुरुवार प्रात कालपर्यंत पत्र यावें ह्मणून लिहिलें येशास गुरुवार प्रात काली प्रहर दिवसासच पत्र पावलें तेव्हा जाब लिहून मूर्त साधणें फलतच आहे, व थोडीसी दिकतही आहे भोसले भेटून गेले पाहिजेत, तेव्हा मुहूर्त टळला तरी चिंता नाही

दुसरे पत्राचा मजकूर कीं तीर्थस्वरूपानी बोलाऊन नेऊन नेहमी शफत हीं अक्षरें आह्मास अनकूल पडत नाहीं असे बोलले, त्यावरून तुह्मी उतर केले की पूर्वीं आज्ञेप्रमाणें लिहिलें असताही आज्ञा कसी होत्ये ? त्यास उतर आले असते, आह्मी निघालो असतो तर सुधेच होतें बोललोच होतो आता आह्मीच सागतो त्याप्रमाणें लिहा ह्मणून आज्ञा केली त्यावरून लिहिलें त्यास उतम आहे आह्मीही समीप येत आहों, कृष्णरावही जातील सोईस येईल तसे करावें लागेल * रोज येक बोलण्यात येते उतमच आहे कृष्णराव बोलतील, बनल्यास करू रा छ २६ जिलकाद सु॥ इसने सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

☞ The Peshwa writes to Nana Fadnis approving the latter's replies to the queries started by Raghunathrao

---

*No 328* ] [ 5 February 1773 ?

श्री

पौ छ २० जिल्काद

राजश्रियाविराजित राजश्री रामचद्रपत गोरे स्वामी गोसावी यास,—

पो नारायणराव बल्लाळ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करणे विशेष तुह्मी पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन सतोष जाहाला तेथे स्वदस्तुराविषी वगैरे

* " रोज येक करू " हीं खुणेच्या पुढचीं शेवटचीं अक्षरें माधवराव पेशव्याचीं

कितेकविसी उपरोधाच्या गोष्टी लिहिल्या त्या कळल्या स्वदस्तुरचे पत्र तीर्थरूप मातुश्री बाईसाहे बास लिहिले आहे ते पाहावे § बहुत काय लिहिणे हे विनती छ १२ जिल्काद

☞ Ramchandrapant Gore is asked by Narayanrao to remove his suspicions about the Peshwa's autograph

---

*No 329* ] [ 19 May 1773

श्री

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूराव स्वामीचे सेवेसी,—**

पो बाळाजी जनार्दन सा। नमस्कार विनती उपर येथील कुशल ता। छ २६ सफरपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष तुह्मी पत्र पाठविले ते पावले श्रीमत राजश्री नारायणराव याचे भेटीचा मजकूर लिहिलात, त्यास श्रीमतास विनती करून तुह्मास व नागोजी सिंदे यास पत्रे सर कारची पाठविली आहेत कळेल ऐवजाविशी पूर्वी पत्र पाठविलेत की पचवीस हजार रुपये गुदस्तात ज्याजती लागतील तर याचा अजमास व बेहड्यास कमजाजती निवडून पाठवणे, त्यासारखी तरतूद होईल बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती

☞ In this wholly autograph letter Nana Fadnis asks Baburao Krishna to submit for sanction the usual budget of the expenses for the Chhatrapati of Satara

---

*No 330* ] [ October 1773

श्री

श्रीसाब सपुत्रोविजयते

**राजश्री मोरोबाबूराव यांसी,—**

विनती उपरी बाजीराय.बराबर चिठी व निरोप पाठविला तो पावला ऐसियासी बरे वाटत असिल्यास तेथे राहाणे योग्य नाही तुम्हास जवळ बाळगावे ऐसी आमची मर्जी आहे दिवस मनसुब्याचे तुम्ही कर्ते शाहाणे आणि रिकामे राहिल्यास कसे मर्जीस येईल ! जवळ असावे यास्तव लौकर दिनसुध पाहून यावे मध्ये रिकामे जावे यावे असे कशास पाहिजे ! पुण्यातील कामकाज चालवावयास नारो आपाजीस ठेवणार आहो हे विनती

☞ Raghunathrao acknowledges the messages sent by Moroba Phadnis and invites him at once to occupy his official post

---

*No 331* ] [ 29 November 1773 *

**श्रीगणराज**

श्रीमत राजश्री पत प्रधान स्वामीचे सेवेसी—

विनती सेवक पाडुरंगराव गोविंद कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १४ रमजान मु॥ कुडची कृष्णा दक्षण तीर येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीनी छ ५ रमजानचें आज्ञापत्र पा। तेथें आज्ञा की राजश्री रामचद्र गणेश यानी

---

§ येथून पुढील हस्ताक्षर नारायणराव पेशव्याचें

चिकोडीच्या आसपास राहोन करवीरच्या शह राखावा तुह्मी व राजश्री कोनेरराव व कृष्णराव पानसे व सिवराव घोरपडे ऐसे घेऊन धारवाडाकडे जावें ह्मणोन त्यावरून मिर्जेहून कूच करून मुकाम मारास आलों तीर्थस्वरूप राजश्री कोनेरराव व राजश्री कृष्णराव यास लिहोन येथेच आणविले त्याच्या आमच्या भेटी कालच जाल्या त्रिवर्ग येकत्र जालों राजश्री सिवराव घोरपडे तेही त्रयोदसीस कालच डेरादाखल जाले आज आथवा उद्ईक येथे येतील आणखी लोक याव याचे आहेत च्यार मुकाम येथें होतील तदोतर आज्ञेप्रा। कूच करून धारवाडाकडे जातों आज्ञेस उजूर नाही कर्नाटकात भारी जमाव आसल्यास शत्रूवर दाब चागला बसेल याजकरिता आणखी फौज आह्माकडे रवाना करावयाची आज्ञा जाली पाहिजे × वरकड सविस्तर विनती राजश्री सिवाजी बावाजी करिता विदित होईल विदित होय विज्ञापना

☞ Pandurang Govind Patwardhan communicates the rally of troopes to the Peshwa for an expedition into the Karnatak and requests him to collect more troops in order to humble the enemy completely

---

*No 332* ] [ 1 December 1773

**श्रीगणराज**

श्रीमत राजश्री नाना फडणीस स्वामीचे शेवेसी—

पो पाडुरग गोविंद कृतानेक सा। नमस्कार विनती उपरी येथील कुशल ता। छ १६ रमजान पावेतो आपले कृपेकडून वर्तमान येथास्थित आसे विशेष राजश्री रामचद्र गणेश करवीरकराचे तोंडावर व राहातील तुम्ही धारवाडाकडे जाणे म्हणून आज्ञा आज्ञेप्रो कूच करून धारवाडाकडे जात आहो आमचा जथ पडला राजश्री सिवराव घोरपडे याचा भेटीचा प्रकार पधरा रोज आणखी लोक जमावयास लागतील याजकरिता हलके हलके जात आहों तीर्थस्वरूप राजश्री बलवतराव सेवेसी आहेत आपणही सर्वप्रकारे वडिलावर ममता करीतच आहेत परतु सर्व प्रकारे सोय करून देऊन उपजीविका चाले तो आर्थ करावा बहुत विनती

☞ Pandurang Govind Patwardhan accepts Nana Fadnis' intructions for an expedition into the Karnatak and craves favourable considarotion of the points submitted by him for orders.

---

*NO 333* ] [ 25 December 1773

**श्री**

पो पौष वद्य प्रतिपदा गुरुवार

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मोरो बाबूराव स्वामी गोसावी यासी-

पो रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष तुह्मी पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें स्थलाचा मजकूर लिहिला की तालुकदारानी सनद अमान्य करून स्थल हवालें केले नाही, ह्मणून लिहिलें तें कळलें ऐशास तुह्मासी करार करून सनदा दिल्ह्या त्यात दुसरा अर्थ किमपि नाही ति [ पत्राचा मधील भाग गहाळ झाला आहे ] † कौदपत्र व खिजमतगार हुजुरून पाठविले आहेत आज्ञेप्रो वर्तणूक करितीलच

† येथून पुढील अक्षर निराळ

तथावत कदाचित् केली तरी पारपत्यही होईल आत येक बाहेर येक ऐसा मजकूर केला नाही. हे विनती बाजीपंत गोविंद सविस्तर लिहितील त्याजवरून कलल छ १० सवाल हे विनती.

☞ Raghunathrao asks Moro Baburao Fadnis not to entertain doubts about the former's intentions and accept the settlement made as final

---

*No 334* ] [ December 1773

श्री

राजश्री मोरोबा दादा स्वामीचे सेवेसी,—

सा। नमस्कार विनंती उपरी आपण चिठी पाठविली ती पावली कार्यभाग उरकून येतो ह्मणोन लिहिले ते कलले उतम आहे राजश्री आबास बरोबर घेऊन यावे वरकड श्रीमताचे लस्क रातून कोणी कोणी निघाले ते सविस्तरशा नानाचे पत्रावरून कलेल वरकडही सधि पाहून निघणार ह्मणोन नरसिंगरायानी लिहिले आहे पाहावे लोभ आसो दीजे हे विनती

☞ In this wholly autograph letter Sakharam Bapu approves the measures adopted by Moroba Dada for concerted action

---

*NO 335* ] [ December 1773

श्री

विनती सेवक सखाराम भगवत कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। छ १९ रविलाकरपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित आसे विशेष स्वामींनी कृपा करून दोन पत्रे पाठविली ते पावली त्यातील येक येक शद्ब वाचिता भक्तीने अनदअश्रु आले चितास अति अनद जाला तो कोठवरी ल्याहावा ? स्वामीचे कल्याण आसावे त्यात आह्मास [स]र्व प्राप्त आहे गड किले द्रव्य सर्व स्वामीची कृपा आहे त्यपेक्षा अधिकोतर वाटत नाही माझे मनात स्वामींनी व याणी येकविचार आसावे सर्वांचे सगोपन करावें हेच चितात आहे लघु मनुश्ये नाना प्रकारचे पेच करितात हे मात्र वाईट वाटत साराश स्वामी सर्वज्ञ आहेत बहुत दूरदेशी जाणतात हे जाणणार जाणतात निदर्शनास येते तेव्हा मूर्खास कलतें असो माझे स्वरूप राखणे व आशक्तपणी साभाल करणें हे स्वामीस आगाध नाही मोगलाकडील राजकारणे बहुत साभाळून करावी या दिवसात हैदराचा शह आहे हे आपण जाणतच आहेत सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना उदासीनपणे न धरिता मनसबा करणे ह्मणून आज्ञा केली वैशास प्राणही गेला तरी सेवाधर्माविसी उदासीन राहाणार नाही अशक्तपणे मात्र काय उणें पडेल तें पडो. येवि-सींचे सशये किमपि नसावे हे विज्ञापना

☞ Sakharam Bapu acknowledges the warm compliments paid to him by Raghunathrao and assures him of his own loyalty and devotion, advising him at the same time to adopt a conciliatory attitude towards all parties

---

*No 336* ] [ 3 January 1774

श्रीसाब सयुत्रोविजयते

राजश्री मोरो बाबूराव यासी,—

विनती उपरी तुम्ही गेलियानतर काडिलूर सगमास + कृष्णा दक्षण तीरी आलो दोन तीन लक्ष गुडमटकल ककापली वगैरे ऐवज करार केला आलीकडे बसालतजग व लाहान सस्थाने येथील कारभार होत आहे मोठा कारभार हैदरअली खानाकडे तेथे शह दिल्हा आहे खडणी करार होईल तेव्हा खरे ऐवज बहुत दरमाहा पाहिजे यास्तव दाहाबारापर्यंत तुम्ही व रा नाना मिलोन तजवीज करणे खडणीचे ऐवजी आथवा माहालचे ऐवजी वराता लौकरच लाऊन देऊ परतु तूर्त खर्चास सावकारापासून ऐवज करार करून ठेवणे येथून ऐवज उटे पाठऊन आणिला जाईल जरूर जरूर तर्तूद करणे कृपेने हैदराकडील खडणीचा ऐवज लौकरच ठहरेल परतु आगोधर तर्तूद असावी कदाचित् च्यार दिवस लाबलच तरी लस्करात ओढा पाडावयाचा नाही सबब लिहिले असे तुम्ही रिकामे माघअखेर तेथे राहून लौकर स्वारीचे रुबे येणे जाणिजे छ १९ सवाल बहुत काय लिहिणे हे विनती

☞ Raghunathrao communicates to Maro Baburao the progress of military operations in Karnatak and asks him quickly to raise funds for the expenses of his war

---

*No 337* ] [ 18 January 1774

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मोरो बाबूराव स्वामी गोसावी यासी,-

पो रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनती उपरी यथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणे विशेष तुह्मी पुत्राचे वृतबधाकरिता निरोप घेऊन गेला त्यास वृतबध जाहालाच असेल * तरी लौकर येणे जाणिजे छ ५ जिल्काद बहुत काय लिहिणे हे विनती

☞ Moro Baburao is asked by Raghunathrao to come to his presence immediately

---

*No 338* ] [ 18 January 1774

श्री

सेवेसी सदासिव अनत कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता छ ५ जिल्काद पावेतो यथास्थित असे विशेष बापूजी जाधव याजबरोबर ऐवज रुो २५००० पचवीस हजार हाली सिक्याचे पाठविले ते पावले आज्ञेप्रो समारोप करून ठेवितो शके १६९५ विजयसवत्सरे माघ शुा। शष्टी सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

☞ Sadashiv Anant acknowledges receipt of Rs 25000 to Nana Fadnis ( ? )

---

\+ कडलूर सगम भीमा व कृष्णा याचा * परतु दुसऱ्या एका पत्रावरून ही मुज फाल्गुन शुा। १० म्ह २१ २ १७७४ रोजीं जुन्नरास झाली असें दिसून येतें

*No 339* ] [ 30 January 1774

श्री

पौ छ २७ जिल्काद

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूराव स्वामीचे सेवेसी,-

पो बाळाजी जनार्दन सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ १७ जिल्काद जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष तुह्मास पूर्वी बो। राजश्री गोविंदभट§ याजबा। निरोप सांगोन पाठविला तुह्मी मान्य केले त्याजवर येथून चार दिवस जाले, त्रिंबकपंत आबा इशमनीस याजकडील याजबराबर सांधान पा। आहे ते पावोन तुह्मास भेटोन तुह्मी राजश्री स्वामीस किल्यावर नेलेच असेल आह्मी श्रीमंत सौ। पार्वतीबाई व गंगाबाई यास घेऊन राजश्री सखारामपंत बापूसुधा किले पुरंदरास आलो तुह्मी राजेश्रीस जलदी करून किल्यावर नेणे यक घडीचा विलंब न लावणे × तुमचे भरवशावर केले आहे बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे ही विनंती

☞ Nana Fadnis asks Baburao Krishna to remove the Chhatrapati at once to the fort and not leave him for a moment free in the town of Satara

---

*No 340* ] [ 30 January 1774

श्री

राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव कृष्ण यास,—

प्रति मातुश्री गंगाबाई आसीर्वाद सु॥ आर्बा सबैन मया व अलफ आह्मी पुणियाहून निघोन समागमे राजश्री सखाराम भगवंत व राजश्री बाळाजी जनार्दन व राजश्री मोरो बाबूराव फडणीस यास घेऊन किले पुरंदरास गेलों आत पर राज्याचा बंदोबस्त आह्मास केला पाहिजे राजश्री साबाजी भोसले व राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ[1] वीस हजार फौजेनसी दोन तीन दिवसा येऊन सामील होतील व लस्करातीलही लाहन मोठे सरदार आज्ञेतच आहेत व तीर्थरूप मातुश्री बाई[2] गंगापुराहून लौकरच येतील तरी तुह्मी किले सातारा येथील चौकी पाहारा आलग नोबत येथास्थित करणें आणि बंदोबस्त केल्याचे वर्तमान हुजूर लेहून पाठवणें † जाणिजे छ १७ जिलकाद आज्ञा प्रमाण लेखन सीमा

☞ Gangabai informs Baburao Krishna of her having accepted the reins of Govt at Purandar

---

*No 341* ] [ 3 February 1774

श्री

पौ छ २३ जिल्काद

राजश्री नागोजी सींदे व बाबूराव कृष्ण गोसावी यासी,—

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो। बालाजी जनार्दन आसीर्वाद व नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल ता। छ २१ जिल्काद जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष तुम्ही पत्र पो। ते पावले व त्रिंबकपंत आले त्याणी वर्तमान सांगितले राजश्री स्वामीस किल्यावर घेऊन गेलो म्हणोन लिहिले ते कळलें फार चांगली गोष्ट केली खुणेप्रों गोष्ट उतरली तीर्थस्वरूप

---

§ उपाध्ये × येथून अक्षर नानाचें १ पठे २ गोपीकाबाई † येथून अक्षराचें वळण निराळें

कुशावा व तुम्ही यकरूप आहा येणेकरून सतोष जाहाला उभयता मातुश्रीस घेऊन तेथेच येणार होतो परतु पला लाव यास्तव येथे आलो पुढे तेथे लौकरच येणे होईल कोणेविसी चिता न करावी किल्याची बेगमी कसकसी आहे ते लिहून पाठवावे * बहुत खबरदारीने राहावें येकरूप असावे तुम्ही इतवारी म्हणोन श्रीमतानी तुम्हास ठेवले त्याचे सार्थक हेंच आहे बहुत काय लिहिणें हे विनती

☞ Nana Fadnis compliments Nogoji Shinde and Baburao Krishna for having effected timely measures for the security of Satara

---

*No 342* ] [ 6 February 1774

पौ छ १० जिल्हेज

**श्रीगणराज**

श्रीमन राजश्री नाना फडणीस स्वामींचे सेवेसी,—

विनती सेवक पाडुरग गोविंद कृतानेक सा नमस्कार विनती उपरी येथील कुशल ता छ २४ जिल्कादपावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष आपले पत्र आले की जो जमाव आसेल तो घेऊन जलद येणे त्याजवरून चिरजीव गगाधरराव याची व तीर्थस्वरूप राजश्री कोनेरराव याची रवानगी करून सेवेसी पो आहेत राऊतही तीनसेंपावेतो होतील आणखी जमा करितील, व इकडूनही पाठऊन देऊ आपली पत्रे पूर्वीच लस्करास गेली आसतील आम्हीही आपले वर्तमान आलेवर व पूर्वीच सूचना लिहिली आहे मचि सेवेसी येणार होतो विशेष परिचय नाही याज-करिता परतु किलेचे काम हे तोंड आहे याजकरिता राहिलो चिरजीव नेणता आहे याजकरिता सभालून घ्यावे चिरजीव राजश्री विनायेक भास्कर उभयेता हुजूरच आसतात साल मारी आसा प्रकार घडला होता, याजकरिता गेले नाहींत हाली सेवेसी पाठविले आहेत

राजश्री हरिपत फडके यास सा नमस्कार विनती सदैव पत्री साभालीत आसावें बहुत काय लिहिणे हे विनती

☞ Pandurang Govind Patvardhan offers quota of troops and his full loyalty and support to Nana Fadnis in the enterprise which he had started

---

*No 343* ] [ 7 February 1774

**श्री**

पौ छ २६ जिल्काद आर्बा

विनती माणसे घेऊन हवा चागली सा सिवनेरीस जावे असे आपल्यास लिहिले होते त्याचे उतर उतम आहे असे आपले आले त्यावरून प्रतापगडाखालून माणसे आणावी असे त्याज कडे लिहून पाठविले तो रामचद्र नारायेण सातारियास आले हे वर्तमान ऐकोन न येणे ह्मणून त्यास लिहिले व आपल्यासही लिहिले होते त्यास रामचद्र नारायण सातारियास आले हे वर्तमान त्यास जवळ त्यापक्षी लौकर करताच आमचे पत्र न येण्याविसी पाठविले तें न पोहचताच त्याणी प्रतापगडचे घाटाने खाली कोकणात उतरून तोरण्याचे पेठेवरून आजच सोमवारी सायकाळी पुण्यास बागेत आह्मी आलो, तेथे आली आता येथे राहाणे व्यर्थ, सिवनेरीस जावे असा आपला आमचा पूर्वसदर्भही लिहिण्यात आहेच त्याप्रो आज रात्रीसच निघून खेडास गेलो तिकडून

---

* येथून अक्षर नानाचें

माणसे आली तीं दोन वेळा शयाद्रीचे घाट चढउतार यामुळें हैराण जाली खरीच परतु पुढे मुहूर्त ठीक नाही, दोन तीन दिवस व्यर्थ मुक्काम होतात, दिवस गडबडीचे, यास्तव खेडास निघून गेलो तेथे भीमातीरी सिवरात्रही करून पुढे गेल्यास चिंता नाही हे समजून गेलो आपल्यास कळावे ह्मणून लि॥ असे लस्करचे व राजश्री मामाचे वर्तमान तेथे येतच असेल, तें कळवीत जावें बहुत काय लिहिणे? रा। छ २५ जिल्काद तीन प्रहर रात्र हे विनंती

☞ The writer informs the addressee ( Moroba Fadnis ? ) of his having selected Shivner for the ceremony and of his being on his way to that place This is probably connected with the thread ceremony of Moroba's son

---

*No 344* ] [ 12 February 1774

श्री

पौ छ २ जिल्हेज

राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव कृष्ण गोसावी यास,—

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य प्रति मातुश्री गगाबाई आसीर्वाद सु॥ आर्बा सबैन मया व अलफ किले सातारा येथील खर्चास लक्ष्मण भिकाजी कारकून सिलेदार याजबरोबर नख्त रुपये २५००० पचवीस हजार उटावर घालून पाठविले आहेत घेणे पावलियाचे उतर पाठवणे + जाणिजे छ १० जिलकाद

☞ Gangabai advises Baburao Krishna of the despatch of Rs 25000 for the expense of Satara

---

*No 345* ] [ 13 February 1774

श्री

पौ छ १२ जिल्हेज

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य राजश्री ब बूराव कृष्ण गो यासी,—

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ आर्बा सबैन मया व अलफ पुण्यातील वगैरे कितेकानी फितुर करून बदराहा वर्तणुक करू लागले हे जाणून राजश्री त्याचे हाती न चाढावे या अर्थे तुम्ही सातारियाचे किल्यावर राजश्री नेऊन ठेविले, बदोबस्त येथास्थित येथील मर्जीनरूप केलात म्हणून वर्तमान कळले तेण्हेकरून तुम्हावर मर्जी बहुतच सतोष जाली असे फार उतम केले हरामखोर आपले ढगास प्रवर्तले तशा समयात दूरदेसी मनात आणून खावद्चाकरीवर दृष्ट देऊन मनसुब्याची गोष्ट केलीत शाबास तुमची तारीफ पत्री काय ल्याहावी? याउपरीही बहुत सावध राहाणे तुह्माकडे ते पेगाम तऱ्हेने तऱ्हेने लावितील तुम्ही चितात आणणार नाही हे खातरजमाच आहे तथापि सूचना लिहिली आहे तरी राजश्रींस किल्यावरच ठेऊन फितवेखोराचे हाती न लागत ते गोष्ट करणें खासा स्वारीही फिरली, दर कूच येत असे तोपावतो तुम्ही सावधगिरीने राहून बहुत बदोबस्त करणे येविसीचे बदोबस्तास हुजरून रा। रामचद्र नारायण पाठविले आहेत ते पावलेच असतील ते व तुम्ही मिलोन बदोबस्त करणे × जाणिजे छ १ जिल्हेज

☞ Peshwa Raghunathrao compliments Baburao Krishna on his having kept the Chhatrapati secure in the fort of Satara

---

+ येथून अक्षर नानाचे

and warns him against the treacherous machinations of a party of some prominent Poonaites

---

*No 346* ] [ 13 February 1774

पौ छ १० जिल्हेज

श्रीगणराज

श्रीमत राजश्री नाना फडणीस स्वामीचे शेवेसी,--

विनती शेवक पाडुरग गोविंद कृतानेक सानमस्कार विनती येथील वर्तमान ता। छ १ जिल्हेज जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष लस्करातून आज प्रहर दिवस पावेतो वर्तमान किमपि आले नाही येताच सेवेसी लिहून पाठवितो सातारेकडे फौज काही लष्करातून आली होती ती जिकडे तिकडे फुटोन गेली काही आपणाकडे पुरधरासही गेली ह्मणून रहिमतपुराहून व सातारेकडून आमची बातमी आली स्वामीस कळलेच आसेल आज ता। लष्करची बातमी यावी परतु दिवसगत का लागली न कळे आज उद्यात वर्तमान यावेसे आहे राजश्री मामा व भोंसले कोठे आहेत हें लेखन करावयास आज्ञा करावी बहुत काय लिहिणे हे विनती चिरजीव गगाधरराव व तीर्थस्वरूप राजश्री कोनेरराव आजता। पावलेच आसतील हे विनती

☞ Pandurang Govind communicates to Nana Phadnis some items of military operations and inquires where Trimbakrao and the Nagpur Bhosle were

---

*No 347* ] [ 14 February 1774

श्री

छ २५ जिल्हेज फाल्गुन विशय

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री मोरो बाबूराव स्वामी गोसावी यासी—

पो रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणे विशेष तिकडे काही गडबड जाहाली आहे ह्मणून परस्परे विदित जाहाले येशास तुह्माकडून काहींच विनतीपत्र येऊन वर्तमान कळो न दिल्हे अपूर्व आहे असो हाली तुह्माकडे रा। अनद्राव तोरो कारकून पाठविले असेत तरी काय वर्तमान आहे ते याजपासी सागणे व तुह्मी विनतीपत्र वरचेवर लेहून पाठवीत जाणे जाणिजे छ २ जिल्हेज सु॥ आर्बासबैन मया व अलफ × बहुत काय लिहिणें हे विनती

☞ Peshwa Raghunathrao expresses his surprise to Moro Baburao why the latter had sent no communication so far

*No 348* ] [ 19 March 1774

श्री

राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव गोसावी यासी,—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो बालाजी जनार्दन आसीर्वाद व नमस्कार विनती उपरी येथील कुशल ता। छ ६ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष ऐवज पाठविला तो पावलाच असेल किल्यावर दारुगोळा दाणा वगैरे जिंकिरा काय आहे याची याद पाठवणे, किल्याची बेगमी दाणादुणा वगैरे हर येकविसी पोख्ती बेगमी करणे आह्मी व राजश्री सखाराम-पंत बापू श्रीमंत मातुश्री बाईसाहेबास घेऊन पुरंदरास आलो, हे वर्तमान श्रीमंत माहाराजास लिहिले नवते येथील व चहूकडील बंदोबस्तास गुंतलो होतो हाली उभयतानी पत्रे लिहून राजश्री लक्ष्मणपंत पाठविले आहेत याची भेट करून पत्रे देऊन उतरे घेऊन पाठवणे किल्याचा बंदोबस्त कसक्सा आहे तो लक्ष्मणपंतास दाखवणे × बहुत काय लिहिणे हे विनंती

☞ Nana Fadnis writes to Baburao Krishna to be very cautious in the protection of Satara and to send the writer a complete list of ammunition and provisions

---

*NO 349* ] [ 19 February 1774

श्री

राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव गोसावी यास,—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्नो। हरि बल्लाळ आसीर्वाद व नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ ७ जिल्हेज आवसीची प्रहररात्र जाणून स्वकीय कुशल लिहित जावे विशेष तुह्मी छ ६ जिल्हेजचें पत्र पा। तें छ ७ मि।। सायंकाळी पावलें श्रीमंताचीं पत्रें तुह्मा उभयतास आली, त्याच्या नकला करून पा। त्या पावल्या श्रीमंत राजश्री दादा फडनीस याचे पुत्राची मुंजी फाल्गुन शुध दशमीची शुनरास करणार यास्तव श्रीमंत राजश्री नाना आजच गेले मुंजी होताच निघोन येतील तुमची पत्रें त्याजकडे पाठविली पत्रांतील मजकूर श्रीमंत राजश्री बापूस सांगितला त्याणी सांगितले कीं जासूद आले असतील ते किल्यावर अडकाऊन ठेवणें, जाब न देणें याप्रो करावें नाना चहूरोजीं येतील तुह्माकडील कारकून आजच येथें आले भेटले त्याचे नावाचा लखोटा सकाळी त्यास प्रविष्ट करू लस्करचें वर्तमान तुह्मी लिहिले ते आह्मास कळलें असे तुह्मास कळावयाकरिता रातोरात जासूदजोडी पा। असे तुह्मी इतबारी आहा कोणेविसी चिंता न करावी पचवीस हजार रु।। येथून पा। आहेत, किल्यावर सरंजाम बहुत जलदीनें चढवावा राजश्री कुशाबा वरते आहेत ते तुह्मी यकमतें चालतच असाल दिवस यकप्रकारचे आहेत यकरूप असावें चार माणसें अधिक आगळी लागल्यास ठेऊन बंदोबस्त परवानगी रसानगीचा करावा राजश्री त्रिंबक राऊ मामा साबाजी भोसले पचवीस हजार फौजेनसी लस्करचें तोंडावर आहेत लस्करातही सान्यास सकेत आहेत लवकरच संतोषाचीं पत्रें येतील लस्करातून जासूद आले त्यास पुसावें कीं तुह्मी कोणे मुक्कामीहून आलेत ? श्रीमंत बाई पुरंदरास घेऊन आलों हें वर्तमान लस्करात कधीं कळलें ! फौज किती आहे ? लस्कर गलबलें किंवा हुशार आहे ! काहीं फौज निराळी आली आहे की काय ! असें बारीक बारीक वर्तमान पुसोन—

☞ This is the first sheet of a letter addressed by Haripant Phadke to Baburao Krishna extolling his faithfulness and circumspection in not yielding to the persuasion of Raghunathrao

---

*No 350* ] [ 27 February 1774

पौ छ १८ जिल्हेज

श्रीगणराज

**श्रीमत राजश्री नाना फडणीस स्वामींचे सेवेसी,—**

पोष्य पाडुरगराव गोविंद कृतानेक साष्टाग नमस्कार विनती उपरी येथील कुशल ताा छ १५ जिल्हेज रविवार श्रीमताची स्वारी माघारी फिरोन मजल दर मजल काडलूरसगमाकडे जात आहे ह्मणून लक्ष्मेश्वराहून पत्र आले ते व जमखिंडीहून पत्र आलेले चिरंजीव राजश्री गगाधरराव याजकडे पाठविली आहेत त्यावरूत लस्कराचे वर्तमान कलेल आपणाकडे तथ्य वर्तमान आले आसेल ते लिहून पाठविले पाहिजे तीर्थस्वरूपाची पत्रे अद्यापि आली नाहीत आल्या उपरी लिहून पाठऊ * राजश्री गोपाल्पत लस्करातून आह्माकडील साहावे रोजी काल तास रात्रीस आले तेच सेवेसी पाठविले आहेत आपणाकडील पत्राचा पुरावा व बारीक बातम्य' येश्या जलद् वरचेवर जात जाव्या आवल्याची मोट आहे विना आगेजणी पक्के होत नाही आपणही मुजीकरिता गेला होता तिकडील सविस्तर कचे लेखन करावयासी आज्ञा करावी बहुत विनती

☞ Panduiang Govind Patwardhan seeks from Nana Fadnis news of Raghunath's movements and advises him to use the utmost caution to meet the delicate situation that was developing for their ministerial party

---

*No 351* ] [ 6 March 1774

पौ छ ३ मोहरम अर्बा

श्रीशंकर

सेवेसी वामनराव गोविंद कृतानेक साा नमस्कार विज्ञापना ताा छ २२ जिल्हेज मो हेटकल नजीक लोचनगुड तुगभद्रा दक्षणतीर येथे सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष राजश्री भवान राव प्रतिनिधि व तुह्मी मिलोन सर्वांस साभालोन घेऊन येणे, मसलतीचा घाट येथास्थित उतरणे एकनिष्ठ वडिलापासोन तुह्मी आहा तेथे फार लिहिणे न लगे ह्मणून अज्ञा यैशियास येथील मजकूर आजपावेतो जाला तो लिहिला आहे व कारकुनासमागमे सागून पाठविला राजश्री त्रिंबकराव मामा जवल पास कोठे नाहीत यास्तव येथील मडली मागे पुढे पाहू लागली रो भवानराव प्रतिनिधि यास बधन झाले ते मागेच लिा होते यास्तव विस्कलित पडिले रो भीवराव पानसे यासी सेवेसी येथून मध्यस्तीस रवाना जाले आहेत ते सेवेसी विनंति करता विदित होईल आह्मास शफत घावी आणि एकनिष्ठपणे राहावे ह्मणून बहुत प्रकारे ह्मणत होते परतु आह्मी राजश्री मुरार राव घोरपडे सेनापति यास सागितले की आमचे लक्ष येथे नाही श्रीमत मातुश्री जवल आमचे लक्ष यास्तव जे करतील ते करूत परतु आमचे राहाणे घडत नाही, आणि आह्मी रो सेनापती सही बहुत प्रकारे सागितले की तुमचा व श्रीमत कैलासवासी याचा रुणानबध बहुत होता हे दिवस प्राप्त जाले यात तुह्मीही नसावे तिकडील होईल ते साहित्य करावे न होय पक्षी माघारे तरी जावे, यातच तुह्मास श्रेयस्कर, आसे सागितलेवरून त्यानीही निरोप घ्यावयाचा विचार केला आह्मी साफ सागितले की हे राहिलेवर आह्मी येत नाही त्याजवरून सिद्नूरचे मुकामी बहाना करून हैदरखानाकडील यैवज घेऊन येणे ह्मणून आज्ञा करून आह्मास व सेनापतीस निरोप दिल्हा

---

* येथून अक्षर वेगळे

हा मजकूर सेवेसी सागून पाठविला आहे हाली सर्वास पत्रें आली त्यात भाव की आज्ञास व प्रतिनिधीस मिळोन येणे येसियास आमचा प्रकार तसाच होता परतु प्रतिनिधीस आवरण जाले राजश्री मामा कोठेहि नाहीत जवळ पास आल्याची बातमीही नाहीं असे जाणून येथील मडली सर्व सरकारचे लक्षात होती, त्याजपैकी आज्ञाबरोबर यावयास उतावली करीत होते काही लोकाचे मने मातबर सोबत असावी असे जाणून उतावली करीत होते त्यास सागितले की तुह्मी उतावली न करणें, च्यार दिवस सरकार कामासाठीं आहा तसे राहून दिवस घालिवणे, मामाचाही उदये आठ च्यार दिवसात होईल, आज्ञाकडून त्याजकडे पत्रें गेली आहेत यास्तव दम धरून राहाणें ते जवळ येताच आह्मीही सडे होऊन पिछावर येतो मग सर्व जसे आता कामाची नजर धरिता त्याजप्रो करावे असे सागोन राहाविले आता मामाचे बातमीस्तव लस्करात व मामाकडे माणसे पा आहेत ते जवळ आल्याची बातमी येताच आम्ही सडे होऊन लस्करचे पिछावर जात आहो अथवा मामाचा उदये कोठेच नाहीं असे वर्तमान आलें तर लस्कर डावे उजवे टाकून सेवेसी येतो अथवा इकडे येखादे ठाण्यास घेरून बसल्यास काहीं कुमक जाल्यास करू हाली सरकारची पत्रें सर्वास रवाना जालीं हीं पावतीं करावी तर प्रतिनिधीस आधीच आवरण आहे आणि हे पाहिल्याउपर विशेष होऊन काम नासेल यास्तव दिल्ही नाहींत याजउपर सर्व लाहान थोरास राजपत्रे प्रा करावी त्यात भाव जे सरकारकामावर लक्ष धरून जलद येणें, आसा भाव त्याहावयासी आज्ञा करावी आजी आमचे कूच होऊन कपलीचे सुमारे गेलो तूर्त रास्ते याजकडील तालुक्यास उपद्रवास प्रारभ जाला आहे तेथील बातमी येईल त्याप्रमाणें करावयास येईल सेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति

विनती सेवक परशराम रामचद्र व रघुनाथराव नीलकठ व पुरुषोत्तमराव कृष्ण कृतानेक सा नमस्कार विज्ञापना आज्ञापत्र सादर जाहले, त्याचे उतर वडिली लिहिले आहे त्याजवरून विदित होईल सेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति

☞ Vamanrao Govind Patvardhan gives a graphic description of conditions and measures obtaining in the camp of Raghunathrao, who was being gradually deserted by all the prominent Sardars The writer persuaded Murarrao Ghorpade to join the Barbhais Kampli is 13 miles east of Hospet

---

*No 352* ] [ 6 March 1774

## श्रीगणराज

पौ छ ४ मोहरम अर्बा

### राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामींचे सेवेसी,—

पो वामनराव गोविंद कृतानेक सा समस्कार विनती उपरी येथील कुशल ता छ २२ जिल्हेज भानुवासरे मु॥ लोचनगुड तुगभद्रातीर जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष आपण छ १३ जिल्हेजची पत्रे पाठविली ती पावली लिहिले वर्तमान सविस्तर कलले इकडील वर्तमान तरी येथील मनसबा येक प्रकारचा जाला याचे कारण राजश्री मामाचे कोठेंही आल्याचे पक्के वर्तमान नाहीं यास्तव मडलीपैकीं काहीं लोकाचे चिती तूर्तच गडबड करावी काहीं लोकाचे चिती मातबर सोबत मिळावी, मातबर काम व्हावे आम्ही खानदानचे लोक, येकादे जागा प्रकार बिघडला नर्दी तेही वाईट असे जाले तेव्हा आम्ही सर्वास येकच विचार सागितला जसे आहा तसे

राहून जिकडे चित आहे तसे असो देणें तिकडूनही मातबर फौज येते व आम्हीही मागाहून येतो तुह्मास घेऊन जाऊ चिंता न करणे असे सर्वांचे दिलासे करून दीलभरवसा केला आमचा प्रकार तरी आह्मास दोन च्यार वेळ श्रीमतानी राजश्री मुरारराव घोरपडे याचे विद्यमान बोली लाविली की निरवालसपणे राहून शफत यावी आपण तुमचे माडीवर उसे ठेवितो तुमचे चितास येईल ते करा परतु आह्मास त्या बोलण्याचा विस्वास न पडे, आणि दुसरे लक्षही नाही आपण जाणतच आहा येकच विचार आडात घालून दे र कापणे ही लक्षणे कुलवताची नवेत किती दिवस जगावे ? थोरास काय गति घडल्या आमची कथा काय आसा विचार सेनापतीही मनसवा सागितला की श्रीमत कैलासवासी उभयेतानी तुह्मावर बहुत ममता करून तुमचेच कल्याण केले तुह्मी त्यासी आणभाष दिल्ही आणि हा समय या प्रकारचा घडला आह्मी सर्व येकत्र होऊन हा विचार केला यात तुह्मी आसावे तेही न घडे आणि समयास आतर करू नये असे ह्मणाल तरी तेथेही चार मातबर मिळाले आहेत येथील सर्वांची लक्षे तिकडेच आहेत त्यापशी तुह्मी येऊनही नीट होणार नाही तेव्हा लौकिक उतम दिसणार नाही आणि आपणही त्यासी पत्र लिहिले होत व आमचे सागणेवरून तुह्मी केले ते सिध्धीस जावे या आर्थे बहाना करून निरोप घेतला तो विस्तार रा॥ बाळाजीपत भिडे याजबरोबर सागून पाठविला आहे, त्याजवरोन कळेल रा॥ भीवरावही सागता कळेल आपण रा॥ येसाजीराम याजकडे श्रीमत रा॥ भवानराव प्रतिनिधीस व सर्व मडलीस पत्रे पाठविली ती पत्रे ज्याची त्यास यावी तरी पतास बधन जाले सर्वांस पत्रातील भाव ते व आह्मी सागू त्याप्रो वर्तावे असे होते पत्रे दिल्याने विशेष बधन होईल, यास्तव पाठऊन दिल्ही नाहीत आह्मी राहून काही उपयोगी नाही असे आपणास वाटेल त्यास आपण दोन तीन पत्रे पाठविली ती सारी श्रीमतास हस्तगत जाली त्याजवरोन हा प्रकार करणे व रा॥ मामाचेही पतेवार ठिकाण आमच्या रोखे आले असे आद्यापि नाही येथील प्रसग येक प्रकारे घडला यास्तव आम्ही योजना केली की रा॥ मामाचे लस्कर श्रीमतापासोन विसा पचविसा कोसाचे आतऱ्याने आल्याची खबर आल्यावर आम्ही सडे होऊन लस्करचे पिछावर येतो दोहीकडून फौजा आल्यास कामही होईल आपणास कळावे यास्तव सविस्तर लि॥ आहे दुसरी सर्वास राजश्रीची व श्रीमत मातुश्रीची व आपली उभयेताची पत्रे पाठवावी. त्यात भाव जे तुम्ही येकनिष्ठ आहा हुजूर येणे इतक्याच मजकुराची पत्रे पाठवावी रा॥ मुधोजी भोसलेही आपले लक्षात आहेत तो मजकूर रा॥ माहादाजी पत नि॥ पराजपे याजबरोबर सागून पाठविला आहे त्याजवरोन कळेल त्याचे उतर पाठविलेच असेल पावेल त्याचीही पत्रे पाठवावी आपण रा॥ दादा सिवनेरीस होते तेथे मुजीकरिता गेला होता म्हणून रा॥ हरिपत तात्यानी लिहिले होते, त्याजवरोन बहुतच सतोष जाहाला आपण तेथे गेला तेव्हा तेही आलेच असतील दादास जरूर ममतेंत घ्यावे रा॥ गोपालनाईक यास श्रीमती सधानास्तव रवाना केले आहेत परतु आतील भाव भिन आहेत नाइकानी तेथील ममतेचे म्हणून रा॥ भीवराया सही आणिले आहेत ते सर्व येथील भाव आपणास सागता कळो येईल चिरंजीव तेथे आहेतच सरकारसेवा कळेल तसी करतील लस्करचे बातमीस व रा॥ मामाचे बातमीस कारकून व जासूद पा॥ आहेत बातमी येईल तसा विचार करण्यात येईल रा॥ बाजीपत जोसी यासी बधन व्हावयाचे कारण आपण पत्र त्यासी लिहिले होते जे लौकर सर्व मडली घेऊन येणे तेच पत्र श्रीमतास सापडले यास्तव अकस्मात बधन केले राजश्री मुरारराव यासही पत्र खातरजमेचे पाठवावे, आणि सरकार ठाण्यास हैदरखानाकडील उपद्रव होऊ न यावे येसे त्याहावे मामाचे विलबामुळे सर्व विलग पडले आत. तरी लवकर आल्याने सर्व यथास्थित होईल बहुत विनती ( पुढील मजकूर बापूच्या पत्रात अधिक आहे ) आपाजीराम यासहा पत्रें पाठवावी तोही आपले लक्षात आहे आम्ही आजी येथून कूच करून कपलीचे सुमारे गेलो लस्करची बातमी येईल त्याजप्रमाणें वर्तणुक करू

पोष्य परशराम रामचंद्र व रघुनाथराव नीळकंठ व पुरुषोतमराव कृष्ण कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी आपण पत्रे पाठविली त्याची उतरे वडिली लिहिली आहेत त्याजवरून कळेल आपल्याशिवाय दुसरे लक्ष तिळमात्र नाही श्रीकृपेकरून भेट होईल तो सुदिवस तेथे कोठे भेद न होय ते करावे बहुत विनंती *

राजश्री बाबूराव वैद्य यास नमस्कार सर्व मंडळीस नमस्कार सागणे हे विनंती

☞ In continuation of his last letter Vamanrao Govind writes to Nana and Sakharam Bapu from Raghunathrao's camp south of the Tungabhadra, giving full and pertinent details of the situation of Raghunathrao who intercepted several letters sent from Poona to the various Maratha Sardars in his camp This made all afraid of Raghunathrao's wrath

---

*No 353* ] [ 6 March 1774

श्रीगणराज

पौ छ २७ जिल्हेज आर्बा

**श्रीमंत राजश्री नाना फडणीस स्वामींचे सेवेसी,—**

पोष्य पांडुरंगराव गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ २२ जिल्हेज जाणून स्वकीये कुशल लेखन करीत जावे विशेष आपण पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर कळला लष्करातून पत्रे येतात ती धरून पाठवीत जावी ह्मणून लि॥ त्याप्रमाणे जागा जागा कमावीसदारास पत्रे पाठऊन बंदोबस्त केला आहे पत्रे सापडतील ती रवाना आपणाकडे वरचेवरी करितो † मनोळीपासून बागलकोटपावेतो कमावीसदार यास लिहिले आहे जी सापडतील ती सेवेसी पाठऊन देतो बागलकोट तालुकेतील नमवडगी ह्मणून ठाणे होते ते श्रीमतानी घेतले कमावीसदार रास्तेकडील धरला ह्मणून बातमीची पत्रे आली तीच बजिनस आज दोन प्रहरी सेवेसी पाठविली आहेत छ १७ जिल्हेजी मोगलाकडे मामा आक्लकोटाहून कूच करून गेले आथणीचे पत्रच आनंदराव याचे आले हे विनंती

राजश्री हरिपंत स्वामीस सा। नमस्कार विनंती सदैव पत्री संतोषवीत आसावे बहुत विनंती

☞ Pandurangrao Patvardhan informs Nana Fadnis of news from Raghunathrao's camp, mentioning how he was intercepting letters to his partizans

---

*No 354* ] [ 12 March 1774

पौ छ १ मोहरम अर्बा चैत्र

श्रीगणराज

**राजेश्री उभयेता स्वामींचे सेवेसी,—**

विनंती उपरी आज फाल्गुन वद्य आमवाशा मद्दवारी तेरदल व जमखिंडीची पत्रे आली ती बाजिनस पाठविली आहेत त्यावरून सविस्तर कळेल आज मद्दवारी मजखिंडी नजीक तीन कोसा

---

* असेच पत्र विरकोळ फेरफारानिशी सखारामबापूकडेही पाठविले होते † निराळे अक्षर

वरी मुकाम जाहला लुटावयाची व जाळावयाची आज्ञा झाली आहे राजश्री मामाची फौज आलद्-गुजोटीकडेच आहे तीर्थस्वरूप राजश्री वामनराव राजश्री मुरारराव याजपासून निघून कनकगिरीचे* सुमारे आहेत ह्मणून वर्तमान आहे×मामा अद्याप लावणीवर टाकितात का याचा आर्थ कळत नाहीं आह्मावर ते आले तर आमचेकडून बातमी कळणार नाहीं सर्व सकटपरिहार करणार श्रीमत कैलासवासी याचे पुण्य आहे बहुत काय लिहिणें ? श्रीपढरीनाथ इतके करणार नाहीं हे विनती

☞ Nana and Bapu are informed of Raghunathrao's camp having arrived near Jamkhindi

---

*No 355* ] [ 21 March 1774

श्री

**राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव गोसावी यासी,—**

अखडित लक्ष्मी अलकृत राजमान्य श्री॥ हरि बलाल आसार्वाद व नमस्कार विनती उपरी येथील कुशल ता। छ ११ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष तुम्ही पत्र पा। ते पावले आम्ही मगळवारी तेथून निघालो तो तेच दिवशीं रात्रीस बावीस कोस राजश्री मामाचे लस्करास पावलो श्रीमत कृष्णेचे पाण्याने वरते येत होते त्र म आमची फौज जवळ आली तेव्हा तो रोख सोडून अग्रणी नदीचे पाण्यावर आले विजापुरचा रोख धरितात असी बातमी आली त्यावरून आम्ही सडी स्वारी केली राजश्री वामनराव आज भेटतील मोगलाची फौज मागें चहू कोसाचे अतरे टाकून आम्ही दरमजल जात असों श्रीकृपेनें लौकरच गाठ पडेल तुह्मास लिहून पाठवू मी सातारियाहून आल्यावर राजश्री मामास तेथील बदोबस्ताचा प्रकार समजाविला सतोष जाहला तुम्ही वरचेवर पत्र पाठवीत जावे तुम्ही तथे असता आह्मी काळजी करावी असे नाहीं बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे राजश्री कुशाबास चिठी लिहली आहे द्यावी हे विनती

☞ Haripant Phadke informs Baburao Apte at Satara of his having joined Trimbakrao's army near the Krishna Men are reported to be in high spirits

---

*No 356* ] [ 28 March 1774

श्री

पौ। छ १६ मोहरम

**राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव कृष्ण गोसावी यास**

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य प्रति मातुश्री गगाबाई आसीर्वाद सु॥ अर्बा सबैन मया व अलफ आह्मी सातारियास येणार तेथें स्वारी येईल त्याच दिवशीं राजश्री स्वामीस खाले उत रावयाचा मजकूर आहे त्यास वाडे झाडून नीट करून ठेवणें तार्थस्वरूप राजश्री दादासाहेब याणी पळावयाचा विचार करून मिरजेचे मुक्कामीहून निघाले + त्याचे म गे फौजा गेल्याच आहेत त्यास कदाचित जवळपास इकडे आले तर येण्यास गुता काही पडेल लिहिल्याप्रमाणे तरतूद करणें जाणिजे छ १५ मोहरम, † आज्ञा प्रमाण

☞ Gangabai informs Baburao Apte of her intention of

---

* About 20 miles north of the Tungabhadra, District Raichur × येथून अक्षर निराळें + इ स ऐ टि १-६२ पहा † यथून निराळे अक्षर

removing for protection from Purandar to Satara, in view of Raghunathrao's journey from Miraj towards the north

No 357 ] [ 6 April 1774

श्री

पौ छ ३० मोहरम

राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव कृष्ण यास,—

प्रति मातुश्री गगाबाई आसीर्वाद सु॥ आर्बा सबैन मया व अलफ तीर्थस्वरूपानीं राजश्री त्रिबकराव विश्वनाथ यासी मलुखाचा सदर्भ लाविला यामुलें याणी विश्वासेंकरून हजार पाचशें राउतानसी त्याचे आसपास जाऊन त्याजकडील मध्यस्थासी बोलत आहेत तो इतकियात त्याणी दगा करून धरून नल यामुलें मनस्वी आवाया कदाचित आल्या असतील त्यावरून हवालदिल व्हाल तरी न होणें वर्तमान या जातीचें आहे केवल सावध असोन धरून नेले असें नाहीं असो सरकारची फौज व खासा नबाब व राजश्री साबाजी भोसले सेनासाहेब सुभा हे एकत्र होऊन सावध आहेत, व तिकडील हुजरातची पथकें व लहान मोठे सरदार याच इकडे यावयाचें अनुसधान लागलें आहे तेही सारे लौकर येतील प्रस्तुत त्याणी पल काढिला इकडील कुल फौज पाठीस लागली आहे तरी तुह्मी किल सातारा येथील बदोबस्त यथास्थित करून बेवसवसा* राहाणे दुसरेकडून तुह्मास कोणाची पत्रें आली तरी त्याजवर न जाणें हाली राजश्री श्रीनिबास पडित प्रतिनिधींही फौजसुधा आपले फौजेत सामील जाहाले जाणिजे छ २४ मोहरम × आज्ञा प्रमाण

☞ Gangabai in communicating to Baburao Krishna the sad end of Trimbakrao Pethe asks him to hold courage and not give in to any wild romours of the ministerial party fearfully weakened

No 358 ] [ 7 April 1774

श्री

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य राजश्री उधो विरेस्वर गो यास—

प्रति मातुश्री गगाबाई आशीर्वाद सु॥ अर्बा सबैन मया व अलफ राजश्री मोरो बाबूलव याची मुलेमाणसे सिवनेरीस शहरात आहेत, त्यास गडबड जालियास माणसे घेऊन किल्यावर येतील त्यास वरते येऊन राहू देणे बरोबर शागीर्दपेशाचे लोक पचवीस तीस घेणे † जाणिजे छ २५ मोहरम बहुत काय लिहिणे

☞ Udhav Vireshvar Chitale is asked by Gangabai to admit Moro Baburao's family into the Shivneri fort for security

* निश्चित × निराळें अक्षर व गगाबाईची माळ † जाणिजे पासून मोहरम पर्यंतचीं अक्षरें नाना फडणविसाच्या हातची व बहुत काय लिहिणें हीं आणखी दुसऱ्याचीं

*No 359* ] [ 8 April 1774

श्रीसांबः सपुत्रो विजयते

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखाराम भगवत गोसावी यासी,-**

पोष्य रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणे विशेष वेदशास्त्रसपन्न राजश्री वररुची पाध्ये यास हुजुरून तुह्माकडे पाठविले आहेत हे सागतील ते सविस्तर ऐकोन उत्तर सत्वर पाठवावे तुमचे उत्तर येईल त्याअन्वये पुढील कर्तव्य मनसुबे घडोन येतील आमचे मुख्य मतलब भटजीस सागितले आहेत पत्री तपसील लिहिला नाही तुह्मास आमचे मनातील अर्थ सर्व समजलेच असतील तुमचे तर्कात न येत ऐसे काय आहे? तथापि सूचना वेदमूर्तीजवळ केली आहे तुमचे उत्तराचा मार्ग लक्षीत असो जलद उत्तर पाठवावे जाणिजे छ २६ मोहरम शुक्रवार बहुत काय लिहिणे मुकाम मुबई (?) हे विनती

☞ Raghunathrao writes to Sakharam Bapu telling him of his envoy Vararuchi Padhye having been deputed to meet the addressee and explain the writer s intentions so as to bring about a reconciliation

---

*No 360* ] [ 12 April 1774

श्रीसांबः सपुत्रो

**राजश्री सखाराम भगवत यासी,—**

विनती उपरी कितेक मजकूर चिरजीव रा बज्याबानी विनती केली त्याजवरून रा चिंतो विठल यास पाठविले आहेत याजपासी खुलासा मजकूर बोलणे परलोक स्मरोन विवेक केल्यास इहलोकही उत्तम आहे रयतीचेही कल्याण आहे राज्यही बाकी राहिले ते वाचेल यात उत्तम दिसेल ते कराल आह्माकडून गैरवाजवी ओढाळपण होणार नाही जाणिजे छ ३० मोहरम हे विनती बराबर विसाजी केशव पाठविले आहेत उभयताही बोलतील हे विनती

☞ Raghunathrao sends Chinto Vithal to Sakharam Bapu for effecting terms of peace between the two parties and warns him of the consequences if he rejected the proferred hand

---

*No 361* ] [ 17 April 1774

पौ छ ६ रौवल आर्बा मु॥ सातारा *

श्रीसांब सपुत्रो विजयते

**राजश्री सखाराम भगवत यासी,—**

विनती उपरी रा चितो विठल व विसाजी केशव पिंपरीचे मुकामीहून तुह्माकडे पाठविले आहेत जबानीवरून कललेच असेल साराश दौलत बहुता दिवसानी वडिलानी मेळविली ते आमचे तुमचे कजियाने बुडवावी हे तुह्मास उचित नाही चिरजीव गगाबाईस पुत्र व्हावा, पुढें थोर जाहाल्यानतर दौलतही करील येविसी आमचेच मानस अनुकूल आहे तुह्मीच लटके तर्क कुतर्क घेऊन कजिया वाढऊन मोगलाचे घरात दौलत घालिता हे या लोकी व परलोकी बरे की

---

* पैवस्ती नाना फडणिसाच्या हातची असाच मजकूर दादासाहेबाच्या वतीनें व्यकटराम शास्त्रीनें महादजी शिंद्याला लिहिलेल्या पत्रात आहे तें पत्र पिंपरी नजीक औरगाबादहून तीनच दिवसापूर्वी म्ह १४-४-१७७४ ला लिहिलें आहे पहा सिंदे शाहीची राजकारणें १ ले १

काय ? पूर्वी नारायेणरायाचा काळ जाहाला तेव्हा तुह्मी माडीवर शफत वाहिली ते विस्मरणात आली की काय ? तुह्मासी आह्मी शपथ केली त्यात अतर कोणते केले ! सर्व गोष्टी मनन करून उत्तर पाठवणे असो जाहाले ते जाहाले, पुढें तरी समाजून करावे सर्व कारभार आह्मीच करावा हाही आग्रह नाहीं अत पर तुह्मास उचित दिसेल ते कराल नेमिले असेल ते होईल जाणिजे छ ५ सफर हे विनती

☞ Raghunathrao warns Sakharam Bhagvant against the extreme measures that the ministers were pursuing and against the terrible consequences that would result by such persistence

---

*No 362* ] [ 17 April 1774

श्रीसांबः मपुत्रो विजयते

राजश्री मोरो बाबूराव यासी,—

विनती उपरी रा चिंतो विठल यास पाठविले आहे त्याजरून येथील मजकूर कळलाच असेल साराश ज्या काळी होणे ते जाहाले अत पर तऱ्ही तुह्मी सारे मिळोन ज्यात आमचे व सर्वाचे बरे तच तोड काढून उभयतास पाठवावे हे विनती रा छ ५ सफर

☞ Raghunathrao requests Moro Baburao to meet Chinto Vithal and bring about a reconciliation so advantageous to all

---

*No 363* ] [ 17 April 1774

श्री

पौ छ ७ सफर

राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव कृष्ण गोसावी यासी—

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य प्रति मातुश्री गगाबाई आसीर्वाद सु॥ आर्बा सबैन मया व अलफ मसुदा पाटविला आहे त्याप्रमाणें राजश्री स्वामीचे पत्र राजश्री भवानराव प्रतिनिधि यास चिटनिसाचे हातचे घेऊन लौकर पाठवणे × जाणिजे * छ ५ सफर + आज्ञा प्रमाण

☞ Baburao Krishna is advised by Gangabai to obtain a letter from the Chatrapati to Bhavanrao Pratinidhi to remain firm Nagoji Sinde is always associated with Baburao Krishna, in correspondence, as they showed a disposition to disagree between themselves

---

*No 364* ] [ 18 April 1774

श्री

पौ छ ७ सफर

राजश्री नागोजी सिंदे व बाबूराव गोसावी यास—

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य स्नो बाळाजी जनार्दन आसीर्वाद व नमस्कार विनती

---

* ' जाणिजे छ ५ सफर ' हीं अक्षरें नाना फडणिसाच्या हातची

उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष श्रीमत मातुश्री गगाबाई अधिक शुद्ध सप्तमीस इदुवासरी प्रसुत जाहाली पुत्र जाहाला तुह्मास कळावे ह्मणोन लिहिले असे बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनती

☞ The birth of a son to Gangabai is reported in this letter to Baburao Krishna by Nana Fadnis

---

*No 365* ] [ 19 April 1774

श्री

पौ छ ९ सफर आर्बा ×

सेवेसी नागोजी सिदे व बाबूराव कृष्ण विज्ञापना ता छ ७ सफरपावेतो क्षेम असो विशेष रा गोपाल नाईक याचा येणे याचा कोण अर्थ आहे त्याचा बारकाईने शोध घऊन लिहून पा ह्मणोन आज्ञा व वर आल्यास घेऊ नये त्यास त्याची मुलें माणसे शहरातच आहेत, ते आपल्या घरास आले आहेत ते आल्यावर आपणासही त्याची पत्रे नेली आहेत वर येणे याचा अर्थ तर फार करून राबत्याचे शहरचे लोक आहेत, त्यासच परवानगी देत नाही मग गैरराबत्याचा येणेच नाही आणखी बातमी घेऊन लिहून पा तूर्त ते राहणार आहेत सेवेसी स्रुत होय × हे विज्ञापना

☞ Baburao Krishna accepts Nana's instructions not to give admission into the Satara fort to Gopal Naik ( Tambvekar ? )

---

*No 366* ] [ 28 April 1774

श्री

पौ छ १८ सफर आर्बा

राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञा केली एसीजे तुह्मी विनतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले गगाबाई याचे पुत्राचे नामकर्ण द्वितीयेस नेमिले हे कलोन स्वामीस बहुत सतोष जाहाला सोहळा लौकरीच सिद्धीस न्यावा दर्शनास येतो ह्मणोन लिहिलेत उतम आहे जाणिजे छ १६ सफर § बहुत काय लिहिणे

☞ Ramraja acknowledges Nana's letter communicating the fixture of the name-giving ceremony of Gangabai's Son

---

*No 367* ] [ 1 May 1774

श्री

राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञा केली ऐसीजे तुह्मी विनतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले द्वितियेस नामकर्ण करून नामाभिदान माधवराव ठेविलेत उतम केले जाणिजे छ १९ सफर × बहुत काय लिहिणे

☞ Ramraja received the news of the name Madhavrao having been given to the new child

---

× पेवस्ती नानाच्या हातची § येथून हस्ताक्षर छत्रपति रामराजाचें असलें पाहिजे

*NO 368* ] [ 1 May 1774

श्री

पो छ २० सफर आर्बा

सेवेसी विज्ञापना ता छ १९ सफर पावेतों स्वामीचे कृपावलोकने सेवकाचा व किल्याचा बदोबस्त यथास्थित असे विशेष सेवकास पत्र पो ते पावले सविस्तर अभिप्राय कलला येथील बदोबस्ताचा अर्थ तर पूर्वीच स्वामीची आज्ञा पक्केपणाने असावे ऐसी आहे त्या लक्षानुरूप सेवकाची वर्तणूक आहे येणेकरून सर्व विघ्ने खपुष्पवत् जाहाली पुढे स्वामीचे आज्ञेप्रो सेवक पक्केपणानेच आहे या स्थलास हवालदार पाठवावयाचा अर्थ लि॥ त्यास स्वामीची स्वारी सप्तर्षीस लौकरच होणार आहे ते समई आज्ञा होईल, त्याप्रो वर्तणूक होईल साराश तिकडील बड पुर्ते मोडे तोपर्यंत जो विचार करणे तो दुरदेशी पहून करावा लागेल बहुत काल पदरचे सेवक होते तेच घातास प्रवर्तले त्याचा सूड आपण ईश्वरी तेज ह्मणोन घेतला सेवकास सेवेवाचून दुसरा अर्थ दिसत नाहीं × जो स्वामीकाजी तत्पर तो प्राणाहून पलीकडे येवढी मात्र निष्ठा आहे तेच फलद्रात्री आहे नागोजी सिंदे हुजूरच राहिले ह्मणोन लिहिले ते कलले त्याकडील लोक व त्याची बाइको व वस्तवानी खाली उतरून देतो सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Baburao Krishna heartily congratulates Nana Fadnis for the success of the hazardous measures that he had adopted and assures him of his loyalty and readiness to execute all the commands to the best of his ability

*No 369* ] [ 2 May 1774

श्री

पो छ २७ सफर

**अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गोसावी यास,-**

प्रति मातुश्री गगाबाई आसीर्वाद सु॥ आर्बा सबैन मया व अलफ रा नागोजी सिंदे यास तूर्त हुजूर ठेविले असले तरी तुह्मी किले सातारा येथील चौकी पहाऱ्याचा बदोबस्त बहुत खबरदारीने करून किला हुशार राखणें § जाणिजे छ २० सफर * आज्ञाप्रमाण

☞ Baburao Krishna is informed that Nagoji Sinde was transferred from Satara to Purandar

*No 370* ] [ 4 May 1774

श्री

पो छ २४ सफर आर्बा

सेवेसी बाबूराव कृष्ण करद्वय जोडून साष्टाग नमस्कार विज्ञापना ता छ २२ सफरपावेतो सेवकाचे व किले सातारियाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीची आज्ञा जाली त्याप्रो नागोजी सिंदे याचे ममतेचे लोक होते ते झाडून युक्तीनें खाली उतरले व त्याची मुलेमाणसेही उतरली येथील पका बदोबस्त करून सेवक आज्ञे प्रो खबरदार आहे मारानिलेबरोबर लोक पचवीस तीस आा त्याचेच तर्फेचे गेले होते ते खालीं पुरधरचे माचीस आहेत तेही तेथें नागोजी

× येथून अक्षर वेनले पैवस्ती नाना फडणिसाच्या हातची § येथून अक्षर नानाचें * ही अक्षरें निराळ्या वळणाची

शिंदे यास आज्ञा जाहाली ह्मणजे जातील यानतर राजश्री माधवराव तुकदेव सैन्यात पलीकडे आहेत व तिकडील रक्षाचे लोक आहेत त्याची घरे व जमिनी फित्यानजीक गावी आहेत, त्याची जप्ती करावयाची आज्ञा आली तर जप्त करू नागोजी शिंदे याची मुले माणसे उतरली तीं त्याचे निसबतीस महिमानगड आहे तेथें जाणार आहेत × कळावे सेवकास आज्ञेचा मात्र उजूर आज्ञा होता मग उसीरच नाहीं यवढे महार्णव जाले, परतु आपल्ये आज्ञेचे अनुसधान दृढतर चित्ती धरून शत्रूस त्रणप्राय मानले होते परतु धणी मात्र पुर्तेपणी खबीर असावा मग खरे सेवकास प्राणादिक तुछ आहे तो अनुभव या समई [ अपूर्ण ]

☞ Baburao Krishna reports how readily and completely he always execu'ed whatever commands were entrusted to him, and advises him to stand firm in his resolve

---

*No 371* ] [ 7 May 1774

श्री

**मा। अजम वेकापा देश कुलकर्णी पा। केरूर यासी रघुनाथ बाजीराव प्रधान,**

सु॥ आर्बा सबैन मया व आलफ वामनराव गोविंद व आनदराव भिकाजी रास्ते याजकडील वगैरे ते प्राताचे तालुकियाचे अमलाचा बदोबस्त करावयाची आज्ञा रा। येसाजी विश्वासराव यास तूर्त केली आहे तरी पा। मजकूरचा अमल याजकडे सुरलीत देणे व वरकड आमलाचे बदोबस्ताविसी मारनिलेची कुमक करून ठाणी हस्तगत होत व अमल सुरलीत चाले से करणे तुह्मी सरकारचाकरी ये ( क ) निष्ठेने करोन ( दा ) खविलीयास सेवेनरूप तुमचे ऊर्जित केले जाईल जाणिजे छ २५ सफर × आज्ञा प्रमाण

☞ Venkappa Desh Kulkarni is entrusted by Raghunathrao with the management of the jagir districts belonging to the Rastes and the Patwardhans

---

*No 372* ] [ 7 May 1774

श्री

**मा। अजम देशमुख व देशपाडे पा। हरिहर यासी—**

रघुनाथ बाजीराव प्रधान सु॥ आर्बा सबैन मया व अलफ पा। मजकूरचे अमलाचा बदोबस्त तूर्त येसाजी विश्वासराव यास सागितला आहे तरी याजकडून अमलाचे बदोबस्तास पा। मजकुरी यईल त्यासी रुजू होऊन पा। मजकूरचा अमल सुरलीत देणें जाणिजे छ २५ × सफर आज्ञा प्रमाण †

☞ Raghunathrao pursuing the policy of confiscating the territories of persons in the ministerial party, entrusts the district of Harihar to his own partizan Yesaji Vishvasrao

---

*No 373* ] [ 7 May 1774

श्री

सेवेसी बाबूराव कृष्ण करद्वय जोडून साष्टाग नमस्कार विज्ञापना ता। छ २५ सफरपावेतों स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीचे आज्ञापत्र आले त्यास

---

† याच मजकुराचीं, याच तारखेची व शिक्याची रघुनाथ बाजीराव याची आणखी दोन आज्ञापत्रें-" पा। बेहाटी व बेवगटा"च्या देशमुख व देशपाडे याना लिहिलेली आहेत.

पूर्वीचे आज्ञापत्राचे उतर सेवेसी लिहिले होते की ह्या पत्राचे उतर आल्यावाचून बोलत नाही परतु दुसरे पत्र आले की दीक्षीत व तुह्मी बोलावें, त्यावरून आज मध्यारी दीक्षिताही येऊन विनती माहाराजास केली त्याचे उतर माहाराजाही केले की आपले वय चालीस * वर्षाच आहे आपली उमेद पुत्र व्हावा पोटी हेही आहे, व आणखी एक लग्नही करून पाहू आणखी वरीस साहा महिने वाट पाहू सतान जाहाले तर उतम नाही तर आपले दाहा दिवसाचा भोसला येवाधा पाहून पुत्र आणून विधान पेशव्यापासूनच करवीन मला पेशव्यावाचून कोण आहे? मातुश्री आईसाहेबाचे कारा ग्रह श्रीमत नानासाहेबाकरिताच सोसिले तेव्हा हाली नारायेणरायास पुत्र जाहाला हाच माझा पुत्र व पेशव्या परतु भोसला राजा असावा या अर्थीही मी जाणतच आहे परतु वरील दोन वरसे वाट पाहावी याप्रा आपणास व बापूस त्याहावे यैशी आज्ञा जाहाली त्यावरून लिहिले आहे आणखी बोलिले की गुदस्ता नारायेणराव आले तेव्हाही मला ह्मणत होते परतु हाच जाब आह्मी केला हेही माहाराजानी सागितले तुर्त यैसा अर्थ दिसोन आला सेवेसी स्रुत होय हे विज्ञाप्ति

☞ Nana advised Ramraja through Baburao Krishna to odopt a son The Raja replied that he was yet young and hoped to get children, even by marrying another wife if nacessory He was however determined to support the Peshwa's policy in any case

---

*No 374* ] [ 9 May 1774

श्री

पौ छ २८ सफर

सेवेसी विज्ञापना ता। २७ सफर इदुवार दोन प्रहरपर्यंत किले सातारा वर्तमान येथास्थित असे विशेष राजश्री स्वामीचे दतपुत्राचा मजकूर तर राजश्रीचे बोलणे यात मुख्य भाव हा की राजश्री बापू व नाना उभयताची व माझी भेट जाहाल्यानतर पुत्राचा अर्थ व माझे जे बोलणे ते त्या उभयताजवळ बोलेन यैसे परिछिन बोलिले हे वर्तमान आपणास कळावे ह्मणोन लि॥ यैशास पुढे पुत्राचा अर्थ निग्रह करून मान्य राजश्री कराऊ हाटल्यास निग्रहाविसी आपली आज्ञा नाही तेव्हा निग्रह करिता नये त्याहीमध्ये पुत्राचे काम याजकरिता अत पर आपण येऊन बोलोन बदोबस्त करणार तर तसेच त्याहावे आह्मास आज्ञा काये ती करावी पुत्राचे बोलणेयात राजश्रीस काही देणे घेणे याजविसी आशाही दाखविली परत ते आपणा उभयतावाचून बोलत नाही ह्मणतात या पत्राचे उतर येईल त्याप्रा करू शाहाजी भोसले यास पुत्रसहवर्तमान आणिले ते कृष्णातीरी गोव्यास ठेविले आहेत फार करून येसमईच पुत्र राजश्री घेताल हा अर्थ दिसतच नाही परतु आपल्ये भेटीचा उजूर राखतात तेव्हा जर खामखा पुत्रच देणे असेल तर आपण रुबरू खटखट करून देणे, असे असल्यास आपण यावेच अगर पुन्हा आह्मासच लिहिणे असेल तर कोणत्या अर्थी राजश्रीस राजी करावे ते परिछिन त्याहावे आपण पुत्राविसी रुबरू खटखट करणे ते ठीक दिसत नाही याजकरिता आह्मास आज्ञा असावी की राजश्रीस परिछिन निग्रह करून पुत्र घेवावाच असी आल्यास आह्मी बोलोन ठीक करू तो आपण मुकाम दहिगावीच करावा कदाचित या समई राजश्रीस दुखी करणे नसेल तर तसेच त्याहावे बरे प्रकारे मान्य होता दिसत नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Baburao Krishna reports to Nana Fadnis Ramraja's

---

* ही गोष्ट अक्षरश खरी नाही १७५० त रामराजा गादीवर बसला त्यावेळीं त्याचे वय बावीस तेवीस वर्षांचें होतें असे ताराबाईनें कळविलें ह्मणजे स १७७४ त त्याचे वय ४६ असलें पाहिजे पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें तें कमी सागितलें असावें

determination not to adopt a son, until he had a full talk with the two ministers on the subject The writer seeks further instructions

---

*No 375* ] [ 9 May 1774

श्रीहरि

पौ छ १७ सफर आर्वा

विज्ञापना ता छ २७ सफर प्रात काळपर्यंत क्षेम असे विशेष रा बिष्णुपत काल रविवारी आले, आपले पत्रही मला दिल्हे व आज्ञेप्रा महाराजाजवळ दीक्षित मजमदार कुशाबा विष्णुपत सुध्दा व कानोजी मोहितेही विष्णुपतानी सागितले की बापूनी व नानानी दिल्हे आहेत तेही किल्यावर बोलणेयात ह्मणोन तेही होते राजश्रीस अर्ज करिता सर्वांनीं केला की आपण दत्तपुत्र गुदस्ता घेतो ह्मटले होते तो अर्थ न जाहाला, याजकरिता हाली घ्यावयाचे करावे या बोलणे याकरिता राजश्री बापूनी व नानानी बिष्णुपत पाठविले आहेत येसे बोलताच स्वामीही उत्तर केले की आपण गुदस्ता कोणाजवळ पुत्राचा आशय किमपि बोलिलोच नाही, व दत्तपुत्राची वार्ताही गुदस्ता आपण काढिली नाही हे साफ सर्वांदेखत बोलिला आता हाली तुह्मी ह्मणत असाल तर मला बेचालीस वरसे जाहाली ? मी काही वृध नाही दुसरे येक लग्न करून येक दोन वरसे पाहून नाहीच जाहाला तर बापू नाना सागतील तेच होईल परतु येव्हा काही पुत्र घेतच नाही हे साफ साधितले त्यातही बापू व नाना फारसे लाब नाही दो ती रोजी येणार आहेत माझा बदोबस्त व सर्व बोलणे ते त्यासी तुमचे सर्वांचे गुजारतीनेच बोलेन परतु एव्हा काहिच घडत नाही येसे बोलिले तेव्हा विष्णुपतानी मला येकीकडे काढून विचारू लागले की उभयतानी आह्मास पा हा तर असे ह्मणतो कसे करावे ? याजकरिता विष्णुपत शेवकास ह्मणो लागले की महाराजाजवळ येसू न्हावी आहे त्यास चावर दोन चावर जमीन व हजार पाचेसे रुपये देऊन हे कार्य पुत्राचे मान्य करवावे हा विचार करावा येसे बोलिले तेव्हा त्यास आह्मी उतर केले की लाहान माणसासी असा प्रसग आमचा बोलावयाचा नव्हे राज्यासी नचानी बोलू नये येविसी आह्मी त्याचे पारपत्य करितो त्यासी असे बोलणे उचित आह्मास नव्हे, व राजा पुत्र न घेई तर आमचा तटही नाही प्रस्तुत राजा स्वत सिध आहेच मग आह्मी आयास तरी का करावा ? हें बोलिलें त्यावरून विष्णुपत बोलिले की बापूनी व नानानीच मनसबा केला की यासमई आह्मी राजेश्रीस दत्तपुत्र देत नाही तर आमचे पेशवाईस अपाय आहे हा मनसबा का ह्मणाल तर राजा वृध दुसरा पुत्र घ्यावा हे बापूनी व नानानीच योजून मला पा येसे बोलिले मग सेवकास वाटले की आजच दत्तपुत्र न दिल्हेयास पेशवाईचा काय तोटा होटा होत आहे ? याचा अर्थ स्वामी समजलेच असतील परतु विष्णुपत तो असे बोलिले मग पुत्राचा मजकूर स्वामीपासी कोणीकडून आला व आज सध्य कशासाठी उत्पन्न कोणी करविली हे खास जाणत परतु राजश्रीचा आशय की आपण उभयेता आल्यावर बोलणे ते बोलू येसे आहे विष्णुपताचा अर्थ तर येशा नापिकास दोन चावर जमीन व हजार रुपये द्यावे येसे बोलिले तेव्हा शेवकास आशय असा भासला की आज प्रत्यक्ष राजा जिवत चालीस वरसाचा आहे, मग इतकी लघु माणसाचीही मिनती करून कार्य करणे, हा मनसबा आपणा कडील नसेल ते भासलेच परतु कोणी भासविणारानी भासविला असेल असो राजश्रीच उतर याप्रा होऊन सारी मडली खाली गेली आपण शहरात सातारेयात आल्यावर जे होणे ते होईल आजच काही कोणेविसी सकट आपणास आहे येसे दिसत नाही मग राजश्री आपणा

वर सर्तानी असता दु:खी करणे हेही ठीक सेवकास दिसत नाही आपले जे पत्र शेवकास येते तेथे लिहिले असते की तुह्माकडून कोणी राजश्रीसी बोलो नये, असे आपले लिहिले येते. आणि जे आपण पाठविले ते नायिकापासून राजा वश करणार तेव्हा अशा मनसबेयाने पुत्र राजश्रीस दिल्हेयाने पेशवाईचा नफा दिसत नाही ज्याणी हा मनसबा आपणास भासविला असेल त्याचा नफा असेल तर असो आपण तो सर्व प्रकारे सुज्ञ आहेत स्वामीस पत्र लिहित्ये वेळेस काही गुजाइस राखोन लिहीत नाही पत्रे जतन ठेवीत जावी सुचनार्थ लिहिले आहे पुत्र देणेच जाला तर साहा चौ महिन्या राजा राजी करून केल्यास काय गुता आहे? येन्हा पका मनसबा करून जावे दोन रोजात वस्त्रे घेऊन हेच उतम आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

☞ Nana found it essential to give a son in adoption to Ramraja and from him receive the clothes of investiture for the new-born Peshwa Ramraja refused to adopt a son when he was hoping to have a real son of his own Nana there upon sent his own agent Vishnupant to Satara to pursuade Ramraja to accept adoption Baburao Krishna writes a sensible and full explanation to Nana in this long letter about the in advisability of the plan

---

*No 376* ] [ 10 May 1774

श्री

पौ छ २८ सफर आर्बा

आसीर्वाद विनंती येथील कुशल ता। अधिक वा। अमावास्या जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष आपण स्मरण करून पत्र पाठविले तें पावोन बहुत संतोष जाहाला लि॥ अर्थ सर्व कळला आपण जो अर्थ लिहिला तो बहुत उतम आहे राजश्री बाबूरायास घेऊन श्रीमत महाराजास सर्व अर्थ आपल्या लि॥ प्रो॥ निवेदन केला पुत्र घेण्याविसीं बहुत संदेह त्याचे मनात आले तितक्याचेही परिमार्जन द्रिष्टोत्पतीत आहे, तें व आपल्या लि॥ अन्वयें बहुत केले का की कैलासवासी सिवाजी महाराज याणी राज्य महत सक्टे करून मिळविले, ते त्याच्या माघे गतही जाहाले होते परतु श्रीचा वर होता, येणेकरून कैलासवासी शाहू माहाराज याणी येवनाचे कारग्रहातून पुन्हा येऊन पनास वर्षे यकरूपी राज्य केले परतु वश चालवयाचा विचार न केला त्याचा काल होताच राज्य बुडालेच होते परतु ब्राह्मणात अवतारी पुरुष श्रीमत कैलासवासी नाना जाहाले त्याणी श्रीमत मातुश्री आईसाहेबाकरवी या राजश्रीस आणऊन राज्य स्थापना करऊन पूर्ववत् प्रमाणें राज्य याचे स्वाधीन केले, आणि याचा सिका घेऊन चतु समुद्रपर्यंत कीर्ति जी त्याणी केली या प्रो॥ कलयुगात कोणी केली नाही, आणि पूर्वीही ब्राह्मणात असा कोणी जाहाला नाही त्याचे मावे दैव मात्र त्याचे वशाचे परतु राज्य रक्षिता आपणासारखे पुरुष ईश्वरे पूर्वी उत्पन्न केले होते ह्मणोन रक्षिले पुढे काळगतीकरून दैवही ह्मणावयास श्रीमत नानाचा वश राहिला नवता त्यास ईश्वरास प्रजेचे व देवा ब्राह्मणाचे सकट आणि आपणासारख्याच्या कीर्ति पुढे राहाव्या ह्मणोन ईश्वरे आपले सतेकरून वश श्रीमताचा उत्पन केला येक अर्थ ईश्वरकृपेकरून घडला आता राहता येक अर्थ राज्यस्थानी शिवाजी माहाराजाचे वसी हे राजश्री येकच आहेत यास पुत्र करून राज्यास पुढे आधार करावा या अर्थे राजश्रीसीही बहुत प्रकारे बोलिलो हे अर्थ आपण योजिले, येणेकरून आपली कीर्ति पुढे बहुत काल राहील आणि श्रीमताचे कुलासही लोकिक अपवाद की

राज्यस्थित यथास्थित रक्षिली नाही यामुळे ऱ्हास होत चालला ही दोनीही निमित्यें निवारण करून श्रीमताचे वशाची व सिवाजी माहाराजाचे वशाची वृध्ध करावी हे आपण योजिले यातून दुसरी कीर्त विशेष नाही ही सत्कीर्त बहुत दिवस राहील हा अर्थ ईश्वरकृपेकरून आपणास सुच विला, तो ईश्वरकृपेकरून आपले हातेच सिधीस जाईल श्लोक सिक्यात राजश्रीच्या नावाचा दुसरा करावा याविसीं लि॥ त्यावरून विनती केली आपले नावे करावा ह्मणोन सांगितले आपण करवावा दोनी वाड्यात निवेदन करून पके करावे ह्मणोन लि॥ त्यास दोही वाड्यातील ठीक केले आहे वाड्यातील काही गुता नाही त्यानतर राजश्री विष्णुपतही आपणाकडून रविवारी आले त्याणी सर्व अर्थ सांगितला ते व आम्ही व राजश्री मुजुमदार व राजश्री कृष्णराव कारभारी व राजश्री बाबूराव येसे जाऊन राजश्रीस विनती केली तो अर्थ राजश्री विष्णुपत आपणाकडे गेले, त्याणी आल्यादारभ्य सर्व अर्थ निवेदन केलाच असेल × आपण जा अर्थ योजिला आहे तो उभयपक्षी उत्तमच आहे पुढें आपले मनोगतानुरूपच घडविल्यास घडोन यईल उदईक आपले दर्शनाती सर्व विदित होतील लोभ असो द्यावा हे आसीर्वाद

☞ The writer ( Ramraja's priest Dikshit of the previous letter ? ) explains to Nana Fadnis how he tried to persuade Ramraja to adopt a son, but without avail

---

*No 377* ] [ 19 May 1774

श्री

पौ छ १ रावल आर्वा

अपत्ये मोरोबाबूराव सा॥ नमस्कार विनति छ ६ रावलचे पत्र पाठविलें ते आज गुरुवारीं पावलें सातारीयास येऊन वस्त्रें घेवलीं सप्तमीस महाराजास नजर केली दशमीस आज्ञा घेऊन येऊ राजास पुत्र घावयाचा प्रकार राहिला श्रीमस दोन हजार फौज गारदी घेऊन इदुरास गेले सिंद गेले वामनराव वगैरेही वीस हजार सैन्यसुधा जात आहेत मोगल बराणपुरावर आहे पुढें मुख्य काय विचार करितात, आपलें नाकाचें दुखणे कसें आहे तें लिहिणें ह्मणून लि॥ तें कळले फार उतम जालें ज्या गोष्टीस सर्व अनुसरतील तें का सेवटास न जाय ? फार चागले जाले सेवट गोड जाहला आपणास सर्वांस येश आले बहुत चागले जालें नाकाचा प्रकार आतील क्षत काहींसे बरें होत आले आहे, परतु मस्तकी विकार आहे तो जावयास मास पक्ष पाहिजे सेवाद्रि (?) ह्मणतो औषध आमलसे श्रमाचे आहे यास्तव हळू हळू उपाय करीत आहो बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनती

☞ Moroba Fadnis informs Nana of his own gratification at the success of the measures adopted by Nana and tells him that he was ailing for some ulcer in the nose

---

*No 378* ] [ 20 June 1774

श्री

पौ छ ११ राबर

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूराव स्वामींचे शेवेसी, –**

पो बाळाजी जनार्दन सा॥ नमस्कार विनती उपरी ता॥ १० राबरपावेतो वर्तमान यथास्थित

× येथून पुढील मजकूर निराळ्या हस्ताक्षरात व बाळबोधी लिपींत आहे

असे विशेष कोणी सातारियास राजकारण तुमचा नाश करून किला बळकाऊन माहाराज हाती घालावे असे केले आहे ह्मणोन पुण्याकडून वगैरे वर्तमाने येतात यास्तव तुह्मास पत्र लिहिले आहे त्यास जे जे माणूस किल्यावर आहे व खालून जात येत असते त्याचा बारकाईनें शोध राखावा सशय येईल तो घेऊच नये बहुत खबरदारीने फार बदोबस्ती करावी याकाली मुद्दा सापडेल तेंव्हाच प्रमाण मानावे असे नाही काही तर्क काही अनुमानही मनात आणावे बहुत काय लिहिणे लोभ असा दीजे हे विज्ञापना

☞ In this autograph letter Nana Fadnis enjoins Baburao Apte at Satara to be extremely watchful about the admissions and departures into and from the fort, as there were thick rumours that efforts were being made to release the Chatrapati and bring about a revolution

---

*No 379* ] [ 5 July 1774

श्री

पौ २६ शाकर रात्री अवसीची दोन तास

**राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री बाबूराव स्वामीचे सेवेसी—**

पो बालाजी जनार्दन सा नमस्कार विनती उपर ता छ २५ शाकरपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष तुह्मास पत्र पूर्वी पाठविले त्याचे उतर तीन बद विस्तारे लिहिलेत त्यात बदोबस्तास अलस तिलप्राय करीत नाही सर्वांशी शत्रुत्त्व घडले आहे, परतु स्वामीकार्याचे ठाई देह अर्पण असी दृढतर भावना केली मग शत्रुभय कोठील व येथे शहरातही कोणी कोणी मनसबे घरोघर करतात की आह्मास देऊन वश करावे, न बने तर नाश करावा परतु देऊन घेऊन वश होणे हे पूर्वेचा सूर्य पश्चिमेस कदाचित् उगवेल परतु हे घडणे दूर नाशाचा प्रकार तर ब्रह्मलिखित टलत नाही येथील अर्थे स्वस्थ असावे श्रीमताकडील वर्तमान मनश्री बोलतात याकरिता शेवकास ही बातमी कलावी येथील अर्थ स्वामीस कलावा यास्तव गोविंद धोंडदेव पाठविले आहेत धनीकडील कारकून ठेवावयाचा विचार चागला उपयोगी परतु त्याकडील कारभारीयास वाईट वाटते दोन रोज गडबड माडली होती परतु मी नरऊन समजाऊन सागोन ठीक केले ह्मणोन लिहिलेत त्यास बदोबस्तास आलस करीत नाही फार उत्तम आहे सार्वकाल सावधगिरी असावी व जातीस आपले फार जपावे दगाने देह अर्पण जाहाल्यास तुमचे सार्थक, परतु पुढे सरकारचा नाशच याकरता ब्रह्मलिखित टलणार नाही या वेदांतावर दृष्ट देऊ नये देऊन घेऊन वश होण्याचे निखालसतेचे प्रकार लिहिलेत, त्यास श्रीमत कैलासवासी याणी तुह्मास ठेविले त्याचे सार्थक व एकनिष्ठता व कुलिणता व प्रामाणिकता यासच ह्मणावे देणेघेण्यास तर ईश्वर कदापि तुह्मास इकडून उणे पडू देणार नाही ही खातरजमा असावी तुह्मी तर तेही आशा न धरिता शुद्ध एकनिष्ठेवरच निष्ठा ठेविलीत ही मोठीच गोष्ट परतु आह्मी उपेक्षा करणार नाही एकदा पुरवणी पत्री विस्तारे लिहिले आहे त्यावरून कलेल श्रीमताकडील वर्तमान तर उभयता सरदाराची पत्रे हा कालपर्यंत निखालस येतात की आह्मी श्रीमतास घेऊन युक्तीनें आणितो श्रीमत दररोज नित्य नवे एक बोलणे बोलतात यास्तव आग्रह करावा तर नाश होईल जाऊ द्यावे तर कूच करतील याकरिता त्याकडील सिबदी दूर करून घालऊन देऊन घेऊन येतो, व बातमीतही लबाडी आढलत नाही चार दिवस अधिक उणे लागतील इतकेच मात्र प्रस्तुत वर्तमान आले की उभयता सरदाराचे व श्रीमताचे वाकडे पडले हेही कामचे कामच आहे लोक तत्पक्षी वगैरे आहेत ते मनस्वी

वर्तमानें उठऊन खुल करावयास साधक्ता पाडतात परंतु ती कसी पडेल? राण्याकडील कारभारी लचाडी करितात, या करिताच देवस्थले यास आणविले व कारकून तुह्माकडीलच असावे असे रगडून सांगिले, व हली तर राहण्यास किल्यावरच नेविले तेंव्हा गुताच उरकला तुह्मीही बारीक बारीक वर्तमानाचे शोधात असून आढलेल ते लिहित जावे बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती

☞ This is another very readable autogaph letter from Nana to Baburao Apte, commending the latter's selfless services to the Maratha Raj and communicating news of the movements of Raghunatharo

---

*No 380*] [6 August 1774?

श्री

**श्रीमत राजश्री दादा स्वामींचे सेवेसी,--**

पो नारो गणेश सा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता आषाढ वा १४ मु॥ इंदूर येथास्थित जाणून स्वकीय लिहीत आसीले पाहिज विसेष (बहुत) रोज जाले आपलेकडून पत्र येऊन परामर्श न जाला येसे नसावे सर्वदा पत्रीं संतोषवीत आस वे इकडील मजकूर तरी राजश्री तुकोजी बाबा सुभेदार सहवर्तमान आह्मी वा ७ स मु॥ मजकुरी दाखल जालो हे वर्तमान आपल्यास कलावे वरकड रा गबाजी श्रुत करतील × बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनती

☞ Holkar's Diwan Naro Ganesh writes probably to Moroba Dada informing him of his own and his master's arrival at Indore

---

*No 381*] [17 September 1774

**श्रीगणराज**

पौ छ १३ रजब खमस

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नाना स्वामींचे सेवेसी-**

पो वामनराव गोविंद व परशराम रामचद्र व रघुनाथराव नीलकठ कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल भाद्रपद शु॥ १२ जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष आपण पत्र पा ते प्रविष्ट जाले श्रीमत बरानपुरावर आले शिंद्याची व श्रीमताची गाठ फिरोन पडेल असे दिसते श्रीमताचे राजकारण होतच आहे भाद्रपद शु॥ च निघावे आपण निघाले ह्मणजे सारे सरदार निघतील लश्कर निघावे ह्मणून लिहिले ते कलले आह्मी घरास आल्यापासोन रिकामे नाही बाहेर त्वरेने निघावे आसे आपण निरोपाचे समई सांगितले, व तीर्थस्वरूप राजश्री पुरुषोतम राव दाजी आपले आज्ञेप्रो निकडीनेच लिहीत आहेत लोकास बोलाऊ पाठऊन मागील फडशा सालमजकुरचे समजाविसीचे काम चालीस लागिले आहे पागाची तयारी होत आहे आम्ही वद्य द्वितीयसे बाहेर निघावयाचा मुहूर्त पाहिला आहे, ते दिवसी निघतो आमचा गुता बाहेर निघावयाविसींचा किमपि नाहीं लोक जमा व्हावयास च्यार दिवस अधिक लागल्यास उपाय नाहीं आम्ही आपले तर्फेनें निकडीस चुकत नाहीं सरकारचे पत्रही तयारीविसी आले सरकारचे आज्ञे प्रमाणें फौजेचा जथ पाडीत माहादेवाचे सुमारे येत असो हुजरातचे फौजस तो आपण पत्रे रवाना केलीच आहेत त्यास लोक फार करून तरते बुडते पाहातात यास्तव दिलासा देऊन लौकर जमा

होत ते करावे ह्मणजे सरदारही सर्व जलद्रीनें येतील आम्ही जलदीस ढील करीत नाहीं क्षेप निक्षेप द्वितीयेस बाहेर निघतो

☞ Vamanrao Patwardhan writes to Nana that he was making preparations for starting as soon as possible and collecting troops for service

---

*No 382* ] [ 23 September 1774

श्री

सेवेसी विज्ञापना ता छ १६ रजब प्रात कालपर्यंत सुखरूप असो विशेष राजश्री स्वामी याही मला बोलाऊन नेऊन सागितले की राजश्री नानास आमचा निरोप पोहोचवणे कीं आह्मी आइकिले तुह्मास कोणी दगा करणार आहेत याजकरिता बहुत सावध असावे कोणाचा भरवसा धरू नये भवानराव देखील विष्णु नरहर मोरोबा आदीकरून या कर्मात बजावा सुद्धा आहेत ही नावे माहाराजाहीच घेतली आणि मजकडून पत्र आपणास लिहवले आपण फार सावध असावे येविसी बहुत माहाराजाही सागितले जर नाना आहे तर पेशवाई आहे नाहीं तर काहीच नाहीं येसे मजजवल येकट्याजवल येकाती बोलत होते मी उतर केले की आपणास इतकी चिंता आहे तेंव्हा कलिकालाचे भय नाहीं त्यावरून सतोषी फार आहेत राजश्री आपणाविसी फार कळकळ करितात व मलाही माहाराजाही सागितले की तुह्मीही आपणास जपत जावे तुम्हासही शत्रु फार आहेत हेही सागितले राजश्री खुद् आपला अर्थ सागत होते, मी तो जिवास उदक सोडिले आह हेही मजजवल बोलत होते हे सर्व आपणास कलावे याजकरिता मुजरद गडी रवाना केले आहेत आपणाजवल शेपनास मराठे घरदाज जवल असतीलच आपण ब्राम्हण्य राखिले आहे तेथे ईश्वरास चिंता पडली आहे परतु उगेच मेघाची अभ्रे येतात ती ईश्वरकृपेच्या वायूकरून दूर सहजच होतील हे पत्र आपण मात्र वाचून फाडून टाकावे दुसरेयास कदाप कलो देऊ नये येसी राजश्रीची आज्ञा आहे माहाराजास सेवकाने विचारिले की तुम्ही कशावरून सागता ! कोठे आइकिले ? त्यावरून त्याणी उतर केले की जेवढे गृहस्थ लिहिले आहेत यात प्रामाणिक कोणी नाहीं विस्वास देऊन दगा करितील म्हणोन तुम्ही फार सावध असावे मी जिवत असता माझा सिका मोडिला, तेंव्हा सर्वही होते कोणास अभिमान न आला व नारायणरायाचा सूड कोणी घेतला नाहीं परतु माझ्या पेशव्याचे अनाचे सार्थक नानाही केलें, तेंव्हा त्याची चिंता मला फार आहे असे बोल्ले हे विज्ञापना

☞ Baburao Krishna reports to Nana his conversation with Ramraja and the latter's particular warning against the devilish plots which, he had heard, mischief-makers were forming for the destruction of Nana

---

*No 383* ] [ 28 September 1774

श्री

पौ छ २२ रजब

विनती उपर सातारकर मडली वगैरे तुम्हास दगा करून माहाराज हाती घालावे या साधनात फार आहेत बहुत सावध असावे हे विनती

☞ This is Nana's autograph warning to Baburao against

secret plots aiming at his life and capturing the person of the Chahtrapati

---

*No 384*] [6 November 1774

श्री

**श्रीमत राजश्री नाना फडणीस स्वामीचे सेवेसी,—**

विनंती सेवक नरसिंगराव कृष्ण सा। नमस्कार विज्ञापना प्रांत हिंदुस्थान पो। माहालची कमावीस साल मजकूर आह्माकडे सागितली माहाल बि॥

| | |
|---|---|
| १ पो। अरुण वगैरे | १ पो। केशवरायाचे पाटण |
| १ पा। काळाबाग | १ ता। अमाझरी व तराई |
| १ पा। शाहाडोरा | १ पा। मावन |
| १ पा। खुटावद | १ पो। खजुरी कवातिया सा। चदेरी |
| ४ | ४ |

८

सदरहू आठ माहालचे कारकुनीबा। रुपये ३००० अक्षेरी तीन हजार अर्काट गजीकोट पोते चाल अखेर अषाढ देऊ मिति शके १६९६ जये नाम सवछर सन खमस सबैन मया व आलफ छ १ रमजान बहुत काये लिहिणे हे विज्ञापि हस्ताक्षर मल्हार खडेरावनि॥ मारनिले

☞ Narsinhrao Krishna writes to Nana Fadnis agreeing to pay Rs 3000 for the clerical work of the 8 districts mentioned in the paper

---

*No 385*] [19 November 1774

श्री

**अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नरोतम किशोरदास गो। यास,—**

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुहूरसन सन खमस सबैन मया व अलफ इंग्रेजाकडील बातमी कळली पाहिजे, याजकरिता आबाजी व्यंकटेश व बालाजी शामजी हे दोघे पाठविले आहेत याजपासी तेथील वर्तमान सागत जाणे रोजचे रोज हुजूर लेहून पाठवितील जाणिजे छ १४ रमजान आज्ञा प्रमाण

☞ Raghunathrao deputes his two confidential men to fetch news from the English

---

*No 386*] [25 November 1774

श्रीगणराज

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नाना स्वामीचे सेवेसी,—**

पो। वामनराव गोविंद कृतानेक सा। नमस्कार विनती येथील कुशल ता। छ २० रमजान भृगुवार मो। कलब प्रा। इंदापूर नीरा उतरतीर वर्तमान येथास्थित असे विशेष आपण चिरंजीव राजश्री भाऊच्या पत्री नमस्कार लिहिला तो पावला आमचे येणे आपण घडविले

उत्तम आहे लवकर यावे ह्मणून लिहिले ते कळले श्रीमताचे पुण्य समर्थ राज्याचा बंदोबस्त जाला पाहिजे यास्तव आपले निघणे जाले उत्तम गोष्ट जाली पेशजी चिरंजिवानी पेडगावचा सुमार लिहिला होता आता कोरेगावकड येणे ह्मणून पत्र आले उत्तम आहे लिहिले प्रो लाब लाब मजल करून येतो फौजही पार करून मिळाली आहे राहिल्यासही निकडीची पत्रे पाठविली आहेत आह्मी आपले आज्ञेसिवाय नाही बहुत विनंती

☞ Vamanrao Patwardhan writing to Nana Fadnis cordially accepts the latter's commands and expresses his readiness to be present with his full quota of troops at the appointed place

*No 387* ] [ November 1774

श्री

**राजश्री मोरोबा दादा स्वामीचे सेवेसी,—**

सा। नमस्कार विनती उपरी इकडील वर्तमान तरी श्रीमत टोक्याकडे गेले नबाब नगरावरून पाठीमागे जातात कोणी कोणी तिकडून निघतात तथ्य वर्तमान आले ह्मणजे लेहू रा। कृष्णराव यासी रुकनुदौलानी येक दोनदा स्मरण केले की नबाबापासी जरूर पाहिजेत याजकरिता परवाचे दिवसी त्याचा मुहूर्त आहे जातील रा। बाबूजी नाईक यास येथे बोलाविले आहे तेही दो चौ रोजानी येतील ह्मणून उतर आले आहे आपला मुहूर्त येथूनच योजिला आहे त्याप्रो जरूर यावयाचे करावे आपण आलियाखेरीज सातारियाकडे न जावे आसेच चितात आहे पहिल्या मुहूर्तानेच यावे रवाना रविवार दोन प्रहर लोभ आसो दीजे हे विनंती

☞ The whole letter is in Sakharambapu's hand He asks Moroba Dada to come at once in order to proceed to Satara

*NO 388* ] [ Received on 9 July 1775

श्रीशंभु प्रा।

पौ छ १० जावल सु॥ सीत सबैन

**राजश्री कोनेरराव दाजी गोसावी यासी,—**

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो। येशवतराव सिंदे सरसुभेदार कृतानेक दडवत विनती उपरी येथील क्षेम जाणोन स्वकीय लेखन करीत गेले पाहिजे विशेष आपण येसाजी मोटेसमागम पत्र पाठिविल पावल लिहिला मजकूर कलला तेथ लिहिल जे आपणाकडील शाहाणा कारकून येसाजी मोटे याजबरोबर पाठऊन देणे ह्मणून लिहिल त्याजवरून राजश्री गोपाळपत यासी येसाजी मोटेसमागम पाठिविल आहेत राजश्री आपाजी शामजी याचे विद्‌मान पुरधराहून यादी ठरून आलीच आहे, त्याप्रमाण निर्गमात आल्यावर गाव खेडी ई सोडून दिली जाती गुता पडणार नाही ह्मणून लिहिल, तर यादीचा फडशा सर्व होण तो पुरधरी राजश्री बापूचे व राजश्री नाना फडणीस व आपाजी शामजी याचे विद्‌मान तेथच होईल ह्मणून पेसजी तुह्मास लिहिलच आहे सरकारची ठाणी व गावजराबजरा झाडेनिसी ई सोडून सरकारात घ्यावी आपणाकडील गोली बद द्रविया ( ठरल्या ) प्रमाण जाहल उपरात श्रीमत धणीसाहेबाचे सेवेसी आर्ज करून इकडील गोली बद करावयासी येईल येविसीचा मजकूर सविस्तर उभयेता मशारनिल सागिता कलल बहुत काये लिहून कलवावस नाही आपण सुज्ञच आहेत बहुत काय लिहिण लोभ कीजे × हे विनंती

☞ Yashwantrao Sinde writing to Koner Rao proposes to

execute the terms of agreement contracted at Purandar in consultation with Nana, Bapu and other persons concerned The settlement refers probably to disputes between the Patwardhans and the Raja of Kolhapur

*No 389* ] [ 31 January 1776

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री शामराव बापू याप्रति खंडेराव त्र्यंबक† कृतानेक आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लि।। जाणे विशेष श्रीमंत सौ मातुश्री बाईसाहेब* यासी देसी घेऊन जावे याअर्थी श्रीमंतानी राजश्री सदासिवपंत व राजश्री आनंदराव‡ व हुजुरे पाठविले त्यासी ते येथे आल्यावर त्याचे कूच व्हावयाविसी बहुतच निकड कली धरणी पारणी जाली परंतु त्याच्या मनात देसी यावे हे न होय कितेक प्रकारे विनंति आह्मी केली व कारकून याणीही केली केली परंतु मर्जीस येईना त्याचे सविस्तर तुह्मास लिहिलेच होते त्यावर वारवार कूच्याविसी बोलतच होतो त्यास आता चालतो ह्मणतात याप्रो मर्जी जाली स्वारीचा सरंजाम डेरे राहुट्या वगैरे आम्हाजवळ मागतात आम्ही दोन वर्षे सामान दिल्हे खर्चासही देत आलो सामान मिळत नाहीं याप्रो म्हणावे तर तसेही निमित्य याजकरिता कर्जवाम करून कार्याकारण सरंजाम राजश्री सदासिवपंत व आनंदराव याचे विद्यमाने देतो आम्हीही समागमे येतो ही चालतो म्हणतात याचा काही भरवसा दिसत नाही कोण्या प्रकारावर आहेत याचे ठीक दिसत नाहीं कोणे समई काय वर्तेल याचा भरवसा नाहीं इतक्यावर आम्हाकडे दोष नाहीं आमच्यान जेथवर होईल तेथवर चुकत नाही आमच्यानें निमित्य घेवेना म्हणोन वारवार ही चाकरी नको येसी विनंती लिहीत गेलो परंतु खावंदाचे विचारास न आले आम्हास सर्वप्रकारे पेच दिसतो तुम्ही सविस्तर अर्थ तपसीलवार निवेदन करावे चालतो म्हणतात त्यास केवळ सत्य भासत नाहीं बहुत आग्र हाची गोष्ट सागावी तर गैरमर्जी होते घडी घडीची मर्जी आहे आपले तर्फेनें कूच्याच्या प्रेत्नास अंतर नाहीं पुढें होईल ते लि।। पा।। तुम्ही उभयतास सर्व श्रुत करावे

☞ Khanderao Trimbak Odhekar writes to Shyamrao Bapu asking him to inform Nana and Bapu that Anandibai does not agree to move from Dhar to the Deccan, and that she was being persuaded to accept the proposal, but that it was difficult to fathom her real intentions

*No 390* ] [ 4 March 1776 ?

श्रीशंकर

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखाराम भगवत यासी,—**

प्रति सौ आनंदीबाई नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष आनंदराव गंगाधर आह्मास बोलवावयास आले आहेत त्यासी काहा दिवस तो नाही येत म्हणत होतो तुम्हाकडील विशेष आग्रह पडिला यापक्षी वोढावे हे वेडेपण हे समजोन येतो ह्मणोन मार्गसीर्ष वद्य ५ कबूल केले तेंव्हापासून फार थोडे जसे साहित्य मिळेल त्या तऱ्हेनें करून लवकर चला ह्मणोन कारकुनासी बोलतो परंतु दोन महिने झाले अद्यापही साहित्याची व येण्याची तऱ्हा

† ओढेकर * आनंदीबाई ‡ आनंदराव गंगाधर चंद्रचूड

काही दिसत नाहीं आम्हास ह्मणाल की आह्मासी कबूल करून अद्यापपर्यंत येत नाही लटके समजतील यास्तव तुह्मास लिहून पाठवावयाचे कारण तर येथेंच आह्मी राहावे हेच तुह्मास बरे वाटत आसले तर खर्चाची सोये होय ते करणे नाही तरी हुजूर लस्करात पोहोचून देण्याविशई कारकुनास लिहिणे तुह्मी आसता आह्मी खर्चावेचाविशई दुसऱ्याजवळ तीनदा भिक्षा मागणे हे योग्य नाही आह्मास ह्मणाल तर कालच प्रात जाहाला अहे परतु तुह्मास या गोष्टीची लाज पुर्ती आसावी रा छ १३ मोहरम बहुत काय लिहिणे हे विनती

☞ Anandibai addresses this letter to Sakharambapu asking him either to arrange for her journey to meet her husband at Surat or for her current expenses at Dhar or wherever else she was wanted to go and stay It is unfortunate she writes that she should be obliged to beg in this way

---

*No 391* ] [ 1 May 1776

श्री

**श्रीमत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी,—**

पो खडेराव त्र्यबक सा। नमस्कार विनती उपरी येथील कुशल ता। वैशाख वा। ११ मगलवार मु। बऱ्हाणपूर जाणोन स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष आपली पत्रे देसी येण्याविसी येत गेली त्यावरून धारेहून कूच करून येथपर्यंत * आलो पुढें दरकूच येत असो × बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनती

☞ Khanderao Trimbak reports to Nana his arrival at Barhanpur

---

*No 392* ] [ 14 August 1776

श्री

पो छ १ रजब

**राजश्री हवालदार व कारकून किले पारनेरा गोसावी यासी,—**

श्रों रघुनाथ बाजीराव प्रधान आसीर्वाद व नमस्कार सु। सबा सबैन मया व अलफ खासास्वारी बलसाडच्या सुमारें येत आहे त्यास तुह्मी येक सरदार व येक कारकून शाहाणे मनुष्य असे हुजूर लौकर पाठवणें ते हुजूर आल्यावर त्यास आज्ञा करावयाची ते करून तुह्माकडे पाठविले जातील जाणिजे छ २८ जमादिलाखर आज्ञाप्रमाण

☞ Raghunthrao requires the Havaldar of fort Parnera to send a chief to meet him on his journey towards Balsad.

---

* ज्येष्ठ शु॥ ८ शनिवारीं म्ह ता २५-५-१७७६ रोजीं कुभारीस आल्याचें दुसऱ्या एका पत्रात लिहिले आहे

*No 393* ]  [ 3 September 1776

श्रीशंकर

पौ छ १५ साबान सबा

**सहश्राय चिरजीव राजश्री बाळाजी जनार्दन * यासी,—**

प्रति सौवती आनदीबाई आसीर्वाद उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीये कुशळ लेखन करीत जाणे विशेष बहुत दिवस जाहाले, तुह्माकडून पत्र न आले याचे कारण काय? त्यास येसे न करणे सदैव पत्र पाठऊन सतोशवीत जाणे यानतर इकडील मजकूर तर राजश्री रगराव माहादेव व कोनेर झिमदेव येथे येऊन किल्यासी खटखट करितात नित्य उठून गोळागोळी होत आहे कही बद केली आहे तुमचे नाव घेतात की आह्मास त्याणी पाठविले आहे की किला घेऊन आपल्यास पुण्यास न्यावे त्यास आह्मी त्याजला उतर दिल्हे की आह्मास पुण्यास जाऊन त्यास नफा कोणता? हे त्याच्या चितात असते तरी सिंदे व होळकर व हरि बलाळ या कामास नामर्द नवते तुह्मास येथे येऊन येक महिना होऊन चुकला बदुखा मारून लोक मात्र जखमी करिता तिही रुपयाची गावची माणसे ठेऊन धामधूम मात्र किल्याभोंवती करिता ही गोष्ट तुह्मास योग्य नाही याप्रमाणे त्याजकडे निरोप पाठविला त्याजवरून त्याणी दाहा पाच कलमे लबाडीची लिहून पाठविली त्याचे उतर कलमास योग्य केले येकीकडेस वकील बोलवावयासी पाठवावे व येकीकडेस मोर च्याचे बदोबस्त करावे, याप्रा करितात लबाड्याही फार बोलतात आह्मी त्यास बाहीर निरोप पाठविला की आह्मी व चिरजीव येथे आहों तुह्मी येऊन मोर्चे लाविले तुह्मास किला न आला तरी तुमची आबरू मात्र गेली बाइकावर तलवार कोणीही धरली नाही, ती तुह्मी धरलीत येवढे मात्र तुमचे पदरी पडलें श्रीसतेने कदाचित किला तुमसी मऊ बोलिला तरी आत धणी मर्द नाही बाइका मुलासी तरवार धरून पराक्रम काय विशेष जाहला! आह्मास तो हेच मोठेपण की तुम्हाकडील पाचसातसे माणूस व हजार दीडहजार स्वार इतका अटबर घेऊन येथे येऊन बसला मोरचेही नव गावात आणिले इतके असोन आम्ही माहिनाभर लढाई घेतली आणिकही जवपरयत लढवेल तवपावेतो लढतच आहो हेच आमचे थोरपण आहे आम्ही बाइका होऊन आतून लढतो तुम्ही पुरुष असोन बाहीरून लढता, यातच लाहान मोठेपण शाहाणे आहेत ते निवडीत असतील याप्रमाणे त्याचे आमचे बोलणे जाले परतु ते लाहान माणूस त्यास शका काहीच नाही तरी हेच बोलणे तुमसी आहे आणिकही घरगुती जाबसाल की आम्ही येथे आलो कोणते समयास? कारण कोणते? रुपयाचेही त्या काळात बळ किती? च्यार मणुशे चागली तेही तुम्हाजवळ उठून आलीत त्यापक्षी येथे चागले माणूस काय असेल आणि कोणे तऱ्हेने येथे आहो हे तुम्हास कळत नसेल की काय? तुम्ही तो दौलतीमधे फडणीस कारभारी आहात † असे असोन आम्हावर तलवार धरून उभे राहिला या गोष्टीस तुम्हास वाईट कसे म्हणावे? इतका उद्योग कोणते कारणासाठी केला आहे हे कळत नाही पुरुषाकडे केला तर असो आम्हाकडे करून तुम्हास नफा कोणता? तरी ही गोष्ट तुम्हास योग्य नाही तरी यासी मना चिठी पाठऊन आम्हास येथे खर्चावेचासाठी दो चव लाखाचे परगण्याच्या यादी व शाहाणा माणूस पाठऊन देणे कठकटीसी आह्मा तुह्मास प्रयोजन नाही इतके असोन तुमच्या थोरपणास जे योग्य असेल ते करणे श्रीसत्ता प्रमाण आहे रा छ १९ रजब बहुत काय लिहिणे हे विनती

☞ Anandibai writes this very clever and strongly worded

---

* याच मजकुराचे पत्र किरकोळ फेरफारासह सखाराम बापूस लिहिलेलें आहे † सखाराम बापूच्या पत्रात ' शाहाणे येक आहा ' असे शब्द आहेत

letter both to Nana Fadnis and Sakharam Bapu, asking them why they were persecuting her and her baby son when they were in a helpless condition She advises them on the contrary to look after her according to her dignity

---

*No 394* ] [ 21 October 1776

श्रीसांबः सपुत्रो विजयते

पौ छ १५ रमजान सबा

राजश्री बाळाजी जनार्दन यास,—

विनती उपरी राजश्री बापूराव बलाल काणे याजबराबर पत्र व निरोप पाठविले ते पावले लिहिला मजकूर ध्यानात आला त्याची उत्तरे मशारनिलेजवल आज्ञा केली आहे हे लिहितील त्याजवरून सारांश जे कालेकरून घडावयाचे ते घडले आत पर निखालसता धरून तड पाडावा हे उत्तमच आहे मागील जाहाले मजकुराचे सशय तुम्ही टाकणे हिकडूनही जातील सकटकाली जे न करावयाचे अर्थ तेही प्रसगावर नजर देऊन करावेच लागतात तुम्ही निखालसपणें आमची मर्जी रक्षिल्यास लोकविरुद्ध धर्मविरुद्ध अर्थ आम्हा पा (सून घडावयाचे) नाहींत येविसी खातरजमा करणे तु ( मची उभ ) यताची शपथपूर्वक पते व सरदाराकडील दोघे मातबर व आणिकही दोघे चवघे मातबर मध्यस्तीस यावे निखालसतेने तह करावा यात स्वच्छता राहील सकटकाली पर स्परे सहाय व्हावे हाही मजकूर घडेल मग विरोधाची तरी सभूतच नसावी पत्रात अर्थ तीन हिसे गरम व नरम चवथाई दर्शीत आले त्यास जे अर्थ नरमाईने होऊन येतील ते गरमीने होणार नाहींत हेच समजणे आमची मर्जी तुम्हास बहुत दिवस वाकिफच आहे त्याचे विस्तार पत्री काये लिहिणे रा छ ७ रमजान हा कारभार जलद व्हावा तोपर्यंत चहूकडील जाबसाल आम्ही तटून राखितो आम्हास हा मजकूर ( अपूर्ण )

☞ Raghunathrao writing to Nana Fadnis expresses his readiness to come to an amicable and honourable settlement with the ministers and asks for some respectable persons being deputed to him from Poona for effecting mediation

---

*No 395* ] [ 31 October 1776

श्री

श्रीमत राजश्री नानास्वामींचे सेवेसी,—

विनती सेवक गोविंद रघुनाथ कृतानेक साष्टाग नमस्कार विनती ता छ १७ माहे रमजान पौ स्वामीचे कृपेकरून सर्व येथास्थित असे विशेष स्वामींनी कृपा करून सेवकास लि॥ की सखाराम हरि यास किले घनगडावर अटकेस ठेवावा याकरिता पाठविला आहे पायात बेडी आहे ही पाहणें चागली असल्यास उतम नाहीं तर दुसरी चागली बेडी घालून पके बदोबस्ताने ठेवावा चौकीस नेहमी सखोजी पडवल सरनोबत यास दाहा असामीनसी ठेऊन तुम्ही दररोज चौकसी करीत जाणे त्याजवल कोणास जाऊ येऊ न देणे व चौकीस लोक त्याजवळ नेहमी असतील त्याणी त्याजवल बोलू नय व किल्याखालून त्यास कोणी फराळास वगैरे घेऊन आल्यास वर न घेणें बदिवान कोण याचे नाव हेही कोणास कलो देऊ नये रात्र दिवस खबरदारी करीत जाणे व पेसजी बदिवान वेंकटराऊ माने किल्यास आहे त्यास मागाहून पत्र पाठऊन दुसरे जागा नेऊन

ठेवऊ फार बदोबस्ती कोणाचा विश्वास न धरिता करावी माणसे चौकीची दोहो तिही दिवसी बद्लीत जावी यैसे पत्र पधरावे रावलचे हरजी वाघवैरा दि॥ बहिरजी नाईक हे घेऊन किल्यास आले आणि सरकारची सनद स्वार दि॥ राजश्री सदाशिव धोंडदेव मारनिलेस किला घेऊन आले पायातील बेडी सरकरची चागली थोर आहे आज्ञेप्रो प्रतिदिनी खबरदारी करू व सखोजी नाईक पडवल यास नेहमी दाही जणानसी स्वतत्र घरात मारनिलेजवल ठेविले आहेत येवेसी स्रुत होय हे विनती

☞ Govind Raghunath officer in charge fort Ghanagad writes to Nana accepting his commands to look after the prisoner Sakharam Hari properly and to keep a very strict watch on him

---

*No 396* ] [ 10 November 1776

पौ छ ६ शवाल कार्तिक शुा। ८ सोमवार

श्रीसाबः सपुत्रो विजयते

**राजश्री माधवराव सदाशिव यास,—**

उपरी रा बापू व नाना यास पत्रे लिली आहेत त्याजवरून कलेल आम्ही रिकामपणी मुबईस जाऊन येणार तेथे विशेष तर तूर्त काम नाहीं व प्रसगानुसार आहे ही, त्यास आम्हास तह पडून रेवातीरी ईश्वरसेवन करून राहावे हे मोठी इच्छा आहे श्री पूर्ण करील तूर्त तुम्ही येऊन कमपेश सरदाराचे अनुमतेच ठराऊन निकाल पाडावा हे उत्तम आहे आमचे मनात बहुत ओढावयाचे नाही ईश्वर इछा काये अहे हे न कले प्रसग पडेल तसे करावेच लागेल तोड पडता ओढवणार नाही यैसे मानस आहे जाणिजे छ १७ रमजान

☞ Raghunathrao asks Madhavrao Sadashiv to effect a reconciliation for him with the court of Poona, reminding him that he had now given up his former high demands

---

*No 397* ] [ 10 December 1776

पौ छ ५ जिलकाद् मार्गसीर्ष

श्री

**अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य राजश्री भीवराव येशवत गो —**

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुा सबा सबैन मया व अलफ तुह्मी विनतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाले सरकारचे आज्ञे प्रॉ गाई व ह्मैसी व हरणे पाठविली आहेत ह्मणोन लि॥ येशास तुह्मी गाई ह्मशी व हरणे पाठविली ते पेणेस आली आहेत तेथून हजूर येतील × जाणिजे छ २८ सवाल ( येथें दोन शिक्के रघुनाथरावाचे )

☞ Raghunathrao writing to Bhivrao Yashvant Panse says that the cows, buffaloes and the deer sent by him have arrived at Pen

---

*No 398* ] [ 2 April 1778

श्री

आज्ञापत्र राजश्री पतप्रधान ताा कोडाजी व सताजी चोन्हे सुा। समान सबैन मय

व अलफ तुह्मी कृष्णाजी रेकडा याजबराबर विनती सागोन पाठविली की किले पुरदर येथे बालाजी जनार्दन आलियानतर कैद करू व त्याची स्त्री व माधवराव नारायण ह्मणोन जाला आहे ऐसे सरकारचे हुकुमाखेरीज कोण्हाचे स्वाधीन करणार नाही साहेबानी काही खूण पाठवावी त्याजवरून कृष्णाजी रेकडा याजबल खुणेबद्दल तीस मोहरा पाठविल्या आहेत ह्या घेणे माधवराव नारायण ह्मणोन जाला आहे त्यास व बालाजी जनार्दन याचे स्त्रीस जप्त करून ठेवणे कदाचित बालाजी जनार्दन किलेयावर आल्यास त्यासही कैद करणे जाणिजे छ ३ रबिलावल †
आज्ञा प्रमाण

☞ This is an order issued by Raghunathrao for the arrest and confinement of Madhavrao Narayan, Nana Fadnis and his wife This secret conspiracy on the part of Raghunathrao is so far unknown in current papers

---

*No 399* ] [ 2 April 1778

श्री

राजश्री दीपाजीराव येरुडकर गोसावी यासी,—

अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य श्री रघुनाथ बाजीराव प्रधान आसीर्वाद सु॥ समान सबैन मया व अलफ तुह्मी कृष्णाजी रेकडा याजबराबर विनती सागोन पाठविली की बालाजी जनार्दन किले पुरदर येथे आल्यानतर त्यास कैद करू व त्याची स्त्री व माधवराव नारायण ह्मणोन जाला आहे ऐसे सरकारचे हुकुमाखेरीज कोण्हाचे स्वाधीन करणार नाही साहेबानी काही खूण पाठवावी त्याजवरून कृष्णाजी रेकडा याजबल खुणेबद्दल तीस मोहरा पाठविल्या आहेत ह्या घेणे माधवराव नारायण ह्मणून केला आहे त्यास व बालाजी जनार्दन याचे स्त्रीस जप्त करून ठेवणे कदाचित बालाजी जनार्दन किल्यावर आल्यास त्यासही कैद करणे जाणिजे छ ३ रबिलावल † बहुत काय लिहिणे

☞ This is another letter addressed by Raghunathrao to Dipajirao Yerudkar, corroborating the secret intrigue for the arrest and confinement of the young Peshwa and Nana Phadnis

---

*No 400* ] [ 5 April 1778

श्री

राजमान्य राजश्री शकराजी मोरेश्वर यास,—

प्रती रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ समान सबैन मया व अलफ साप्रत इकडील वर्तमान तरी पुण्याकडून राजश्री मोरो बाबूराव व राजश्री तुकोजी होळकर व राजश्री बज्या (बा) पुरधरे व चितो विठल व रघुपतराव नारायेण व विसाजी कृष्ण वगैरे सरदार याणी सरकार सेवा करून दाखविली पुण्यात सरकारची द्वाही फिरऊन बदोबस्त जाला इकडून खासा स्वारी इग्रेजी जगी सरजाम बराबर घेऊन छ १४ रावली निघत असो तरी तुह्मी हुजूर येणे सरकारातून जाबीतजग व समसामुतदौला यास येल्या कासिदा बराबर पाठविल्या असेत त्यास तुह्मी उभयेता मारनिलेकडे जाऊन येल्या घेणे जाणिजे छ ६ रावल आज्ञा प्रमाण

☞ Raghunathrao writes to Shankraji Moreshwar asking

† रघुनाथरावाचे दोन शिक्के येथे आहेत

him to meet the writer in connection with the revolution at Poona which Moroba Dada, Tukoji Holkar and some other prominent persons had effected in favour of the writer

---

*No 401* ] [ 16 May 1778

श्री

**अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री नारो माहादेव गो,—**

सेवक माधवराव नारायेण प्रधान नमस्कार सु॥ समान सबैन मया व आलफ शंकराजी खंडेराव हे किले सिंहीगड येथे आटकेंत आहेत त्यास हुजूर आणविले असे तरी मारनिले समागमे दाहा सिपाई देऊन बंदोबस्तानें हुजूर लस्करात पाठऊन देणे जाणिजे छ १८ राफर आज्ञा प्रमाण

☞ Peshwa Madhavrao Narayan asks Naro Mahadev to send to Poona under proper custody Shankaraji Khanderav who was in confinement at Sinhgad

---

*No 402* ] [ 19 May 1778

श्री

**अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो माहादेव गोसावी यास,—**

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ समान सबैन मया व असफ रामजी पवार याची माणसे किले सिंहीगड येथे अटकेस आहेत आसामी

१ बायको
२ पुत्र
२ कुणबिणी
५

एकूण पाच आसामी अटकेस आहेत ती हुजूर आणविली असेत, तरी बरोबर दाहा सिपाई देऊन पाठऊन देणे जाणिजे छ २१ राफर आज्ञा प्रमाण

☞ In continuation of the previous letter, this is another by the Peshwa ordering Naro Mahadev to send to Poona Ramji Pawar's family from Sinhgad where they were in confinement

---

*No 403* ] [ 16 October 1778

**श्रीसाब सपुत्रो विजयते**

**राजश्री बाळाजी जनार्दन यास,—**

विनंती उपरी पूर्वीचे पत्राचे जाब आला नाहीं, यास्तव हे पत्र पाठविले आहे उतर यावे सविस्तर मजकूर बापूराव यास आज्ञा केली आहे याचे लिहिल्यावरून कळेल व राजश्री सखाराम बापूचे पत्रातही लिहिले आहे ते पत्र तुमचे दृष्टीत येईल त्यामध्ये आमचे मनातील आर्थ लिहिले आहेत तुह्मीही गैरवाकफ नाहीं याउपरी तुमचे थोरपणास उचित ते करणे तुमचे लिहिले येईल तो मजकूर ध्यानात आल्यावरी जो निश्चय होणे तो होईल पत्राचे उत्तर लवकर येत नाही यास्तव मात्र चिंतात संशय वाटतो तथापि बापूराव काणे याचे खातर

जमेवर येथे येथील कार्यांकारण बंदोबस्त करून आहो उभयता सरदार व हुजुरातचे सरदार याचे मातबर मध्यस्तीत लष्कर यावे ह्मणजे खातरजमा पटेल तोपर्यंत उगेच बसणे उचित दिसत नाहीं तुह्मास सर्व समजतच आहे विशेष काय लिहिणे ? जाणिजे छ २४ रमजान हे विनती

☞ Raghunathrao offers to come himself and conciliate Balaji Janardan under conditions which Baburao Kane was deputed personally to explain and for which he was to stand guarantee

---

*No 404*] [21 October 1778

हरः विजयते

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन यासी,—**

पौ रघुनाथ बाजीराव नमस्कार विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणे विशेष आम्ही देशी आलो तुह्मी शफतपूर्वक खातरजमेचे पत्र पाठविले ते पावले त्यास चिरंजीव रा। माधवराव याच्या आमच्या कराराच्या यादी तुमचे माध्यस्तीने जाहाल्या आहेत, त्याप्रमाणे परस्परे निःकपट चालावे यात अतर करू नये तुह्माविसी वाकडे मनात किमपि नाहीं येविसी श्रीसांबाचें शफतपूर्वक बेलभडार हरि बलाल यांचपासी दिल्हा असे तुह्मास पावता करितील रा। छ २९ रमजान बहुत काय लिहिणे हे विनती

☞ Raghunathrao passes to Nana Fadnis a sacred oath of remaining friendly to him and to the new Peshwa Nana Fadnis had first similarly passed a sacred oath to Raghunathrao

---

*No 405*] [23 November 1778

श्री

**राजमान्य राजश्री कृष्णाजी रामचद्र कारदार ता। अवचितगड यांसी,—**

प्रति रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ तिसा सबैन मया व अलफ खासा स्वारी समेत इंग्रेजी सरजामसुधा पुण्यास जात आहे त्यास तुह्मी वसवास न धरिता तेथेच राहून बेगारी वगैरे सरजामाची तयारी करून ठेवणे आणि तुह्मी आपले कडील कारकून हुजूर पाठवणे जाणिजे छ १ जिल्काद × आज्ञाप्रमाण

☞ Raghunathrao asks the killedar of Avachitgad to supply labour and provisions to the writer in his expedition to Poona with the military help of the British

---

*No 406*] [2 February 1779

श्री

सेवेसी नारो माहादेव गद्रे मुकाम किले सिंहीगड सा। नमस्कार विज्ञापना ता। छ १४ मोहरम पावेतो सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष छ ११ मोहरमचे पत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की चिंतो विठल याची स्त्री किल्यावर आहे तिच्या वलगना फार होत असतात ह्मणोन आइकिण्यात येते त्यास ज्या घरात ठेविली असेल त्या घरातच आत असावे बाहेर येऊ नये तिचे भाषण दुसऱ्याचे कर्णश्रवणी न पडे असा बदोबस्त चागला करून ठेवणे

व सुमेरसिंगाचे लेकास सिधा दर रोज कोणते प्रतीचा पावतो तो लिहून पाठवणे ह्मणोन आज्ञा येसियास आज्ञेप्रमाणेच चिंतो विठल याचे स्त्रीचा बदोबस्त केला आहे सरकारचे वाड्यात आहेत सरकारचे कारखाने गलबलेचे दिवसात आले ते सरकारचे वाड्यात ठेविले व लोक पलोन आले व इग्रज तलेगावावर आला याचा हर्ष होऊन ( तीं ) वल्गना करीत असे व शाक भाजी पोचवाव यास कारकून जाई त्याजवलही मनस्वी भाषणें करीत असे इग्रज स्वामीचे प्रतापे करून नामोहरम होऊन माघारा गेला व कारखाने खालीं उतरोन जाऊ लागले व लोकाचे कविले खालीं गेले हे समजल्यानतर सर्वस्वे अन्नहार होऊन भाषण करावयाचे बद जाहाले आहे त्या दिवसापासून घरा तून बाहेर निघत नाहीं परतु सहज बोलणे ते विल्यापेक्षांही वाकडे, येसी बायको कोठे पाहिल्यात आली नसेल सुमेरसिंगाचे लेकास दर रोज सिधा कणिक येक सेर व दाल पावसेर व तूप दोन टाक येणे प्रमाणे सरकारचे आज्ञे प्रो पावत आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

☞ Naro Mahadev officer in charge of Sinhgad in reply to Nana's inquiry, explains the way in which Chinto Vithal's wife behaved under imprisonment and the rations that were being given to Sumersingh's son The letter is very interesting

---

*No 407* ] [ 11 February 1779

श्री

राजश्री गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेर बाहादूर गोसावी यासी,—

सकलगुणालकरण अखडित लक्ष्मी आलकृत राजमान्य स्नो रघुनाथ बाजीराव आसीर्वाद विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष आमचा व चिरंजीव राजश्री माधवराव नारायेण पत प्रधान याचा तह राजश्री तुकोजी होलकर व राजश्री माहादजी सिंदे याचे विद्यमाने होऊन आम्ही उभयता सरदारापासी आलों तुह्मास कलावे चिरंजीव राजश्री माधवराव नारायेण पत प्रधान व त्याचे कारभारी चिरंजीव राजश्री बाजीराव या उभयतानीं तीर्थस्वरूप कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब चालत होते त्याप्रो वर्तावे व चिरंजीव दौलतीचा बदोबस्त करितील त्यास तुह्मी अनुकूल असावे रा छ २३ मोहरम × बहुत काये लिहिणे हे विनती *

☞ Raghunathrao writes to Govindrao Gaikwad under what terms he had surrendered to the sardars Sindia and Holkar at Talegaon His son Bajirav was to act as Minister to the young Peshwa Madhavrao

---

* याच मजकुराचें तारखेचें व सिक्याचें पत्र रघुनाथरावानें येसाजी सिंदे सुभेदार यास लिहिलेलें आहे या पत्राचे शेवटीं व बाजूला ' लेखनावधि ' हा गोल सिक्का आहे यापूर्वीच्या पत्रात रघुनाथरावाच्या प्रधान शब्दाचा मोठा व लबगोल सिक्का होता

*No 408* ] [ 1 May 1779

श्री

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोबा नाईक कोह्ळे का। उज्यन स्वामींचे सेवेसी,—**

पो॥ हरि बाबाजी सा। नमस्कार विनंती उपरी यथील कुशल ता। छ १४ शाकर जाणून स्वकीये कुशल लिहीत आसावे विशेष आपणाकडून यैवज हुंड्याचा श्रीमंताकडे येणे त्यास हुंड्यात करार की रेवातीरास ग्वासा स्वारी आल्यास पधरा दिवसी यैवज देणे त्यास सांप्रत श्रीमंताची स्वारी नर्मदातीरास आली कुच्य दरकुच्य उज्यनीस येते तरी करारप्रा। हुंड्याचा यैवज सिध्य करून ठेवावा हुंड्या पा। आहेत उज्यनीच्या सुमारे येती तोवर यैवज तयार करून ठेवणे येथे रेवेच्या तीरास पाच सात मुकाम आहे तदनंतर उज्यनीनजीक यतील कळावे बहुत काय लि॥ लोभ कीजे हे विनंती मोतीराम व माधवराव हुंड्या देऊन पा। आहेत त्याचे पदरी यैवज घालणे हे विनंती

☞ Hari Babaji Ketkar officer in charge of Raghunathrao who was being removed to Jhansi, asks Naroba Naik a banker of Ujjain to keep cash ready for the drafts which were being despatched for the expenses of Raghunathrao

---

*No 409* ] [ 1779

श्री

यादी लग्नखर्च

राजश्री शाहूमहाराज याचे लग्न सन तिसा सबैनात जाले त्यास-

१६६७८ ||| यैन नख्त

| | |
|---|---|
| १ | सुरिकाबधन |
| १६ | पुण्याहवाचन दक्षणा |
| ११ | हरिद्रालेपन |
| २ | वाग्निश्चय |
| ५ | सुवर्णाभिशक |
| ११ | पत्रिकापूजन |
| १ | कंकण पूजन |
| १ | मंगळसूत्र समई |
| ३ | विवाहहोमास |
| २ | देवदर्शन |
| २ | आप्तवर्ग |
| ७ | गौरीहारास |
| १ | शचीपार्वतीस |
| ६४॥ | मुहूर्ती लग्नसमई |
| ४॥। | मुनमुख पहातेसमई |
| १॥= | रासनाहाणास |

२१॥। साज्याचे समई
२ देवकउत्थापन
३ सतका मातुश्री आईसाहेब याजवरून
२१०॥। मजुरीखर्च
२७४।≈। देहनगी खर्च वाजत्री वगैरे
१४७७। धर्मादाव खर्च
१५॥।≈ खैरातखर्च
२०॥ देवस्थानास
१४॥ वोवाळणी खर्च
१६६ तैवजखर्च
१४ खो। मधुपर्क
१२६। खो दारू
५०। रोशनाई खर्च दिवटीचे पोत व तपेली बुधल्या
४९।≈ बुरुडकाम
३० खो भाडी
२६३५ खो। जिनस गु॥ साबाजी कोठवळे
४३॥। रगमाळा व चौरग
३१॥ पुन्याहवाचन मधुपर्की
२ कैलासवासी शाहूमहाराजाचे तख्तास
३७।- गोंधळ कुलधर्माचा
१९२।≈।॥नारायेणजी मोहिते याजकडे कन्यादानाचे लग्नास
१६२०॥। किता
१००० नारायेणजी मोहिते
५०० सौ सखूबाई महाडकीण करवली यास
१२०॥। देहनगी
१०३३। दागिने सोन्याचे
८४७१८= खो कापड गु॥ रघोजी गोडकर

☞ Shahu the second who was adopted by Ramraja was crowned Chhatrapati at Satara on 11 Dec 1778 and was married soon after The expense of the marriage amounted to Rs 16678 and is detailed in this paper

---

*No 410* ] [ 19 May 1783

श्री

यादी गीर्दनवाई छ १७ जाकर सोमवार श्रीशकराचार्य स्वामीची स्वारी पुणियास येऊन मोतीबागेत पर्वतीनजीक उतरले होते हाली त्याची सरकारातून चिदाई जाहाली सा। आज प्रात काळीं कूच करून मौजे किकवीचे मुकामी समुदावसुधा मजलीस गेले

☞ The visit of Shankaracharya Swami to Poona and his departure are mentioned in this paper

---

*No 411* ]    [ 27 April 1783

श्री

यादी गीर्दनबाई छ २४ जावल सोमवार श्रीशंकराच्यारी स्वामी मठ कोलापूर प्रातांतून स्वारी येऊन मौजे घोरपडीनजीक विसाजी कृष्ण बिनीवाले याचे बागेत येऊन उतरले आहेत बरोबर सरंजाम येणेंप्रमाण

| | |
|---|---|
| १ | पालखी स्वामींची |
| ४० | ब्राह्मण समुदाव आा |
| ८५ | मऱ्हाटी माणसे |
| १ | हाती निशाणाचा |
| ३१ | घोडी ल्हाण थोर नगारखान्यासमेत घोडी रास |
| २ | कर्णेकरी माणसे पाईची |
| ६ | उटे नफर |
| १६ | बैल कोठीचे वगैरे |
| १ | गाय |
| १८३ | |

सदरहु सरंजाम स्वामी बरोबर येणे प्रा आहे

☞ The retinue of Shri Shankaracharya on his visit to Poona is detailed in this paper Men and animals all came to 183 in number

---

*No 412* ]    [ 29 April 1783

श्री

यादी गीर्दनबाई छ २६ जावल मगलवार. श्रीशंकराच्यार्य स्वामींचे दर्शनास तात्याची स्वारी प्रात काली प्रहर दिवसा उपरी गेली होती स्वामींचे दर्शन जालियावर विसाजी कृष्ण बिनिवाले याचे बागेत उतरले होते तेथून स्वामींचे कूच करऊन पर्वतीनजीक मोरोबा दादा फडणीस याचे बागेत येऊन उतरले आहेत तात्या दर्शन करून दोन प्रहरा माघारे आपले घरी भोजनास आले स्वामींचे स्वारीबरोबर तात्याचे चिरंजीव माधवराव व नारोपंत चक्रदेव उभयता होते बागेत स्वामींचा मुकाम जाहल्यावर माधवराव व नारोपंत चक्रदेव माघारे आपले घरी भोजनास आले

☞ The visits of Haripant Tatya and others to the Shankaracharya in Poona are mentioned

---

*No 413* ]    [ ?

श्री

सवेसी रामकृष्ण विज्ञापना येसीजे माझे भाऊ दिलीहून दोघे तिघे जण आले आहेत त्याच्या रोजगाराची सोई जाहाली पाहिजे त्यास साहेबी कृपालु होऊन शहर कसबे पुणें येथलि सबजी मडईचें काम सागावे सबजी मडई जाहालियास साहेबाची कीर्ते आहे वरकड शहरें दिली व बऱ्हाणपूर व आवरंगाबाद या शहरात मडईचा आमल चालत आहे, त्याप्रो मजपासून घेत जावा. कामकाज चालीस लागल्यानतरी सरकार किफायत माझ्याणे जी होईल ती करून दाखवीन.

तूर्त यैवज रुपये सरकारात सालिना खड भरता ५००० रुपये, साहेबाची नजर १००० रुपये येकूण ६००० साहा हजार याप्रों बशर्ते काम हारतेबदीप्रो घेत जावे येतद्विषईचा बदोबस्त चागला करून देविला पाहिजे हजारो रुपये खर्च करावे तेव्हा मडईची वसाहात होत्ये हें काम साहेबाच्या नावावर होऊन येईल यासिवाय हरजिनस भाजी सरकारात येत जाईल

☞ Sabji means green vegetables One Ramkrishna offers to open a vegetable market at Poona under certain stipulations and mentions its advantages

---

*No 414* ] [ 2 July 1788

श्री

जेष्ठ वद १४ बुधवार तिसरा प्रहरी नूर मा। खान याचे नावी टिपुसो याचे परवाना आले, त्यात लिहिल आहेत, की छ १३ रजब हजरताचे पैवस्ता जाहल आहे थोर दिवस जाणून छ मजकुरी किरस्तन वगैर बाइका व मूल पुरुष सहित पनास हजार माणुसास मुसलमान करून दिनात मिळवील हजरताचे पैवस्ता होऊन बारासे वरीष सुमार जाहले आजी पावेतो पादशहा व वजीर व अमीर उदड होऊन गेले, असा धर्मकार्य कोणी येकदा केले नाहीं साप्रतकाली खुदाचे फजलेन थोर नेक काम घडल ते दिवसाचे नाव ईदलमोईन ह्मणून ठेऊन अह्मी बहुत खुषी केली आहे तरी तेथ मुसलमान नेक असतील त्यास सागणे की हे वर्तमान येकताच खैरात करणे, आणि खुदायेताकचा हकात शुकुरगुजार * व दुचेंदा निमाज करून नवे कपडे लेऊन दरसाल छ १३ रजबी ऐसच खुषी कराव ह्मणून सागणे ह्मणून लिहिले आहेत मोगलाच लस्करातील वकिलासही हेचप्रा। लिहिल आहेत रुत होय

☞ This is a public request issued probably at Poona at the instance of Tipu Sultan for the celebration of the anniversary day of Mohammad Paigambar's death on 13 th day of the month of Rajab

---

*No 415* ] [ 1793-94

श्री

यादी नरसिंगराव कृष्ण सु। आर्बा तिसैन मया व अलफ तालुके अमदाबाद व स्वारी प्रा। काठेवाड येथील सिबदी व स्वार याची बक्षीगिरीची असामी विठल सदासिव याचे नावे आहे ती दूर करून साल मजकुरी आपणाकडे सागावी वतन साऊना

रुो

| | |
|---|---|
| १००० जातीस | बक्षीगिरीचे दरकसमधे |
| १००० पालखी व अफदागिऱ्या व दिवट्या मिळेन | रसद २५००० रुो |
| २००० | |

☞ The office of the Bikshi for Gujrat is conferred on Narsingrao Krishna on the specified emoluments

---

* शुकुर गुजारी=आभार प्रदर्शन

*No 416* ]  [ 1795 ?

श्री

याद राजश्री अमृतराव यास सांगावयाची

१ श्रीमंताजवळ बसून कामकाज करीत जावे व बंदोबस्त वाड्यातील व शहरचा पाहात जावा करीत जावा

१ कजिरे प्रकर्णांची याद पहावी या अन्वयें करावे व बातमी राखावी

१ कुंभारीचा बंदोबस्त बालाजीपंत फाटक याकडे सांगितला आहे बातमी राखीत जावी

१ मुंबैस रणसोडी वकील आहे बातमी नवल विशेष आणवीत जावी

१ फौज गाडदी ठविले त्याची याद त्याचे रोजमरी द्यावे

१ बातमी बारकाईने असावी

१ मानाजी शिंदे

१ मोरो हरि।

१ गोपाळ नाईक

१ आपाजीपंत

१ मबैकर वकील

१ फरासिसाचा वकील आला तर

१ त्रिंबक नारायण

१ ——————

१ वाजवी ताकीद पत्रें असतील ती देत जावी

१ मनसब्या कजिये वाजवी मनास आणून विल्हे लावीत जाणे

१ वाड्यातील बातमी कलवावी व सर्वांनी अमृतराव सांगतील त्याप्रोची करावे

☞ In this paper Nana Fadnis in his own hand lays down items of duties to be carried out at the Peshwa's palace, where he appointed Amritrao ( Pethe ? ) as officer in charge

---

*No 417* ]  [ 5 June 1796

श्री

पौ छ १ जिल्हेज अस्तमान

**अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गो, —**

सेवक चिमणाजी माधवराव प्रधान नमस्कार सु॥ सबा तिसैन मया व आलफ राजश्री बालाजी जनार्दन वाईस होते त्यास प्रतापगड रायगडाकडे गले ह्मणोन कळले त्यास तुह्मी किले सातारा येथील बंदोबस्त यथास्थित राखून सरकार लक्षात राहून खबरदारीने राहाणे × जाणिजे छ २८ जिलकाद आज्ञा प्रमाण

☞ Chimnaji Madhavrao Peshwa orders Baburao Krishna to keep a strong guard at the fort of Satara, since Nana Fadnis

had gone from Wai to Pratapgad

---

*No 418* ] [ 6 June 1796

श्री

पौ छ १ जिल्हेज मधरात्र

**अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गो यासी —**

सेवक चिमणाजी माधवराव प्रधान नमस्कार सु॥ सबा तिसैन मया व अलफ राजश्री बालाजी जनार्दन निघोन गेले त्याजबराबर पागा व पथके व हती वगैरे सरंजाम होता तो सातारियास आला आहे तो हुजूर पाठऊन देणे + जाणिजे छ २९ जिल्काद आज्ञा प्रमाण

☞ Baburao Krishna is ordered to send back to Poona all the retinue that Nana had taken with him The next two letters deal with the same subject

---

*No 419* ] [ 14 June 1796

श्री

पौ छ मोहरम

**अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गो,—**

सेवक चिमणाजी माधवराव प्रधान नमस्कार सु॥ सबा तिसैन मया व अलफ राजश्री बालाजी जनार्दन याचे हती च्यार व घोडी तटे मिळोन दाहा पधरा सातारियास आहेत म्हणोन हुजूर विदित जाहाले त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी मारनिलेचे हती च्यार व घोडी तटे असतील ती सरकारात पाठऊन देणे जाणिजे छ ८ जिल्हेज × आज्ञा प्रमाण

---

*No 420* ] [ 25 June 1796

श्रीशंकर

पौ छ ८ रबिलावल

**अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गोसावी यासी,—**

सेवक चिमणाजी माधवराव प्रधान नमस्कार सु॥ सबा तिसैन मया व अलफ राजश्री बालाजी जनार्दन निघोन गेले त्याजबराबर लोक गेले आहेत त्याची घोडी व चीजवस्त सातारियास राहिली आहे म्हणोन हुजूर विदित जाहाले त्याजवरून सरकारातून कृष्णाजी कोन्हेर कारकून पाठविले असेत तरी मारनिलेबराबर लोक गेले त्याची घोडी व चीजवस्त वगैरे सातारियास ज्याचे घरी असेल त्याचा शोध तुम्ही व हे लाऊन सरकारचे कारकुनाबराबर हुजूर पाठऊन देणे × जाणिजे छ १९ जिल्हेज आज्ञा प्रमाण

---

*NO 421* ] [ 25 August 1796

श्री

पौ छ ८ रबिलावल

**अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गो यासी,—**

सेवक चिमणाजी माधवराव प्रधान नमस्कार सु॥ सबा तिसैन मया व आलफ नीलकंठ

बाबूराव आमात्य मृत्य पावले सबब त्याचे बधु राजश्री सर्वोत्तमबाबूराव यास मजमूची वस्त्र श्रीमन राजश्री माहाराजाकडून देवावयाची व याचे वडिलाचे वेळेचे कर्जदार आहेत ते यास उपद्रव करितात त्यास ताकीद करून उपद्रव लागू न द्यावा व राजश्री रामचद्र सिवाजी व रा गंगाधर गोविंद यास मामिलेनी खते देऊन सरजामचे गाव लिहून दिल्हे आहेत, त्याची चौकसी होऊन कर्जाचा ठराव करून द्यावयाविसी आज्ञा जाली पाहिजे ह्मणोन पत आमात्य याजकडील कारकुनानी हुजूर विदित केले त्याजवरून हे पत्र सादर केले असे तरी तुह्मी श्रीमत माहाराजास विनती करून मजमूची वस्त्रे राजश्री सर्वोतम बाबूराव यास देवणे व येक साल साहुकाराचा तगादा मामिलेस लागो न देणे व काही साहुकाराचे हिसेबाचे लढे आसतील ते मनास आणोन वाजवी ठराव करोन देवणे जाणिजे छ १९ सफर × आज्ञा प्रमाण

☞ Sarvottam Baburao is appointed by the Peshwa to to succeed his deceased brother Nilkanth Baburao Amatya

---

*No 422*] [7 October 1796

श्री

पौ छ ९ राकर

**अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाबूराव कृष्ण गो यासी,—**

सेवक चिमणाजी माधवराव प्रधान नमस्कार सा॥ सबा तिसैन मया व अलफ तुह्माकरिता विजयादशमीचा पोशाग सनगे सुमारी

१ तिवट पैठणी
१ जाफरखानी पैठणी
२

येकूण दोन सनगे रामजी तावरा व भिवजी सकपाळ खिजमतगार याजबराबर पाठविली असेत घेऊन पावलियाचें उतर पाठविणे जाणिजे छ ५ रविलाखर × आज्ञा प्रमाण

☞ Boburao Krishna is presented with the usual customary dress for the Dassara by the Peshwa

---

*No 423*] [10 October 1799

श्री

पौ छ २२ जावल मयातैन

**राजश्री नाना गोसावी यासी,—**

सकल गुणालकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य, श्रो चतसिंग राजे भोसले दडवत विनंती उपरी येथील कुशल ता। छ १० जमादिलावलपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष आपणाकडून पत्र येऊन परामर्ष होत नाहीं त्यास असे नसावे निरंतर पत्रीं सांभाळ करीत असावा यानतर इकडील सविस्तर मजकूर राजश्री माहादाजीपंत यास समजला आहे ते आपल्यास श्रुत करितील ध्यानात आणोन खातरजमेने बरोबर घडोन यावा साराश स्वामींची आज्ञा आपले लक्षात चालावयाची आहे त्यास यासिसीचा आभिमान धरून कीर्ति करणे आपणाकडे आहे

आपले सिवाय आह्मास दुसरा विचार नाहीं मर्जीस येऊन आपण सागतील त्या अन्वये वर्तणुक करू बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनती

☞ Chatrasingh Bhosle brother of the Chatrapati offers his loyal services to Nana Fadnis and requests that proper provision should be made for his expenses

---

*No 424* ] [ 20 December 1802

श्री

**राजश्री अमृतराव साहेब गोसावी यासी,—**

सकळ गुणालकरण अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य श्री चत्रसिंग राजे भोसले दडवत विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपण राजश्री व्यासराव गोपाळ याजबराबर पत्र पाठविलें त्याजवरून व मशारनिलेचे सवानीवरून सर्व अर्थ समजण्यात आले राजश्री यशवतराव होलकर वस्त्रे आणावयाचे उदेशे आले आहेत तरी श्रीमत महाराज राजश्री छत्रपती स्वामीस विनती करून वस्त्रे याजवल द्यावी म्हणोन लिहिले त्यावरून तीर्थरूप राजश्री स्वामीस विनती करून वस्त्रे बहुमान राजश्री ¯यवकराव अमृतेश्वर व होलकर याजकडील राजश्री फत्तेसिंगराव माने याजवल मार्गसीर्ष वद्य येकादसी सोमवारी साहा घटिका रात्रीस दिल्हीं आपणास कलावे [ पुढे रेघ ओढलेली दिसत असल्यामुळें पत्र अपूर्ण दिसतें ]

☞ Chatrasingh Bhosle writes to Amritrao informing him of his having despatched the robes of Peshwa-ship from the Chhatrapati at the request of Holkar and others

---

समाप्त

# सूचि

( आकडे लेखांकाचे )


अंताजी नागनाथ- फत्तेसिंग गायकवाडाचा दिवाण- ७, २१
अनुपगीर गोसावी-२२५
अनूबाई इचलकरंजीकर-तोतयाशीं संबंध १८
अंबूजी इंगळे- १४५ ४८, १६०, १६६, १६८, १९९, १९९, २०० २४३
अमृतराव रघुनाथराव पेशवे- ४२४
अली बहादर- नानाकडून कानउघाडणी २५१, २५२
अहल्याबाई होळकर- नारो शिवदेवाची शिष्टाई १२०, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, महादजीशी भेट १३६, तुकोजीबद्दल तक्रार १९१, १९५
आनंदराव धुळप—इंग्रजांशीं समुद्रावर चकमक २३१
आनंदराव पवार—१३१
आनंदराव रास्ते—३१३
आनंदीबाई निंबाळकर—३, १६
आनंदीबाई पेशवे—धारची लढाई व दुःस्थिति ३८९, ३९०, खुबीदार पत्र ३९३
आबा चिटणीस—२२७
आबाजी महादेव—३१५
आबाजी रघुनाथ—महादजींचा चिटणीस ७, ८, ९, २६, ३७, ६०
इंग्रज—माळव्यांत युद्ध १२२, १२३, ग्वाल्हेर हस्तगत, १२४, १३५, माळव्यावर आक्रमण १४२, नाना फडणिसाची चढाई १४५, १४७, १४८, कुलारसची लढाई १६३, १७०, १७१, १८१, तहाची वाटाघाट १८२, नानाचा अविश्वास १८६, चेतसिंगासी बेबनाव १८८, महादजींशी तह १९६, २०३
इंद्रसेन—जागीर २०३, २२२-३
उधो वीरेश्वर चितळे, शिवनेरीचा किल्लेदार-३५८
कित्तूरकर देसाई—१
कृष्णराव काळे—३८७
कृष्णाजी पवार—१३१, १३३
केशव जगन्नाथ,—असीरगडचा किल्लेदार-महादजीस किल्ला देण्यास हरकत १०४, १९८
केसोपंत दातार—पराजय १०२, १२२, १३७
कोल्हापूर छत्रपति—( स्वारीचे तपशील महादजी शिंद्याचे नावाखालीं पहा ) पेशव्यांशीं तह ७६.
खंडेराव त्र्यंबक ओढेकर—आनंदीबाईशीं लढाई धारेस ३८९, ३९१
खुमानसिंग बुंदेला—२०५, राज्याच्या खटपटी २९३
गंगाजी आव्हाड—२६, ६१
गंगाधर गोविंद खेर ( बुंदेले )—१३५, १६३, १८१, १८८, १९४
गंगाधर यशवंत चंद्रचूड—पेशव्याचा हुकूम ३१५
गंगाबाई पेशवे—मृत्यूचा अभिप्राय २०, ३४०, ३४४, ३५६ ५८, ३६३, प्रसूति व नामकरण ३६४-६६
गणेशपंत बेहेरे पेशव्याचा सरदार—१०२, १४५, १८५
गाडर्ड— इंग्रज पहा
गिरमाजी मल्हार—१८२
गुमानसिंग बुंदेला—२०५, २९३
गुलराज वकील—पेशव्यास पत्र ३०१
गुलाम कादर—२२५
गोपाळशास्त्री—कोल्हापुरकराचा वकील २२
गोपाळ संभाजी –पिंपळोद्यावर नेमणूक १९३, नानाकडे भेलसे महालाच्या अव्यवस्थेची तक्रार २०६, २०९, २१०, २११, २१३, २१४, पुत्र धोंडो गोपाळ २५५, २५८
गोपिकाबाई — ३१३
गोविंद कृष्ण—कमावीसदार ३०९
गोविंद गोपाळ, गायकवाडाचा दिवाण-१३०
गोविंद तमाजी—जैपुरास वकील २८७
गोविंद बल्लाळ बुंदेले – अंतरवेदींतील कामगिरी २८७, २८८
गोविंदराव गायकवाड—२१, १२८, १३०, तळेगावावर रघुनाथरावाचें पत्र ४०७

गोहदचा राणा ( छत्रसाल )— १६२, १६५, १७१, १८२, १८३, १८४, १९४, महादजीची चढाई २३४
घाशीराम—२९२
चर्तसिंग भोसले—नानास विनती ४२३, अमृतराव पेशव्यास विनती ४२४
चद्रराव पवार—१०६, १०७, १०८
चिंतो विठ्ठल—दादाचा पक्षपाती २०, २२, ६५, ११४, कैदेंतून पलायन १२४-२७, चुलत्या पुतण्यात मध्यस्थी ३१५, ३२२, ३६०-६२, बायकोच्या वलाना ४०६
चिमणाजी खंडेराव—महादजीचा वकील गोहदकराशी वाटाघाट १८२-८४
चिमणाजी माधव पेशवा—४१७-४२२
चेतसिंग—इंग्रजाशीं बेबनाव १८८, १९०
जगतराज बुंदेला—मृत्यु २९३
जनकोजी शिंदे—पेशव्याचें कर्ज वारण्याचा करार २९२, २९९.
जनार्दन गोपाळ—२५८
जयसिंग सवाई—बाजीरावावर लोभ २६२-६४, २६७, २७१
जाबितजंग धौशा रुक्नुद्दौला, निजामाचा सरदार—८, ९, ३१, ३४, ३६, ३७, ५४, ६६, ६७, ३८७
जिवबादादा बक्षी—६०
टिपू सुलतान— जनरल मॅथ्यूजचा पाडाव २२४, चढाई २३०, २४५, पुण्यास पैगंबराचा उत्सव ४१४
तुकोजी होळकर—सिंद्याच्या कामगिरीशी तुलना १, ३५, महादजीचा टोमणा ३६, ६६, ७३, मोरोबादादाच्या फितुराची उभारणी ७४, ७७-७८, ८५, पुणे दरबारकडे मागण्या १०४, ११८, नारो शिवदेवाची शिष्टाई १२०, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, १४५, १८५, अहल्याबाई बद्दल तक्रार १९१, १९५, २४०, कपिलाषष्ठीची यात्रा २४९-५०, दिनचर्या, २५३, पुण्यात फितूर ४००
त्रिंबक नारायण, नारो शंकरचा पुत्र —५७, ४१६
त्रिंबकराव मामा पेठे—३५२, ३५३, मृत्यु ३५७
दादाजी गंगाधर होळकराचा कारभारी —११४
दिलीप सिंग, जयसिंगाचा चाकर—२६२
दुर्गाबाई, कोल्हापूर छत्रपतिची राणी—३७, ५१
देवराव हिंगणे—१३५
देवास—येथील पवार दोन पातींचा उगम १३१
धारराव शिंदे—६०, ६३
धोंडो गोपाळ, गोपाळ सभाजीचा पुत्र, पिंपळोद्याचा जाहागीरदार —२५४-२५५, २५८
धोंडो भीवराव, नानाचा हेर महादजी जवळ—८ व पुढची पुष्कळ पत्रें लिहिणारा
धौशा—जाबीत जंग पहा
नजफखान—११२, १२२, १२३, १३५, १३९, १४५, महादजीशी सधान १५८, १५९
नरसिंगराव कृष्ण— अमदाबादची बक्षीगिरी ४१५
नागोजी शिंदे— ३२०, ३४०, ३४१, ३४८, ३४९, ३५५—५७, ३६३—६५
नादीर शाहा— २६५, २६६, २६७, २७०
नाना फडणीवीस— तोतयाच्या प्रकरणातील खोचदार जबान्या १७-१९, कैद केल्याची अफवा २० व २२, गृहकृत्याचा अभिप्राय २०, स्वभावाची फोड २३, २८, तोतयाचे प्रकरणीं इंग्रजाची मध्यस्थी ८६, महादजीशी भेट ८७, पुण्यास अस्वस्थता ९०, तोतयाकडील धामधूम ९२, तोतयासबधीं जबानी ९३, हेराकडून धोक्याची खबर ९९, १०१, महादजीची दिलसफाई १०५, दिल्लीची बातमी व चौकडीचें कारस्थान ११२, कोल्हापुरची तक्रार ११५, ११६, ११७ गुजराथची बातमी ११८, १२२, माळव्यातील युद्धाची वाटाघाट १२३, इंग्रजास ग्वाल्हेर हस्तगत १२४, चिंतो विठलाचें पलायन, फिरून अटक व कैद १२५-२७, राजकारणी पत १२९, देवासच्या दोन पातींचा उगम १३१, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, कारभाराची अनास्था १३७, बुंदेलखंडची

व्यवस्था १४१, वसई इंग्रजांकडून हस्तगत १४४, इंग्रजांवर उठाव १४५, इंग्रजांवर अविश्वास १८६, चेतसिंगास मदत १९०, होळकराच्या तक्रारी १९१, बाबूराव भास्कराची लाघवी पत्रें १९९-२०२, गोपाळ सभाजीची तक्रार २०६, २०९-२११, पेशव्याच्या लग्नासाठीं बऱ्हाणपुरी कापड २१९, राज्यकारभाराचे मुख्य प्रश्न २२०, उत्तर हिंदुस्थानातील सुका मेवा २४७, अलीबहादरची कानउघाडणी २५१, पानपत स्वारींत बायको घेण्याचें कारण २९५, सुदर चित्राचा शोक ३००, ३०२, ३०४,[1] ६०५, माधवरावाचीं पत्रें ३०६, ३०७-८, ३१०, ३११-१३, राघोबादादावर देखरेख ठेवण्याचा हुकूम ३२१, माधवराव पेशव्याकडून शाबासकी ३२३ व ३२७, ३२९, ३३२, ३३९, ३४१, दादाची कर्नाटकात स्वारी, ३४२, ३४६, ३४८-४९, ३५०, ३५२-५४, ३६४, छत्रपतीकडून सूचना सावध राहण्याची ३८२, बाबूराव कृष्णास दग्याची सूचना ३८३, ३८४, ३८८, ३९०, आनंदीबाईचे हाल ३९३, रघुनाथरावाची नरमाई ३९४ व ३९६, सखाराम हरीचा बदोबस्त ३९५, रघुनाथरावाची शरणागति ४०३-४०४, पुण्याची मडई ४११, पैगंबराचा उत्सव ४१४, बालपेशव्याचा बदोबस्त ४१६, चतसिंग भोसल्याची विनती ४२३

नारायणराव पेशवा, मातुश्रीस पत्र—३२४, ३२८

नारो कृष्ण दरवे, बऱ्हाणपुरचा सुभा—१६१

नारो गणेश, होळकराचा कारभारी—११४,१९५

नारोपत फाटक, नारायणरावाचा गवई—२९५

नारो शकर, सिंद्याचा वकील—७५, ७९,८१

नारो शिवदेव—नानाचा वकील महादजीजवळ ४, ५, बधूचा मृत्यु ६, १२, १४, १५, २२, २६, ३२, ४९, ५६, ५९, ६०, ६२, मोरोबादादाचा फितूर ७४, करवीरचा तह ७६, तोतयाचा पाठलाग ८३ व कबजा ८४, तोतयाचे प्रकरणात इंग्रजाचा हस्तक्षेप ८६, तोतयाचें पुण्यास आगमन ८७, पुण्यास अस्वस्थता ९०, १०४, महादजीची दिलसफाई १०५, गुजरातची स्वारी १०६, १०७-९, गुजरात युद्धाची बातमी ११३-१४, अहल्याबाईकडे शिष्टाई १२०, युद्धाची वाटाघाट १२३, १२४, १२५, राजकारणी पत्र १२९, देवास दोन पातींचा उगम १३१, १३२, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, राज्यकारभाराची अनास्था १३७, इंग्रजाचें आक्रमण १४२, १४५, दक्षिणेस प्रयाण १५०, १५४, १५५, १७६, १८३, तहाची वाटाघाट नानास कळवितो १८४, १८५, २१२, राज्यकारभाराचे प्रश्न २२०

निजाम अलीखान—जकात माफ १७३

निजाम उल् मुल्क—बाजीरावाकडे तक्रार २६९, २७०, ३८७

परशुरामभाऊ पटवर्धन—१३२, १५६, ३८६

पांडुरग रघुनाथ, नानाचा कारकून—१५७, १६०, १६३, १६६, १६७, १७०, १७५, १७८, १७९, १८१

पाराशर दादाजी, होळकराचा सरदार—१०६, १०७, १०८, १५६

प्रतापसिंग रावराजा माचेडीकर—२४३, २४४

फत्तेसिंग गायकवाड—१०८, १२८, १३०

बजाबा पुरंदरे—२०, ३८२, पुण्यात फितूर ४००

बहिरोपंत, होळकराचा कारकून—लबाडी १९५

बहिरजी ताकपीर, महादजीचा जावई—६७

बळवंतराव धोंडदेव—१३७ १४५, १४८, १५०, १६६, २१२

बाजी गोविंद, पेशव्याचा सरदार—९, १०

बाजीराव बर्वे, दादाचा साथीदार—४५

बाजीराव बल्लाळ पेशवा—त्र्यंबकजीरामाचें पत्र, दिल्लीचें कारस्थान २६२, २६४, नादीरशाहचें वर्तमान २६५-६७, शाहूची दिल्ली राजकारणाबद्दल सूचना २६८,२६९,२७०, भिंग्याचा बदोबस्त २७२, २७३, २७४, २७६, मस्तानीस पकडण्याचा कट २७५

बापूजी बल्लाळ फडके—पानिपत स्वारींतील बातमी २९६, २९७

बापूजी महादेव हिंगणे — मृत्यु २३७, ३१९
बापूजी रघुनाथ, सदाशिव दिनकराचा भाचा, नानाचा कारकून—१४८, १५४, १६४
बापूजी शामराज, कोल्हापूरचा वकील—३७, ३९, ४०, ५६, ५७, ६०, ६६, याचा भाऊ आपाजी श्यामजी ३८८
बाबाराव निजामाचा वकील—२५२
बाबूजी नाईक--गळाठ्यात २१, ३८७
बाबूराव कृष्ण आपटे, किल्ले बोधनचा फडणीस व साताराचा कारभारी —२९८, ३०५, ३१६, ३१७-३१८, ३२०, ३२९, ३३९, गंगाबाईचें पत्र ३४०, ३४४, खुबीदार वर्तन ३४५, ३४८-४९, ३५५, ३६३-६५, छत्रपतींची सूचना नानास ३८२, दग्याची सूचना ३८३, नाना फडणिसास अटक अटक करण्याचे हुकूम ४१७-४२२
बाबूराव कोन्हेर कोल्हटकर—झाशीच्या मामलतीचा करार २९४
बाबूराव नारायण, गोविंदपंत बुंदेल्याचा भाऊ-२९३
बाबूराव केशव, नानाचा हस्तक-१४३
बाबूराव भास्कर (मेहेंदळे?), पेशव्याचा कमावीसदार बुंदेलखंडात—१४१, लाघवी पत्रें २०२ व २०५, २०८, २१५, २१७, २२१, २४५
बाबूराव मल्हार बर्वे, दिल्लीस पेशव्याचा वकील २६५, २६८, २६९
बाबूराव वैद्य—होळकराकडे शिष्टाई १२०
बाळाजी गोविंद बुंदेले—१५४, १९९, २००, २२१, बुंदेलखंडावर शुर्जाची चढाई २३६
बाळाजी बाजीराव पेशवे—उत्तरेतून आरसे मागवितो २७७, छत्रपति रामराजाशी संबंध २८१, निजामाशीं किल्याची अदलाबदल २८२, २८६, २९०, जंजिरा हस्तगत करण्याचा प्रयत्न २९१, कर्ज वारण्याविषयीं शिंदे होळकराशी करार २९२, बुंदेलखंडातील परिस्थितीची फोड २९३, पानिपत स्वारींतील महत्वाचें वर्तमान २९६, २९८
बाळाजी विश्वनाथ—शाहूस पत्र २६०
बाळाबाई, महादजीची कन्या— शितोळ्याशीं लग्न ७, ९, ५६
बाळाराव गोविंद, महादजीचा कारभारी—३, ४, ७, ८, लग्न ९, १०, १६, २०, २२, २३, ३१, कोल्हापूर स्वारीतून परत ४०, लढाईत हल्ला ५६, ५९, ६०, ७५, ८६, ९९, आजार १०७
बाळोबा पागनीस शिंद्याचा सरदार—९८, १७०
भगीरथराव शिंदे—१०६, १०७, १०८
भवानराव प्रतिनिधि—अत्यवस्थ २१, ३५१, ३५२, ३५३, ३८२
भीवराव यशवंत पानसे—८३, ९०, ३९७
मनसूरशहा बीडकर फकीर, महादजीचा गुरु—२९, ६०
मयाराम वकील—२६९
मल्हारराव पवार, उदाजीचा नातू—६८
मल्हारराव होळकर—पेशव्याचें कर्ज वारण्याचा करार २९२
मस्तानी—महत्वाचा घाट २७५
महमदखान बंगश—२६६
महादजी शिंदे—होळकराच्या कामगिरीशी तुलना १, सासवडजवळ दगा २, ऋतुप्राप्तिचा समारंभ ४ व ९ व १०, त्वेषाची तक्रार ५, ८, ९, १०, ११, स्वभावाची फोड १४ व १५ व २२, उमेदीचें भाषण २६ व ३०, एकांत २७, गुरूचा रोष २९, हरिपंतास पत्र ३१, कोल्हापुरवर चढाई व सलुखाचीं सूत्रें ३४, लढाई ३६, कोल्हापुरावर चढाई व होळकराचा द्वेष ३७, लढाई ३९, ४१, ४४, लढाईची स्थिति ४५, तर्तूद ४६,-४८,-५२, कोल्हापुरची हलाखी ५८, कोल्हापुरचा वेढा ६३, ६५, खाजगी चर्चा नानाबद्दल ६९, ७३, दादासाहेबाकडे संधान ७५, करवीरचा तह ७६, हरिपंतास पत्र ८०, तोतयाचा पाठलाग ८३ व कबजा ८४, दादासाहेबाचा डाव ८५, तोतया पुण्यास ८७, पुण्यात एकांत ९५, ९७, ९८, पुणेदरबारकडे १०४, नानाकडून दिलसफाई १०५, गुजरात स्वारी १०६, ११८, माळव्यातील मोहीम १२२

ग्वाल्हेर इंग्रजास हस्तगत १२४, चितो विठलाचें पलायन १२५-२७, राजकारणी पत्र १२९, माळव्यातील राजकारणाचो स्पष्टता १३४, अहल्याबाईची भेट १३६, कारभाराची अनास्था १३७, राणेखाना कडून कान उघाडणी १३८ व १४०, इंग्रजाचें आक्रमण १४२, मोहिमेची सूचना १४५, इंग्रजाना अटकाव १४७, इंग्रजाशी लढाई १५० व १५३, नजफखानाशी सधान १५८, १५९, कुलारस एथें इंग्रजाचा पराभव १६३ व १६६, निजामास जकातमाफ १७३, माळव्यातील दुर्दशा १७८, तह्याची वाटाघाट १८२, चेतसिंगास मदत १९०, इंग्रजाशी तह १९६, ग्वाल्हेर काबीज २२७-२८, २३१, महादर्जीची अचूक निशाणबाजी २३८ जयपूरची खडणी वसूल २४४, दिनचर्या २५३

महादजी शिंदे तोरगळकर — याचा उपद्रव ३३

महादाजी बल्लाळ गुरुजी — महादर्जीची भेट ३, ४, ५, ७, ८, ९, १०, ११, १६, २१, २४, कोल्हापूर स्वारीतून परत ४०, ९५, नानाचा ध्यास ३०६

माधवराव गंगाधर चंद्रचूड—२२७

माधवराव नारायण पेशवे—पत्र ४०१, ४०२

माधवराव पेशवे थोरले— नानास पत्र ३०६ ८, ३११ १३, ३१४, ३१६ २० दादावर देखरेख ३२१, नानास शाबासकी ३२३, ३२७

मानाजी शिंदे — लढाईतून पळ २८, हैद्राकडून गौरव, बायको कैद ४१, ६१, ६९, पराभव १७४, १७९, १८५, याच्यावर नजर ४१६

मीरखान टोके, सरंजामदार—बापाच्या पश्चात् सरंजामप्राप्ति १३

मीर्झा जगली शहाजादा, शुजा उद्दौल्याचा पुत्र-२२५, पुण्यास मुक्काम २५६

मुरारराव घोरपडे—३५१

मोरो बापूजी फडके, हरिपंताचा पुतण्या-१८,९३

मोरोबा दादा फडणीस — २०, २२, ७०, फितूर ७४, ९४, २९९, ३३०, ३३३, ३३४, कर्नाटक स्वारी ३३६-३७, ३४१, मुलाचा व्रतबंध ३४३, ३४७, ३४९, ३५८, ३६२, ३८२, ३८७ पुण्याचा फितूर ४००

मॅक्फर्सन्—पुण्यास भेट ८२

म्यूर् कर्नल् — इंग्रज पहा

यशवंतराव पवार- २९२

येसाजी शिंदे, कोल्हापुरचा कारभारी - १, ३, ६, ७, ९, १०, सल्ला २४, लढाई ३६, ३७, ४५, ४९, ५१, ५९, ६२, ६६, ६८, तह ७६, ९५, १०००, १०१, नानाकडे तक्रार ११५-१७, कोल्हापुरचा तह १९७, पटवर्धनाशीं तह ३८८

रखमाबाई होळकर, तुकोजीची बायको—१९५

रघुनाथराव दादा पेशवे—७५, ७८, ७९, तोतयाच्या बडाव्याचा फायदा ८५, वास्तव्य २२९, प्रायश्चित्त २३२, गोविंदपंत बुंदेल्याची कामगिरी २८७, २९०, ३०२, ३११, ३२३, कर्नाटकात स्वारी ३३१, ३३३, सखाराम बापूचा उपदेश ३३५, ३३६, ३४२, ३४५, ३४७, ३५२-५४, ३५६, सखाराम बापूस वळविण्याचा प्रयत्न ३५९-६१, ३८१, ३९२, ३९३, नरमाई ३९४, ३९६-९७, नाना फडणीस व बाल पेशवा यास कैदेचा घाट ३९८-९९, पुण्यास द्वाही ४००, शरणागति ४०३-४०४, ४०५, तळेगावावर स्वाधीन ४०७

रघुनाथ हरि नेवाळकर—२०२, २१५, २२१, बुंदेलखंडावर शुजाची चढाई २१६,२२६

रघुजी आंग्रे—८६

रघुजी भोसले—२७०

रखोजी शिंदे—साबाजीचा नातू २१८

राघोपंत गुरुजी—१४६ अ

राणेखान भाई—३, ८, ९, २४, २६, २७, ३५, ३८, ४४, ६०, ८४, ८६, महादजीची कानउघाडणी १३८, १५०, १६७, १६८, १७५, २४१

रामचंद्र गणेश कानडे पेशव्याचा सरदार—९,

कोल्हापुरच्या लढाईत ४५, ५५, ९५, ११९, १३७, मृत्यु १४४, ३३१
रामचद्र नाईक पराजपे – तोतयाची सुटका १९, ८९, ९२
रामचद्र नारायण गोरे—३२८, ३४३
रामराजा छत्रपति—नानास धोक्याची खबर देतो ९९, व ३८२, पेशव्याशी सबध २८१, ३१०, ३६६-६७
रायाजी पाटील—२६, ३४, ६०, १२५, २४४
रुक्नुद्दौला—जाबीतजग पहा
लालजी बल्लाळ गुळगुळे —१६६
वामनराव पटवर्धन—कर्नाटक स्वारी ३५०-५१, ३५२, ३८६
विसाजी आपाजी आठवले—१०६, ११३, ११४, १२२
विसाजी केशव लेले—वसईवर हरामखोरी १४४, ३६१
विष्णु महादेव, नानाचा हस्तक—१९०, ३७५
व्यकाजीराम वकील—२६२, २६४
शकराचार्य कोल्हापुरचे—पुण्यास आगमन ४१० ४१२
शहा आलम—१३५
शाहू छत्रपति (पहिल)—आशानदास मोकासा २५९, २६०, दिल्लीच्या राजकारणाबद्दल सुचना २६८, प्रमुख दरबारी व्यक्तींची यादी २८०
शाहू छत्रपति (दुसरे)—लग्न व खर्च ४०९
शिवराव हरि नेवाळकर—१६३, १८१, १९४
शिवाजी आपाजी पराजपे, रत्नागिरीचा किल्लेदार-तोतयाच्या सुटकेची जबानी १७-१९, बेड्या घातल्या ८८
शिवाजी विठल विंचूरकर—८, ३७, पुत्राचा मृत्यु १११, १३७, १४३, १६५, १४८, १५०, १६१, १९४
सखारामपत कोल्हापुरचा वकील पुण्यास—१००, १९७
सखाराम भगवत (बापू)—सामवडचे वाड्यात शिंदाची जती २, २०, २२, बायको आजारी ३४, पत्रें ८१-८२, ९९, ३०२, ३०३, माधवराव व दादासाहेब यांची मध्यस्थी ३१५, ३३५, रघुनाथरावावर भक्ति ३३५, ३४१ ३४८-४९, ३५२-५४, ३५५-५७, दादासाहेबाकडील सदर्भ ३५९ ६१, ३८७, ३८८, आनदीबाईचें खोंचदार पत्र ३९० व ३९३, ३९६
सखाराम हरि गुप्ते— घनगडावर सक्त कैद-३९५
सखूबाई, जयापाची बायको — नातीचें लग्न ६
सगुणाबाई पेशवे—२८८
सटवोजा भोसले, कोल्हापुरचा सरदार- ३४, ३६, ३७, ६८, ३९, ४५, ४९, ५१, शकराचार्यांचा मठ लुटला ५७, ६३, ६८, १३१, १८५
सदाशिव दिनकर, पेशव्याचा वकील मिंयाजवळ-१४, २२, २६, ३२, ९६, गुजरात युद्धाची बातमी ११९, दक्षिणेंत प्रयाण १५०, १८०, १८९, होळकराच्या तक्रारी १९१
सदाशिव पवार, देवासकर — १३१, १३३ हिशोबाची भानगड १४३
सदाशिव मल्हार, महादजीचा बक्षी—८, १४०, १४२, १४५, १४६, १४७, १६०, १६३, १६७, १६८, १८१, १९४, २३७
सदाशिव रघुनाथ केळकर, नानाचा वकील महादजीजवळ— ११, २३
सदाशिवराव भाऊ— नाना फडणिसास स्वारींत घेण्याचें कारण २९५
सर्वोत्तम बाबूराव अमात्य—नेमणूक ४२१
सुमेरसिग— लेकाचे हाल ४०६
साहेबखान टोके —२४१
हरकूबाई होळकर— नानास पत्र- १२१, १९५
हरिपत फडके— हैदरावर स्वारी ८, ९, स्वभावाची खोच २३, महादजींचें पत्र ३१, ९६, १४५, १५६, ३४९, ३५५, शकराचार्यांची भेट ४१२
हरि बाबाजी केतकर, शिंद्याचा सरदार— ५५, ६७, ६०, ६२, ६४, ९४, दादासाहेबास झाशीस नेतो ४०८
हैदरअली— १, ८, ९, मसलत २१, ३१, हरिपताशी लढाई ३९, करवीरकरास धीर ४५, ५९, ६६, ६७, ६८